म ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. ७६२

REFBK-0008945



स्वामीभक्त कै. ग. व. मुळेकर

# प्रस्तावना

१. आमचे प. पू. वडील कै. गणेश बल्लाळ मुळेकर यांनीं इ. स. १८९७ चे सुमारास श्रीअक्कलकोट स्वामी महाराजांची माहिती ठिकठिकाणांहून गोळा करून, व त्या पूर्वी वर्तमानपत्रांतून आलेली सर्व माहिती मोठ्या प्रयासानें संकलित करून, त्यांचें चरित्र प्रसिद्ध केलें. त्या नंतर इ. स. १९०४ मध्यें द्वितीयावृत्तीही निघाली. तींत म्हणण्यासारखा असा कांहींच फेरफार केला नाहीं. त्यावेळीं श्री. माधवशास्त्री यांनीं संस्कृतांत लिहिलेलें एक चरित्र प्रसिद्ध झालें होतें. तसेंच श्री. भागवत यांनीं लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध झालें होते. तसेंच आमचे वडिलांनीं श्रीस्वामीमहाराजांचें चरित्र प्रसिद्ध केल्यानंतर ही आज ७–८ प्रकाशनें दुसरीं झालीं आहेत. परंतु आमच्या वडिलांनीं ग्रथित केलेल्या माहिती इतकी परिप्लुत दुसऱ्या कोणत्याही प्रकाशनांत दिसत नाहीं. सदर चरित्र आतां फारच दुर्मिळ जहालें आहे, व त्याची मागणी सर्व महाराष्ट्रांत आहे, हें ध्यानीं घेऊन आमचे वडिलांनीं लिहिलेल्या सदर चरित्राचें पुनर्मुद्रण करण्याचें ठरविलें. महाराजांचे प्रयाणानंतर श्रीबाळाप्पा महाराज, श्रीतात महाराज, श्रीआनंदनाथ महाराज, श्री बीडकर महाराज, दादरचे श्री बाळकृष्ण महाराज ( सुरत ) वगैरे महाराजांचे भक्तांनीं भक्तिभावाचा प्रवाह जिकडे तिकडे कसा फारच वाढविला आहे, हेंही दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ ग्रंथ छापून आज सुमारें ६० वर्षें झालीं असल्यामुळें कालानुरूप ठिकठिकाणीं किंचित् शब्दफेरफार केला आहे. तरीपण अर्थहानी होऊं दिली नाहीं.

२. महाराजांचे चरित्र ७ भागांत व परिशिष्टांत दिलें आहे. तसेंच दरेक पॅरिग्राफासही थोडक्यांत शीर्षक दिलें आहे. त्यामुळें आगामी विषयाचें सूचन होतें. अशा रीतीनें सर्व माहितीची संगति लावण्याचा प्रयत्न यांत केला आहे. अनावश्यक व द्विरुक्ति भाग शक्य तितका काढून टाकला आहे. शक्यतों ग्राम्य शब्दप्रचार टाळण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांच्या मुखांतून आलेलीं अध्यात्म, धर्म, जीवन, भक्ति, शास्त्र, व्यवहार वगैरे संबंधी बोधवचनें जाड्या टाइपांत दिलीं आहेत. मूळग्रंथ हा १९ वें शतकाचें अखेरीस लिहिला गेला आहे म्हणून त्या वेळच्या परिस्थितीचें वर्णन ठिकठिकाणीं आलें आहे. हें सुबुद्ध वाचक जाणतीलच. मूळ ग्रंथांची भाषा फार जुनी असल्यामुळें प्रुफें तपासतांना फारच तारांबळ उडत असे. सर्व भाषा सुधारणें शक्य नसल्यामुळें, अनेक चुका राहून गेल्या आहेत.



स्वामीभक्त कै. ग. ब. मुळेकर

# प्रस्तावना

१. आमचे प. पू. वडील कै. गणेश बल्लाळ मुळेकर यांनीं इ. स. १८९७ चे सुमारास श्रीअक्कलकोट स्वामी महाराजांची माहिती ठिकठिकाणांहून गोळा करून, व त्या पूर्वीं वर्तमानपत्रांतून आलेली सर्व माहिती मोठ्या प्रयासानें संकलित करून, त्यांचें चरित्र प्रसिद्ध केलें. त्या नंतर इ. स. १९०४ मध्यें द्वितीयावृत्तीही निघाली. तींत म्हणण्यासारखा असा कांहींच फेरफार केला नाहीं. त्यावेळीं श्री. माधवशास्त्री यांनीं संस्कृतांत लिहिलेलें एक चरित्र प्रसिद्ध झालें होतें. तसेंच श्रीं. भागवत यांनीं लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध झालें होते. तसेंच आमचे वडिलांनीं श्रीस्वामीमहाराजांचें चरित्र प्रसिद्ध केल्यानंतर ही आज ७–८ प्रकाशनें दुसरीं झालीं आहेत. परंतु आमच्या वडिलांनीं ग्रथित केलेल्या माहिती इतकी परिप्लुत दुसऱ्या कोणत्याही प्रकाशनांत दिसत नाहीं. सदर चरित्र आतां फारच दुर्मिळ जहालें आहे, व त्याची मागणी सर्व महाराष्ट्रांत आहे, हें ध्यानीं घेऊन आमचे वडिलांनीं लिहिलेल्या सदर चरित्राचें पुनर्मुद्रण करण्याचें ठरविलें. महाराजांचे प्रयाणानंतर श्रीबाळाप्पा महाराज, श्रीतात महाराज, श्रीआनंदनाथ महाराज, श्री बीडकर महाराज, दादरचे श्री बाळकृष्ण महाराज (सुरत) वगैरे महाराजांचे भक्तांनीं भक्तिभावाचा प्रवाह जिकडे तिकडे कसा फारच वाढविला आहे, हेंही दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ ग्रंथ छापून आज सुमारें ६० वर्षें झालीं असल्यामुळें कालानुरूप ठिकठिकाणीं किंचित् शब्दफेरफार केला आहे. तरीपण अर्थहानी होऊं दिली नाहीं.

२. महाराजांचे चरित्र ७ भागांत व परिशिष्टांत दिलें आहे. तसेंच दरेक पॅरिग्राफासही थोडक्यांत शीर्षक दिलें आहे. त्यामुळें आगामी विषयाचें सूचन होतें. अशा रीतीनें सर्व माहितीची संगति लावण्याचा प्रयत्न यांत केला आहे. अनावश्यक व द्विरुक्ति भाग शक्य तितका काढून टाकला आहे. शक्यतों ग्राम्य शब्दप्रचार टाळण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांच्या मुखांतून आलेलीं अध्यात्म, धर्म, जीवन, भक्ति, शास्त्र, व्यवहार वगैरे संबंधी बोधवचनें जाड्या टाइपांत दिलीं आहेत. मूळग्रंथ हा १९ शें शतकाचें अखेरीस लिहिला गेला आहे म्हणून त्या वेळच्या परिस्थितीचें वर्णन ठिकठिकाणीं आलें आहे. हें सुबुद्ध वाचक जाणतीलच. मूळ ग्रंथांची भाषा फार जुनी असल्यामुळें प्रुफे तपासतांना फारच तारांबळ उडत असे. सर्व भाषा सुधारणें शक्य नसल्यामुळें, अनेक चुका राहून गेल्या आहेत.

शुद्धिपत्र देऊनहि भागत नाहीं, म्हणून आमचे वाचकवर्गास या बद्दल क्षमाशील होण्यास नम्र विनंती आहे.

३. महाराजांच्या प्रयाणानंतर त्यांचा भक्तगण अतिशयच विस्तृत झाला आहे. तरीपण जाहिरात करूनही महाराजांची फारशी खात्रीलायक माहिती उपलब्ध झाली नाहीं. व जी मिळाली त्यांतील योग्य वाटली तीही माहिती यांत समाविष्ट केली आहे.

स्वामीभक्त चोळाप्पा यांचें मूळ ग्रंथांत विखुरलेलें चरित्र एके ठिकाणीं दिलें आहे. श्रीबाळाप्पाचें मूळ ग्रंथांतील चरित्र उत्तरार्ध घालून तें पुरें केलें आहे. तसेंच श्रीआनंदनाथ महाराज, श्रीतात महाराज, व दादरचे बाळकृष्ण महाराज (सुरत) यांचीहि त्रोटक चरित्रें या ग्रंथांत गोंवून महाराजांचे चरित्राची पूर्ति केली आहे.

४. महाराजांनीं प्रयाण करून आज ७८ वर्षें होत आलीं, तरीपण ते आपल्या भक्तांस अनेक प्रकारांनीं दृष्टांत देऊन त्यांच्या मनकामना तृप्त करितात. त्यांचे संकटापासून रक्षण करितात, इतकेंच नव्हे तर ते जणूं प्रत्यक्षच आपल्या भक्तगणांत एकसारखे वावरत आहेत, असा अनेक अनन्य भक्तांचा अनुभव आहे. 'भाव तेथे देव' हें वचन पावलोपावलीं प्रत्यक्ष पुरवार करून देणारी स्वामी महाराज, 'माऊली' आहे, हेंच स्वामी देवतेचें वैशिष्ट्य आहे.

५. श्रीअक्कलकोट येथील वडाखालील मठाचा, व आंतील गाभाऱ्यांतील एक, अशीं दोन छायाचित्रें दिलीं आहेत. तसेंच, श्रीबाळाप्पाचे मठांतील सभामंडप व गाभारा (पादुकांसह) अशीं आणखी दोन छायाचित्रें दिलीं आहेत. व पेठेंतील समाधीचेंहि छायाचित्र ह्यांत गोंविलें आहे. श्रीसद्‌गुरु बाळाप्पांचें चरित्र-भागास त्यांचें छायाचित्रहि जोडलें आहे. तसेंच मुंबई येथील कांदेवाडी मठांतले, व दादर येथील मठांतील महाराजांच्या मूर्तीचें ध्यान अक्षय्य जवळ असावें म्हणून तीहि छायाचित्रें यांत समाविष्ट केलीं आहेत. तसेंच मलपृष्ठावर छत्रीधारी महाराजांचे तैलचित्राचे उत्कृष्ट छायाचित्रहि दिलें आहे. शिवाय जोशी-बुवांचे शेजारचे मठांतील श्रीचिंतोपंत अप्पा टोळ यांस पाटावर उमटून दिलेल्या पादुकांचे नेहमीं दर्शन व्हावें, म्हणून त्यांचेंहि चित्र दिलें आहे. तसेंच मूळ लेखक स्वामीभक्त गणेश बल्लाळ मुळेकर यांचे व त्यांस स्वहस्तें महाराजांनीं दिलेल्या पादुकांचें अशी आणखी दोन छायाचित्रें दिली आहेत. तसेंच दादरचे बाळकृष्ण महाराजांचे चित्र देऊन सदर ग्रंथ भक्तगणांस शक्य तितका उपयुक्त व मनोवेधक करण्याचा प्रयत्न केला आहे.

६ सदर ग्रंथारंभीं पी. सी. कापडीया, ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई, श्री. घोंडो वामन टिल्लू, व श्री. विश्वनाथ मोरेश्वर कोठारे, व श्री. घनश्याम हरिश्चंद्र रेळे, सॉलिसिटर, व श्री. विष्णु कृष्णराव कोठारे, बी. ए., यांनीं या कामीं कांहीं मौल्यवान् सूचना केल्यामुळें आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेंच श्रीअक्कलकोट स्वामी महाराज भक्त समिति, मुंबई यांनींहि प्रथम पासून अखेर पर्यंत आम्हांस साहाय्य देऊन सदर प्रकाशन बाहेर पाडण्यास मदत केली आहे ही श्रींची कृपाच म्हणावयाची. तसेंच श्रीरामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक, श्री. के. एन्. सापळे यांनीं वारंवार आमच्याशीं सहकार करून वेळचे वेळीं छपाईचें काम करून दिलें. तसेंच ब्लॉक्स बनविण्याचे कामींहि त्यांनीं आम्हांस मोठें सहाय केलें आहे. इतकें करूनहि हें प्रकाशन अगदीं वेळेवर बाहेर पाडण्यास आमच्या करितां जी मेहनत घेतली व काळजी वाहिली त्याबद्दल आम्हीं त्यांचे कायमचे ऋणीं आहोंत,

७. अखेरीस आमचे वडिलांनीं लिहिलेल्या या मूळचरित्राचे पुनर्मुद्रणाची वाढवून सुधारून काढलेल्या आवृत्तीची, अल्पकृति प्रसिद्ध करून, महाराजांचे भक्तगणास सादर करण्याची ज्यांनीं मति देऊन तें कार्यहि पुरें करविलें, त्या श्री अक्कलकोट स्वामी माउलीस अनन्यशरण होऊन विरमतो.

ता. ६ माहे डिसेंबर, सन १९५६.
२७ सी, ताराबाग,
मुंबई ४.

**दि. ग. मुळेकर.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| भाग १ ला | अवतारित्व | १ ते ३५ |
| भाग २ रा | अक्कलकोटांतील श्रीस्वामी महाराजांचें वास्तव्य | ३६ ते १३७ |
| भाग ३ रा | वामनबुवा बडोदेकरांची अनुभविक माहिती | १३८ ते १८१ |
| भाग ४ था | श्रीस्वामीभक्त चोळाप्पा | १८२ ते १९१ |
| भाग ५ वा | श्रीस्वामीभक्त बाळाप्पा यांचें चरित्र | १९२ ते २२० |
| भाग ६ वा | श्रीस्वामीभक्तिपरायण स्वामीसुत यांचें चरित्र | २२१ ते २४७ |
| भाग ७ वा | महाराजांचें चरित्रासंबंधी अखेरच्या कांहीं गोष्टी | २४८ ते २६७ |
| | अष्टक, भूपाळी, पदें, आरत्या | २६८ ते २७३ |
| परिशिष्ट | श्रीस्वामीदास सद्गुरु बाळाप्पा महाराज यांचें संक्षिप्त उत्तर चरित्र | २७४ ते २८० |
| परिशिष्ट (अ) | श्री आनंदनाथ महाराजांचें चरित्र | २८१ ते २८२ |
| परिशिष्ट (ब) | श्री तात महाराजांचें चरित्र | २८३ |
| परिशिष्ट (क) | दादरचे श्रीबाळकृष्ण महाराज ( सुरत ) यांचें चरित्र | २८४ ते २८५ |
| परिशिष्ट (ड) | सदाशिव नारायण भट यांचेकडील माहिती | २८६ |
| परिशिष्ट (इ) | श्रीवामनबुवा ब्रह्मनिष्ठांचे निर्याण | २८७ |
| परिशिष्ट (ई) | श्रीअक्कलकोटमधील महाराजांचें मठ | २८७ |


## फोटोसंबंधी माहितीपत्र


| | | पान |
|---|---|---|
| १ | श्रीस्वामीभक्त कै. गणेश बल्लाळ मुळेकर फोटो | प्रस्तावनेंत |
| २ | हातांत गोटी असलेला श्रीस्वामी महाराजांचा फोटो | सुरवातीचें पान |
| ३ | श्रीचिंतोपंतास पावलें उमटून दिलेल्या पादुका | ६६ |
| ४ | श्रीस्वामी महाराजांच्या कांदेवाडींतील मठातील श्रीस्वामीमहाराजांचा उभा फोटो | १७७ |
| ५ | श्रीबाळाप्पा महाराजांचा फोटो | १९२ |
| ६ | श्रीबाळाप्पांचे मठाचा सभामंडप | १९२ |
| ७ | श्रीबाळाप्पांचे मठाचा गाभारा | १९२ |
| ८ | श्रीमुळेकरांकडील प्रासादिक दिलेल्या पादुका | २५९ |
| ९ | श्रीबाळकृष्ण महाराज ( सुरत ) यांचा फोटो | २८४ |
| १० | श्रीस्वामीरायांची समाधि | २८४ |
| ११ | वडाखालील मठाचें चित्र | २८८ |
| १२ | वडाखालील मठाचा गाभारा | २८८ |

# शुद्धीपत्र

| पान | ओळ | शब्द | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ११ | १ | ३ | माया | माय |
| ६४ | १८–१९ | ८ | कवड | कडव |
| ६९ | १६ | ६ | नाहींत | नव्हते |
| ८० | १९ | ७ | उड्यावर | घड्यावर |
| ८१ | १ | ३ | पुण्याचे रामानंद महाराज बीडकर | पुण्याचे रामानंद बीडकर महाराज |
| ८१ | ७ | १० | मंडळीनीं | मंडळी समक्ष |
| ८७ | ७ | २ | बोटे | बोठे |
| ९० | ६ | २ | श्रीकवल्याश्रम स्वामी | श्रीकैवल्याश्रम स्वामी |
| ९७ | ८ | ५ | शिष्याची | शिष्याचा |
| ११३ | ४ | ३ | दर्या किनाऱ्यास आनंद कर जा | दर्याकिनाऱ्यावर बसून आनंद कर जा |
| १२१ | २३ | २ | परत | परत शब्द गाळावा |
| १२४ | शेवटची ओळ | ९ | नने | नये |
| १५१ | १९ | ४ | कापून | कापून गाळणे |
| १६० | १० | ६ | आपण | आपणास |
| १६३ | ३ | १० | कारक | तारक |
| १६४ | १० | ३ | मोठे | कोठें |
| १६६ | २२ | ८ | आमचे | आजचे |
| १७० | १३ | ११ | स्वामास | स्वामीस |
| १७१ | २७ | ४ | शक्ति | शान्ति |
| १७८ | ८ | ३ | ज्ञानिशो | ज्ञानिनो |
| १७९ | ४ | ८ | कृपाकार | कृपाकर |
| १७९ | २३ | १०–१२ | आले फार | फार आले |
| १८४ | २५ | ११ | बाहेरील | बाहेरून |
| १८६ | ११ | ६ | उराशी | उशाशी |
| २०२ | २४ | | हिला ठेवूं नको बरे हें रद्द समजावें | |

| पान | ओळ | शब्द | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| २०२ | २५ | १ | बाईस | सुंदराबाईस |
| २१३ | १३ | शेवटचा | गेला | गेले |
| २१६ | १० | ७ | आला | आले |
| २२३ | ११ | १० | हल्ली | हल्ली शब्द गाळणें |
| २२६ | ११ | | रकम | रक्कम |
| २३६ | ४ | ५ | नारखे | नाखरे |
| २४२ | २५ | २ | लाकर्के | लाडर्के |
| २४३ | २८ | ११ | फलें | फुलें |
| २४४ | २९ | ६ | महाराजांनीं दादास आपल्या जवळ नेऊन बसविले व हे वाक्य काढून टाकावे | |
| २५३ | १० | ५ | सांगितलें | विचारलें |
| २५४ | ११ | २ | आहे | होता |
| २५६ | १६ | ५ | संगमनेरकर | संगमनेरचे |
| २६७ | मथळ्यांतील ६ वा शब्द समाप्ति काढून टाकणे | | | |
| २६८ | ८ | ५ | श्रुतिविस्मरतम् | श्रुतिविस्मरंतम् |
| २६८ | २६ | ६ | वच्छला | वच्छाला |
| २७० | पद ३ रे | ७ | तेजज | तेजज्या |
| २७१ | पद ५ वे | ७ | बहुदीर्घ | बाहुदीर्घ |
| २७२ | ६ | २ | प्रीय स्वामीप्रति | प्रेमळ स्वामीप्रति |
| २७२ | ७ | २ | पुरें | पुढें |
| २७२ | २० | ६ | पूर्णब्रह्म तूं | पूर्णब्रह्मतूंचि |
| २८० | १० | ? | नवदुर्ग | नळदुर्ग |
| २८१ | ८ | ७ | जो | जों |
| २८२ | १४ | ९ | एवलें | येवले |
| २८५ | २० | ८ | काटेकर | कोटकर |



श्री अक्कलकोट स्वामी महाराज

श्री अक्कलकोट निवासी

# [स्वा]मी महाराज यांचें चरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम 21323
क्रमांक

लेखक,

स्वामीभक्त कै. गणेश बल्लाळ मुळेकर.

REFBK-0008945

आवृत्ति ३ री

किंमत ३ रु.

: प्रकाशक :
दिगंबर गणेश मुळेकर,
२७ सी, ताराबाग इस्टेट,
मुंबई ४.

प्रकाशक यानी कॉपी राईट रिझर्व्हड् केले आहेत.

दुर्मुखनाम संवत्सरे,
मार्गशीर्ष शुद्ध १५ सोमवार,
दत्तजयंती, शके १८७८.
ता. १७ डिसेंबर १९५६.

: मुद्रक
कृ. ना. स
रामकृष्ण प्रिं
मोरबाग रोड
मुंबई २

27323 दि.
नों: दि:

॥ श्रीसद्गुरु प्रसन्न ॥

श्री अक्कलकोट निवासी

# स्वामीमहाराज यांचें चरित्र

भाग १ ला

## अवतारित्व

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ १ ॥

श्रीस्वामी समर्थ हे अक्कलकोटास सन १८५७ सालचे आरंभीं आले. श्रीमंत मालोजी राजे हे त्यावेळेस नुकतेच राज्यपदारूढ झाले होते. श्री स्वामीमहाराज हे प्रथम मंगळवेढ्यास प्रसिद्ध झाले; तेथून ते सोलापुरास आले; व तेथून अक्कलकोटास आले. अनंत लीला करून श्री समर्थांनीं जगदोद्धार केला. काशीपासून रामेश्वरपावेतों हजारों लोक महाराजांचें दर्शनास येऊन पुनीत होऊन गेले आहेत. महाराजांचे तोंडचा प्रत्येक शब्द व त्यांची प्रत्येक कृति चमत्काराची असे. नित्य शतशः चमत्काराच्या गोष्टीं घडून येत. जर कोणी त्या गोष्टी लिहून ठेविल्या

असत्या तर आज आपणांस महाराजांचे चरित्राचा भागवत, भारताप्रमाणें ग्रंथ वाचण्यास मिळता. आपल्या कमनशिबानें महाराजांची लीला ते असतांना कोणी लिहून ठेविली नाहीं. त्यांची साग्र लीला कोणासही लिहितां आली नसती, कारण प्रत्येक क्षणोक्षणीं त्यांच्या लीलेंत चमत्कार दृष्टीस पडे. अफाट समुद्रांतून मूठभर वाळू घेऊन बाहेर निघावें, त्याप्रमाणें श्रीस्वामीमहाराजांचें अफाट चरित्र-सागरांतून मूठभर चरित्रमाला जनांपुढें मांडण्याचा प्रस्तुतचा प्रयत्न आहे.

## महाराजांचा जन्म

श्रीस्वामी महाराजांचा जन्म कोठें झाला, ते लहानाचे मोठे कोठें झाले, त्यांचीं मातापितरें कोण होतीं, जात कोण, देश कोण, त्यानीं दीक्षा कोठें घेतली, त्यांतील एकाही गोष्टीचा तिळमात्रही थांग लागला नाहीं. त्यानीं संन्यास कोठें व केव्हां घेतला याचाही पत्ता नाहीं. ते संन्यासी होते, यावरून ते जातीचे ब्राह्मण असावे असें अनुमान आहे. ते ब्राह्मण, शूद्र व यवनाकडेही भोजन करीत असत. भीमातीरीं मैसलगी नांवाचें एक गांव आहे, तेथील रहाणार माधवशास्त्री यानीं श्रीस्वामीमहाराजांचें चरित्र संस्कृतांत श्लोकबद्ध रचिलें आहे. त्यांतील महाराजांचे जन्म संबंधानें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णिलें आहे.

### श्लोक

**मत्स्यकूर्मादि देवास्तु, जन्म-निर्याण-भाविताः ॥**
**बभूवुः पञ्च सन्नाद्या जन्म-निर्याण-माश्रिताः ॥ १ ॥**
**इति स्मृत्या पुराणोक्त्या गुरु-मूलं न विद्यते ॥**
**कस्माद्देशात्समायातो यत्केनापि न विद्यते ॥ २ ॥**

**भावार्थ**—मत्स्य, कच्छ आदि करून अवतारांचे जन्म, निर्याण आपणांस ठाऊक आहेत. पण श्रीगुरु कोठून आले, कोठें जन्मले हें कांहींच कळत नाहीं.

## महाराजांची कान्ति तेज व शरीर

त्यांची कांति दिव्य, तेजःपुंज होती. शरीराचा वर्ण गौर होता. ते आजानुबाहू होते. त्यांचे अंगाचें तेज इतकें प्रखर होतें कीं त्यांचे कडे एक सारखी दृष्टि लावून कोणाच्यानेंही पहावत नसे. महाराजांचें नाक लांबट होतें, कान मोठे, व ऊर

विशाल होतें. महाराज साधरण चालीनें चालूं लागले तर आपणांस त्यांचे बरोबर धांवावें लागे. ते लंगोटी नेसत, अथवा त्यांस लेंगोटी नेसवीत असत असें म्हणणें जास्त प्रशस्त दिसेल. कारण ते लंगोटी फेंकून देऊन दिगंबर रहात. त्यांस चोळप्पा नित्य प्रातःकाळीं स्नान घालून 'कपाळास' केशर कस्तुरीचें गंध लावी. महाराज दोन आचमनें घेत. ते स्वतः हातानें क्वचित्च जेवीत. त्यांस अर्भका प्रमाणें भरवावें लागत असे. त्यांचें मूर्तीचें वर्णन करण्यास आम्हीं असमर्थ आहों, करितां वाचकांस महाराजांची तसबीर लगत असलेली घेऊन ती बारकाईनें पाहून आपल्या नेत्रांची सार्थकता करण्याची आम्हीं शिफारस करतों. माधव शास्त्री ह्यांनीं श्री स्वामीचें स्वरूप वर्णन केलेले श्लोक येथें देतोः—

## श्लोक

जन्मशून्यो दिव्यरूपो रविभाः सुरवंदितः ॥
आदर्शवत्–दृश्य–सूक्ष्म–गंड–युग्म सुमंडितः ॥१॥
सुनासोऽनिमिषः, सुभ्रूः, करुणापूर्णलोचनः ॥
शरत्पूर्णेंदु–वंदनो, स्फाटिक्य–मणिभूषितः ॥२॥
सुंदरांगो, दिव्य बाहुः, कटिमेखल–शोभितः ॥
कौपीनधारी, रंभोरूः, कंज–कोमल–पादकः ॥३॥

**भावार्थः**—स्वामी महाराज जन्म शून्य असून सूर्याप्रमाणें त्यांचें दिव्य रूप होतें. देवहि महाराजांस पाहून वंदन करीत, अशी त्यांची कान्ति होती. गंडस्थल शोभिवंत दिसत असे. त्यांचें नासिक सरळ, भिंवया उत्तम, नेत्रकमल पूर्ण कृपेचें घरच भासे. शरदृतूंतील पूर्ण चंद्राप्रमाणें महाराजांचें मुख शोभा देई. त्यांचे अंगास स्फटिकांच्या माला शोभा देत. त्यांची काया सुंदर असे. ते आजानुबाहू होते. कमरेस मेखलेची शोभा असें. ते कौपीन नेसत असत. त्यांच्या मांड्या केळीचे खांबाप्रमाणें दिसत. त्यांचे चरण कमलासारखे कोमल असत.

महाराजांचे दर्शनास लोक येत ते त्यांचे पायांवर डोकें ठेवून देवाप्रमाणें दर्शन घेत. पायांवर डोकें ठेवूं लागला म्हणजे एखादे वेळेस मोठा चमत्कार होई. तो असा कीं महाराजांचे पाय व डोकें यांजमध्यें एका जवाएवढें अंतर राहिल्यावर महाराजांचे मनांत दर्शन देण्याचें नसलें तर एकदम 'हट्ट' असें म्हणत; त्या सरसें दर्शन घेणारा घाबरून उलथा पालथा मागल्या बाजूस पडून जाई!

याप्रमाणें अनेक भक्तांची अनेक वेळां धांदल उडे. महाराजांचें दर्शन म्हणजे मोठें दिव्य होतें. विशेषेंकरून जारिणी स्त्रिया महाराजांसमोर जाण्यास फार भीत. केलेल्या पापाची महाराजांसमोर तेव्हांच झाडणी होई. गालीप्रदान देऊन जारिणीचें जाराचें नांवही महाराज उघड करीत. एक वेळ एका थोर घराण्यांतील बाई पुत्र मागून घेणारी महाराजांजवळ आली. बरोबर दासदासी सेवकजन पुष्कळ होते. बाईनें पुत्र व्हावा म्हणून महाराजांची प्रार्थना केली. महाराजांनीं उत्तर दिलें, 'अगे, मजजवळ कशाचा मुलगा? तो तुझा + + + बसला आहे त्याजजवळ माग म्हणजे तो देईल.' सदर ग्रहस्थाचा व बाईचा फंद असल्याचें मागाहून कळून आलें.

## श्री स्वामीराज दत्त अवतारा पैकींच एक होते.

श्रीस्वामी महाराज साक्षात् दत्तावतार होते. श्रीगुरु–चरित्रांत दत्ताचे अवतार वर्णिले आहेत तेः–श्रीदत्त, श्रीपादस्वामी व श्रीनृसिंह सरस्वति असे आहेत. पुढील अवतार श्रीस्वामींचा आहे. श्रीस्वामी मंगळवेढ्यास फारसे प्रसिद्धीस आले नाहींत. गाणगापूर आपल मुख्य स्थान, त्याचे नजीक वास करून प्रसिद्ध व्हावें या हेतूनें श्री–स्वामी अक्कलकोटास प्रसिद्ध झाले. श्रीस्वामींचे सर्व भक्त त्यांस दत्ताचा चवथा अवतार मानून भक्ति करितात, व पुढील चरित्रा वरून सर्व वाचकांची तशीच खात्री होणार आहे. गाणगापूर हें श्रीनृसिंह सरस्वतीचें स्थान आहे. तेथें अनेक दत्तोपासक सेवा करून इच्छित प्राप्त करून घेतात. श्रीस्वामी महाराज अक्कल–कोटीं प्रकट झाल्यापासून अनेक सेवेकऱ्यांस अक्कलकोटास जाऊन सेवा करण्या-विषयीं गाणगापुरास दृष्टांत झाले आहेत. महाराज आनंदांत असतांना आपण कोण म्हणून त्यांस कोणी प्रश्न केल्यास, 'दत्तनगर, मूळ पुरुष,' 'वडाचें झाड' म्हणून उद्गार निघत. शिवाय 'मूळ मूळ' याप्रमाण महाराज हमेश उच्चार करीत असत. एके दिवशीं गाणगापुरचे कांहीं पुजारी श्रीस्वामी महाराजांचे दर्शनास अक्कलकोटास आले. दर्शन झाल्यावर पुजाऱ्यांस महाराजांनीं "तुमचे देवाचें नांव काय?" म्हणून प्रश्न केला. पुजाऱ्यांनीं सांगितलें, "महाराज आमचे देवास नृसिंह सरस्वति म्हणतात." तें ऐकून महाराज म्हणाले, "माझे नांव नृसिंहभान आहे बरें," कित्येक प्रसंगीं मीच राम झालों होतों, मीच कृष्ण झालों होतों म्हणून उद्गार महाराजांचे मुखांतून निघत असत. त्यावरून श्रीस्वामीमहाराज हे अवतारी होते हें निःसंशय आहे.

# गाणगापुरचे नृसिंह सरस्वतीचाच अवतार श्रीस्वामी समर्थ होत

एका मित्रानें महाराज कोठून आले याबद्दल खुद्द महाराजांचे तोंडची हकीकत लिहून कळविली ती वाचकांस मोठ्या आनंदानें सादर करतों.

महाराज अक्कलकोटास असतां एके वेळीं कलकत्याहून एक इंग्लिश बॅरिस्टर व त्याजबरोबर एक पारशी गृहस्थ असे आपल्या कामास मुंबईहून पुण्याकडे आले होते. स्वामी महाराजांची कीर्ति ऐकून महाराजांची मूर्ति कशी आहे ती पहावी, व कोठील राहणार, त्यानीं योगसाधन कोठें केलें, वगैरे माहिती मिळविण्याचे जिज्ञासेनें ते अक्कलकोटास आले होते. स्वामीसमर्थांची स्वारी बुधवार पेठेंत राचाप्पा मोदी यांचे घरीं चौसोपींत बसली होती. सदरहू दोघे गृहस्थ, मोदी यांचे वाड्यांत येण्याचे अगोदरच दोन घटका तीन खुर्च्या महाराजांचे आज्ञेवरून सेवेकरी मंडळीनें आणून ठेविल्या होत्या. पुढें बॅरिस्टर व पारशी दर्शनास आल्यावर महाराज, अंगणांत तीन खुर्च्या ठेविल्या होत्या, त्यांपैकीं एकीवर जाऊन बसले. उभयतां समर्थांचें दिव्य तेज पाहून दिपून गेले; व जी विचारपूस करावयाची होती ती एकीकडे राहून “ आपण कोठून आलां ? ” एवढा काय तो प्रश्न साहेबानें महाराजांस केला. त्यावर महाराजांनीं उत्तर केलें तें असें:—‘ प्रथम आम्ही कर्दलीवनांतून निघालों. पुढें फिरत फिरत कलकत्ता वगैरे शहरें पाहिलीं. बंगाल देश हिंडून काली देवीचें दर्शन घेतलें. नंतर गंगा तटाकानें फिरत फिरत हरिद्वार व केदारेश्वर पाहिलें. महाराजांनीं हजारों गांवांचीं व तीर्थांचीं नांवें घेतलीं पण ती ध्यानांत न राहिल्यानें एथें देववत नाहींत. महाराज म्हणाले, “ पुढें आम्ही गोदा तटाकास आलों. गोदावरीचें स्नान करून हिंडत हिंडत दक्षिण हैद्राबादेस गेलों. तेथें कांहीं दिवस राहून नंतर मंगळवेढ्यास आलों. तेथें बरीच वर्षे राहून नंतर पंढरपूर व बेगमपूर एथें जाऊन हिंडत हिंडत मोहोळास आलों. तेथून सोलापुरास आलों. तेथें कांहीं महिने राहून अक्कलकोटास आलों तो एथेंच आहे. याप्रमाणें महाराजांनीं आपली हकीगत सांगितली. साहेब व पारशी हे कांहीं वेळ बसून महाराजांची आज्ञा घेऊन निघून गेले.

जे दत्तोपासक श्रीगुरु चरित्राचें पठण करितात त्यांचे लक्षांत असेल कीं, गुरुचरित्राचे ५१ वे अध्यायांत श्रीनृसिंह सरस्वती हे गाणगापुराहून निघून कर्दली वनांत गुप्त झाले म्हणून कथा आहे. श्री स्वामीमहाराजांनीं प्रथम आपण

याप्रमाणें अनेक भक्तांची अनेक वेळां धांदल उडे. महाराजांचें दर्शन म्हणजे मोठें दिव्य होतें. विशेषेंकरून जारिणी स्त्रिया महाराजांसमोर जाण्यास फार भीत. केलेल्या पापाची महाराजांसमोर तेव्हांच झाडणी होई. गालीप्रदान देऊन जारिणीचें जाराचें नांवही महाराज उघड करीत. एक वेळ एका थोर घराण्यांतील बाई पुत्र मागून घेणारी महाराजांजवळ आली. बरोबर दासदासी सेवकजन पुष्कळ होते. बाईनें पुत्र व्हावा म्हणून महाराजांची प्रार्थना केली. महाराजांनीं उत्तर दिलें, 'अगे, मजजवळ कशाचा मुलगा? तो तुझा + + + बसला आहे त्याजजवळ माग म्हणजे तो देईल.' सदर गृहस्थाचा व बाईचा फंद असल्याचें मागाहून कळून आलें.

## श्री स्वामीराज दत्त अवतारा पैकींच एक होते.

श्रीस्वामी महाराज साक्षात् दत्तावतार होते. श्रीगुरु—चरित्रांत दत्ताचे अवतार वर्णिले आहेत तेः—श्रीदत्त, श्रीपादस्वामी व श्रीनृसिंह सरस्वति असे आहेत. पुढील अवतार श्रीस्वामींचा आहे. श्रीस्वामी मंगळवेढ्यास फारसे प्रसिद्धीस आले नाहींत. गाणगापूर आपल मुख्य स्थान, त्याचे नजीक वास करून प्रसिद्ध व्हावें या हेतूनें श्री—स्वामी अक्कलकोटास प्रसिद्ध झाले. श्रीस्वामींचे सर्व भक्त त्यांस दत्ताचा चवथा अवतार मानून भक्ति करितात, व पुढील चरित्रा वरून सर्व वाचकांची तशीच खात्री होणार आहे. गाणगापूर हें श्रीनृसिंह सरस्वतीचें स्थान आहे. तेथें अनेक दत्तोपासक सेवा करून इच्छित प्राप्त करून घेतात. श्रीस्वामी महाराज अक्कल—कोटीं प्रकट झाल्यापासून अनेक सेवेकऱ्यांस अक्कलकोटास जाऊन सेवा करण्या-विषयीं गाणगापुरास दृष्टांत झाले आहेत. महाराज आनंदांत असतांना आपण कोण म्हणून त्यांस कोणी प्रश्न केल्यास, 'दत्तनगर, मूळ पुरुष,' 'वडाचें झाड' म्हणून उद्गार निघत. शिवाय 'मूळ मूळ' याप्रमाण महाराज हमेश उच्चार करीत असत. एके दिवशीं गाणगापुरचे कांहीं पुजारी श्रीस्वामी महाराजांचे दर्शनास अक्कलकोटास आले. दर्शन झाल्यावर पुजाऱ्यांस महाराजांनीं "तुमचे देवाचें नांव काय?" म्हणून प्रश्न केला. पुजाऱ्यांनीं सांगितलें, "महाराज आमचे देवास नृसिंह सरस्वति म्हणतात." तें ऐकून महाराज म्हणाले, "माझे नांव नृसिंहभान आहे बरें," कित्येक प्रसंगीं मीच राम झालों होतों, मीच कृष्ण झालों होतों म्हणून उद्गार महाराजांचे मुखांतून निघत असत. त्यावरून श्रीस्वामीमहाराज हे अवतारी होते हें निःसंशय आहे.

# गाणगापुरचे नृसिंह सरस्वतीचाच अवतार श्रीस्वामी समर्थ होत

एका मित्रानें महाराज कोठून आले याबद्दल खुद्द महाराजांचे तोंडची हकीकत लिहून कळविली ती वाचकांस मोठ्या आनंदानें सादर करतों.

महाराज अक्कलकोटास असतां एके वेळीं कलकत्याहून एक इंग्लिश बॅरिस्टर व त्याजबरोबर एक पारशी गृहस्थ असे आपल्या कामास मुंबईहून पुण्याकडे आले होते. स्वामी महाराजांची कीर्ति ऐकून महाराजांची मूर्ति कशी आहे ती पहावी, व कोठील राहणार, त्यानीं योगसाधन कोठें केलें, वगैरे माहिती मिळविण्याचे जिज्ञासेनें ते अक्कलकोटास आले होते. स्वामीसमर्थांची स्वारी बुधवार पेठेंत राचाप्पा मोदी यांचे घरीं चौसोपींत बसली होती. सदरहू दोघे गृहस्थ, मोदी यांचे वाड्यांत येण्याचे अगोदरच दोन घटका तीन खुर्च्या महाराजांचे आज्ञेवरून सेवेकरी मंडळीनें आणून ठेविल्या होत्या. पुढें बॅरिस्टर व पारशी दर्शनास आल्यावर महाराज, अंगणांत तीन खुर्च्या ठेविल्या होत्या, त्यांपैकीं एकीवर जाऊन बसले. उभयतां समर्थांचें दिव्य तेज पाहून दिपून गेले; व जी विचारपूस करावयाची होती ती एकीकडे राहून " आपण कोठून आलां ? " एवढा काय तो प्रश्न साहेबानें महाराजांस केला. त्यावर महाराजांनीं उत्तर केलें तें असें:—'प्रथम आम्ही कर्दलीवनांतून निघालों. पुढें फिरत फिरत कलकत्ता वगैरे शहरें पाहिलीं. बंगाल देश हिंडून काली देवीचें दर्शन घेतलें. नंतर गंगा तटाकानें फिरत फिरत हरिद्वार व केदारेश्वर पाहिलें. महाराजांनीं हजारों गांवांचीं व तीर्थांचीं नांवें घेतलीं पण ती ध्यानांत न राहिल्यानें एथें देववत नाहींत. महाराज म्हणाले, " पुढें आम्ही गोदा तटाकास आलों. गोदावरीचें स्नान करून हिंडत हिंडत दक्षिण हैद्राबादेस गेलों. तेथें कांहीं दिवस राहून नंतर मंगळवेढ्यास आलों. तेथें बरीच वर्षें राहून नंतर पंढरपूर व बेगमपूर एथें जाऊन हिंडत हिंडत मोहोळास आलों. तेथून सोलापुरास आलों. तेथें कांहीं महिने राहून अक्कलकोटास आलों तो एथेंच आहे. याप्रमाणें महाराजांनीं आपली हकीगत सांगितली. साहेब व पारशी हे कांहीं वेळ बसून महाराजांची आज्ञा घेऊन निघून गेले.

जे दत्तोपासक श्रीगुरु चरित्राचें पठण करितात त्यांचे लक्षांत असेल कीं, गुरुचरित्राचे ५१ वे अध्यायांत श्रीनृसिंह सरस्वती हे गाणगापुराहून निघून कर्दली वनांत गुप्त झाले म्हणून कथा आहे. श्री स्वामीमहाराजांनीं प्रथम आपण

कर्दली-वनांतून निघालों म्हणून सांगितलें आहे, याचा व वरील कथेशीं मेळ घातला म्हणजे सूज्ञ वाचकांस सहज कळून येईल कीं, श्री नृसिंह-सरस्वतीचाच अवतार श्री स्वामीमहाराज होते.

## अवतार सादृश्य !

दुसरे असें कीं, श्री नृसिंह-सरस्वती स्वामी श्री-शैल मल्लिकार्जुनीं गुप्त झाले, ही गोष्ट बहुधान्य संवत्सरामध्यें घडून आली. श्री स्वामी दयाळ शके १८०० सालीं बहुधान्य संवत्सरांतच निजानंदीं निमग्न झाले. हाहि मेळ अवतार संबंधानें ध्यानांत ठेवण्याजोगा आहे.

## चिंतोपंतास महाराजांचे भेटीचें भविष्य

रा. चिंतोपंत आपा टोळ यांची व महाराजांची सोलापुरास गांठ पडून नंतर महाराज अक्कलकोटास आले. त्या बद्दल साग्र हकीकत पुढें देण्यांत येईलच. चिंतोपंत हे महाराजांचे पूर्ण भक्त होते. महाराज हे दत्त-अवतार असून त्यांचे सहवासाचा लाभ होणार, हें त्यांस पांच सात वर्षें अगोदरच कळलें होतें. ती गोष्ट अशी आहे:—श्रीक्षेत्र पंढरपुरास गोपाळबुवा नांवाचे महा प्रसिद्ध जगद्वंद्य पुरुष होऊन गेले. सन १८४६-४७ सालीं श्री. चिंतोपंत आपा टोळ हे सोलापुरास मामलेदार असतां त्यांचे हाता खालील नगदी कारकून सातान्यास रजेवर गेले होते. परत येतांना ते पंढरपुरास मुक्कामास आले. 'आपण कोण ? कोठें असतां ?' म्हणून बोवांनी प्रश्न केला. आपण सोलापुरास मामलेदार कचेरींत कारकून आहों म्हणून त्यानें सांगितलें. 'हो! तुमचे मामलेदारास पत्र द्यावयाचें आहे, म्हणून बुवा म्हणाले, व त्यांस दौत, लेखणी, कागद आणण्यास सांगितलें. कागद, दौत, लेखणी आल्यावर गोपाळबुवांनीं पत्र लिहिण्यास सांगितलें. त्यांतील मुख्य मुद्याची गोष्ट ही होती कीं, 'कांहीं दिवसांनीं तुला महान् योगी सत्पुरूष दत्तात्रयाची गांठ पडून दर्शन व सहवास होईल.' पुढें सात आठ वर्षांत चिंतोपंतांची व महाराजांची गांठ पडून चिंतोपंत महाराजांचे निस्सीम भक्त झाले. व श्री. स्वामी महाराज हे साक्षात् दत्त अवतार आहेत याबद्दल त्यांची पूर्ण खात्री झाली.

## मारवाडी लोटा

दुसरी गोष्ट अशी कीं महाराज वाटतील तशीं अचाट कृत्यें करीत. पण कोणत्याही वेळीं त्यांचे अमृत दृष्टीनें अपघात किंवा विपरीत

गोष्ट घडून आल्याचें एकवारही कोणाच्या पहाण्यांत आलें नाहीं. सन १८७६ सालचे दुष्काळांत एके दिवशीं सकाळीं आम्ही महाराजांचे दर्शनास गेलों होतों. गांवाबाहेर एका बड्या बावडीजवळ महाराज बसले होते व लीला करीत होते. तितक्यांत एक मारवाडी हातपाय धुवून लोटा भरून घेऊन महाराजांचे दर्शनास आला. दर्शन घेऊन मारवाडी परत जाऊं लागला, तितक्यांत महाराजांनीं त्यास परत बोलावलें आणि त्याच्या हातांतील तांब्या घेऊन त्यांतील पाणी महाराजांनीं सांडून दिलें, व लोटा भिरकावून सुमारें २५–३० कदमावर बावडी होती तींत फेंकून दिला. आतां त्या बावडींत पाण्याचे दुष्काळामुळें ५०–६० माणसांची गर्दी होती. आम्हांस वाटलें कीं, हा मारवाडी जड लोटा, कोणाचे तरी डोकींत बसून त्याचा मोक्ष होणार!!! पण महाराजांची अगाध करणी कशी ती पहा! विहीर ३० । ४० हात खोल होती. लोटा जो तींत पडला तो कोणाचेही डोकींत न बसतां गर्दीचे मध्यभागीं रिकामी जागा होती तीवर बेतानें पडला. वाचकहो! आपण कोणतीही चांगली गोष्ट करण्यास लागलों तरी देखील तींत विपरीतपणा घडून येतो, पण महाराज शतशः विपरीत गोष्टी करीत असून त्यांचे परिणाम जर चांगले झाले तर महाराजांचे अवतारीपणाबद्दल व त्यांचे दैवी सामर्थ्याबद्दल तुम्हांस शंका घेण्यास कांहीं जागा राहील काय?

## राजा व रंक महाराजांस सारखेच होते.

राजा व रंक महाराजांस सारखेच होते. अक्कलकोटचे न्यायाधीश, मामलेदार, फौजदार, फार तर काय खुद्द राजेसाहेब यांसही श्रीमुखांत खाण्याचे प्रसंग वर्षास येत असत. डोकीचें पागोटें काढून लांब फेंकून देणें, शिव्या देणें, वगैरे खेळ महाराजांचे हमेशा चालावयाचे; पण कोणाची बिशाद नाहीं कीं, महाराजांपुढें कोणी ब्र म्हणेल किंवा केल्या हुकमाची अवज्ञा करील. अहाहा!!! वाचकहो, हें लिहीत असतां महाराजांचे रागाची आठवण होऊन मलाही कांपरा भरला व लेखणी चालत नाहींशी झाली. महाराजांचे चरणीं मस्तक ठेवून माफी मागून त्यांचे आज्ञेनें गुणानुवाद वर्णन करीत आहे. महाराजांस पाहिल्याबरोबर ते देवरूप आहेत, अशी मनाची खात्री होई.

श्रीस्वामी महाराज हे प्रथम मंगळवेढ्यास इ. स. १८३८ चे सुमारास प्रसिद्ध झाले. तेथें ते कोठून आले त्याजबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं, तथापि त्यांचे भक्तजनांनीं होईल तितकी खटपट करून माहिती मिळविली आहे ती खालीं देतों.

## श्री स्वामीमहाराज वारुळांतून बाहेर आले

उत्तर हिंदुस्तानांत श्री भागीरथीचे उत्तर दिशेस एक मोठें अरण्य आहे; तेथें योगी लोक तपश्चर्या करितात; त्या वनांत एका वारुळांत स्वामीमहाराज तपश्चर्या करीत असतां, एक लांकूडतोड्या लांकडें तोडीत तोडीत महाराजांचे वारुळाजवळ आला. त्यानें लांकूड तोडण्याचे हेतूनें कुऱ्हाडीचे घाव वारुळावर केले. ते महाराजांचे मांडीस लागले. ते पुढें त्यांचे मांडीवर दिसत; व ते श्री विष्णूचे वत्सलांछनाप्रमाणें महाराजांस शोभा देत. लांकूडतोड्यानें एकाअर्थी उपकारच केला; कारण श्री स्वामीमहाराजांसारखें अमोल रत्न त्यानें जगास दृग्गोचर करून दिलें.

## महाराजांची काशीस–देवलग्रामास भेट–देवलग्रामास पादुकांची स्थापना–मोंगलाईंत गमन, राजुर गांवीं मठ स्थापना.

उत्तर हिंदुस्तानांतील वनांतून महाराज निघाले ते श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन पूर्व दिशेस प्रकट झाले. पुढें महाराज गंगोत्रीस जाऊन कांहीं दिवस राहिले. नंतर यतिराज हे देवलग्रामास जाऊन तेथें त्यांनीं आपल्या पादुका स्थापन केल्या. ब्रह्म–हत्यादि पापें पादुकांचे दर्शनानें नाहींशीं होतात असा त्या स्थानाचा महिमा आहे. तदनंतर महाराज मोगलाईंत जाऊन राहिले. तेथें राजुर गांवीं मठ स्थापन करून त्यास आठ गांवची जहागीर सरकारांतून मिळवून शिष्याकडे मठ सोपवून देऊन महाराज पुढें चालते झाले.

## चंचल भारती–स्वामीरायांचें रामेश्वर, उडपी, पंढरपूर, मंगळवेढें येथें गमन.

त्यावेळीं महाराज चंचल भारती नांवानें प्रसिद्ध होते. महाराज अक्कलकोटास आल्यावर मोंगलाईंतील संस्थानांपैकीं कांहीं बैरागी महाराजांजवळ आले होते. जहागिरीसंबंधीं कांहीं लढा पडल्यामुळें मूळ संपादक जे स्वामीमहाराज "चंचल भारती" त्यांची आज्ञा घेण्यास आले होते. सरकारांतून असा हुकूम झाला होता कीं मूळ संपादकाचे सहीचा लेख बैराग्यांनीं आणावा म्हणजे त्याप्रमाणें तक्रारीचा निकाल होईल. महाराजांनीं त्यांस आपल्या सहीचा लेख दिला नाहीं असें सांगतात. पुढें महाराज रामेश्वरास गेले. तेथून उडपी क्षेत्रास जाऊन श्रीकृष्णाचें

त्यानीं दर्शन घेतलें. पुढें महाराज पंढरपुरास आले व श्री विठ्ठलाचें व पुंडलिकाचें दर्शन घेऊन व त्यांस आपलें देऊन पुढें आपला भक्त दामाजीपंत ज्या गांवीं प्रसिद्ध झाला, त्या मंगळवेढें गांवीं महाराज प्रसिद्ध झाले. श्री विठ्ठल आपला सखा आहे असें अक्कलकोटास महाराज हमेशा म्हणत. "पंढरीचे लोका, किती मारूं हांका। तेथें माझा सखा पांडुरंग ॥ याप्रमाणें महाराज अभंग नित्य म्हणत असत.

## महाराजांचें वय.

महाराजांचें वय ४००–५०० वर्षांचें होतें असें लोक सांगतात. पण खात्रीलायक माहिती त्यांचे वयासंबंधानें मिळाली नाहीं. ते फार जुनाट पुरुष होते, हें मात्र प्रत्येकजण कबूल करील.

एका चतुरस्र योजक भक्तानें श्रीस्वामी अक्कलकोटास वास करून प्रगट झाले ह्याचें कारण असें ठरविलें आहे कीं, "अक्कलसे खुदा पछानना". म्हणून एक हिंदुस्थानी जुनीं म्हण आहे, त्याप्रमाणें महाराज अक्कलकोटास राहिले, व देव आहे कीं नाहीं, हें अक्कलेनें ओळखा असे भक्तांस शब्दानें न सांगतां कृतीनें त्यानीं सुचविलें.

स्वतः महाराजांनीं आपण कोण कोठील या गोष्टीचा थांग लागूं दिला नाहीं. अक्कलकोटास वसंत ऋतूंत एके दिवशीं महाराजांची स्वारी रा. चिंतोपंत आप्पा टोळ यांचे घरीं होती. उन्हाळा फार असल्यामुळें टोळ यांनीं अंगणांत पाणी शिंपून जिकडे तिकडे गारीगार करून बिछाईत टाकिली होती. महाराजांस भोजन घालून आंथरुणावर निजविलें; पुष्कळ वेळ गोष्टी चालल्या होत्या. पण महाराजांचे भाषणांतील मागील पुढील संदर्भ कांहींच कोणाचे ध्यानांत येईना. या प्रमाणें मध्यरात्र होण्याचा समय आला. इतक्यांत महाराजांनीं लावणी म्हणण्यास आरंभ केलाः—

**"गोरे ग रूप तुझें। तुला पाहिले सात ताल माडीवरी ॥**

ही जुनी लावणी महाराजांनीं सबंध चालीवर म्हटली. लावणी म्हणणें झाल्यावर चिंतोपंत आप्पा यांनीं महाराजांस विचारलें, "महाराज, आपण पूर्वाश्रमांत गृहस्थ होतां असें वाटतें. आपली जात कोण, आई बाप कोण हें कृपा करून सांगावें. आमची जात चांभार, आई महारीण, बाप महार आहे. टोळांनीं महाराजांचे चरणीं मस्तक ठेवून विनवणी केली कीं महाराज आपण कोणतेही गोष्टीचा थांग

लागूं देत नाहीं, आम्ही मूढ अज्ञान आहोंत, आम्हांस कांहीं समजत नाहीं. त्यावर महाराज पोट धरधरून मोठ्यानें हंसूं लागले. याप्रमाणें महाराजांची विचित्र लीला होती.

## भाग्यवंतास दर्शन

महाराजाचें ज्यांस दैवयोगानें दर्शन झालें आहे, त्यासच महाराजांचे वैभवाची थोरवी ध्यानांत येईल. त्या वैभवाचें यथातथ्य वर्णन करण्यास आमची लेखणी समर्थ नाहीं. खरोखर दैववान् मनुष्यांसच महाराजांचे दर्शनाचा लाभ होत असे. अक्कलकोटास एकवेळ अशी गोष्ट झाली कीं, कोणी जहागीरदार महाराजांचे दर्शनास जाणार, म्हणून पांचचार दिवसांपासून वदंता होती. पुढें तो येत नाहीं असें कळलें, तेव्हां एक सेवेकरी महाराजांस म्हणाला, "महाराज, फलाणे जहागिरदार दर्शनास येणार होते. पण ते आतां येत नाहींत असें कळतें." हें ऐकून महाराजांनीं आपली अंगुली ललाटास दोन वेळां लाविली. या कृतीनें सुचविलें कीं, ज्याच्या नशिबांत आहे त्यासच समर्थांचें दर्शन होईल.

## हस्तिनापुरानजिक जन्म

हरीभाऊ ऊर्फ स्वामीसुत म्हणून महाराजांचे परम निःसीम भक्त होऊन गेले. हे मोठे वरदी होते. त्यांचें चरित्र पुढील भागांत येईलच. यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, महाराजांचा जन्म हस्तनापुरानजीक छेलीखेडी ग्रामीं चैत्र शुद्ध २ स झाला. त्या प्रमाणें सदर मित्तीस मुंबईचे मठांत त्यांचा उत्साह होतो. जन्मासंबंधानें स्वामीसुतानें खालील अभंग केले आहेत.

### अभंग

**स्वामी माझा अवतरला । दीनभक्तांचे काजाला ॥ १ ॥**
**छेलीखेड्या ग्रामामाजी । झाला अवतार हा सहजीं ॥ २ ॥**
**गोटी खेळण्याचा रंग । तेव्हां मनीं झालों दंग ॥ ३ ॥**
**तेथें हाता विजयसिंग । आतां येथें करूं रंग ॥ ४ ॥**
**गोटी विजयसिंग मारी । दुसरी गोटी होय करी ॥ ५ ॥**
**गोट्यांचा हो पडला ढीग । चाकित झाला विजयसिंग ॥ ६ ॥**

गोटी स्वामी माया झाली । स्वामी हस्तीं ती शोभली ॥ ७ ॥
गोट्या झाल्या रानोमाळ । काय मौजेचा हा खेळ ॥ ८ ॥
एक प्रहर खेळ केला । समर्थे दाविली ती लीला ॥ ९ ॥
स्वामीसुत म्हणे झाला । अवतार भक्तांच्या काजाला ॥ १० ॥

याप्रमाणें महाराजांचे जन्म संबंधानें कांहीं भक्तांचें मत आहे. महाराजांची लीला अगम्य होती, व त्यांचे संबंधानें कोणतीही गोष्ट असंभवनीय आहे, असें ज्यांनीं महाराजांची दैविक कृति पाहिली आहे, त्यांस वाटावयाचें नाहीं.

महाराज हे दत्तावतार आहेत असें त्यांचे भक्तच म्हणतात असें नाहीं. मोठमोठे योगी सिद्ध तापसी महाराजांची कीर्ति ऐकून दर्शनास येत; व महाराज अवतारी असल्याबद्दल आपली खात्री करून नगरवासी जनांस तसा उपदेश करून जात असत. आळंदीचे श्रीनरसिंह सरस्वती व यशवंतराव महाराज, देव मामलेदार हे साधुही स्वामी महाराजांस अवतारी मानीत असत. फार तर काय पण मूर्तिपूजा निषेधक ब्रह्मवेत्ते-वेदोक्त प्रकाशाचे कर्ते जे विष्णुबोवा ब्रह्मचारी हेही श्री स्वामींस अवतारी मानीत. ब्रह्मचारी स्वतः मोठे वक्ते, वेदांती व विद्वान् होते. ज्यांनीं त्यांचा ' वेदोक्त धर्मप्रकाश ' ग्रंथ वाचला असेल, त्यांस माहीत असेल कीं, ज्ञानोबा, चांगदेव, नामदेव इत्यादि भक्तांनीं जे चमत्कार केले ते खरे नसावे म्हणून टीका केली आहे, अशा मार्मिक विद्वानाकडून महाराजांस ' अवतारी ' असा किताब मिळाला आहे, याहून जास्ती पुरावा तो कोणता पाहिजे ? असो; श्री स्वामी महाराज हे साक्षात् दत्तावतार होते याबद्दल कांहीं शंका नाहीं.

## विष्णुबोवा जोग

सदरहु विष्णुबोवा यांनीं महाराजांस अवतारी म्हणून जो किताब दिला तो उगीच नाहीं. ते जात्या कुत्सित स्वभावाचे होते. महाराजांची व त्यांची समक्ष गांठ पडून जेव्हां श्री स्वामींचे दैविक सामर्थ्याबद्दल त्यांची खात्री झाली, तेव्हांच बोवा सद्गुरूस लीन झाले. त्यांची सविस्तर हकीकत खालीं दिली आहे.

अक्कलकोटचे राजेसाहेब श्रीमंत मालोजीराव यांस वेदांत विषय ऐकण्याचा छंद फार असे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव वगैरे वेदांत ग्रंथाचा अर्थ समजून घेण्याकरितां रा. रा. रामभाऊ चिंचणीकर, गोपाळशास्त्री हेरळीकर वगैरे मंडळी त्यांनीं चांगलीं वेतनें देऊन आपल्या पदरीं ठेविली होती. नित्यशः राजवाड्यांत वेदांताची चर्चा

चालवी. बहुत दिवस याप्रमाणें क्रम चालला होता. पुढें मुंबईहून विष्णुबोवा यांची कीर्ति ऐकूं येऊं लागली. त्यांनीं वेदांवर प्राकृत टीका करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली; व पाद्री लोकांशीं वाद करून त्यांचें मत खंडन केलें. ते जगप्रसिद्ध वक्ते असून वेदांतावर उत्तम व्याख्यानें देतात, वगैरे हकीकत राजेसाहेबांचे कानीं आल्यामुळें, ब्रह्मचारी यांचे मुखानें वेदांत विषय श्रवण करावा, अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. इरप्रयत्नानें ब्रह्मचारी बोवांस अक्कलकोटास आणविलें. बोवांनीं बरेच दिवस राजवाड्यांत वेदांताची चर्चा चालवून, पुष्कळ व्याख्यानें दिलीं. एके दिवशीं ब्रह्मचारी बोवांचे मनांत आलें कीं, श्रीस्वामीमहाराजांसन्निध जाऊन वेदांत विषयावर भाषण करावें. बोवां बरोबर तीन पारशी गृहस्थ होते, तेही त्यांजबरोबर महाराजांकडे गेले. महाराजांचें दर्शन घेऊन, बोवांनीं वेदांतावर पुष्कळ वेळ भाषण केलें; व शेवटीं ब्रह्मपद तदाकारवृत्ति काय केल्यानें होते, असा महाराजांस प्रश्न केला. बोवांच्या सर्व गोष्टी महाराजांनीं ऐकून घेतल्या; पण उत्तर म्हणून दिलें नाहीं. बोवांस वाटलें कीं, स्वामी वेडे आहेत, त्यांची कीर्ति उगीच झाली आहे त्यांस कांहीं कळत नाहीं.

आपण मोठे विद्वान्, शहाणे व महाराजांपेक्षां श्रेष्ठ आहों, असा अभिमान मनांत धरून पारशांसह बोवा बिऱ्हाडीं गेले. त्याच रात्रीं विष्णुबोवांचे अंगावर हजारों विंचू चढल्याचा स्वप्नांत त्यांस भास झाला. विंचू पाहून ते फार भयभीत झाले. त्या विंचवांपैकीं एका विंचवानें आपणांस दंश केला, असें बोवांस स्वप्न पडलें. बोवांची बोबडी वळली; व 'मेलों मेलों,' अशी बोंब मारीत बोवा उठले. पारशी नजीक निजले होते, ते जागे झाले. विष्णुबोवांस धरून 'सावध व्हा, सावध व्हा,' म्हणून धीर देवून त्यांस शुद्धीवर आणिलें. स्वप्नांतील मजकूर बोवांनीं पारशांस सांगितला. 'आपण महाराजांस नांवें ठेविलीं त्याचें तर हें फळ नसेलना?' अशी बोवांचे मनांत शंका आली. दुसरे दिवशीं पारशांसहवर्तमान स्वारी महाराजांकडे आली. महाराजांचें दर्शन घेऊन सन्निध बसले. विष्णुबोवा वेदांत विषयावर पुनः बोलूं लागले; व पूर्वीचा प्रश्न ब्रह्मपद तदाकारवृत्ति काय केल्यानें होते, असा पुनः महाराजांस प्रश्न केला. महाराज म्हणाले "**हत्त गाढवा, स्वप्नांत हजारों विंचू तुझे आंगावर चढले म्हणून तूं घाबरतोस, स्वप्नांतील विंचू चावला तर बोंबा मारीत उठतोस आणि गोष्टी तर वेदांताच्या करतोस, तर तूं केवळ पढतमूर्ख आहेस. ब्रह्मपद तदाकार वृत्ति होणें कां वाटेवर पडली आहे? पुष्कळ**

**वाचाळपणा करून, ब्रह्म बोलून, 'कोटीवर कोटी करून वेदांत बोललास म्हणून योगी झालास कीं, काय? ऊठ. चालता हो."** बोवा खजिल होऊन बिऱ्हाडीं परत गेले. महाराजांनीं आणखीहि मनोमय खुणा समजावून दिल्या. पुढें बोवांची पक्की खात्री झाली कीं, महाराज अवतारी आहेत.

गाणगापूर येथें भक्तांस अक्कलकोटास जाण्याविषयीं दृष्टांत होत, तसेंच गिरनार पर्वतांतही श्रीस्वामीसमर्थांनीं आपले भक्तजनांस दृष्टांत दिले आहेत, त्यांपैकीं कांहीं येथें देतों.

गाणगापुरचे श्री नृसिंह—सरस्वतीस नवस केलेला पुष्कळ भक्तजन अक्कलकोटास श्रीस्वामीसान्निध फेडीत असत. घाटावरील एका ब्राह्मणानें श्रीनृसिंह—सरस्वतीस असा नवस केला होता कीं, आपणांस पुत्र झाल्यास त्याचें उपनयन गाणगापुरास येऊन करीन. श्रीदत्त कृपेनें पुढें त्यास पुत्र झाला. नवस फेडण्यास ब्राह्मण कुटुंबासहवर्तमान गाणगापुरास जाण्यास निघाला. अक्कलकोटापावेतों गेल्यावर ब्राह्मणाची खर्ची सरली, तेव्हां ब्राह्मणानें श्रीस्वामींना विनंति केली कीं, आपल्या-हातून गाणगापुरास जाऊन नवस फेडला जात नाहीं. महाराज देव अवतार आहेत; सबब नवस अक्कलकोटासच फेडून घ्यावा. महाराजांचे कृपेनें ब्राह्मणास द्रव्याची मदत मिळून त्यानें मुलाचें उपनयन अक्कलकोटास केलें, व केलेले नवसाची सांगता करून, आपल्या देशीं परत गेला. अक्कलकोटास हल्लीं दत्तजयंतीचा व गुरु प्रतिपदेचा ( माघ वद्य १ ) उत्साह होतो. अक्कलकोटचे राजेसाहेबांकडून सदर उत्साहास सालीना २०० रुपयांची नेमणूक होती. यावरून श्री स्वामीमहाराज हे साक्षात् दत्तावतार आहेत, हें सर्वमान्य असल्याचें दिसून येईल.

## ठाकूरदासबुवांचा कुष्ट परिहार

मुंबईस ठाकूरद्वार नांवाचें देवस्थान प्रसिद्ध आहे. या देवाचे सभा मंडपांत उजवे बाजूस छोटेसें देऊळ बांधलें असून, त्यांत स्वामी महाराजांची तसबीर व पादुका स्थापन केल्या आहेत. नित्य पूजन, आर्ती, धुपार्ती वगैरे समारंभ होत असून, प्रत्येक गुरुवारी श्रींची पालखी निघत असते. हें संस्थान ठाकूरदासबाबा ऊर्फ श्रीकृष्ण बोवा यांनीं स्थापन केलें. ठाकूरदासबोवा हे लहानपणापासून दत्तोपासक होते. नरसोबाची वाडी, गाणगापूर वगैरे ठिकाणीं जाऊन दत्ताची सेवा करण्याची त्यांस फार हौस असे. श्रीकृष्ण बोवा हे कीर्तन फार उत्तम करीत. मुंबईस त्यांची

कीर्तनाबद्दल फार ख्याति होती. असो. पुढें कांहीं वर्षांनीं श्रीकृष्णबोवांचे आंगावर प्रारब्धयोगानें श्वेतकुष्ट उत्पन्न झालें; तोंडावर पांढरेपणा येऊन चेहरा विद्रूप दिसूं लागला. बोवा विद्वान् सर्वमान्य असून या रोगाचे योगानें त्यांस मरणप्राय दुःख झालें. दोन वर्षें पावेतों अनेक उपाय केले, पण कुष्ट कमी होईना. यामुळें चित्त उदास होऊन, ठाकूरदास बोवांनीं निश्चय केला कीं, यापुढें स्वजनांस तोंड दाखवावयाचें नाहीं. करितां कुटुंबासुद्धां श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन वास करावा. त्याप्रमाणें तयारी करून आपले आवडते गाणगापुरचे पादुकांची अखेरची भेट घेण्यास गाणगापुरास आले. श्रींचे पादुकांस कस्तुरी अर्पण करण्याचे हेतूनें, उत्तम कस्तुरी त्यांनीं बरोबर आणिली होती. श्रींचें दर्शन घेऊन पादुकांची यथासांग पूजा केली. मात्र कस्तुरी अर्पण करण्याचा त्यांस विसर पडला. मग बुवांनीं ब्राह्मणभोजन करून त्या दिवशीं मंदिरांत उत्तम प्रकारचें कीर्तन केलें व काशीस जाण्याबद्दल श्रींची आज्ञा मागितली. त्याच रात्रीं बुवांस दृष्टांत झाला कीं, अक्कलकोटास जाऊन श्रीदत्तस्वामी समर्थ यांचें दर्शन घ्यावें; म्हणजे रोगापासून मुक्त होशील. श्रीकृष्णबुवा प्रातःकाळीं जागे झाले; तों रात्रीचे दृष्टांताचें स्मरण झालें. स्नान-संध्यादि नित्यकर्म सारून, श्रीनृसिंह-सरस्वतीचे पादुकांचें दर्शन घेऊन, बुवांनीं अक्कलकोटाचा रस्ता धरिला. तिसरे दिवशीं अक्कलकोटास बोवा पोहोंचले. महाराज कोठें आहेत याचा तपास करितां, बाहेरगांवची एक वेश्या अक्कलकोटास येऊन राहिली होती, तिचे घरीं महाराज बसले असल्याचें कळलें. बुवा लगबगीनें दर्शनास निघाले. श्रीस्वामींचें चरणीं मस्तक ठेऊन बोवांनीं दर्शन घेतलें. महाराज बोवाकडे पाहून म्हणाले, "**हमारी कस्तुरी अबी के अबी लाव**" ठाकूरदास बोवांस आपण पादुकांवर अर्पण करण्यास कस्तुरी आणिली होती त्याचें स्मरण झालें. कस्तुरी विस्मरणानें तशीच राहिली. श्रीस्वामीमहाराजांनीं त्याची आठवण करून दिली, त्यावरून बोवांची पक्की खात्री झाली कीं, श्रीस्वामी-महाराज हे साक्षात् दत्तावतार आहेत. बुवांनीं बिऱ्हाडीं जाऊन, कस्तुरीची पुडी आणून श्रीस्वामींचे हातांत दिली. महाराजांनीं हास्य करून ती कस्तुरी तेथें लहान लहान मुलें जमलीं होतीं त्यास वांटिली. श्रीस्वामींची सेवा करीत श्रीकृष्णबोवा कांहीं दिवस राहिले. एके दिवशीं बोवा दर्शनास आले असतां, महाराजांनीं जवळच धुनी पेटली होती, त्यांतील एक जळकें लांकूड बोवांचे आंगावर फेंकलें. सेवेकऱ्यांनीं जयजयकार करून बोवांस सांगितलें 'तुमचें कार्य झालें.' तें काष्ठ नित्य उगाळून, त्यांत गाणगापुरचें भस्म मिश्रण करून, त्याचा लेप कुष्टावर

असतां, श्रीस्वामींस त्यानें आपणास एकानें फसविल्याबद्दल हकीकत सांगितली. ती अशीः—

ब्राह्मण म्हणाला, "कांहीं दिवसांपूर्वीं वांईस एक अनुष्ठानी बोवा आला होता. अनुष्ठानाची समाप्ति करून, श्रीदत्तप्रीत्यर्थ ब्राह्मणभोजन घालण्याचा त्यानें बेत केला. त्याजजवळ पैसे नव्हते. आपणांजवळून त्यानें समाराधनेकरितां २५ रुपये उसने घेतले. आपली हुंडी एकदोन दिवसांत येणार आहे, आल्यावर रुपयांची फेड करण्याचें त्यानें वचन दिलें. दुसरे दिवशीं समाराधना वगैरे यथासांग झाल्यावर, रात्रीं ब्राह्मणानें पोबारा केला; व मज गरीबाचे रुपये व्यर्थ बुडविले." ब्राह्मण आणखी म्हणाला, 'महाराज आपल्या नांवावर मीं रुपये दिले, त्याची अशी व्यवस्था व्हावी काय?' महाराजांनीं उत्तर दिलें नाहीं; पण दर्शनाकरितां तेथें पुष्कळ लोकांची गर्दी जमली होती, त्यां पैकीं एका गृहस्थाकडे बोट दाखविलें. महाराज काय दाखवितात, तें पहाण्यास ब्राह्मण मागें वळून पाहूं लागला, तों काय विलक्षण चमत्कार झाला पहा!!! ज्या ब्राह्मणानें त्यास फसविलें, तोच ब्राह्मण त्याचे मागें उभा होता. आपणांस ठकविणारा ब्राह्मण ओळखून, वांईकरानें त्याचा पदर धरिला. दोघांची बाचाबाच होऊं लागली. शेवटीं ठक ब्राह्मणानें आपली लबाडी कबूल केली. त्याजजवळ रोख पैसा नव्हता. मग गोविंदराव टोळ व दुसरे गृहस्थ मध्यस्थी पडून, दोघांची समजूत काढली. ब्राह्मणाजवळ सखलादीची टोपी, गुरुचरित्रांची पोथी व नाशिकचा तांब्या, प्याला वगैरे जिनसा होत्या, त्या वाईकर ब्राह्मणास देऊन, समजूत केली. नंतर वाईकरानें महाराजांजवळ येऊन विनंति केली कीं, आपल्या कृपेनें रुपये आपले आपल्यास मिळाले, त्यांचें काय करावयाचें त्याबद्दल आज्ञा व्हावी. महाराजांनीं उत्तर दिलें, "**आम्हांस ठाऊक नाहीं आल्या वाटेनें जा**" मग ब्राह्मण निघून गेला. याप्रमाणें महाराजांची अगम्य लीला होती.

## श्रीधर ब्राह्मणाचा पोटशूळ बरा झाला.

कर्नाटकांतील श्रीधर नांवाचा ब्राह्मण, गाणगापुरास येऊन सेवा करीत राहिला होता. पोटशूळाचा दारुण आजार त्यास झाला असल्यानें, श्रीची सेवा करीत होता. कांहीं दिवस गेल्यावर एका रात्रीं यतिरूप धरून दत्तांनीं ब्राह्मणास स्वप्नांत दर्शन देऊन, आज्ञा केली, "श्रीपुरीचे पानांचा रस काढून त्यांत सुंठ व सैंधव घालून भक्षण कर; म्हणजे पोटशूळ शांत होईल." श्रीधर सकाळीं जागा झाला व रात्रींचे

स्वप्नाची त्यास आठवण झाली. परंतु श्रीपुरी कोणत्या झाडास म्हणतात, हें त्या ब्राह्मणास कळेना. वैद्य व दुसरे अनुभवशीर गृहस्थांस श्रीपुरीचे झाडाबद्दल त्यानें विचारलें, पण त्यास कोणी सांगेना. ब्राह्मण सचिंत होऊन दुसरे दिवशीं रात्रीं देवळांत निजला असतां, त्यास पुनः श्रीनें दृष्टांत दिला, "अक्कलकोटास परमहंस स्वामी आहेत, ते तुला श्रीपुरीचें झाड दाखवून देतील." सकाळीं उठून श्रीधरानें अक्कलकोटाचा रस्ता धरिला. दुसरे दिवशीं ब्राह्मण अक्कलकोटास जाऊन पोहोंचला. नव्या विहिरीजवळ मारुतीचे ओट्यावर समर्थांची स्वारी बसली होती. श्रींचे पायांवर डोकी ठेऊन, हात जोडून उभा राहिला. त्याचे तोंडाकडे पाहूनच महाराज म्हणाले, '**अरे निंबाचे झाडास श्रीपुरी म्हणतात. त्याचा रस काढून त्यांत सुंठ व सैंधव मिश्रण करून तीन दिवस घे. म्हणजे तुझी व्याधि नष्ट होईल.**' ब्राह्मणास आनंद होऊन आज्ञेप्रमाणें औषध घेतल्यावर, आठ दिवसांनीं तो बरा होऊन आपल्या गांवास श्रीस्वामींचे गुणानुवाद गात परत गेला.

## गोविंदराव टोळ यांस गाणगापुरास संगमावर आपण असतों सांगून स्वप्नांत प्रत्यक्ष संगमावर दर्शन.

रा. चिंतो सखाराम ऊर्फ चिंतोपंत आपा टोळ यांचे चिरंजीव गोविंदराव हे दत्तोपासक होते. त्यांस ब्रह्मसमंधाची बाधा होती, ती दूर केल्याबद्दल पुढें गोष्ट येईलच. अक्कलकोटास ते सेवा करीत असतां, एके दिवशीं समर्थांची स्वारी त्यांचे बिऱ्हाडीं जोशी बुवांचे वाड्यांत अकस्मात् आली. सकाळची वेळ असून गोविंदराव पूजा करीत बसले होते. गोविंदरावांनीं महाराजांस बसण्यास पाट मांडला, व त्यांनीं गाणगापुराहून पादुका करवून आणिल्या होत्या त्या समर्थांचे पायांस लावून, समर्थांचें चरणांचें गंध, पुष्पें वाहून पूजन केलें व प्रार्थना केली कीं, अक्षय्य आपल्या चरणांचें ध्यान हृदयांत रहावें. विसर पडूं नये. प्रार्थना ऐकून महाराजांनीं मान डोलविली. पुन्हां गोविंदरावानें प्रश्न केला कीं, 'महाराज आपण गाणगापुरास संगमावर असतां काय?' महाराज म्हणाले, '**होय आम्हीं तेथें असतों**' असें सांगून महाराज उठून गेले. त्याच रात्रीं गोविंदराव यांस स्वप्नांत दृष्टांत झाला कीं, श्रीक्षेत्र गाणगापूर येथें गांवांतील देवालयांत श्रीदत्तात्रेय नृसिंहसरस्वतीच्या निज पादुका आहेत, त्या देव्हाऱ्यांत श्रीस्वामी बसले आहेत, व चरणीं निजपादुका घातल्या आहेत, पुजारी मंडळी सन्निध

बसली आहे. गोविंदरावांनीं पुजाऱ्यास स्वप्नांत विचारलें कीं, देव्हाऱ्यांत कोण बसलें आहे? पुजारी यांनीं जाब दिला कीं, हे अक्कलकोटचे स्वामी महाराज आहेत. इतकें स्वप्न पाहून गोविंदराव जागे झाले. व श्रीस्वामी साक्षात् दत्तावतार आहेत याबद्दल त्यांची खात्री झाली. महाराजांचे निस्सीम भक्तांपैकीं गोविंदराव हे एक असून ते सोलापुरास वास करून असत.—

## गिरनार पर्वतांतील सेवादास महाराज.

काठेवाड प्रांतांत जुनागड संस्थान आहे. जुनागड शहरापासून दोन मैलांवर प्रसिद्ध गिरनार पर्वत फार विस्तीर्ण व उंच आहे, या पर्वतांत हजारों सिद्ध, महात्मे पुरुषांचीं स्थानें असून, तेथें योगी व सत्पुरुष हजारों आहेत. हें प्रमुख श्रीसद्गुरु दत्तात्रेय स्वामींचें उत्तम वसतिस्थान असल्यामुळें अनेक लोक तेथें सेवार्थ राहातात. नेहमीं लक्षावधि लोक, दर्शनास येतात. शिवरात्रीचा मेळा भरतो. पर्वतांत चोहोंकडे वृक्ष, वनस्पतींची शोभा, देवस्थानें, स्वच्छ जलमय तीर्थें, कुंडें व मनुष्यांची गर्दी अक्षय्य असते. "दत्तगुरु गिरनारी भरंसा भारी" अशी अखंड गर्जना चालत असते. इ. स. १८७३ चे पौष्यमासीं वामनबोवा ब्रह्मनिष्ठ हे द्वारकायात्रेस गेले होते, तेव्हां त्यांचा गिरनार पर्वतांत १५ दिवस मुक्काम होता. त्यासमयीं गोमुखतीर्थ कुंडापलीकडे, जवळ सेवादास नांवाचे योगीपुरुष राहत होते. ते सांगत होते, "जे स्वामी हल्लीं अक्कलकोटास सुप्रसिद्ध आहेत, ते शके १७७५ चे सालीं या गिरनार पर्वतांत आम्हीं पाहिले आहेत." योगमार्गांत मला शंका होती, तिचें स्वानुभूतियुक्त सहज कोठें न झालेलें तें समाधान या चैतन्य नृसिंहस्वामींनीं केलें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें सर्व आंगच्या समर्थांच्या खुणा मिळतात. श्रीसमर्थांनीं सहज समाधान केलें, ते योगी सेवादास महाराज गिरनार पर्वतांत प्रसिद्ध होते.

गिरनार पर्वतांत असणारे कृष्णागिरी, भारतिबुवा व रामपुरी यांच्या उत्कट शुभेच्छेमुळें, श्रीमद्दत्तात्रेय महाराजांनीं अक्कलकोटास असलेले प्रख्यात नृसिंहभान-स्वामीरूपानें आपलें दर्शन त्यांस दिलें. हे त्रिवर्ग सत्पुरुष रामेश्वराच्या यात्रेहून येतांना इ. स. १८८२ त अक्कलकोटास उतरले होते. त्यांना प्रथमानुभवाचे दाखले मिळाल्यावर, स्वामी हे श्रीमत् गुरुदत्तगिरनारीच असा निश्चय झाला. ह्या त्रिवर्गांनीं ही गोष्ट वामनबुवांस सांगितली.

## पंढरपुरचे विठोबा व स्वामी महाराज

द्वारकेस द्वारकाधीशाचे मंदिराचे पहारा असलेले मोठे दरवाज्याचे डावे बाजूस, रिकाम्या मोकळ्या जागेंत एक मराठा तरुण साधु राहत होता. तो वेड्यासारखा वागत होता. गरीब सात्विक होता. तो सांगत होता कीं, मी पंढरपूच्या जवळचा रहाणारा आहें. मी मंगळवेढ्यास या विख्यात स्वामींची सेवा थोडी केली आहे. त्यांनीं मला असा हुकूम केला कीं, **तूं द्वारका यात्रा कर जा. दरवाज्यांत राहून तांब्याच्या पैशाचे आकाराच्या खापरखुंट्या करीत बैस, म्हणजे तुला विठोबा भेटेल** " त्याप्रमाणें मी थेथें खापराचे पैसे करीत बसलों आहें. दोन वेळ श्रीविठ्ठलाचें दर्शन मला येथें झालें. धन्य! धन्य! माझा तर विठोबा प्रत्यक्ष स्वामीमहाराज आहे! हें वृत्त शके १७९६ चे चैत्रशुद्धांत या साधूनें सांगितलें.

नारायणसरोवर गांवांत श्रीकृष्णात्रिविक्रमाचे मंदिरांत एक ब्रह्मचारी संस्थानी होते. ते पण सांगत होते कीं, सांप्रत अक्कलकोटस्थ स्वामीचें आम्हांस दर्शन झालें आहे. त्या दिगंबर दर्शनानें माझ्या उजव्या हातावरील कोड गेलें; व मनाला स्थिरता प्राप्त झाली. त्या अवतारी पुरुषाच्या कृपाकटाक्षानेंच या स्थानांत मी महंत झालों आहें असें बोलून स्वतःचे पूजेंत असलेली स्वामी महाराजांची तसबीर दाखविली. हें वृत्त शके १७९६ वैशाख वद्य ६ स वामनबुवा ब्रह्मनिष्ठ यांस नारायणसरोवरास असतांना सांगितलें.

## जगन्नाथपुरीस महाराजांचें दर्शन व संकट निरसन

एक अलवणी ब्रह्मचारी बुवा बडोद्यास फार दिवस रहात होते. त्यांनीं चारी धामें यात्रा केली होती. हे ज्या वेळीं जगन्नाथ स्थानांत होते. त्यावेळेस अलवणी महाराजांची प्रकृति बिघडली होती. एक दोन मनुष्यें बरोबर होतीं, पण त्या मनुष्यांस अंगांत ताप असल्यामुळें सिधा सरंजाम आणावयाचें सामर्थ्य नव्हतें. परमेश्वर सर्वांस साह्यकारी आहे, कोणाचेंही अडूं देत नाहीं. या नियमान्वयें अलवणीबुवांचें ह्रद्गत जाणून कोणी तेजःपुंज श्रीवृद्ध नृसिंहतीर्थ या नांवाचे यतिवेषधारी पुरुष, अलवणी सत्पुरुषाचे बिऱ्हाडीं येऊन, कमरेवर हात ठेऊन, सन्मुख उभे राहिले. या अवधूत नृसिंह-मूर्तीचें दर्शन होतांच, अलवणीबुवा खडखडून उठले. व परमहंस अवधूतास साष्टांग नमस्कार करून, हात जोडून उभे राहिले. मुखानें संस्कृत भाषेंत स्तुति

करून म्हणाले, "आपण साक्षात् अवतारी पुरुष अंतरसाक्षी आहांत, अनायासें दिनानाथांनीं दर्शन दिलें. आज महत् भाग्य सुदिन उदयास आला. हे भगवान्, आपला वास दक्षिण देशांत कोणत्या स्थानीं आहे ?' हें वाक्य श्रवण करून महाराज नृसिंह स्वामी बोलले, '**सर्वस्थानें आमचींच आहेत. त्यांत विशेषें करून मातापूर, गिरनारी पर्वत, कोल्हापूर, गाणगापूर आदिकरून स्थानें आहेत. त्या गाणगापूराजवळ फिरत फिरत संचार करूं**' असें वचन बोलत बोलत दिसेनासे झाले. अलवणीबुवांनीं हें पाहून त्यांस मोठा चमत्कार वाटला, विस्मित झाले, आणि पाहतात तों पक्वान्नानें पूर्ण भरलेलीं पात्रें सिद्ध आहेत. शिष्यासहित त्यांनीं तें प्रसादान्न प्रेमपूर्वक भक्षण केलें. परमानंद झाला. तात्काळ प्रकृति सुधारली. त्यासमयीं संन्यासी, गोसावी, खाकी, बैरागी वगैरे कित्येक लोक शोध करीत करीत तेथें आले; व ब्रह्मचारी अलवणीबुवांस विचारूं लागले कीं, "हमारे गुरु महंत दत्तावधूत नृसिंहतीर्थ—कहां है ?" अलवणीबुवांनीं इत्थंभूत वर्तमान सांगितल्यावर ते सर्व आक्रोश करूं लागले. 'हरीहर दत्तगुरु पामर सेवकोंका त्याग करके गुप्त होगये. हमारे निकृष्ट प्रारब्धकूं धिःक्कार है." असें म्हणत गेले. नंतर ब्रह्मचारीबुवा यात्रा करीत बडोद्यास येऊन राहिले. मी बडोद्यास असतां या मीठ न खाणाऱ्या बुवांकडे प्रथम दर्शनास गेलों. मला पाहून " जगन्नाथके महंत दत्तावधूत दाक्षिणका परमार्थ अक्कलकोटमें बैठे है. वृद्ध नृसिंहतीर्थ स्वामी " असें त्यांचें हें अंतरसाक्ष वाक्य ऐकून नमन करून नम्रपणें राम तलावाच्या राममंदिरांत देवीदास वगैरे मंडळीसमक्ष ही गोष्ट सांगितली असें वामनबुवा ब्रह्मनिष्ठनीं सांगितलें. हे अलवणी महाराज मोठे विरक्त, निस्पृही, ज्ञानी, मनांतील जाणणारे, सत्पुरुष होते. तसेंच विद्वान् व तपस्वी होते. कोणाची उपाधि न व्हावी म्हणून हे बालोन्मत्त पिशाचवत् बोलत असत; व त्याच वृत्तीनें स्वतंत्र रहात असत.

याप्रमाणें श्रीस्वामीसमर्थ अवतारी असल्याबद्दल आणखीही पाहिजे तितके दाखले देतां येतील. पण ग्रंथ विस्ताराचे भयानें आम्ही या मुद्यावर जास्ती लिहीत नाहीं.

## महाराजांचें मंगळवेढ्यांतील वास्तव्य

श्रीस्वामी महाराज हे प्रथम मंगलवढ्यास इ. स. १८३८ चे सुमारास प्रसिद्ध झाले.

श्रीस्वामी महाराज मंगळवेढ्यास १२ वर्षें पावेतों राहिले, पण तेथें ते फारसे प्रसिद्धीस आले नाहींत. ते गांवांत क्वचित्‌च येत. हमेषा ते रानांत रहात असत. गांवांत आले म्हणजे गलिच्छ ठिकाणीं बसून कोणी कांहीं दिलें तरी खाऊन पुनः जंगलांत जात. पटवर्धनांचें कुरण मंगळवेढ्यास आहे, त्यांत महाराज बहुतकरून रहात. महिन्यांतून एखादे वेळेस स्वारी गांवांत येई. असे रानांत असतांना ते उदरनिर्वाह कसा करीत हें त्यांचें त्यांसच माहीत. गांवांतील लोक हा कोणी वेडा बुवा आहे, असें प्रथम मानीत, पण पुढें महाराजांचे अद्भुत चमत्कार पाहून, महाराजांचे ठिकाणीं त्यांची श्रद्धा बसली. मंगळवेढ्यास महाराज दिगंबरबोवा या नांवानें प्रसिद्ध होते.

## मंगळवेढ्याचे बाळकृष्णबोवा–आंधळे मुलास दृष्टिदान व विहिरीस पाणी.

याच वेळेस मंगळवेढ्यास बाळकृष्णबोवा म्हणून साधु प्रसिद्धीस आले. त्यांनीं अनेक चमत्कार केल्याचें समजतें. एकदां देवीच्या आजारानें एका मुलाचे दोन्ही डोळे गेले; डोळे येण्याविषयीं या मुलाचे आईबापांनीं पुष्कळ इलाज केले, परंतु गुण येईना. एके दिवशीं बाळकृष्णबुवा त्यांचें घरीं गेले. त्या समयीं ह्या आंधळ्या मुलाच्या आईनें बोवाचे पायावर मुलास घालून प्रार्थना केली, “ महाराज, लेंकराचे डोळे गेले आहेत; औषधोपचार करून थकलें, पण डोळे आले नाहींत. हें ऐकून बाळकृष्णबुवांस करुणा आली. त्यांनीं तेथीलच एका झाडाचा पाला आपल्या हातानें चोळून मुलाच्या डोळ्यांवर बांधिला. आणि तीन दिवस उपोषण करण्यास सांगून, चवथे दिवशीं डोळे सोडण्यास सांगितलें, आणि आपण चालते झाले. चवथे दिवशीं डोळे सोडतांच मुलास लख्ख दिसूं लागलें. मंगळवेढें गांवाबाहेर गोरबाव नांवाची एक विहीर आहे. तिचें पाणी फार चांगलें असल्या कारणानें चौथाई गांव त्याच विहिरीचें पाणी पीत असे. एके वर्षी त्या विहिरीचें पाणी अगदीं आटलें. बोवांनीं ही अडचण पाहतां आपण त्या विहिरींत जाऊन बसले. तीन दिवस अहोरात्र बोवा विहिरींतच होते. चौथे दिवशीं विहिरींत पुरुषभर पाणी जमलें. मग बोवा बाहेर निघाले. बाळकृष्णबोवांनीं असे अनेक चमत्कार केलें आहेत. श्रीस्वामी महाराज मंगळवेढ्याहून गेल्यावर बाळकृष्णबोवाही पंढरपुरास जाऊन राहिले. तेथें कोंकणे नांवाचे हुंडीवाले सावकार होते, त्यांचें घरीं बुवा राहिले. बोवा घरीं आल्यापासून सावकाराचे

दुकानाची फारच भरभराट झाली. यामुळें त्यांचे घरचीं सर्व माणसें बोवांचे भजनीं लागलीं. बोवा समाधिस्थ झाल्यावर त्यांची समाधि सावकारानें चंद्रभागेंत बांधिली. बाळकृष्ण बोवा मोठे अवलिया होते. त्यांचें चरित्र कोणी लिहून ठेविलें नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. हे बोवा महाराजांस देव मानीत. बोवा दर्शनास आले म्हणजे महाराज दोन्ही हात कमरेवर ठेऊन विठोबासारखे उभे रहात. मग बोवा त्यांचे चरणीं मस्तक ठेवून दर्शन घेत असत.

## गाय दुग्धवती केली.

मंगळवेढ्यास महाराजांनीं अनेक चमत्कार केल्याचें समजतें. एकवेळ एका ब्राह्मणाकडे जाऊन महाराजांनीं खाण्यास दशमी मागितली. ब्राह्मणानें सांगितलें, "महाराज, दारांत गाय आहे, पण ती दूध देत नाहीं." हे शब्द ऐकून महाराज गाईजवळ गेले; आणि गाईच्या पाठीवर हात फिरवून म्हणाले, 'बाई, हा ब्राह्मण कुटुंबवत्सल आहे. याजवर तुम्ही अवकृपा कां करितां? यास दूध देत जा.' असें गाईजवळ बोलून ब्राह्मणास सांगितलें, 'आज तूं हिचें दूध काढून मला दशमी करून ठेव, मी संध्याकाळीं येईन.' त्या ब्राह्मणानें महाराजांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन गाईचें दूध काढविलें, आणि महाराजांस संध्याकाळा करितां दुधाची दशमी करून ठेविली. महाराजांनीं संध्याकाळीं येऊन ती दशमी खाल्ली. पुढें ब्राह्मणाची उत्तम प्रकारची भरभराट होऊन त्याचें दैन्य दूर झालें.

## बसाप्पा तेल्यास धनप्राप्ति.

बसाप्पा तेली मंगळवेढ्यास रहात असे. एके दिवशीं तो जंगलांत फिरत असतां, कंटकाची शय्या करून त्यावर श्री दिगंबर स्वामी म्हणजे श्रीस्वामी महाराज हे आनंदानें निद्रिस्त झाल्याचें त्यानें पाहिलें. महाराज हे साक्षात् अवतारी आहेत, अशी त्याची खात्री होऊन तो त्या दिवसापासून महाराजांची एकनिष्ठ भक्ति करूं लागला. सर्वकाळ महाराजांबरोबर तो फिरूं लागला.

घरीं त्याची बायको मोलमजुरी करून पोट भरी. घरीं दारिद्य फार असून नवरा वेड्याचे नादीं लागला, काम धंदा करीत नाहीं, म्हणून ती फार दुःख करीत असे. या प्रमाणें बरीच वर्षें गेलीं. बसाप्पाची भक्ति पाहून महाराज सुप्रसन्न झाले, व बसाप्पाचें दारिद्य दूर करण्याचें त्यांचे मनांत आलें. मग तेथें काय उशीर आहे!

एके दिवशीं चार घटका दिवस असतां बसापास बरोबर घेऊन महाराज लगतच काटवण म्हणून गांव आहे, त्या गांवचे जंगलांत गेले. महाराज पुढें व बसाप्पा मागें याप्रमाणें जातां जातां सूर्य अस्तमान झाला. एकाएकीं त्या जंगलांत हजारों सर्प दिसूं लागले. जिकडे पहावें तिकडे सर्पच सर्प!! असें पाहून बसाप्पा घाबरून गेला, व स्वामींचे चरणीं लागला. त्यास अभय देऊन महाराज म्हणाले, **तुझी इच्छा पूर्ण होईपावेतों ह्यांतून घे घाबरूं नको.** श्रीस्वामींचे शब्दावर विश्वास ठेवून, आपल्या आंगावरील वस्त्र सर्पावर घालून, भीत भीत एक सर्प बसाप्पानें हस्तगत केला. सर्प दीड हात लांब होता. तो बसाप्पानें आपल्या खाकेंत ठेविला. मग रानांतील सर्व सर्प नाहींसे झाले. महाराज व बसाप्पा मग गांवाकडे परतले. गांवाजवळ एक छानदार बाग होती, त्यांत महाराज बसले. व बसाप्पास आज्ञा केली कीं, घरीं जाऊन तुझ्या खाकेंत धन आहे तें घेऊन स्त्रीपुत्रांसह आनंदानें रहा. महाराजांचे चरणीं साष्टांग प्रणिपात करून, बसाप्पा स्वगृहीं गेला. भ्रतार घरीं आलेला पाहून त्याचे स्त्रीसही आनंद वाटला. तिचे समक्ष खाकेंतील गांठोडें काढून सोडून पाहातो तों, सर्पाचे ऐवजीं बावनकशी सोन्याची लगड झालेली दृष्टीस पडली. त्या स्त्रीपुरुषांचा आनंद गगनांत मावेना! प्रातःकाळीं दोघांनीं महाराजांचें दर्शन घेऊन, पंचारती ओंवाळली. महाराजांचे आशीर्वादानें पुढें तें दंपत्य आनंदानें संसार करूं लागलें. महाराज अक्कलकोटास आल्यावर बसाप्पा महाराजांचे दर्शनास प्रतिवर्षी येत असे. **ही गोष्ट इ.स. १८४४ सालीं घडली.**

## शिरसाच्या वृक्षाचा डींक साखरेंत खाऊन शूद्राचे स्त्रीस पुत्रप्राप्ति.

मंगळवेढ्यास एक साठ वर्षांचा शूद्र होता. बावन वर्षांचे वयाची त्याची बायको होती. तिजला संतान नसल्यानें ती फार कष्टी होती. बाई पतिव्रता असून मोठी भाविक होती. एक वेळ बसाप्पा तेल्याची व तिची गांठ पडली, महाराजांची विचित्र लीला त्यानें बाईस सांगितली व तिला उपदेश केला, "तूं महाराजांची भक्ति करीत जा. नित्य दर्शन घेतल्याशिवाय भोजन करूं नकोस; म्हणजे महाराजांचे कृपेनें तुझे मनोरथ पूर्ण होतील." त्या दिवसापासून बाई श्रीस्वामींची भक्ति करूं लागली. नित्य अरण्यांत जाऊन, महाराजांचें दर्शन घेऊन, मग भोजन करावें, असा तिनें नेम धरिला. याप्रमाणें दोन वर्षें तिनें भक्ति केली. पुढें एक वेळ बाई

बोवा नित्य लावूं लागले. या प्रमाणें कांहीं दिवस केल्यावर कुष्ट नाहींसें झालें. बोवांची सेवा चालली असतां, त्यांचें कुटुंब सौभाग्यवती राधाबाई, ह्याही श्री स्वामींची एकनिष्ठ भावानें सेवा करीत होत्या. बोवांस त्यावेळेस फक्त सात वर्षांची कन्या मात्र होती. बाईनें महाराजांस पुत्रप्राप्तीबद्दल प्रार्थना केली. महाराजांनीं आपल्या डोकीची टोपी काढून, बाईच्या ओटींत फेंकून दिली. बाईनें हा महाप्रसाद समजून आनंदानें महाराजांस साष्टांग नमस्कार घातला. पुढें बारा महिन्यांचे आंत पुत्र झाला. त्याचें नांव गुरुनाथ ठेविलें. श्रीस्वामी महाराजांचे आज्ञेप्रमाणें गुरुनाथाचा व्रतबंध अक्कलकोटास स्वामी सन्निध झाला. इ. स. १८७० सालीं माघ मासांत अक्कलकोटास शिवरात्रीचे दिवशीं, ठाकूरदास बोवा कीर्तन करीत असतां, आपल्या डोकीची भरजरी टोपी काढून, गुरुनाथाचे डोक्यांत महाराजांनीं घातली. पुढें ठाकूरदास बोवा श्रीस्वामींचे पूर्ण भक्त झाले. प्रतिवर्षी गुरुप्रतिपदेचे उत्साहास अक्कलकोटास येऊन, चार दिवस कीर्तन करून, आनंद करीत असत. श्रीस्वामी महाराजांच्या पादुका मुंबईस ठाकुरद्वारीं त्यांनीं स्थापन केल्या. ठाकूरदास बोवा नंतर कैलासवासी झाले. नंतर गुरुनाथबोवा हे ठाकुरद्वारीं श्रीस्वामींचें भजन पूजन भक्तिपुरःसर करीत असत. ठाकूरदास बोवांचें कुष्ट परिहार झाल्यावर, ते हमेष अक्कलकोटास येऊन, श्रीजवळ कीर्तन व पूजन करीत असत. एके दिवशीं बोवांचे मनांत आलें कीं, श्रीस्वामींपासून आपणांस गुरूपदेश मिळावा. असें मनांत येतांच महाराज फार रागावून म्हणूं लागले, "**हामकू कायकू सताता, हाम पंतोजीपण नहीं करता. गाटके गुरु बाटके चेले हम करते नहीं. देखे.**" पुढचे वर्षी श्रीकृष्णबोवांनीं मनांत निर्धार केला कीं, मरण आलें तरी पुरवलें, पण श्री स्वामीसमर्थांचा अनुग्रह घेतल्यावांचून रहावयाचें नाहीं, असा निर्धार करून महाराजांसमोर बोवा हात जोडून उभे राहिले. तेव्हां महाराज म्हणाले, '**निकल जा, जूता मारेंगे,**' हे शब्द ऐकून बोवांचे मनांत भक्तिविजयांतील कबिरांचे कथेचें स्मरण झालें. काशीक्षेत्रीं रामानंद म्हणून महान् साधू होते. त्यांचा अनुग्रह आपणास व्हावा म्हणून कबीर त्यांजकडे गेले. मणिकर्णिकेचे घांटावर रामानंद स्वामी स्नान संध्या करीत असतां, कबीर त्यांचे-जवळ जाऊन हात जोडून उभे राहिले. त्यांस पाहून रामानंदांनीं आपल्या पादुका झुगारून कबीरास मारिल्या. हाच अनुग्रह झाला, असें समजून कबीर श्रीरामाची भक्ति करूं लागले. ही गोष्ट बोवांचे मनांत येतांच, महाराज म्हणाले, '**तेरा कबीर झक मारता है, हम कुच परवा नहीं रखते.**' हे शब्द ऐकून

महाराजांचे अंतरसाक्षित्वाबद्दल बोवांस परमाश्चर्य वाटलें. महाराज साक्षात् दत्तावतार आहेत, असें जाणून अखेर पावेतों महाराजांची त्यांनीं भक्ति केली.

मुंबईस ठाकुरद्वारीं महाराजांचें देऊळ असून स्वामिभक्त गुरुनाथबोवा श्रीचे पादुकांची सेवा करून असत. 'रघुनाथजीके सन्निध हमकूं नाचनेकू जगा रखो' अशी आज्ञा महाराजांनीं ठाकूरदास बोवांस केली होती; त्याप्रमाणें श्रीरघुनाथाचे देवळाजवळ श्री समर्थांचा पूजादि उत्साह उत्तम प्रकारें चालू आहे.

## कुष्ट रोग्याची व्याधी गेली.

एक कुष्टी गाणगापुरास व्याधी शमनार्थ बहुत दिवस सेवा करीत राहिला होता. त्यास अक्कलकोटास जाण्याविषयीं दृष्टांत झाला. अक्कलकोटास जाऊन श्रीस्वामींची बहुत दिवस सेवा केली. कुष्ठानें अत्यंत त्रस्त झाला असल्यानें, एके दिवशीं श्रीस्वामींची प्रार्थना केली कीं, 'महाराज, आतां आपणास दुःख सहन होत नाहीं, मरण प्राप्त झाल्यास व्यथेपासून मुक्त होईन.' सदय हृदय स्वामीमहाराजांस त्याची कींव आली, व त्यांनीं त्यास आज्ञा केली, 'विष्टा घेऊन आंगास लाव.' आज्ञा प्रमाण म्हणून, सेवेकरी साष्टांग नमस्कार करून उठला, व औषध मिळविण्याचे खटपटीस लागला. त्यानें विचार केला कीं, विष्टाच आंगास लावण्याची तर दुसऱ्याची कशाला आणावी, असें मनांत आणून श्रीस्वामींचीच विष्टा घेऊन त्यानें सर्वांगास त्याचा लेप केला. कांहीं वेळानें आंग धुऊन टाकिलें. निश्चयाचे बळानें सेवेकऱ्याचें कार्य झालें. आठचार दिवसांतच आंगास क्षतें पडली होतीं, त्यांस खपली धरून तीं साफ झालीं, व कुष्ट्याचें शरीर दिव्य झालें. कांहीं दिवस अक्कलकोटास राहून श्रीस्वामींची आज्ञा घेऊन, संसारसुखाचा अनुभव घेण्यास कुष्टी आपल्या गांवीं गेला व श्रीस्वामींची सेवा करीत राहिला.

## वाईकर ब्राह्मणास एका अनुष्ठानी बोवानीं फसविलें. फसविणारा बुवा तेथेंच सांपडला–त्याची कबुली व वाईकरास आपले पैशाची परत फेड.

श्रीक्षेत्र वांई येथील एक ब्राह्मण गाणगापुरास सेवा करण्यास राहिला होता. अक्कलकोटचे श्रीस्वामींची कीर्ति ऐकून तो स्वामींचे दर्शनास आला. श्रीस्वामींची लीला पाहून त्यास आल्हाद झाला. एके दिवशीं स्वामीसन्निध ब्राह्मण बसला

महाराजांचे दर्शनास आली असतां, तिची सप्रेम भक्ति पाहून, महाराज प्रसन्न झाले. हास्य करून महाराज तिला म्हणाले, **"तो पलीकडचा वृक्ष दिसत आहे, तो पहा. त्याचा डीक काढून साखरेंत मिळवून खा, म्हणजे तुझें कार्य होईल."** बाई वृक्षाजवळ गेली. पहाते तों शिरसाचा वृक्ष होता. पांढरा शुभ्र त्यास डीक आला होता. तो काढून घेऊन महाराजांचे आज्ञेप्रमाणें त्यांत साखर घालून तिनें खाल्ला. दयाघनाचे कृपेंकरून बाई गर्भवती झाली, व तीस पुढें सुलक्षणी पुत्र झाला. महाराजांचे चरणांवर पुत्र घालून त्यांचें आशीर्वचन घेऊन बाई पुढें पतीसह आनंदानें नांदूं लागली.

## कोरड्या ठणठणीत आडांत विपुल पाणी.

बाबाजीभट म्हणून वैदिक व सत्वस्थ ब्राह्मण मंगळवेढ्यास रहात असे. श्रीस्वामी समर्थ त्यांचे घरीं महिना पंधरा दिवसांनीं येऊन घटका घटका बसत असत. एके दिवशीं तिसरे प्रहरीं महाराज भटजीचे घरीं आले. भटजी घरीं नव्हते. त्यांचे स्त्रीनें महाराजांस बसण्यास आसन देऊन, सद्भावानें पूजन केलें. महाराजांनीं तिजजवळ पाणी पिण्यास मागितलें. देण्याजोगें पाणी घरांत नसल्यानें बाईनें महाराजांस विनंती केली, "आपण क्षणभर स्थिर व्हावें, बाहेर जाऊन आतांच पाणी घेऊन येतें." महाराज तिला म्हणाले, **"घरांत पाणी असतां बाहेर कां जातेस?"** बाईनें हात जोडून विनंती केली, 'घरांत आड आहे खरा, पण त्यांत पाणी नाहीं. उन्हाळ्यांत तो कोरडा ठणठणीत होतो. म्हणून बाहेर जाऊन पाणी घेऊन येतें.' त्यावर स्वामी समर्थ म्हणाले, **'बाहेर जाणें नको, आडांत पुष्कळ पाणी आहे, तुला दाखवितों चल.'** असें म्हणून महाराज परसांत गेले. आडाजवळ बसून महाराजांनीं लघुशंका केली व बाईस म्हणाले, आडांत पुष्कळ पाणी आहे, घागर सोडून पाणी काढ. बाईनें महाराजांचे वाक्यावर विश्वास ठेवून, घागरीस दोरी बांधून, आडांत सोडून दिली. घागर पाण्यानें तेव्हांच भरली, व आडांत पुरुषभर पाणी झालें. बाबाजीभट तितक्यांत घरीं आले, व झालेला प्रकार पाहून, महाराजांस साष्टांग नमस्कार करून महाराजांची स्तुति केली. पाणी गोड विपुल होऊन पुढें पाण्याची तूट भटजीस कधींच पडली नाहीं. हे बाबाजीभट पुढें पंढरपुरास येऊन राहिले, व हा चमत्कार सर्वत्रांस त्यांनीं श्रुत केला.

## तंतुकार भक्तास द्रव्यप्राप्ति

मंगळवेढ्यास महाराजांचा एक तंतुकार (साळी) भक्त होता. तो दारिद्र्यानें फार पीडला होता. भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत असे. महाराजांची व त्याची सुदैवानें गांठ पडली. तेव्हांपासून महाराजांची एकनिष्ठपणें सेवा तो करूं लागला. सेवा करितां करितां तीन महिने झाले. महाराजांस भक्ताची करुणा आली. एके दिवशीं रात्रीं महाराज ज्या ठिकाणीं निद्रिस्त झाले, त्याच ठिकाणीं तंतुकारही निजला होता. तंतुकाराचे स्वप्नांत महाराजांनीं दर्शन देऊन दृष्टांत दिला तो असाः—"**तुझा बाप पूर्वीं मोठा व्यापारी होता. पंढरपुरास यात्रेकरितां तो गेला असतां, एकाएकीं मरण पावला. तुझी आई त्याचे पूर्वींच मेली. तुझ्या घराचे मागें तुझे बापानें तुळसीवृंदावनाखालीं पुष्कळ द्रव्य पुरून ठेविलें आहे, तें तूं काढून घे.**" असा चमत्कारिक दृष्टांत पाहून तंतुकार जागृत झाला. महाराजांचे आज्ञेप्रमाणें घरीं जाऊन तुळसीवृंदावनाखालीं खणून पहातो तों त्यास विपुल धन मिळालें, अत्यानंद होऊन श्रीस्वामींचा तपास करीत तंतुकार जंगलांत निघून गेला. व श्रीस्वामींचे चरणीं मस्तक ठेवून आनंदाश्रूनें श्रींचे पायास अभिषेक केला. आशीर्वचन घेऊन पुढें तो आनंदानें संसार करूं लागला. हा तंतुकार पुढें मोहोळास येऊन राहिला. अशी श्रीस्वामींची अगाध लीला आहे.

## महाराजांचा एक यवन भक्त

मंगळवेढ्यास श्रीस्वामी महाराज असतां, एक यवन त्यांची सेवा करीत असे. श्रीसमर्थांची स्वारी पटवर्धनाचे कुरणांत असे, तेथें जाऊन चिलीम तयार करून तो महाराजांस तंबाखु पाजीत असे. महाराज गांवांत आले म्हणजेहि, तो त्यांची सेवा करी. तो कांहीं धंदा करीत नसे. वेड्यासारखें गांवांत फिरावें, कोठेंतरी भाकर मागून खावी, याप्रमाणें त्याची वृत्ति होती. याप्रमाणें बरेच दिवस त्यानें स्वामी महाराजांची सेवा केली; पुढें महाराजांनीं त्याजवर अनुग्रह करून, मस्तकीं हस्त ठेवून ज्ञानी केलें. पुढें तो यवन मोठा अवलिया बनला. बाह्यात्कारी पिशाचवृत्तीनें राहून, अंतःकरणीं ब्रह्म तदाकार होऊन, तो सच्चिदानंदी लीन झाला. महाराजांनीं कोणास उपदेश वगैरे केला नाहीं, म्हणून लोकांची समज आहे, पण या अवलियाचे उदाहरणावरून पात्र पाहून महाराज कृपा करीत, यांत संशय राहिला नाहीं. पुढें हे

यवन अवलिया पंढरपुरास जाऊन सातारा जिल्ह्यांत गेले. ते कृष्णातटाकीं पिशाच-वृत्तीनें भ्रमण करीत; पुढें हे अवलिया मोठे योगी आहेत, अशी जगांत त्यांची कीर्ति होऊन पुष्कळ कामनिक लोक त्यांजकडे येत असत. अवलिया हे कोणी भेटीस आला तर त्यास दगड मारून जवळ येऊं देत नसत. दगड बहुतकरून कोणास न लागेल असा मारीत. पण ज्यास दगड लागे, त्याची कामना पूर्ण व्हावी, अशी त्यांची कृपा असे.

## यशवंतराव देव मामलेदार

श्रीयशवंतराव महादेव हे महाराज मंगळवेढ्यास असतां, भोसे गांवाहून तेथें जाऊन, कांहीं दिवस स्वामी सन्निध राहून, त्यांची कृपा संपादून, परत गांवीं गेले. पुढें ते देवमामलेदार म्हणून प्रसिद्धीस आले. यावरून श्रीसमर्थ योग्यतेनुरूप अनुग्रह करीत असत, हें दिसून येईल.

## चळअंब्यास महाराजांची लीला

श्रीस्वामीमहाराज मंगळवेढ्यास असतां ते हमेष पंढरपूर, बेगमपूर, चळआंबे वगैरे नजीकचे गांवीं जात येत असत. चळआंबे हा गांव पटवर्धनांचा आहे. एके दिवशीं श्रीसमर्थांची स्वारी चळआंब्यास रामदासीबोवांचे मठांत गेली, तेथें भोजन करून महाराज दोनप्रहरीं निद्रिस्त झाले. रामदासीबोवा, कांहीं काम असल्यानें मठाचें दार बंद करून त्यास कुलूप लावून बाहेर गेले. पुढें संध्याकाळचे सुमारास श्रीस्वामीसमर्थ भीमानदीचे वाळवंटांत खेळत बसलेले लोकांनीं पाहिले. चळआंब्यास भीमानदी आहे. महाराज वाळवंटांत बसले आहेत, अशी वदंता गांवांत पसरून रामदासीबोवांचे श्रवणीं पडली. महाराज तर मठांत निद्रिस्त आहेत, वाळवंटांतील स्वामी दुसरे कोणी असतील, असें बोवांस वाटलें. कारण आपले हातानें मठास कुलूप लावून बोवा बाहेर पडले होते. लगबगीनें बोवा मठांत जाऊन कुलूप उघडून पहातात तों श्रीसमर्थांची स्वारी मठांत नाहीं. हें पाहून बोवास आश्चर्य वाटलें. मठास दुसरा दरवाजा नाहीं, किंवा बाहेर पडण्यास कांहीं मार्ग नाहीं. दरवाजास स्वहस्तें कुलूप लावलें असून त्याची किल्ली आपणाजवळ आहे. महाराज मठाबाहेर कसे गेले? याबद्दल बोवांचा कांहीं तर्क चालेना. शेवटीं महाराजांचे अगम्य लीलेबद्दल बोवांस आश्चर्य वाटलें. वाळवंटांत जाऊन प्रेमपूर्वक बोवांनीं महाराजांचें दर्शन घेतलें. व त्यांस गांवांत घेऊन गेले. याप्रमाणें श्रीस्वामी

महाराजांची अगाध लीला होती. वे० शा० परशरामभट गोरे नांवाचे गृहस्थ सोलापुरास होते, त्यांनीं वरील चमत्कार पाहिला आहे.

## मंगळवेढ्यास त्रयमूर्तींची भेट

असें दिसतें कीं, श्रीस्वामी महाराजांप्रमाणें तीन मूर्ति असून, त्यांपैकीं महाराज हे एक होते. एके वेळेस या त्रयमूर्ति मंगळवेढ्याचे कांहीं लोकांचे दृष्टीस पडल्या होत्या. गांवाजवळ एक मोठा डोंगर आहे, त्याचे पायथ्याशीं नदी असून, तिचे कांठीं झाडी असून, तें स्थळ मोठें मनोहर आहे. त्या स्थळीं एक वेळ श्रीस्वामीमहाराजांची स्वारी बसली होती. तों नदीचे पलीकडचे तीराहून महाराजांप्रमाणें दिव्य तेजाचे असे दोन पुरुष तेथें आले. तिघांनीं परस्परांचें दर्शन घेऊन, तिघेही डोंगरावर चढले. परस्परांत भाषणें झालीं, तीं कोणास कळण्याजोगीं नव्हतीं. त्यांपैकीं एक यती “ कां रडतो कां ” म्हणून बोलला. तितक्यांत दुसरा म्हणाला “ हांका कां मारतो ? ” तिसरा म्हणाला “ असें कां करतो ? ” ह्याप्रमाणें मनःपूत बडबड करून ते डोंगरावर गेले व कांहीं वेळानें महाराज एकटेच परत आले.

## श्रीस्वामीरायांची हुमनाबादचे माणिकप्रभूस भेट व बाबा सबनीस यांस दर्शन

श्रीस्वामीमहाराज अक्कलकोटास येण्यापूर्वीं एकवेळ हुमनाबादेस “ माणिकप्रभू ” म्हणून वरदी पुरुष होऊन गेले. त्यांचे भेटीस गेले होते. यावेळेसही महाराजांबरोबर दुसऱ्या दोन मूर्ति होत्या. रा. रा. बाबा सबनीस हे अक्कलकोटचे रहाणारे होते. बाबा हे तत्त्ववेत्ते असून भाविक होते. त्यांचें कुटुंब निवर्तल्यामुळें ते उद्विग्न झाले होते. परमार्थसाधनांकरितां हुमनाबादेस माणिकप्रभूंकडे ते वारंवार जात असत. एकदां नित्याप्रमाणें बाबा माणिकप्रभूचे दर्शनास गेले असतां, प्रभूजवळ तीन मूर्ति बसलेल्या त्यांनीं पाहिल्या, त्यांपैकीं एक श्रीस्वामीमहाराज होते. माणिकप्रभूनें खूण करून महाराजांचें दर्शन घेण्याबद्दल बाबांस सूचना केली. बाबांस खूण समजली नाहीं. तेव्हां प्रभुनें बाबांस बोलून सांगितलें ‘ अतःपर हे स्वामीमहाराज तुझे गुरु आहेत. यांचें दर्शन घे. ’ मग बाबांनीं महाराजांचें व त्याजबरोबर असलेल्या दोन मूर्तींचें दर्शन घेतलें. महाराजांनीं

बाबांस पुष्कळ शिव्या दिल्या, व मनांतील गोष्टींची ओळख दिली. 'तूं कसाई आहेस,' म्हणून महाराज बाबांस म्हणाले. "**अक्कलकोटकू जाव हम बी आवेंगे**" असें महाराजांनीं बाबांस सांगितलें. आपण अक्कलकोटचे राहणार हे महाराजांस कसें कळलें, याजबद्दल बाबांस विस्मय वाटला. आपली आई फार आजारी असून जाऊं नको म्हणून वारंवार म्हणत असतां, आपण निर्दयपणानें तिला सोडून आलों म्हणून आपणांस महाराजांनीं कसाई म्हणून हांक मारिली; याबद्दलही बाबांचे मनाची खात्री होऊन, महाराज हे अवतारी असल्याबद्दल त्यांस संशय राहिला नाहीं. बाबा सबनीस हे पुढें अक्कलकोटास गेले. कांहीं दिवसांनीं महाराजही अक्कलकोटास प्रसिद्ध झाले. आपणास माणिकप्रभूंचे सन्निध दर्शन दिलेली अवतारी मूर्ति हीच अशी बाबांची खूण पटल्यावर, बाबा हे स्वामीमहाराजांचे निस्सीम भक्त झाले. महाराजांबरोबर असलेल्या दुसऱ्या दोन मूर्ति मात्र पुढें कोठें दृष्टीस पडल्या नाहींत. ब्रह्मा, विष्णु व महेश मिळून दत्त अवतार झाला त्याचप्रमाणें त्या त्रिमूर्तिपैकीं स्वामीमहाराजांचा अवतार अक्कलकोटीं प्रसिद्धीस आला.

## पंढरीनाथचा जोडा घालून महाराज मंगळवेढ्यांतून गेले

श्रीस्वामीमहाराज हे मंगळवेढ्याहून निघून पंढरपुरास आले; व तेथून मोहोळास आले. मंगळवेढ्याहून महाराज पंढरपुरास आले, त्यावेळेची हकीकत भागवत यांनीं लिहिलेल्या चरित्रांत दिली आहे, ती अशी :—

महाराज मंगळवेढ्याहून निघाले, ते दिवशींची स्मरणाची हकीकत मंगळवेढ्यांतील एका गृहस्थांकडून आम्हांस कळली, ती अशी—सोलापुराला जाणाऱ्या रस्त्यावर करमरकर यांचें एक शेत आहे. तें शेत वे० रा० रा० पंढरीनाथ आणि एकनाथ भटजी दिवासकर यांनीं सन १८५५।५६ सालीं वांट्यानें घेतलें होतें. पंढरीनाथ आणि एकनाथभटजी यांची आणि स्वामी महाराजांची एके दिवशीं ऐन १–२ वाजतां रस्त्यांत गांठ पडली, त्यावेळीं सूर्याची प्रखरता होऊन गेल्यामुळें पायांचे चटके बेण्यापुरती जमीन तापून गेली होती. पाय अतिशय भाजूं लागल्यामुळें स्वामींनीं पंढरीनाथाजवळ त्याच्या पायांतील जोडे आपल्या पायांत घालण्याकरितां मागितले. पंढरीनाथानें ताबडतोब जोडे पायांतून काढून स्वामी महाराजांस पायांत घालण्याकरितां दिले. स्वामी महाराजांनीं ते जोडे पायांत घालून जी चाल काढली, त्या चालीनें पंढरीनाथ आणि एकनाथ हे आपसांत बोलत आहेत तों महाराज त्या

उभयतांचे नजरेआड झाले. स्वामीमहाराज आसपास कोठें दिसत नाहींत असें पाहून एकनाथ पंढरीनाथास म्हणतो, 'अरे तूं आपला जोडा त्या वेड्यास देऊन टाकलास, आणि तो तर दिसेनासा झाला, जोडा दिला असें काकांना कळलें तर ते रागावतील.' हें ऐकून पंढरीनाथ चिंतेंत पडला. सुमारें पांच मिनिटांचे अवकाशांत स्वामीमहाराज मोठ्या लगबगीनें परत आले. आणि पंढरीनाथास म्हणाले, '**घे आपला जोडा, आतां काका कशास रागें भरेल. जोडा तर आला,**' इतकें बोलून पुन्हा परत झपाट्यानें चालते झाले. या दोघांस वाटलें कीं, हा वेडा येथेंच कोठें तरी आड होता, त्यानें आपलें बोलणें ऐकून जोडा परत आणून दिला. पंढरीनाथानें जोडा पायांत घातला; आणि उभयतां शेताकडे चालते झाले. सोलापूर वाटेकडून कांहीं मंडळी अर्ध्या तासानें गांवाकडे आली, ती मंडळी अर्ध्या वाटेंत भेटली त्यांनीं हा वेडा लगबगीनें कशाकरितां आला होता, याबद्दल चौकशी झाली. त्यावरून हा वेडा इतक्या थोड्या अवकाशांत सुमारें अर्ध्या तासाचे पल्यावर असून त्याला आपण बोललेले शब्द कसे कळले, याजबद्दल मोठें आश्चर्य वाटलें. आणि हा आपण म्हणतों तसा वेडसर नसावा अशा विषयीं त्या सर्व लोकांची त्यावेळीं खात्री झाली. त्या दिवशीं स्वामीमहाराज जे गेले ते पुनः मंगळवेढ्यास परत आले नाहींत.

## श्री यतीरायांचे मोहळास आगमन.

श्रीस्वामीमहाराज हे मंगळवेढ्याहून निघाले ते पंढरपुराहून मोहोळास आले. मोहोळ त्यावेळीं तालुक्याचा गांव होता. पंढरपुराहून निघाले तों भीमानदीस महापूर आला असून नावा बंद होत्या. श्रीस्वामीसमर्थ तसेच नदींत चालून पलीकडे गेले. त्यांस गुडघाभर पाण्यापेक्षां जास्ती पाणी मुळींच लागलें नाहीं. हा चमत्कार पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें.

## ब्रह्मदर्शनेच्छु कोष्ट्यास ब्रह्म—तेजानें भ्रमिष्टता व गवे स्वामींचे विनंती वरून कोष्ट्याचा भ्रमनिरास.

मोहोळास त्यावेळेस रा० गणेश हरी सोहनी नांवाचे मामलतदार होते. श्रीस्वामीमहाराज मोहोळास येऊन हमेष त्यांचे घरीं वास करीत. मोहोळास गवे स्वामी म्हणून लिंगाईत वाणी जातीचा मोठा योगाभ्यासी व महान् साधु होऊन गला. त्यावेळेस गवे स्वामींचें वय १२५ वर्षांचें होतें, असें सांगतात. एकांतीं

एका खोलींत बसून गवे स्वामी, योगधारणा करीत. त्यांचें आसन जमिनीपासून दोन हात अधांतरीं रहात असे, असें म्हणतात. बहुत काळचा योगाभ्यास असून, भूतभविष्य ज्ञान त्यांस होतें. एके दिवशीं श्रीस्वामीसमर्थांची व गवे स्वामी यांची गांठ पडून एकांतीं भाषणें झालीं. त्यावर गवे स्वामींनीं योगाभ्यास सोडून आसन विसर्जन केलें. श्रीस्वामीमहाराज अक्कलकोटास गेल्यावर पुढें बरेच दिवसांनीं गवे स्वामी समाधिस्थ झाले.

मोहोळास श्रीस्वामीसमर्थ असतांना, एक कोष्टी जातीचा गृहस्थ आपणास "ब्रह्म दाखवा, ब्रह्म दाखवा," म्हणून महाराजांचे पाठीस लागला. कांहीं केल्यानें तो आपला नाद सोडीना. एके दिवशीं महाराज कोष्ट्यास म्हणाले, "तुला ब्रह्म दाखवितों." मोहोळास श्री नागनाथाचें देवालय आहे. तेथें श्रीस्वामी व कोष्टी होते. "**ब्रह्म पहा**" असें महाराजांनीं म्हटल्याबरोबर कोष्ट्यास जिकडे तिकडे नाग दिसूं लागले. कोष्टी हा घाबरून गेला व भीतीनें तो भ्रमिष्ट झाला. बरेच दिवस तो वेड्यासारखा फिरत होता. नंतर गवे स्वामींनीं श्रीस्वामी-समर्थांची प्रार्थना करून कोष्ट्यास पूर्व स्थितीवर आणलें.

## गणेश हरी यानीं गुरुआज्ञा मान्य केल्यावर सर्वकांहीं यथास्थित

मोहोळास गेल्यावर श्रीस्वामीसमर्थ गणेश हरी सोहनी यांचे घरीं रहात म्हणून वर सांगितलें आहे. एके दिवशीं भाद्रपदमासीं गणेश हरी यांचे घरीं गणपतीचे उत्सवानिमित्त रात्रीं कीर्तन चाललें होतें. मध्यरात्रींचा समय असून पाऊस मंद मंद पडत होता. अशा वेळेस श्रीसमर्थ सभेंतून उठून गढीचा दरवाजा उघडून बाहेर पडले. हें पाहून गणेश हरीहि बाहेर पडून समर्थांची घरांत जाण्याविषयीं विनवणी करूं लागले. अनेक प्रकारें प्रार्थना केली, पण महाराज घरांत परत न जातां त्यास म्हणाले "तुझे घरीं आम्हांस विटाळ होतो, आम्ही येत नाहीं." असें म्हणून महाराजांनीं जंगलचा रस्ता धरिला. सोहनी यांनीं मशाल लावून महाराजांबरोबर एक कोसभर जंगलांत गेले. वारंवार परत येण्याविषयीं प्रार्थना चालली होती; पण महाराज परत आले नाहींत. गणेश हरीची मग निराशा झाली; नंतर त्यांनीं महाराजांस प्रश्न केला कीं पुनः केव्हां दर्शन द्याल? तेव्हां महाराजांनीं उत्तर दिलें. "**आंब्याचे दिवसांत देऊं.**" महाराजांजवळ एक मनुष्य ठेवून सोहनी घरीं परतले. महाराजांनीं गणेश हरीस, "तुझे घरीं आम्हांस

विटाळ होतो." असें सांगितलें. त्याचें कारण असें होतें कीं, गणेश हरीनें घरांत एक रखेली बाळगली होती तीस सोडून द्यावें अशी महाराजांची इच्छा दिसली. सोहोनी हे मोठे भक्तिमान् होतें. पण कामाचे झपाट्यांतून कोण पार पडला आहे! श्रीस्वामींचीं जोड करून रखेलीस सोडलें असतें, म्हणजे सर्व ठीक जमतें. पण मायेचा झपाटा मोठा विलक्षण आहे! श्रीजगद्गुरुस सोडून रखेलीचें चैनबाजींत सोहोनी राहिले, त्यामुळें पुढें त्यांजवर बरेच प्रसंग आले; व महाराजांचें वचना-प्रमाणें रखेली सोडीपावेतों त्यांस सुदीन प्राप्त झालेच नाहींत.

वरील गोष्ट घडल्यावर सन १८५१।५२ सालचे सुमारास जिल्ह्याचे कलेक्टर मोहोळ तालुक्याचे जमाबंदीस आले. साहेबानें सोहनी यांची कीर्ति ऐकून त्यांस एकांतीं बोलावून सांगितलें कीं, तुम्हीं रखेली ठेविली आहे, तीस सोडून द्यावें. अंमलदारास ही गोष्ट कलंक आणणारी आहे. गणेश हरीस मोह सुटेना. लहान-पणापासून आपण तिजला ठेविलें असून, आतां सोडणें बरोबर नाहीं, असें मनांत आणून उघडपणें साहेबास सोहनी यांनीं उत्तर दिलें कीं, साहेबांनीं खाजगी गोष्टींत लक्ष देऊं नये. त्यावरून साहेबांस फार राग आला. पुढें गणेश हरीवर फौजदारी खटले होऊन ते सेशन कमिटही झाले; पण श्रीस्वामींचे कृपेनें सेशनांत गणेश हरी हे निर्दोषी होऊन सुटले. मात्र मामलतीचे कामावरून ते बडतर्फ झाले. पुढें सोलापुरास जाऊन बरेच दिवस घरीं राहिले. पुढें आंब्याचे दिवस आल्यावर श्रीस्वामी समर्थ दिगंबर रूपानें दोन आंबे घेऊन सोहनी यांजकडे गेले; व ते आंबे देऊन त्यांचे पदरांत घालून तसेच नाहींसे झाले. सोहनी यांस बडोद्यास पुनः मामलतीची जागा मिळून सोन्याचे दिवस त्यांचे दृष्टीस पडले. पण ते केव्हां, तर महाराजांचे आज्ञेप्रमाणें रखेली सोडल्यावर; ती गोष्ट अशी आहे कीं, जेव्हां नोकरी जाऊन निर्वाहास कांहीं साधन उरलें नाहीं, तेव्हां कोठें तरी प्रयत्न करून नोकरी मिळवावी, म्हणून सोहनी आपल्या अंगवस्त्रासुद्धां पुण्यास गेले. त्या वेळी बडोद्यास श्रीमंत गणपतराव-महाराज गादीवर असोन त्यांचे पदरीं गणेशशास्त्री, म्हणून गृहस्थ होते. ते राजाचे मोठे प्रीतींतले होते. हे गणेशशास्त्री सोहनी यांचे स्नेही असल्यानें गायकवाडींत आपली कांहीं योजना व्हावी म्हणोन त्यांनीं शास्त्रीबुवांस पत्र धाडलें.. गणेशशास्त्री यांनीं उत्तर पाठविलें, "आपण लौकरच पुण्यास येणार आहों, त्यावेळेस काय तो विचार करूं." पुढे गणेशशास्त्री पुण्यास आल्यावर सोहनी यांनीं त्यांची भेट घेतली. गणेशशास्त्री यांनीं सोहनीस सांगितलें "आपण नोकरीबद्दल खटपट करूं, पण ही रखेली प्रथम सुटली पाहिजे, गायकवाड सरकारास या गोष्टीची मोठी चिरड आहे;

21323

करितां रखेली सुटे पावेतों कांहीं करितां येत नाहीं." सोहनी यांनीं निरूपाय होऊन रखेली सोडली. पुढें त्यांस श्रीगुरुकृपेनें बडोदें संस्थानांत देगांव तालुक्याची मामलत मिळून तिचा उपभोग त्यांनीं २०।२२ वर्षें घेतला. गुरु आज्ञा मान्य केल्यास काय होणार नाहीं ! !

## श्रीस्वामीरायांचें सोलापुरास आगमन.

मोहोळाहून श्रीस्वामीमहाराज निघाले ते सोलापुरास गेले. सन १८५४।५५ सालची ही गोष्ट आहे. कांहीं महिने महाराज सोलापुरास राहिले. रामभाऊ गुर्जर यांचे घरीं महाराज रहात असत.

## चिंतोपंत आप्पा टोळ व महाराजांची गांठ.

एके दिवशीं श्रीदत्ताचे देवळांतील सोप्यांत श्रीस्वामीसमर्थ दिगंबररूपानें बसले होते. सायंकाळचे वेळीं पुष्कळ भक्तमंडळी दत्ताचे दर्शनास आली. त्यांत रा० चिंतोपंत आपा टोळही आले. दत्ताचें दर्शन घेऊन प्रदक्षिणा करितांना महाराजांची दिव्यमूर्ति दृष्टीस पडली. महाराजांस पाहून चिंतोपंत मनांत म्हणाले, हे कोणी सिद्ध पुरुष असावेत, असें मनांत येतांच महाराज म्हणाले, "**आम्ही सिद्ध पुरुष असो कीं कोणी असो; तुला काय करावयाचें आहे, तूं आपल्या वाटेनें जा.**" हे शब्द ऐकून टोळांस आश्चर्य वाटलें. व ते मनांत म्हणाले, हे कोणी मनकवडे असावे. त्यावर महाराजांनीं पुन्हां उत्तर दिलें, "**आम्हीं मनकवडे असो कीं कोणी असो; तूं आपल्या वाटेनें जा.**" हें उत्तर ऐकून तर महाराजांचे अंतरसाक्षित्वाबद्दल चिंतोपंताची पूर्ण खात्री होऊन महाराजांसन्निध जाऊन त्यांनीं दर्शन घेतलें. व घरीं येण्याबद्दल महाराजांची प्रार्थना केली. चिंतोपंतांची भक्ति पाहून महाराज त्यांचे घरीं गेले. भोजन करवून चिंतोपंतांनीं उत्तमप्रकारें महाराजांची सेवा केली. व पुढें त्यांचे ते एकनिष्ठ सेवक बनले.

## भक्तींत विकल्प.

चिंतोपंत आपा टोळ यांची व श्रीस्वामीची गांठ पडल्यापासून टोळ यांस महाराजांचे अगाध लीलेबद्दल अनुभव येऊं लागला. टोळ यांची भक्ति महाराजांचे चरणीं दृढ झाली. मर्जी प्रसन्न पाहून टोळ हे महाराजांस आपल्या घरीं भोजनास वगैरे नेत असत. एकदां महाराजांस चिंतोपंत घरीं घेऊन गेले.

महाराज ओसरीवर बसले, व टोळ घरांत गेले. मागीलदारीं स्नान करीत असतां दाजीबा सोहनी यांची व टोळांची मसलत झाली कीं, स्वामी हे पाहिजे तेथें जेवतात, त्यांचे पंक्तीस ब्राह्मणानें बसणें चांगलें नाहीं; करितां स्वामींचें पान दुसरे पंक्तीस मांडावें. असा बेत होऊन टोळ ओसरीवर धोतर नेसत आले. तितक्यांत महाराज त्यांस म्हणाले, "**तुझे मनांत कांक्षा आली, आम्हीं जेवीत नाहीं.**" असें म्हणून उठून चालते झाले. आपल्या मनांत विकल्प आला त्याचें हें फळ आहे, असें जाणून टोळ यांनीं समर्थांचे चरण धरून, मोठ्या मिनतवारीनें महाराजांस घरीं नेऊन, भोजन घातलें.

## भक्त कैवारी बहुरूपधारी स्वामी महाराज.

दुसरे एके वेळेस अशीच महाराजांची स्वारी टोळ यांचे घरीं भोजनास आली होती. चिंतोपंत यांनीं महाराजांस स्नान घालून यथासांग पूजन करून भोजनास पात्र वाढलें. महाराज जेवीनात. दहा वाजून गेले. चिंतोपंत आप्पांचा मुलगा विष्णुपंत उर्फ दाजीबा हा त्यावेळेस सोलापूर कलेक्टरचे दफ्तर कचेरींत कारकून होता. गोल्डफिंझ साहेब त्या वेळेस कलेक्टर असून हणमंतराव पीतांबर हे दफ्तरदार होते. दोघेही अधिकारी फार कडक असून सर्व कारकुनांनीं बरोबर दहा वाजतां कचेरींत यावें असा नियम होता. चिंतोपंतानें चिरंजिवास सांगितलें कीं, "तुला कचेरींत जाण्यास उशीर होईल, करितां घरांत जाऊन जेवण उरकून जा." विष्णुपंतही भक्तिमान् होता, त्यानें निश्चय केला कीं, महाराजांनीं भोजन केल्याशिवाय अन्न घ्यावयाचें नाहीं, जें व्हावयाचें असेल तें होईल. अकरा वाजण्याचे सुमारास महाराज भोजन करूं लागले. मग विष्णुपंतही भोजन आटोपून लगबगीनें कचेरींत गेला. बाळकृष्ण देवराव हे त्यावेळीं कलेक्टरचे हेडक्लार्क असून त्यांजकडेस हजिरी भरण्याचें काम होतें. विष्णुपंतानें अंगवस्त्र गादीवर ठेविलें, व आपणास जरा उशीर झाला त्याबद्दल रदबदली करण्यास, ते हेडक्लार्ककडे गेले. विष्णुपंताची विनंति ऐकून हेडक्लार्कास आश्चर्य वाटलें. तुम्ही आज माझ्या अगोदर कचेरींत आलां असून तुमची हजिरी पूर्वींच भरली आहे असें हेडक्लार्कांनीं सांगितलें. व हजिरीबुक उघडून त्यांत हजर मांडलें असल्याचें विष्णुपंतास दाखविलें. विष्णुपंतास मोठें आश्चर्य वाटलें, व सर्व कारकून मंडळीसही त्या गोष्टीचें मोठें कौतुक वाटलें. पुढें बहुत वर्षें पावेतों ही गोष्ट कलेक्टर कचेरींतील सर्वांचे तोंडीं होती. ही गोष्ट सन १८५६ सालची आहे. अशी महाराजांची अघटित लीला आहे.

## राजाचा अंतकाळ हाच उन्हाळा.

चिंतोपंत आप्पा यांनीं इंग्रजींत मामलतीचें काम केलें असून, स्वामी महाराज सोलापुरास आले, त्यावेळीं ते पेनशनर होते. पुढें अक्कलकोटचे राजे शहाजीमहाराज यांनीं टोळ यांस अक्कलकोटास कारभारी नेमिले होते. टोळ एकवेळ सोलापुरास असतां राजेसाहेबांचें त्यांस जरुरीचें पाचारण आलें. श्रीस्वामी महाराज टोळांचे घरीं त्यावेळीं आले होते. "आपणही मजबरोबर अक्कलकोटास चलावें," म्हणून महाराजांची टोळ यांनीं प्रार्थना केली. तेव्हां महाराज म्हणाले, "अक्कलकोटास उन्हाळा आहे, आपण येत नाहीं," "तर मग महाराज, आपण अक्कलकोटास केव्हां याल?" म्हणून टोळ यांनीं पुन्हां प्रश्न केला. तेव्हां महाराज म्हणाले, "पाऊस पडल्यावर येऊं." मग चिंतोपंतआप्पा स्वामीमहाराजांची आज्ञा घेऊन अक्कलकोटास गेले. हल्लीं उन्हाळा आहे, पाऊस पडल्यावर येऊं म्हणून महाराज टोळ यांस म्हणाले, याचा अर्थ प्राकृतजन असा करतील कीं, उन्हाळा कडक असल्यानें महाराज भिऊन अक्कलकोटास गेले नाहींत. पण महाराजांचा अर्थ तसा नव्हता. भर दोन प्रहरीं हवें तितकें ऊन असलें तरी महाराज बाहेर पडत. अक्कलकोटचे राजाचा अंतकाळ जवळ आला होता, व त्या सालीं पावसाळ्याचा उन्हाळा बनला होता, हाच महाराजांचा उन्हाळा या शब्दाचा अर्थ होता. पुढें शहाजी राजे यांची प्रकृति बिघडून आषाढमासीं त्यांचा अंत झाला. त्या सालीं सबंध चतुर्मासांत पाऊस म्हणून कसा तो पडला नाहीं. पुढें दीपवाळी झाल्यावर कार्तिकमासीं पर्जन्य पडून पिकें चांगलीं आलीं. मग श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोटास आले. त्यावेळेस श्रीमंत मालोजीराव अक्कलकोटचे गादीवर नुकतेच बसले होते. पुढें सतत तेवीस वर्षें महाराजांनीं बुद्धिग्रामीं (अक्कलकोटास) वास करून भक्तवृंदांस अनेक लीला दाखवून भक्तकामकल्पद्रुम या नांवाची सार्थकता केली.

# भाग २ रा

## अक्कलकोटांतील श्री स्वामीमहाराज यांचें वास्तव्य
## " हम् किसकेताबेदार है "

कार्तिक महिन्यांत चिंतोपंत आपा सोलापुरास आले होते, त्यांजबरोबर महाराज अक्कलकोटास गेले. टोळ यांनीं दोन घोडे आणवून एकावर आपण बसून दुसऱ्यावर स्वामीमहाराजांस बसविलें. बरोबर एक चाकर घेऊन पायवाटेनें अक्कलकोटास चालले. सुमारें चार कोस लांब गेले, तों मागाहून कलेक्टर साहेबां-कडून चिंतोपंताचे नांवाचा हुकूम घेऊन एक स्वार आला. जरूरीचें काम आहे, तुम्ही उभ्याउभीं भेटून जावें, म्हणून हुकुमांत फर्माविलें होतें. चिंतोपंतांनीं गड्यास सांगितलें, आम्हीं आतां जाऊन परत येतों, तोंपावेतों स्वामींस कोठें जाऊं देऊं नये. अशी ताकीद देऊन चिंतोपंत सोलापुराकडे परत गेले. समर्थ कोणाचे आज्ञेंत थोडेच राहणार!! टोळ गेल्याबरोबर आपण उठून जवळच एक बाग होता त्यांत गेले. तेथून जे निघाले ते थेट अक्कलकोटास जाऊन खंडोबाचे ओट्या-वर बसले. इकडे चिंतोपंत सोलापुरचें काम आटोपून, भरधांव घोडा सोडून, ज्या झाडाखालीं महाराजांस बसण्यास सांगितलें होतें तेथें आले. पाहतात तों स्वामी-महाराज तेथें नाहींत. गड्यावर रागावून स्वामींस कसें जाऊं दिलें, म्हणून पुसूं लागले. गड्यानें हात जोडून प्रत्युत्तर केलें कीं, स्वामींनीं न जावें म्हणून आपण पराकाष्ठा केली, पण महाराजांनीं कांहीं ऐकलें नाहीं. " **हम किसके ताबेदार है ?** " असें बोलून महाराज दहा पांच पावलें गेले, मग गुप्त झाले; असें गड्यानें सांगितलें. टोळ यांस फार वाईट वाटलें. व महाराजांचें पुनर्दर्शन होतें कीं नाहीं, याबद्दल त्यांस काळजी पडली. इकडे तिकडे तपास करून पाहतां, महाराज कोठें मिळाले नाहींत; सबब निराश होऊन टोळांनीं घोडा भरधांव

काढून अक्कलकोटचा मार्ग धरिला. खंडोबाचें देऊळ सोलापूरचे वाटेवरच आहे. खंडोबाचे देवळांत महाराजांस पाहून टोळ यांस मोठा आनंद झाला. सत्वर घोड्याखालीं उतरून त्यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें; व विनंति केली कीं, आपल्या घरीं चलावें. महाराजांनीं उत्तर दिलें, "**आमचें घर निराळें आहे.**" पुष्कळ आग्रह केला पण महाराज येत नाहींत, असें पाहून निराश होऊन टोळ आपल्या बिऱ्हाडीं गेले.

## १८५७ सालचे बंडाचें भाकीत.

श्रीस्वामीमहाराज चोपाळाचे घरीं राहिले होते. मनास वाटेल तेव्हां दुसरेकडेही जाऊन रहात. पण चोळापा त्यांचे बरोबर सेवेंत तत्पर असे. कांहीं दिवस पावेतों महाराज रा० चिंतोपंत आपा टोळ यांचें घरीं जाऊन राहिले होते. तेथें असतां महाराजांनीं चमत्कारिक खेळाची सुरवात केली. तो खेळ असा. गांवाबाहेर जाऊन एरंडाची लांकडें महाराज आणीत; व त्यांचे वीत वीत लांबीचे तुकडे करून त्यांत माती भरून दुसरे लांकडानें ती माती ठांशीत असत. मग पांच पांच सहा सहा तुकडे त्रिकोणाकृति ज्याप्रमाणें पलटणीचे लोक बंदुकी लावून ठेवितात त्याप्रमाणें रांगाच्या रांगा लावून ठेवीत असत. त्याप्रमाणेंच घोंगडीच्या दशा काढून, त्या दहा पांच एके ठिकाणीं गांठून, त्यांची रांग लावून ठेवीत. असा क्रम सहा महिने पावेतों चालला होता. महाराज हें काय करितां? असा कोणी प्रश्न केल्यास "**पलटणी तयार करितों**", म्हणून जबाब देत. महाराजांचे कृतीचा अर्थ कोणास कळेना. पुढें सन १८५७।५८ सालीं उत्तर हिंदुस्थानांत पलटणी बदलून नानासाहेब पेशवे यांचें बंड झालें; तेव्हां महाराजांनीं खेळरूपानें युद्धाचे तयारीचीं चिन्हें दाखविल्याचें सर्वांचे ध्यानांत येऊन, मोठा चमत्कार वाटला. याचप्रमाणें महाराजांच्या प्रत्येक कृतींत अर्थ असे; पण तो अर्थ प्रसंगानुसार विचारदृष्टीनें पाहिला म्हणजे ध्यानांत येई. सन १८५८ सालचे बंडाचा कांहीं दिवस धुमाकूळ माजून, अनेक लहान थोर गोरगरीब स्त्रीपुरुषांचा विध्वंस होऊन, पुढें इंग्रज बहादुरांचे पराक्रमानें जिकडे तिकडे शांतता होत चालली. अशा संधीस श्रीस्वामी समर्थ दुसराच खेळ खेळूं लागले. तो असा कीं, अक्कलकोटास लक्ष्मी नांवाची मोठी तोफ आहे. तेथें जाऊन रोज प्रातःकाळीं महाराजांनीं त्या तोफेच्या तोंडांत डोकें खुपसून बसावें. असा कांहीं दिवस क्रम चालला. लोकांस या कृतीचा कांहीं अर्थ कळेना. पुढें बंडाची चौकशी होऊन बंडांत सामील असलेल्या हजारों

लोकांस तोफेच्या तोंडीं देण्याचा सरकारनें सपाटा चालविला, तेव्हां सुज्ञ जनांस महाराजांचे कृतीचा अनुभव आला. पुढें महाराजांनीं ती कृति सोडल्यावर तोफेच्या तोंडीं देण्याचेंही बंद झालें. सदरचे बंडांत सामील असल्याबद्दल पुष्कळ राजेरजवाड्यांवर वहीम येऊन त्यांची चौकशी झाली.

## जमखिंडीचे राजे आप्पासाहेब यांजवरील संकट व त्याचें निवारण.

जमखिंडीचे राजे श्री० आपासाहेब यांजवरही त्यावेळीं आफत आली होती. कोणी दुष्ट लोकांनीं आपासाहेबांबद्दल इंग्लिश अधिकाऱ्यांचे कान फुंकल्यावरून, आपासाहेब बंडांत सामील आहेत, असा त्यांजवर आरोप येऊन, इंग्रजसरकारांनीं त्यांचें संस्थान जप्त केलें होतें; व खुद्द आपासाहेबांस अटक करून वेंगुर्ल्यास नेऊन ठेविल होतें. त्यावेळीं आपासाहेबांचे पदरचे गृहस्थ गोपाळ जोशी हिरळीकर हे अक्कलकोटाचे राहणारे असल्यानें, रजा घेऊन कांहीं कामास अक्कलकोटास आले होते. त्यावक्तीं महाराजांची बरीच प्रसिद्धि झाली होती. श्रीसमर्थांची कीर्ति ऐकून हिरळीकर जोशीबुवा त्यांचे दर्शनास गेले. श्रीस्वामीमहाराज अक्कलकोटा-बाहेर सभोंवार खंदक आहे, त्यावर बसले होते. जोशीबुवा महाराजांचें दर्शन घेऊन त्यांचे सन्निध इतर मंडळी बसली होती, त्यांत जाऊन बसले. मंडळींत इकडील तिकडील गप्पा होतां होतां जोशीबुवांनीं आपल्या यजमानावर (आपासाहेबांवर) आलेल्या प्रसंगाची इत्थंभूत हकीकत मंडळीस सांगितली. हकीकत सांगणें चाललें असतां एकदां महाराजांनीं जमखिंडीकडे तोंड फिरविलें, व तोंडावर छाटी घेऊन "**या या या**" असें म्हणून हातांनीं बोलावण्यासारखी खूण बरेच वेळ करीत बसले. मंडळींनीं ही कृति पाहून जोशीबुवांस सांगितलें कीं, श्रीस्वामीसमर्थ तुमचे यजमानास बोलावीत आहेत, त्याअर्थीं खचित ते दोषमुक्त होऊन परत येतील. जोशीबुवास मोठा आनंद होऊन त्यांनीं शकुनगांठ बांधिली. श्रीस्वामीसमर्थांचे कृपेनें पुढें सहा महिन्यांनीं जमखिंडीकर हे निर्दोषी ठरून, वेंगुर्ल्याहून आपल्या संस्थानांत परत येऊन अधिकार चालवूं लागले. या प्रमाणें पुढें होणाऱ्या गोष्टीबद्दल कांहीं चमत्कारिक कृति करून महाराज दिग्दर्शन करीत असत.

## मोंगलाईतील निलंगें गांवीं १८५९ सालचें रोहिल्यांचें बंड.

पुढें सन १८५९ सालीं निलंगें, जिल्हा नलदुर्ग इलाखा मोंगलाई येथें रोहिले लोकांनीं बंडावा करून लाखों रुपयांची लूट केली; व पुष्कळ लोकांस मारठोक

केली. ही बातमी चोहोंकडे पसरली. एके दिवशीं श्रीसमर्थांची स्वारी अक्कलकोटास बुधवार पेठेंत बादुल्लाखां शिपाई याचे आंगणांत बसली होती. महाराजांचे सन्निध पुष्कळ लोक बसले होते; त्यांत निलंगें रोहिल्यांनीं लुटल्याची गोष्ट निघाली. तितक्यांत समर्थांनीं बादुल्लाखां यास आज्ञा केली कीं, 'एक लगाम घेऊन ये.' त्याप्रमाणें त्यानें लगाम आणून महाराजांचे हातीं दिला. तो लगाम घेऊन महाराज उठले; व आंगणांतच एक बोरीचें झाड होतें त्यास लगाम अडकवून, आपल्या जागेवर येऊन बसले व खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांनीं उद्गार काढिलेः—"**अब हिंदूका कुछ रहा नहीं. हत्ती गया, घोडा गया, पालखी गया, उंट गया, आदमी सब कूछ गया.**" असें बोलून महाराज स्तब्ध राहिले. महाराजांचे वर लिहिलेले उद्गार कितपत खरे झाले याची साक्ष इतिहास देत असल्यानें, त्याजबद्दल येथें जास्ती लिहिणें जरूर नाहीं.

## अक्कलकोटचे राजे श्रीमंत मालोजीराव यांस प्रथम दर्शन.

महाराज अक्कलकोटास आले तेव्हां श्रीमंत मालोजीराव नुकतेच गादीवर बसले होते. ते पुढें महाराजांचे पूर्ण भक्त बनले. महाराज आल्यावर कांहीं दिवसांनीं आपल्या गांवांत कोणी साधु आले आहेत, म्हणून हकीकत राजाचे सेवक राजास सांगूं लागले. राजानें त्यांस उत्तर दिलें, "साधु खरें. कशावरून म्हणावे; आतां त्यांची गोष्ट निघाली आहे तर आतांचे आतां त्यांनीं येऊन आपणांस दर्शन द्यावें. म्हणजे ते खरे साधु असें आपण मानूं." इतकें बोलण्याचा उशीर तों दिगंबर स्वामीमहाराज राजापुढें येऊन उभे राहिले. राजास मोठें आश्चर्य वाटलें, त्यानें मनोभावानें श्रीस्वामींचें दर्शन घेतलें. पुढें कांहीं वेळानें महाराज उठून गेले.

## तरवार व पिकदाणी राजास देऊन त्याची गव्हर्नरसाहेबांस भेटण्याकरितां रवानगी.

पुढें कांहीं दिवसांनीं मुंबईचे गव्हर्नरसाहेब सोलापुरास आले होते. संस्थानचे कांहीं कामासंबंधानें श्री. मालोजीराजेसाहेबांस त्यांनीं बोलाविलें. राजेसाहेबांनीं आपले कारभारी चिंतोपंत आपा यांस बरोबर घेतलें, व जावयास निघाले. टोळ यांनीं राजेसाहेबांस सुचविलें कीं, आपणांस राजकीय कामास जावयाचें आहे, करितां चोळोपाचे घरीं एक साधु आले आहेत, त्यांचें दर्शन घेऊन जावें हें बरें.

राजेसाहेबांनीं टोळ यांचें म्हणण्यास रुकार दिला. चोळापाचे घरीं बाजेवर महाराज बसले होते. मेण्यांतून उतरून आंत येऊन पहातात तों महाराजांची कडक मुद्रा पाहून, राजाचे पुढें जाण्यास धैर्य होईना. अरे इकडे ये म्हणून महाराजांनीं हाक मारल्यावर आंत जाऊन, राजानें महाराजांचें दर्शन घेतलें. तितक्यांत एका शिपायाच्या हातांत तरवार होती ती घेऊन, महाराजांनीं राजाचे हातांत दिली तसेंच हुजऱ्याचे हातांत पिकदाणी होती ती घेऊन राजाचे हातीं दिली. मग दर्शन घेऊन राजेसाहेब व टोळ सोलापुरास गेले. गव्हर्नरसाहेब जाण्याचे गडबडींत होते, त्यामुळें तोफांची सरबत्ती व इतर मानपान राजास मिळावा, तसा मिळाला नाहीं, यामुळें राजास वाईट वाटलें. गव्हर्नरसाहेब व राजेसाहेब यांची मुलाखत झाली. हत्यारें बाळगण्यासंबंधानें संस्थानांत बंदी झाली होती, त्याबद्दल विचार करून साहेबांनीं पूर्ववत् हत्यारांची मोकळीक दिली. महाराजांनीं राजाचे हातांत तलवार दिली होती, त्याचा अर्थ हत्यारें बाळगण्याची परवानगी होईल, असा अनुभवास आला व पिकदाणी दिली हें अपमानदर्शक असल्याचा अनुभव आला हें पाहून राजास आश्चर्य वाटलें. पुढें राजाची भक्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊं लागली. मग चोळापास महाराजांची शुश्रूषा करण्याबद्दल राजानें पांच रुपये दरमहाची नेमणूक करून दिली.

## जातीपेक्षां भक्ति महाराजांस प्रिय होती.

महाराज गांवांत वाटेल तिकडे हिंडत असत, व वाटेल तेथें बसत. लहर लागेल त्याप्रमाणें वाटेल त्याचे घरीं अन्न ग्रहण करीत. ब्राह्मण, शूद्र, वैश्य व यवन या सर्वांस ते सारखेंच मानीत. जातीपेक्षां भक्ति महाराजांस प्रिय होती.

## मेलेला उंदीर जिवंत केला.

एके दिवशीं फिरत फिरत श्रीस्वामीसमर्थांची स्वारी राजवाड्यांत गेली. राजा पुढें येऊन महाराजांस घेऊन घरांत गेला, व उभयतां देवघरापुढें झोंपाळ्यावर बसले. दोघांच्या गोष्टी चालल्या. इकडे देवघरांत आपा सलब पुजारी गंध उगाळीत होता. तों एक उंदीर येऊन निरांजनांतील फुलवाती खाऊं लागला. त्याजकडे सलबाची नजर गेली. देवघरांत उंदरांचा फार त्रास झाला होता. नित्य उंदीर वाती खाऊन जात. आपास उंदरांचा राग येऊन त्यानें हातांतील खोड मोठ्या जोरानें उंदरावर फेंकलें. त्यासरसा उंदराचा प्राण गेला. मग शेंपूट

धरून उंदरांस बाहेर टाकण्यास आपा घेऊन चालला. महाराजांनीं उंदीर इकडे आण, म्हणून आपास आज्ञा केली. आपानें महाराजांचे हातीं उंदीर दिला. त्यास घेऊन महाराजांनीं त्याची झोपाळ्याचे कड्यांतून इकडून तिकडे व तिकडून इकडे अशी दहा पांच वेळ काढघाल केली. मग त्यास हातांत घेऊन "**बच्चा जाव,**" म्हणतांच उंदीर सजीव होऊन ताडकन् उडी मारून आपले बिळांत पळून गेला. हा चमत्कार पाहून राजास महाराजांचे अद्भुत शक्तीबद्दल मोठा चमत्कार वाटला.

## मी तुझे गांवीं आलों असून तूं येथें कां येतोस ?

हा चमत्कार घडला त्याचवर्षी श्रीमंत मालोजी राजे गुरुप्रतिपदेचे उत्सवास गाणगापुरीं गेले. दरवर्षास गाणगापुरास जाऊन त्रिरात्र तेथें वास करून ब्राह्मणभोजन घालून राजेसाहेब परत येत. या वर्षी ब्राह्मणभोजन झालें, आणि रात्रीं श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी स्वप्नांत येऊन बोलले कीं, "मी तुझे गांवीं आलों असून तूं येथें कां येतोस ?" हें स्वप्न पाहून राजा जागा झाला, व दुसरे दिवशीं अक्कलकोटास परत आला. श्रीस्वामी समर्थ साक्षात् दत्त अवतार आहेत, अशी त्याची खात्री झाली. मग स्वामींच्या पादुका घेऊन त्यांस गंधलेपन करून त्या देवळांत पूजेस ठेविल्या. पुढें गुरुप्रतिपदेचा उत्सव राजा अक्कलकोटासच करूं लागला. संस्थानांतून प्रति वर्षास दीडशें रुपयांची नेमणूक उत्सवास असून, अद्याप पावेतों मोठ्या थाटानें उत्सव होत असतो.

## सोन्याचा भरलेला चौफुला विहिरींत टाकून दुसरे दिवशीं काढविला—तरी त्यांतील लवंगा वेलदोडे कोरडेच होते.

एक वेळ श्रीस्वामीसमर्थ राजवाड्याचे आंगणांत फिरत होते. तितक्यांत हुजऱ्याचे हातांत सुवर्णाचा चौफुला होता, तो महाराजांनीं हिसकून घेतला. आंगणांत एक खोल विहीर होती तिकडे पाहून महाराजांनीं राजास प्रश्न केला, "**चौफुला विहिरींत टाकूं ?**" राजानें हात जोडून विनंति केली कीं, "महाराज, चौफुला आपलाच आहे, त्याचें पाहिजे तें करावें." हें ऐकून महाराजांनीं चौफुला विहिरींत फेंकून दिला. सोन्याचा चौफुला गेला म्हणून सर्व लोक खेदयुक्त मुद्रेनें पाहूं लागले. राजास महाराजांच्या सामर्थ्याबद्दल पूर्ण खात्री होती, सबब त्यास चौफुला

गेल्याबद्दल कांहींच फिकीर वाटली नाहीं. रात्रीं महाराज वाड्यांतच राहिले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं महाराज पुनः आंगणांत खेळूं लागले. तेथें राजाही आला. " **अरे पोहरा आण** " म्हणून महाराजांनीं राजास आज्ञा केली. राजानें तत्काळ पोहरा व दोर आणविला. विहिरींत पोहरा सोडून बाहेर काढला. तों काय चमत्कार झाला पहा ! पोहऱ्यांतून सुवर्णाचा चौफुला वर आला. चौफुल्यांतील लवंगा, वेलदोडे जसेचे तसेच असलेले दृष्टीस पडले ! ! हा चमत्कार पाहून राजास व सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें.

## अक्कलकोट येथील २२।२३ वर्षांचे वास्तव्यांत (१) चोळापाची (२) राणीसाहेब व सुंदराबाई व (३) पंचांची अशा तीन कारकिर्दी झाल्या.

श्रीस्वामीमहाराजांचा अक्कलकोटास सुमारें २२।२३ वर्षें वास झाला. या काळांत तीन कारकीर्दी झाल्या; म्हणजे महाराजांची सेवा करणें, त्यांजपुढें भक्त-लोक पैसा व इतर जिनसा ठेवीत त्यांची व्यवस्था लावणें, व साधारणपणें महा-राजांवर नजर ठेवणें, हीं तीन कामें तीन वेळेस तीन निरनिराळ्या व्यक्तींकडे सोंपवलीं गेलीं. पहिली कारकीर्द चोळापाची, दुसरी श्रीमंत राणीसाहेब व सुंदराबाई यांची व तिसरी पंचांची. या कारकीर्दी बदलण्याचें कारण काय हें योग्य स्थळीं कळविण्यांत येईलच. यापुढें ज्या आम्हीं गोष्टी देत आहोंत त्या आम्हांस ज्याप्रमाणें माहिती मिळाली त्याप्रमाणें देत आहोंत. त्यांतील पहिल्यानें घडलेली गोष्ट कोणती व मागाहून घडली कोणती, याजबद्दल खात्रीपूर्वक कांहींच सांगतां येणार नाहीं. कारण जसजशा गोष्टी घडल्या तसतशा क्रमानें त्या कोणी लिहून ठेविल्या नाहींत. त्यामुळें तशी फोड करणें अशक्य आहे. शिवाय महाराज जरी समाधिस्थ झाले, तरी भक्तजनांस ते जसे पहिल्यानें होते तसे ते अद्यापही आहेत. हल्लीं आपल्या भक्तजनांस दृष्टांतानें वगैरे अनेक चमत्कार करून दाखवीत आहेत व बालकांप्रमाणें भक्तांचे संरक्षण करीत आहेत. करितां समाधिस्थ झाल्या-वरही ज्या कांहीं चमत्कारिक गोष्टी महाराजांसंबंधानें घडल्या आहेत, त्याही आम्हीं चरित्रांत देणार आहोंत.

## महाराजांचे आगमनानें विपरितः सुपरितो भवेत्.

महाराज अक्कलकोटास आल्यावर थोडेच दिवसांनीं संस्थानावर मोठें संकट आलें होतें. पण तें स्वामींचे कृपादृष्टीनें दूर झालें. ती हकीकत अशी आहे.

सन १८५७ सालचे बंडापूर्वी कांहीं वर्षें अक्कलकोटास पिराजीराव भोंसले म्हणून मानकरी होते. अक्कलकोटचे राजेसाहेब व सातारकर बुवासाहेब महाराज या उभयतांचें मन शुद्ध नसल्यामुळें, पिराजीराव भोंसले यांनीं अक्कलकोटास बंड करून, सातारकरांबरोबर लढाई करून, त्यांचे सैन्याची फार खराबी केली. उभयतां राजांचे तंट्यांत इंग्रजसरकारानें मध्यस्थी करून समेट केला. बाजीराव साहेबास इंग्रजसरकारांनीं ब्रह्मावर्तास नेऊन ठेविल होतें. तेथें जाऊन पिराजीनें बाजीरावाची नोकरी पत्करली. आपल्या गुणांनीं पिराजी हा बाजीरावाचे छोटेखानी सैन्याचा सेनापति झाला. ब्रह्मावर्तास असतांना पिराजीस एक दासीपुत्र झाला. पुढें बरींच वर्षें गेल्यावर बाजीराव व पिराजी हे वारले. व सन १८५७ सालीं नानासाहेब पेशवे यांनीं बंड केलें. पिराजीचा मुलगा दाजीबा भोंसले अक्कलकोटास होता. त्याजवर मालोजीराजे यांची फार प्रीति असून त्यांस सर्व सल्लामसलत दाजीबाच देत असे. पिराजीचे दासीपुत्राचीं बंडासंबंधीं पत्रें दाजीबास अक्कलकोटास गुप्त रीतीनें येत असत. त्यांपैकीं कांहीं पत्रें मुंबईसरकारचे हातीं येऊन, त्यांनीं ती सोलापुरचे कलेक्टर व अक्कलकोटचे पोलिटिकल एजंट मे० गोल्डस्मिथसाहेब यांजकडे पाठवून देऊन, तुम्ही पोलिटिकल एजंट असतां तुम्हांस बातमी नाहीं, हें तुमचें निष्काळजी-पणाचें दर्शक आहे म्हणून ठपका दिला. त्यावरून पोलिटिकल एजंट यांस फार वाईट वाटलें. त्यांनीं अक्कलकोटचे राजेसाहेबांस रागानें यादी लिहिली कीं, दाजीबा भोंसले यांस आमचेकडे एकदम पाठवून द्यावें. श्रीमंत मालोजीराजे यांचे दाजीबां-वर प्रेम असल्यानें, ते त्यांस पाठविण्यास कांकूं करूं लागले. आपल्या आज्ञेप्रमाणें राजेसाहेब करीत नाहींत, हें पाहून पोलिटिकल एजंट यांचा राग जास्ती वाढला. साहेबांनीं राजेसाहेबांविरुद्ध सरकारांत लिहून, अक्कलकोट संस्थानचा बंदोबस्त करण्यास आपणांस लागेल तितक्या सैन्याची मदत मिळावी, व त्याबद्दल हुकूम सोलापूर लष्करांतील मेजरसाहेब यांस, 'परभारें जावा' अशी विनंति केली. ही खबर अक्कलकोटास कळतांच सर्वांची पांचावर धारण बसली. आतां संस्थान जप्त होतें असें सर्वांस वाटलें. चिंतोपंत आप्पा टोळ कारभारी व नाना वकील सातारकर यांनीं विचार केला कीं, अशा वेळेस स्वस्थ बसून उपयोग नाहीं. पोलिटिकल एजंट यांजकडे जाऊन कांहींतरी खटपट करून आलेला प्रसंग टाळला पाहिजे. श्रीस्वामी समर्थांची त्यांनीं आज्ञा मागितली, "**जा कांहीं होत नाहीं**" म्हणून महाराज म्हणाले. चरणीं मस्तक ठेऊन उभयतां निघाले. ते सोलापुरास जाऊन साहेबांस भेटले. टोळ यांनीं साहेबांस

पुष्कळप्रकारें विनवणी करून राजेसाहेबांचें चोख वर्तनाबद्दल साहेबांची खात्री केली. साहेब दयाळूच होते, त्यांनीं टोळांस अभयवचन दिलें, व सांगितलें कीं, आम्ही ज्या असाम्या मागतों त्या मात्र पाठवून दिल्या पाहिजेत. चिंतोपंतांनीं ती गोष्ट मान्य केली. त्याच संधीस हिंदुस्थानांतून एक बंडांतील मनुष्य अक्कलकोटास आला होता. तो डफ मृदंगाचे गतीवर फार चांगला वाजवीत असे. राजेसाहेबांस डफ वाजवून दाखवून खुष करून एकांतीं गांठ घ्यावी, व बंडाबद्दल त्यांचें साह्य मागावें, म्हणून तो आला होता. तसेंच म्हैसूर संस्थानांतून तेथील राजेसाहेबांकडून एक जंगम चार माणसें बरोबर घेऊन आला होता. हीं सर्व त्रहिमी माणसें व दाजीबा भोंसले मिळून २७ माणसें आपणांकडे पाठवून द्यावींत, म्हणून राजेसाहेबांस हुकूम आला. नाइलाज होऊन राजानें सर्वांस पकडून सोलापुरास पाठविलें. साहेब खुष झाले, व राजाबद्दल त्यांचे मनांत आलेला सर्व संशय दूर झाला. आतां लष्कराचें काम नाहीं, म्हणून त्यांनीं सरकारांत रिपोर्ट केला. दाजीबा भोंसले यांस तीन वर्षें ठाण्याचे किल्ल्यांत नेऊन अटकेंत ठेविलें. नंतर सोलापूर जिल्ह्यांत त्यानें येऊं नये म्हणून ठराव झाला. म्हैसूरचे राजेसाहेब यांनीं आमचा परागंदा झालेला नोकर सोलापुरचे अधिकारी यांचे ताब्यांत आहे, त्यास संस्थानांत परत पाठवावें, म्हणून कमिशनरचे मार्फत लिहिल्यावरून, जंगमास म्हैसूर संस्थानांत पाठवून दिलें. बाकीचे इसमांस कांहीं दिवस अटकेंत ठेवून मग खुलें केलें. याप्रमाणें आलेला प्रसंग श्रीस्वामीमहाराजांचे कृपेनें टळला. महाराज नुकतेच अक्कलकोटास आले होते. त्यांचे आगमनानें ॥ **विपरितः सुपरितो भवेत्** ॥ असें होण्यास काय उशीर आहे? आलेला प्रसंग किती कठीण होता, याचें अनुमान हल्लीं करितां येणार नाहीं. पण सन १८५७ सालची धामधूम व बंडाळी मनांत आणिली म्हणजे, ती वेळ किती आणीबाणीची होती हें लक्षांत येईल.

## राजास यथाशास्त्र राज्याभिषेक.

असो, तोफा व इतर हत्यारें संस्थानांत राहूं द्यावींत, म्हणून सरकारनें ठराव केला. या वेळेपूर्वीं थोडेच दिवस मालोजी राजे यांचे वडील वारले होते. मालोजीराजे संस्थानचें काम पहात होते, पण सरकारांतून त्यांस देण्यास वस्त्रें आलेलीं पोलिटिकल एजंट साहेबांनीं बंडाचे धांदलीमुळें अटकावून ठेविलीं होतीं. त्यामुळें यथाशास्त्र राजास राज्याभिषेक झाला नव्हता. तो स्वामी महाराजांच्या कारकीर्दीत

यथासांग झाला. सर्व प्रकारें राज्यांत स्वस्थता झाली. राजाची गादी कायम रहाण्यास स्वामी महाराजच कारण झाले, याबद्दल महाराजांचे तोंडांतून एकवेळ उद्गार निघाले होते. त्याबद्दल हकीकत खालीं दिली आहे.

वरील गोष्ट घडल्यावर कांहीं वर्षांनीं राजेसाहेब हे दाजीबा भोंसले यास जामीन होऊन अक्कलकोटास घेऊन आले. दाजीबाचें राजावर वजन होतें, त्यामुळें तो वाटेल ती गोष्ट करीत असे. प्रजा फार त्रासून गेली. दाजीबानें चिंतोपंत आपा टोळ यांचे बद्दल राजेसाहेबाचे मनांत वाईट भरून दिल्यामुळें, नाइलाज होऊन टोळ हे कारभार सोडून पुण्यास जाण्यास निघाले. टोळ हे स्वामी महाराजांचे भक्त होते. एके दिवशीं श्रीस्वामी महाराजांची स्वारी टोळांचे बिऱ्हाडीं आली. रात्रीं त्यांचेच घरीं वस्तीस राहिले. रात्रीं भोजन झाल्यावर महाराजांनीं शयन केलें. कांहीं वेळ गेल्यावर समर्थांनीं आपणाशींच भाषण केलें, '**तुजला राजा कोणी बनविला, निगा रखो मेहरबान सलाम कोणी केलें? विसरलास, तुझें चांगलें व्हावयाचें नाहीं.**' असें बोलून महाराज स्तब्ध राहिले. अर्थात हे शब्द राजास उद्देशून होते. पुढें चिंतोपंत आपा टोळ समर्थांची आज्ञा घेऊन पुण्यास गेले. महाराजांचे वचनाप्रमाणें पुढें संस्थान जप्त होऊन राजास दुर्दिन आले. पण त्यावेळेसही महाराजांचे कृपेनें पुन्हा संस्थान राजेसाहेबांस परत मिळालें.

## दाजीबाचे मुलाचे हातीं तिळ व भविष्य–" संपलें जा "

दाजीबा भोंसले यास ठाण्याचे किल्ल्यांत अटकेंत ठेविल्यावर एके दिवशीं दाजीबाचा मुलगा व त्याची आत श्रीस्वामी महाराजांचे दर्शनास आलीं. दोघें समर्थांचें दर्शन घेऊन सन्निध बसले, तितक्यांत महाराजांनीं तीळ आणण्याची आज्ञा केली. सेवेकऱ्यांनीं तीळ आणतांच त्यांतून एक मूठभर तीळ घेऊन दाजीबाचे मुलाचे हातांत दिले. व श्रीस्वामी समर्थ म्हणाले, 'संपले जा.' पुढें कांहीं दिवसांनीं मकरसंक्रांत आली. दाजीबाचा मुलगा आजारी पडून त्यास देवाज्ञा झाली. याप्रमाणें श्रीस्वामी समर्थांची वचनोक्ति अनुभवास येत असे.

## काळजी कां करतोस आम्ही तिला खंड्या नेमला आहे.

विश्वासराव ऊर्फ आपासाहेब माने हे रहिमतपूर, जिल्हा सातारा येथील रहाणारे होते. अक्कलकोटचे राजेसाहेब यांचे आपासाहेब मानकरी असल्यानें ते अक्कलकोटास रहात असत. त्यांची कन्या जमनाबाई लग्नास उपवर झाली. पण कोठें वर

मिळेना. तेव्हां माने यांस मोठी चिंता प्राप्त झाली. कन्या रूपानें अप्रतिम सुंदर होती. आपले योग्यतेप्रमाणें व मुलीचे रूपाप्रमाणें वर कसा मिळतो, याची आपासाहेबांचे मनांत निरंतर काळजी लागली. एके दिवशीं श्रीस्वामीसमर्थांकडे जाऊन, चरणीं मस्तक ठेवून, आपासाहेबांनीं महाराजांस विनंति केली, " मुलीस चांगलें स्थळ मिळत नाहीं, महाराजांनीं कृपा करावी." श्रीस्वामीसमर्थांनीं जबाब दिला कीं, '**काळजी कां करतोस, आम्ही तिला खंड्या नेमला आहे.**' आपासाहेब यांस आज्ञेचा अर्थ कळेना. पण महाराजांवर विश्वास ठेवून ते स्वस्थ राहिले. कांहीं दिवस गेल्यावर असा योगायोग आला कीं, श्रीमंत खंडेराव महाराज गाइकवाड यांच्याशीं जम्नाबाईचा विवाह झाला. तेव्हां महाराज यांचा ' खंड्या नेमला आहे ' या आज्ञेचा अर्थ कळला. आपासाहेब साधारण मानकरी असोन राजाबरोबर कन्येचें लग्न झालें, म्हणून त्यांस फार आनंद झाला. आपासाहेब यांस पुष्कळ द्रव्य मिळून माने मंडळींत मोठमोठाल्या नेमणुका श्रीमंत खंडेराव महाराजांनीं करून दिल्या. तीच आपासाहेबांची कन्या बडोद्याच्या श्रीमंत जम्नाबाई राणीसाहेब होत्या.

## विषमज्वरानें पीडित अप्पासाहेबांचे अंगावर तीन वेळां पाय फिरवून आराम.

पुढें आपासाहेब माने हे श्रीस्वामींचे पूर्ण भक्त बनले. महाराजांचीही त्यांजवर पूर्ण कृपा होती. एकवेळ माने हे अक्कलकोटास पटवर्धन यांचे गणपतीचे देवळांत येऊन राहिले असतां प्रारब्ध योगानें त्यांस विषमज्वराचें दुखणें झालें; व प्रकृति फार बिघडली. आपासाहेबांचा नित्य श्रीस्वामीचे दर्शनास जाण्याचा नेम असे; दुखण्यामुळें दर्शनास जातां येईना. मनांत श्रीस्वामींचें स्मरण माने करीत होते. भक्तवत्सल महाराज फिरतां फिरतां एके दिवशीं गणपतीचे देवळांत आले. माने अत्यवस्थ असून बेशुद्ध पडले होते. महाराजांनीं त्यांचे अंगावरून तीन वेळ पाय फिरविला, व कांहीं वेळ बसून निघून गेले. दुसरे दिवसापासून आपासाहेब यांचे दुखण्यास फरक पडून ते चांगले झाले.

## पांडोबा पुराणिकावर अनुग्रह, तुजला आम्ही लिंग दिलें आहे जा.

पांडोबा पुराणिक म्हणून अक्कलकोटचे राजाचे आश्रित होते. त्यास मालोजी राजे यांचे वडील शहाजी राजे यांनीं आपल्या संस्थानचा अधिकार सातारकर

छत्रपतीबुवा साहेब यांजकडून मिळाल्यास, तुम्हांस इनाम जमीन एक हजाराची देईन म्हणून कागद लिहून दिला होता. त्याचप्रमाणें शहाजीराव यांस संस्थानचा अधिकार मिळाला. पण पुराणिक बोवांस कराराप्रमाणें त्यांनीं इनाम जमीन दिली नाहीं. नित्य पुराणाचे वेळेस जमिनीबद्दल पुराणिकबोवांची कुरकुर राजेसाहेबां-जवळ चाले. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें दैवयोगानें शहाजी राजे निवर्तले; तेव्हां तर पुराणिकबोवा अगदीं निराश झाले. पांडोबाचा श्रीसमर्थांचे दर्शनास नित्य जाण्यास नेम असून, महाराजांचे ठिकाणीं त्यांची फार निष्ठा असे. पुराणिकबुवांस महाराज 'लठ्या' म्हणून हांक मारीत. जमिनीबद्दल विचार पुराणिकबुवांचे मनांत हमेश घोळत असत. एके दिवशीं राजानें कबूल केलेली जमीन आपणास मिळावी, म्हणून महाराजांची पुराणिकबोवांनीं प्रार्थना केली. महाराज म्हणाले, "**तुजला आम्हीं लिंग दिलें आहे–जा.**" पुढें शहाजीराजे निवर्तले, त्यांचे दशदानांत जमीन दान द्यावयाची होती, ती जमीन पांडोबा पुराणिक यांस देऊन आपले वडिलांचा दस्त जमीन देण्याबद्दल त्यांजजवळ असलेला काढून घ्यावा, म्हणून कारभारी चिंतोपंत आपा टोळ यांनीं श्री० मालोजी राजे यांस सल्ला दिला. तो राजास पसंत पडून मौजे शिरवळ येथील शेरी जमीन साडेचारशें रुपये आकाराची पुराणिकबोवांस वंशपरंपरेनें इनाम करून देऊन, सनद लिहून दिली. सदर जमिनींत श्रीरामेश्वर म्हणून महादेवाचें लिंग आहे. देवालय उत्तम असून दोहोंबाजूस ओढे वहात आहेत व त्यांचे पाट चालत आहेत. देवळाभोंवतीं आंब्याचीं वगैरे झाडें असून ती जागा फारच रमणीय आहे. असो. "तुला आम्ही लिंग दिलें आहे", म्हणून पुराणिकबोवांस महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें रामेश्वराचें लिंग असलेली सुपीक शेरी जमीन त्यांस इनाम मिळाली. याप्रमाणें महाराजांचे मुखांतून निघालेली वाणी कधीं असत्य होत नसे.

## गणपतराव जोशी यांजवर अनुग्रह–दिनकर पाटील यांस " पाटील जा आतां खुशाल कमाविसदारी करा."

आणखी एक चमत्कारिक गोष्ट अशी झाली कीं, अक्कलकोटचे राजेसाहेबांचें ग्रामजोशी, गणपतराव जोशी संगमेश्वरकर यांस अक्कलकोटचे राजेसाहेब, पेशवे सरकार व निजामसरकार या त्रिवर्गांनीं मिळून अंदेवाडी तालुके अफजलपूर हा गांव जहागीर करून दिला होता. कांहीं कारणावरून एकेवेळीं हा गांव निजाम–

सरकारांनीं जप्त केला होता, गांव जप्त झाला म्हणून जोशीबुवांनीं अक्कलकोटचे राजेसाहेबांकडे यादी लिहिली. साहेबांकडून ती यादी सोलापुरचे पोलिटिकल एजंटचे मार्फत निजाम हैदराबादच्या रेसिडेंट साहेबांकडे गेली. रेसिडेंट साहेबांनीं सर्व तपास करून शेवटीं जप्ती खुली केल्याबद्दल सोलापुरचे पोलिटिकल एजंटाकडे लिहिलें. त्यांनीं अक्कलकोटास कळविलें. याच दिवशीं प्रातःकाळीं श्रीसमर्थांचे दर्शनास जोशीबुवा, अक्कलकोटचे कारभारी चिंतोपंत टोळ व जहागीर गांवचा पाटील दिनकर हे आले होते. त्रिवर्गांनीं दर्शन घेतलें, व खालीं बसले. तेव्हां महाराजांनीं पाटिलांस आज्ञा केली कीं, " **पाटील जा. आतां खुशाल कमाविसदारी करा.** " नंतर मंडळी उठून घरीं आल्यावर चिंतोपंत आपा टोळ संस्थानचे कारभारी हें टपाल फोडून पहातात तों, त्यांतच अंदेवाडी गांवची जप्ति उठविल्याचें लिहिलें होतें. हें सर्वांनीं वाचतांच सर्वांस मोठा आनंद झाला, व श्रीसमर्थांचे अतर्क्य सामर्थ्याचें सर्व आश्चर्य करूं लागले. अशा समर्थांच्या असंख्य लीला होत्या.

## शुद्ध भाव तेथेंच देव.

याच गणपतराव जोशीबुवांचे घरीं एके वेळीं समर्थांची स्वारी नेहमीं प्रमाणें प्रातःकाळीं आली होती. स्वारी आलेली पाहून सर्वांस मोठा आनंद झाला. जोशीबुवांनीं यतिरायांस स्नान घालून पिवळा मुकटा नेसावयास दिला; व षोडशोपचारें यथासांग पूजा करून, नैवेद्य समर्पण करण्यासाठीं पुढें ठेविला. इतक्यांत जोशीबुवांचे मनांत महाराजांचें भोजन होऊन बाहेर गेल्यावर आपण नेसावयास दिलेला नवा मुकटा महाराज कोणास देऊन तर टाकणार नाहींत, अशी शंका आली. तोंच समर्थांनीं त्यांचे मनांतील आशय जाणून लागलीच स्वारी उठली; व " **हा घे तुझा मुकटा,** " असें म्हणून लागलीच मुकटा सोडून टाकला व दिगंबर मूर्ति भोजन न करितां जाऊं लागली. ते वेळेस जोशीबुवांनीं भोजन करावें म्हणून बहुत प्रकारें यतिराजांची विनवणी केली. परंतु " **तुझे मनांत विकल्प आला आतां आम्ही भोजन करणार नाहीं.** " असें सांगून स्वारी तशीच रस्त्यानें जाती झाली. इतक्यांत तात्या वैद्य नांवाचे गृहस्थांनीं भक्तियुक्त विनंती केली कीं, महाराजांनीं माझेवर अनुग्रह करून माझ्या घरीं भोजन करावें. लागलीच त्याचे घरीं श्रीसमर्थांची तशीच दिगंबर स्वारी जाऊन समर्थांनीं भोजन केलें, व वैद्यबुवांचा हेतु पूर्ण केला. ठीकच आहे. शुद्ध भक्ति पाहिल्यावर

मग दया कोठें जाणावयाला थोडेंच जावें लागतें ? मग दयाब्धि हें नांव कसें साजेल ? अशा श्रीयतिराजांनीं लीला केल्या होत्या.

## कोणतीही गोष्ट महाराज शद्बानें न सांगतां कृतीनें करून दाखवीत.

कोणतीही गोष्ट महाराज स्पष्ट शब्दानें न सांगतां कृतीनें करून दाखवीत. कोणी सेवेकरी भांडूं लागले म्हणजे त्यांस महाराज जवळ बोलावीत; व त्यांचे हातांत मुंगी देत. या कृतीनें मुंगी होऊन साखर खावी या म्हणीच्या अर्थाचें दिग्दर्शन करीत. श्रीमंत मालोजीराव भोंसले **अक्कलकोटचे राजाचे तीर्थरूप** यांची भक्ति श्रीस्वामीचरणीं एकनिष्ठ होती. त्यांस पुत्रप्राप्तीची फार इच्छा होती. श्रीस्वामी-महाराजांचे कृपेनें राणीसाहेब गरोदर झाल्या. सर्वांस आनंद झाला. कांहीं महिने लोटल्यावर महाराजांजवळ येऊन कांहीं लोकांनीं पुत्र होईल किंवा कन्या होईल म्हणून प्रश्न केला. महाराजांनीं कांहीं जबाब न देतां, " **बांगडी लाव** " म्हणून सेवेकऱ्यांस आज्ञा केली. यावरून प्रश्न विचारणारांनीं आपल्या मनांत गांठ मारिली कीं, राजास कन्या होणार व त्याप्रमाणेंच पुढें झालें. श्रीस्वामी कृपेनें राणीसाहेब पुन्हां गर्भवती झाल्या. पूर्ववत् लोक पुन्हा प्रश्न करण्यास महाराजांजवळ गेले. महाराजांनीं कांहीं जबाब न देतां आपण जागेवरून उठून चुलीजवळ जाऊन बसले. याचाही अर्थ उघड होता. व त्याप्रमाणें राजास द्वितीय कन्यारत्न झालें. पुढें तिसरे खेपेस राणीसाहेबांस गर्भधारण झालें असतां, पूर्ववत् लोक महाराजांजवळ प्रश्न विचारण्यास आले. यावेळेस महाराजांनीं आपल्या मांडीवर चापट मारून दोन्ही हात एकत्र करून बंदूक सोडण्याची कृति करून दाखविली. व म्हणाले, '**लगाव सरबत्ती**' तोफा सोडून आनंद करण्याबद्दल महाराजांची आज्ञा झाली, त्या अर्थीं पुत्र खास होणार अशी लोकांची खात्री झाली. श्रीस्वामी कृपेनें पुत्रच झाला.

## भीमरावाचे आवाळू बरें केलें.

भीमराव म्हणून श्रीस्वामींचा सेवेकरी होता. त्याचे डोक्यास मोठ्या तांब्याएवढें आवाळू होतें. यामुळें त्याची मुद्रा चमत्कारिक दिसे. बिचाऱ्यास डोकीस पागोटें कसें घालावें हें माहितच नव्हतें. महाराजांची पुष्कळ दिवस मनोभावानें त्यानें सेवा केली. नित्य भीमराव व त्याचा मुलगा बागांत जाऊन टोपलीभर फुलें

महाराजांकरितां घेऊन येत. सेवेकरी भीमराव यास थट्टेनें दोन डोक्याचा माणूस हाक मारीत. एके दिवशीं महाराज आनंदानें बागेंत बसले असतां, भीमराव नित्याप्रमाणें फुलांची परडी भरून घेऊन आला. त्यास दुरून येतांना पहातांच दोन डोक्यांचा मनुष्य आला म्हणून सेवेकरी थट्टा करूं लागले, व हांसूं लागले. त्यांचे बरोबर महाराजही '**दोन डोक्यांचा मनुष्य आला**' म्हणून तोंडानें म्हणाले, व खदखदां सेवेकऱ्यांबरोबर हांसूं लागले. भीमराव खजील झाला. पण ही संधि बरी आहे असें पाहून, महाराजांस म्हणाला, 'महाराज लोक हांसतात ते हांसोत, पण आपण दीनदयाळ, भक्तवत्सल, आपणही आपले भक्ताचें व्यंग पाहून हांसता ? कृपाकटाक्षानें अवलोकन करून व्यंग दूर करावें. म्हणजे इतर लोकांप्रमाणें मी मौजेनें पागोटें घालून आनंद करीन.' म्हणून भीमरावानें महाराजांची प्रार्थना केली. कृपाळू महाराजांस त्याची कींव आली. पण त्यास ते कांहींच बोलले नाहींत. रात्रीं भीमराव निद्रिस्त असतां स्वप्नांत त्यास दर्शन देऊन त्याचें डोकीचें आवाळूंवरून हात फिरविला. सकाळीं भीमराव जागा होऊन पहातो तों, डोकीचें आवाळूं फुटून जाऊन त्याचें वीतभर कातडें लोंबूं लागलें. परमानंदानें भीमराव महाराजांचें दर्शनास गेला. दोन डोक्यांचा मनुष्य एक डोक्याचा होऊन आल्याचें पाहून भक्तांस आनंद झाला. भीमरावानें महाराजांनीं स्वप्नामध्यें येऊन दर्शन दिल्याची हकीकत सर्वांस सांगितली. पुढें भीमरावास चिंता पडली कीं, कातडें बरें कशानें होतें ? महाराजांस त्यानें विनंति केली कीं, कातडें कापून टाकूं कीं, कसें ? महाराजांनीं तीर्थ अंगारा लावण्यास आज्ञा दिली. त्याप्रमाणें केल्यावर कातडें कांहीं दिवसांनीं आपोआप सुकून नाहींसें झालें. नंतर भीमराव चितापूर म्हणून मोगलाईत गांव आहे तेथें आपल्या मुलाजवळ रहात असे.

## अक्कलकोटची भरभराट, श्री. मालोजीराजे यांजवर अनुग्रह.

पुढें महाराजांची उत्तरोत्तर जास्त कीर्ति होऊं लागली. महाराज अनेक चमत्कार करून दाखवूं लागले. महाराजांनीं अक्कलकोटास वास करून, त्या नगरास केवळ अमरावतीची शोभा आणिली. महाराज असतांना अक्कलकोट शहर जिकडे तिकडे आनंदानें दुमदुमलेलें दिसे. जरी अक्कलकोट राजधानीचें गांव आहे, तरी महाराज त्या गांवीं प्रसिद्ध होईपावेतों त्या गांवांकडे कोणी ढुंकून पहात नसे. जिकडे तिकडे अक्कलकोटची प्रसिद्धि होऊन त्या गांवास हल्लीं जें वैभव आलें आहे, त्यास कारण श्रीस्वामीसमर्थ होत. त्या गांवचा व्यापार

[stamp]

पूर्वीपेक्षां शतपटीनें वाढला. शेंकडों घोड्यांचे तांगे, शिग्राम गांवांत फिरूं लागले. नित्य शेंपन्नास लोक कडबगांव स्टेशनावर अक्कलकोटचे यात्रेस जाण्याकरितां उतरले नाहींत असा दिवस गेला नाहीं. आम्हांला वाटतें श्रीमंत मालोजीराजांचे पूर्व पुण्याईचे योगानें महाराजांनीं त्यांचे नगरींत येऊन त्यांस व त्यांचे प्रजेस पुनीत केलें. श्री. मालोजीराजे यांजवर अनेक संकटें येऊन गुजरलीं. फार तर काय पण एकवेळ संस्थान सोडून राजास मुंबईस जाऊन राहण्याचा प्रसंग आला होता. पण ते सर्व प्रसंग महाराजांचे कृपेनें निर्विघ्नपणें पार पडले. काश्मीरपासून रामेश्वर पावेतों महाराजांची प्रसिद्धि होऊन, लक्षावधि लोक महाराजांचे दर्शनास येत असत. पात्र पाहून त्याप्रमाणें महाराज कृपा करीत. प्रत्येक दर्शनेच्छु यात्रेकऱ्यास महाराज कांहीं तरी चमत्कार दाखवीत. त्या सर्व चमत्कारांचें जर कोणी टिपण करून ठेविलें असतें, तर महाराजांचें अफाट वैभवाचें चित्र जगास उत्तम रीतीनें दाखवितां आलें असतें. महाराजांचे हातांत खेळण्याकरितां पितळेचीं कडीं करून ठेविलीं होतीं. त्यांवर अनेक देवतांचीं चित्रें काढिलीं होतीं. जो दर्शनास येई, त्याचें जें उपास्य दैवत असे, तें महाराज त्यास दाखवीत, असा अनुभव सर्वांस येत असे. लांकडाचीं व हस्तिदंताचीं मापासारखीं वाटोळीं चक्रें महाराजांनजीक खेळण्यास ठेविलेलीं असत. त्यांत धान्य वगैरे घालून इकडून तिकडे तिकडून इकडे काढ घाल करावी हाच महाराजांचा खेळ होता. दुसरेही बालकाप्रमाणें महाराज खेळ करीत असत. महाराज एके ठिकाणीं बसून कधीं रहात नसत. दिवसांतून दहापांच स्थानें बदलत. महाराजांचे दर्शनास "**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानीच भरतर्षभ,**" असे चार प्रकारचे लोक येत. त्यामध्यें बहुतकरून संकटांत पडलेले व अर्थार्थी म्हणजे आपणांस धन मिळावें, संतति व्हावी असें इच्छिणारांची संख्या फार. जिज्ञासु थोडेबहुत येत, पण केवळ ज्ञानप्राप्ती करितां फारच थोडे लोक येत. सर्वांची इच्छा महाराज तृप्त करीत. महाराज चालते बोलते देवच आहेत असें सर्वांस वाटे. त्यांचे सन्निधच बसून रहावें, तेथून मुळींच उठून जाऊं नये, असें सर्वत्रांस वाटे. अशी महाराजांची मनोहर मूर्ति होती. रोज सकाळसंध्याकाळ भक्तमंडळी जमून बागेंत किंवा जंगलांत असतांना आरती चालली म्हणजे, मनास असा आल्हाद वाटे कीं, जसे आपण इंद्राचे नंदनवनांतच आहों. महाराज रागांत असले तर आरती करूं देत नसत. सेवेकऱ्यांकडून घेऊन आरती पालथी टाकीत. सेवेकऱ्यांस महाराजांची तबियत पक्की समजली होती, त्यांचे इच्छेप्रमाणें ते करीत. कधीं महाराज आरतीचे वेळीं

एक बोट दाखवीत, तेव्हां सेवेकऱ्यानें एकच चरण म्हणून आरती पुरी करावी. दोन बोटें दाखविलीं म्हणजे दोनच चरण म्हणावे. एखादे वेळीं महाराज आनंदांत असले म्हणजे संपूर्ण आरती म्हणावी. याप्रमाणें क्रम चालत असे.

## मला राग असता तर मी इतके लोकांची भाजी करून खाल्ली असती.

महाराजांची मर्जी सुप्रसन्न असली म्हणजे ते भक्तजनांजवळ गोड भाषण करून त्यांचे मर्जीप्रमाणें सेवा करून घेत. पण जर मर्जी रागांत असली तर महाराजांचे सभोंवार शंभर हातांत मोठ्या राजाचीही येण्याची प्राज्ञा नव्हती. मात्र हा महाराजांचा राग खरा नसे. कांहीं तरी वृत्तिक्षोभ होत असे, एवढेंच. एके दिवशीं महाराजांची स्वारी अक्कलकोटास वडाचे झाडाखालीं असतां तबियत जरा कडक झाली होती. कोणास दर्शनास महाराज येऊं देईनात. नजीकच एक अभाविक गृहस्थ बसला होता. तो म्हणूं लागला, 'कायहो, हे साधु म्हणवितात, मग यांस राग कशास पाहिजे ?' महाराजांनीं त्यास कांहीं त्यावेळीं प्रत्युत्तर दिलें नाहीं. पुढें १५ दिवसांनीं त्याच वडाखालीं माटेबोवा यांचें कीर्तन असल्यानें चारशें पांचशें लोकांचा समुदाय जमला होता. ह्यावेळीं सदर गृहस्थाचे प्रश्नाचा निकाल महाराजांनीं केला. महाराज म्हणाले, मला राग असता, तर इतके लोकांची भाजी करून खाल्ली असती. हें वाक्य महाराज बहुतवेळां म्हणाले. महाराजांचा असा नियम असे कीं, कोणतें वाक्य तोंडांतून निघालें म्हणजे तें दहावीस वेळ म्हणावयाचें. महाराज पूर्ण दयाळू असून आपल्या भक्तजनांचें संरक्षण करीत असत. कधीं कधीं ते रागांत असत, पण तो कांहीं खरा राग नव्हता.

## राजा व रंक महाराजांस सारखेच असत.

राजा व रंक महाराजांस सारखेच असत. किंबहुना रंक त्यांस जास्त प्रिय असे. श्री. मालोजीराव यांस महाराजांनीं चमत्कार करून दाखविल्यावर त्यांची भक्ति स्वामींचरणीं जडून ते दर गुरुवारीं महाराजांची स्वारी ज्या ठिकाणीं असेल तेथें दर्शनास जात असत. याप्रमाणें बहुत दिवस चाललें होतें. एके गुरुवारीं राजा हत्तीवर बसून दर्शनास आला. महाराजांस पाहून राजा खालीं उतरला व अनवाणी महाराजांनजीक गेला. महाराजांचे चरणीं मस्तक ठेविल्याबरोबर महाराजांनीं फाडकन् त्याचे श्रीमुखांत भडकविली. राजाचे डोकीवरील पागोटें एकीकडे जाऊन

पडलें, व राजा फार भयभीत होऊन थरथर कांपूं लागला, व हात जोडून महाराजां-पुढें उभा राहिला. हुजऱ्यानें राजाचें पागोटें आणून डोकीस घातलें. महाराज रागानें म्हणाले, “**तुझें मोठेपण तुझे घरांत, येथें मोठेपण कशास पाहिजे? अरे, असे बुद्‌बलके राजे आपण पुष्कळ बनवतो.**” अपराधाची क्षमा करावी म्हणून प्रार्थना करून राजा परत गेला. पुढें दर गुरुवारीं महाराजांची तबियत कशी आहे हें पाहून राजा दर्शनास जात असे. व म्याना वगैरे वाहन लांब महाराजांस न दिसेल अशा जागीं ठेऊन मग पायानें राजा दर्शनास जाई. याप्रमाणें महाराजांचें उग्र तेज होतें.

## हिंदु, मुसलमान, पारशी, युरोपियन महाराजांचे दर्शनास येत.

हिंदु, मुसलमान, पारशी, युरोपियन वगैरे सर्व जातींचे लोक महाराजांचे दर्शनास येत. सर्वांचें मनोगत ओळखून महाराज त्यांच्या मनकामना पूर्ण करीत. मुसलमान लोकांवर महाराजांची फार प्रीति होती. महाराजांस कुत्रा फार आवडत असे, पण मांजर पाहिलें कीं, महाराज रागावत, व निमकहराम म्हणून त्यास तेव्हांच हांकलून देत. गाईवर महाराजांची फार प्रीति असे. झाडाची फांदी किंवा पाला कोणी तोडूं लागल्यास महाराजांस फार राग येई. एक वेळ अशी गोष्ट घडली कीं, समर्थांची स्वारी गणपतराव जोशी यांचे घरीं सोप्यांत बसली असतां त्यांचे गड्यानें त्यांचे आशेवरून अंगणांत एक कडू लिंबाचा वृक्ष होता, त्याची फांदी तोडण्यास सुरवात केली. हें महाराजांनीं पहातांच अतिशय रागावून शिव्या देऊं लागले. “**आमचे पालखीची दांडी कोण तोडतो, त्याचे हातपाय तोडून टाकावे.**” असें महाराज म्हणाले. हें ऐकतांच गणपतराव जोशानें गड्यास फांदी तोडण्याचें बंद करण्यास सांगून झाडाचे खालीं उतरविलें. तत्रापि महाराज रागांतच होते. जोशीबुवा तोंड चुकवून एकीकडे जाऊन बसले. नंतर थोडे वेळानें समर्थ सोप्यांतून उठून परसांत जाऊन उकीरड्यावर बसले. बहुत वेळ तेथेंच होते. महाराज कोठें गेले म्हणून जोशीबुवा व इतर मंडळी पाहूं लागली, तों समर्थ उकीरड्यावर बसलेले दृष्टीस पडले.

## महाराजांचे कानांत गांधील माशी व रक्तस्राव.

जोशीबुवांचे नजरेस असें आलें कीं, महाराजांचे कानांत गांधील माशी जाऊन ती कान उकरीत आहे. व त्या योगानें महाराजांच्या कानांतून रक्त वहात आहे.

महाराज हंसत खेळत बसले होते, पण कोणास पुढें येऊं देईनात. गणपतराव जोशी यांनीं धैर्य करून महाराजांजवळ जाऊन प्रार्थना केली कीं, महाराज आपण मजला यावेळीं मारिलें तरी मी भिणार नाहीं, व आपल्या कानांतील गांधील माशी काढल्याशिवाय राहणार नाहीं. असा जोशीबुवांचा दृढ निश्चय पाहून, समर्थ उगीच राहिले. मग गणपतराव यांनीं लागलाच चिमटा आणून महाराजांचे कानांतील गांधील माशी काढून कान पुसून काढला. कानांत कांहीं पोखरलेलें नसून तो साफ दिसूं लागला. रक्तप्रवाह कोणीकडून आला हें कळेना. त्याबद्दल सर्वांस आश्चर्य वाटलें. श्रीस्वामीसमर्थ पूर्णब्रह्म असून अनेक चमत्कारिक लीला भक्तजनांस दाखवीत असत.

## वाटेल त्याचेकडे भोजन—विटाळाचे बंड नसे—अत्यंजास स्पर्श करून प्रसाद.

महाराज वाटेल त्याचे घरीं जेवीत म्हणून मागें सांगितलेंच आहे. तसेंच विटाळाचें बंड त्यांचे दरबारांत मुळींच नसे. दर्शनास अत्यंज जरी आला तरी त्याचे हातास शिवून महाराज प्रसाद देत. एखादी अस्पर्श बाई दर्शनास येऊन लांब उभी राहून नमस्कार करूं लागली, तर महाराज तिजला जवळ बोलावून बळेंच स्पर्श करीत. ती पुढें येण्यास न धजली तर गिरदी वगैरे जें जवळ असेल तें तिच्या आंगावर महाराज फेंकून देत. महान् पातक्यांस पुनीत करणारे महाराज त्यांस विटाळ कसा स्पर्श करील ? असो. सोंवळ्या ब्राह्मणांस हें महाराजांचें करणें विषम वाटे. त्यांचें मन राखण्यास महाराजांजवळचे सेवेकरी व शिपाई हे अत्यंज वगैरे दर्शनास येतांना पाहिला म्हणजे पुढें शिवाशिव होऊं नये ह्मणून अगोदरच त्यास प्रसाद देऊन वाटेस लावीत. शुभाशुभ दोन्ही महाराजांस इष्टच होतीं. अगर सकलमंगल मंगलाधीश जे स्वामी समर्थ त्यांचे कृपादृष्टीनें अशुभाचें शुभ होणें काय दुर्लभ आहे ? महाराजांचा नेम असे कीं, फिरतां फिरतां दगडास शेंदूर लाविलेला देव दृष्टीस पडला, म्हणजे त्यावर बसून लघवी केल्यावांचून पुढें जावयाचेंच नाहीं. कधीं कधीं शौचही त्याजवरच करीत. या कृतीनें दगडाचे देवाची अनित्यता भक्तांचे मनांत भरवीत. अक्कलकोटास खास बागेंत गाणदेवी म्हणून दगडास शेंदूर लावून बनविलेली देवी आहे. तिचा सर्व गांवास मोठा दरारा असे. दोनप्रहरीं किंवा सायंकाळीं अज्ञ मुलें अगर बाया खास बागेंत गेल्यास त्यांस देवीचा झपाटा झाल्याशिवाय राहत नसे. मग कोंबडें, नारळ, नैवेद्य अर्पण

21323 ५५ २१/१/१

केल्यावांचून देवी संतुष्ट होत नसे, व झपाटा झालेल्या मनुष्यांस गुण देत नसे. याप्रमाणें अक्कलकोटास सदर देवीचें महात्म्य फार वाढलें होतें, पण रामायणांतील अहिमही आख्यानांतील रामलक्ष्मणांस बली देणाऱ्या महिकावती नगरीचे देवीची, मारुतीनें तिजला मोरींत कोंडून जी व्यवस्था केली, त्याहून जास्त महाराजांनीं या गाणदेवीची फजिती उडविली. हल्लीं गाणदेवीस कोणी भजत नाहीं. महाराज खास बागेंत असले म्हणजे त्यांचा शौचकूप सदर देवीचा दगडच होत असे. त्या दगडावांचून इतर ठिकाणीं महाराज लघवी अगर शौच करित नसत. अर्थातच थोडेच दिवसांनीं देवीचें महात्म्य अगदीं नष्ट झालें.

## कलौ श्रीपादवल्लभम्.

॥ **कलौ श्रीपादवल्लभम्** ॥ या वाक्याप्रमाणें कलियुगांत श्रीस्वामींचाच भक्तीचा विशेष महिमा वाढणार आहे. रामकृष्णादि अवतार जुनेपुराणे झाले, सबब कलियुगांत श्रीपादवल्लभाचा श्रीस्वामीसमर्थ हे अवतार झाले आहत. एक वेळ असें झालें कीं, तळवडकर बाळकृष्णबोवा सामुद्रिक पाहणारे असून रामदासी पंथाचे होते. महाराजांचे दर्शनास अक्कलकोटास आले असतां महाराज त्यांस म्हणाले, "**साखरेंत पाणी मिसळूं नका बरें**" याप्रमाणें अनेक वेळां महाराज म्हणाले. यावरून पुढें श्रीगुरुदत्ताचा महिमा वाढणार आहे असें दिसतें. महाराज अवतारी असल्यानें कांहीं लोकांची रीत असे कीं, आपल उपास्य दैवत असेल त्याची प्रतिमा अगर गीता अगर सप्तशति वगैरे जी पोथी आपणास वाचावयाची असेल ती प्रथम महाराजांचे हातांत देऊन त्यांचे हातून प्रसाद म्हणून घेऊन, मग पूजनास अगर वाचनास आरंभ करावा. महाराज हात लावून पोथी अगर प्रतिमा देत. मात्र आपल्या भक्तांस दुसऱ्या देवतेचें भजनपूजन करण्यास आज्ञा देत नसत. इतर लोकांप्रमाणें बाळापा सेवेकरी यानें एके दिवशीं शाकंबरी महात्म्याची पोथी आपणास मिळावी, म्हणून महाराजांचे हातीं दिली. पण महाराजांनीं ती कोठें बाळापास परत दिली! वाशीमकर बोवा ज्यास महाराज लिंब्या म्हणून म्हणत त्यास ती पोथी दिली. बाळापाचें कुलदैवत महाराजच झाले होतें. त्यास दुसऱ्या दैवताची काय जरूर होती?

## सर्व दैवतें स्वामीचरणीं वास करीत आहेत.

दत्तंभट म्हणून महाराजांचा सेवेकरी होता, नंतर तो संन्यास ग्रहण करून काशीक्षेत्रीं वास करून राहिला. एके दिवशीं दत्तंभटाचे मनांत आलें कीं, आपल्या

कुलदेवतेस जावें. दत्तंभटानें महाराजांची कुलदेवतेस जाण्याबद्दल आज्ञा मागितली. महाराज म्हणाले, 'तुझी देवी कोठें आहे? ती आणून दे.' दत्तंभटानें आपल्या देव्हाऱ्यांतील रुप्याचा देवीचा टाक होता, तो आणून महाराजांच्या हातीं दिला. तो घेऊन महाराजांनीं आपल्या पायांतील जोड्यांत घातला, व पुनः काढून **"हा पाहिला कारे,"** असें म्हणून दत्तंभटास दाखविला. याप्रमाणें टाक जोड्यांत घालण्याची व पुनः काढून दत्तंभटास दाखविण्याची क्रिया महाराजांनीं पांचसात वेळां केली. तेव्हां दत्तंभटाची खात्री झाली कीं, सर्व दैवतें स्वामीचरणीं वास करीत आहेत. असे केवळ बोलते चालते देव श्रीस्वामीसमर्थ आहेत. मग दत्तंभट यात्रेस न जातां श्रीस्वामीचरणीं सेवा करीत राहिला.

माधवशास्त्री यांचे चरित्रांत महाराजांचे गुणांबद्दल खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे.

## श्लोक.

**ममताहंकारवर्ज्यो विषयेषु विरागवान् ॥**
**षट्शत्रुविजयी शांतो षट्तरंगसुभंगकृत् ॥ १ ॥**
**मायावी नहि एषस्तु नित्यतृप्तो निराश्रयः ॥**
**लिप्ता नास्ति कदाप्यस्य तृट्क्षुधादिविवर्जितः ॥ २ ॥**
**यत्र यत्र स्थलं पूतं तत्र तत्रावसत्सदा ॥**
**चतुर्विधा वर्णजातः पूज्यते च यथा तथा ॥ ३ ॥**
**भूतं भविष्यं वक्ताहि इष्टानिष्टेच विंदति ॥**
**अन्यच्चित्रं चैकमस्ति अधीनं नहि कस्यचित् ॥ ४ ॥**

**भावार्थ**—मोह–ममता–अहंकार ह्यांचा महाराजांनीं त्याग केला होता. कामक्रोधादि शत्रु महाराजांनीं जिंकले होते. विषयाची त्यांचे पुढें मात्रा चालत नसे, महाराजांस कपट कसें तें ठाऊक नसे. महाराज सदा तृप्त व आश्रयरहित रहात. त्यांस कशाचीही इच्छा नसे. त्यांस तहान भुकेची बाधा होत नसे. जें स्थान त्यांस पवित्र वाटे तेथें ते वास करीत. चारही वर्णांचे लोक त्यांची पूजा करीत. महाराज भूत, भविष्य व वर्तमान सांगत. इष्ट अनिष्टही त्यांस कळत असे; आणखी असा चमत्कार असे कीं, महाराज कोणा मनुष्याचे आधीन रहात नसत.

## भक्तिप्रिय महाराज.

महाराजांस भक्ति फार प्रिय असे. आपल्या भक्तांस ते इतर तीर्थास जाण्यास परवानगी देत नसत. एक वेळ अशी गोष्ट घडली कीं, मुंगी पैठणची विदूर जातीची विठाबाई नांवाची स्त्री अक्कलकोटास महाराजांचे दर्शनास आली होती. तो आषाढ महिना असून एकादशी नजीकच आली असल्यानें, बाईचे मनांत पंढरपुरास श्रीविठ्ठलाचें दर्शनास जाण्याचें होतें. तिनें आपला उद्देश बाळापा व गणपतराव सेवेकऱ्यांस कळविला. श्रीसमर्थांची स्वारी त्यावेळीं राजवाड्यांत असल्यानें, सेवेकरी गांवांतच बिऱ्हाड करून राहिले होते. महाराज गेले म्हणजे बहुत दिवस तेथेंच रहात असत. बायकांशिवाय दुसऱ्यांस राजवाड्यांत जाण्याची परवानगी नसे, म्हणून मागें लिहिलेंच आहे. विठाबाईचा बेत ऐकून गणपतराव व बाळापा यांनीं विचार केला कीं महाराज राजवाड्यांत किती दिवस राहतात याचा नेम नाहीं; आपणास सेवा घडत नाहीं, बाहेर कंटाळवाणे दिवस काढावे लागतात, सबब विठाबाईचे बरोबर आषाढीचे यात्रेस जाऊन पंढरीनाथाचें दर्शन घेऊन परत यावें, असें मनांत आल्यावरून त्यांनीं विठाबाईस विनंति केली कीं, आपणास पंढरपुरास घेऊन जावें. तिनें ती गोष्ट मान्य केली. हा बेत रात्रीं झाला. सकाळचे प्रहरीं विठाबाई महाराजांचें दर्शन व पूजन करण्यास राजवाड्यांत गेली. दर्शनाहून आल्यावर सेवेकऱ्यांसहित पंढरपुरास जाण्याकरितां निघण्याचा बाईचा विचार होता; बाईनें महाराजांचें दर्शन घेतलें; तितक्यांत तिचे तोंडाकडे पाहून महाराज म्हणाले, '**काय ग विठोबाचा + + + धरण्यास अजून गेली नाहींस ?**' हे शब्द ऐकतांच बाई लज्जेनें खालीं पाहूं लागली. जमलेल्या स्त्री–समाजांत एकच हंशा पिकला. विठाबाईनें विचार केला कीं, प्रत्यक्ष बोलतेचालते देव सोडून आपण दर्शन करण्यास जाणार, व त्यांतून महाराजांचे सेवेकरी बरोबर घेऊन जाणार, असें जाणून महाराजांनीं आपली सर्व स्त्रियांदेखत फजिती उडविली. मग ती उघडपणें महाराजांस म्हणाली, 'महाराज, आपण बोलतेचालते विठोबा प्रत्यक्ष असतां पंढरपुरास कशास जाऊं ?' याप्रमाणें बोलून विठाबाई बिऱ्हाडीं आली, व गणपतराव व बाळापा सेवेकरी यांस तिनें झालेली हकीकत सांगितली. पुढें सेवेकऱ्यांचा व विठाबाईचाही पंढरपुरास जाण्याचा बेत रहित झाला, हें सांगणें नकोच. महाराजांनींही मग लौकरच राजवाड्याबाहेर येऊन सेवेकऱ्यांस व सर्व भक्तवृंदांस दर्शन दिलें.

## परशुराम सेवेकरी यांस 'संतचरणाची माती । तीच माझी भागीरथी'

एक वेळ परशुराम सेवेकरी याचें मनांत आलें कीं, श्रीकाशीक्षेत्रीं जाण्यास यात्रा निघाली आहे, त्यांचे बरोबर आपण श्रीविश्वेश्वराचें दर्शनास जावें. असें मनांत आणून श्रीस्वामीसमर्थांजवळ येऊन काशीयात्रेस जाण्यास आज्ञा मागितली. महाराजांनीं उत्तर केलें, '**संत चरणाची माती ॥ तीच माझी भागीरथी**'. हें उत्तर ऐकून परशुराम यानें काशीयात्रेस जाण्याचा बेत रहित केला. श्रीस्वामी-चरणीं सर्व तीर्थें आहेत अशी भावना धरून दृढभक्तीनें महाराजांची सेवा करूं लागला.

## धोंडीबा सेवेकरी यांस–कारे कार्तिकस्वामी येथें नाहींत का?

महाराजांचा धोंडिबा नांवाचा सेवेकरी होता, त्याचे मनांत एक वेळ श्रीकार्तिक-स्वामींचे यात्रेस जाण्याचें आलें. महाराजांजवळ जाऊन त्यानें जाण्याविषयीं आज्ञा मागितली. महाराज म्हणाले, "**कारे कार्तिकस्वामी येथें नाहींत का?**" हें ऐकून धोंडीबा म्हणाला, "आपण प्रत्यक्ष कार्तिकस्वामी आहां. मी यात्रेस जाऊन व्यर्थ श्रम कशास करूं." असें म्हणून महाराजांची दृढभक्ति करीत धोंडिबा अक्कलकोटास राहिला. तो महाराजांची सेवा करून अक्कलकोटास वडाखालील मठांत असे.

## कर्तव्यकर्म करून हमेश श्रीस्वामीमहाराजांची आठवण हृदयांत ठेवावी.

आपल्या भक्तांनीं आपलीच भक्ति करावी अशी महाराजांची इच्छा असे. रामकृष्णादि अवतार झाले, त्यांपैकींच श्रीस्वामींचा अवतार होता. **धर्मसंबंधानें विशेष भानगडींत पडण्यास महाराज आज्ञा देत नसत. उगीच जप करीत बसावें, किंवा भजनपूजनांत फार वेळ मोडावा, असा महाराजांचा उद्देश नव्हता. आपआपलें कर्तव्यकर्म प्रत्येकानें बजावून, हमेष श्रीस्वामी समर्थांची आठवण हृदयांत ठेवावी, असाच महा-राजांचा उपदेश होता.** उगीच वैराग्याचा वेष धरून भांगगांज्यांत चूर राहणारे पोटार्थी साधूंचा महाराज मनापासून कंटाळा करीत. श्रम करून पोटास मिळवावें,

ह्याच यांचा सर्वांस उपदेश असे. खरे साधु थोडे, "**सर्व साधु पोटाखालीं व × × खालीं आहेत.**" असें महाराज म्हणत असत. सेवेकरितां पुष्कळ लोक महाराजांजवळ येत; त्यांतून जो उद्योगी व भक्तिमान् असा असे, त्यासच महाराज ठेवून घेत. आळशी व दीर्घसूत्री माणसास प्रसाद देऊन लागलेच जाण्यास आज्ञा देत. त्याची घरीं जाण्याची इच्छा नसल्यास त्यास तीर्थयात्रा करण्यास आज्ञा देत. जो भक्त महाराजांस आवडे त्यास महाराज प्रसाद देत नसत; व त्यामुळें त्यानें आपणाजवळ रहावें अशी त्यांची इच्छा दिसून येई.

## सतत श्रम करावे हा भक्तांस उपदेश.

सतत श्रम करावे हा महाराजांचा आपल्या भक्तांस सतत उपदेश असे. वास्तविक पाहतां या जगांत उद्योगी मनुष्यच सुख पावतो, आळशी मनुष्याचे हालच होतात. मनुष्य आळशी असला तर प्रत्यक्ष पिताही त्याचा द्वेष करितो. जगन्नियंत्याचीही इच्छा श्रम करून सर्वांनीं ह्या जगाची रहाटी कायम ठेवावी अशीच आहे. म्हणूनच गीता वगैरे आपल्या धर्मतत्त्वाचे ग्रंथांत स्वधर्म हा मोठा श्रेयस्कर मानला आहे. हें तत्त्व मनांत बाळगून जो मनुष्य वागतो त्याचा सर्वत्र विजयच होतो. स्वधर्मास इंग्रजींत "ड्यूटी" अशी सज्ञा आहे. ती सांभाळण्यांत ( मग ती कितीही हलकी असो ) इंग्रज लोकांची किती तत्परता असते? एकवेळ दहा आज्ञांपैकीं ( Ten Commandments ) एखादीचें ते उल्लंघन करतील पण आपली "ड्यूटी" बजाविण्याचें कामीं ते जिवाकडेही पाहणार नाहींत; हेंच त्यांचें देशोन्नतीचें बीज होय. सुदैवानें आपलेही लोक या इंग्रज लोकांचे अनुकरणानें "ड्यूटी" ची योग्यता जाणूं लागले आहेत. आपली "ड्यूटी" जाणून जेव्हां प्रत्येक इसम तिची देवतेप्रमाणें सेवा करण्यास लागेल, तेव्हांच आपल्या देशाची उन्नति होणार आहे. या मूळ तत्त्वाचा देशबांधवांचें हृत्पटलावर ठसा उमटल्यावांचून, आपल्या सुधारकांचीं कोरडीं व्याख्यानें कांहींएक करूं शकणार नाहींत. असो, तात्पर्य श्रीस्वामीमहाराजांचा उपदेश, देशकालास कसा अनुसरून असे, तें यावरून सर्वांचें ध्यानीं येणार आहे. जे खरे स्वामीभक्त आहेत ते महाराजांचे उपदेशास अनुसरून, अश्रांत श्रम करून, या जगांत आपली सार्थकता करून घेत आहेत. आणि खरें म्हटलें तर जे लोक आळसास थारा देऊन आपल्या जन्माचें मातेरें करून घेतात, त्यांचे कमअकलेचें आम्हास नवल वाटतें! सृष्टिकर्त्याचे इच्छेनुरूप श्रम न करितां मनुष्य आळशी

राहिला, तर वैद्यशास्त्राप्रमाणें असें ठरलें आहे कीं, आळशास नानाप्रकारचे रोग होऊन तो लौकरच मरतो. करितां सर्वांनीं स्वधर्माप्रमाणें परिश्रम करून मनांत श्रीस्वामींची भक्ति ठेवून या संसारसागरांतून सुखानें पार पडावें.

## कामांत कामा, स्मर राम राणा.

धर्मसंबंधानें उगीच प्रहरचे प्रहर पूजा वगैरे करण्यांत घालविण्यास महाराज सांगत नसत. म्हणजे प्रपंच साधून परमार्थाचा लाभ करावा असें महाराजांचें मत होतें. 'कामांत कामा, स्मर राम राणा.' असें एका कवीचें वाक्य आहे. परमेश्वराचे कृतीचा सृष्टयोत्पत्तिसंबंधानें विचार केल्यास, त्याचाही हेतु कांहीं उद्योग न करितां 'जगानें राम राम' म्हणत बसावें, असा असल्याचा दिसत नाहीं. विचार करा कीं आजकाल सर्व प्रजा जर 'तुकोबा' किंवा 'ज्ञानोबा' होऊन बसली असती, तर आपणास अन्नवस्त्र तरी मिळतें काय? खचित मिळतेंना. करितां स्वधर्म सोडून सर्वकाल देवपूजा करीत बसणें, हें धर्माचें खरें तत्त्व नाहीं. सर्वत्र गोरगरिबांस, विद्वान् पंडितांस, श्रीमान् सावकारांस, धर्म, अर्थ, काम, व मोक्ष साधण्यास सर्व शास्त्रांचें सार काढून हीच सोपी युक्ति जगमान्य अशी ठरली आहे कीं, प्रत्येकानें अश्रांत श्रम करून, आपला स्वधर्म राखावा व जगन्नियंत्या प्रभूची अंतःकरणांत भक्ति सदासर्वकाल जागृत ठेवावी. या योगानें मनुष्य या लोकीं सुख पावून परलोकींही उत्तम गति पावतो.

## मेहनत करून खावें, शेत करून खावें, उतावळा सो बावळा.

**आळशी मनुष्य महाराजांस बिलकुल आवडत नसे. 'आळशी मनुष्याचें तोंड पाहूं नये,' असें महाराज हमेष बोलत असत.** कोणी ढोंगी पोटार्थी बोवा आला असतां, '**आयतें खायाला हुडकतो मादरचोद, बापाची मत्ता,**' याप्रमाणें म्हणून त्यास रागें भरत. महाराज कसें होईल, काय होईल, म्हणून कोणी मनांत विवंचना करीत बसल्यास, '**कायरे तुजजवळ बैल नाहींत काय?**' म्हणून प्रश्न करीत. 'मेहनत करून खावें, शेत करून खावें,' म्हणून महाराज त्यास म्हणत. यावरून बैलाप्रमाणें सतत श्रम करून मनुष्यानें आपली उपजीविका करावी, उगीच दैन्य भाकूं नये, प्रयत्नीं परमेश्वर साह्य होतो, याप्रमाणें महाराजांचें मत होतें हें उघड दिसतें. कोणी भक्त आपली मनकामना लौकर पूर्ण होण्याविषयीं मनांत चिंतीत असल्यास, महाराज '**उतावळा सो**

**बावळा, धीरसो गंभीर,**' अगर '**उतावळा नवरा व गुडघ्यास बाशिंग**', याप्रमाणें अनेक वेळां म्हणत. परमेश्वराचें ज्ञान होण्याचे इच्छेनें कोणी आल्यास त्यास त्याचे योग्यतेप्रमाणें कर्ममार्ग व भक्तिमार्ग प्रथम दाखवून मग ज्ञानमार्ग दाखवीत.

## पाषाण मूर्तींच्या भक्तीपेक्षां गुरु भक्ति श्रेष्ठ.

एक ब्राह्मण पार्थीवलिंगाची पूजा करितां करितां म्हातारा झाला. महाराजांसमक्ष एके दिवशीं पार्थिवपूजा करीत असतां महाराज त्यास म्हणाले, '**अरे माती आणखी किती दिवस चिवडणार?**' पुढें त्या ब्राह्मणानें पार्थिवपूजा सोडून दिली. एखादे वेळीं गणपतीची पूजा कर, सांबाची पूजा कर, म्हणून महाराज मुद्दाम सांगत. पाषाणाचे मूर्तीची भक्ति करण्यापेक्षां गुरुभक्ति करणें, जास्ती श्रेयस्कर असें महाराज भक्तांस सांगत असत.

## गणपतीचा जप, श्रीस्वामीचा जप, व विराट परमेश्वराचें ध्यान.

एक वेळ अशी गोष्ट झाली कीं, बाळापा सेवेकरी हा प्रातःकाळीं च्यार वाजतां जपमाळ धरून गणपतीचा जप करीत बसला होता. दर्शनाची गर्दी रात्रीं बारा वाजेपावेतों जरी असली, तरी महाराज व सेवेकरी पहांटेस जागे होत. बाळापा वर लिहिल्याप्रमाणें जप करीत बसला, व स्वामीसमर्थ पलंगावर बसले असून, खालीं जवळ सेवेकरीण शिऊबाई गोष्टी सांगत बसली होती. गोष्टी चालल्या असतां शिऊबाईनें महाराजांस प्रश्न केला, " महाराज, हल्लीं बाळापा काय करीत आहेत ?" महाराजांनीं उत्तर दिलें, '**अग तो तरट विणीत बसला आहे.**' शिऊबाई मग उगीच राहिली. बाळापानें महाराजांचें उत्तर ऐकून, मनांत विचार केला कीं, तरटाचा उपयोग विशेष होत नाहीं. त्या अर्थी गणपतीचा जप विशेष श्रेयस्कर दिसत नाहीं. तो दिवस गेला. दुसरे दिवशीं रात्रीं पुनः महाराज जागे होऊन पलंगावर बसले. शिऊबाईही जागी होऊन महाराजांजवळ बसली. बाळापा सेवेकरी जागा होऊन जपमाळ घेऊन बसला. गणपतीचे जपास तरट विणण्याची उपमा आदल्या रात्रीं महाराजांनी दिली होती, ती गोष्ट मनांत ठेवून त्यावेळीं बाळापा श्रीस्वामीसमर्थ नांवाचा जप करूं लागला. कांहीं वेळानें शिऊबाईनें महाराजांस पुनः प्रश्न केला, 'महाराज, आज बाळाप्पा काय करीत आहे.' महाराजांनीं उत्तर दिलें, " **अग तो**

**कांबळी विणीत आहे.**" बाळाप्पानें हे शब्द ऐकून त्यास आनंद झाला. कांबळी सर्व उपयोगास येते. त्याप्रमाणें श्रीसमर्थांचें नांव संसारांतील सर्व अडचणी दूर होण्यास उपयोगी पडेल, अशी त्याची खात्री होऊन, अहोरात्र तो श्रीस्वामीचा जप करूं लागला. या गोष्टीवरून सर्व वाचकांनीं उपदेश घेण्याजोगा आहे. श्रीस्वामींचें स्मरण हमेष केल्यास या भवसागरांतील सर्व दुःखें व अडचणी नाहींशा होऊन मानवास सद्गति प्राप्त होईल. याचा अनुभव भक्तजनांनीं घेऊन पहावा. आतां यांत एक शंका राहिली कीं, जर महाराजांनीं आपला जप करणारांस कांबळी विणणारा अशी संज्ञा दिली, तर शालजोडी विणणारा महाराजांचे मतें कोण होईल ? आम्हांस वाटतें कीं, विराटरूपी जो परमेश्वर त्याचें ध्यान करणारा शालजोडी विणणाराची पदवी मिळवील. सहस्रशीर्ष वगैरे गुणांनीं विराटपुरुषांचें वर्णन वेदांत केलेंच आहे. महाराज स्वतः खालीं लिहिलेला श्लोक म्हणत असत.

## श्लोक

**पीठं यस्य धरित्री जलचरकलशं लिंगमाकाशमूर्ति ।**
**नक्षत्रं पुष्पमाला ग्रहगणकुसुमं नेत्र चंद्रार्क वन्हिः ॥**
**कुक्षौ सप्तसमुद्रं भुजगिरि शिखरं सप्तपातालपादम् ।**
**वेदं वक्त्रं षडंगं दशदिशि वसनं दिव्यलिंगं नमामि ॥ १ ॥**

याप्रमाणें विराटरूपी परमेश्वराचें ध्यान, अति उत्तम भक्ति मानली जाईल. पण वाचकहो, विचार करा कीं, एक सहस्र लोकांचे स्थितीविषयीं आपण जर विचार केला, तर त्यांत शालजोडी वापरणारे किती मिळतील, फार तर पांचदहा मिळतील. बाकी सर्व कांबळीं वापरणारे मिळतील. त्याप्रमाणेंच भक्तीची गोष्ट आहे. कर्म, भक्ति व ज्ञान मार्गांपैकीं ज्ञान प्राप्त होणें फार दुर्लभ आहे. तें प्राप्त करून घेण्यास दीर्घकाल व श्रम लागतात. परंतु मानवाचे पाठीमागें हा संसार लागला आहे. शिस्नोदराची सेवा करितां करितां मनुष्य जेरीस येतो. भक्तिज्ञानाबद्दल विचार करण्यास वेळ कुठें मिळतो ! सबब तरणोपायाचा अति सुलभ मार्ग म्हटला म्हणजे स्वामिभक्ति होय. दीन जनांचें परिपालन करण्याकरितांच श्रीस्वामी समर्थांचा अवतार होता.

## एका कबीरपंथी बोवाचें बिंग फुटलें.

सकाळपासून संध्याकाळपावेतों दर्शनाची इतकी गर्दी होत असे कीं, महाराजांस विश्रांति कशी ती मिळतच नसे. कांहीं खुणा करून व कांहीं प्रत्यक्ष भाषणानें

दर्शनास आलेले मनुष्यांचे मनांतील गोष्टींचा खुलासा महाराज करीत. साधु, असाधु, धूर्त, कपटी यांपैकीं ज्या स्वभावाचा मनुष्य असे, त्या स्वभावाची परीक्षा महाराज तेव्हांच करीत! "कपटादारें वळो पर परमेश्वर कसा वळेल हरी," या आर्येप्रमाणें भक्तीनेंच महाराज वश होत. कपटी मनुष्यांची मात्रा त्यांचे पुढें चालत नसे. एक वेळ अशी गोष्ट घडली कीं, एक कबीरपंथी बोवा भिक्षा मागत मागत अक्कलकोटास आला. नित्य प्रातःकाळीं स्नान करून, नानाप्रकारचे टिळे व मुद्रा आंगास लावून, गळ्यांत नानाप्रकारच्या माळा घालून, डोकीला पटका बांधून हातांत वीणा घेऊन, मोठ्या थाटानें बोवा पदें व अभंग म्हणत, गांवांत फिरत असे. दिसण्यांत तर साधूचें सोंग उत्तम तऱ्हेनें सजला होता. पण "अंदरकी बात राम जाने," याप्रमाणें बोवांची स्थिति होती. एके दिवशीं महाराजांची स्वारी गणपतराव जोशी यांचे देवडीवर बसली असतां, बोवांची फेरी तेथें आली. "ये संतनकी बानी साधुराम ये संतनकी बानी." हें पद बोवा म्हणत होते. महाराजांनीं कबीरपंथी बोवांस पहातांच, आपल्या हाताचा आंगठा व त्याचे जवळील बोट वासून, योनीची आकृति दाखवून, त्या आकृतींत दुसरे हाताचें बोट घालून त्याची काढघाल करून बोवांस म्हणाले, "**ये संतनकी बानी**" असें म्हणून महाराज पोट धरधरून हांसूं लागले. हें पाहून गणपतराव जोशी, व इतर मंडळी यांस आश्चर्य वाटलें. महाराजांनीं जें चिन्ह करून दाखविलें त्यावरून बोवा वरून साधु दिसतो, तसा अंतर्यामीं साधु नसावा, अशी सर्वांची अटकळ झाली. गणपतराव व दुसरे दोनचार गृहस्थ बोवांचे बिऱ्हाडाचा शोध करीत निघाले. पहातात तों एक फटाकडी बैरागीण बोवांचे सेवेंत असलेली दृष्टीस पडली. तिजबद्दल जास्ती तपास करितां, ती बाई एका गृहस्थाची लग्नाची बायको असून कबीरपंथी बोवांनीं तिजला नादीं लावून काढून आणिली असल्याचें कळलें. आपलें पाप बाहेर पडल्यामुळें बोवा अक्कलकोटाहून पळून गेले. याप्रमाणें सात पड्यांत जरी पुण्य अगर पाप केलें तरी तें सर्वज्ञ स्वामी समर्थांस सहजीं कळून येई.

## समर्थ निद्रेंत घोरत असतांना "हां ए सोनार नहीं नहीं"

महाराज कधीं कधीं कांट्यांत जाऊन सुखानें निद्रा करीत. वास्तविक पाहतां त्यांस निद्रा मुळींच नव्हती. एका प्रसंगीं असा चमत्कार झाला कीं, गणपतराव जोशी यांचे घरीं समर्थांची स्वारी सायंकाळीं आली. बरोबर चोळापा व गोविंदराव टोळ दोघेच होते. चार घटका रात्र झाल्यावर चोळापानें महाराजांस आंथरूण घालून

दिलें, व त्यावर महाराज निजले. महाराज उठून कोणीकडे जातील त्यांजवर तुम्हीं नजर ठेवावी, म्हणून गोविंदरावांस सांगून चोळापा आपल्या घरीं गेला. महाराजांस गाढ निद्रा लागून ते घोरूं लागले. गोविंदरावाचे मनांत कल्पना आली कीं, महाराज महान् योगी असून साधारण मनुष्याप्रमाणें घोरतात हें कसें ? भगवद्गीतेंतील दुसरे अध्यायांतील श्लोकांचें त्यास स्मरण झालें. **या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ॥ यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥** या प्रमाणें विचार टोळ यांचे मनांत येतांच समर्थ निद्रेंत घोरत असतांना खाकरून "**हां ए सोनार नहीं नहीं**" असें बोलून पुन्हां घोरूं लागले. गोविंदराव टोळ यांस समर्थ नेहमीं सोनार म्हणून हांक मारीत. वर लिहिल्याप्रमाणें भर निद्रेंत महाराजांनी बोलून दाखवून, गोविंदराव यांचे मनांतील संशय दूर केला. प्रत्यक्ष विश्वरूप नटलेले महाराज त्यांस निद्रा कशाची आणि जाग्रति कशाची ! ! !

## महाराजांस गादी व दगड सारखाच.

तसेंच एकदां अशी गोष्ट घडली कीं, महाराज गादीवर निजले असतां बाबा सबनीस यांचा मेहुणा एक पुराणिक होता, त्यानें निंदा केली कीं, संन्याशास निजण्यास मऊ गादी कशाला पाहिजे ? महाराज प्रथम कांबळ्यावर निजत असत, पण पुढें त्यांचा भक्त बाबा सबनीस यानें त्यांस गादी दिल्यापासून, ते गादीवर निजूं लागले. पुराणिक बोवांस महाराजांनीं त्या वेळेस कांहीं जबाब दिला नाहीं. एक महिना गेल्यावर एके दिवशीं सहज महाराज कवड गांवाकडे जाण्यास निघाले. पुराणिकबोवा त्यांचे बरोबर गेले. जातां जातां महाराज कवड गांवापलीकडे गेले. सायंकाळ झाली, गांवानजीक डोंगर आहे, त्याजवर महाराज चढूं लागले. पुराणिकबोवा महाराजांची परत जाण्याबद्दल विनंति करूं लागले. 'होय होय,' म्हणत महाराज डोंगरावर गेले. थंडीचे दिवस, अंधारी रात्र, हांतरूणपांघरूण जवळ नाहीं, ही स्थिति पाहून पुराणिकबोवा घाबरले. महाराजांनीं आपली छाटी एका काळ्या पथ्थरावर टाकून आराम केला. पुराणिकबोवांस थंडीनें कांपरें भरलें. आंगावर आंगवस्त्र होतें, त्यानें थंडी राहिना. महाराज, थंडी फार वाजते काय करावें ? म्हणून केविलवाणीनें पुराणेकबोवा महाराजांची विनंती करूं लागला. महाराजांनीं त्यास उत्तर दिलें, "**मऊ मऊ गादी कशी आहे ?**" पुराणिकबोवांस एका महिन्यापूर्वी महाराज गादीवर निजतात त्याबद्दल निंदा केल्याचें स्मरण झालें. केवळ आपली खोड मोडण्याकरितां आपणांस महाराजांनीं डोंगरावर

आणिलें, असें जाणून अनन्यभावानें शरण जाऊन त्यानें महाराजांची क्षमा मागितली. आपण अज्ञ आहों. महाराजांस इतर संन्याशाप्रमाणें मानून निंदा केल्याचा त्यास पश्चात्ताप झाला. महाराजांस गादी व दगड सारखाच आहे, अशी त्याची खात्री झाली. रात्रभर डोंगरावर काढून, सकाळीं महाराजांसमवेत अक्कलकोटास आला. व आपली झालेली फजीति त्यानें सर्वांस सांगितली. पुढें तो पुराणिक महाराजांचा उत्तम भक्त बनला.

## अनेक दर्शनेच्छुंपैकीं एखाद्याचें नेमकें नांव व खाणाखुणा सांगून बोलावून घेत.

उत्तरोत्तर महाराजांचें वैभव वाढून मोठ्या राजाप्रमाणें त्यांचा थाट बनून राहिला. विंचूरकरांकडून महाराजांचे सेवेस "भुजंगा" म्हणून एक चपराशी दिला होता. तो अखेर महाराजांजवळच राहिला. त्याजवर महाराजांची फार प्रीति होती. महाराज त्यास फिरंगी म्हणून हांक मारीत. मेणा, घोडे, गाई वगैरे श्री० मालोजी राजांकडून महाराजांस मिळाले होते. राजेसाहेबांची व राणीसाहेबांची महाराजांचे ठिकाणीं फार भक्ति होती. महाराज राजवाड्यांत जाऊन आठआठ पंधरापंधरा दिवस रहात असत. राजवाड्यांत फक्त बायकांस दर्शनास जाण्याची परवानगी असे. बाकीचे लोकांच्या झुंडीच्या झुंडी राजवाड्याबाहेर दर्शनाकरितां थबकून रहात. सायंकाळीं राजवाड्याचे गच्चीवर बसून महाराज यात्रेकऱ्यांस दर्शन देत. एखादेवेळेस असें होई कीं, बाहेर तिष्ठत असलेल्या लोकांपैकीं एखाद्या मनुष्याचें नेमकें नांव खाणाखुणा सांगून, एखाद्या चपराशाकडून, किंवा दुसऱ्या जवळ असलेल्या मनुष्याकडून महाराज त्याला आंत बोलावून आणून, सर्वांसमक्ष त्या मनुष्याजवळ चांगल्या प्रकारें भाषण करीत आणि त्याला कांहीं एक प्रकारची सेवा करण्यास सांगून, प्रसाद देऊन त्यास मोठ्या प्रेमानें निरोप देत.

## नित्य उपक्रम—दर्शन घेणाऱ्याचें मनांतील इंगित सांगत.

पुढें जेव्हां यात्रेची फारच गर्दी होऊं लागली तेव्हां चोळापा महाराजांस मोठ्या प्रातःकाळीं स्नान घालून, आरती करून नैवेद्य अर्पण करीत असे. नित्य केशरकस्तुरीचें गंध महाराजांचे कपाळीं लावी. महाराज दोन आचमनें घेत. चोळापा किंवा सुंदराबाई त्यांस भरवीत असत. एकदां उजाडलें म्हणजे चालली दर्शनाची

दाटी. रात्रीं नऊदहा वाजेपावेतों नित्य शेंकडों लोक दर्शनास येत. महाराजांच्या बाललीला व दर्शनास येणारे मनुष्यांचे मनांतील इंगित जाणण्याचे खेळ एकसारखे चाललेले असत. मध्यें मध्यें महाराज निद्रिस्त होत. दुपारच वेळीं लहर लागल्यास महाराज थोडेंसें जेवीत. एखादे वेळीं आठआठ दिवस अन्नपाण्यावांचून महाराज राहत. महाराजांची रोज त्रिकाळ आरती होत असे. बहुतेक दत्ताच्या आरत्या म्हणून महाराजांस ओंवाळीत.

## चिंतोपंतास श्रीचे चरण निरंतर पूजेकरितां मिळावे म्हणून दोन्ही चरण पाटावर उमटवून दिले.



चिंतोपंतांचे पाटावरील उमटलेल्या पादुका

चिंतोपंत आपा टोळ यांनीं आपले घरीं श्रीविष्णुपंचायतनास कोट तुळशी वाहण्याचा संकल्प करून, त्याप्रमाणें दररोज तुळशी वाहण्याचा क्रम चालविला होता. केव्हां केव्हां श्रीस्वामी समर्थ पूजेचे वेळेस टोळाचे घरीं येत असत. महाराज

आले म्हणजे केवळ दत्तरूप समजून त्यांचे चरणीं टोळ हे विष्णुसहस्रनामावळीनें तुळशी वाहत असत. एके दिवशीं श्रीसमर्थ चरणीं नामावळी वाहून, धूपदीपनैवेद्य दाखवून, यथासांग चिंतोपंतांनीं महाराजांची पूजा केली. व शेवटीं प्रार्थना केली कीं, 'श्रींचे चरण पूजेकरितां निरंतर सन्निध असावेत.' "**बरें आहे. तुझ्या म्हणण्याप्रमाणें होईल.**" असें सांगून महाराज निघून गेले. कांहीं वेळानें पहातात तों ज्या पाटावर महाराज बसले होते, त्या पाटावर श्रींचे दोन्ही चरण उमटलेले दृष्टीस पडले. जसे मृदु वालुकामय प्रदेशावर चालत असतां मनुष्याचे पाय त्यावर उमटतात, तसे श्रीस्वामी महाराजांचे चरण शुष्क काष्ठाचे पाटावर उमटले. हा अद्‌भुत चमत्कार पाहून टोळ यांस परमानंद झाला. व हा महाराजांचा प्रसाद शिरसावंद्य समजून भक्तिपूर्वक ते त्यांची नित्य पूजा करूं लागले. हल्लीं सदरहू प्रासादिक पादुका अक्कलकोटास जोशीबुवांचे घराजवळ समर्थांचा मठ आहे त्यांत आहेत. (छायाचित्र पान ६६ वर)

## वेदांत विषय हातखंडा.

अक्कलकोटास रामजोशी बोवांचे घरीं पंचदशी म्हणून, एक वेदांतपर ग्रंथ आहे. तो नित्यशः गणपतराव जोशी संगमेश्वरकर, गोपाळ जोशी हिरलीकर, जयतीर्थ, पुराणिक वगैरे विद्वान् मंडळी वाचीत असत. एके दिवशीं नित्य नेमाप्रमाणें सदरील मंडळीचें ग्रंथावलोकनांचें काम चाललें असतां एका श्लोकाचा अर्थ कोणास बरोबर लागेना. त्याचे विवरणांत सर्वत्र मंडळी अगदीं गढून गेली आहे, इतक्यांत श्रीसमर्थांची स्वारी बाहेर फिरण्यास गेलेली चोळापाचे घरीं आली, अशी त्यांस बातमी समजली. तेव्हां श्लोकाच्या अर्थाची चर्चा उदईक करावी, असें सर्वत्रांनीं ठरवून सर्वजण महाराजांचे दर्शनास गेले. श्रीसमर्थांचें दर्शन घेऊन मंडळी खालीं बसली, तोंच महाराज वेदांत विषयावर बोलूं लागले. आणि शेवटीं ज्या श्लोकाची भानगड मंडळीनें उद्यांवर ठेवली होती, त्याचाही अर्थ सर्वत्रांच्या हृदयांत समर्थांनीं चांगला भरवून दिला. तेव्हां हा चमत्कार पाहून सर्व विद्वान् मंडळी आश्चर्यानें चकित झाली. व आपल्या मनांतलें हृद्गत महाराजांनीं जाणलेसें पाहून त्यांस मोठा आनंद झाला. आणि हा प्रत्यक्ष ईश्वरी अवतार आहे अशी त्यांची खात्री होऊन, श्रींचे चरणाजवळ सर्वजण पारमार्थिक ज्ञान मिळावें म्हणून निश्चयानें सेवा येऊं लागले.

## भक्तांचें रक्षण–पिराजीरावांचा निष्कारण दंगा.

पुढील येणारें संकट जाणून श्रीस्वामीसमर्थ आपल्या भक्तांचें कसें संरक्षण करीत, हें पुढील गोष्टीवरून ध्यानांत येईल.

एके दिवशीं रंगपंचमी असल्यामुळें त्या उत्साहासंबंधानें राजवाड्यांत दरबार भरला होता. चिंतोपंतआपा टोळ कारभारी यांचे घरीं श्रीस्वामीसमर्थांची स्वारी असल्यानें, त्यांस दरबारास जाण्यास उशीर झाला. राजाकडून त्यांस बोलविण्यास जासूद आला. महाराजांनीं टोळांस कचेरीत जाऊं नको, म्हणून आज्ञा केली. समर्थांची आज्ञा अमान्य करून टोळांस जातां येईना. इकडे राजाची इतराजी होईल, म्हणून त्यांस भीति पडली. अशा पंचाइतींत टोळ असतां राजाकडून दुसरें बोलावणें आलें. पण समर्थ जाण्यास आज्ञा देईनात. तिसरे खेपेस चोपदार बोलवावयास आला, तरी समर्थांनीं परवानगी दिली नाहीं. चिंतोपंताकडे रागानें पाहून, महाराज म्हणाले, "**तुझा गळा कापला तर तूं काय करशील? तुझे हात पाय तोडले तर तूं काय करशील?**" वगैरे पुष्कळ प्रकारें महाराज रागवून बोलले. महाराज आणखी म्हणाले—"**दरवाजाबाहेर बसून लौकर या म्हणून मोठ्या दिमाखानें हुकूम करतो.**" चिंतोपंत आपा हे स्वामीभक्तच होते. त्यांची खात्री झाली कीं, आज दरबारांत कांहीं तरी विपरीत प्रकार घडणार आहे; राजाची गैरमर्जी होण्याची भीति न बाळगतां श्रीसमर्थांचे आज्ञेप्रमाणें दरबारास न जाण्याचा त्यांनीं निश्चय केला. चोपदार परत जाऊं लागला, तेव्हां गोपाळ जोशी हिरलीकर समर्थांजवळ बसले होते, ते उठून बाहेर चोपदाराचे मागें गेले, व राजेसाहेब कोठें आहेत? म्हणून त्यांनीं चोपदारास विचारिलें. त्यानें उत्तर दिलें, 'राजेसाहेब थोरले दरवाजाचे बाहेर चौथऱ्यावर बसले आहेत.' त्यावरून दरवाजाबाहेर बसून हुकूम करितो, म्हणून महाराज म्हणाले ती गोष्ट जोशीबुवांचे प्रत्यंतरास आली. पुढें दरबारांत अनर्थ घडून आला. तो असा कीं, दुतर्फा मानकरी मंडळी बसली असतां गणपतराव खंडागळे मानकरी हे दरबारास आले. त्यांचे कमरेस तरवार लटकत होती. तिचें टोंक गणपतराव बसते समयीं पिराजीराव पिलविकर मानकरी यांचे पागोट्यास लागून, पागोटें खालीं पडलें. भर दरबारांत अपमान झालेला सहन न होऊन, पिराजीराव गणपतरावाचे आंगावर घसरले. तरवारीचे सळ दोघांनीं उपसून ते एकमेकांचा प्राण घेण्यास प्रवृत्त झाले. दुसरे मानकरी मंडळींनीं मोठ्या प्रयासें उभयतांस एका

बाजूस काढून, तंटा मिटविला. याप्रमाणें रंगपंचमीचा बेरंग झाला. पिराजीरावांनीं विनाकारण दंगा केला, सबब राजेसाहेबांनीं त्यांस अक्कलकोटचे बाहेर हद्दपार केलें. याप्रमाणें पुढें अनर्थ घडणार, हें जाणून महाराजांनीं आपला भक्त टोळ यास दरबारांत जाऊं दिलें नाहीं. अशी महाराजांची विचित्र लीला होती.

## ब्राह्मण सुभेदार व पार्शी मॅजिस्ट्रेट यांचे योगें प्रजा त्रस्त

श्रीमंत मालोजीराजे साहेब यांचे कारभारी दाजीबा भोंसले, यास बंडासंबंधानें हद्दपार केल्याचें चरित्र पूर्वी आलेंच आहे. राजेसाहेब यांचें दाजीबावर प्रेम असल्यानें, दाजीबास पुन्हां अक्कलकोटास आणण्याबद्दल त्यांचे भगीरथ प्रयत्न चालले होते. व त्यासंबंधानें त्यांनीं हजारों रुपये खर्चेही केले. याप्रमाणें राजाची कडेकोट तयारी चालली होती. एके दिवशीं तिसरे प्रहरीं श्रीस्वामी महाराज नरसिंगराव भोंसले यांचे वाड्यांत बसले असून सन्निध सेवेकरी मंडळी व विश्वासराव आपासाहेब माने मंडळी होती. महाराजांचे बाललीलेचे खेळ चालले असतां, एकाएकीं समर्थ अतिशय रागावले, ते इतके कीं, त्यांची मुद्रा तप्त सुवर्णाप्रमाणें लाल दिसूं लागली. सेवेकरी मंडळी भीतीनें लांब पळून, काय चमत्कार होतो, तो पहात लपून उभी राहिली. विश्वासराव माने मोठे शूर सरदार पण कुपित झालेले महाराजांसमोर क्षणभरही उभे राहण्यास समर्थ नाहींत. ते म्हणाले, प्रसंग पडल्यास वाघाचे आंगावर चालून जाण्यास आम्ही भिणार नाहीं, पण श्रीसमर्थांपुढें उभें राहण्यासही आपलें धैर्य होत नाहीं. जाळून भस्म करून टाकतील. तितक्यांत महाराज मोठ्या रागानें, म्हणूं लागले, "**क्यौं चेष्टा लगाई बहुत मात्रागमनी, इसके माकू लगे गद्धे हरामखोर चोर साले, दाज्याकू कोन लेकर आता है ? दाज्याकू लेकर आये तो फेर सो शिपाई लाकर पकडकर ले जावेगे.**" याप्रमाणें भाषण करून महाराज स्तब्ध राहिले. चार घटका पावेतों कोणास जवळ येऊं दिलें नाहीं. ही महाराजांची उक्ति राजाचे कानावर गेली. त्यानें त्या वेळींच सावध होऊन महाराजांचे इच्छेनुरूप वर्तन करण्याचें होतें, पण '**विनाशकाले विपरीत बुद्धिः**' याप्रमाणें दाजीबास घेऊन येण्याचे प्रयत्न सुरूच होते. राजास वाटे दाजीबा हा एक परीसच आहे. त्या प्राप्तीनें आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील. पुढें कांहीं दिवसांनीं राजाचे प्रयत्नास यश आलें. अतःपर दाजीबाकडून गैरवर्तन होणार नाहीं, म्हणून इंग्रज सरकारची खात्री करून, आपण स्वतः त्यास पन्नास हजार रुपयांस जामीन

राहून, दाजीबास एकदांचे अक्कलकोटास आणिलें. दाजीबा भोंसले आल्यावर राजेसाहेबांचा तो खासगी कारभारी बनला. वाटेल तसे प्रकार संस्थानांत होऊं लागले. एक पारशी मॅजिस्ट्रेट व एक ब्राह्मण सुभेदार, हे दाजीबास अनुकूल राहून प्रजेस फार ताप देऊं लागले. "फुलाचे चोरीस फांशीची शिक्षा," या म्हणीचा अर्थ अक्कलकोटास दृष्टिगोचर होऊं लागला. एका शेतकऱ्याचे शेतांतून दोन तीन इसमांनीं बिन परवानगीनें तुराटीचे तीन चार भारे नेले, त्याबद्दल खटले होऊन प्रत्येकास एक एक वर्ष सक्त मजुरीची कैद व पांच-पांचशें रुपये दंड याप्रमाणें शिक्षा ठोठावली. तसेंच बापूसाहेब निंबाळकर हे राजघराण्यांतील मुलीचे वंशांतील असल्यानें मानकरी असून बागेहाळी हा गांव त्यांजकडे जहागीर होता. त्या गांवचे एका महारास रागानें बापूसाहेब यांनीं जोडा मारिला. त्याबद्दल फिर्याद येऊन, दाजीबा भोंसल्याचें व बापूसाहेबांचें वैमनस्य असल्यामुळें, दाजीबानें आंतून किल्ली फिरविल्यावरून मॅजिस्ट्रेट साहेबांनीं बापूसाहेबांचें वय ६० वर्षांचें असतां, एक वर्षाची सक्त मजुरी व हजार रुपये दंड द्यावा म्हणून शिक्षा दिली. नारायणराव आरगडे सोलापूरकर मुक्त्यार वकील हे अक्कलकोट गांवांत रस्त्यानें जात असतां एका इसमास धक्का लागून त्याचें पागोटें पडलें. त्यावरून त्याज-बरोबर मारामारी होऊन फिर्याद आली. आकसानें मॅजिस्ट्रेटानें त्यास एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा दिली. याप्रमाणें फार जुलूम होऊं लागला. अब्रूदार गृहस्थास अक्कलकोटास जाण्याची व राहण्याची फार भीति वाटूं लागली. इकडे वर सांगितलेले ब्राह्मण सुभेदार यांचाही जुलूम सुरू झाला. चिंतोपंत आपा टोळ हे कारभारी असतां अक्कलकोट तालुक्याची जमा सालीना एक लक्ष पंधरा हजार झाली होती. त्यांनीं लोकांस खुष ठेवून व राजाचेंही नुकसान न करितां योग्य सारा जमिनीवर बसवून, इस्तावे चढ घालून पंचवीस तीस तीस वर्षांचे कौल राजाचे सहीशिक्यानिशीं रयतेस दिले होते. दाजीबा भोंसले यांचा हल्लीं असा सल्ला पडला कीं, टोळ यांनीं सरकारचें फार नुकसान करून कौल दिले. राजेसाहेबांचे सल्ल्यानें सदरचे कौल जुलमानें रयतेपासून परत घेऊन, फाडून व जाळून टाकण्याचा सुभेदार यानें सपाटा चालविला व साऱ्याचा चढ रयतेवर बसविला. तेणेंकरून प्रजा त्रस्त होऊन हजारों अर्ज काउन्सलपर्यंत गेले. हे अर्ज करण्याचें कामीं शंकरराव नाना सरदेशमुख यांचें अंग आहे, अशा वहिमावरून त्यांस बोलावून आणून, दाजीनें राजास सल्ला दिल्यानें राजानें त्यांस नजरकैदेंत ठेविलें. सरदेशमुख यांनीं सवड साधून रात्रीं आपली सुटका करून घेऊन,

सोलापुरास निघून गेले. तेथें पोलिटिकल एजंट यांजकडे रयतेवर जुलूम झाल्याची त्यांनीं फिर्याद दिली. याप्रमाणें अक्कलकोटास झोटिंग बादशाही चालली. अब्रूदार लोक रस्त्यांत वागण्यासही भिऊं लागले. अर्जावरून संस्थान लौकरच जप्त होणार म्हणून जिकडे तिकडे वदंता उडाली. अशा आणिबाणीचे वेळीं एक शास्त्रीबुवा राजास राजनीतीचा उपदेश करण्यास आले. अक्कलकोटचे दक्षिणेस चारपांच कोसांवर खेड म्हणून एक गांव आहे. तेथील आद्य आचार्य यांस श्रीमंत पेशवे सरकारांनीं चाळीस हजारांचीं जहागीर गांवें दिलीं होती. आचार्य बहुत विद्वान् असून सत्पुरूष होते. '**जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूति ॥** ' अक्कलकोट जप्त होणार हें ऐकून आचार्यांचें मन कळवळलें. व शेजारधर्म आहे, आपण राजास भेटून चार उपदेशपर गोष्टी सांगून पहाव्या, अशा हेतूनें ते अक्कलकोटास आले. राजाची भेट घेतल्यावर राजानें आगमनाचें कारण विचारलें. आपण स्वतः जहागीरदार आहों, शेजारधर्माप्रमाणें भेटून चार शब्द सांगण्यास आलों, म्हणून सांगून आचार्यांनीं अनेक तऱ्हेनें राजनीतीचा उपदेश केला. शेवटीं उदाहरणार्थ, भागवतांतील एक गोष्ट आचार्यांनीं सांगितली. ती अशी :-शेंकडों मनुष्यें ज्यांत बसलीं आहेत असें एक जहाज समुद्रांत चाललें असतां, मोठें तुफान झालें. तितक्यांत त्या जहाजासमोर एक मत्स्य येऊन उभा राहिला, व त्यास वाचा फुटून बोलूं लागला कीं, या जहाजांतील एक मनुष्य (त्याचें नांव त्यानें सांगितलें) मला भक्षावयास द्या म्हणजे मी जहाज गिळीत नाहीं, नाहीं तर सर्व जहाज गिळून टाकीन, असें म्हणून मत्स्य स्तब्ध राहिला. जहाजांतील लोकांनीं विचार करून त्या मनुष्यास पाण्यांत ढकलून देऊन सर्व प्राण वांचविले व जहाज सुखरूप गेलें. ही गोष्ट सांगून आचार्य म्हणाले, या आपल्या संस्थानरूप जहाजांत तसा एखादा मनुष्य असल्यास त्यास टाकून देऊन संस्थानचें संरक्षण करावें. याप्रमाणें नीतीच्या गोष्टी सांगून आचार्य खेडास निघून गेले. वैभवानें ज्याचे डोळे धुंद झाले आहेत, त्यास या बोधाचा थोडाच उपयोग होणार! आचार्य वाड्याचे बाहेर जाण्याचा उशीर, तों दाजीबा भोंसले व आपा माहुत यांनीं आचार्यांचा फार्स करून दाखविला. आचार्यांसारखा शालनामा डोकीस बांधून, हातांत काठी घेऊन, त्यांचेसारखे शास्त्रार्थ बोलून व हातवारे करून हुबेहुब त्यांनीं सोंगाची बतावणी केली. मालोजीराजे यांस त्यांचें फार हंसूं आलें. व ते म्हणाले, म्हातारा आम्हांस नीतीच्या गोष्टी सांगतो, आम्हांस काय समजत नाहीं? मोठा शहाणा आला. असें म्हणून त्यांची निर्भत्सना केली.

**॥ उत्कच मरणाला ॥ हित परिणामीं न सोसावे काढा ॥** याप्रमाणें राजाची स्थिति झाली होती. पूर्वी महाभारतांत प्रत्यक्ष व्यास व श्रीकृष्ण भगवान् येऊन पांडवाशीं वैर न करण्याबद्दल दुर्योधन राजास उपदेश केला असतां, शकुनिमामा आदिकरून दुष्ट मंडळीस तो न आवडून, त्यांची त्यांनीं निर्भत्सना केली. तद्वत्च ही गोष्ट झाली. मालोजीराजे हे महाराजांचे भक्त होते. महाराज वारंवार राजास वाईट प्रकार सोडून देण्याबद्दल सूचना करीत असून, राजाचे डोळे उघडेनात हें त्याचें नशीबच म्हणायचें. ॥ **समोहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योस्ति न प्रियः ॥ ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥** हें भगवद्वाक्य सत्य आहे. ज्यानें जसें करावें तसें भरावें. जो सत्कर्म आचरतो तो ईश्वरप्रिय अनायासें होतो. तसाच दुष्कर्मे आचरणारा आपण होऊन नाश पावतो. असो, एके दिवशीं श्रीसमर्थ स्वामीमहाराज राजवाड्याचे बाहेर शिपाई लोकांचे चौकींत बसले होते. संध्याकाळची वेळ होती, इतक्यांत मॅजिस्ट्रेट साहेब हे आपल्या राहते बंगल्यापासून घोडा पिटीत मोठ्या थाटानें राजवाड्यांत जाण्यास आले समर्थांनीं त्यास पाहतांच हातांत काठी घेऊन, त्यांचे घोड्यापाशीं जाऊन म्हणूं लागले. **"पुढें गेलास तर डोकें फोडीन, मात्रागमनी लुच्चा, चोरा, माझीं पोरें जाळलींस, पोळलींस, आग लावलीस,"** वगैरे अनेक तऱ्हेनें महाराज फार रागानें बोलले. ती रागीट मुद्रा पाहून मॅजिस्ट्रेट साहेब घोडा फिरवून परत जाऊं लागले; हें पाहून '**बरतर्फ**' असे शब्द महाराज म्हणाले. पुढें थोडे दिवसांनीं अक्कलकोट संस्थान जप्त होऊन मॅजिस्ट्रेट साहेब व ब्राह्मण सुभेदार उभयतां आपणांस अटक होईल म्हणून मोगलाईत पळून गेले.

## संस्थान जप्त, नंतर खुलें, मालोजीराजे यांस अंतकाळीं महाराजांचें दर्शन.

श्री. मालोजीराव राजे यांनीं महाराजांचे उपदेशाप्रमाणें बंदोबस्त न ठेविल्यामुळें राज्यकारस्थानें उत्पन्न होऊन राज्य जप्त झालें. राजेसाहेबांस मुंबईस घेऊन गेले. मागें समर्थांची स्वारी राजवाड्यांत जाऊन राहिली. कित्येक कुत्सित लोक म्हणूं लागले कीं, संन्याशाचा पाय गादीस लागला, आतां परत राजास गादी मिळणें दुर्घट आहे. महाराजांचे कृपेनें लौकरच राजेसाहेब अक्कलकोटास परत आले. स्वामी महाराजांनीं '**आपली गादी संभाळ.**' अशी राजास आज्ञा करून आपण राजवाड्यांतून बाहेर पडले, ते मग बहुत दिवस परत

आले नाहींत. इंग्रज सरकारानें जरी पूर्ण अधिकार राजास दिलेले नव्हते, तरी जती खुली करून रीजंट वगैरे नेमून कारभार चालविला. रा. माधवराव विठ्ठल विंचूरकर ऊर्फ दादासाहेब यांस सरकारांतून रिजंट नेमिलें. व मे० माधवराव गोविंद रानडे यांस कारभारी नेमिलें. पुढें राज्यकारभार चांगले रीतीनें चालला. श्रीसमर्थांचेच कृपेनें अक्कलकोटचे राजे श्री० शहाजीराव उर्फ बाबासाहेब यांस सन १८९१ सालीं नवंबर महिन्याचे २५ वे तारखेस संस्थानचा अधिकार मिळून ते कारभार पाहूं लागले. असो. श्री० मालोजीराव राजे यांचा आजार वाढून पुढें त्यांस देवाज्ञा झाली. ते महाराजांचे भक्त होते. समर्थ ते वेळेस गांवगन्ना फिरत होते. अंतकाळचे वेळेस समर्थांचें दर्शन व्हावें, म्हणून त्यांचें सर्व लक्ष श्रीकडे लागलें. मग काय उशीर आहे ! समर्थ एकाएकीं येऊन राजाचे बिछान्याजवळ उभे राहिले. राजानें दर्शन घेऊन स्वामींचें ध्यान करीत प्राण सोडिला.

## डॉ. वामन गोपाळ यांस प्रदोष पूजेचे वेळीं दृष्टांत.

नवीन सुधारक मंडळीपैकीं बहुत लोक महाराजांचे सेवेस लागल्याचीं उदाहरणें आहेत. मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर वामन गोपाळ हे महाराजांचे मोठे भक्त होते. बाहेरून ते कितीही नास्तिक दिसत असले तरी, त्यांचे अंतःकरणांत भगवद्भक्ति वास करीत होती. श्रीसमर्थांची तसबीर पुढें ठेवून डॉक्टरसाहेब नित्य भजन—पूजन करीत असत. एके दिवशीं प्रदोष पूजेचेवेळीं वामनराव महाराजांचें ध्यान करीत असतां, त्यांस असा दृष्टांत झाला कीं, महाराजांस एक म्हातारी विधवा बाई डाळिंबाचे दाणे खाऊं घालीत आहे. कांहीं वेळानें वामनराव स्थितीवर आल्यावर, झाल्या दृष्टांताबद्दल विचार करीत बसले. दोन तीन दिवसांमागें त्यांनीं महाराजां-करितां डाळिंब वगैरे फळफळांची पार्सल अक्कलकोटास पाठविली होती. त्यांचा उपयोग प्रदोषकाळींच झाला कीं काय याची प्रचिती कशी पहावी, या विचारांत ते होते. तितक्यांत महादेवभटजी सेवेकरी मुंबईस आले होते. त्यांची व वामनरावांची गांठ पडली. झालेला दृष्टांत भटजीस कळवून वामनराव म्हणाले, अक्कलकोटास आपले कोणी ओळखीचे नाहीं, करितां तुम्ही आपल्या स्नेह्यास लिहून फळांबद्दल हकीकत मागवावी. महादेव भटजीनें रा० रा० बाबूराव मोघे अक्कलकोटचे मामलेदार, यांस पत्र लिहून जबाब आणविला. त्यांत ज्या दिवशीं व ज्यावेळेस वामनरावास दृष्टांत झाला, त्याच वेळेस सुंदराबाईनें महाराजांस डाळिंबाचे दाणे खाण्यास दिले, असा मजकूर

होता. पत्र पाहून डॉक्तर यांस मोठा आनंद झाला. ते अक्कलकोटास वारंवार जाऊन समर्थांचें दर्शन घेत असत.

## नारायणराव दामले वकील, सोलापूर, यांची गोमुत्रानें मूळव्याध बरी केली.

रा० रा० नारायण परशराम दामले वकील, मुक्काम सोलापूर, हे महाराजांचे मोठे भक्त होते. कोणताहि प्रसंग आला असतां अक्कलकोटास जाऊन, समर्थांची प्रार्थना करून, त्यांचे आज्ञेप्रमाणें वर्तन ठेवून, ते त्यांतून पार पडत असत. वकील यांस महाराज गणपती या नांवानें हाक मारीत असत. एक वेळ नारायणरावजीस मुळव्याधीचा आजार उत्पन्न होऊन ते फार आजारी झाले. डाक्तर व वैद्य यांचे पुष्कळ औषध घेतलें, पण गुण येईना. शेवटीं डॉक्टर यांनीं शस्त्रानें व्याधीवर प्रयोग केला. त्यापासून गुण न येतां कोंबांतून रक्तस्राव होऊन दामले यांचीं प्रकृति अति क्षीण झाली. औषध घेतां घेतां ते कंटाळून गेले. स्वतः अक्कलकोटास जाऊन महाराजांस प्रार्थना करून उपचार करण्याची आंगांत ताकद राहिली नाहीं. या दुखण्यांतून बरें होण्याची त्यांची निराशा झाली. श्रीसमर्थ महाराजांखेरीज आपणास कोणी तारणार नाहीं, असा निर्धार करून, त्यांनीं अक्कलकोटास मोरोपंत सेवेकरी यांस पत्र पाठविलें कीं, महाराजांस आपल्या दुखण्या संबंधानें प्रार्थना करून, जी आज्ञा होईल ती आपणांस लिहून कळवावी. मोरोपंतानें त्याप्रमाणें प्रार्थना केली असतां महाराज म्हणाले, "गोमूत्र द्यावें म्हणजे व्याधि जाईल." त्याप्रमाणें मोरोपंतानें दामले यांस लिहून कळविलें. नारायणरावजींनीं आज्ञेप्रमाणें कांहीं दिवस गोमूत्र घेतल्यावर त्यांची प्रकृति चांगली होऊत मूळव्याधीचा रोग अगदीं नाहींसा झाला.

## प्रसिद्ध वासुदेव बळवंत यांस बंडास प्रवृत्त होण्यास आज्ञा दिली नाहीं.

साधू, असाधू, धूर्त, लुटारू, बंडखोर सर्वजण आपल्या कामांत आपणांस यश यावें, म्हणून महाराजांजवळ प्रार्थना करण्यास येत असत. असें सांगतात कीं, प्रसिद्ध बंडखोर वासुदेव बळवंत फडके हे पुण्यास नोकर असतां रजा घेऊन दोन तीन वेळ महाराजांचे दर्शनास आले होते. आपले हेतू शब्दांनीं न कळवितां मनोमय महाराजांची विनंति त्यांनीं केली. सर्वसाक्षी समर्थांनीं त्यांचे हेतू जाणले,

पण त्यांचे मनाप्रमाणें करण्यास आज्ञा दिली नाहीं, असें दिसतें. पुढें बंड करण्यास प्रवृत्त होण्यापूर्वी एकवेळ तरवार घेऊन ते महाराजांचे दर्शनास आले होते. महाराजांपुढें तरवार ठेवून, चरणीं वंदन करून, दूर जाऊन बसले. त्यांचा हेतू असा होता कीं, महाराजांनीं स्वहस्तानें आपणास तरवार द्यावी व मग ती वरदी तरवार घेऊन अजिंक्य व्हावें. परंतु सर्व शक्तिमान् श्रीस्वामीसमर्थ असें भलतेंच करण्यास आज्ञा कोठून देणार ? फडके यांचे हातांत तरवार न देतां, जवळ असलेले एका सेवेकऱ्यास हांक मारून, त्याचे हातांत तरवार देऊन, जवळच एक तरटीचें झाड होतें, त्यावर नेऊन ठेवण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केलें. फडके पुष्कळ वेळ बसले पण महाराजांनीं त्यांचे हातांत तरवार मुळींच दिली नाहीं. मग वासुदेवराव निराश होऊन तरटीचे झाडावरील तरवार घेऊन पुण्यास निघून गेले; समर्थांचे कृत्याचा अर्थ उघड होता. पण त्यांस न जुमानतां वासुदेवराव यांनीं पुढें दरोडेखोरांचें काम सुरू केलें. त्याचा परिणाम विपरीत होऊन, पुढें गाणगापुरानजीक पकडले गेले, व त्यांस शिक्षा झाली, हें प्रसिद्धच आहे. वासुदेवानें दंगा सुरू केल्यावर, त्यांचा महाराजांचे दर्शनास तरवार घेऊन येण्याचा हेतू लोकांचे ध्यानीं आला. त्रिकालज्ञ स्वामीसमर्थ भलत्याच गोष्टीबद्दल आज्ञा कशी देतील ! यांचे आज्ञेविरुद्ध कोणी वर्तन केल्यास त्यास यश येण्याची आशा बाळगणें हें वेडेपणाचें काम आहे.

## दादासाहेब विंचूरकर यांचें मांडीवरील श्वेतकुष्ट बरें केलें.

माधवराव विठ्ठल ऊर्फ दादासाहेब विंचूरकर हे अक्कलकोट संस्थानांत रीजंट होते. त्यांची भक्ति श्रीस्वामीचरणीं फार होती. श्रीस्वामीमहाराज कधीं कधीं विंचूरकर यांचे बिऱ्हाडीं जात असत. दादासाहेब समर्थांस स्नान घालून, गंधपुष्पादि षोडशोपचारें पूजा करून, भोजन करवीत. मग आपण प्रसाद ग्रहण करीत. दादासाहेब नास्तिक आहेत असें बाह्यांतरीं दुसऱ्यांस वाटे, पण ते महाराजांचे प्रेमळ भक्त होते. रात्रीं भजन मंडळी जमवून टाळ मृदंग घेऊन आनंदानें दादासाहेब भजन करीत. महाराज त्या ठिकाणीं एखादे वेळेस येऊन बसत असत. दादासाहेबांचे मांडीवर पुढें एक श्वेतकुष्टाचा डाग उद्भवला. दादासाहेबांस काळजी उत्पन्न झाली कीं, हा रोग जास्त फैलावतो कीं काय, कोण जाणे ! एके दिवशीं ते महाराजांचे दर्शनास आले असतां महाराजांची सुप्रसन्न मर्जी पाहून, दादासाहेबांनीं मांडीवरील डाग बरा होण्याबद्दल प्रार्थना केली.

महाराज म्हणाले, '**त्याचें नांव काय?**' दादासाहेबांनीं उत्तर दिलें, 'लोक त्यास श्वेतकुष्ट म्हणतात.' त्यानंतर महाराजांनीं विचारिलें, 'तुझे हातांतलि बोटांत काय आहे?' 'आंगठी आहे,' म्हणून दादासाहेब म्हणाले. '**खडा कसला आहे?**' हें विचारितां पांढरा आहे, म्हणून दादासाहेबांनीं उत्तर दिलें. '**तो फेकून दे,**' म्हणून महाराजांनीं आज्ञा केली. दादासाहेबांनीं मनांत विचार केला कीं, तीनशें रुपये किंमतीची आंगठी फेंकून कशी द्यावी? महाराजांचे हातांत घालावी मग ते पाहिजे तें करोत. असा विचार करून आपल्या हातांतील आंगठी काढून महाराजांचे हातांत घातली. महाराजांनीं ती आंगठी चोळाप्पास दिली. त्यानें ती विकून महाराजांचें देवळाचें काम चालविलें. हल्लीं ती आंगठी अक्कलकोटचे राजेसाहेबांजवळ आहे. पुढें विंचुरकरांचे मांडीवरील डाग कमी होत होत अगदीं नाहींसा झाला. याप्रमाणें महाराजांचीं विचित्र लीला होती.

## दादासाहेब विंचूरकरांस लाखो लोक रामराम करतात तेथें जा.

पुढें एक वेळ दादासाहेब हे आपले ऑफिसांत काम करीत बसले असतां, महाराज अकस्मात् तेथें आले. आपण खुर्चीवरून उठून महाराजांस आपल्या जागीं बसविलें, व दादासाहेब उभे राहिले. व कांहीं वेळ बोलणें झाल्यावर महाराज म्हणाले, '**आब तुम्हारा खुर्च्या टेबल सब खटला ऊंटपर डालकर कुच करो.**' हें ऐकून विंचूरकर चकित झाले, व महाराजांस म्हणाले, 'महाराज मला कोठें जाण्यास सांगतां?' महाराजांनीं उत्तर दिलें '**हजारों लाखो लोक रामराम करितात, तेथें जा.**' असें सांगून महाराज, उठून चालते झाले. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीमंत मालोजीराजे व दादासाहेब या उभयतांमध्यें लबाड लोकांनीं वैमनस्य आणवून मुंबईसरकारपर्यंत राजेसाहेबांकडून गिल्ला करविला. हें वर्तमान आप्पासाहेब विंचूरकर यांस समजतांच दादासाहेब यांस परत बोलावून घेऊन, विंचूर संस्थानचें सर्व काम त्याजकडे सोंपविलें. दादासाहेबांचे मनांत पुन्हां अक्कलकोटास जावयाचें होतें, पण आप्पासाहेब विचारी असल्यामुळें त्यांनीं सर्व गोष्टीचा विचार करून त्यांस जाऊं दिलें नाहीं.

## डॉ. आत्माराम यांस 'गोविंद पांडुरंग ब्रह्मखेत्री यांचा चेहरा पहा'—महारोगाचें निदर्शन केलें.

गोविंद पांडुरंग ब्रह्मखेत्री नांवाचे गृहस्थ सोलापुरास रहात होते. एके वेळीं हे गृहस्थ अक्कलकोटास श्रीसमर्थांचे दर्शनास आले होते. यतिराजांचे दर्शन घेऊन

29323 ८४८२ नों. दिः
गोविंदराव खालीं बसले. त्याच वेळेस सोलापुरचे प्रसिद्ध डॉक्टर आत्माराम हे महाराजांचे दर्शनास आले. डॉक्टर दर्शन घेऊन श्रीसन्निध बसतांच, स्वामीमहाराजांनीं **वरील 'गोविंदराव ब्रह्मखेत्री यांचा चेहरा पहा,'** म्हणून डॉक्टर आत्माराम यांस आज्ञा केली. यावेळेस गोविंदरावांची प्रकृति चांगली इतर मनुष्यासारखी होती. डॉक्टरानें तपासणी करितां गोविंदरावास कांहीं रोगाची भावना झाल्याचें दिसलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं गोविंदरावास एका महारोगाचा आजार उत्पन्न झाला, तेव्हां डॉक्टरास, जें महाराजांनीं "**चेहरा पहा**" म्हणून म्हटलें होतें त्याचा अनुभव आला. परंतु सदरहू गृहस्थाचे दुर्भाग्यामुळें त्यांस श्रीसमर्थांची सेवा घडली नाहीं. यामुळें त्या रोगांतच त्यांस जन्मभर रहावें लागलें.

## भजनी नाना बुवा तांदुळवाडीकरांचें भजन रंगांत आलेवर पांडुरंग दर्शन.

आपल्या भक्तांचें मनोगत जाणून तदनुसार त्यांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीं समर्थ तसतशीं रूपें घेत. एका प्रेमळ भक्तास श्री पांडुरंगदर्शन समर्थांनीं दिल्याबद्दलची हकीकत अशी आहे :—

सातारा प्रांतांतील प्रसिद्ध भजनीबुवा नानाबुवा तांदुळवाडीकर हे पंढरीस श्रीविठोबाच्या वाऱ्या नेहमीं करीत असत. त्यांची त्या प्रांतांत भजनाची चांगली प्रख्याति होती. हे बुवा प्रेमळभक्त असून, यांस दैविक साक्षात्कारही झाला होता. सदरहू बुवांनीं श्रीदत्तअवतार स्वामीमहाराज अक्कलकोटास भक्तजनांसाठीं वास करीत आहेत, अशी कीर्ति ऐकून एकवार श्रीचें दर्शन घ्यावें, या हेतूनें ते अक्कलकोटास आले. ते गणपतराव जोशी संगमेश्वरकर यांचे घरीं उतरले होते. या वेळेस चोळाप्पाचे घरीं श्रीसमर्थांची स्वारी होती. नानाबुवांनीं समर्थचरणीं मोठ्या प्रेमभावानें वंदन करून, ते खालीं बसले. व त्यांनीं तें अद्भुत दिव्यतेज व आजानुबाहू मूर्ति निरीक्षण करून, त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु गळूं लागले. या प्रमाणें चित्ताचें समाधान करून, बुवा श्रीचरणीं पुनः नमन करून, आपले बिऱ्हाडीं आले. ते अक्कलकोटास ७।८ दिवस होते. एके दिवशीं बुवांचे मनांत श्रीसमर्थांपुढें आपण भजन करावें असें आलें; परंतु स्वामीमहाराज बसतील कीं नाहीं ही त्यांस काळजी वाटली. परंतु इकडे हा त्यांचा प्रेमभाव श्रीसमर्थांनीं जाणून लागलीच स्वारी गणपतराव जोशी यांचे घरीं येऊन बसली. आपण ज्या चिंतेंत होतों ती चिंता समर्थांनीं आपण होऊन निवारण केली, हें पाहून त्या भजनीबुवांस

मोठा आनंद झाला. व त्यांनीं लागलीच मृदंग, वीणा वगैरे आणवून भजनास प्रारंभ केला. त्यावेळेस स्वतः बुवा प्रेमळ, भजनी व भजन सर्वोत्तम करणारे, आणि पुढें श्रीसमर्थांची स्वारी विराजमान झालेली, मग त्या आनंदास काय विचारावें! इतक्यांत एक मोठा चमत्कार घडून आला तो असा कीं, भजनाचा ऐन रंग जमून गेला आहे, सर्व श्रोते जन प्रेमरसांत बुडून गेले आहेत, इतक्यामध्यें नानाबुवा अगदीं तटस्थ होऊन उभे राहिले. त्यांच्या दोन्ही डोळ्यांतून प्रेमाश्रुपात होत होते. अशा स्थितींत ते सुमारें एक घटकाभर उभे राहिले. नंतर समाधि उतरल्यावर त्यांनीं कांहीं वेळ भजन करून भजनाची समाप्ति केली व श्रीसमर्थांस आरती ओवाळून पादारविंदीं नमन करून ते खालीं बसले. बुवा खालीं बसल्यावर त्यांस गणपतराव जोशी यांनीं आपण एक घटकाभर तटस्थ कां उभे होतां, तें कृपा करून सांगावें, म्हणून प्रार्थना केली. तेव्हां बुवांनीं त्यांस सांगितलें कीं, निम्मे भजन झाल्यावर श्रीसमर्थांनीं आपलें हें स्वरूप अदृश्य करून, सांवळी मूर्ति पीतांबर परिधान केलेली, कटीवर दोन्ही हस्त ठेविलेली, मस्तकीं मुकुट, कर्णीं कुंडलें धारण केलेली, अशी श्रीपांडुरंगमूर्ति मला दिसूं लागली. तें तेजःपुंज मनमोहन रूप पाहून माझी वृत्ति अंतर्मुख होऊन समाधि लागली. माझें देहभान नाहींसें झालें; पुढें कांहीं वेळानें देहावर वृत्ति आली तेव्हां मीं पुनः भजन चालू केलें. श्रीस्वामीराय प्रत्यक्ष दत्तावतार आहेत, भक्तजनांचे उद्धारार्थ हा मानवी शरीरसंबंध ठेवून आम्हां मूढजनांचें तारण करीत आहेत, यांत संदेह नाहीं. याप्रमाणें श्रीपांडुरंगदर्शन झाल्यावर, नानाबुवा आणखी कांहीं दिवस तेथें राहून, त्यांनीं मनोभावें स्वामीरायांची सेवा केली, व आज्ञा घेऊन नंतर आपले गांवीं गेले. अशा समर्थांच्या अनेक लीला होत्या.

## पुण्याचे माटेबुवांचें भागवत सप्ताहाचें पुराण महाराजांनीं सात दिवस श्रवण केलें.

पुण्याचे प्रसिद्ध माटेबोवा वेदांती हे महाराजांचे मोठे भक्त होते. महाराज अवतारी असल्याबद्दल त्यांचे मनाची पूर्ण खात्री होऊन श्रीदत्तरूप समजून माटेबोवा महाराजांची भक्ति करीत. महाराजांचीही पुढें बोवांवर कृपा झाली. ॥ **ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं** ॥ याप्रमाणें महाराजांची कृति होती. माटेबोवा हे श्रीसखारामबोवा आनगांव कवाडकर यांचे शिष्य होते. पुढें माटेबोवा हमेष अक्कलकोटास येऊन श्रीचे सन्निध वास्तव्य करीत असत.

ते मोठे वेदांती असून कीर्तनांत वेदांतविषयाचें उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन करीत असत. यांची पुणें प्रांतांत प्रसिद्धि असून त्यांचें शिष्यमंडळही मोठें होतें. रामकृष्णबोवा पुराणिक असून पुराण सांगण्याविषयीं त्यांची मोठी प्रख्याति होती. त्यांच्यावर महाराजांचें प्रेम असे. पुराणिक बोवांनीं अक्कलकोटास एक वेळ भागवताचा सप्ताह केला. तेव्हां सात दिवस एकसारखें बसून महाराजांनीं पुराण श्रवण केलें. याप्रमाणें महाराज एकसारखे बसून पुराण श्रवण केल्याचें हें एवढेंच उदाहरण आहे. यावरून हे माटे खरे भक्तिमान् व तत्त्वज्ञानी होते यांत शंका नाहीं. कोणी विद्वान् गृहस्थ आल्याचें महाराजांजवळ कोणी सांगितल्यास "**विद्वान् कसचे गळेकापे आहेत.**" असें महाराज म्हणत आणि अनुभवावरून असेंच दिसतें कीं विद्वत्ता आंगीं जास्ती झाली म्हणजे भक्तिमार्ग व तत्त्वविचार दूर होऊन वादविवादांचीच आंगीं घमेंड येते. वामन पंडिताचे उदाहरणावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येईल. सत्पुरुषाची गांठ पडून ज्ञानगंगेचे प्रवाहास वळण मिळून त्याचा ओघ बोधवृत्तीकडे जाऊं लागेपावेतों, पाखंड दरडीखालीं उदक पडून अज्ञानसिंधूस जाऊन मिळे. पण सद्‌गुरुकृपा अगाध आहे! हिमालयावर परमहंसरूपानें भगवंतानें वामन पंडितास कृतकृत्य केलें. एक वेळ माटेबोवा यांचे कीर्तनाचा खास बागेंत थाट चालला होता. शेंकडो लोक कीर्तनास बसले असून श्रीस्वामीसमर्थास समोर उंच सिंहासनावर बसविलें होतें. निरूपण करतांना, "या भवसमुद्रापासून कोणते चरण आम्हांस पार करतील?" अशी उक्ति बोवांचे मुखांतून निघाली. त्याचें उत्तर बोवांनीं देण्यापूर्वीच श्रीस्वामींनीं आपला सव्य चरण खालीं सोडला. त्यासरसे बोवा सद्गदित अंतःकरणानें धांवत महाराजांचे सन्निध जाऊन प्रेमानें श्रीचरण पोटाशीं आवळून धरिला. व हेच चरण भवसमुद्रांतून तारण्यास समर्थ आहेत म्हणून सर्व श्रोतृसमुदायास बोवांनीं कथन केलें. तितक्यांत महाराजांनीं दुसरा पाय खालीं सोडला. तो बाळाप्पा सेवेकरी यांनीं आपल्या हृत्कमळीं धरिला. या प्रमाणें महाराजांचें खरें वैभव खरे भक्तच जाणत असत.

## आबाजी बोवा तळवडकर–उपड्या घड्यावर पाणी.

तळवडकर आबाजीबोवा नांवाचे रामदासीबोवा श्रीस्वामीचे निस्सीम भक्त झाले होते. हे मोठे वेदांती असून कीर्तनाविषयीं त्यांची मोठी कीर्ति होती. सोलापूर प्रांतांत त्यांचे कीर्तनाची फार प्रसिद्धि होती. महाराजांची कीर्ति ऐकून ते अक्कलकोटास दर्शनास आले. मन शुद्ध नसून विद्वत्तेची आंगांत फार गुर्मी

होती. महाराजांचे मनांत कोणास दर्शन देण्याचें नसल्यास दोन दोन दिवस दर्शन देत नसत. आबाजीबोवा सायंकाळचे चार वाजतां दर्शनास आले. महाराज निद्रिस्त असल्यानें बोवा महाराज उठण्याची वाट पहात बसले. पांच वाजले, सहा वाजले, तथापि महाराज उठेनात. बोवा दर्शनाकरितां तळमळ करूं लागले. जवळचे सेवेकऱ्यांनीं बोवास सांगितलें कीं, तुम्हांस दर्शन देण्याचें महाराजांचे मनांत नसल्याचें दिसतें. तुम्ही आतां जा. बोवा हट्टास पेटले, व दर्शन घेतल्या-वांचून आपण साफ जाणार नाहीं, म्हणून त्यांनीं जाब दिला. महाराजापुढें कोणाचा हट्ट चालणार, सात वाजले, आठही वाजले, तरी महाराज उठले नाहींत तेव्हां कंटाळून बोवा बिऱ्हाडीं गेले. ते गेल्याबरोबर महाराज उठून बसले. त्यांस निद्रा कसची ? बोवास दर्शन देण्याचें नसल्यानें ते निद्रिस्त राहिले, एवढेंच. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं महाराज उठले ते एका उकीरड्यावर जाऊन बसले. बोवा येईपावेतों तेथेंच होते. बुवानें येऊन दर्शन घेतलें, तितक्यांत **"अरे दोन घागरी घेऊन या,"** म्हणून महाराजांनीं सेवेकऱ्यांस सांगितलें. त्याप्रमाणें घागरी आल्यावर त्या बोवापुढें पालथ्या घातल्या. त्या कृतीनें **"उपड्या घड्यावर पाणी,"** या म्हणीचा अर्थ महाराजांनीं बोवास स्पष्ट करून दाखविला. **॥ व्यर्थ भाराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥** जोंपावेतों मनाची एकाग्रता होऊन परमेश्वर स्वरूपीं ध्यान लागलें नाहीं, व जोंपावेतों आपण तोंडानें लोकांस उपदेश करतों काय याची ओळख स्वतःचे अंतःकरणास नाहीं, तोंपावेतों आपण केलेलें वाक्पांडित्य व पालथ्या उड्यावर पाणी दोन्ही सारखींच होत, हें महाराजांनीं बोवास सुचविलें. बोवाचे मनांत ओळख पटावी अशा तऱ्हेच्या कांहीं दुसऱ्याही गोष्टींची खूण पटवून आपल्या अंतरसाक्षित्वाबद्दल त्याची खात्री केली. बोवा सुज्ञच होता, महाराजांचे कृतीचा आशय मनांत समजून त्यानें आपली स्थिति सुधारली, व पश्चात्ताप पावून, महाराजांचे चरणीं लीन झाला. पंधरा दिवस महाराजांसन्निध राहून त्यानें श्रीस्वामींची कृपा संपादन केली. नित्य कीर्तन करीत असे. महाराज फिरत फिरत शिरोळ गांवीं गेले. तेथें आबाजी-बोवा यांनीं आपल्या गुरूची पुण्यातिथि केली. महाराज त्या दिवशीं भोजनास तर गेले नाहींतच, पण त्यांनीं स्नानही केलें नाहीं. त्यांची लीला तेच जाणोत. दुसरे दिवशीं सांगवी गांवीं जाऊन महाराज जेवले. पुढें बोवांनीं महाराजांची प्रार्थना करून प्रसाद मागितल्यावरून आपल्या खडावा त्यास प्रसाद दिला. भक्तिपूर्वक पूजाअर्चा करून बोवा आनंदानें राहिले. अशा समर्थांच्या अनंत लीला होत्या.

# पुण्याचे रामानंद महाराज बीडकर.

श्रीरामानंद बीडकर हे सराफीचा व गंध्याचा धंदा करून पुणें येथें रहात असत. नंतर त्यांनीं किमयेचेंहि ज्ञान करून घेऊन आपला चरितार्थ उत्तम रीतीनें थाटला होता.

एकदां त्यांची व एका साधूची गांठ पडून त्याजकडे जाणें येणें सुरू झालें. परंतु त्यांचें समाधान होईना. कारण त्यांना शब्दज्ञान नको होतें. आपल्याकडून त्यांचें समाधान होणार नाहीं असें वाटतांच, "वैराग्य पाहिजे; त्याशिवाय व्यर्थ आहे. आपण ऐषआराम करावा, आपण परमार्थाला लायक नाहीं." असा सर्व मंडळींनीं बीडकरांवर स्पष्ट शेरा मारला. ती गोष्ट बीडकरांचे अंतःकरणाला लागली, व त्यांचेकडून लायक म्हणून घेईन अशी त्यांनीं त्या दिवशींच प्रतिज्ञा केली. ते दृढनिश्चयी व करारी होते. कोणीहि अमुक गोष्ट होणार नाहीं म्हटलें म्हणजे त्यांना चीड येत असे, व ती गोष्ट करून दाखविल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

आपण प्रतिज्ञा केली व बोलून चुकलों; पण तें घडावें कसें व विषय सुटावे कसे? कोणी झाला तरी जास्त सुख दिसल्याशिवाय हातचें सुख दवडण्यास राजी नसतो. विचार करून शेवटीं आपलें आराध्य दैवत वायुसुत मारुति रायांची उपासना, पूजाअर्चा, इनुमान कवचाचे पाठ व उपोषणें सुरू केलीं; व रात्रंदिन, 'मारुतिरायच आपली प्रतिज्ञा खरी करील,' असा ध्यास घेतला. अशा रीतीनें कांहीं दिवस सेवा घेतल्या नंतर "अक्कलकोटच्या स्वामींच्या दर्शनास जावें." असा त्यांस दृष्टांत झाला, व बीडकरांनीं एकदम अक्कलकोटचा रस्ता धरला.

अक्कलकोटास पोहोंचल्यावर श्रीस्वामी महाराज राजवाड्यांत आहेत व तेथून ते लवकर परत येणार नाहींत असें त्यांस कळलें. श्रीस्वामींचें दर्शन घेतल्या शिवाय अन्नग्रहण न करण्याचा त्यांनीं निश्चय केला. दोन दिवस झाल्यावर श्रीस्वामी राजवाड्यांतून बाहेर आले. त्यांस कळलें. त्यांनीं लागलीच स्नान करून पोषाख केला व श्रीफळ, उदबत्ती, पुष्पाहार व अत्तरें वगैरे घेऊन ते श्रीस्वामींच्या दर्शनास गेले. पूजा समर्पण करून श्रीस्वामींच्या पायां पडले. "तेव्हां कायकू पाया पडते?" असें स्वामीमहाराज म्हणाले. त्यावर "पाया मजबूत पाहिजे," असें बीडकरांनी उत्तर दिलें. तेव्हां श्रीस्वामींनीं बोट दाखवून, "उदर देख, उदर देख," म्हणून बोट दाखविलें. बीडकरांनां खुंटीला अडकलेलें हरणाचें कातडें दिसलें. त्यावर बसून योगाभ्यास करावा असें सूचित

केल्याचें बीडकरांनीं ताडलें. परंतु श्रीस्वामीरायांचा हेतु नक्की समजेना म्हणून ते, 'अज्ञानी आहें' म्हणाले. तेव्हां, 'कायका अज्ञान' असें म्हणून श्रीस्वामीराज रागावले व शिव्यांस सुरवात झाली. शंकर बैठा ××× विष्णु बैठा ××× हनुमान बैठा ××× अशा रीतीनें शिव्यांस सुरवात झाली. 'लिंग तो शंकर पूजता है, ओ कुच अज्ञान है कीं सज्ञान है,' असें बीडकर म्हणाले. त्यावर महाराज फारच रागावले व पूर्वीपेक्षां दुप्पट अवसान आणून मोठ्यानें शिव्या सुरू झाल्या. हें पाहून सुंदराबाई व चोळाप्पा जवळच बसली होती, त्यांनीं बीडकरांस दूर करून, 'आपण गृहस्थाश्रमी आहां. श्रीस्वामींचा कोप झाला तर सर्वस्वी नुकसान होईल' असें सांगितलें, पण बीडकर बाजूस होईनात. शेवटीं शिव्या देणें बंद होऊन, 'अभी ह्यांसे चले जाव तुमारा काम होगया है.' असा हुकूम होतांच बीडकर आपले बिऱ्हाडीं आले व तसेच पुण्यास निघून गेले.

श्रीस्वामीरायांचे दर्शनानें बीडकरांचे वृत्तींत एकदम फरक पडला व 'श्रीगुरुराय माउली' म्हणण्याचा त्यांना एकसारखा चाळा लागला. अशा रीतीनें एक वर्षपर्यंत भजनांत गेल्यानंतर दुसऱ्या वर्षी माघ शुद्ध पौर्णिमेस ते पुन्हां श्रीस्वामीरायांचे दर्शनास आले तेव्हां, "**आंबेका पाड लगा है, पुरा होयगा तो काम हो जायगा,**" असें श्रीस्वामी माउली म्हणाले. त्या खेपेस दुसरें कांहीं विशेष झालें नाहीं; तरी बीडकरांचा पूर्वीचा क्रम चालूच होता. नंतर पुन्हां एक वर्षानें माघ शुद्ध पौर्णिमेस गुरुवारीं ते श्रीस्वामी महाराजांचे दर्शनास गेले, व रीतीप्रमाणें पूजा समर्पण करून ह्या खेपेस श्रीस्वामींचा उपदेश होईपर्यंत सेवेला राहण्याचा त्यांनीं निश्चय केला. रात्रौ स्वामींचें पादसंवाहन चाललें असतां पहांट झाली तरी स्वामींनीं, "पुरे" असें म्हटलें नाहीं; इतकेंच नव्हें, तर परीक्षा पहाण्याकरितांच कीं काय, पादसंवाहन चाललें असतां एकाएकीं स्वामींच्या दोन गुडघ्यांमधून एक नाग बाहेर पडला व फडा वर करून समोर उभा राहिला व बीडकरांच्या अंगावर फूत्कार करूं लागला. तरी त्यांनीं पाय सोडले नाहींत असें पाहून श्रीस्वामीराज एकदम उठून बसले व रागानें, "**तूं बडा राक्षस जिंद है.**" असें रागानें म्हणाले. तेव्हां मात्र बीडकर घाबरले व कर्णाचें उदाहरण लक्षांत येऊन आपणांस शाप होतो कीं काय अशी धास्ती उत्पन्न झाली. परंतु तसे कांहीं झालें नाहीं. उलट त्यावेळींच बीडकरांस उपदेश झाला, "जिंद राक्षस निकल जाव ह्यांसे," असें म्हणून त्या झपाट्यांत श्रीस्वामीरायांनीं बीडकरांस एक थप्पड दिली. त्या सरशीं ते गुंगी येऊन खालीं पडले. इतक्यांत एक संन्याशी लहानपणापासून हटयोग शिकण्याकरितां

राहिले होते ते हुक्याची वेळ झाली सबब हुक्का घेऊन आले व श्रीस्वामी माउलीस हुक्का देऊन बीडकरांस आपल्या ठिकाणीं घेऊन गेले. पुढें दुसरे दिवशीं पहांटे बीडकर शुद्धीवर आले त्या वेळचा त्यांचा आनंद अवर्णनीय होता. बीडकर आनंदित मुद्रेनें पुन्हां दर्शनास गेले असतां 'अबी क्या तेरे बाप का देना लेना है, सेवा बनाव,' अशी आज्ञा झाली व एक सहस्र भोजन घालण्याची आज्ञा झाली. तिसऱ्या खेपेस स्वामींच्या दर्शनास जातांना सर्व तऱ्हेचीं अत्तरें मिळून सुमारें एक हजार रुपयांची एक अत्तराची पेटी घेऊन कुर्डुवाडी स्टेशनवरून घोडा करून बीडकर अक्कलकोटीं निघाले. वाटेंत घोडा बुजून घोड्यानें धांव घेतली व अत्तराची पेटी खालीं पडून ती दोरीनें बांधलेली असल्यामुळें घोड्या बरोबर आपटत फुटत गेली व आंतील सर्व कुपीनकुपी फुटून सर्व जिनसांची नासधूस झाली. तेव्हां बीडकरांस वाईट वाटलें. परंतु स्वामींच्या दर्शना विषयींचें प्रेम कमी झालें नाहीं.

## सहस्र भोजनाचे खर्चाची भरपाई.

अक्कलकोटास पोहोंचल्यावर जवळ पैसा नसलेमुळें सहस्र भोजन, कसें घालावें त्याबद्दल त्यांस काळजी पडली. पण श्री स्वामी कृपेनें त्यांस त्यावेळचे राजाचे कारभारी यांजकडून मदत मिळाली; व वाण्याकडून भोजनाचें सर्व साहित्य मिळवून श्रीस्वामींचे आज्ञेप्रमाणें सहस्र भोजन घातलें व फुटलेल्या अत्तराचे कुप्यांतून अत्तर मिळवून राजास अष्टगंध हवे होते तें तयार करून दिले व वाण्याचे पैशांची भरपाई केली. ब्राह्मणास भोजन दक्षणा स्वतःजवळील पैशाने दिली.

## गुरुदक्षिणा.

सहस्रभोजन आटोपल्यावर, "**हमारेकु भोजन तो दिया, लेकिन दच्छिना नहि दिया.**" असें म्हणून, "अबी दच्छिना होना." असें स्वामी महाराज म्हणाले व बीडकरांकडे पाहून, "**बच्चा, अब्बी कित्ती गुरुदच्छिना देएगा, बहोत देएगा?**" असें म्हटलें असतां, "आज्ञा प्रमाण" असा स्वामींस होकार दिला. परंतु श्रीस्वामीराय नुसत्या होकारावरच थांबले नाहींत. "**अब्बी झूटा क्या बोलते है, तेरेसे दच्छिना नहि दिये जायगी, देना तो वचन दे देव**" असें म्हणून हात पुढें केला. व बीडकरांपासून हातावर तीनदां वचन घेतलें. संपत्तीचाच झरा बंद होईल असें

बीडकरांस वाटले नाहीं व "काय आज्ञा आहे ?" म्हणून विचारलें असतां "**तूं जो जडीबुट्टीचा अथवा किमयेचा उद्योग करतोस तो आजपासून बंद. पुढें करूं नये,**" अशी गुरुदक्षणा मागितली व ती त्यांनीं दिली. तेव्हां ज्यावर आपण आजवर चैन मारली, ज्यावर आपणास मानमान्यता मिळाली व राजाप्रमाणें उपभोग मिळाले व त्यामुळें आपण बेफिकीरीनें वागलों तो संपत्तीचा झराच एकदम बंद पडला ह्याबद्दल बीडकरांस काय वाटलें असेल याची कल्पना करणें अशक्य आहे. परंतु, "गुरुआज्ञा प्रमाण." असें म्हणून तसें करण्याचें श्रीस्वामींस वचन दिलें. परंतु मी करणार नाहीं तरी मी शिष्य तयार करीन असें बीडकर म्हणाले. त्यावर, "झाला तर कर." असें स्वामींनीं उत्तर दिलें. स्वामींनां गुरुदक्षिणा दिली त्या विद्येकरितां शिष्य तयार करण्याचा प्रयत्न केला असतांहि, दग्धबीजा प्रमाणें अंकुर फुटला नाहीं, व पुढें बीडकर त्या भानगडींतहि पडले नाहींत. तसेंच परमार्थ विद्या ही मी दुसऱ्याला सांगेन असें बीडकर म्हणाले असतां, 'राम्या, भूक लागल्याशिवाय जेऊं घातलें असतां चीज होणार नाहीं. अन्नाचा चिवडा होईल,' असें श्रीस्वामीराज म्हणाले. त्यावर, 'भुकेलेल्याला कोणीहि देईल,' असें बीडकर म्हणाले.

बीडकर चौथे खेपेस श्रीस्वामीरायांचे दर्शनास गेले असतां, "**तूं पुन्हा अक्कलकोटास येऊं नये; नर्मदा प्रदक्षिणा करावी,**" अशी श्रीस्वामीरायांची स्पष्ट आज्ञा झाली. नंतर श्री बीडकर पुन्हा अक्कलकोटास गेले नाहींत. महाराजांचे आज्ञेप्रमाणें नर्मदा प्रदक्षिणा करण्याचा त्यांनीं निश्चय केला. इतर यात्रेकरूंप्रमाणें प्रदक्षिणेचे वाटेनें न जातां त्यांनीं आडमार्गानें रानांतून वाट काढली. बीडकर प्रथम ओंकारेश्वरास आले. तेथून ते गोसाव्यांस व बुवा लोकांस भेट देत देत संध्याकाळीं एका झाडींत शिरले, व तेथें धुनी पेटवून रात्रीं तेथेंच मुक्काम करण्याचें त्यांनीं ठरविलें. रात्रीं त्यांस धुनीजवळ कोणी बसलें आहे असा भास झाला, व पहातांत तो एक प्राणी बसला असें त्यांस दिसलें. धुनी पेटवून पहातात तों त्यांस मोठा वाघ दिसला. विजेसारखे चमकणारे गरगरीत डोळे जेव्हां बीडकरांचे नजरेस पडले तेव्हां त्यांचे अंगांतून दरदरून घाम सुटला व त्यांची नजर चळली. तरी न डगमगतां वाघाचे डोळ्यास डोळा भिडविला. तेव्हां तर पंचानन फारच बिथरले, व डुरकण्यावर डुरकण्या फोडीत इतस्ततः फेऱ्या घालूं लागले व बीडकरांचे अंगावर उडी टाकण्याचाहि आव आणला. तेव्हां बीडकरांनी श्रीस्वामीरायांचा धांवा सुरू केला. अखेरीस धुनीवरून उडी मारून, डुरकण्या फोडीत फोडीत जेव्हां वाघोबांनीं

आपला मार्ग सुधारला, तेव्हां सद्गुरुस्वामींची आठवण होऊन त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहूं लागले, व आपण धन्य आहोंत असा आत्मविश्वास उत्पन्न होऊन, निर्भय तेथेंच ते पडून राहिले. पुढें असेच आडमार्गांनीं जातां जातां एका भिल्लानें त्यांना मोठ्या अजगराचे तडाक्यांतून सोडवण्याकरितां धांवून अन्य रस्त्यानें सुरक्षित स्थळीं नेलें. एकदां संध्याकाळ होऊं लागली, व गांवचा रस्ता त्यांस सांपडेना, तेव्हां एक लांडगा त्यांचे मागे लागला, व त्यानें त्यांस गांवाजवळ सोडून आपण पळून गेला. एके गांवीं श्रीनर्मदामायींनीं त्यांस प्रत्यक्ष दर्शन देऊन दुग्ध दिलें. बीडकर महेश्वरगांवीं असतां श्रीस्वामीमहाराजांचे निर्याणाची बातमी त्यांस कळली. ही बातमी ऐकतांच सबंध दिवस बीडकर फार अस्वस्थ झाले; तेव्हां श्रीस्वामीरायांनी बीडकरांस स्वप्नांत दर्शन देऊन, **'मी देह सोडला, तरी गेलों नाहीं. जिवंत आहे,'** असें सांगून, "ओंकारासच म्हणजे जेथून प्रदक्षिणा सुरू केली तेथेंच प्रदक्षिणा पुरी करावी," अशी आज्ञा केली. नंतर पंथा म्हणून महेश्वरापासून तीन चार मैलांवर ओंकारेश्वराजवळ गांव आहे, तेथें मुक्काम केला. नर्मदा ओलांडून ओंकारेश्वरीं आले.

बरेच काळांत त्यांचेकडून पत्र नाहीं म्हणून त्यांचें कुटुंब त्यांचे शोधार्थ निघालें व प्रत्येक टप्प्यावर चौकशी केली, पण प्रत्येक ठिकाणीं ते सुरक्षित आहेत व ते पुढें गेले असें समजलें. जातां जातां त्या फत्तेगिरी बुवांच्या मठाशीं आल्या. तेव्हां बीडकर परत फिरले व ओंकारेश्वरीं आपणांस भेटतील असें बुवांनीं सांगतांच त्या ओंकारेश्वरीं परत आल्या व ब्रह्मचाऱ्याचे मठांत बीडकरांची व त्यांची भेट झाली. नंतर बीडकर सहकुटुंब पुण्यास आले, व आपला नित्य कार्यक्रम सुरू केला. त्यांनीं पुष्कळ शिष्यगण तयार केला व पुण्यास मठाची स्थापना केली. पुढें मूळव्याधीच्या विकारानें रक्त पडूं लागणें व गुदद्वार बाहेर पडणें, ह्यामुळें हैराण झाले; व अशा रीतीनें कांहीं काळ स्वास्थ्यांत, तर कांहीं काळ दुखण्यांत काढून ते तारीख १ एप्रिल १९१३ रोजीं स्व–स्वरूपी लीन झाले!

## कैवल्याश्रम स्वामी ऊर्फ बोटे स्वामी.

[श्री. काशीनाथ यज्ञेश्वर जोशी रा. होडवाड, जि० बेळगांव (व्हाया बैलहोंगल) यांनीं ता. १–९–१९५६ रोजीं पाठविलेली माहिती खालीं दिली आहे. त्यावरून महाराजांचें अंतर्ज्ञान व भक्तांवरील प्रेम उत्कृष्टपणें दिसून येईल.]

श्रींच्या अंतर्ज्ञान निदर्शक गोष्टीशीं ज्या महात्म्यांचा संबंध येणार आहे, त्यांजविषयीं आधीं वाचकांच्या माहितीकरितां चार शब्द लिहिणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. उत्तर कर्नाटकांत सुप्रसिद्ध होऊन गेलेले, मोठे भगवद्भक्त आणि परमार्थाचे थोर अधिकारी परमहंस श्री कैवल्याश्रमस्वामी ऊर्फ बोटेस्वामी हे आज पंचेचाळीस वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांच्या पूर्वाश्रमाचे नांव 'राम' असें होतें. बाळपणींच परमार्थाकडे त्यांचा कल होता. तेव्हां त्याच तऱ्हेचे खेळ ते खेळत; एकाग्रमनानें पुराण व साधु-संतांच्या गोष्टी ऐकत तेव्हांच श्री चिंदबर भक्तीचा छंदही त्यांना लागला होता. त्यांनीं आपलें उभें आयुष्यच शिवचिदंबरेश्वराच्या सेवेंत घालविलें. विशेषतः आश्रम घेतल्यानंतर गुर्लहोसूर येथील त्या देवाच्या देवळाचा जीर्णोद्धार केला; आणि आपल्या अवसान काळापर्यंत म्हणजे वीस वर्षें त्या देवांचे आगमोक्त महोत्सव केले. भक्तीचा प्रसार; आणि धर्माचा प्रसार यांतच आपलें जीवन व्यतीत करून शके १८३३ सालीं श्री चिंदबर स्वरूपीं लीन झाले. ह्या स्वामींनीं आपल्या बालपणीं दोनदां श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला. त्यावेळीं श्रींनीं त्यांच्या विषयीं आपल्या अलौकिक अंतर्ज्ञानानें ज्यागोष्टी जाणल्या त्या या खालीं प्रसंगासह देत आहोंत.

स्वामी हे लहानपणीं नोकरीनिमित्त मुरगोड येथें आपल्या वडील बंधूजवळ रहात होते. ते सुमारें चौदा वर्षांचे असतांना एके दिवशीं मंडळींत बोलत बसले असतां श्री अक्कलकोट स्वामी विषयीं गोष्टी निघाल्या. त्याकाळीं त्यांची धवलकीर्ति शिशिर ऋतूंतील पूर्णचंद्राच्या चांदण्याप्रमाणें भक्तांना आल्हादकारक होऊन पसरली होती. तेव्हां प्रत्येकानें त्यांच्याविषयींचे आपण पाहिलेले व ऐकलेले अनेक अद्भुत चमत्कार सांगितले. स्वामींचे वडीलहि त्यांचे लोकोत्तर चमत्कार केव्हां केव्हां सांगत असत. स्वामींच्या पारमार्थिक मनावर त्यांचा इतका परिणाम झाला कीं, एक वेळ तरी अशा सत्पुरुषाचें दर्शन आपण घेतलेंच पाहिजे, असा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. आपला निश्चय वडिलांना कळविल्यास, ते मुळींच सम्मति देणार नाहींत, म्हणून एक पत्र लिहून तें वडिलांस देणें करितां आपल्या धाकट्या बंधूंजवळ दिलें; व लगेच आपण कोणालाहि न कळवितां सरळ अक्कलकोटची वाट धरिली.

वय लहान, प्रवासाचा अनुभव नाहीं, जवळ पुंजी नाहीं, आणि पायीं प्रवास ह्यामुळें वाटेंत अतिशय त्रास सोसावा लागला. तरीहि दर्शनोत्सुकता प्रबळ; म्हणून

त्यांना त्याची खंत वाटली नाहीं. जातांना वाटेंत हिपरगी येथील श्रीमार्तंडभैरवाचें आणि गाणगापूर येथील श्रीदत्तात्रेयाचें दर्शन घेऊन ते पुढें निघाले.

## अलौकिक अंतर्ज्ञान.

" अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः। तस्याहं सुलभः " म्हणून भगवंतांनीं भक्तांस आश्वासन दिल्याप्रमाणें तसेंच नामधारक भक्तांस श्रीनरसिंह सरस्वतिस्वामींनीं स्वप्नांत दर्शन दिल्याप्रमाणें, अनन्यमनानें श्रींचें चिंतन करीत चाललेल्या बोटे स्वामींना अक्कलकोटच्या वाटेवरील एका खेड्यांत श्रीनीं स्वप्न-दृष्टांत दिला. स्वप्नांत दिगंबर स्वरूपी एका यतीचें दर्शन झालें. लगेच स्वामींनीं दंडवत नमस्कार घातला. इतक्यांत, त्या यतीचें एका श्यामवर्ण सुंदर बालकांत रूपांतर झालेलें दिसलें. जणूं श्रींनी चिदंबर आणि मी एकच आहों असें पर्यायानें दर्शवून, स्वामींच्या तोंडांत आपली जीभ घातली. लगेच स्वामी जागे झाले. त्या बालकाची नितांत दर्शनोत्सुकता आणि एकाग्र मनाचें चिंतन जाणूनच श्रींनी त्यांना स्वप्नांत दर्शन दिलें, असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं.

अक्कलकोटला गेल्यावर रिक्तहस्तानें महात्म्यांचें दर्शन घेऊं नये ह्या आप्त-वाक्याप्रमाणें स्वामींनीं दोन पैशांचा पेढा घेऊन श्रींच्या भेटीस गेले. त्यावेळीं श्री अर्धोन्मीलित अवस्थेंत स्वानंदामध्यें निमग्न होते. आजानुबाहू, तेजःपुंज आणि नग्नावस्थेंत स्वप्नांत दिसलेली भव्यमूर्तीच प्रत्यक्ष दिसल्यावर सानंदाश्चर्यानें स्वामींचें भानच हरपलें. लगेच साष्टांग नमस्कार करून, " देवा! आपल्या पवित्र चरणांचें दर्शन घ्यावें या उत्कंठेनें सन्निध आलों आहें. आपले पावन पाय पुढें करून या दीन दासावर कृपा करावी." अशी मनोमय प्रार्थना केली. पेढा अर्पण करणें त्यावेळीं त्यांच्या ध्यानांत आले नाहीं. तेव्हां श्रींनीं एकदम स्मृतीवर आल्याप्रमाणें करून आपले पाय पुढें करीत स्मित हास्यानें उद्गारले,

## " बेटा, पेढा लाव."

इकडे मुरगोड मुक्कामीं घरची मंडळी दोन चार दिवस झाले तरी मुलगा घरीं आला नाहीं म्हणून काळजींत तपास चालविला होता. तेव्हां धाकट्या भावानें पत्र दिल्यावरून मुलानें अक्कलकोटची वाट धरिली हे त्यांनां कळलें. लगेच मुलाला घेऊन येण्याकरितां त्यांचे वडील अक्कलकोटास जाणेकरितां निघाले. तेथें पोहोंचल्यावर श्रींचें दर्शन घेऊन, आपल्या मुलाविषयीं मठांत व गांवांत

सगळीकडे तपास केला, तरी मुळींच पत्ता लागेना. तेव्हां खिन्न मनानें तेथेंच बसून मनांत संकल्प केला कीं, श्रींच्या कृपेनें आपला मुलगा भेटला तर, आठ आण्यांची साखर आणून श्रींच्या नांवानें वाटूं. इतक्यांत समोरून श्री चिदंबर नामस्मरण करीत येत असलेला आपला मुलगा दिसला. दोघेंहि एकमेकांस प्रेमानें कडकडून भेटले. नंतर संतुष्ट मनानें श्रींच्या दर्शनार्थ निघाले.

तेव्हां श्री एका मैदानांतील वटवृक्षाखालीं मंचकावर पूर्वाभिमुख होऊन बसले होते. अंगांत काषायवस्त्र व लंगोटी, गळयांत रुद्राक्षांची माळ, यानें त्यांच्या सौंदर्यांत भर पडली होती. स्मित हास्यानें मुख झळकत होतें. तेजस्वी अशा भव्य मूर्तीस पाहून, आनंदातिशयानें चरणांवर मस्तक ठेवून, त्या पिता-पुत्रांनीं अत्यंत नम्रभावानें वंदन केलें; जवळच पुराण चालले होते तेथें जाऊन श्रवण करण्यास बसले.

श्रींची कृति दिसण्यांत वेडगळपणाची व विक्षिप्त, आणि त्यांचे तोंडून निघणारे उद्गार असंबद्ध असें वरवर पहाणारांस वाटे. परंतु त्यांचें खरें इंगित फारच अर्थपूर्ण असून थोड्यांनांच कळत असे. पुराण चालू असतां श्रींनीं मधेंच पोथीचें एक पान घेऊन त्याचे नळकांडें करून त्यांतून फुंकले. त्यानें पुराण श्रवण करणाऱ्या बहुतेकांची अशी स्थिति असते म्हणून पर्यायानें दर्शविलें. थोड्या वेळानें ते पिता-पुत्र पुनः एकदां नमस्कार करून निरोप मागत असतां श्रींची स्वारी एकदम-“नवसाची साखर कोठें आहे?” असें मोठ्यानें उद्गारले. तें ऐकून सर्वांस फारच आश्चर्य वाटलें. स्वामींच्या वडिलांना मात्र आपल्या संकल्पाची आठवण होऊन त्यांनीं सर्वांस आपल्या नवसाची हकीकत सांगितली. श्रींच्या अंतर्ज्ञानाबद्दल, सर्वज्ञतेबद्दल पूज्यभावानें नतमस्तक होऊन लगेच साखर आणून श्रींच्या पुढें ठेविली. तेव्हां श्रींनीं एक चिमूटभर साखर घेऊन बाकीची सर्वांनां वांटण्यास सांगितलें. ह्या गोष्टीवरून श्रींच्या अंतःसाक्षित्वाची खूण पटते. सहजच आहे. “एकं विज्ञाते सर्वं विज्ञातं भवति” या उपनिषद्वाक्याप्रमाणें ब्रह्मज्ञान्यांनां जगाच्या कल्याणाकरितांच अवतरलेल्या विभूतींना-अवतारिकांना अज्ञात असें काय आहे?

श्री कैवल्याश्रमस्वामी हे आपल्या पूर्वाश्रमांत वयाचे सुमारें सोळावे वर्षी वडिलांच्या आग्रहामुळें ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षणाकरितां राहिले होते. परीक्षा संपवून सर्टिफिकेट घेऊन घरीं गेल्यावर नोकरीवर जाण्यापूर्वी पुनः एकवार श्रींची भेट घेण्याची त्यांना अनावर उत्कंठा लागली. तेव्हां सर्व देशभर भयंकर दुष्काळ पडला होता.

प्रवास करणें फारच धोक्याचें झालें होतें. त्यामुळें त्यांच्या प्रवासास घरची मंडळी नाराज होती. तरीहि त्यांनीं श्रीचिदंबरावर भार टाकून मनाचा हिय्या करून निघाले. "जया देव तारी, तया कोण मारी," या म्हणी प्रमाणें श्री समर्थांच्या कृपेनें तसल्या विषम परिस्थितींतहि सर्व प्रवास संपवून सुरक्षितपणें अक्कलकोटास पोंचलें.

त्यांना गांवांत श्रींचा तपास कोठेंहि लागेना. निरुपायानें चिंताग्रस्त होऊन एके ठिकाणीं बसतात इतक्यांत श्रींचें दर्शन घेऊन आलेल्या एका गृहस्थाकडून कळलें कीं, श्रींची स्वारी गांवाबाहेर तीन मैलांवर एका झाडाखालीं बसली आहे. एवढें कळण्याचाच आवकाश; लगेच ते त्या ठिकाणीं गेले. तेथें व्याघ्रासनावर बसलेली श्रींची मूर्ति पाहून त्यांना आनंदाचें भरतें आलें. आणि त्यांनीं श्रींच्या पुढें मस्तक नमवून, " भगवान्! भगवद्वचना प्रमाणें चालू युगांत आपण अवतारी पुरुष आहां. आपल्या दर्शनानें कैंक लोकांची पातकें नष्ट झालीं असतील. तरी या दासाचा भाव ओळखून कृपा करून वंदनासाठीं आपले पावन पदकमल पुढें करावें." अशी मनोमय प्रार्थना करतांच, श्रींनीं त्यांच्याकडे स्मित करीत कृपा दृष्टीनें पाहिलें; व आपला उजवा पाय पुढें केला. तेव्हां त्यांनां झालेल्या आनंदाचें वर्णन करणें अशक्य आहे. तान्हें मूल प्रेमभरानें जसें आपल्या आईला बिलगतें, तसें त्यांनीं धांवत जाऊन आपलें मस्तक श्रींच्या चरणकमलावर ठेविलें. आणि बरोबर आणलेले पांच रुपये पुढें ठेविले. श्रींनीं ते रुपये हातात घेऊन इकडे तिकडे घोळवून त्यांना प्रसाद म्हणून परत दिले. त्यावेळीं श्रींच्या मुखांतून भविष्यवाणी निघाली. " १ **पाणी फार खोल आहे भिऊं नकोस.** २ (छातीवर हात ठेऊन) **मी तुझ्याबरोबर येतों,** ३ **लाख, लाख, लाख ब्राह्मण भोजन.**" ही अमोघवाणी ऐकून जवळच्या मंडळींनीं 'तुमच्यावर श्रीची पूर्ण कृपा आहे. हीं वाक्यें तुम्हांलाच उद्देशून आहेत. असें सांगितलें.

पुढें चतुर्थाश्रम स्वीकारल्यावर श्रीकैवल्याश्रम स्वामींनीं गुर्लहोसूर येथें येऊन श्रीशिवचिदंबरेश्वरांचे आगमोक्त महोत्सव वीस वर्षें करतांना आणि त्यानंतर समाधिस्थ जहाल्यावर आज पंचेचाळीस वर्षें त्यांच्या नांवानें चाललेल्या आराधना-महोत्सवांचे वेळीं त्यांच्या बाल्यदशेंत वर्तविलेली वरील भविष्यवाणी विशेषतः त्यांतील लाख, लाख, लाख ब्राह्मण भोजनाची सर्वांच्या प्रत्ययास आली आहे; व येत आहे. कालाच्या महोदरांत दडलेल्या, सामान्य लोकांच्या दृष्टीस अगोचर

असलेल्या अशा भवितव्यास, त्रिकालज्ञानीं महात्म्येच पाहूं शकतात; त्यांना अगोचर असें कांहींच नसतें, हेंच खरें.

अवतारिक विभूति श्रीअक्कलकोट स्वामीमहाराज यांचें अंतर्ज्ञान कसें अलौकिक होतें याविषयीं आणखी एका प्रसंगाची हकीकत देऊन लांबलेला हा लेख संपवितों.

परमहंस श्रीकैवल्याश्रमस्वामी यांच्या पूर्वाश्रमांतील नांव 'राम' असें होतें आणि त्यांना लहानपणींच श्रींच्या दर्शनाची ओढ कशी अनावर झाली होती, त्यामुळें त्यांनीं लांब पल्याचा प्रवास पोटापाण्याची, उन्हातान्हाची व श्रमाची तमा न बाळगतां पुरा करून श्रींचा कृपाप्रसाद कसा मिळविला ह्या गोष्टी यापूर्वी सांगण्यांत आल्या आहेत. प्रथम दर्शन घडल्याच्या पुढच्याच वर्षी म्हणजे स्वामींच्या वयाचें पंधरावे वर्षी त्यांनीं घरच्या गरीबीमुळें मुरगोड शाळेंत थोरल्या भावाच्या हाताखालीं मास्तरकी पतकरिली होती, तेव्हां ते 'राम–मास्तर' म्हणून ओळखले जात होते.

सालाबाद प्रमाणें मुरगोड येथें चालणाऱ्या श्री शिवचिदंबरेश्वराच्या शके १७९४ च्या उत्सवांत एके दिवशीं ते आपल्या नित्यक्रमाप्रमाणें देवळांतील झाडलोट वगैरे सर्व अंगमेहनतींची कामें आटपून, दुपारीं सवंगड्या समवेत गांवाबाहेरच्या विहिरीवर स्नानाकरितां गेले होते. तेव्हां अगडीचे (धारवाड जि.) वे. व्यंकणभट सिद्धांती म्हणणारे दशग्रंथी ब्राह्मण देवळांत जाऊन 'रामू शिक्षक कोठें आहे' असा शोध करूं लागले. आणि विहिरीवर स्नानास गेल्याचें समजून तिकडे गेले. तेथें चौकशी करतां 'रामू शिक्षक हाच' असें कोणी दाखवितांक्षणीं व्यंकणभटजींनीं पुढें होऊन त्यांच्या पुढें नारळ ठेऊन अत्यंत भक्तिभावानें नमस्कार घातला. 'हा ग्रहस्थ असें कां करतो, रामूविषयीं पूज्यबुद्धि यांस कशी झाली, तसें होण्याचें कारण काय' याचें तेथें असलेल्या सर्वांस फारच आश्चर्य वाटलें. तेव्हां व्यंकणभटजींनीं घडलेली सर्व हकीकत सांगितली. अक्कलकोटक्षेत्रीं आपण श्रींच्या दर्शनास गेल्यावेळीं 'पुन्हा लवकरच आपल्या दर्शनाचा सुयोग यावा' अशी प्रार्थना केली असतां, श्रींनी सांगितले कीं, "मुरगोडास आमचा परमभक्त 'रामू शिक्षक' म्हणून आहे; त्याचें दर्शन घ्या, म्हणजे आमचें दर्शन झाल्या प्रमाणेंच आहे." या श्रींच्या शब्दावर माझा पूर्ण विश्वास असल्यानें त्यांच्या आज्ञेप्रमाणें

आज येथें आलों. आणि त्यांच्या या परमभक्तांचें दर्शन घेतलें. यामुळें मला प्रत्यक्ष श्रींच्या दर्शनाचा लाभ घडला असें वाटून परम संतोष झाला.

श्री कैवल्याश्रमस्वामींची विभूतिमत्ता, ईश्वरी साक्षात्काराचा योग त्यांच्यांतील दृढभक्ति, भक्ति व धर्मप्रसाराचें अगाध सामर्थ्य, श्री त्रिदंबरेश्वराचें त्यांजकडून होणारें भावी कार्य इत्यादि दैवी प्रभावाच्या गोष्टी त्यांच्या बाळपणींच श्रींनीं ओळखल्याची, आणि भगवंतांनीं गीतेंत " ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्–म्हणजे जे मला भक्तिपूर्वक भजतात ते आपल्या निर्मळ अंतःकरणाच्या योगानें माझ्यामध्यें व मी त्यांच्यामध्यें असें बिंब प्रतिबिंबाप्रमाणें एकस्वरूप असतों," म्हणून सांगितलेल्या सिद्धातांची प्रचीति वरील प्रसंगावरून श्रींनीं पटवून दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इति शम्.

## आळंदीचे नृसिंह सरस्वती स्वामींस हठयोगमार्गें समाधि.

" आळंदीचे प्रसिद्ध नृसिंह सरस्वती स्वामी दोन वेळ समर्थांचे दर्शनास गेले होते. ते चतुःशास्त्रांत प्रवीण असून मोठे विद्वान् होते. पुढें पुढें त्यांनां योगाभ्यासही चांगला साधला होता. ब्रह्मनाळ, नरसोबाची वाडी आदिकरून कृष्णातटाकाचे क्षेत्रांचे ठिकाणीं हठयोगाचा अभ्यास बरेच दिवस ते करीत होते. दररोज आसनाविधी करून व प्राणायाम करून नासिकेंतून वायु वर चढवून द्विदळ म्हणजे आज्ञाचक्राचा भेद होऊन सहस्रदळ [ब्रह्मरंध्र] पर्यंत वायु चढवून शेवटची समाधि साधण्याचा त्यांनीं बहुत यत्न केला, परंतु कांहीं लाग लागेना. गुरुपरंपरा हठयोगाचा मार्ग कोणी सांगेल म्हणून ते पुष्कळ फिरले, परंतु त्यांचे इच्छेप्रमाणें त्यांस कोणी गुरु मिळेना. शेवटीं समर्थांची कीर्ति ऐकून ते अक्कलकोटास आले. महाराजांची स्वारी राजवाड्यापाशीं भंडारखाना आहे, त्यांत होती. नृसिंह सरस्वतीस भंडारखान्याचे दरवाजाचे आंत आलेले पाहून, योगशास्त्रांतील आज्ञाचक्र भेदाचा श्लोक म्हणून, महाराजांनीं त्यांजकडे कृपादृष्टीनें पाहिलें. त्यासरशीं नृसिंह सरस्वतीस समाधि लागून ते खालीं बसले. चार घटकापर्यंत देहस्थितीचें स्मरण न राहतां, ब्रह्मतदाकारवृत्ति होऊन, आनंदांत राहिले. पुढें महाराजांनीं पूर्ण कृपादृष्टीनें पाहतांच, ब्रह्मरंध्रांतून वायु उतरून ते पुनः देहस्थितीवर आले. समाधि उतरल्यावर त्यांस मोठा आनंद होऊन ते म्हणाले, " आपण बहुत वर्षें समाधियोग साधन होण्याकरितां फार परिश्रम केले, त्यांचें फळ श्रीसमर्थकृपेनें आज आपल्यास प्राप्त झालें." पुढें कांहीं दिवस समर्थांपाशीं राहून

योगसाधन करून महाराजांची आज्ञा घेऊन परत आळंदीस गेले. तेथें त्यांनीं बहुत महत्कृत्यें केलीं.

## नृसिंह सरस्वती महाराज हटयोग सोडून भक्तिमार्गास लागले.

आणखी एक वेळ सदरचे स्वामी महाराजांचे दर्शनास आले होते. आळंदीस त्यांनीं योगसाधन करून पुष्कळ शिष्यसमाजांवर अनुग्रह केला होता. नित्य प्रातःकाळीं उठून इंद्रायणी नदीचे दक्षिणेस जांभूळवन आहे तिकडे शौचाविधि उरकून नदीवर मुखमार्जन व स्नान करून मध्यान्ह पावेतों योगाभ्यास करून, मग गांवांत यावें; याप्रमाणें क्रम चालला होता. त्या योगानें सिद्धि प्राप्त होऊन स्वामी जें जें भाषण करतील, तें तें सत्य होऊं लागलें. मुंबईचे भाटे व पुण्या–मुंबईचे बडे लोक स्वामींच्या दर्शनास येऊन त्यांचा अनुग्रह घेऊं लागले. स्वामींनीं श्री ज्ञानोबाचा रथ, इंद्रयणी नदीस घाट, तसेंच लगत धर्मशाळा अशीं मोठमोठीं कामें शिष्यमंडळीकडून करून घेतलीं. ब्राह्मणभोजनें नित्यशः होऊं लागलीं. व गरीबगुरिबांस अन्नवस्त्र मिळूं लागल्यामुळें स्वामींची फार प्रख्याति झाली. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीनृसिंह सरस्वती स्वामी अक्कलकोटास श्रीसमर्थांचे दर्शनास पुनः आले. समर्थांची स्वारी अक्कलकोटाचे पश्चिमेस माळावर श्री रामचंद्राचे देवळा-जवळ होती. नृसिंह सरस्वती स्वामीस पहातांच महाराज म्हणाले, "**क्यौं रंडी छोडी नहीं ?**" हें ऐकतांच नृसिंह सरस्वतीनें हात जोडून महाराजांस विनंति केली, "महाराज रंडी छोडनेके वास्ते एही इलाज चला है, आपकी कृपा होना." हें ऐकतांच समर्थ हंसले व जवळ सेवेकरी होते त्यांस म्हणाले, "अरे हे मोठे महंत आहेत, यांस बसावयास आसन द्या." अशी आज्ञा होतांच सेवेकरी यांनीं व्याघ्राजिन आणून दिलें. समर्थचरणीं मस्तक ठेवून त्यावर स्वामी बसले. थोडावेळ बसून समर्थांची परवानगी घेऊन स्वामी मठांत उतरण्यास गेले. समर्थांचें व स्वामीचें संभाषण झालें, त्याचा गूढार्थ मंडळींस समजेना. कांहीं गृहस्थमंडळींनीं स्वामींस रंडी सोडण्यास सांगितलें, याचा अर्थ काय म्हणून पुसतां, "रंडी म्हणजे सिद्धि ती सोडण्याविषयीं महाराजांची आज्ञा आहे व त्याप्रमाणें आपण प्रयत्नांत असून समर्थ कृपेनें लौकरच इच्छा पूर्ण होईल, असें ते म्हणाले." पुढें सिद्धि वगैरेच्या मार्गास न लागतां श्रीविठ्ठल, याप्रमाणें नामस्मरण करून आपण भक्तिमार्ग स्वीकारून सर्व जनांस स्वामींनीं भक्तिमार्गास लाविल्याचें प्रसिद्धच आहे.

## श्री गिरीपर्वतावर महातेजस्वी रूपानें दर्शन.

खेड गांवचा राहणारा नारायणभट या नांवाचा एक ब्राह्मण श्रीगिरीपर्वतावर त्र्यंकटेशाचें दर्शन घेऊन आपल्या घरीं जात असतां शके १७९२ आश्विन शु० १३ रोजीं श्रीस्वामीसमर्थांनीं महा सतेजरूपानें त्यास दर्शन दिलें. तेव्हां तो श्रीसमर्थांस विनंति करूं लागला कीं, " महाराज आपण अक्कलकोटास वास करीत असतां या ठिकाणीं कोठून व कसे आलां ? " तेव्हां श्रीस्वामीसमर्थ म्हणाले, " **पूर्वींचें महान पुण्यक्षेत्र असून लक्ष्मीचे उत्सवाकरितां येथें हल्लीं आलों व नेहमीं मी येत असतों.** " याप्रमाणें श्रीस्वामिसमर्थ त्या पर्वताचे आकाशास लागलेले शिखरावर गुप्त झाले. याप्रमाणें श्रीस्वामीसमर्थ हे कलियुगांत जगाचा उद्धार करण्यासाठीं अक्कलकोटवासी होऊन सर्व भूमंडळावर फिरून क्रीडा करीत असत. नारायणभट अक्कलकोटास आल्यावर त्यानें हें वृत्त सर्वांस सांगितलें; तेव्हां सर्व भक्तवृंदास आनंद झाला.

## 'इंद्र महाराज चले ईदलमे चमक रही बिजली बादलमे, इंद्रमहाराज'.

महाराज कधीं एका जागीं वास्तव्य करून रहात नसत. येथून तेथें तेथून येथें अशा एका घटकेंत चार ठिकाणीं जागा बदलत. मोठा पर्जन्य पडत असतां त्यामध्यें फिरण्याची महाराजांस मोठी हौस वाटे. एके दिवशीं समर्थांची स्वारी रामाचे देवळांत असतां आकाश ढगांनीं व्याप्त होऊन पाऊस पडूं लागला. इतक्यांत '**मेणा लाव,**' म्हणून महाराजांनीं हुकूम केला. भरपावसांत महाराज निघणार असें पाहून सर्वत्र सेवेकऱ्यांनीं व यात्रेकरूंनीं प्रार्थना केली कीं, "पाऊस पडत आहे, गरीबगुरिबांस पांघरण्यास वस्त्र नाहीं, त्यांचे हाल होतील." पण महाराज तसेच निघाले. सर्व मंडळीही त्यांचे बरोबरच निघाली. पाऊस खूप जोराचा पडत असून विजेचा कडकडाट चालला होता. ह्या वेळेस महाराज मोठ्या खुषींत असून भिजत असलेले मंडळीकडे पाहून हंसत होते, व तोंडानें '**इंद्रमहाराज चले ईदलमे चमक रही बिजली बादलमे, इंद्रमहाराज.**' याप्रमाणें गाणें म्हणत होते. ते ऐकून भक्तमंडळीही त्याप्रमाणेंच गाणें म्हणूं लागली. याप्रमाणें गात गात भर पावसांत महाराज सर्व मंडळीसह चोळाप्पाचे घरीं आले, व आनंदांत तेथें रात्र घालविली.

## ‘ चला तुम्हांस मोठा मनुष्य दाखवितों.’

एके दिवशीं भर दोन प्रहरीं महाराजांची स्वारी खासबागेंत असून पांचपन्नास लोकांचा मेळा नजीक होता. एकाएकीं महाराज उठून म्हणाले, **‘ चला, तुम्हांस मोठा मनुष्य दाखवितों.** ’ हें ऐकून महाराज काय दाखवितात, हें पाहण्यास सर्व लोक उठून चालूं लागले; पांचपन्नास पावलें गेल्यावर एका वारुळाजवळ महाराज उभे राहिल. तितक्यांत वारुळांतून एक मोठा नाग निघून जाऊं लागला. महाराज त्यास पोंचविण्यास पन्नास कदम गेले, व सर्वत्रांस सांगूं लागले **‘ हा मोठा मनुष्य आहे बरें.** ’ नागास नमस्कार करून सर्व लोक महाराजां-बरोबर परत बिन्हाडीं गेले. अशी महाराजांची चमत्कारिक लीला होती.

## रामपूर येथें ‘ अन्नशान्ति.’

श्रीअक्कलकोटनिवासी स्वामीमहाराज यांच्या गाणगापुरनिवासी श्रीनृसिंह-सरस्वतीप्रमाणेंच सर्व लीला होत्या. एका दुर्बळ भक्तानें चार मनुष्यास पुरे इतकें अन्न सिद्ध केलें असतां, त्या अन्नावर श्रीनृसिंहसरस्वती स्वामींनीं आपली छाटी टाकून, अन्न दुसऱ्या पात्रांत घेऊन, वाढण्यास सांगितलें. त्या योगानें हजारों लोक जेवून गेले, तरी अन्न पात्रांत पूर्ववत् कायम राहिलें. अशी एक कथा श्रीगुरुचरित्रांत आहे. त्या प्रमाणेंच लीला एके समयीं श्रीस्वामीसमर्थांनीं करून दाखविली, ती कथा अशी आहे. सोलापूर व अक्कलकोट यांचे दरम्यान रामपूर म्हणून सोलापूर तालुक्यांत गांव आहे. सोलापूरपासून हा गांव पांच कोस आहे. तेथील रावजी पाटील प्रथम शास्त्री ब्राह्मण, व त्याची जवळची नातेवाईक विठाबाई अशीं दोघेही श्रीस्वामींची भक्ति करीत असत. कधीं कधीं श्रीसमर्थांची स्वारी रामपुरास जात असे. एका खेपेस समर्थांचे स्वारीचा मुक्काम सोळा दिवस रामपुरास पडला. महाराजांसन्निध चोळापा, गणपतराव, रामभाऊ दाढीवाले, महादेवभट व बाबा-साहेब यादव वगैरे सेवेकरी मंडळी होती. महाराजांप्रीत्यर्थ चाळीस ब्राह्मण जेऊं घालण्याचा रावजी पाटील व विठाबाई यांचा नवस होता. अनायासें समर्थांची स्वारी आपले ग्रामास आली आहे, ही संधि नवस फेडण्यास उत्तम, असें मनांत आणून विठाबाईनें चाळीस पानांची सामग्री तयार करवून, स्वयंपाक तयार केला. स्वामीमहाराजांची स्वारी रामपुरास आली आहे, ही वार्ता सोलापूर व इतर गांवीं गेली. समर्थांचे दर्शनास हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या; मंडळींची

गर्दी फार झाली, इकडे विठाबाईनें स्वयंपाक सिद्ध करून, समर्थांस मंगलस्नान घालून, गंधाक्षत लावून, षोडशोपचारें पूजा केली; व भोजनास पात्र वाढून तयार केलें. लीलाविग्रही श्रीस्वामीसमर्थ भोजनास उठेनात. याप्रमाणें बराच वेळ गेला. मंडळीची गर्दी जास्त होऊं लागली; "सर्वत्रांस भोजन घालावें," म्हणून समर्थांनीं रावजी पाटिलास आज्ञा केली. त्यानें आज्ञा शिरसावंद्य केली, पण मनांत त्यास मोठी चिंता पडली कीं, चाळीस इसमांचे स्वयंपाकांत इतके लोक कसे जेवतील ? अशा प्रकारें तो चिंतेंत असतां, श्रीसमर्थांनीं त्याचें मन ओळखून, त्यास व विठाबाईस बोलाविलें, आणि एक टोपली आणण्यास आज्ञा केली. टोपली आणल्यावर त्यांत पोळ्या, भात वगैरे सर्व पदार्थ भरण्यास सांगितलें. नंतर देव्हाऱ्यांतील देवी, खंडोबा वगैरे देवतांचे टाक होते, ते व शालिग्राम वगैरे त्या अन्नावर ठेवून, त्यावर आणखी पोळ्या रचल्या. मग उभयतांकडून अन्नपूर्णेची पूजा करविली. विठाबाईचे डोकीवर ती टोपली देऊन, तिजकडून तुळशीस तीन प्रदक्षिणा करविल्या. नंतर ती टोपली श्रीस्वामींनीं आपल्या पलंगाजवळ ठेवून, पात्रें वाढण्यास सांगितलीं. पहिली पंगत चारशें पानांची झाली. रावजी पाटील, महादेव भट वगैरे सेवेकरी वाढूं लागले. महाराजांनीं आज्ञा केली कीं, " स्वयंपाक-घरांतून अन्न बाहेर घेऊन आल्यावर फिरून मागें पाहूं नये." सेवेकरी त्याप्रमाणें वाढूं लागले. पहिली पंगत जेवून उठली तरी, स्वयंपाक घरांतील अन्न जसेंचें तसेंच कायम आहे, असें पाहून सेवेकऱ्यांनीं श्रीस्वामी नांवाचा जयजयकार केला व आज श्रीसमर्थ अद्‌भुत चमत्कार दाखवून विचित्र लीला करणार असें सर्व म्हणूं लागले. दर्शनास लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. त्या सर्वांस भोजन घालावें म्हणून श्रीस्वामी वारंवार आज्ञा करीत असत. भक्तजनही श्रीस्वामींचा प्रसाद घेतल्यावांचून कशास जातील ? भोजनाच्या पंक्तींच्या पंक्ति होऊं लागल्या; प्रहररात्र पावेतों याप्रमाणें जेवणाचा थाट उडून राहिला. पुढें महाराज उपवासी असल्यानें, 'भोजन करावें', म्हणून रावजी पाटिलानें प्रार्थना केली, तेव्हां श्रीसमर्थ म्हणाले, "**अद्याप आमचे बापआजे आले नाहींत, ते आल्यावर भोजन करूं.**" या बोलण्याचा अर्थ कोणाचे ध्यानांत येईना. पुढें कांहीं वेळानें सोलापुराहून सरकारी कामगार मंडळी आली, त्यांनीं दर्शन घेऊन भोजन केलें. त्यादिवशीं रात्रीं अकरा वाजतां श्रीदयाघन सद्‌गुरूनें भोजन केलें. शिल्लक राहिलेलें अन्न रावजीकडून इतर लोकांस वांटून दिलें. टोपलींत असलेलें अन्न दुसरे दिवशीं प्रसाद समजून सर्वत्र सेवेकऱ्यांनीं ग्रहण केलें. चाळीस पानांचे सामग्रींत चार सहस्र मनुष्यें जेवलीं, अशी श्रीगुरुसमर्थांनीं अगम्य लीला दाखविली.

## अक्कलकोटचे भगवंत अप्पा सुतार यांचे मळ्यांत अन्नशान्ति व महाराजांनीं पाण्याच्या चुळीनें प्रदीप्त केलेला अग्नि.

असाच एकवेळ अक्कलकोटास चमत्कार झाला. अक्कलकोटचा राहणारा भगवंत आपा सुतार हा महाराजांचा पूर्ण भक्त होता. श्रीस्वामीसमर्थ कधीं कधीं त्याचे घरीं दोन दोन दिवस रहात असत. सदरचा सुतार यानें आपल्या शेतांत नवीन विहीर बांधिली. श्रीस्वामीकृपेनें पाणी विपुल लागलें. भगवंत आपाचे मनांत असें आलें कीं, एकवेळ सद्गुरुस्वामींस शेतांत नेऊन, भोजन घालून, उच्छिष्ट प्रसाद घेऊन, धन्य व्हावें. असा हेतु मनांत धरून, सुतार महाराजांकडे आला. समर्थांची स्वारी चोळाप्पाचे घराजवळ मोदी यांचे कठड्यावर बसली होती. सुतारानें, विनयपूर्वक हात जोडून, 'मळ्यांत कृपा करून चलावें,' म्हणून श्रीची प्रार्थना केली. "**थोडें थांब**" म्हणून महाराजांनीं उत्तर दिलें. याप्रमाणें चार पांच वेळ विनंति केली. त्याचें उत्तर असेंच मिळालें. कांहीं वेळानें काशिनाथपंत म्हसवडकर हे महाराजांचे दर्शनास आले. दर्शन घेऊन बसले असतां सुतारानें त्यांस सूचना केली कीं, 'महाराजांस मळ्यापावेतों घेऊन चला.' म्हसवडकरांनीं विनंति करितांच महाराज उठले; व काशिनाथपंताचा हात धरून थेट सुताराचे मळ्याचा रस्ता धरून चालले. शेतांत जाऊन महाराज बसले. सुतारानें शिधा सामग्री आणली होती, ती घेऊन काशिनाथपंत व बाबा सबनीस यांनीं स्वयंपाक तयार केला. श्रीस्वामीमहाराजांस स्नान घालून म्हसवडकर यांनीं त्यांची षोडशोपचारें पूजा केली. महाराजांस भोजन घालून म्हसवडकर व सबनीस भोजनास बसणार, इतक्यांत गांवांतून सेवेकरी मंडळी आली, त्यांस भोजन घालण्यास महाराजांनीं आज्ञा केली. पांचजणांचा स्वयंपाक केलेला, व मंडळी तर पुष्कळ आली. अन्न सर्वत्रांस कसें पुरतें याची म्हसवडकर यांस काळजी पडली. आज्ञा प्रमाण मानून सर्वत्रांस भोजन घातलें. मग सबनीस, म्हसवडकर, भगवंत आपा व त्याचा भाऊ नरसापा सुतार असे जेवले. एकंदर पात्रें ५० झालीं. श्रीस्वामी कृपेनें अन्नाची तूट मुळींच पडली नाहीं. पुढें महाराजांनीं आणखी चमत्कार केला तो असा:—सायंकाळचे चार वाजण्याचे सुमारास हुरडा भाजण्यास मंडळीनें आगटी तयार केली. तें पाहून महाराज आगटीजवळ आले. जवळच एक पाण्याची घागर भरली होती त्यांतील पाणी एका तांब्यांत ओतून घेऊन, महाराज चूळ भरूं लागले. चूळ भरून महाराज आगटींत प्रदीप्त झालेल्या अग्नीवर टाकीत. पाणी अग्नींत पडल्याबरोबर

होमकुंडांत तुपाची आहुति दिली असतां जसा अग्नि जास्त भडकतो, त्याप्रमाणें चुळांचे पाण्यानें अग्नि जास्त भडकून ज्वाळा भडकूं लागत. घागरींतील सर्व पाणी खलास होईपावेतों महाराजांचा हा खेळ चालला होता; पाणी पडलें असतां अग्नि विझावा तसें न होतां तूप टाकिल्याप्रमाणें दुणावत असलेला पाहून, सर्व मंडळी आश्चर्यानें थक्क झाली व अवतारी स्वामी महाराजांस शरण गेली. पुढें सर्व मंडळीनें हुरडा खाल्ल्यावर सायंकाळीं महाराजांसह गांवांत गेली. अशी महाराजांची अगम्य लीला असे.

## बसलगांव येथें अन्नशान्ति, सोलापुरचे शिप्याची समंध बाधा दूर करून समंधास गति.

आणखी एकदां अशीच अन्नशांति झाली. श्रीदत्त अवधूतस्वामी एके दिवशीं बसलगांवास फिरत फिरत गेले होते. अक्कलकोटापासून हा गांव दोन अडीच कोसांवर आहे. त्या गांवीं श्रीभवानींचीं दोन स्थानें आहेत. एक देऊळ गांवांत असून दुसरें बाहेर माळावर आहे. माळावरील देवळांत महाराज जाऊन बसले. महाराजांस अक्कलकोट सोडून बरेच दिवस झाले असल्यानें, दर्शनातुर झालेली भक्तमंडळी, गणपतराव जोशी, संगमेश्वरकर व काशिनाथपंत म्हसवडकर वगैरे त्या गांवीं आली. प्रेमपुरःसर दर्शन करून मंडळी बसली. तितक्यांत महाराजांनीं काशिनाथपंतास आज्ञा केली कीं, "गांवांत जाऊन नथनीस (देवीस) मी आलों म्हणून सांग." पंतांनीं आज्ञेप्रमाणें जाऊन देवीस निरोप कळविला. मागोमाग महाराजही देवळांत आले. गणपतरावही त्यांजबरोबर आले. तितक्यांत सोलापुरहून एक शिंपी सहकुटुंब श्रीसमर्थांचे दर्शनास आला. दर्शन घेऊन शिंपी जवळ बसला. शिंप्याचे मनांत श्रीस नैवेद्य करण्याचें होतें. त्यानें ती गोष्ट भवानराव देशपांडे बसलगांवचे कुळकर्णी यांजपाशीं काढली. त्यानें म्हसवडकर यांस सांगितली. महाराजांनीं तें ऐकून, "स्वयंपाक करून सर्वांस जेवण घालावें," अशी आज्ञा केली. शिंप्यानें ब्राह्मणाकडून ५० पात्रांचा स्वयंपाक करविला. ते दिवशीं अमावास्या होती. गणपतराव जोशी यांचे घरीं दर्श असल्यानें महाराज आज्ञा देतील तर जाऊं, असें त्यांचे मनांत आलें. तें जाणून "**अरे लठ्ठ्या लवकर घरास जा.**" म्हणून महाराजांनीं आज्ञा केली. गणपतराव अक्कलकोटास गेले. इकडे स्वयंपाक तयार झाल्यावर भवानराव यांनीं महाराजांस मंगलस्नान घालून, यथासांग पूजा करून, आरती केली व भोजनास पात्रें मांडिलीं. दर्शनास मंडळीची

गर्दी झाली. सर्वांस भोजन घालावें म्हणून महाराजांची आज्ञा होती, त्याप्रमाणें पंक्तीवर पंक्ति बसूं लागल्या. ५० पात्रांचे स्वयंपाकांत पांचशें मंडळी यथेच्छ जेवली; तें पाहून भक्तजनांस अत्यानंद होऊन, वारंवार श्रीस्वामी नांवाचा जयजयकार करूं लागले. सर्वांचे मागून शिंप्यानें मुलांबाळांसुद्धां प्रसाद ग्रहण करून, महाराजांसमीप येऊन बसला. त्यास समंधाची बाधा होती. आंगांत संचार होऊन समंध मोठमोठ्यानें ओरडूं लागला व समर्थांपुढें नाचूं लागला. बराच वेळ याप्रमाणें चेष्टा झाल्यावर, समंध महाराजांच्या पायां पडून गति मागूं लागला. कृपा करून समर्थांनीं त्यास गति दिली. पुढें तो शिंपी महाराजांचा निरोप घेऊन आनंदानें आपल्या गांवीं परत गेला.

## बाबासाहेब जाधव यांस जीवदान.

बाबासाहेब जाधव म्हणून अक्कलकोट संस्थानांतील मानकऱ्यांपैकीं मानकरी होते. हे महाराजांचे निस्सीम भक्त होते. प्रथम पासून महाराजांची भक्ति हे करीत असत. त्यांस संतान नव्हतें. पुढें कर्मयोगानें त्यांचें कुटुंब निवर्तलें. पुनः विवाह करण्याबद्दल महाराजांची आज्ञा मागतां, मिळाली नाहीं. हजार बाराशें रुपयांची इस्टेट होती, त्याची विल्हेवाट लावून महाराजांचे उत्सवाकडे त्यांपैकीं तीनशें रुपये खर्च करून, बाकी रुपयांचा दानधर्म केला. व निव्वळ लंगोटी लावून, गोसावी बनून, ते महाराजांचे सन्निध सेवा करीत राहिले. त्यांनीं बहुत वर्षें सेवा केली. महाराज समाधिस्थ झाल्याचे पश्चात्‌ही श्रींचे मठांत समाधीची सेवा करून बाबासाहेब आनंदांत कालक्रमण करीत असत. मानकरी या नात्यानें त्यांस संस्थानांतून १० रुपये दरमहा मिळत असत. हे बाबासाहेब निवर्तल्यास बरीच वर्षें झालीं. ज्याप्रमाणें राजास "कुंभार" या नांवानें महाराज हांक मारीत, त्याप्रमाणेंच बाबासाहेबांसही महाराज 'कुंभार' म्हणून हाक मारीत असत. बाबासाहेब महाराजांसन्निध वास करूं लागल्यावर, एके दिवशीं मोठा चमत्कार झाला. महाराजांची स्वारी सरकार वाड्याजवळ लक्कडखान्यांत होती. दिवसाचे बारा वाजण्याच्या सुमारास महाराज बाबासाहेबांस म्हणाले, "**कुंभार, तुझे नांवाची चिठी आली आहे.**" हें ऐकतांच बाबासाहेब घाबरले; व त्यांस अक्राळविक्राळ काळपुरुष पुढें दिसूं लागला. पण न घाबरतां त्यांनीं श्रींचे चरण घट्ट धरिले, व विज्ञाप्ति केली कीं, "श्रीगुरूची सेवा करण्याची लालसा पुरी झाली नाहीं, श्रीगुरुदत्तांनीं कृपा करून

२९३२३ ८४२ दि. ११

तूर्त निरोप देऊं नये." समर्थांस त्यांची करुणा येऊन चिठ्ठी माघारी फिरविली. समोर हात करून, "**जा बैलाकडे**" असें महाराज म्हणाले, त्यासरसा बैल धाडकन् भुईवर पडला, व तास दोन तासांनीं गतप्राण झाला. याप्रमाणें भक्ताचें मरण चुकवून कनवाळू महाराजांनीं वृषभास मुक्ति दिली. पुढें बाबासाहेबांची भक्ति वाढून ते श्रींची सेवा प्रेमपुरःसर करूं लागले.

## रावण्णा वाणी यांस इटगी गांवीं प्राणदान.

एके दिवशीं फिरतां फिरतां महाराज बागेहाळी म्हणून अक्कलकोटापासून एक कोसावर गांव आहे, तेथें गेले. मुजावर म्हणून तेथें मुसलमान आहेत. त्यांचे घरीं महाराज उतरले. दोन प्रहर पावेतों तेथें राहून स्वारी पुढें उन्हांतच जाऊं लागली. स्नान भोजन वगैरे कांहीं केलें नाहीं. पांच पन्नास मंडळी महाराजांबरोबर होती. त्यांत पुण्याचा हकीम ज्यास महाराजांनीं प्रसाद म्हणून मोहऱ्या दिल्या होत्या, तोही होता. चालतां चालतां महाराज म्हणाले, "**चला पाहण्यास गमत, खाण्यास न्यामत् चला.**" मंडळीचें भोजन वगैरे झालें नसून उन्हाची वेळ असल्यानें एकएक जण पाय मागें घेऊं लागला. शेवटीं पांचचार खरे भाविक सेवेकरी मात्र महाराजांबरोबर राहिले. त्यांत बाबासाहेब मानकरी होते. महाराजांनीं इटगी गांवचा रस्ता धरिला. तीन वाजण्याचे सुमारास त्या गांवीं जाऊन, मारुतीचे देवळांत महाराज उतरले. स्नान वगैरे त्या दिवशीं कांहीं केलें नाहीं. गांववाल्यांनीं तंबाखू हुक्का ओढण्यास आणून दिली. पण महाराजांनीं हुक्काही ओढला नाहीं. बाजरीचे भुसकट तेथें पडलें होतें तें गोळा करून ठेवण्यास सेवेकऱ्यांस आज्ञा केली. ते थंडीचे दिवस होते. शेकण्याकरितां भुसकट गोळा केलें होते. त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं चार वाजतां त्या गांवीं रावण्णा नांवाचा वाणी, आपल्या शेतांत नांगर हाकीत असतां त्यास सर्पदंश होऊन लहरीवर लहरी येऊं लागल्या. त्याचे आप्त मंडळीनें त्यास एका कांबळ्यांत घालून उचलून मारुतीचे देवळांत आणून बसविलें. विष आंगांत जास्ती भिनून रावण्णा अगदीं थंडगार पडला. त्याची जगण्याची आशा राहिली नाहीं. महाराजांचे सेवेकरी मजा पहातच होते. त्यांपैकीं बाबासाहेब जाधव यांनीं रावण्णास कांहीं तरी आराम पडावा म्हणून, महाराजांच्या चर्मपादुका (जोडा) घेऊन रावण्णाचे डोकीवर नेऊन ठेविल्या. बाबासाहेबांनीं कांहींतरी गुण यावा म्हणून सहज ही लीला केली. त्यांनीं मनांत हा विचार आणला नाहीं कीं, पादुका कोणाच्या, त्यांचा प्रभाव काय व त्यापासून

कांहीं बरीवाईट गोष्ट झाली तर अपयश कोणास येणार ? असो. रावण्णाची आयु-र्मर्यादा बळकट म्हणूनच बाबासाहेबांस तशी बुद्धि झाली. भक्ताने कोणतीही गोष्ट केली तर त्याचा अभिमान भक्तवत्सलासच राहणार. रावण्णाचे मस्तकावर आपला जोडा ठेविलेला पाहून, महाराजांनीं जमिनीवर आंग टाकिलें होतें ते खाडकन् उठून बसले व रागानें संतप्त झाले.

## "मुर्द्याचे डोकीवर जोडा कशाला ठेवलास ?"

म्हणून फार रागानें महाराज बाबासाहेब यांस म्हणाले, व शिव्या देऊं लागले. देवळांत मनुष्याची गर्दी झाली होती, पण महाराज संतप्त झालेले पाहून सर्वजण पळून गेले. दोन इसम मात्र रावण्णास घेऊन राहिले. बाबासाहेबही भीतीनें पळून लांब जाऊन उभे राहिले. महाराजांनीं आपल्या डोकींतील टोपी काढून रागानें जमिनीवर आपटून फेंकून दिली. त्याचप्रमाणें कफनी काढून फेंकून दिली. शेवटीं लंगोटी फेडून रागानें फेंकून देऊन, महाराज दिगंबर बनले. बाबासाहेब एका कोपऱ्यांत लपून उभे होते, त्यांस सन्निध बोलाविलें. बाबासाहेब भीतीनें थरथर कांपूं लागले. त्यांचें पाऊल पुढें पडेना. "**ये भोसडीच्या ये चोदीच्या,**" अशा शिव्या मिळाल्यावर, एकएक पाऊल पुढें पडूं लागलें. भीतभीत कांपतकांपत बाबासाहेब महाराजांसन्निध एकदांचे आले. महाराजांनीं पुनः त्यांस शिवी देऊन विचारिलें, "**मुर्द्याचे डोकीवर जोडे ठेवण्यास तुला कोणी सांगितलें ?**" बाबासाहेबाच्यानें जबाब देववेना. मग आपल्या डोकीचें पागोटें काढून भुईवर आपटण्यास सांगितलें. तसें त्यानें केलें; मग आंगरखा काढून आपटण्यास सांगितला. बाबासाहेबांस भीति पडली कीं, महाराज स्वतःप्रमाणें आपणास दिगंबर करितात. पण तसें कांहीं झालें नाहीं. महाराजांनीं मग बाबासाहेबांस आज्ञा केली कीं, "रावण्णाचें नांव घेऊन त्याचे कानांत हांक मार." त्याप्रमाणें त्यांनीं हाक मारिली, पण कांहीं जबाब मिळाला नाहीं. "**मोठ्यानें हांक मार.**" म्हणून महाराजांनीं आज्ञा केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. "**दोन्ही कानांत मोठ्यानें हाक मार.**" म्हणून पुनः आज्ञा झाल्यावर, "रावण्णा, रावण्णा," म्हणून बाबासाहेबांनीं मोठ्यानें हाक मारिली. त्यासरसा रावण्णा हा शुद्धीवर येऊन त्यानें डोळे उघडले, व लोकांकडे पाहूं लागला. सर्व भक्तमंडळीस अत्यानंद होउन सर्वत्रांनीं "श्रीस्वामीसमर्थ महाराज की जय" असें म्हणून जयजयकार केला. थोड्या वेळानें रावण्णा चांगला सावध होऊन, आपणास भूक लागली आहे, कांहीं तरी खाण्यास

द्या म्हणून म्हणाला. त्याचे आप्त मंडळीनें खाण्यास काय द्यावें, म्हणून महाराजांस विचारितां, बोटव्याची खीर घालण्यास सांगितलें. त्याप्रमाणें माणसांनीं तत्काळ सिद्धता करून रावण्णास बोटव्याची खीर, व महाराजांकरितांहि खीर व इतर पदार्थांचें ताट भरून आणलें. रावण्णानें खीर खाल्ली. सर्प चावला असतां दूध देऊं नये म्हणून लोकांचा समज आहे, पण प्राणदाते महाराजांचे वचनावर पूर्ण भरंवसा ठेवून दुधाची खीर रावण्णास दिली. रावण्णा पुढें चांगला हुषार झाला. केवळ आपल्या चर्मपादुका मस्तकावर ठेविल्याचा दीनदयाळ स्वामीसमर्थांनीं अभिमान धरून प्रेतवत् झालेल्या रावण्णास श्रीसमर्थांनीं प्राणदान दिलें. असें महाराजांचें अगाध वैभव होते. तें पूर्णपणें वर्णन करण्यास मानव समर्थ नाहींत. असो. महाराजांस वाढून आणलेलें ताट महाराजांनीं स्वीकारिलें नाहीं. चांदण्यास नैवेद्य दाखविण्यास सांगितलें. नैवेद्य दाखविल्यावर बाबासाहेबांस ताट देण्यास सांगितलें. त्यांनीं यथेच्छ भोजन केलें. त्यादिवशीं महाराजांस निव्वळ उपवास घडला. दुसरे दिवशीं सकाळीं महाराज उठून रामपुरास गेले. तेथें पाटलाकडे स्नान घालून पूजन करून महाराजांस जेऊं घातलें.

## जीवदान नेहमीं देत नसत.

महाराज सर्वशक्तिमान् होते याजबद्दल अनेक दाखले आहेत. कर्तुं–अकर्तुं–अन्यथा कर्तुं ही शक्ति महाराजांच्या आंगीं होती. मात्र कालमानानें ते त्या शक्तीचा उपयोग क्वचित् प्रसंगीं करीत असत. असे चमत्कार दृष्टिगोचर फारसे होत नसत, व झाले तरी लागलीच माया पटलानें जनांचे नयन अंध होऊन, श्रीस्वामीसमर्थ आपणांप्रमाणेंच मानव आहेत, असा समज अज्ञजनांचा होत असे. रामकृष्णादि पूर्वांश अवतार झाले, त्यावेळींहि अशीच माया लोकांस भुरळ पाडीत असे. श्रीकृष्ण भगवान् बालपणीं प्राकृत मुलांप्रमाणेंच माती खातात, या आरोपास पात्र झाले होते. पुनः माती खाऊं नये असा बंदोबस्त करण्यास यशोदा मातेनें हातांत काठी घेऊन, बालकृष्णास शिक्षा करण्याची तयारी केली. माया लाघवी पूतनारीनें भ्याल्यासारखें दाखवून, गोरेंमोरें तोंड करून, रडण्यास आरंभ केला व दीनवाणीनें 'मीं माती खाल्ली नाहीं,' म्हणून आईची विनंति केली. तोंडांत माती आहे कीं नाहीं, तें पाहण्यास मातेनें तोंड उघडण्यास सांगतांच, श्रीकृष्णानें तोंड उघडून चतुर्दश-भुवनांचा आपल्या वदनांत समावेश असल्याचें तिच्या नजरेस आणिलें. क्षणैक ती चकित होऊन श्रीगोपालकृष्ण हा पूर्णब्रह्म आहे, बालक नाहीं, अशी तिची

खात्री झाली. असा तिचा समज राहणें भगवंतास इष्ट न वाटून मायेचे योगानें तिचे मनांत पालट पाडून हें आपलें बालकच आहे, अशा भ्रमांत ती पडून त्यास कडेवर घेऊन, आपल्या चिमुकल्या पाडसाचे तिनें मुक्यावर मुके घेतले. त्याचप्रमाणें पूतनेचें शोषण केलें तेव्हां, व अघासुर, बकासुर वगैरे राक्षसांचा भगवानानें नाश केला तेव्हांहि पित्यास व इतर लोकांस भुरळ पाडून आपण सर्वशक्तिमान् परमेश्वर आहों, हें त्यांस जाणूं दिलें नाहीं. गोवर्धन नांवाचे डोंगराखालीं सर्व गोकुळवासीजन अतिवृष्टीचे भीतीनें जाऊन राहिले असतां, डोंगर आंगावर पडूं लागला. तेव्हां श्रीकृष्णानें नुसत्या करांगुलीवर डोंगर धरून सर्वांचें रक्षण केलें. पण तें संकट पार पडण्याचा उशीर तोंच शेंबडे चिपडे गोपाळ एकाहून एक अधिक बढाई करूं लागले. एक म्हणतो, 'मीं आपला सोटा लावल्यानें डोंगर वरचेवर राहिला,' दुसरा म्हणतो, 'मी आपली गदा वर धरल्यानें संकट टळलें,' तिसरा म्हणतो, 'आम्हीं दहा पांचजण मिळून मोठी शिळा वर धरिली म्हणून डोंगर आंगावर पडला नाहीं.' अशीं अनेकांनीं अनेक कारणें देऊन श्रीकृष्णाचे पराक्रमास उणेपणा आणण्याचा प्रयत्न केला. तसें होणें परमात्म्यास इष्टच होतें. सांदिपनी गुरूनें दक्षिणा मागतांना मृत झालेले पुत्र आणून द्यावे, म्हणून श्रीकृष्णास आज्ञा करितांच कृष्णानें यमाचे दाढेंतून पुत्र आणून गुरुदक्षिणा दिली. पण आपल्या स्वतःचा भाचा आपली प्रिय भगिनी सुभद्रा हिचा मुलगा जो बाळ अभिमन्यु, हा, 'कृष्ण कृष्ण,' म्हणून प्राण सोडीत असतां त्यास न वांचवितां खुशाल मरूं दिलें; हें नवल नव्हे काय? तात्पर्य, परमात्म्याच्या लीला विचित्र आहेत. श्रीस्वामीसमर्थांकडे कोणी प्राणदान मागण्यास आल्यावर, महाराजांची तबियत लागल्यास तेव्हांच फत्ते काम करीत असत. मनांत नसल्यास दाखला देत कीं, "**कायरे, अभिमन्यु मेला तेव्हां श्रीकृष्ण भगवान् जवळ होते कीं नाहीं?**" याप्रमाणें जाब मिळाला म्हणजे समजावें कीं, महाराजांच्या मनांत कृपा करण्याचें नाहीं. पुण्यास एका ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याची पत्रिका पाहून जोशीबुवांनीं सांगितलें कीं, मुलगा अकरा वर्षांवर वांचणार नाहीं. ब्राह्मण भाविक होता. देवब्राह्मणांवर त्याचा विश्वास होता. ज्योतिष्याचे वाक्यावर भरंवसा ठेवून, त्यानें अकरा वर्षांचा मुलगा होईपावेतों मुंजच करण्याची नाहीं, असा निश्चय केला. मुलाचे वयास दहा वर्षे झाल्यावर, अक्कलकोटनिवासी स्वामींची कीर्ति ऐकून मुलास दर्शनास घेऊन गेला. दर्शन घेऊन सन्निध बसतात तों त्या ब्राह्मणास पूर्वी सांगितल्या-प्रमाणें "**कायरे अभिमन्यु मेला तेव्हां श्रीकृष्ण भगवान् कोठें होते?**"

म्हणून प्रश्न केला. मुलगा वांचत नाहीं अशी ब्राह्मणाची खात्री झाली. तो परत पुण्यास गेल्यावर मुलास देवाज्ञा झाली व ज्योतिष्याचें भाकित खरें झालें.

## बाईचें मूल जिवंत केलें.

एखादे वेळेस दीन भक्तावर कृपा करून महाराज प्राणदान देत असत. रावण्णाची गोष्ट मागें दिली आहे. एक वेळ अशी गोष्ट झाली कीं, अक्कलकोट संस्थानांतलि एका खेडेगांवांतील बाईचा मुलगा अत्यवस्थ झाल्यानें ती बाई मुलास घेऊन श्रीस्वामीसमर्थांकडे आली. श्रीसमर्थांची स्वारी बुधवार पेठेंत चोळापाचे घरीं बसली होती. बाई तेथें जाऊन पोंचली व मुलास श्रीस्वामी चरणांवर घालण्याकरितां त्याचे तोंडावरून वस्त्र काढून पहाते तों मूल मृत झाल्याचें तिला कळून आलें. मग तिचे शोकाचें काय वर्णन करावें ? ऊर शीर बडवून घेऊन तिनें मोठा आकांत मांडिला. श्रीसमर्थांची प्रार्थना करून ती सांगूं लागली, " महाराज, घरीं अनेक प्रकारचे औषधोपचार केले, पण बालकास आराम नसल्यानें श्रीचरणांसन्निध आणिलें असतां, अशी गोष्ट घडून आली. आपलें प्रारब्ध म्हणावयाचें ! देवाचे दर्शनास गेलें असतां देऊळच आंगांवर पडून मृत्यु यावा, अगर व्याघ्राचे भयानें धेनु पळत असतां यवनाचे तडाक्यांत सांपडून ती गतप्राण व्हावी, त्याप्रमाणें आपली स्थिति झाली." अशी तऱ्हेतऱ्हेनें तिनें श्रींची करुणा भाकली. श्रीस्वामी दयार्णव तिचा विलाप पाहून मनांत कळवळले. महाराज आसनावरून उठून बाईजवळ गेले, व "**आण तुझा मुलगा इकडे,**" असें म्हणून मुलगा तिच्या जवळून हिसकून घेतला. मुलाचें खालीं डोकें व वर पाय करून गिरगिर फिरवूं लागले. मग तेथें एक घोडें उभें होतें त्याचे तोंडास मूल लावून महाराज त्यास म्हणाले, "**हे घोड्या, तूं रांडेचे पोर खा.**" असें म्हणून महाराजांनीं तें पोर स्वयंपाक करण्याकरितां चर खणला होता, त्यावर फेंकून दिलें. त्यासरसें मूल जिवंत होऊन रडूं लागलें. बाईनें मुलास पोटाशीं धरून स्तनपान करविलें. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रु टपटप पडूं लागले. श्रीसमर्थांस अनन्य शरण होऊन तिनें व सर्वत्र मंडळीनें 'स्वामी महाराज की जय' म्हणून जयजयकार केला. तितक्यांत कांहीं कुत्सित लोक नजीक होतेच. ते आपल्या कल्पना चालवूं लागले कीं मुलगें मुळींच मेलें नव्हतें, त्यास मूर्छा आली होती, पण श्रीस्वामींनीं उलटें धरून फिरविल्यामुळें तें जागें होऊन रडूं लागलें, दुसरें कांहीं नाहीं. श्रीसमर्थांस अशी मंडळी इष्टच होती. आपला महिमा

प्रकट व्हावा अशी त्यांची इच्छा नव्हती. पण सोनें तें कोठें नेलें तरी सोनेंच ठरणार. पण सोन्याची पारख करण्याची अक्कल पाहिजे. त्याप्रमाणें अक्कलवान लोकांची अक्कलकोटवासी श्रीस्वामी पूर्णब्रह्म अवतारी आहेत अशी खात्री झाली होती. मूढजन मात्र महाराजांस इतर प्राकृत जनांप्रमाणें मानीत.

## श्रीस्वामीरायांची अमृत दृष्टि व कानफाट्याचा वृत्तांत.

श्रीस्वामी अमृतदृष्टि होते. श्रीनृसिंहसरस्वति गाणगापूरनिवासी यांनीं आपल्या अमृतदृष्टीनें अवलोकन करून, लोखंडाचें सुवर्ण केलें, व प्रेतसंजीवन केल्याच्या कथा गुरुचरित्रांत प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें श्रीस्वामीसमर्थांचे दृष्टीचें सामर्थ्य होतें, हें पुढील गोष्टीवरून दिसून येईल.

एक कानफाट्या नाथसंप्रदायी गृहस्थ महाराजांचा मोठा भक्त होता. तो फिरत फिरत श्रीसमर्थांचे दर्शनास आला होता. त्याजबरोबर दोन चार शिष्य व एक घोडा होता. आंगावर उत्तम प्रकारचीं वस्त्रें व कानांत लांकडाचीं कुंडलें होतीं. हातांत मोठा लोखंडी त्रिशूल असून, आंगांत कफनी होती. याप्रमाणें मोठ्या थाटानें कानफाट्या श्रीस्वामीसमर्थांच्या दर्शनास आला. त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी अक्कलकोट गांवाबाहेर मुरलीधराचे देवळांत होती. महाराज पलंगावर पहुडले होते. कानफाट्याजवळ एक तांबडी बनात होती, ती घेऊन त्यानें महाराजांचे आंगावर पांघरूण घातलें. त्यासरसे महाराज पलंगावर उठून बसले. “**चेटुक करतो मादरचोद, चेटुक करतो,**” असें म्हणून बनांत पायांखालीं घेऊन महाराज बसले. कानफाट्या दूर जाऊन हात जोडून उभा राहिला. महाराजांची पूर्ण ब्रह्मस्थिति पाहून आपलें चेटुक वगैरे सोडून, अनन्यभावानें शरण जाऊन श्रींची सेवा करूं लागला. त्याजबरोबर, शिष्य होते त्यास त्यानें परत लावून दिले. महाराजांचा तो पूर्ण भक्त बनला. या कानफाट्याप्रमाणें निस्सीम भक्त महाराजांचा दुसरा कोणी झाला नाहीं. तो हमेष महाराजांची सेवा करीत असे. तो महाराजांचा इतका निस्सीम भक्त झाला होता कीं, सेवेकरी मंडळीपैकीं कोणी श्री सद्गुरूचे नांवावांचून रामकृष्ण अगर इतर देवतेचें नांव घेतल्यास, त्याचे तळव्याची आग मस्तकीं जाई. लोकांस तो उपदेश करीत असे कीं, श्रीस्वामीसमर्थ हे साक्षात् दत्तावतार बोलते चालते असून, दुसऱ्या देवतेचें नांव घेणें पातक आहे. कोणी सहज बोलण्यांत ‘राम’ ‘कृष्ण’ वगैरे नांवाचा उच्चार केल्यास, कानफाट्या त्याचे श्रीमुखांत

भडकाविल्याशिवाय राहत नसे. याप्रमाणें बहुत लोकांनीं त्याचे हातचा मार खाल्ला व कानफाट्या म्हणजे सेवेकऱ्यांस एक काळपुरुषच भासूं लागला होता. तो स्वतः महाराजांची एकनिष्ठपणें सेवा करी. महाराजांचें मलमूत्र जमिनीवर पडल्याबरोबर तें तो मोठें मिष्टान्नाप्रमाणें भक्षण करी. कोणी सेवेकरी सेवेंत कुचरपणा करूं लागल्यास कानफाट्या त्यास मुष्टिमोदक देण्यास तयारच असे. सुंदराबाई व चोळापा यांजवर कानफाट्याची मोठी करडी नजर असे. कारण तो म्हणत असे कीं महाराजांचें खाऊन महाराजांची सेवा ते बरोबर करीत नाहींत. एखादे दिवशीं तुमचा समाचार घेईन, म्हणून तो त्यांस वारंवार भीति घालीत असे. तो शरीरानें मोठा धिप्पाड असून फार बळकट होता. १०।२० मनुष्यास तो भारी होता; जतचे संस्थानिक डफळे सरकार यांनीं महाराजांस मोठ्या बैलांची गाडी दिली होती. भुजंगा त्यावर हांकण्यास बसे. बैल भरधांव चालले असतां कानफाट्यानें मागले बाजूनें गाडी ओढून धरिली म्हणजे बैल मटकन् उभे रहात. याप्रमाणें त्याची शक्ति होती. महाराज बाहेर जाण्यास निघाले म्हणजे त्यांजकडे तोंड करून तो पाठीचे बाजूनें चालत जाई. दोन सेवेकऱ्यांच्या शेंड्या धरून राग आला म्हणजे एकमेकांच्या डोक्यावर डोकें नारळाप्रमाणें तो आपटीत असे. याप्रमाणें त्याचा सर्वांस दरारा असे. असा क्रम चालला असतां कानफाट्यानें पुष्कळ लोकांची रामकृष्णादि नांवें घेतल्यावरून डोकीं फोडलीं. शेवटीं पोलिसांत वर्दी गेली. चीफ कॉन्स्टेबल तेथें येऊन तपास करूं लागला. "**आमचे दरबारांत तूं कोण × × × × तपास करणारा?**" म्हणून महाराजांनीं फौजदारास दरडावल्याबरोबर फौजदारानें चरणीं मस्तक ठेवून प्रयाण केलें. पुढें आणखी एका सेवेकऱ्यास कानफाट्यानें दगड मारून डोकें फोडिलें. मोठ्या दुखापतीचा चार्ज शाबीत होऊन कानफाट्यास रा० रा० नानासाहेब बर्वे न्यायाधीश यांनीं सहा महिन्यांची सक्त मजुरीची सजा दिली. तुरुंगांत नेल्यावर कानफाट्या सक्त मजुरी करीना. महाराजांचें दर्शन होत नसल्यानें त्यानें अन्नही वर्ज केलें. कांहीं दिवस याप्रमाणें अन्नावांचून राहिल्यावर, यास दोन शिपाई हत्यारबंद देऊन महाराजांचें दर्शनास नेण्याचा साहेबाकडून हुकूम झाला. तुरुंगांत कांहीं लिंगाईत वाणी होते. त्यांनीं शिवशिव असा उच्चार केल्याबरोबर, कानफाट्या त्यांचे आंगावर चवताळून मारण्यास जाई. श्रीस्वामी नांवाचा जप करण्यास सांगे. एके दिवशीं धाकट्या वेशीबाहेर लंडोरी बोवाचे मळ्यांत श्रीस्वामी समर्थांची स्वारी होती. तेथें एक छाती इतकी उंचीची समाधि होती, त्यावर महाराज

जाऊन बसले. त्यादिवशीं महाराजांनीं महादेवाचे लिंगाची पूजा केली. कानफाट्यास त्यादिवशीं गांवांत झाडझुड करण्यास एक शिपाई धाकट्या वेशीकडे घेऊन गेला. तितक्यांत मळ्यांतून "श्रीस्वामी महाराज की जय," असा नामघोष भक्तमंडळीनें केलेला कानफाट्याचे कानीं पडला. त्यासरसें कानफाट्याचें देहभान नाहींसें झालें. व श्रीसमर्थांचें दर्शन घेण्याविषयीं तो फार आतुर झाला. एक तरुण शिपाई कमरेस तरवार लटकविलेला त्याचे बरोबर होता. त्याची त्यानें विनवणी केली कीं, आपणास श्रीस्वामींचें दर्शनास घेऊन जावें. शिपायानें ती गोष्ट नाकारिली. बोलतां बोलतां पटकन् शिपायाचे हातांतून तरवार घेऊन ती म्यानांतून काढून, कानफाट्या महाराजांकडे चालला. पायांत शृंखला जशाच्या तशाच होत्या. याप्रमाणें ही भीमसेनाची स्वारी नागवी तरवार घेऊन येतांना पाहून, महाराजांसान्निध सेवेकरी वगैरे ५० लोक होते त्यांची पांचावर धारण बसली. जसजसा कानफाट्या जवळ येऊं लागला, तसतसा एकएक जण मागें पाय काढूं लागला. शेवटीं कानफाट्या महाराजांचे नजीक येईपावेतों, भुजंगा चपराशी व बाबासाहेब यादव सेवेकरी असे दोघे मात्र राहिले. ओट्याचे खालीं दहा बारा हातांवर एक वृद्ध देशस्थ ब्राह्मण, मोंगलाईतील पाथ्रीं परभणी जिल्ह्यांतील राहणारा, हातांत जपमाळा घेऊन श्रीस्वामी महाराजांचा जप करीत ध्यानस्थ होऊन बसला होता. कानफाट्या नागवी तरवार घेऊन पायांतील बिड्या खळखळ करीत आहेत, अशा स्थितींत हळूहळू श्रीस्वामी समर्थांकडे चालला. त्यास पाहून महाराज म्हणाले "**ह्यां क्या है मोटके पास बैल और टोणगा है उस्के पास जाव.**" महाराजांचे आज्ञेप्रमाणें कानफाट्या विहिरीकडे कांहीं पावलें गेला, व पुनः माघारी फिरला. तो वृद्ध ब्राह्मण पाठमोरा बसला होता. त्याचे शरीराचा वर्ण चोळापाप्रमाणें काळसर असून आंगाचा बांधाही चोळापाप्रमाणेंच होता. कानफाट्याचा राग चोळापावर होताच. तोच हा आहे, असें समजून त्या तरवारीनें ब्राह्मणाचे मानेवर घाव करणें सुरू केलें. एकावर एक कचाकच बारा तेरा वार त्या धटिंगण कानफाट्यानें गरीब ब्राह्मणाचे मानेवर केले. एकसारखा रक्तस्राव होऊं लागला. ब्राह्मणाचें देहभान नाहींसे झालें. श्रीस्वामीसमर्थांनीं आपली दृष्टी एकसारखी ब्राह्मणाकडे लाविली होती. शेवटीं तरवारीची मूट तुटून पडल्यावर कानफाट्यानें मारणें बंद केलें. व स्वामीसमर्थांपुढें तरवार आणून टाकिली. ती भुजंगानें उचलून घेतली. पुढें कानफाट्या लोकांस मळ्यांतील ढेंकळें उचलून मारूं लागला. त्यास पकडण्याची कोणास छाती होईना. पोलिसचे

लोक व इतर कामगार मंडळी तेथें जमली होती, पण कोणासही पकडण्याची युक्ति सुचेना; तितक्यांत एक मल्ला भक्कम धनगर, कानफाट्याहून दांडगा, तेथें आला. त्यास कानफाट्याचे मागें जाऊन पकडण्याची खूण केली. व कानफाट्यास समोरचे मंडळीनें बोलण्याचे नादीं लावलें. धनगरानें हळूच मागाहून येऊन कानफाट्याचे पाय धरून खालीं पाडलें. त्यासरसे पोलीसाचे लोक पुढें सरसाऊन कानफाट्यास त्यांनीं बांधून टाकिलें. असो, वृद्ध ब्राह्मणाचे जखमेवर गुरुकृपादृष्टीचें निरीक्षण झाल्यानें त्यास त्यापासून कांहीं विशेष धक्का पोंचला नाहीं. त्यास डॉक्टरचे दवाखान्यांत पाठविलें. तेथें तो आठ दहा दिवसांत चांगला बरा झाला. ज्या धटिंगण कानफाट्याची एक बुक्की ब्राह्मणाचे प्राण हरण करण्यास बस्स होती, त्या कानफाट्यानें तरवारीनें मानेवर केलेले दहाबारा वारांनींही ब्राह्मण मरूं नये, हा कशाचा प्रताप बरें? केवळ श्रीस्वामीचे कृपावलोकनाचा!!! तरवार तरी गंजून घरांत पडलेली होती असेंही नाहीं. रोज शिपायांनीं वापरण्याची तरवार होती. श्रीसमर्थांचे कृपादृष्टीवाचून ब्राह्मणास वांचविण्यास कोणीही समर्थ झालें नसतें. अशी श्रीसमर्थांची अगाध लीला होती. ब्राह्मण बरा होऊन पुनः श्रीस्वामीसन्निध सेवा करीत राहिला. कानफाट्यास पुढें कायद्याप्रमाणें शिक्षा झाली. कानफाट्यानें केलेल्या गर्दीची बातमी गांवांत पसरल्यावर, मामलेदार न्यायाधीश वगैरे मंडळी महाराजांसन्निध आली. भुजंगा त्यांस हकीकत सांगूं लागला. "महाराज येथें बसले होते, आपण येथें बसलों होतों, कानफाट्या तिकडून आला, मग असें झालें, तसें झालें," वगैरे हकीकत सांगत असतां, महाराज त्यास रागानें शिवी देऊन म्हणाले, "**मोठा लढाई मारतो, गप बस.**" याप्रमाणें महाराजांचीं अगम्य लीला होती.

## केशीगांवचे आपा पाटलांस अभय दान.

अक्कलकोटापासून सात कोसांवर मोंगलाईंत केशी म्हणून गांव आहे. त्या गांवचा आपा पाटील, वाणी जातीचा, महाराजांचा मोठा भक्त होता. महाराज केशी गांवास वारंवार जात असत. एकवेळ महाराज त्या गांवीं जाऊन मारुतीचे देवळांत उतरले. तेव्हां आपा पाटील यास आनंद झाला. महाराजांचे सर्व सेवेकऱ्यांस उत्तम प्रकारचा शिधा देऊन प्रयोजन करविलें, व एकनिष्ठपणें सेवा करूं लागला. महाराज आल्याची बातमी ऐकून नळदुर्गाहून तालुकदार (असिस्टंट कलेक्टर) ही समर्थांचे दर्शनास आले. त्यांचे बरोबर आमीन (फौजदार) ही आला होता. तालुकदारानें श्रीचें दर्शन घेऊन प्रार्थना केली कीं, आपल्या गांवीं

चलावें. महाराजांनीं उत्तर दिलें, “ **लहान घोडा घेऊन ये म्हणजे येऊं.**” याचा अर्थ तुला असलेली गुर्मी कमी कर म्हणजे येऊं असा होता. तालुकदारास हा खोल अर्थ कसचा कळतो ? त्याचा घोडा लहानच होता, तो महाराजांस बसण्यास देऊन आपण दुसऱ्या घोड्यावर बसावें, असा त्यानें बेत केला. त्यानें आमीनास दुसरा घोडा गांवांतून पकडून आणण्यास हुकूम केला. आमीन जो गेला तो आपाची मोठी घोडी तीनशें रुपये किंमतीची होती, तिजवर खोगीर घालून नेऊं लागला. आपा पाटील व त्याचे घरचीं माणसें महाराजांसन्निध होतीं. फक्त एक म्हातारी घरीं होती. तिनें आमीनास विनंति केली कीं, पाटील घरीं नाहीं, तो आल्यावर त्यास विचारून घोडी न्यावी. आमीन त्या म्हातारीचें थोडेंच ऐकणार ! जबरदस्तीनें त्यानें घोडी चालविली. म्हातारी देवळांत गेली. व झालेली हकीकत आपास सांगितली. आपा घरीं येऊन आमीनास म्हणाला, मी गांवचा पाटील आहे, तुम्हांला एक सोडून चार घोडे देतों, पण आपली घोडी सोडून द्यावी. कांहीं बोलाचाल होऊन आपानें घोडी घरीं नेली. इकडे तालुकदारानें आपला घोडा तयार करून महाराजांकडे नेला. महाराज म्हणाले, “ आम्ही येत नाहीं, तूंच बस.” तालुकदार हिरमुष्ट होऊन परत गांवीं जाण्यास निघाला. तों आमीनानें आपा पाटलाचे घोडीबद्दल हकीकत त्यास तिखटमीठ लावून सांगितली. “ पाटील बहुत मगरूर आहे. आपणांकरितां घोडी तयार केली असतां परत नेऊन दांडगाई व शिवीगाळ केली,” म्हणून आमीनानें सांगितलें. हें ऐकून तालुकदार रागानें संतप्त झाला, आपा पाटील त्यास पोंचविण्यास गेला असतां, त्याचा रामराम न घेतां, पुष्कळ गालिप्रदान केलें. व, “ तूं पैसेवाला असल्यानें मोठा मस्त झालास, तुझी खोडकी मोडली पाहिजे,” असें म्हणाला. आपा पाटलानें विनयपूर्वक त्याची समजूत घालण्याचा बहुत प्रयत्न केला, पण सर्व व्यर्थ झाला. जातांना तालुकदार साहेबांनीं प्रतिज्ञा केली कीं, “ आठ दिवसांत तुझे पायांत बेड्या घालून नेईन तरच मी तालुकदार !”

## ओंवी

**कोप आलिया ओळंबयासी । कैंवी स्पर्शो अग्नीसी ॥**
**सद्‌गुरु कृपा असे जयासी । काय करील यवन दुष्ट ॥**

हें गुरुभक्तीचें तत्त्व तालुकदार थोडेंच जाणत होता. तालुकदार गेल्यावर आपा पाटील रडत रडत श्रीस्वामीसन्निध आला. व करद्वय जोडून प्रार्थना केली,

"महाराज सद्गुरूची भेट झाली असतां त्रिताप शमन होऊन सर्व दुःख नाहींसें होतें, असें असून आपण चिंताग्नींत होरपळत आहों." भक्त संकटीं पडलेला पाहून दयाळु महाराजांचें मन कळवळलें. अतिशय रागानें महाराज म्हणूं लागले, '**मादरचोदास लाख लाख कोरड्यांनीं मारूं. मादरचोदास गढीपार करून देऊं.**' महाराजांस इतका संताप आला होता कीं, ते ज्या पलंगावर बसले होते, तो जसजसे महाराज रागानें बोलत तसतसा डगडगां हालूं लागला. याप्रमाणें कांहींवेळ गेल्यावर महाराज अक्कलकोटास गेले. आपा पाटील फिकिरींत राहिला. पुढें त्यास बिड्या घालणाऱ्या तालुकदाराची आठ दिवसांतच तैलंगणांत बदली होऊन, त्याचा सर्वस्वी नाश झाला. गुरुकृपाकवच ज्या भक्तानें धारण केलें आहे, त्यास क्रोधरूपी वज्राची काय भीति आहे? आपा पाटील आनंदानें राहिला. श्रीस्वामीकृपेनें सदरचा आपा आपल्या गांवीं भरभराटीनें नांदत होता.

## पांडु सोनारा वरील संकट निवारण.

श्रीस्वामीसमर्थ अक्कलकोटास असतां, एके ठिकाणीं रहात नसून हमेष जवळपासचे खेड्यापाड्यावर फिरत असत. **भक्तांचें संरक्षण करावें, व नास्तिकजन भक्तिमार्गास लावावे, हाच फिरण्याचा हेतु असे.** मैंदरगी म्हणून कुरुंदवाडकराचें इनाम गांव अक्कलकोटापासून तीन कोसांवर आहे. त्या गांवीं पांडू सोनार या नांवाचा एक गृहस्थ असून तो महाराजांचा भक्त होता. तो सोनारकाम करून प्रपंच चालवीत असे. कर्जाचें ओझें झाल्यानें आपल्या व्यवसायचातुर्यानें पैसा मिळविण्याची त्यानें युक्ति योजिली. एका श्रीमंत गृहस्थानें कांहीं सोन्याचे दागिने घडण्यास दिले असतां, सोनें चोरून त्या ऐवजीं चांदीचे दागिने घडून, त्यावर सोन्याचा मुलामा करून, दागिने मालकास दिले. पातक कोठें गुप्त राहतें? पांडूची चोरी उमगली जाऊन मालकानें मैंदरगीचे मामलेदाराकडे फिर्याद केली. तात्यासाहेब मामलेदार यांनीं खटल्याची चौकशी करून, सोनारावर गुन्हा शाबीत केला. दुष्काळाचे दिवस असल्यानें होईल तोंपावेतों कैदेची शिक्षा न देतां फटक्यांची द्यावी, असा त्यावेळीं हुकूम असल्यानें, मामलेदारानें पांडूस फटक्यांची शिक्षा दिली. पांडूनें आलेलें संकट जाणून श्रीस्वामीसमर्थांचा धांवा केला. भक्तकाजकल्पद्रुम समर्थ भक्त संकटांत पाहून कळवळले. द्रौपदीनें धांवा केला असतां, रुक्मिणीनें पंचपक्वान्नांनीं वाढलेलें ताट झुगारून देऊन, ज्याप्रमाणें श्रीकृष्णभगवान् यांनीं वस्त्रहरणाचे वेळेस धांवत जाऊन, आपल्या प्रिय भगिनीची

लज्जा रक्षण केली, त्याचप्रमाणें महाराजांनीं आपल्या भक्ताचा सांभाळ केला. ज्या दिवशीं शिक्षा अमलांत यावयाची त्या दिवशीं पांडू सोनारानें महाराजांची स्तुति करून फारच आळविलें. समर्थांची स्वारी अक्कलकोटास होती. सकाळची स्नानाची वेळ होती. उष्णोदकाचा तांब्या भरून सेवेकरी आंगावर घालणार, तो बंद करून स्नान करावयाचें नाहीं, '**मेणा लेके आव.**' म्हणून महाराज म्हणाले. मग काय उशीर ? सत्वर स्वारीची तयारी झाली. महाराज बाहेरगांवीं जाण्यास निघाले म्हणजे अखेर पावेतों कोणते गांवीं जाणार तें सेवेकऱ्यांस कळत नसे. पूर्व दिशेस जाणें असल्यास प्रथम उत्तर दिशेचा मार्ग धरून, पश्चिमेस वळून मग पुन्हां पूर्वेस जावें, अशी महाराजांची विचित्र लीला असे. महाराज निघाले ते बोरी नदीवर जाऊन स्नान करून पुढें मैंदरगीस पोंचेपावेतों तीन वाजून गेले. धर्मशाळेंत वगैरे दुसरे ठिकाणीं न जातां, महाराज थेट कचेरींत गेले. महाराजांनीं आपल्यावर अनुग्रहच केला, असें समजून मामलेदार यांनीं आदरसत्कार करून, महाराजांस आपल्या गादीवर बसवून, आपण हस्त जोडून नजीक उभे राहिले. कैदी सोनार समोरच उभा होता. "**येरे इकडे**" असें म्हणून त्यास आपणाजवळ बोलावून महाराजांनीं बसण्यास सांगितलें. कैद्यावरील महाराजांची प्रीति पाहून मामलेदारास आश्चर्य वाटलें. महाराजांचे सरबराईस मामलेदार लागले. थोडावेळ गेल्यावर पांडू सोनारासही "**सरबराईस जा, बसलास कां ?**" म्हणून महाराजांनीं आज्ञा केली. सोनारास तेंच पाहिजे होतें. आनंदानें धांवत जाऊन महाराजांची सर्व व्यवस्था त्यानें लाविली. दुसरे दिवसपावेतों आपणाजवळ पांडूस ठेऊन घेतलें. पांडूवरील महाराजांचें प्रेम पाहून मामलेदारानें त्यास शिक्षा न करितां सोडून दिलें. मोठ्या हर्षानें सोनारानें आपली गोष्ट साद्यंत सेवेकऱ्यांस सांगितली. महाराज स्नान करितां करितां एकदम उठून कां आले, त्याचें कारण सेवेकऱ्यांचें ध्यानांत येऊन सर्वांनीं स्वामीनामाचा जयजयकार केला.

## मैंदरगीचा मुसलमान जमादार सिद्धपुरुष बनला.

याच मैंदरगी गांवीं एक मुसलमान जमादार सरकारी नोकरीवर होता. बंदिखान्यांतील कैद्यांवर देखरेख करण्याचें त्याजकडे काम होतें. एके दिवशीं सायंकाळीं कैदी तुरुंगांत घालण्याचेवेळीं एक कैदी जमादाराची नजर चुकवून पळून जाण्याकरितां कोटाचे खंदकांत लपून बसला. रात्रीं कैदी मोजतांना एक कैदी कमी असल्याचें जमादाराचे लक्षांत आलें. तेव्हां त्यास फार वाईट वाटून

झाले गोष्टीचा काय परिणाम होतो, याची काळजी पडली. नोकरी करितां करितां म्हातारपण झालें, आतां पेन्शन घेऊन घरीं बसण्याचे दिवस आले असतां, असा प्रसंग आला म्हणून जमादारास पराकाष्ठेचें दुःख झालें. जमादार श्रीसमर्थांचा भक्त होता. श्रींचे स्मरण करून त्यानें प्रार्थना केली कीं, "पळालेला कैदी सांपडून आपणावर आलेले दूषण टळल्यास, नोकरीचा राजीनामा देऊन जन्मभर श्रीस्वामींची सेवा करीन." रात्रीं इकडे तिकडे कैद्याबद्दल त्यानें तपास केला, पण पत्ता लागला नाहीं. उजाडल्यावर एक स्वार कैद्याचे तपासास फिरत असतां, खंदकांत लपून बसलेला कैदी त्यास सांपडला. स्वारानें त्यास जमादाराचे स्वाधीन केला. जमादारास अत्यानंद होऊन कैद्यास घेऊन तसाच तो मामलेदाराकडे गेला, व त्यांचे स्वाधीन कैदी करून, नौकरीचा राजीनामा पुढें ठेविला. खंदकांत कैदी रात्रभर बसून कसा राहिला, त्याचे मामलेदारास आश्चर्य वाटलें. कैद्यास विचारपूस करितां त्यानें सांगितलें कीं, रात्रभर पळून जाण्याकरितां खंदकाभोंवतीं फिरलों. खंदकावर चढून जावें तर एक संन्यासी आपणास मारण्यास येई. तो संन्यासी सकाळपावेतों आपल्यामागें फिरतच होता. सकाळीं स्वार येऊन त्यानें आपणास पकडलें. ही कैद्याची हकीकत ऐकून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. जमादाराची खात्री झाली कीं, आपलें संकट श्रीस्वामीसमर्थांनीं दूर केलें. पूर्वींचे संकेताप्रमाणें नोकरी सोडून, जमादार अक्कलकोटास जाऊन श्रीस्वामींचे चरणीं लागला. सर्वसंग परित्याग करून जमादार महाराजांचे सेवेस तत्पर राहिला. पोटाचा कोणताच उद्योग तो करीत नसे. दुपारचे बारा वाजतां, "**चोळ्या यास दोन भाकरी दे.**" म्हणून महाराज चोळापा यास आज्ञा करीत. याप्रमाणें आठ दिवस क्रम चालला. चोळापा लोभी होता. रोज दोन भाकरी देण्याचें त्यास जड वाटूं लागलें. जमादारास महाराजांजवळ बसण्याची त्यानें मनाई केली. जमादार लांब बसूं लागला. महाराजांनीं हें पाहून एके दिवशीं त्यास जवळ बोलाविलें, व आपल्या पायांतील जोडा त्याचे आंगावर फेंकून, गांवीं जाण्यास आज्ञा दिली. प्रसाद शिरसावंद्य करून, मोठ्या आनंदाने जमादार मैंदरगीस गेला. चर्मी पादुका घरांत ठेवून मोठ्या भक्तीनें त्यांची पूजा करूं लागला. बाहेर एक पडकें घर होतें, त्यांत जमादार जाऊन राहिला. श्रीस्वामीकृपेनें त्यास गांवांतून आयतें भोजन मिळूं लागलें. श्रीस्वामीभक्त म्हणून जमादार पुढें प्रसिद्ध झाला. त्याची कीर्ति ऐकून रोगी व व्याधिग्रस्त लोक त्याजकडे येऊं लागले. श्रीस्वामींचे चर्मपादुकांखालील माती जमादार त्यांस देत असे. त्या प्रसादानें रोगी बरे होऊं लागले. तो मोठा सिद्ध

पुरुष बनला. ब्राह्मणही त्यास वंदन करूं लागले. जमादार हमेष अक्कलकोटास दर्शनास जात असे. त्यास महाराज पीरसाहेब या नांवानें हाक मारीत. पुढें त्यास द्रव्यही पुष्कळ मिळूं लागलें. जमादाराची बायको पतीचे पुढें सेवा करूं लागली. पुढें जमादारानें देऊळ बांधून, त्यांत पादुकांची स्थापना करून पूजेस एक ब्राह्मण ठेविला. मोठ्या थाटानें श्रीचा उत्साह करूं लागला. जमादाराचे म्हणण्याप्रमाणें सर्व होऊं लागलें. त्याचे शिष्यही बहुत बनले. याप्रमाणें श्रीस्वामीकृपेनें तो केवळ अवलिया बनला.

## महालक्ष्मीस ( मुंबई ) श्रीस्वामींचा मठ.

श्रीस्वामीसमर्थांची लीला अगाध आहे. त्यांची भक्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत असून, नवीन नवीन मठ स्थापन होत आहेत. शके १८१४ सालचे दत्तजयंतीचे मुहूर्तानें मुंबईस महालक्ष्मीवर प्रख्यात सद्‌गृहस्थ रा० रा० विनायकराव वासुदेवजी यांनीं श्रीचे पादुकांची स्थापना केली आहे. लहानसें टुमदार संगमरवरी पाषाणाचें देऊळ बांधलें असून तें अगदीं समुद्रकांठीं आहे. त्यांत ग्यासचे ( धुराचे ) दिवे घेतले असून तें स्थान फार रमणीय दिसतें. विनायकरावजी यांनीं पादुकांची पूजा व अर्चा करण्यास मुद्दाम १५ रुपये दरमहाचा ब्राह्मण ठेविला. ह्या पादुका श्रीसमर्थांनीं विनायकरावजींकडे मुद्दाम पाठविल्या होत्या. लहानशा संगमरवरी दगडावर चिमुकल्या पादुका वठविलेल्या आहेत. रा० रा० विनायकरावजी हे महाराजांचे पूर्ण भक्त होते. सन १८९२ सालचे नाताळांत आमचे एका मित्रानें महालक्ष्मीस जाऊन मुद्दाम त्यांची भेट घेतली. श्रीसमर्थ साक्षात् दत्त अवतार असल्याबद्दल विनायकरावजींची बालंबाल खात्री झाली असून, जे कांहीं सुधारक महाराजांस नांवें ठेवीत, व हल्लींही ठेवितात, ते केवळ मूर्ख असे स्पष्ट उद्गार वृद्ध आजोबांचे तोंडून निघाले. हे गृहस्थ साधारण नसून मोठे हुषार, निस्पृह व राजकारणी आहेत, हें सर्वत्र महशूरच आहे. मुंबई सरकारांत, तसेंच इतर संस्थानांत यांची जी मान्यता व वजन होतें तें यापुढें त्यांची पदवी ( ओरिएन्टल ट्रान्स्लेटर ) धारण करणारांपैकीं एकासही संपादन करितां येईल कीं नाहीं, याची वानवाच आहे. पिनलकोडचें सुबोध मराठी भाषांतर यांनींच केलें आहे. ह्यावरून यांची विद्वत्ता कशी होती हें सहज दिसून येतें. असो. सांगावयाचें इतकेंच कीं, अशा सर्वमान्य गृहस्थाचे तोंडून श्रीस्वामीसमर्थांबद्दल स्तुतिपर हकीकत जी आम्हांस मिळाली, ती वाचकां-

पुढें ठेविली असतां, त्यांस सर्वथैव मान्य होईल, हें जाणून ती आम्ही खालीं देत आहों. काकासाहेबांनीं ( विनायकरावजींनीं) सांगितलें कीं, सन १८७८।७९ सालीं नेहमींप्रमाणें आपण श्रीसमर्थांचे दर्शनास अक्कलकोटास गेलों असतां आज्ञा झाली "**दर्या किनाऱ्यास आनंद कर जा.**" यावेळीं काकासाहेबांचे वय ६० वर्षांचे होतें. आज्ञा शिरसा मान्य करून पुण्यास गेल्याबरोबर त्यांनीं पेनशन मिळण्या-बद्दल अर्ज केला.

## विनायकराव यांस पेनशन व प्रत्यक्ष प्रसाद.

सरकार त्यास पेनशन देण्यास काकूं करूं लागलें. कारण अशा उपयोगी जुन्या इमानी नौकरास कोण जाऊं देतों ? विनायकरावजींचे आग्रहावरून त्यांस पुढें पेनशन मिळालें. तेव्हांपासून ते आज्ञेप्रमाणें महालक्ष्मीस दर्याकांठीं वास करून आनंदानें पुत्रपौत्रासह काळ क्रमीत होते. पेनशन घेतल्यावर कांहीं वर्षांनीं रावसाहेब ढवळे [ रावजी भिकाजी ढवळे ] यांचें हस्तें सदरहू पादुका खुद्द महाराजांनीं त्यांजकडे पाठविल्या. "**काकासाहेबांस पादुका नेऊन दे.**" अशी आज्ञा झाल्याप्रमाणें केवळ ढवळे यांनीं मुंबईस जाऊन पादुका काकासाहेबांचे स्वाधीन केल्या; त्यांची त्यांनीं स्थापना केली.

## शके १८१४ सालीं महालक्ष्मीवर स्थापलेल्या पादुका.

कांहीं दिवसापूर्वी काकासाहेबांचें कुटुंब आजारी होऊन त्यांची प्रकृति अत्यवस्थ झाली. या दुखण्यांतून त्या उठतील, अशी आशा उरली नव्हती. त्यांचें सोनेंच होणार होतें, सबब येणारे प्रसंगास बाई घाबरल्या नाहींत. पण श्रीच्या पादुकांची जोड्यानें स्थापना करावी, अशी प्रथमपासून त्यांची इच्छा असल्यानें त्यांनीं श्रींची अनन्य भावानें मनांतील हेतु सिद्धीस नेण्याबद्दल प्रार्थना केली. मग काय उशीर ! श्रीकृपेनें बाई चांगल्या झाल्या, व शके १८१४ सालचे दत्तजयंतीस त्यांचे हस्तें यथासांग पादुकांची स्थापना झाली, व बाईचे मनांतील हेतु पूर्ण झाला. श्रीसमर्थांचे दर्शनास गेल्यावेळीं, "**पथ्थरावर पैसे ठोक,**" अशी बाईस आज्ञा झाली होती, त्याचा अर्थ पादुकांची स्थापना करावी असाच असावा. सदरहू मजकूर पुणेंवैभवांत छापल्यानंतर काकासाहेब कैलासवासी झाले.

## विनायकराव वासुदेवजी उर्फ काकासाहेब प्रथम अक्कलकोटास दर्शनास गेले त्या वेळचा प्रसंग.

काकासाहेब प्रथम समर्थांचे दर्शनास गेले, त्या गोष्टीस **बरीच वर्षें** झालीं. त्यावेळेस आगगाडी फक्त सोलापूर पावेतोंच चालू होती. पुढें मालगाडी मात्र जात असे. श्रीस्वामीसमर्थांची कीर्ति ऐकून काकासाहेबांचे मनांत अक्कलकोटास दर्शनास जाण्याचें बहुत दिवसांपासून होतें. एकदांचा नाताळचे रजेंत तो योग आला. त्यांचा थाट केवळ राजकीय असे. चाकर माणसें आप्त स्वकीय सर्वच 'आम्ही येतों', 'आम्ही येतों', म्हणूं लागलीं. असें होतां होतां काकासाहेबांचे बरोबर दोनएकशें माणसांचा समुदाय निघाला. सर्व मंडळी सोलापूरापावेतों आगगाडीनें आली. पुढें काकासाहेबांनीं मुद्दाम व्यवस्था करून मालगाडीस माणसांचे डबे जोडून कडबगांव पावेतों सर्व मंडळी गेली. राजाकडून म्याना, बग्या व गाड्या स्टेशनावर तयार होत्या. काकासाहेबांस आणण्यास कारभारी व दुसरी मानकरी मंडळी सामोरी गेली होती. **भक्तीं जसा मदात्मा देहींही तसा न दारुका गमला ॥** भक्तिप्रिय समर्थांनीं काकासाहेबांची भक्ति पाहून "**हमकूबी तट्टू भेजो. हामबी जावेंगे,**" म्हणून आज्ञा केल्याबरोबर राजवाड्यांतून त्यांजकरितां मुद्दाम बगी आली. त्यांत बसून महाराज अर्धवाट कडबगांवचे रस्त्यानें गेलें. काकासाहेबांचे कुटुंब अस्पर्श असले कारणानें स्वतंत्र गाडींत बसलें होतें. उभयतां स्त्रीपुरुषें दर्शनाविषयीं फार आतुर झालीं होतीं. महाराज अर्ध वाटेवर आल्याचें पाहून त्यांस जो आनंद झाला, तो वर्णन करितां येत नाहीं. बहुत दिवस चुकलेली गाय तान्हुल्यास एकाएकीं भेटली असतां त्यास जसा आनंद होतो, तसा काकासाहेबांस झाला. त्यांनीं पूर्ण उल्हासानें दर्शन घेऊन आनंदाश्रूंनीं श्रींचें अंघ्रिक्षालन केलें. आपल्या कुटुंबासही दुरून दर्शन करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें प्रेमपुरःसर त्यांनीं व थोडेसे दुसरे लोकांनीं दर्शन घेतलें; इतक्यांत महाराजांनीं गाडींत बसून, "**चलो गाडी हकालो,**" म्हणून हुकूम केल्यावरून बाकीचे मंडळीचें दर्शन अक्कलकोटास झालें. काकासाहेब दोन चार दिवस तेथें राहिले, व जातांना श्रीफलाचा प्रसाद काकासाहेबांचे पदरांत घालून टिचकी वाजवून, "**शीघ्र शीघ्र शीघ्र,**" असे तीन वेळां महाराज म्हणाले. ह्याचा अर्थ त्यावेळेस ध्यानांत आला नाहीं. पण आज्ञेप्रमाणें काकासाहेब शीघ्र कडबगांवास गेले. तेथें पाहतात तों मोठाच अनर्थ गुदरला होता. काकासाहेबांचे बरोबरची कांहीं मंडळी पुढें कडबगांवास गेली होती.

त्यांत कांहीं लहान अर्भकें हौसेनें हत्तीचे अंबारींत बसून गेलीं होतीं. त्यावेळीं आगगाडी नवीनच असल्यानें, तिच्रे कर्कश शिळीनें मनुष्येंहि घाबरून जात, मग जनावरें बुजत ह्यांत आश्चर्य तें कोणतें ? स्टेशनाजवळ गेल्याबरोबर आगगाडीची शीळ झाली, त्यासरसा गजराज बुजून शुंडा वर उभारून अरण्यांत भटकला. काकासाहेबांस हें वर्तमान ऐकून फारच काळजी वाटली; व आतां ही गोष्ट कोणते थरास जाईल, त्याची त्यांस धास्ती पडली. श्रीस्वामीसमर्थांचा धांवा करावयास लागले, व आपणांस "शीघ्र शीघ्र" जाण्यास आज्ञा झाली, त्याचें हेंच कारण असल्याचें त्यांचें लक्षांत आलें. श्रीकृपेवांचून आपल्या हातून तरी काय होणार ? असें मनांत आणून ते स्तब्ध राहिले. जवळचे मंडळीनें त्यांची बहुतप्रकारें समजूत केली, व महात कुशल आहे, तो हत्तीस चीची करीत परत आणील, म्हणून सांगितलें. दुसरे महात व इतर लोक भाले घेऊन हत्तीचे पाठीस लागले, व मोठे प्रयासानें मुलांसह त्यास सुरक्षित स्टेशनावर आणिलें. काकासाहेबांस अत्यानंद झाला. श्रीस्वामींचा जयजयकार करून सर्व मंडळी आगगाडींत बसून सुखरूप पढरपूर वगैरे यात्रा करून परत मुंबईस गेली.

## पंढरीचा विठोबा वाळवंटी.

पुढें तीन चार वर्षांनीं शनिवार रविवारची संधि पाहून काकासाहेब पुनः अक्कलकोटास गेले होते. त्यावेळेस तर मोठाच चमत्कार झाला. सकाळचे प्रहरीं नऊदहा वाजण्याचे सुमाराम श्रीस्वामीसमर्थ मंचकावर पहुडले होते. रावसाहेब ढवळे चवरी वारीत होते; छोटे राजेसाहेब [ शहाजी महाराज ] नजीकच होते. त्यास "**शंकर उठ तेरेकू काम नही मालूम,**" अशी आज्ञा करून चवरी वारण्यास सांगितलें. त्या दिवशीं चोळापानें महाराजांस पीतांबर नेसवून, आंगांत भरजरीचा आंगरखा व डोकीस टोपी घातली होती. एकाएकीं महाराजांनीं पीतांबर फेडून डोक्यापासून पायांपर्यंत सर्व आंगावर घेतला. व आंगांतील आंगरखा व डोक्याची टोपी काढून फेंकून दिली. तेव्हां महाराजांचे डोळ्यांवाटे खळखळ पाणी आलें, व "**पंढरीचा विठोबा वाळुवंटीं,**" असें बहुत वेळां म्हणाले. महाराज सर्व दिवसभर उदास राहिले. सर्व भक्त-मंडळीस वाटलें कीं, कांहींतरी अरिष्ट प्राप्त झालें असावें. पण तें काय हें कोणाचेच लक्षांत येईना. बिचारी भक्तमंडळीही दिवसभर काळजींत राहिली. काकासाहेब रजा नसले कारणानें श्रीसमर्थांची आज्ञा घेऊन निघाले. रात्रौ बारीं

रोड स्टेशनावर त्यांस बातमी कळली कीं, पंढरपुरास कोणी यवनानें पंढरीनाथास धोंडा मारून पाय मोडला. श्रीस्वामीसमर्थांचे आदले दिवसाचे कृतीचें त्यांस स्मरण झालें. व महाराजांची अगम्य लीला त्यांचे लक्षांत आली.

## अभंग

**पंढरीचे लोकां ॥ किती मारूं हाका ॥**
**तेथें माझा सखा ॥ पांडुरंग ॥**

असें महाराज हमेषा म्हणत असत. त्या सख्यास दुखापत झाल्यानें महाराजांचे डोळ्यांस पाणी आलें हें यथार्थच झालें.

काकासाहेब यांनीं श्रीस्वामीसमर्थांचें साक्षित्वाबद्दल कांहीं गोष्टी सांगितल्या त्या खालीं दिल्या आहेत.

## पूर्वी गेला असतास तर गाय चिखलांत रुतली असती.

रावजी भिकाजी ढवळे ऊर्फ रावसाहेब ढवळे यांच्या मातोश्री श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन राहिल्या होत्या. पुण्यक्षेत्रीं आपला देह पडावा अशी त्यांची इच्छा होती. **काश्यां तु मरणान् मुक्तिः।** एक वेळ त्यांची (मातुश्रींची) प्रकृति फार बिघडली, त्यांनीं रावसाहेब यांस एकदम निघून येण्याबद्दल तार केली. तार येतांच रावसाहेब हे श्रीसमर्थाजवळ येऊन आज्ञा मागूं लागले. महाराजांनीं आज्ञा दिली नाहीं. "**बैठ किद्‌र जाता.**" म्हणून महाराजांचा हुकूम झाल्याप्रमाणें रावसाहेब स्वस्थ राहिले. पुढें त्यांचे मातोश्रीस आराम पडून त्यांची प्रकृति चांगली झाली. पुढें एक वर्षानें याचप्रमाणें मातोश्रींची अवस्था असल्याचें पत्र आलें, त्यावेळेसही महाराजांनीं आज्ञा दिली नाहीं, सबब रावसाहेब गेले नाहींत. श्रीसमर्थांचे वचनावर पूर्ण भरंवसा ठेवून बसले. तिकडे मातोश्रींची प्रकृति साफ होऊन त्या पूर्ववत् हिंडूंफिरूं लागल्या. पुढें तिसरे वर्षी त्यांची प्रकृति पुनः बिघडून रावसाहेबांस पाचारण झालें. महाराजांचा निरोप मागतांच महाराजांनीं आज्ञा दिली. ढवळे काशीस गेले, मातुश्रीस देवाज्ञा होऊन त्यांचा यथासांग विधी रावसाहेब यांचे हातून झाला. पुढें ते कांहीं दिवसांनीं अक्कलकोटास दर्शनास गेलें असतां, "**पूर्वी गेला असतास तर गाय चिखलांत रुतली असती.**" म्हणून आज्ञा झाली. याचा अर्थ तूं वर्ष दोन वर्षे विनाकारण अटकून पडला असतास असाच असावा, असें वाटतें. मग महाराजांचा अर्थ महाराजच जाणोत.

रावसाहेब ढवळे हे महाराजांचे मोठे भक्त होते. हे किब्यांचे दिवाण होते. महाराजांची त्यांजवर पूर्ण कृपा दृष्टि असे. एक वेळ महाराजांनीं रावसाहेबांस सोन्यानें मढवलेली रुद्राक्षांची माळ प्रसाद म्हणून दिली होती, ती त्यांनीं पूजेंत ठेविली. रावसाहेबांनीं अलीकडे संन्यास घेऊन धर्मकार्यांत आपला वेळ घालविला. सुमारें साठवर्षांपूर्वी एका भाद्रपद मासीं ते पुण्यास सामाधिस्त झाल्याचें कळतें.

## पोष्टल सुपरींटेंडेंट बाबाजी सदोबा यांस अनुज्ञा; नदी किनारे पार.

रा० रा. बाबाजी सदोबा पोष्टखात्यांतील सुपरींटेंडेंट होते. हे पोष्टखात्याचे उत्तम माहितगार असून, मोठे मेहनती व नियमित वेळीं काम करणारे असून ते एक वेळ शनिवार रविवारची संधि पाहून, अक्कलकोटास श्रीसमर्थांचे दर्शनास गेले होते. दर्शन घेऊन परत जाण्यास आज्ञा मागितली. महाराजांनीं आज्ञा दिली नाहीं. "**बैठ किदर जाता.**" असें म्हणाले. कांहीं वेळ बसून पुनः आज्ञा मागितली, पण आज्ञा मिळाली नाहीं. तिसरे वक्तास आज्ञा मागतां ती न देतां महाराज म्हणाले, "**नदी किनारे पार.**" बाबाजीनीं विचार केला कीं, आतां आज्ञा घेण्याची अपेक्षा धरली तर गाडी चुकून तिकडे सरकारचे नौकरींत अंतर पडेल. महाराजांचा डोळा चुकवून ते निघाले, व कडबगांव स्टेशनावर आले. पण गाडी कोठें आहे ? त्यांस अशी बातमी लागली कीं, मोठा पाऊस पडून कृष्णा नदीस महापूर येऊन कृष्णेचा पूल पडला. गाडी दुसरे दिवशीं सकाळीं आली, तों पावेतों त्यांस स्टेशनावर तिष्ठत बसावें लागलें. तेव्हां महाराजांचें आज्ञा न देण्याचें व "नदी किनारे पार" या म्हणण्याचा अर्थ त्यांस कळून आला.

## युरोपियन इंजिनिअरला पुत्र प्राप्ती.

सोलापुरास रेल्वेकडे एक इंजिनीअर युरोपियन जातीचा असून त्याचकडे डिस्ट्रिक इंजिनीअरचें काम होतें. महाराजांची किर्ती ऐकून तोही एक वेळ कांहीं हेतु मनांत धरून कडबगांवाहून अक्कलकोटास गेला. तो श्रीस्वामी महाराजांचें दर्शन घेऊन व हात जोडून पुढें उभा राहिला. त्याचे तोंडाकडे पाहून महाराज म्हणाले, "**क्या तेरेकू बेटा होना ? हो जावेगा एक बरस दिनमे.**" आपले अंतःकरणांतील महाराजांनीं बरोबर ताडलेलें पाहून, साहेबास फार विस्मय वाटला; व महाराजांचें चरणीं लीन होऊन तो आपल्या कामावर गेला. पुढें एक वर्षाचे आंत त्यास पुत्र प्राप्ति होऊन, तो महाराजांचा भक्त होऊन राहिला.

## डोळ्याचे इस्राइल डॉक्टरास, 'क्यौं, कितने हजार आंख तुमने फोडे.'

सर जमशेटजी जिजीभाईचे दवाखान्यांतील सर कावसजीचे डोळ्यांचें हॉस्पिटलांत एक इस्रायल जातीचा डॉक्टर होता. नाताळ वगैरे सुटीचे दिवस आले म्हणजे मुंबईची चैनी मंडळी "पिक् निक्" पार्टीला कोठें तरी जात असतात, हें सर्वांस माहितच आहे. एकवेळ नाताळचे रजेंत कांहीं मंडळी महाराजांचें दर्शनास व कांहीं गमतीखातर म्हणून अक्कलकोटास जाण्यास निघाली. त्यांचे बरोबर हे इस्रायल डॉक्टरही निघाले. सर्व मंडळीबरोबर त्यानेंही जाऊन श्रीस्वामीसमर्थांचें दर्शन घेतलें. त्यास पाहतांच, "**क्यौं कितनें हजार आंख तुमने फोडे !**" म्हणून महाराजांनीं त्यास प्रश्न केला. हें ऐकून तो आश्चर्यानें थक्क होऊन गेला. आपण आफ्थॉल्मिक् (डोळ्याचे) डिस्पेन्सरीचा डॉक्टर आहों हें महाराजांनीं कसें ताडलें ? याचें त्यास आश्चर्य वाटून, महाराज हे महान् अवतारी पुरुष आहेत, अशी त्याची खात्री झाली. पुढें आपल्या मुलांबाळांसह तो महाराजांचे दर्शनास गेला, व श्रीस्वामीसमर्थांचा भक्त होऊन आनंदानें राहिला.

## तुमारा चोर तर मोंगलाइमें पकडकर रखा है.

हरिश्चंद्र गोपाळजी हे जनार्दन गोपाळजीचे भाऊ असून बडोद्यास राहात असत. त्यांचे घरीं एक ब्राह्मण होता. त्या ब्राह्मणानें एकदां चोरी करून हजार दोन हजारांचा विषय घेऊन तो पळून गेला. पुष्कळ तपास केला पण शोध लागेना. पुढें कांहीं महिन्यांनीं हरिश्चंद्रजी हे अक्कलकोटास श्रीस्वामीसमर्थांचे दर्शनास गेले. श्रीस्वामीचरणीं मस्तक ठेऊन सन्निध बसले. तितक्यांत महाराज म्हणाले, "**तुमारा चोर तर मोंगलाईत** (फलाणे गांवीं) **पकडकर रखा है.**" महाराजांनीं गांवाचें नांव घेतलें, पण हल्लीं तें लक्षांत नाहीं. हरिश्चंद्रजीनें त्याप्रमाणें जाऊन तपास केला तर, खरोखरच ब्राह्मण दागिन्यांसुद्धां मोंगलाईत पकडलेला त्यांस मिळाला. त्यांस मोठा आनंद होऊन दागिने घेऊन श्रीस्वामीगुणानुवाद वर्णन करीत हरिश्चंद्रजी आपल्या गांवीं गेले.

## गरीब ब्राह्मण स्त्रीकडून सहस्र भोजन.

शेर मार्केटाचे वेळीं मुंबईस पुष्कळ लोकांचें नशीब फळफळलें होतें. त्यांपैकींच एक ब्राह्मण असून त्यानें फार पैसा कमाविला; उभयतां स्त्रीपुरुषांस इच्छा झाली

कीं, " नुसत्या पैशास घेऊन काय करावयाचें आहे? एखादें पुत्रसंतान झाल्यास आपण धन्य होऊं." त्याप्रमाणें मनांत येऊन त्यांनीं श्रीदत्तनरसिंहसरस्वती गाणगापूरनिवासी, यांस पुत्रप्राप्ति झाल्यास एक सहस्र ब्राह्मण भोजन घालण्याचा निश्चय केला. नवसाप्रमाणें एक वर्षांतच त्या उभयतांनीं पुत्रमुख पाहिलें. त्यामुळें त्यांचे आनंदास पारावर नाहींसा झाला, पण या जगांतील कोणतीच गोष्ट सुरळीत चालत नाहीं. पुढें झालेली शेराची भरभराटी जाऊन पुष्कळ लोकांचीं दिवाळीं निघालीं. त्यांत ब्राह्मणास दारिद्र्य आल. कालचक्राचा घाला पडून तो पुढें मृत्यु पावला. बाईचे मनांत नवसाची गोष्ट घोळत होती; आपल्या हातून सहस्र ब्राह्मण भोजन कसें होतें, याची तिला चिंता पडली. तितक्यांत तिचे एका शेजारणीनें तिला उपदेश केला कीं, 'गाणगापुरास जाऊन पुत्रासह श्रीदत्ताचे पादुकांची तूं सेवा कर,' म्हणजे श्रीदत्त आपला नवस फेडून घेतील. बाईस ती गोष्ट रुचली. व गाणगापुरास जाऊन तिनें श्रीची सेवा केली. कांहीं दिवस लोटल्यावर तिला एके रात्रीं असा दृष्टांत झाला कीं, 'तुला हजार ब्राह्मणांची शक्ति नाहीं तर अक्कलकोटास जाऊन श्रीस्वामीस जेऊं घाल, म्हणजे नवस फिटेल.' दुसरे दिवशीं सकाळीं बाई उठून अक्कलकोटास गेली. दूर उभी राहिली. तिला पाहून महाराजांनीं जवळ बोलाविलें, व नैवेद्य करण्यास आज्ञा केली. बाईस अत्यानंद होऊन तिनें कणीक, गूळ, तूप, वगैरे शिधा आणला होता, त्याची पाकनिष्पत्ति केली. महाराज येथेच्छ जेवले; व ढेंकर देऊन, "बाई, तुझे हजार ब्राह्मण जेवले बरें," असें म्हणाले. बाईस नवस फिटल्याबद्दल धन्यता वाटून आनंदानें ती मुंबईस परत आली.

कोणी मुंबापुरस्थ रा० रा० जगन्नाथ नारायण शिरोडकर नांवाचे सद्गृहस्थास अद्भुत चमत्कार दाखवून त्यांस जीवदान दिलें. याजबद्दलची हकीकत सदरहू गृहस्थाकडून मिळविलेली आम्ही खालीं देतों.

## दोन्ही पायांस अत्यंत असाध्य घाणेरडा रोग–त्याचें निरसन.

सन १८६१ किंवा ६२ सालांत जगन्नाथपंत हे त्यांचे पायास सतत तीन साडेतीन वर्षें कांहीं रोग होऊन ते फारच इजा भोगीत होते. त्यांनीं आपले पाय पुष्कळ चांगल्या अनुभविक डॉक्टरांस व इतर वैद्यांस दाखवून जीं जीं औषधें व उपाय त्यांस त्यांनीं सांगितलें, ते ते सर्व करून दमले; परंतु त्यांपैकीं एकापासूनही गुण आला नाहीं. शेवटीं कांहीं चांगले हुषार डॉक्टरांनीं दोन्ही पाय ढोंपरापासून कापावे, असें ठरविलें. अशा प्रकारचा

भयंकर उपाय करण्यानें जीविताची आशा तर जगन्नाथरावास राहिलीच नाहीं, परंतु असला अघोर उपाय आपणांस करावा लागेल, अशी धास्ती त्यांचे मनाला बसून ते फारच खेद करूं लागले. त्यांस त्या भीतीनें कांहींच सुचेनासें झालें. अशा विवंचनेंत ते काळ काढीत असतां, त्यांस त्यांच्या कितीएक प्रिय मित्रांनीं सांगितलें, 'अक्कलकोटास श्रीस्वामी महाराज आहेत, ते व्याधिग्रस्तांची व्याधि दूर करितात.' हें त्यांचें भाषण ऐकतांच सदरहू गृहस्थांनीं अक्कलकोटास जाऊन श्रीमहाराजांचें दर्शन घेण्याचा निश्चय केला. व लागलीच बरोबर आपलें कुटुंब, त्यांचा स्नेही, आचारी व आणखी एक चाकर इतकी मंडळी घेऊन ते अक्कलकोटास गेले. अक्कलकोटचे गणपतराव जोशी यांचे घरीं हे गृहस्थ उतरले होते. श्रीसमर्थांची स्वारी या वेळेस चोळापाचे घरीं होती. जगन्नाथरावांनीं श्रीदर्शनास जातेवेळीं बरोबर समर्थांपुढें ठेवण्यास श्रीफळ घेऊन, आपले सर्व मंडळीसह ते श्रीस्वामीरायांचे दर्शनास गेले. अनन्य भावानें श्रीचे चरणीं लीन होऊन, आणलेलें श्रीफळ पुढें ठेविलें. व मनांत सविनय प्रार्थना केली "महाराज मला एक तर हे पाय बरे करून जीवदान द्यावें, अगर एकदांचा या देहाचा संबंध तरी तोडून टाकावा." या प्रकारचा निर्वाणीचा विचार जगन्नाथरावजींचे मनांत येऊन त्यांचे डोळ्यांतून दुःखाश्रु भरून येऊन ते ढळढळा रडूं लागले. ते इतके कीं त्या अश्रुपातांनीं श्रीचरणांबुजांस अभिषिकच केला. त्यावेळेस ही त्यांची करुणरसप्रधान स्थिति पाहून सर्व सभोंवतालच्या मंडळीसही दया उत्पन्न झाली. स्वतः जगन्नाथरावांची स्थिति पाहतां त्यांचे सर्वांगास थरथर कंप सुटून, घर्मानें सर्व शरीर थबथबलें; इतकें कीं त्या घर्माच्या ओलाव्यानें त्यांच्या दुसऱ्या पायांना लाविलेल्या मलमांच्या पट्या आपोआप गळून पडल्या. जणूं काय त्या रोगास श्रीदर्शनाची इच्छा होऊन आपली मुक्ति येथेंच करून घ्यावी, असें वाटलें. असो. याप्रमाणें दोन्ही पायांच्या जखमा उघड्या झालेल्या श्रीचे कृपावलोकनांत येतांच महाराजांचे मुखांतून, '**क्या मादरचोद दरद है.**' अशी वाणी निघाली. त्या गळून पडलेल्या पट्या सदरहू गृहस्थांनीं आपल्या चाकरास फेंकण्यास सांगितल्या. त्याप्रमाणें तो फेकण्यासाठीं त्या गोळा करतोसें श्रीनीं पाहून, '**फेंक देव भानचोदकू**' असे शब्द उच्चारिले. नंतर त्या जखमांस पुनः नवीन पट्या लावून जगन्नाथराव तसेच श्रीचे चरणाजवळ बसले. महाराजांनीं त्यांचेकडे कृपादृष्टीनें कांहीं वेळ एकसारखें पाहिलें. पुढें इतर सेवक मंडळीची गर्दी होऊं लागली तेव्हां आपल्या दुखऱ्या पायांस कोणी धक्का लावील अशा भीतीनें जगन्नाथरावजी हळूहळू मागें सरले.

त्यांच्या कुटुंबानेंही श्रीचरणारविंदीं मस्तक ठेवून, चुडेदान मिळावें म्हणून श्रीचरणीं विनंति केली. तेव्हां महाराजांनीं मस्तक डोलवून मुखांतून कांहीं वाक्य उच्चारिलें, परंतु तें स्पष्ट ऐकूं आलें नाहीं. बाईनें चरणांवर मस्तक ठेविलें तेव्हां हस्त वर करून आशीर्वाद दिल्याचें चिन्ह बाईस दाखवून मस्तक डोलविलें. अशाप्रकारें आशीर्वाद घेऊन सदरील गृहस्थ कुटुंबासुद्धां आपले बिऱ्हाडीं परत आले. घरीं येऊन झालेली सर्व हकीकत त्यांनीं गणपतराव जोशी यांस सांगितली. त्यांनीं आतां तुमचा रोग गेलाच म्हणून समजा, असें जगन्नाथरावांस सांगितलें. मात्र येथें आहांत तोंपर्यंत श्रींचे दर्शनास उभयतांनीं नित्य जावें, म्हणजे झालें. याप्रमाणें उभयतांनीं पुढें एकवीस दिवसापर्यंत सतत श्रीमहाराजांचे दर्शन घेण्याचा क्रम चालविला. कधीं कधीं जिवास चांगलें समाधान वाटलें म्हणजे, दिवसांतून दोनदोनदांहीं सदहू गृहस्थ दर्शन घेत असत. त्यांनीं बरोबर मुंबईहून आणलेली औषधें मलमेंही, ते पायांस लावीत असत. श्रीसमर्थांस अर्पण करण्यासाठीं मुंबईहून त्यांनीं नानाप्रकारचीं फळेंहि आणिलीं होतीं, तीं नित्यशः नवीं नवीं ते नेत, व मनोभावानें श्रीस अर्पण करीत. एके वेळीं नित्य क्रमाप्रमाणें ते दर्शन घेऊन फळें पुढें ठेवून मनांत चिंतन करूं लागले कीं, 'हीं कपाळाचीं कडू औषधें कधीं सरतात कोण जाणें ?' याप्रमाणें त्यांचे मनांत विचार घोळत आहेत, तों श्रीमहाराजांनीं, "**नव औषध तयार होत आहे.**" असें त्यांस म्हटलें. नंतर जगन्नाथरावांनीं श्रीचरणीं नमन करून परत बिऱ्हाडीं आले; व मुंबईहून आणलेलें डॉक्टरचें औषध आतां पुढें घ्यावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला. मात्र जखमा उघड्या न पडाव्या म्हणून पायांस मलम लावीत असत. पुढें एके दिवशीं सकाळचे वेळेस जगन्नाथराव हे गड्याचे खांद्यावर बसून शौचाहून परत येत असतां, 'महाराज मोंगलाईत परत गेले,' असें कांहीं लोक म्हणूं लागले. कोणी म्हणाले, 'ते मुसलमानांच्या दर्ग्यांत गेले आहेत;' तेव्हां चौकशी अंतीं समर्थांची स्वारी मोंगलाईत नरगुंद म्हणून अक्कलकोटापासून सुमारें सहा सात कोसांवर गांव आहे, तेथें गेली, असे नक्की समजलें. बरोबर सेवेकरी वगैरे कोणीच नव्हतें. कांहीं वेळानें सेवेकरी त्या गांवीं जाऊं लागले. त्यांचे बरोबर हे गृहस्थही गड्याचे पाठीवर बसून श्रींचे दर्शनास गेले. तेथें गेल्यावर पहातात तों श्रीसमर्थांची स्वारी मुसलमानांचे दर्ग्यांत बसली होती. श्रींचे खांद्यावर पोपट बसला होता, व वरचेवर श्रीसमर्थ स्वहस्त त्याचे आंगावरून फिरवीत होते. अशी स्वामींची मूर्ति पाहून जगन्नाथरावांनीं

श्रींचे चरण घट्ट धरिले, व मोठ्यानें आक्रोश केला. महाराजांचे सभोंवतीं कांहीं अंतरावर चार बाजूस चार फकीर ते वेळेस बसले होते. आणखी एक फकीर झाडलोट करीत होता., व दुसरा समर्थांसाठीं हुक्का तयार .करीत होता. जगन्नाथरावांनीं रडत रडतच, "देवा, आतां मी काय करूं?" असें समर्थांस म्हटलें. तें वाक्य ऐकून श्रींनीं, "**मालक आला नाहीं.**" म्हणून उत्तर दिलें. हें श्रींचें वाक्य ऐकून सदरहू गृहस्थांनीं विनंती केली, 'देवा मी कोण हेंच मला कळत नाहीं. तेव्हां मालक कोण हें मी अज्ञ पामर काय समजूं?' त्यांचे शोकाश्रूंनीं श्रींचे चरण भिजून गेले. ते स्ववस्त्रांनीं पुसून ते तसेच कांही वेळ तेथें बसले. जगन्नाथरावांनीं चांदीच्या पादुका करून आणल्या होत्या, त्या खिशांतून काढून श्रींच्या चरणांस लाविल्या व श्रींचे सान्निध ठेवून, 'आतां यापुढें या चरणतीर्थावाचून कांहीं एक औषध घेणार नाहीं,' असें ते श्रीमहाराजांस म्हणाले. 'आतां हे चरण तारोत अगर मारोत' कांहींही होवो. याप्रमाणें बोलून पुनश्च त्यांनीं चरणांवर मस्तक ठेविलें. इतक्यांत महाराजांचे डावे बाजूस बसलेला फकीर त्यांस म्हणाला, "तुमारा काम हुवा, फिकीर मत करो." असें तो फकीर म्हणतो आहे तोंच श्रीसमर्थांनीं जगन्नाथरावाचे मस्तकावरून हस्त फिरविला. ह्या श्रींचे आशीर्वाद चिन्हापासून त्या लंगडेबुवास मोठा आनंद झाला, व त्यांनीं आणलेल्या पादुका पुनः श्रीचरणांस लावून आपल्या खिशांत घातल्या. कांहीं वेळानें त्यांचें कुटुंबही तेथें आलें, व श्रींचे चरणांवर मस्तक ठेवून फार शोक केला. तें बाईचें केविलवाणें व अति निकराचें रडूं सभोंवतालचे फकिरांसही ऐकवेना. शेवटीं ते बाईस म्हणाले, "अगे तुझ्या नवऱ्याचें कार्य झालें. जा." या त्यांच्या बोलण्यास श्रीसमर्थांनींही मान डोलवून बाईचे मस्तकावरून हात फिरविला, व त्यांनीं कांहीं वेळानें उभयतां स्त्रीपुरुषांस परत जाण्यास आज्ञा दिली. त्याप्रमाणें अक्कलकोटास परत येऊन ही सर्व हकीकत जगन्नाथरावांनीं गणपतराव जोशांस सांगितली. त्यांनीं, 'आल्याचें सार्थक झालें,' म्हणून म्हटलें. पुढें भोजनोत्तर जगन्नाथरावांनीं वामकुक्षी केली असतां, त्यांस स्वप्नवत् भास होऊन श्रींची स्वारी अक्कलकोटास परत आली असें वाटलें. त्याप्रमाणें जागृत होऊन पाहतात तों खरेंच! श्रींची स्वारी परत आली, म्हणून त्यांस कळलें. ही आल्याची बातमी कळतांच ते श्रींचे दर्शनास गेले. यावेळेस श्रीसमर्थ थोडे रोषांत होते, म्हणून सदरहू गृहस्थांनीं दुरूनच नमन करून कांहीं अंतरावर ते बसले. कांहीं वेळानें तसेच सरकत श्रींचे चरणांजवळ जाऊन त्यांनीं पायांचें वंदन करून ते परत बिऱ्हाडीं आले. दुसरे दिवशीं मुंबईस

श्रींचे चरण घट्ट धरिले, व मोठ्यानें आक्रोश केला. महाराजांचे सभोंवतीं कांहीं अंतरावर चार बाजूस चार फकीर ते वेळेस बसले होते. आणखी एक फकीर झाडलोट करीत होता., व दुसरा समर्थांसाठीं हुक्का तयार करीत होता. जगन्नाथरावांनीं रडत रडतच, "देवा, आतां मी काय करूं?" असें समर्थास म्हटलें. तें वाक्य ऐकून श्रींनीं, "**मालक आला नाहीं.**" म्हणून उत्तर दिलें. हें श्रींचें वाक्य ऐकून सदरहू गृहस्थांनीं विनंती केली, 'देवा मी कोण हेंच मला कळत नाहीं. तेव्हां मालक कोण हें मी अज्ञ पामर काय समजूं?' त्यांचे शोकाश्रूंनीं श्रींचे चरण भिजून गेले. ते स्ववस्त्रांनीं पुसून ते तसेच कांही वेळ तेथें बसले. जगन्नाथरावांनीं चांदीच्या पादुका करून आणल्या होत्या, त्या खिशांतून काढून श्रीच्या चरणांस लाविल्या व श्रींचे सन्निध ठेवून, 'आतां यापुढें या चरणतीर्थावाचून कांहीं एक औषध घेणार नाहीं,' असें ते श्रीमहाराजांस म्हणाले. 'आतां हे चरण तारोत अगर मारोत' कांहींही होवो. याप्रमाणें बोलून पुनश्च त्यांनीं चरणांवर मस्तक ठेविलें. इतक्यांत महाराजांचे डावे बाजूस बसलेला फकीर त्यांस म्हणाला, "तुमारा काम हुवा, फिकीर मत करो." असें तो फकीर म्हणतो आहे तोंच श्रीसमर्थांनीं जगन्नाथरावाचे मस्तकावरून हस्त फिरविला. ह्या श्रींचे आशीर्वाद चिन्हापासून त्या लंगडेबुवास मोठा आनंद झाला, व त्यांनीं आणलेल्या पादुका पुनः श्रीचरणांस लावून आपल्या खिशांत घातल्या. कांहीं वेळानें त्यांचें कुटुंबही तेथें आलें, व श्रीचे चरणांवर मस्तक ठेवून फार शोक केला. तें बाईचें केविलवाणें व अति निकराचें रडूं सभोंवतालचे फकिरांसही ऐकवेना. शेवटीं ते बाईस म्हणाले, "अगे तुझ्या नवऱ्याचें कार्य झालें. जा." या त्यांच्या बोलण्यास श्रीसमर्थांनींही मान डोलवून बाईचे मस्तकावरून हात फिरविला, व त्यांनीं कांहीं वेळानें उभयतां स्त्रीपुरुषांस परत जाण्यास आज्ञा दिली. त्याप्रमाणें अक्कलकोटास परत येऊन ही सर्व हकीकत जगन्नाथरावांनीं गणपतराव जोशांस सांगितली. त्यांनीं, 'आल्याचें सार्थक झालें,' म्हणून म्हटलें. पुढें भोजनोत्तर जगन्नाथरावांनीं वामकुक्षी केली असतां, त्यांस स्वप्नवत् भास होऊन श्रींची स्वारी अक्कलकोटास परत आली असें वाटलें. त्याप्रमाणें जागृत होऊन पाहतात तों खरेंच! श्रींची स्वारी परत आली, म्हणून त्यांस कळलें. ही आल्याची बातमी कळतांच ते श्रींचे दर्शनास गेले. यावेळेस श्रीसमर्थ थोडे रोषांत होते, म्हणून सदरहू गृहस्थांनीं दुरूनच नमन करून कांहीं अंतरावर ते बसले. कांहीं वेळानें तसेच सरकत श्रींचे चरणांजवळ जाऊन त्यांनीं पायांचें वंदन करून ते परत बिऱ्हाडीं आले. दुसरे दिवशीं मुंबईस

परत जाण्याची सर्व तयारी करून उभयतां स्त्रीपुरुष श्रींचे दर्शनास गेलीं, व परत जाण्यास आज्ञा मागितली. श्रींनीं लागलीच, " घरकू जाव." म्हणून आज्ञा केली. ह्याप्रमाणें श्रीसमर्थांची आज्ञा घेऊन जगन्नाथराव मुंबईस जाण्यास निघाले. वाटेंतच पाहतात तों श्रीकृपेनें पायांच्या जखमा थोडथोड्या कोरड्या पडूं लागल्या. जगन्नाथरावांनीं घरीं परत येऊन मातोश्रींचें दर्शन घेतलें, व पुढें नित्य श्रीसमर्थांच्या पादुकांचें तीर्थ प्राशन करावें आणि जखमांस लावावें हा त्यांनीं क्रम ठेविला होता. पुढें दिवसेंदिवस त्या जखमा बऱ्या होत चालल्या; व चारपांच महिन्यांनीं तर त्या जखमा निःशेष झाल्या. तेणेंकरून त्यांस घरांतल्या घरांत फिरण्याची शक्ति आली. पहा काय अद्‌भुत चमत्कार तो ! ! सतत तीन वर्षें ज्या गृहस्थास केवळ दुःखांतच काळ घालवावा लागला, ज्याला मोठ्या कष्टानें रखडत रखडत जाण्याची देखील पंचाईत पडे, त्यास इतक्या अल्प काळांत श्रीचरणकृपेनें चालता केला. याप्रमाणें आपण पांगळ्याचे चालते झालों याबद्दल श्रींची अतर्क्य शक्ति त्या गृहस्थाचे [मनां]त येऊन, त्यांस व त्यांचे कुटुंबांतील माणसांस किती बरें आनंद झाला [अ]सेल ? त्याचा विचार वाचकांनींच करावा.

## असाध्य रोग तीर्थानें बरा झाला.

श्रीस्वामीमहाराजांचे कृपेंकरून जगन्नाथरावजींचे दोन्ही पाय व्याधींपासून मुक्त होऊन, ते चांगले इतर मनुष्यांसारखे चालूं लागल्यावर, जगन्नाथराव एके दिवशीं सहज डॉ. भाऊ दाजी यांचे घरीं गेले. तवेळेस जे पाय कोणत्याही औषधांनीं बरें होणार नाहींत, म्हणून तोडूनच टाकले पाहिजेत असा ज्या भाऊ दाजींचा निश्चय झाला होता, त्यांनीं त्याच पायांची निरोग स्थिति इतर माणसांसारखी पाहून त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. व हा अद्‌भुत चमत्कार कसा झाला ? म्हणून त्यांनीं जगन्नाथराव यांस विचारिलें. तेव्हां, 'श्रीअक्कलकोटचे स्वामीमहाराजांनीं हें चरणदान मला दिलें म्हणून जगन्नाथपंत म्हणाले; आणि औषध म्हणून दुसरें कांहींच केलें नाहीं, फक्त श्रीच्या चरणाचें नित्यशः तीर्थ मात्र लावीत होतों,' असें त्यांनीं त्यांस सांगितलें. हें ऐकून तर भाऊ दाजींस अतिशयित आश्चर्य वाटल. व त्यांनीं ही महाराजांची अघटित लीला, आपल्या सर्व स्नेही मंडळीस दाखविली. पाय बरे होण्याचे पूर्वी डॉ० भाऊ दाजींनीं जगन्नाथरावांस सर जमशेटजीच्या इस्पितळांतील डॉ० हंटर, व दुसरा डॉ० फॅगर्टी, अशा मोठमोठ्या नामांकित डॉक्टरांस स्वतः नऊन दाखविलें होतें. ते वेळेस त्या त्रिवर्गांनीं मिळून जगन्नाथरावजींचे पाय ढोंपरापासून

तोडावेत, असें ठरविलें होतें. तेंच पाय नुसत्या तीर्थानें बरे झाले, हें केवढें श्रीचरणांचें महात्म्य पहा! अथवा अचेतनास देखील चेतना देणारे ते या सचेतन अवयवांस व्याधिमुक्त करतील यांत नवल तें काय!

## श्री शेषाचार्य यांचे वासनेचा क्षय.

आपल्या भक्तांस वासना उत्पन्न झाली तर, कोणत्या तरी युक्तीनें महाराज दूर करीत असत. श्रीगुरुचरित्रांत एका कर्मनिष्ठ ब्राह्मणास त्याचे स्त्रीचे आग्रहावरून भोजनास जाण्याची आज्ञा करून, त्याचे स्त्रीचे वासनेचा नाश केल्याबद्दल गोष्ट आहे. त्याप्रमाणें अक्कलकोटास शेषाचार्य अग्निहोत्री म्हणून वृद्ध गृहस्थ होते. त्यांची वासना महाराजांनीं दूर केली. हे महाराजांचे पूर्ण भक्त असून मोठे सत्त्वस्थ होते. महाराज असतांना ते नित्य दर्शनास जात असत. महाराजांचें त्यांजवर फार प्रेम असे. महाराज कितीही रागांत असले तरी अग्निहोत्रीबुवांनीं खुशाल जाऊन महाराजांचे चरणीं मस्तक ठेवावें. त्यांचा मुळीच राग न धरितां महाराज आ डीनें त्यांस दर्शन देत; व तपकिरीची डबी पुढें केली म्हणजे तपकिरीची चिम् घेऊन महाराज ओढीत. याप्रमाणें नित्य क्रम चालला होता. महाराज रागांत अस- मोठमोठ्या लोकांची पुढें तोंड करण्याची छाती होत नसे, पण "**भक्तिप्रिय. श्रीपतिः**" आपल्या भक्तास दयाळूपणानें दर्शन देत. अग्निहोत्रीबुवांची इतकी निस्सीम भक्ति होती कीं, श्रीसमर्थांचे चरणांवर मस्तक ठेविलें म्हणजे आपलें कुलदैवत श्रीव्यंकटेश महाराजच आहेत अशी भावना धरून ते दर्शन घेत. बुवांकडे अग्निहोत्र असून नित्य कोरान्न मागून ते आपला निर्वाह करीत. याप्रमाणें पुष्कळ दिवस क्रम चालला. महाराजांपुढें पेढे व बर्फीची ताटेंची ताटें भक्तजन घेऊन येत. लहान लहान अर्भकांस व सर्व लोकांस महाराज पेढे बर्फीचा प्रसाद देत. अग्निहोत्रीबुवांस मात्र प्रसाद महाराज कधींही देत नसत. एकवेळ अग्नि- होत्रीबुवांचे मनांत अशी गोष्ट आली कीं, 'महाराज महार लोकांचे पोरांस बर्फी वांटतात, पण आपणांस प्रसाद देत नाहींत, यांस काय करावें? महाराजांनीं कृपा करून तबकभर बर्फी आपणास दिली तर, पोटभर खावून तृप्त होऊं.' ही वासना अग्निहोत्रीबुवांचे मनांत उत्पन्न झालेली महाराजांस तत्काळ कळली. व तेव्हां- पासून अग्निहोत्रीबुवांचें दर्शन बंद झालें. जेव्हां दर्शनास यावें, तेव्हां महाराज निज- लेले असावेत. असें हमेष होऊं लागलें. कित्येक महिने याप्रमाणें गेले. अग्निहोत्रीबुवा आले, व महाराज बसले आहेत अशी संधीच येऊं नये. महाराज निद्रिस्त असतां ते

जागृत होईपावेतों वाट पाहून दर्शन घेऊन जावें, असें बुवांनीं मनांत आणलें तर, महाराजानीं निजल्या निजल्याच नानाप्रकारच्या शिव्या द्याव्या. बुवांनीं मनांत विचार केला कीं, महाराचांचे आपल्यावर इतकें प्रेम असून एकाएकीं अशी इतराजी झाली, व दर्शनही बंद झालें, असा आपला अन्याय तरी कोणता झाला? विचार करितां करितां शेवटीं त्यांचे लक्षांत आलें कीं, आपले मनांत बर्फी खाण्याची वासना उत्पन्न झाली, तेव्हांपासून महाराजांनीं दर्शन बंद केलें. तें आठवून अग्निहोत्रीबुवास फारच वाईट वाटलें. महाराजांची स्वारी त्यादिवशीं खास बागेंत होती. अग्निहोत्रीबुवा अग्निकुंडांत जाळण्याकरितां शेणाचे गोळे करावयास बागेंत गेले होते. हे गेले तेव्हां महाराज निजलेच होते, त्यांस दर्शन झालें नाहीं. शेणाचे गोळे करितां करितां अग्निहोत्रीबुवांस पश्चात्ताप होऊन, हातांत असलेलें शेण त्यांनीं आपले तोंडांत घातलें, व फार पश्चाताप पावून म्हणाले, महाराज आजपासून जर मीं बर्फीपेढे मागेन तर शेण खाईन. कृपाकरून पूर्ववत् मजला दर्शन देऊन, प्रेम कायम ठेवावें. दीनदयाळ स्वामीमहाराजांस भक्ताची करुणा आली, व त्याचवेळीं जागृत होऊन कित्येक महिन्यांत दर्शन दिलें नव्हतें तें अग्निहोत्रीबुवांस दिलें. तेव्हां अग्निहोत्री यांनीं हात जोडून मनांतल्या मनांत पुनः म्हटलें, 'महाराज, तुमचेजवळ बर्फी मागितली ही चूक झाली, आतां मागेन तर शेण खाईन.' असें मनांत म्हटल्याबरोबर महाराज खदखदां हसूं लागले. पुढें पूर्वीं प्रमाणें अग्निहोत्रीबुवांस दर्शन होऊं लागलें. व त्यांची भक्ति श्रीस्वामी चरणीं दृढ झाली. अशी महाराजांची अघटित लीला असे.

## नरसापा सुताराचे घरीं उमाप दुधदुभतें केलें-वासरास वाचविलें.

नरसापा सुतार या नांवाचा स्वामींचा भक्त अक्कलकोटास होता. महाराजांचे चरणीं पूर्ण प्रीति जडली होती. नरसापाजवळ एक म्हैस होती. ती प्रसूत होऊन तिचें वांसरूं दरसाल मरत असे. जन्म होतांच वांसरानें तडफड करून प्राण सोडावा, अशी खोड म्हशीचे संततीस लागली होती. वांसरूं मेल्यावर पुढें म्हशीनें दूध देऊं नये. याप्रमाणें दाराशीं म्हैस असून नसूनही सारखीच होती. नरसापास तिचा कांहीं उपयोग होत नसे. एक वेळ असा कांहीं प्रसंग आला कीं, म्हैस विण्याचे वेळीं महाराजांची स्वारी त्याचे घरांतच आली होती. नरसापानें तेथें जाऊन, महाराजांचे चरणीं मस्तक ठेऊन, प्रार्थना केली केली कीं, 'महाराज एवढें वांसरूं वांचविलें तर आपल्या कृपेनें दूध तरी खाऊं.' नरसापाचे डोळ्यांतून अश्रु

टपटप पडून त्यायोगें महाराजांचे चरण ओले झाले. श्रीसमर्थांस त्याची करुणा येऊन महाराज उठून म्हैशीजवळ गेले. वासरूं तडफड करून यमसदनाचा रस्ता धरण्याचे विचारांत होतें, इतक्यांत महाराजांनीं आपला पाय त्या वांसरावरून दहा पंधरावेळ फिरविला, व आपल्या जागीं जाऊन बसले. वांसरूं मृत्यूचे मुखांत पडलें नाहीं; जिवंत राहिलें. नरसापानें घरांत यथेच्छ दूधदुभतें करून आनंद केला. महाराजांची कृपा झाल्यावर काळाची बिषाद काय? सदरहु पारडी नंतर म्हातारी म्हैस होवून नरसोपाचे घरी होतीं.

## नरसापाचे शेतांत हुरडा, दुसरे वर्षीं ऊंसाची लागवड–उत्कृष्ट पीक.

एकवेळ हाच नरसापा सुतार आपल्या शेतांत जात असतां, महाराज रस्त्यावरील एका दुकानांत बसले होते. नरसापा घोड्यावरून खालीं उतरला, व त्यानें महाराजांस विनंति केली कीं, ‘ महाराज, आमच्या शेतांत हुरडा उत्तम झाला आहे, हुरडा खाण्यास चलावें.’ महाराजांस राग येऊन म्हणाले, “**हात मादरचोदा कधीं हुरडा पेरला होतास ?**” नरसापा हात जोडून म्हणाला, ‘महाराज, चूक झाली, माझें शेत नाहीं, ‘ आपल्या शेतांत हुरडा आहे तो खाण्यास चलावें.’ मग महाराज सेवेकऱ्यांसह हुरडा खाण्यास गेले. नरसापानें हुरड्याबरोबर खावयास ऊंस वगैरे आणले होते. ऊंस खाऊन महाराजांनीं त्यांचीं पेरें शेतांत खेळतां खेळतां रोवून ठेविलीं. नरसापानें तें पाहून महाराजांची इच्छा आपण शेतांत ऊंस पेरावा अशी दिसते, असें मानून ऊंस शेतांत पेरण्याचा निश्चय केला. श्रीस्वामीकृपेनें त्यास उंसाचे उत्पन्न अत्युत्तम होऊन नेहमींपेक्षां वीसपटीनें जास्ती लाभ झाला. अशी समर्थांची लीला होती.

## आमची अडचण होते, सबब आम्हीं जातो.

हा नरसापा स्वामीमहाराजांचा मोठा भक्त होता. स्वामीमहाराज फिरत फिरत याचें घरीं आले म्हणजे त्यांनीं बहुत दिवस आपले घरीं रहावें, म्हणून त्याची मनापासून इच्छा असे. ते कदाचित् रात्रीं निघून जातील म्हणून नरसापानें उंबऱ्यांत निजून रहावें. शौचास वगैरे महाराज बाहेर गेले म्हणजे निघून जातील, म्हणून घरांतच एके बाजूस त्यांस शौचास बसण्याची तो सोय करीत असे. याप्रमाणें नरसापाचे महाराजांचे ठिकाणीं खरें प्रेम असे. एकवेळ महाराज नरसापाचे घरीं आठ दिवस राहिले. तेव्हां सुगीचे दिवस असल्यानें त्याचे मनांत सहज आलें कीं,

सुगीचे दिवस आहेत महाराज घरांत असल्यानें शेतांत जातां येत नाहीं, नुकसान होणार, कसें करावें ? म्हणून सहज मनांत आलें. अंतरसाक्षी महाराजांनीं त्याचें अंतर जाणून प्रातःकाळीं चार वाजतां उठून दरवाजा उघडून बाहेर निघून जाऊं लागले. नरसापा उंबऱ्यांत निजला होता, त्यानें उठून महाराजांस न जाण्याविषयीं विनंति केली. "**सुगीचे दिवस आहेत, तुला अडचण होते सबब आम्ही जातों.**" म्हणून महाराजांनीं त्याचे मनांत आलेले विचाराची त्यास खूण दिली. नरसापाचे मनांत पश्चात्ताप होऊन महाराजांस राहण्याविषयीं त्यानें पुष्कळ विनंति केली, पण त्यावेळीं महाराज त्याचे घरीं राहिले नाहींत.

## दुःसाध्य काम साधुन दिले, बुद्धिदाते महाराज.

महाराजांचे भक्तांचे मनांत आलेली गोष्ट दुःसाध्य असली तरी महाराजांचे कृपेनें ती सुसाध्य होत असे. सोलापूर तालुक्यांत बोरामणी नांवाचा एक गांव आहे, तेथें गणपतराव म्हणून एक लिंगाईत वाणी रहात असे. तो महाराजांचा भक्त होता. प्रत्येक पौर्णिमेस तो अक्कलकोटास महाराजांचे वारीस येत असे. एका वर्षीं गणपतरावानें आतमकार्यास त्या गांवचे कुळकर्ण्यापासून चार पांचशें रुपये कर्ज काढून त्याचे फेडीस आपलें शेत पांच वर्षें कुळकर्ण्याकडे ताबेगहाण लिहून दिलें. पुढें त्या वर्षीं पर्जन्य उत्तम झाल्यानें गणपतराव यांचें शेतांत उत्तम पीक होऊन कुळकर्णी यांचे रुपयांची फेड एक वर्षाचे पिकानेंच झाली. गणपतराव याचे तोंडास पाणी सुटलें. त्यास वाटलें कुळकर्णी यानें कांहीं नफ्याबद्दल जास्ती रुपये घेऊन आपलें शेत सोडून द्यावें, पण कुळकर्ण्याकडे शेत लिहून दिलें असल्यानें व कुळकर्णी आप्पा वस्ताद असल्यानें गणपतरावांचे मनोरथ पूर्ण होणें अशक्य होतें. गणपतराव यांचें मनांत मोठी चटपट लागून राहिली. अक्कलकोटास वारीस गेला असतां हेच विचार मनांत घोळत होते. महाराजांचे दर्शन घेऊन हात जोडून पुढें उभा राहिला. श्रीस्वामी समर्थांनीं त्याचें मन जाणून तेथें टपालचा शिपाई पत्रें वांटण्यास आला होता, त्यास गणपतरावांचें हातांत लखोटा देण्यास आज्ञा केली. महाराजांची आज्ञा सर्व मान्य करीत. टपालवाल्यानें एक पत्र गणपतरावांचे हातांत दिलें. मग भुजंगा शिपाई तेथें होता, त्यास महाराजांनीं आज्ञा केली कीं गणपतरावांस साहेबाचा बंगला नेऊन दाखीव. त्याप्रमाणें भुजंगानें केलें. गणपतरावास त्या कृतीपासून कांहीं बोध होईना. त्यानें महाराजांजवळचे सेवेकऱ्यांस या महाराजांचे कृतीचा अर्थ विचारिला; पण कोणास सांगतां

येईना. गणपतरावांचे मनांत सर्व दिवस महाराजांची कृति घोळत होती. पण त्यापासून काय समजावें, त्याचा बोध त्यास होईना. विचार करितां करितां महाराजांचे कृतीच्या अर्थाचा प्रकाश एकदम गणपतरावांचे हृदयांत पडला. त्यांस वाटलें, लखोटा घेऊन साहेबाचे बंगल्यावर जाण्यास आज्ञा झाली, याचा अर्थ साहेबांकडे अर्ज करावा, असाच आहे. गणपतराव यानें मग अर्ज लिहून सोलापुरास मामलेदारसाहेब यांजकडे गुदरविला. अर्जाची चवकशी चालली गणपतरावाचे साक्षीदार गणपतरावाचे वतीनें सांगूं लागले; कुळकर्ण्यांचे साक्षीदार त्याचे तर्फेनें सांगूं लागले. गणपतरावांचें म्हणणें होतें कीं, आपण एक सालचें करारानें शेत खेडण्यास दिलें. तसा त्यानें पुरावा दिला. मामलतदारानें दोघांचा सारखा पुरावा पाहून एक ऐंशी वर्षांचा म्हातारा शेतकरी शोधून सरकारतर्फे त्याची साक्ष घेतली. तंट्याचें शेत गणपतरावांचे असून त्याखालीं कुळकर्ण्यानें तें खेडलें, व त्यास चार पांचशें रुपयांचा माल उत्पन्न झाल्याचें म्हाताऱ्यानें सांगितलें. मामलेदारास वाटलें, एवढ्या उत्पन्नाचें शेत पांच वर्षे कोणी चार पांचशें रुपयांकरितां लाऊन देईल, हें संभवत नाहीं. कुळकर्णी लोक लुचे असतात, त्यांतून खटल्यांतील कुळकर्णी कामदार असल्यानें तो आपले वजनानें पाहिजे तसा पुरावा आणूं शकेल. दस्तऐवज बेभरंशाचा ठरवून मामलेदारानें शेताचा कबजा गणपतरावास दिला. बुद्धिदाते श्रीसमर्थ आपले भक्तास अनुकूळ अशी मामलेदारास बुद्धि देऊन भक्ताचे मनोरथ पूर्ण केले. गणपतराव मग अक्कलकोटास येऊन श्रीस्वामींचें प्रेमपूर्वक दर्शन घेऊन घडलेली हकीकत त्यानें सेवेकऱ्यांस सांगितली.

## मे. बंबगार्डनसाहेबास लाथ मारल्याबद्दल पश्चाताप, नंतर कृपा.

कोंडूनाना वांकनीस हे अक्कलकोटचे राजेसाहेब यांचे पदरीं नौकर असून श्रीसमर्थ स्वामीमहाराजांचे भक्त होते. एके दिवशीं कोंडूनाना बहिर्दिशेस गांवा-बाहेर जाऊन खासबागेचे विहिरीवर मुखमार्जन करण्यास विहिरींत उतरून हात-पाय धूत आहेत, इतक्यांत मे० बंबगार्डन साहेब प्रातःकाळीं सहल करण्यास खासबागेंत आले. विहिरीजवळ येऊन आंत कोणी तोंड धुऊन पाणी खराब करीत आहे, असें पाहून साहेबांचें पित्त खवळलें. कोंडूनानास वर बोलावून यथेच्छ गालिप्रदान करून बुटांच्या दोन तीन लाथांचाही प्रसाद दिला, व शिपायाकडून धक्के मारवून बाहेर घालवून दिलें. खुद्द राजानेंच मारिलें, त्याची

फिर्याद कोण घेणार? नानास हा अपमान झाल्याचें मरणप्राय दुःख होऊन ते समर्थास शरण गेले. भक्ताभिमानी स्वामीमहाराज मनांत कळवळले. त्यावेळेस कांहीं एक न बोलतां कांहीं दिवसांनीं महाराज बंबसाहेबाचे बंगल्यावर गेले. आगतस्वागत करून, 'महाराज आपण कां' आलां म्हणून प्रश्न केला असतां, भलतेच शब्दांनीं त्याचा जबाब देऊन, "तांदूळ धुतलेलें पाणी पिऊन बस जा." असें महाराजांनीं म्हटलें. साहेबानें त्यांस खुर्ची बसण्यास दिली असतां त्यावर न बसतां रागानें महाराज निघून गेले. नंतर थोडक्याच दिवसांनीं भक्तजनांचे अभिमानी महाराज यांनीं काय चमत्कार केला पहा. बंबसाहेबांनीं ज्या पायांतील बुटानें कोंडूनानास लाथा मारल्या होत्या, त्या पायास रात्रीं विषारी किरडूं चावल्याचें निमित्त होऊन दुःख झालें; व तें इतकें वाढलें कीं, तो पाय कामांतून गेल्यासारखा झाला. त्यामुळें घोड्यावर बसण्याचें मुळींच खुंटलें. कारणपरत्वें बाहेर जाण्याचा प्रसंग आल्यास मेण्यांत बसून साहेब जाऊं लागले. बंगल्यांतले बंगल्यांतही कुबडीशिवाय त्यांस फिरवत नसे. याप्रमाणें व्याधिग्रस्त होऊन केवळ पराधीन झाले. साहेबानें डॉक्टरी उपाय पुष्कळ केले, परंतु गुण येईना. शस्त्रवैद्यांनीं (इम्प्युटेशन) पाय कापला पाहिजे, त्याशिवाय बरा होणार नाहीं म्हणून मत दिलें. बंबसाहेबांस तो विचार मान्य होईना. श्रीस्वामीसमर्थांची कीर्ति ऐकून एके दिवशीं त्यांचे मनांत असें आलें कीं, आपल्या पायांबद्दल गोष्ट महाराजांजवळ काढवून पहावी. मोरो काशी म्हणून अक्कलकोटचे पेनशनर मामलेदार होते, त्यांस साहेबानें बोलावून आपल्याबद्दल महाराजांजवळ गोष्ट काढण्यास सांगितलें. मोरो काशीनें महाराजांजवळ जाऊन प्रार्थना करितांच म्हणाले, "तांदूळ धुऊन त्या पाण्यांतच मग हे (अळूचे गडे) कुसकरून तें पाणी प्यावें व पायांसही लावावें म्हणजे पाय बरा होईल." ही आज्ञा मोरोपंतानें साहेबांस जाऊन कळविली. त्याप्रमाणें औषध करितांच बंबसाहेबांचे पायांचें दोन तीन वर्षांचें दुःख आठ दिवसांतच बरें झालें, व पाय पूर्वीप्रमाणें चांगला झाला. तेव्हांपासून बंबसाहेबांची महाराजांचे ठिकाणीं चांगली भक्ति बसली.

## लखो गुळ खातो माका देत नाय.

महाराज जशास तसे होते. त्यांची बालकाबरोबर लीला खेळण्याची चाल असे. कोणी संसारी आला तर तो जी कामना धरून येई तिजबद्दल निकाल महाराजां-कडून होई. कोणी वेदांती शास्त्री आल्यास त्याजबरोबर वेदांतांतील विषयांवर

महाराज बोलत. मिळून सदासर्वकाळ सच्चिदानंद स्वरूप असून क्षणोक्षणीं अद्भुत चमत्कार दाखवून भक्तपरिपालन करीत असत. सुमारें सन १८७० सालीं मुंबईहून "स्वामीसुताचे" मठांतून ब्रह्मचारी बोवा व दुसरी कांहीं मंडळी अक्कलकोटास गेली होती. त्यांत रत्नागिरी कडची "बाले" मंडळी चेडवोचेडवा करणारी बरीच होती. त्यांस त्यांचे प्रमाणेंच चमत्कार महाराजांनीं करून दाखविला. महाराज चोळाप्पाचे मठांत होते. ब्रह्मचारी बोवा स्वयंपाकास लागले, व एका लख्या नांवाचे बाल्यास दिडकीचा गूळ आणण्यास बाजारांत पाठविलें. भगवान येशी मांजेरकर व दुसरी मंडळी निवळ कोंकणी जवळ बसली होती. कांहीं वेळानें महाराज म्हणूं लागले, "लखो भोसडीचो गूळ खाता माका देत नाय" असें म्हणून हूं हूं हूं करून रडूं लागले. असें तीन चार वेळ महाराजांनीं केलें. तेव्हां भगवान चटदिशीं उठून बाजाराकडे गेले. तिकडून लख्या गूळ खात येतांना दिसला. महाराजांकरितां आणलेला गूळ तूं का खातोस ? स्वामी ओरडत आहेत, म्हणून भगवान पोऱ्यास म्हणाले. त्याच्यानें ती गोष्ट नाकारवेना. मग उभयतां महाराजांजवळ येऊन लख्या त्यांचे चरणीं लागला. गूळ खातो हें महाराजांस कळलें यांत मोठें नवल नाहीं, कारण ते अंतरसाक्षीच होते. पण आम्हांस नवल एवढेंच वाटतें कीं, बाले लोकांची भाषा कोंकणांत जाऊन महाराज केव्हां शिकले असतील ते असोत. धन्य समर्थांची लीला !!

## महाराज, पैसे जने लगे.

एके वर्षी मोहरमाचे दिवसांत श्रीस्वामी समर्थ अक्कलकोटास मध्य वस्तींत खाज्या पिराचा दर्गा आहे, तेथें बसले होते. पुष्कळ सेवेकरी मंडळीही सन्निध होती. महाराजांचे बाललीलेचें खेळणें चाललें होतें. तितक्यांत राजवाड्यांतील एक मुसलमान शिपाई हातांत तबक घेऊन फकिरी मागण्यास जात होता. महाराज बसलेले पाहून शिपाई नमन करण्यास आला. अक्कलकोटवासी जनांस महाराज एक निधानच सांपडलें होतें. सर्वांचा असा नेम असे कीं, वाटेनें जातांना महाराज जवळपास बसले असल्यास, मोठें जरूरीचें जरी काम असलें, तरी समर्थचरणीं मस्तक ठेविल्याशिवाय पुढें जावयाचें नाहीं. धन्य त्या अक्कलकोटवासी जनांची !! आम्हांस तर वाटतें कीं, श्रीकृष्ण परमात्म्यानें गोकुळांत अवतार घेऊन, जसें सकल नरनारी जनांस आपल्या प्रेमळ भक्तीस लावून, त्यांस इहपराची जोड करून दिली; तद्वतच श्रीस्वामी समर्थांनीं अक्कलकोटनिवासी जनांस आपल्या वास्तव्यानें इहजन्मीं

परमानंदाची प्राप्ति करून देऊन आपल्या भक्तीयोगानें पुढील जन्मीं कैवल्यपद मिळण्याचीही वाट चोखाळून दिली. असो. महाराजांचें दर्शन घेऊन शिपायानें रुमालानें झांकलेलें तबक महाराजांपुढें ठेविलें. महाराजांनीं तबक हातांत घेतलें. त्यांत पांच सहा पैसे होते. पैसे हातांत घेऊन एक, दोन, तीन, याप्रमाणें मोजूं लागले. मोजून पैसे तबकांत टाकावे, व पुन्हा हातांत घेऊन मोजावे. असें मोजतां मोजतां १५।१६ पावेतों पैसे वाढले. हा चमत्कार पाहून शिपायाच्यानें उगें राहवेना. "महाराज पसे जने लगे. (विऊं लागले)" असें तो म्हणाला. हें ऐकतांच महाराजांनीं हात आंखडला, व तबक खालीं ठेविलें. व पुन्हा पाहतात तों पैसे ५।६ च तबकांत राहिले. महाराजांचे हातांत प्रथम पैसे नसून मोजतां मोजतां १५।१६ पावेतों पैसे तबकांत झालेले सर्वत्रांनीं पाहिले. पुन्हां पाहतात तों पैसे पूर्वींप्रमाणेंच कायम. ही लीला पाहून सेवेकऱ्यांस परमाश्चर्य वाटून श्रीस्वामी नामाचा त्यांनीं जयजयकार केला.

## श्रीपाद भटजी व भुजंगा विना आज्ञा ताबूत पाहाण्यास जातात. सोन्याचे जोडवें हरवतें.

एक वेळ श्रीस्वामी समर्थ मोदीचे वाड्यांत असतां, मोहरमचे दिवस असल्यानें, श्रीपादभट पुजारी व भुजंगा शिपाई यांनीं ताबूत पाहाण्यास जाण्याविषयीं महाराजांजवळ आज्ञा मागितली. महाराजांनीं जाऊं नको म्हणून आज्ञा केली. मौज पाहण्याची फार उत्कंठा असल्यानें, कांहीं वेळांनीं मोठ्या मिनतवारीनें महाराजांची पुन्हां आज्ञा मागितली. महाराज आज्ञा देईनात. दुसरे सेवेकऱ्यास महाराजांजवळ बसवून हळूच डोळा चुकवून उभयतां ताबूत पाहाण्यास निघून गेले. कृष्णापाचें तीन साडेतीन तोळ्याचें सोन्याचें जोडवें श्रीपाद भटजीचे हातांत होतें. तें ताबुताचे गर्दींत कोणी काढून घेईल, म्हणून हुशार शिपाई भुजंगा याचे हातांत भटजीनें जोडवें घालण्यास दिलें. आपण गरीब आपल्या हातांत जोडवें नको, उगीच गेले आल्यास पंचाईत म्हणून भुजंगा जोडवें घालीत नव्हता; पण आपण जवळच आहों, जोडवें कोठें जातें, असें सांगून त्याचे हातांत श्रीपाद भटजीनें बळेंच जोडवें घातलें. ताबूत बुडविण्याचा तो दिवस होता. हजारों लोकांची गर्दी होती. मजा पहात पहात दोघेजण गर्दींत शिरले. ताबुतावर उडविण्यास भुजंगानें रेवड्या व खारका घेऊन, तो उडवूं लागला. जोडवें त्याचे बोटांत बरोबर बसलें नव्हतें, सैइल होतें. रेवड्या उडवितां उडवितां जोडवें निघून गेलें. भुजंगा व श्रीपादभट घाबरून गेले. हजारों लोकांची

गर्दीं त्यांत जोडव्याचा कशाचा पत्ता लागतो ? दोन तास पावेतों दोघांनीं पुष्कळ तपास केला. पण शोध लागेना. हिरमुष्टे होऊन ते महाराजांकडे परत आले. महाराजांची आज्ञा भंग केल्यानें हा प्रसंग आला. अशी त्यांची खात्री झाली. तोंड लपवीत महाराजांनजीक येऊन दोघे रडूं लागले. नको म्हणत असतां झक मारण्यास कां गेलां ? म्हणून रागावून महाराजांनीं त्यांस पुष्कळ शिव्या दिल्या. अपराधाची क्षमा करावी, व आलेलें संकट दूर करावें. आपण दरिद्री आहों, आतां एवढें सोनें कसें भरून देऊं, म्हणून भुजंगा महाराजांची फार विनवणी करूं लागला. भुजंगावर महाराजांची फार प्रीति होती. श्रीविष्णुचे द्वारीं जसे जयविजय असतात, त्याप्रमाणेंच भुजंगा शिपाई महाराजांचे द्वारचा जयविजय होता. त्यांनें महाराजांची नौकरीही एकनिष्ठपणें केली. असो. महारजांस भुजंगाची दया येऊन, " रडूं नको तुझें जोडवें सांपडेल. घरीं चालत येईल. स्वस्थ बस." असें महाराज त्यास म्हणाले. या बोलण्यावरून भुजंगास धीर आला. कांहीं वेळानें एक पोलिस शिपाई दोन मुलें व जोडवे घेऊन ज्या ठिकाणीं महाराज होते त्या ठिकाणीं आला. जोडवें गेल्याबद्दल पोलिसास वर्दी दिलीच होती. एका मुलास गर्दीमध्यें जोडवें सांपडलें होतें, तें दुसऱ्या एका मुलानें पाहिलें होतें. वांटणीबद्दल दोघांत भांडण लागलें. कशाबद्दल भांडतात त्याचा तपास पोलिस शिपायानें केला, तेव्हां जोडव्याबद्दल भांडण पाहून शिपाई वर लिहिल्याप्रमाणें महाराजांजवळ आला. जोडवें चालत येईल म्हणून महाराज म्हणाले, त्याचा असा अनुभव आला. भुजंगानें आनंदानें मुलास खाऊ देऊन जोडवें श्रीपाद भटजींचे स्वाधीन केले. जरी अवज्ञा केली होती, तरी आपला प्रिय भक्त व सेवक भुजंगा यांजवर दया करून त्यांस महाराजांनीं काळजींतून मुक्त केलें. महाराज भुजंगास फिरंगी म्हणून हाक मारीत.

## अलिजा बहादुर श्रीमंत जयाजीराव शिंदे सरकार

अलिजाबाहादूर शिंदेसरकार श्रीमंत जयाजीराव महाराज यांची स्वारी अक्कलकोटास श्रीमत्परमहंसस्वामी महाराजांचे दर्शनास आली होती. त्यावेळीं स्वामी महाराज अक्कलकोट येथील राजवाड्यांत होते. श्रीमंत जयाजीराव महाराज हे धर्मनिष्ठ, नीतिमान्, दयाळू, अत्यंत उदार, शूर व शुद्ध भाविक असल्यामुळें ते महात्मा, योगी, साधुसंत आणि अवतारी पुरुषांचें दर्शन स्वतः जाऊन भक्तीनें घेत असत. त्यांस राजसत्ता व लक्ष्मी सर्व प्रकारें अनुकूल असतांही, मद, अहंकार

तर नव्हताच, परंतु भगवद्भजनाची इतकी गोडी होती कीं, ते स्वतः आणि त्यांचे पदरीं असलेले मोठमोठे गवयी वगैरे देखील तालसुरांत रागरागिणींत पदें, अभंग वगैरे म्हणून प्रेमभावानें भजन करीत असत; हें सुप्रसिद्धच आहे. यावेळीं शिंदे सरकार यांजबरोबर थोडे लोक होते. त्यांत प्रख्यात उत्तम कीर्तन करणारे गोविंदबुवा नाशीककर स्वामी होते. व वेणीमाधव शुक्रे वांबोरीकर उर्फ रामभाऊ वकील वगैरे होते. स्वेच्छाचारी दत्तात्रय स्वामी राजवाड्यांत राणीसाहेबांकडेस असल्या-कारणानें, दर्शन कसें होईल, असा विचार दर्शनेच्छूंस पडला; आणि स्वामीमहारा-जास राजवाड्यांतून बाहेर आणण्याविषई मसलती खटपटी पुष्कळ झाल्या. परंतु कोणाचें कांहीं चालेना. ॥ **भक्ति प्रियः श्रीपतिः** ॥ हें मुख्य बीज असल्यानें मसलती सवलती जागच्याजागीं मुरल्या. अर्थात मग खटपटीची लटपट पटपट नाहींशी झाली, आणि दुसरे दिवशीं करुणार्णव स्वामी महाराजांनीं श्रीमंत जयाजीराव यांचे शुद्धांतःकरण ओळखून, स्वच्छंदानें श्रीसमर्थ राजवाड्यांतून निघून सेवकजनांसह गांवाबाहेर येऊन, वृक्षछायेंत विश्रांतीस विराजमान झाले. हें वर्तमान शिंदे सरकार यांस कळतांच, राजभोग सोडून घाई घाई पादचारी दर्शनास आले. श्रीफलादिक पुढें ठेवून मोठ्या प्रेमानें दर्शन घेऊन संतोषी झाले. त्यावेळीं श्रीमंत जयाजीराव महाराजांच्या मनोगत सकाम निष्काम प्रश्नांचीं उत्तरें सहज खेळतांना बोलून दाखविलीं, व समर्थांनीं खुणाही दाखविल्या. आजपर्यंत आपल्या प्रश्नाचें उत्तर कोठेंही बहुत दिवसांत देखील मिळालें नाहीं, तें मनांत आल्याबरोबर सहार्थक पाहिजे होतें तसेंच निश्चयात्मक आशीर्वादरूपानें मिळालें, हें अद्‌भूत समर्थांचें अंतरसाक्षित्व, निस्पृहत्व व दयालुत्व पाहून श्रीमंत जयाजीराव महाराज यांस विलक्षण चमत्कार व यथार्थ समाधान वाटलें. व म्हणाले कीं, 'या अपूर्व दर्शनानें मी खरोखरी पुनीत झालों. वाहवा धन्य! अशी दिव्य तेजःपुंज मूर्ति महद्भाग्यानें आजच पाहिली.' तदनंतर गोविंदबुवा स्वामींनीं हरिकीर्तन केलें. तेव्हां श्रीसमर्थांनीं त्यांस आसनारूढ होण्यास आज्ञा केली, आणि समर्थ म्हणाले कीं "दंड कोठें आहे?" नंतर गोविंदबुवा स्वामी बोलले कीं, "मनोवाक् कायादि दंड परमहंसास मुख्यत्वें प्राप्त झाले, म्हणजे बाह्य काष्टदंड त्याग होतो, कोणतीच अपेक्षा राहत नाहीं." आपल्या दर्शनानें परमानंद झाला. आपली निःसंशय, पूर्ण ब्रह्मस्थिति, राजारंकावर अभेद समदृष्टि, आणि कारुण्यवृष्टि पाहून मी तर काय पण सर्वत्र अत्यंत संतुष्ट झाले आहेत. व्यवहार परमार्थ अभेद ऐक्यरूप झाला आहे. तथापि विनययुक्त प्रार्थना इतकी आहे कीं,

आमचे इकडची भिक्षा कृपा करून अवश्य ग्रहण करावी." हे ऐकून श्रीमत् गुरुदेव पोट धरून हांसत हांसत व कांहीं रागानें शब्द संकेत अर्थ जाणून बोलले, "तुमच्याकडे संन्याशास घरदार वगैरे परिग्रह असतो का नसतो? नसल्यास भिक्षा कोठें कोणी करावी? बरें आहे, मग या." तदनंतर वंदन करून सर्वत्र आश्चर्य करीत बिऱ्हाडी गेले. पुनः शिंदे सरकार, गोविंदस्वामी आणि इतर मंडळी दर्शनास आली. त्याकालीं श्रीदत्तावधूत एकाचे ओटीवर बसले होते. सर्वत्रांनीं वंदन करून करद्वय जोडून समर्थांची स्तुति केली. त्यावेळीं स्वामी महाराजांनीं दादूमियास हाक मारून सांगितलें कीं, "**चपातीं और बेसन लाव.**" असा हुकूम झाल्यावर दादूमियानें तयार केलेलें आपल्या स्वच्छ पात्रांत चपाति आणि बेसन आणून पुढें ठेविलें; तेव्हां विचित्रलीला विग्रह श्रीस्वामीसमर्थ मोठ्यानें बोलले, "**आवजी, अभेद परमहंस, भिक्षा, लेव. खाव.**" हें भाषण ऐकून गोविंदस्वामी अति चकित झाले, आणि प्रार्थना करूं लागले, "आपण साक्षात् परब्रह्म मूर्ति निःसंशय आहांत. आम्हां कोणालाही आपली स्वप्नांत देखील बरोबरी करितां येणार नाहीं." तदनंतर श्रीसमर्थ म्हणाले, "**आपण एकच आहों.**" हें अमृतरूप वचन ऐकून गोविंदबुवा स्वामींस व सर्वत्रांस फार आनंद झाला. अशा वेळीं शिंदेसरकार यांनीं श्रीचरणीं अनन्य साष्टांग दंडवत नमन करून आज्ञा मागितली. तेव्हां समर्थांनीं "**निर्भय असा.**" असा आशिर्वाद दिल्यावर श्रीमंत शिंदे सरकार सर्व मंडळीसह प्रसाद घेऊन जयजयकार करीत स्वराजधानीस गेले. जातांना मार्गांत एक विघ्न टळलें. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीमंत जयाजीराव महाराजांस श्रीसमर्थांच्या वरप्रसादें करून सुपुत्ररत्न प्राप्त झालें;

## श्रीमंत तुकोजीराव होळकर यांस दर्शन व प्रसाद.

इंदूरचे श्रीमंत तुकोजीराव होळकर हे मुद्दाम अक्कलकोटास श्रीस्वामीसमर्थांचे दर्शनास आले होते. त्यांनीं आपले बरोबर कांहीं पदरची मंडळी, व दोन पुत्र आणिले होते. श्रीसमर्थांची स्वारी अक्कलकोट गांवांत अण्णा करनाळकर यांचे घराचे पिछाडीस विहिरीजवळ वडाचे झाडाखालीं निजली होती. महाराजांजवळ सेवेकरी, दर्शनास आलेली मंडळी मिळून अडीचशांवर लोक होते. श्रीमंत तुकोजीराव होळकर समर्थांचे पायांशीं दर्शनास येऊन पोंचले, तेव्हां भालदार, चोपदार, यांची 'निगा रखो' म्हणून ओरडण्याची धांदल झाली. होळकर साहेबांची स्वारी दर्शनास आली म्हणोन, समर्थांपाशीं मंडळी बसली होती ती उठून उभी

राहिली; व गांवांतील लोक श्रीमंत तुकोजीराव आले म्हणून पाहाण्यास पुरुष, बायका व मुलें यांची गर्दी बरीच जमली होती. त्यासमयींचा देखावा पाहण्यासारखा होता. महाराज पलंगावर निजलेच होते. त्याठिकाणीं श्रीमंत तुकोजीराव यांनीं पुत्रांसहित समर्थांचें दर्शन घेतलें. व हात जोडून विनंति केली, "माझे वडिलांचे व अहिल्याबाईचे पुण्याईनें आज पुनः हे चरण दिसले. पूर्वी देशपर्यटण करीत असतां अबूचे पहाडावर ह्या चरणांचें दर्शन झालें होतें. आज माझा मोठा भाग्योदय समजला पाहिजे." याप्रमाणें श्रीमंत तुकोजीराव यांनीं सद्गदित अंतःकरणानें केलेली स्तुति श्रीसमर्थांनीं जाणून पलंगावर उठून बसले; व तुकोजीरावास म्हणाले, "**तुमारे व्हां आंबके झाड है ?**" अशी आज्ञा होतांच तुकोजीराव यांनीं आपल्या मुलांकडे बोट दाखवून, "आपके कृपेसे दो आंबके झाड है," असें उत्तर देतांच श्रीसमर्थांनीं आपल्या डोकीवरील भरजरीची टोपी श्रीमंत तुकोजीराव यांचें आंगावर फेंकून दिली. तो प्रसाद तुकोजीराव यांनीं घेऊन समर्थांचे गळ्यांत फुलांचे हार व हातांत गजरे घालून मेवामिठाईची तबकें पुढें ठेविलीं. नंतर तुकोजीराव हे दर्शन घेऊन खासबागेंत उतरण्यास गेले. दुसरे दिवशीं सेवेकरी मंडळीस व गांवांतील विद्वान् भिक्षुकांस दक्षणा वगैरे देऊन, महाराजांचें दर्शन घेऊन, तुकोजीराव इंदुरास परत गेले. पहा केवढा चमत्कार! श्रीस्वामी महाराज मंगळवेढें, बेगमपूर, चळआंबे, पंढरपूर, मोहोळ, सोलापूर आणि अक्कलकोट हे प्रांत सोडून दुसरीकडे गेले नाहींत. हें सर्व लोकांस प्रसिद्ध असून, श्रीमंत तुकोजीराव यांस महाराजांनीं आबूचे पहाडावर दर्शन दिलें. आबूचे पहाडावर श्रीदत्तात्रयाच्या पादुका असोन महान् योगी तपश्चर्या करण्यास राहिले आहेत. त्या स्थळीं श्रीमंत तुकोजीराव यांस महाराजांनीं दर्शन दिलें हें किती आश्चर्य! **भक्तिप्रियः श्रीपतिः ॥** जसा भाव तशी कृपा श्रीस्वामीमहाराज करीत होते.

## बडोद्यास महाराजांस आणून, तें वैकुंठ वसविण्याची मल्हारराव गाईकवाड यांची मनीषा.

श्रीस्वामीसमर्थांचे दर्शनास शिंदे होळकर व इतर मोठमोठे संस्थानिक येऊन महाराजांचा आशिर्वाद घेऊन परत गेले. श्रीमंत मल्हारराव गाईकवाड हे बडोद्याचे गादीवर बसल्यावर समर्थांची कीर्ति ऐकून त्यांचे एकंदर विलक्षण कृतीप्रमाणें आपण दर्शनास जाण्यापेक्षां श्रीस्वामीसमर्थांसच बडोद्यास आणवून, बडोदें शहर भूवैकुंठ बनवावें, असा विचार करून, तो सिद्धीस जाण्याबद्दल त्यांनीं भगीरथ प्रयत्न केला. पण तो फसला. त्याबद्दल आम्हीं थोडक्यांत हकीकत देत आहों.

एके दिवशीं मानकरी, सरदार, दरकदार वगैरे लोक दरबारांत बसले असतां, श्रीमंत मल्हाररावांनीं आपला विचार सर्वांस कळविला. व श्रीस्वामीसमर्थांस बडोद्यास घेऊन येण्याचें काम कोणी पत्करल्यास त्यास आपण मोठें इनाम देऊं व जहागीर देऊं, व महाराजांस आणण्याप्रीत्यर्थ पाहिजे तितकें द्रव्य खर्चण्यास देऊं, म्हणून आपले मनोगत सर्वांस त्यांनीं विदित केले. हें ऐकून तात्यासाहेब नांवाचे एका सरदारानें हें काम फत्ते करण्याबद्दल विडा उचलला. श्रीमंत मल्हाररावांस मोठा आनंद झाला व त्यास लवाजम्यानिशीं पुष्कळ द्रव्य देऊन अक्कलकोटास जाण्याची आज्ञा दिली. तात्यासाहेब अक्कलकोटास आल्यावर महाराजांसन्निध असलेले सेवेकरी मंडळीस त्यानें द्रव्य वस्त्रपात्र वगैरे देऊन खुष करण्याचा क्रम चालविला. सेवेकऱ्यांसच काय, पण अक्कलकोटांतील सर्व ब्रह्मवृंदास बुंदी, मोतीचूर, जिलबी, साखरभात अशीं पक्कान्नें करून सहस्र भोजनें घालून त्यानें तृप्त केलें. अक्कलकोटास म्हण पडली आहे कीं, "पक्कान्नें करावीं बडोदकरानें व दक्षिणा द्यावी राजे रायरूनें." असो. तात्यासाहेबांचे मनांत कीं, कसेंही करून इष्ट हेतु सिद्धीस जावा. त्यांस वाटलें कीं, चोळापा महाराजांचा पूर्ण भक्त आहे, त्यानें महाराजांस विनंति केल्यास महाराज बडोद्यास खास येतील. अशा समजुतीनें त्यानें चोळापास सांगितलें, "कसेंही करून महाराजांस बडोद्यास घेऊन चला; तुम्हांस राजाकडून दहा हजार रुपयांची जहागीर करून देतों." हें ऐकून चोळापाचे तोंडास पाणी सुटलें.

## अरे त्याजजवळ भक्तीच नाहीं.

एके दिवशीं श्रीसमर्थांची स्वारी आनंदांत असतां चोळापानें हात जोडून प्रार्थना केली "महाराज, मला जहागीर मिळण्याची संधि आली आहे, तर आपण कृपा करून बडोद्यास मल्हाररावाकडे चलावें." महाराजांनीं हास्य करून उत्तर दिलें "अरे त्याजवळ भक्तीच नाहीं." हें ऐकून चोळापा निराश झाला. याशिवाय महाराजांचे मन वळविण्यास तात्यासाहेबानें पुष्कळ प्रयत्न केले, पण ते सर्व व्यर्थ गेले. पुढें महाराजांनीं कृपा करावी म्हणून गुरुचरित्राचे सप्ताहास त्यानें ब्राह्मण बसविले. पण महाराज त्याचे वाड्यात मुळींच गेले नाहींत. मग त्यानें शेवटला उपाय योजिला. तो असा कीं, महाराजांस गुपचिप मेण्यांत घालून कडब गांवापर्यंत न्यावें, व तेथें आगगाडींत बसून बडोद्याची वाट धरावी. साक्षात् दत्त अवतार स्वामीमहाराज, यांचें वैभव मनांत न आणितां प्राकृत जनांप्रमाणें त्यांस पळवून

नेण्याची ही युक्ति योजलेली कितपत सिद्धीस जाणार ? कडबगांवचे रस्त्यानें मेणा चालल्याबरोबर, अंतरसाक्षी महाराजांनीं खालीं उतरावें, याप्रमाणें बरेंच वेळ झालें. पुढें तर कांहीं दिवस महाराज राजवाड्यांत जाऊन राहिले. तेव्हां मंडळीचा अगदींच नाइलाज झाला. याप्रमाणें तात्यासाहेबांनीं चार महिने भगीरथ प्रयत्न करून व हजारों रुपयांचा फडशा उडवून, शेवटीं अपयश येऊन बडोद्यास प्रयाण केलें. मल्हारराव गायकवाड यांची या गोष्टीनें निराशा न होतां, महाराजांस आणण्या-संबंधानें त्यांनीं आणखी प्रयत्न चालविला. यावेळेस यशवंतराव नांवाचा एक मराठा मुत्सद्दी यानें पुढें होऊन महाराजांस बडोद्यास आणण्याची कामगिरी पतकरली. बहुत द्रव्य बरोबर घेऊन खुद्द महाराजांकरितां उंची वस्त्रें व हिरे माणकांचे दागिनें घेऊन स्वारी अक्कलकोटास येऊन थडकली. हें लोक पिछा सोडीत नाहींत हें पाहून महाराजांस राग आला.

## यशवंतराव यांसः–काय आहे रे बिंडी ठोका.

आपणाकरितां आणलेलीं वस्त्रें व दागिने यांचा स्वीकार न करितां, यशवंतराव दर्शन घेऊन हात जोडून सन्निध उभा राहिला असतां त्याचे तोंडाकडे पाहून महाराज म्हणाले, “ **काय आहे रे बिंडी ठोका.**” याप्रमाणें तीन वेळ महाराज म्हणाले. पुढें दोन तीन दिवसांनीं हुकूम पाहतांच परत निघून येण्याबद्दल बडोद्या-हून यशवंतरावास पत्र आलें. यशवंतराव परत गेल्यावर बडोद्यास विषप्रयोगाचा खटला चालून परिणामीं मल्हारराव व त्यांचे अनुयायी यशवंतराव व दुसरे लोक यांस मद्रासेंत अटकेंत रहावें लागलें, हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच. ह्याप्रमाणें श्रीस्वामी-समर्थांची अघटित लीला होती.

# भाग तिसरा.

## वामनबावा बडोदेकरांची अनुभविक माहिती.

वामनबावा ब्रह्मनिष्ठ बडोदेकर हे स्वामीभक्त असून महाराजांबद्दल स्वतः अनुभव त्यांनीं घेतलेला आहे. त्यांनीं महाराजांसंबंधानें खात्रीलायक अनुभविक पाठविलेल्या गोष्टी जशाच्या तशाच या भागांत दिल्या आहेत.

श्रीस्वामी महाराज शके १७७९ त आले. त्याचे दुसरे दिवशीं अक्कलकोट येथें सरकारी गणपति मंदिरांत गेले. ही वार्ता राजवाड्यांत कळतांच श्रीमंत मालोजी महाराज भोंसले, राजेसाहेब, आपल्या सर्व मंडळीसह श्रीयतिराजांचे दर्शनास आले. समर्थांपुढें राजेसाहेबांनीं श्रीफल ठेवून पुष्पांचे हार कंठांत घालून अनन्यभक्तीनें श्रीगुरुचरणीं नमन केलें. अपूर्व दिव्य सतेज चिन्मूर्ति पाहून एककालीं एकरूप आनंद झाला. त्यावेळीं स्वामीमहाराजांनीं मालोजी महाराजांस श्रीफल प्रसाद दिला. इतर मानकरी व दाजीबा भोंसले यांस गळ्यांतील पुष्पहार दिले, आणि भगवी लंगोटी, कफनी, टोपी यांचा बोळा करून राजेसाहेबांकडे फेंकून दिला; व अवधूत दिगंबर चालते झाले. लोकांनीं भगवीं वस्त्रें समर्थांचे हातीं दिलीं. त्याकालीं राजेसाहेबांजवळ एक जंगम साधु होता.

## दाजी पिराजी भोंसले अनन्य भक्त बनले.

दाजी पिराजी भोंसले अक्कलकोट संस्थानांत खाजगी कारभारी होते. लक्ष्मीच्या मदानें व स्वामी महाराजांची आज्ञा भंग केल्यानें दाजीबास अक्कलकोट सोडावें लागलें. यांजवर श्रीमंत मालोजी महाराजांची दया होती. राजेसाहेबांच्या सहवासानें योग व स्वरोदय दाजीबा बरेच जाणत होते. तसेंच गायन, तंतुवाद्य, कसरत, लिहिणें, चित्र काढणें वगैरे कामांत हुशार होते. यांचे शरीर सशक्त व दृढ होतें. मुंबईस राहून पुन्हां कामावर गेले होते. नंतर मुंबईस येऊन कांहीं दिवस राहून पुढें

मुलीचें लग्न बडोद्यास करून फार वर्षें राहिले. यांस स्वामीचरित्राची खरी माहिती फार असून ते अनुभवांतीं स्वामी महाराजांचे अनन्य प्रेमळ भक्त बनले, व त्यांस सद्‌गुरु स्वामीकृपेनें तत्त्वज्ञानही झालें. हें चरित्र दाजीबा वरचेवर प्रेमानें सांगत असत.

## वामनबुवांचे आत्मवृत्तांत व स्वानुभवाच्या गोष्टी.

स्वामीमहाराजांस अक्कलकोटास येऊन तीन वर्षें झाल्यानंतर मीं समर्थांचे दर्शनास प्रत्येक वर्षांत दोन वेळ किंवा एक वेळ कोणत्या तरी महिन्यांत जात असें. मला लहानपणापासून सत्संगाची आवड व दत्तात्रयाची ( उपासना ) भक्ति होती. मी अहमदनगरापासून जवळ सात कोसांवर वांबोरी गांव आहे तेथील राहणारा आहें. मौंजी झाल्यानंतर वेदाध्ययन केलें व शाळेंत अभ्यास करून पास होऊन सरकारी नोकरी शाळाखात्यांत केली. तशीच धुळ्यास कलेक्टर आफिसांत केली. इंग्रजी भाषेचा पांच बुकापर्यंत खाजगी रीतीनें अभ्यास केला. नंतर अहमदनगर येथें वृत्तवैभव छापखान्यांत नोकरी करून तेथें संस्कृत अभ्यास केला, परंतु कोठेंही चित्त स्थिर राहीना, तळमळ व संशय जाईना, सत्संगाच्या प्रीतीमुळें साधु, संत, फकीर, साई, जतीजंगम, संन्याशी, योगी, वेदांती, जोशीभक्त, हरिदास, महंत, मठाधिपती, ब्रह्मचारी त्रिकाळज्ञानी वगैरे पुष्कळ भेटले. त्यांचे यथाशक्ति आदरातिथ्यही करीत होतों, परंतु कोणापासूनही चित्तास स्थिरता व समाधान झालें नाहीं. अहमदनगरास असतां असें ऐकिलें कीं, अक्कलकोटास कोणी स्वामी आले असून ते मनांतील सर्व सांगतात. अशा संबंधानें नोकरी सोडून मातोश्रीसह पायमार्गें पुण्यास आलों. तेथें काप्या लिहिण्याचें काम व दुसरी नोकरी धरली. तुळशीबागेंत नाना नातूंच्या माडीवर रहात होतों. तेथें एके दिवशीं गोपाळराव दादा नातु, व्यंकया तैलंग, एक पुराणिक व मी शेषशाईजवळ सत्पुरुषांच्या गोष्टी सांगत होतों. इतक्यांत एक ब्राह्मण तेजःपुंज आमच्यांत येऊन म्हणाला, 'सद्‌गुरुकृपेवांचून व्यर्थ आहे.' नंतर मी विनंति केली कीं ज्याच्यानें चित्त स्थिर व पारमार्थिक समाधान होईल त्याला सद्‌गुरुदत्तात्रयस्वरूप मानूं, परंतु अद्याप असा कोणी पाहण्यांत आला नाहीं. ब्राह्मण म्हणाला, "तुला गुरुदत्तात्रय-स्वरूप स्वामी अक्कलकोटास दर्शन देतील व तुझें समाधान होईल. जा लौकर." असें म्हणून तो ब्राह्मण कोठें गेला तो पाहत असतां आम्हां कोणासही दिसला नाहीं. पुढें सगळे म्हणाले एकदां जाऊन खरें काय तें पहा. हें कार्तिक वद्य १२ स

बोलणें होऊन मार्गशीर्ष शुद्ध १ स पुण्याहून निघून सोलापुरापर्यंतच रेलवे चालू झाली होती. सोलापुरास स्वामींचे अनुयायी मोहनी देवाचें दर्शन करून पायमार्गें अक्कलकोटास गेलों. तेथें तपास करितां स्वामी महाराज हद्रेस आहेत असें कळलें. नंतर दुसरे दिवशीं नागणसुरास गेलों. हचनाळ, हद्रे वगैरे फिरत भीमातीरीं रोडगी व मिरगी या दोन गांवामधील पयो नदींत श्रीस्वामी महाराजांनीं दत्तरूपानें दर्शन दिलें. आणि समर्थ म्हणाले, '**कां रे आमच्या ब्राह्मणाची थट्टा केलीस?**' अशी खूण मिळतांच मी स्नान करून स्वामीमहाराजांचें पयो नदींत पूजन करून साष्टांग नमस्कार केला. मनांत विनंति केली त्याप्रमाणें मंत्रसह अवधूत दत्तात्रय गीता टाकली आणि दत्तदिगंबर म्हणाले कीं, '**आमची नोकरी कर म्हणजे ब्रह्मनिष्ठ होशील. आण तुझें गाठोडें, आम्हांस दे.**' नंतर लंगोटी नेसून सर्व सामान पुढें ठेविलें. ह्यापैकीं नाशिकी तांब्या, पाणी भरलेला मला दिला व सर्व सामान संभाळून घे म्हणून बोलले. त्या वेळेस एक घोडा व २० मनुष्यें स्वामी महाराजांसन्निध होतीं. महाराज पायीं चालले असून शरीर दिव्य, तेजःपुंज, व सदृढ होतें. सेवेंत चोळापा व श्रीपादभट होते. एक म्हातारी सोनारीण होती. ती वेड्यासारखें करी. परंतु स्वामीमहाराजांचा शब्दार्थ तिला समजत असे. त्यावेळीं नृसिंहवाडीचीं ६ मनुष्यें नवस फेडण्यास आलीं होतीं. त्यांपैकीं कलापानें विचारलें, "स्वामीन्, आपण कोण आहां?" त्यावेळीं श्रीसमर्थ म्हणाले "**मूळ पुरुष वडाचें झाड दत्त नगर.**" हें ऐकतांच म्हातारी सोनारीण बोलली, "वटपत्रशयनीं मूळ पुरुष दत्तात्रयरूपानें अवतरले आहेत." हा अर्थ यथार्थ आहे.

## कर्व्यांनीं महाराजांस ज़ात गोत व रास विचारली.

कर्वे यानीं विचारलें "हें महाराजांचे सत्यर्थरूप वचन आहे काय? ' परंतु आपली ज्ञाती कोण," वगैरे विचारतां श्रीसमर्थ म्हणाले, '**आम्हीं यजुर्वेदी ब्राह्मण, आमचें नांव नृसिंहभान, काश्यपगोत्र आमची मीनराशी**' 'पुन्हां विचारल्यास टाळक्यांत पायपोस.' 'कारे तुझी फक्कड मुलगी पुण्यांत रात्रंदिवस + + + फिरते तिची ज्ञाती कोण?' असें ऐकतांच कर्व्यांनें खालीं मान घातली व रडूं लागला. महाराजांस साष्टांग नमन करून म्हणाला, "आपण साक्षात् परब्रह्म त्रैमूर्तीस्वरूप निःसंशय आहां, काय करावें अपकीर्तिपेक्षां मरण बरें." यावर सर्वांतरसाक्षी महाराज म्हणाले, '**रोता है क्यों? जाव होली करो.**'

या वाक्याची प्रचीती पुढें अशी आली कीं पुण्यास गेल्यावर होळीचे दिवसांत कर्वे यांची दुष्कर्मी कन्या आजारी होऊन यमसदनास गेली. पुढें दत्तजयंतीसाठीं स्वामीमहाराज अक्कलकोटास आले, व वाडीकडील मंडळीसह मी गाणगापुरास गेलों. तेथें गुरुचरित्राचा सप्ताह पठण केला. स्वप्नांत संन्याशी येऊन पोथी दिली व सांगितलें कीं, " मीच अक्कलकोटास आहें, आतां भटकण्याचें काम नाहीं, स्वस्थ भटाच्या तिथीचा विचार करा. " नंतर समाराधना करून अक्कलकोटास आलों. स्वामीमहाराजांस अनन्य साष्टांग प्रणिपात करून मनांत विनंति केली कीं, " भट कोण तिथी कोण, हें मी समजत नाहीं. मी अज्ञान दास आहे, कृपा करून सांगावें, " यावर परम कारुणिक सद्गुरुमहाराजांनीं उत्तर दिलें कीं, '**प्रकृति पुरुष**' यावेळीं एक मास अक्कलकोटास राहिलों असतां महाराज म्हणाले कीं, '**जा गाईची सेवा कर, गाईला चारा घाला.**' म्हणजे मातोश्रीची सेवा व पोषण करावें अशी आज्ञा घेऊन पुण्यास आलों. स्वामीमहाराजांच्या दर्शनापासून चित्त स्थिर राहतें आणि तळमळ जाऊन निःशंक समाधान, शांतवृत्ति रहात आहे. कांहीं दिवस पुण्यास राहून बडोद्यास येऊन राहिलों आहें. निरंतर स्वामीसमर्थांचें भजनपूजन व अभ्यासपूर्वक वेदांत ग्रंथावलोकन करीत असतों.

## महारोगी पंजाबी व एक वृद्ध वैष्णवाचा पोटशूळ बरा झाला.

शके १७८६ मध्यें पंजाबांतील एक मनुष्य महारोगानें पीडलेला, शरीरानें उंच बोलण्यांत मोठा धीट असा अक्कलकोटास महाराजांचे दर्शनास आला. यावेळेस श्रीसमर्थांची स्वारी अक्कलकोटास साखर विहिर आहे तेथें बसली होती. बरोबर सेवेकरी लोक होते. एक वृद्ध असा वैष्णव ब्राह्मण पोटशूळानें अजारी असलेला महाराजांसंनिध एका निंबाचे खालीं बसला होता. आपली व्याधी समर्थांनीं दूर करावी म्हणून त्याची श्रीचरणीं प्रार्थना चालली होती, इतक्यांत दंडवत घालून पुढें उभा राहिला आणि म्हणाला 'आप बहूत चमत्कार बताते हो, यह श्रवण करके मै आया हूं.' हें त्याचें भाषण श्रवण करून श्रीसमर्थ त्यास मोठ्या रागानें म्हणाले कीं '**चमत्कार बैठे + + + पर चमत्कार गारुडीके खेलमे देखे. दहीं बर्फी खाके रंडीकूं + + + है, और मगरमस्ती करता है. तेरेकू आच्छा रंडीके चमत्कार दिनरात दिखता है. और चमत्कार चहाये.**' असें भाषण करून महाराजांनीं आपली लंगोटी फेडून त्यास दाखविली. हें समर्थांचें सर्वज्ञपणाचें वाक्य ऐकतांच तो

दुष्कर्माचरणी मनुष्य मनांतल्या मनांतच विरमून तटस्थ उभा राहिला. इतक्यांत इकडे तो पोटशूळानें ग्रस्त झालेला ब्राह्मण निंबाचे झाडाखालीं बसला होता, त्यास समर्थ म्हणाले. कारे **'आम्ही तुझे बापाचें काय लागतों, तूं उगीच आम्हां संन्याशाजवळ येऊन कां मरतोस? जा, हत्तीच्या लेंड्या आणि या तुझ्या डोक्यावरील निंबाच्या झाडाचा पाला, एकत्र करून खा. म्हणजे तुझा पोटशूळ जाईल.'** हें समर्थांचें वाक्य त्या ब्राह्मणानें शिरसावंद्य करून लागलीच जाऊन त्यानें त्या दोन जिनसा एकत्र करून खाल्या. समर्थांचे कृपेनें त्या ब्राह्मणास त्याचे योगानें तत्काल गुण आला. तेव्हां आपला फार दिवसांचा रोग श्रींचे चरणकृपेनें तत्काल नाहींसा झाला हें मनांत येऊन ब्राह्मण श्रीसमर्थांचे चरणीं लीन झाला. आणि दीनदयाळ भक्तवत्सलप्रभूचा आपणास अनुग्रह व्हावा म्हणून चरणारविंदी विनंति केली. श्रीस्वामीमहाराज हास्यवदन करून त्यास म्हणाले, **'जा कांद्याचीं बोंडें खा'** हें श्रीमुखांतील प्रेमयुक्त भाषण ऐकून वैष्णव ब्राह्मण कांद्याला शिवत नसून त्यांस समर्थ कांदे खा म्हणाले, याबद्दल सर्वत्रांस मोठें कौतुक वाटलें. हें कृपावंताचे मुखांतील अनुग्रहाचें वचन श्रवण करून त्या वृद्ध वैष्णवासही आनंदच झाला, आणि श्रीगुरूचें अवतरण आम्हां दीन दासांचे उद्धारणार्थ झालें असें जाणून त्यानें महाराजांची बहुत प्रकारें स्तुति केली.

## आर्या.

**यतिरपि विश्वकुटुंबी दृढवैराग्योपि रागवाद्न्ये।**
**भिक्षाश्यपि जगदीशश्चरितं चित्रं तदेतदाभाति ॥ १ ॥**

हा तात्कालिक घडलेला चमत्कार त्या पंजाबी मनुष्यानें पाहून आपल्या अंतस्थ दुष्कृति समर्थांनीं सर्वज्ञपणानें जाणल्या हें सर्व मनांत आणून तो अगदीं लीन झाला, व स्वकृतीचा मोठा पश्चात्ताप करूं लागला. पुढें दोन महिने सतत श्रीसमर्थांची सेवा करून श्रींचे कृपेनें तो महारोगापासून दूर होऊन परत स्वदेशीं गेला.

## गोविंद शास्त्री यांस धनप्राप्ती.

अक्कलकोटास कोणी गोविंदशास्त्री ह्मणून एक धनहीन गृहस्थ राहत होते. त्यांचे मनांत जसें श्रीसमर्थ हजारों सेवक जनांच्या त्यांचे हेतुनुरूप मनकामना पूर्ण करतात, तसें आपणही धनप्राप्तीसाठीं श्रींचें दर्शन घेऊन पहावें, असें मनांत

येऊन ते श्रीस्वामीमहाराजांचे दर्शनास गेले. श्रींचें दर्शन घेऊन ते खालीं बसले तोंच समर्थांनीं त्यांचे मनांतील आशय जाणून त्यांस आज्ञा केली कीं, '**तुमचे घराचे परसांत पारींचें झाड आहे त्या खालीं आहे तें घेऊन स्वस्थ हरि हरि करीत बसा.**' हें श्रीमुखांतील वाक्य श्रवण करून शास्त्रीबुवा आनंदभरित झाले, आणि श्रीचरणारविंदीं नमन करून परत घरीं गेले. घरीं जाऊन समर्थांचे आज्ञेप्रमाणें परसांतील फुलझाडाखालीं खोदून पाहिलें तों तेथें पुरलेलें धन त्यांस सांपडलें. अशा प्रकारें आयता धनलाभ झाल्यावर मग शास्त्रीबुवांचे आनंदास काय विचारावें ? ते मोठ्या प्रेमभरानें श्रीयतीराजांचे गुणानुवाद गाऊं लागले. व पुढें श्रींचे आज्ञेप्रमाणेंच त्यांनीं हरि हरि म्हणून काळ घालविला. ही सर्व हकीकत ब्राह्मनिष्ठबुवांनीं स्वतः पाहिलेली आहे.

## वृद्ध तेल्यास धनप्राप्ती व बाईस पुत्रप्राप्ती.

श्रीस्वामीमहाराजांचे दर्शनास एके वेळीं अक्कलकोटास कोणी बसापा नांवाचा तेली आला होता. या तेल्याची बायको तीन मुलगे होऊन वारली होती. तेली वयानें ७५ वर्षांचा वृद्ध झाला असून स्थिति अगदीं गरिबीची होती. यामुळें त्यांस पोटभर अन्न देखील मिळत नसे. या सर्व त्रासानें तिन्ही मुलगे घेऊन तो महाराजांजवळ द्रव्य मागावें या हेतूनें आला होता. श्रीसमर्थांचे दर्शन घेऊन तेली सन्निध उभा आहे. तोंच दुसरा कोणी ब्राह्मण कोंकणांतून आपणाला संतति व्हावी म्हणून श्रींचे दर्शनास सहकुटुंब त्याच वेळीं तेथें आला. यावेळेस श्रीसमर्थमहाराज शेख नुरुद्दीन साहेबांचे दर्ग्याजवळ होते. उभयतां स्त्रीपुरुषांनीं श्रींचें चरणांबुज वंदन करून ब्राह्मण महाराजांस वारा घालीत उभा राहिला. व त्याची बायकोही जवळ उभी होती. स्त्रीचें नांव राधाबाई होतें, इतक्यांत श्रीसमर्थांनीं हास्यवदन करून त्या सन्निध उभे राहिलेल्या बाईकडे पाहिलें, व तिला म्हणाले, "लिंबे," (हे तिचें पूर्व जन्माचें नांव असावें), हा म्हातारा तेली तुझा पूर्व जन्मीचा नवरा आहे, तुझेच पोटचे हे तीन मुलगे आहेत. त्यांस जवळ घे," असे चमत्कारिक शब्द श्रींचे मुखांतून निघतांच तें ऐकून राधाबाई तर फारच लज्जित झाली. पण इकडे असा चमत्कार झाला कीं, ते मुलगे जरी त्या बाईपेक्षां वयानें मोठे होते तरीही आपली जनन देणारी आईच आहे असें त्यास कळतांच त्यांचे पोटांत मायामोह उत्पन्न होऊन, ते तिघेजण त्या बाईस 'आई आई,' असें म्हणूं लागले. तें

पाहून त्या वृद्ध तेल्याचे डोळ्यांतून अश्रूपात होऊं लागले, व त्या बाईलाही पण त्या मुलांविषयीं प्रेम उत्पन्न होऊन तिनें त्यांस जवळ घेतलें. व मोठ्या स्नेहानें आलिंगन देऊन त्यांचीं मुखें कुरवळलीं. हा अद्भुत कधींच न घडून येणारा चमत्कार सर्वत्रांनीं पाहून सर्वांचीं मनें आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेलीं, व पुन्हां श्री सदयहृदय स्वामीमहाराजांनीं बाईस आज्ञा केली, "**अग तूं या तेल्याबरोबर त्याचे गांवीं जा? आणि तुझ्या हातचा त्याचे घरांत पश्चिमेच्या बाजूला रंगित खांबाखालीं द्रव्यानें भरलेला हंडा पुरलेला आहे. तो उकरून सर्व द्रव्य तूं निर्लोभ बुद्धीनें त्या तेल्यास दे, म्हणजे त्याचें दारिद्र विछिन्न होऊन तुलाही पुत्रप्राप्ति होईल.**" याप्रमाणें समर्थांची आज्ञा होतांच ते सर्वजण त्या तेल्याचे घरीं अक्कलकोटापासून सुमारें चोवीस कोसावर होते, त्या गांवीं गेले व त्याचे घरांतील खांबाखालीं उकरून पहातात तों श्री वचनाप्रमाणें द्रव्याचा हंडा त्यांस सांपडला. श्रीसमर्थांचें आज्ञे-प्रमाणें त्या बाईनें तें सर्व द्रव्य त्या तेल्याचे स्वाधीन केलें. तेल्यास संपत्ति मिळाल्यानें त्याचें जन्माचें दारिद्य नाहींसें झालें. इकडे राधाबाई परत आपल्या घरीं आली. पुढें श्रीमहाराजांचे आशीर्वादें करून त्याच वर्षी बाईस पुत्रप्राप्ति झाली. याप्रमाणें श्रीस्वामी समर्थांनीं उभयतां शरणांगतांस आपल्या अतर्क्य सर्वज्ञपणाचा किंचित् चमत्कार लीलामिषानें दाखवून त्यांस पूर्व जन्मींची ओळख दिली, आणि त्यांचे उभयतांचे मानसिक भिन्न हेतु एकमेकांचे हातून सिद्धीस नेले.

## बाईचा विडा नाकारून तिचें गुप्त कारस्थान उघड केलें.

शके १७८९ त एकेकाळीं अक्कलकोटास समर्थांची स्वारी विष्णुबावा ओंडकर यांचे ओट्यावर बसली होती. त्या वेळेस समर्थ अतिशय क्रोधांत असल्यामुळें केवळ नृसिंह अवतारच दिसत होता. एकदां त्यांनीं असें उग्र रूप धारण केलें कीं, त्यांचेपुढें जाण्यास कोणाचीही छाती होत नसे. तें उग्र तेज पाहतांच पाहणाराचा शक्तिपात होई, मग पुढें जाणें कसचें? अशी कांहीं विलक्षण त्या स्वरूपास उग्रता येत असे. असो. याच वेळीं पुण्याहून कोणी एक गृहस्थ बरोबर बायको आणि मेहुणा असें घेऊन पोटीं संतान नव्हते त्याप्रीत्यर्थ महाराजांची सेवा करण्यासाठीं एक महिना अक्कलकोटास येऊन राहिले होते. ते समर्थांचें दर्शनास आले. बाईनें समर्थांस नमस्कार करून उत्तम प्रकारचा चतुर्दशगुणी तांबूल तयार करून आणला होता, तो महाराजांचे मुखांत देऊं लागली. तोंच श्रीयतिराज क्रोधावेशानें तिला

म्हणाले, " **रांडे, सात वर्षें सतत तुझ्या सख्या भावाबरोबर विषयसंग करतेस, तर त्याला विडा दे आम्हांला कशाला देतेस? आमचा × × × उठत नाहीं.**" अशा प्रकारचें समर्थांचें मोठ्या कडाक्याचें गंभीर भाषण ऐकून उभयतां बहीणभाऊ भयानें थरथर कापूं लागले. त्यांस आतां आपलें काय होतें याची मोठी भीति पडली, व लागलीच त्यांनीं तेथून पळ काढला. हें सर्व कृत्य भोंवतालचे मंडळीनें पाहून सर्वजण अगदीं थक्क होऊन जागच्या-जागीं स्तब्ध बसले.

## चोखा मेळ्यास आशीर्वाद.

एक चोखामेळा भजन करणारा तेथें आला, व श्रीचें चरणीं जोहार मायबाप करून तें श्रीचें केवळ नृसिंहरूप पाहून प्रल्हादावर नृसिंहअवतारीं परमेश्वरानें कृपा केली त्याबद्दलचे अभंग तो म्हणूं लागला. सर्व लोक त्याचें प्रेमळ भजन ऐकून अगदीं भजनांत गर्क झाले. शेवटीं हें त्याचें समयोचित दयार्द्र भजन, सदय हृदय महाराजांनीं श्रवण करून जरी स्वारी अतिशय कोपायमान झालेली होती तरी प्रेमपान्हा फुटून समर्थ पोट धरून गदगदां हसूं लागले. नृसिंह अवतारीं हिरण्यकश्यपू बघून देखील महाराजांचा कोप शांत झाला नाहीं. तें उग्ररूप पाहून सर्व देव तर भयानें पळून गेले. प्रत्यक्ष शेजेची रात्रंदिवस प्रभूचे चरणारविंदीं वास करणारी रमा ती देखील पुढें जाण्यास धजली नाहीं. परंतु ते समयीं पांच वर्षांचें अर्भक जो प्रल्हाद त्यानें त्या उग्रतेजास न भीतां एकदम श्रीचें चरणीं मिठी मारली आणि त्यासरसे जसें तें प्रलयाग्नीसमान कोपलेलें परब्रह्म शांत होऊन, त्या प्रल्हादास आशिर्वचन देते झाले. तद्वत् या नीच जातीच्या भक्तावर श्रीसमर्थ दयाघन वळून त्यास प्रसाद स्वहस्तें देते झाले आणि म्हणाले, " **तुझा मुलगा मोठा सत्पुरुष होईल. तुला जन्मभर अन्नवस्त्र सुखानें मिळेल जा.**" " प्रसाद वचन ऐकून तो चोखा म्हणाला, " महाराज मीं या चरणांजवळ एवढेंच सांगण्यासाठीं आलों होतों. आपण पूर्णपरब्रह्मरूप आहांत, मी दीनदास आहें. माझें ऐशीं वर्षांचे वयांत मी आजच खरोखर हें प्रभु चरणारविंद पाहून पुनीत झालों. मला ज्ञानेश्वरी अवगत आहे, परंतु मी नीच अज्ञदास असल्यानें कांहीं ठिकाणीं मला तिचा अर्थ लागत नाहीं. हें वाक्य ऐकून श्रीसमर्थ म्हणाले, " **तुझा मुलगाच तुला तो स्वानुभवपूर्वक तिचा चांगलाच अर्थ सांगेल जा.**" इतकें श्रीमुखांतील अमृततुल्य वचन श्रवण करून तो

चोखामेळा प्रसाद घेऊन घरीं आनंदानें जाता झाला. इकडे ती पुण्याकडील सुस्वरूप जारिणी दुसरेच दिवशीं कृष्णवदन करून निघून गेली. अशा महाराजांच्या सर्वसाक्षीपणाच्या लीला आहेत.

## एक दोन मनुष्यास पुरेसे अन्न नैवेद्यावर वाढावें. स्वयंपाकयास ५००० रु. मिळकत

अक्कलकोटास समर्थांचे दर्शनास ब्रह्मनिष्ठबुवा दरवर्षी जात असत. एकेवेळीं ते नियमाप्रमाणें श्रीचे दर्शनासाठीं गेले. तेव्हां वे० शा० बाळकृष्णभट ग्रामजोशी यांचे घरीं उतरले होते. सदरहू गृहस्थाचे घराचे मागील परसांत एक औदुंबराचा वृक्ष असून त्याचे खालीं मुंबईतील कोणी सद्गृहस्थांनीं श्रीस्वामीमहाराजांच्या पादुका स्थापन केल्या आहेत. जवळच एक पाण्याचा कूप आहे. श्रीदत्तजयंतीच्या पारण्याचे दिवशीं प्रातःकाळीं जोशीबुवांनीं श्रीमहाराजांचे दर्शनास जाऊन श्रीस भोजनाचें निमंत्रण विनयपूर्वक केलें. तेव्हां महाराजांनीं, "**आमचें झाल्यावर चौथे दिवशीं येऊं.**" म्हणून सांगितलें. जोशीबुवांचे घरीं समर्थ महिन्यांतून एक दोन वेळां येत असत. पारणें होऊन गेल्यावर श्रीसमर्थांची स्वारी सर्व सेवकांसह एके दिवशीं जोशीबुवांचे घरीं भोजनास आली. श्रींचें भोजन आनंदानें चाललें आहे. इतक्यांत जोशीबुवांनीं प्रार्थना करून विनोदानें म्हटलें कीं, "पारण्याला समर्थांचें आगमन झालें नाहीं. यामुळें आम्हां सर्वांस गोड वाटलें नाहीं." हें जोशीबुवांचें भाषण ऐकून समर्थ म्हणाले, "**आम्हीं भिकारी आहोंत काय? आमच्या नैवेद्यावर पारण्याचे दिवशीं एकच लाडू, व मूठभर भात कां बरें वाढला होता? तेवढ्यांत आमचें पोट कसें भरेल, हें बडोद्याहून आलेल्या** (ब्रह्मनिष्ठबुवांस) **कळत नव्हतें काय?**" असें श्रींचें वाक्य ऐकतांच जोशीबुवा व ब्रह्मनिष्ठबुवा उभयतां चकित झाले. महाराज म्हणतात तशी नैवेद्याची हेळसांड झाली कीं काय याबद्दल त्यांनीं चौकशी केली. तेव्हां महाराजांचे सेवेंतली सुंदराबाई हिनेंही महाराजांनीं सर्व साक्षित्वानें जाणलेली गोष्ट चुकीनें घडली म्हणून कबूल केलें. नंतर ब्रह्मनिष्ठ-बुवांनीं श्रीसमर्थचरणीं पुन्हां नैवेद्य अर्पण करण्याची आज्ञा मागितली, व झालेल्या चुकीची क्षमा होण्याची विनंति केली; समर्थांनीं आज्ञा देतांच दुसरे दिवशीं यथासांग श्रींचे चरणीं बुवांनीं नैवेद्य अर्पण केला. तांबूल भक्षण करून श्रीसमर्थ

“**एक दोन मनुष्यांस पुरेसें अन्न नैवेद्यावर वाढावें.**” अशी आज्ञा करून श्रीमुरलीधराचे मंदिरांत स्वारी गेली. त्याच दिवशीं मुंबईहून कोणी श्रीमान परभु गृहस्थ स्वामीरायांचे दर्शनास आले होते. त्यांनीं पुजेचे सर्व साहित्य व ब्राह्मणाबरोबर एक पक्वान्नांनीं भरलेले ताट देऊन ते श्रीसमर्थांचे दर्शनास आले. ब्राह्मणानें आणलेलें ताट खालीं ठेवतांच, त्यांस स्वामीमहाराज म्हणाले “**मादरचोद, पांच हजार रुपये रखे सो लेयेंगे. कबी छोडणेवाला नहीं.**” असें श्रीमुखांतील तीन वेळ निघालेलें वाक्य त्या ब्राह्मणानें श्रवण करून तो म्हणाला, “महाराज, मी तर स्वयंपाक करून उदरनिर्वाह करितों माझे जवळ पांच हजार रुपये कोठून येणार?” ह्याप्रमाणें त्याचें मुखांतून वाक्य निघतांच श्रीसमर्थ बसले होते त्याचे मागले बाजूस शेराची कुपाटी होती. तिच्यांत एकाएकीं एक वृद्ध फकीर व त्याचे जवळ एक काळ्या रंगाचा तेजःपुज असा कुत्रा बसलेला सर्वांचे दृष्टीस पडला. इकडे समर्थांचे पुढें ठेविलेलें ताट त्या ब्राह्मणास दाखवून श्रीमहाराज त्यास म्हणाले, “**उनकू खिलाव,**” ब्राह्मणानें लागलीच आज्ञेप्रमाणें तें ताट त्या फकीराचें पुढें नेऊन ठेविलें. नंतर फकीरानें आपण व कुत्रा मिळून त्या ताटांतलें अन्न भक्षून, फक्त पांचग्रास त्या ताटांत शेष ठेविलें. परभू गृहस्थांनीं श्रींची यथासांग पूजा करून तें प्रसादाचें ताट घेऊन परत बिऱ्हाडीं आले. घरीं येऊन तें फकीराचें राहिलेलें प्रासादिक अन्न भक्षण करावें कीं कसें या विचारांत ते पडले. मग त्यांनीं याबद्दल राजोपाध्ये, नारायणभट हर्डीकर, व्यंकटशास्त्री वगैरे विद्वान गृहस्थांस विचारलें. त्यांनीं याचें निवारण श्रीस्वामी महाराजच करतील म्हणून त्यांस सांगितलें. याप्रमाणें त्यांचा विचार कळतांच ते परभु गृहस्थ त्या ब्राह्मणासह पुन्हां श्रींचे दर्शनास गेले. समर्थांनीं त्यास अवलोकन करतांच म्हणाले, “**तुमारेकू खाना होय तो खाव. नहीं तो हमारा पिछे ला देव, घर घर पंचाईत कायकू करता है.**” हें श्रींचे वाक्य ऐकून ते परभू गृहस्थ चरणीं नमन करून निःशंक मनानें परत बिऱ्हाडीं आले, व मनोभावानें तो प्रसाद सर्वत्रांनीं ग्रहण केला. पुढें दुसरे दिवशीं श्रींचें दर्शन घेऊन ते परत मुंबईस गेले. तेथें गेल्यावर असा चमत्कार घडून आला कीं, त्या प्रभू गृहस्थाचे मावशीजवळ हा ब्राह्मण पूर्वी बारा वर्षे आचारी होता. ती बाई चांगली धनसंपन्न होती. तिनें ब्राह्मणास विश्वासुक, गरीब व इमानी असा पाहून आपल्या संतोषानें पांच हजार रुपये बक्षीस दिले. अशाप्रकारें स्वप्नांत देखील ज्यास पांच हजार रुपये मिळण्याचा संभव नव्हता, त्यास श्रीसमर्थ कृपेनें

त्यांच्या वाक्याप्रमाणें सहज अलभ्य लाभ झाला. हा चमत्कार सर्व भाविकजनांनीं पाहून त्यांचे मनाची श्रीस्वामी हे पूर्ण परब्रह्मदत्त अवताररूप आहेत अशी खात्री झाली.

## राधा कसबिणीची छाती पुरुषाप्रमाणें झाली.

अक्कलकोटास श्रीसमर्थांचे दर्शनास कोणी राधा नांवाची कसबीण आली होती. ती चांगली गाणारीण असून शरीरानें सशक्त व दिसण्यांत सुस्वरूप अशी होती. या वेळेस महाराजांचें दर्शन घेऊन ती श्रीचरणाजवळ बसली असतां, तें महाराजांचे तेजःपुंज रूप पाहून तिचे मनांत यतिरायांना स्त्रीसमागम झाला असावा कीं नाहीं, अशी सहज शंका आली. ती याप्रमाणें विचारांत आहे इतक्यांत समर्थांनीं तिला म्हटलें, " **स्त्री पुरुषांत काय भेद आहे? तुला काय पुरुषांपेक्षां अधिक आहे?** " हें श्रीमुखांतलें अंतरसाक्षित्वाचें वाक्य ऐकून बाई विस्मित झाली, व तिनें प्रेमळतेनें उत्तर दिलें कीं, " महाराज स्त्रियांस जे स्तन वगैरे अवयव असतात ते पुरुषास नसतात. " हें तिचें प्रेमाचें भाषण श्रवण करून श्रीसमर्थ तिला म्हणाले, " **अग, हे तुझे स्तन ब्राह्मणास देऊन जा. येथें आमचे जवळ काय पहातेस?** " हे चमत्कारिक शब्द तिनें ऐकून लागलीच श्रीचरणीं नमन केलें. नंतर ती आपले गांवीं जाती झाली. पुढें चमत्कार असा झाला कीं त्या राधेस कांहीं एक रोग वगैरे न होतां, आपोआप तिचे स्तन हळूहळू जिरत जाऊन, तिची छाती पुरुषाप्रमाणें अगदीं सपाट दिसूं लागली. जसा एखादा कुशल चितारी स्वेच्छेनुरूप आपण तयार केलेल्या मृत्तिकेच्या चित्रांत सहज रीतीनें फरक करतो, तसा या विधिनिर्मित मानवी चित्रांत श्री सर्वशक्तिमान् स्वामी-महाराजांनीं आपल्या अनंत शक्तीचे प्रभावें करून सहज रूपांतर करून दिलें. ही केवढी अघटित घटनेची लीला समर्थांनीं करून दाखविली पहा! याप्रमाणें स्वशरिरांत श्रीचे अगाध लीलेनें फरक झालेला पाहून त्या राधा कसबिणीनें पुढें परपुरुषाचा संग सोडून दिला. व परम पुरुषोत्तम स्वामीराज त्यांचे चरणीं अनन्य शरण गेली. हीच राधाबाई पुढें कांहीं दिवसांनीं बडोद्यास बिदागी घेण्यासाठीं गेली होती. ते वेळेसही सर्व घडलेली हकीगत तिनें स्वतः आमचे मित्र ब्रह्मनिष्ठ वामन बुवा यांस सांगितली. पूर्वी महाराजांचे दर्शनास अक्कलकोटास ती आल्यावेळीं हे बुवा तेथें श्री जवळ होतेच. त्यांनीं त्या वेळेस सावयव तिला पाहिलें होतें. व पुढें असा फरक पडलेला त्यांनीं प्रत्यक्ष पाहिला आहे. राधा कसबीण श्रीचे चरणांचें

ध्यान करून काशीस जाऊन काळ क्रमिती झाली. यावेळेस तिचें वय ३२ वर्षांचे होतें. अशा समर्थांच्या अगाध लीला आहेत. ॥ **प्रकृतिः पुरुषो नहि भेद इति** ॥ असें श्रीदत्त गीतेंत वाक्य आहे; त्याची प्रचिती श्रीनीं बाईच्या उदाहरणांनीं सर्वांस स्पष्ट दाखविली.

## ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः

मी शके १७९३ त श्रीदत्तगुरुस्वामीच्या दर्शनार्थ अक्कलकोटास गेलों होतों. तेव्हां कडव गांवचे स्टेशनावर उतरून शौचमुखमार्जन केलें. टांग्यांत बसतेवेळीं नासिकाचा स्वर पाहिला तर सूर्यस्वर उदयसहित पृथ्वी तत्त्व संयुक्त स्पष्ट वाहत होता. श्रीमद्गुरुदर्शन कल्याणकारक मुख्यत्वें चंद्र स्वरांत पृथ्वी अथवा जल तत्व वाहत असतां व्हावे. असें असल्याकारणानें स्वरोदयाच्या अभ्यासोक्त नियमाप्रमाणें स्वर बदलण्याचा पुष्कळ यत्न केला; परंतु बदलेना. दिवसा चंद्र व रात्रौ सूर्य स्वर नेहमीं वाहत असतां आज असें कां झालें. या विचारांत टांग्यांत बसून चालता झालों. अक्कलकोट गांवानजीक रामचंद्राचें देवालय आहे तेथें उतरून पुन्हां स्वर पाहिला. तों सूर्य नाडींतून बाहेर कृष्ण पिंगलात्मक वायु वाहतच होता. सूर्य स्वर बंद होत नाहीं असें जाणून कोणास न दिसेल व न कळेल अशा गुप्त रीतीनें उजवे नाकपुडींत सूक्ष्म मृदु कापसाचा बोळा युक्तीनें बसविला. गांवांत येऊन श्रीफळ बडोद्याची कपोरी विड्याची पानें, उत्तम चुना वगैरे सहित श्रीमूत्सचिदानंदघन स्वमीरायांचे दर्शनास गेलों; त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी राजवाड्यानजीक उजवे बाजून भांडारखाना आहे तेथील सोप्यांत सुशोभित मृगासनावर बसली असून, जवळ मंडळी पुष्कळ बसली होती. त्यासमयीं बडोद्याचे मार्तंडराव संगमनेरकर वगैरे दोन चार गृहस्थ होते. श्रीफलादिक पदार्थ श्रींस अर्पण करून साष्टग नमस्कार केला. करद्वय जोडून मर्यादेनें उभा राहिलों, इतक्यांत श्रीसमर्थ आपल्या उजव्या नाकपुढीस दाबून म्हणाले, "**काय करावें सद्गुरुदर्शनास चंद्र स्वर कां येत नाहीं रे?** नाकांतला बोळा काढून टाका! वायु बंद करून काय × × × होतें! नाकांतला बंद झाला तरी तोंडांतील × × × चालूच आहे असें सोंग करूं नये ॥ ध्यानमूलंगुरोमूर्तिः पूजामूलं गुरोः पदं ॥ मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥ १ ॥ नतद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ॥ यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ २ ॥ स्वस्थ आनदांत असावें." हे समर्थांचें हितकर बोधरूप अमृत वचन ऐकून मी नाकांतून कापसाचा बोळा काढून टाकला.

तो पाहून सर्वांस दत्त महाराजांच्या अंतर्साक्षित्वाचा विलक्षण चमत्कार वाटला, आणि सर्वत्र स्तुति करूं लागले. तेव्हां मी श्रीचरणारविंदीं विनंति केली " नाक [स्वर्ग] मृत्यु पाताल या त्रिलोकांस अंतर्बाह्य निरुपाधिक निर्विकार ब्रह्मानंदरूप सद्गुरु व्यापक अनुभव पूर्वक निःसंशय आहे. संशयोपाधिरूप नाकांतील बोळा सद्गुरु कृपेनें निःशेष निघून गेला, स्वस्वरूपी चंद्र सूर्यादिक नाहींत. **उदयास्तमयौनास्ति ॥ निशब्दंतत् विजानीयात् ॥** तात्पर्य केवळ निर्गुण, साक्षी, दृष्टाब्रह्मात्मयै परमानंदांत निःसंदेह स्वस्थ असावें, ही समर्थांची पारमार्थिक आणि अनंत जन्माचें क्षणांत सार्थक करणारी आज्ञा सर्वथैव शिरसामान्य आहे. शरणांगत शिष्यांस सहज निरुपाधिक आत्मबोध करून तारतात, तेच परमेश्वर सद्गुरु दीनदयाल मायबाप खरे आहेत. तेच समर्थ गुरु धन्य म्हणावे. आणि त्यांचेच चरणीं लीन होण्यानें कल्याण निश्चयात्मक होत असतें."

## समुद्र भरला आहे, त्यांतून घेववेल तितकें घ्यावें. शेत पिकवून खावें.

शके १७९४ त मी श्रीस्वामीमहाराजांचे दर्शनास गेलों. त्याकाळीं श्रीदत्तमूर्ति अक्कलकोटांतील पटवर्धनांचे गणपतीमंदिरांत सेवेकरी व इतर दर्शनेच्छु जनासहित गादीवर विराजमान नृसिंहरूपानें झाली होती. तेव्हां मी श्रीफलादिक पदार्थ पुढें ठेवून अनन्यभावानें शिरसाष्टांग नमस्कार करून उभा राहिलों. तों एकाएकीं कडकडून बोलले कीं, " **कच्चा मडका भाज दिया. बहुत दिन भये, मादरचोद, कायकूं आता है, आबीके आबी निकल जाव.**" ही नृसिंहाक्षरें ऐकतांच मी सर्द होऊन अतिशय घाबरलों. तटस्थ झालों. पाय उचलेना, तीनशें कोसांवरून अडचण असतां, पैसे खर्च करून, तीन दिवस जाग्रण होऊन क्षुधित भक्तीनें आल्याबरोबर विश्रांति न मिळतां, उलटे आतांचे आतां जा म्हणतात. असा काय अन्याय झाला आहे? असो. गुरुआज्ञा शिरसा मानून पाकीट घेऊन, दुरून नमन करून, साखर विहिरीवर गेलों. पाण्यानें चूळ भरली, आणि विचार करूं लागलों कीं, स्टेशनाकडे जाण्यास तांगे तीन वाजतां निघतात. यावेळीं ऊन्ह फार आहे, थोरल्या वेशीनें जावें तर आतांच आलों. वेळ नसतां पुन्हां आतांचे आतां जातों हें पाहून सर्व लोक हटकतील, आणि उपहास करतील. स्नान करून जावें तर तात्काल परत जाण्याची आज्ञा झाली आहे. प्रत्येक समयीं निघतेवेळीं स्वामीराज मला दोन चिकण सुपाऱ्या प्रसाद नेमानीं स्वहस्तें देतात, तसा तराजू दांडीचा

इंग्रजी फद्या पैसा मला दाखवून दर एक खेपेस देत असतात. तो पण प्रसाद यावेळीं मिळाला नाहीं. मला नैवेद्य करण्यास नेहमीं आज्ञा होत असते; ती देखील नाहीं; असो मर्जी. असे मनांत आणून पाकीट घेऊन राजवाड्या नजीकच्या दिंडीनें गांवाबाहेर पडलों. श्रीरामचंद्राचे विहीरींतून पाणी घेऊन चालता झालों. इकडे श्रीसमर्थांचें मन कळवळून, दोन मनुष्यांस परत मला आणण्यासाठीं पाठविलें. ते घाईघाईनें येऊन, "महाराज तुम्हास बोलावत आहेत, लौकर चला." असें म्हणून हात धरून घेऊन गेले. मला पाहून महाराज म्हणाले, "**तुझें मन पाहिलें, पक्का झालास, या खेपेस योगशास्त्राचे प्रश्न आम्हास विचारण्यास आला असून परत कां जातोस?**" असें म्हटल्यावर जसा प्राण गेलेला परत आला म्हणजे आनंद होतो, त्याहीपेक्षां अधिक आनंदलहरींत शांत झालों. मग महाराज चोळापास म्हणाले, "पहातोस काय ? आमचें ताट त्याला दे." हें ऐकून तेथेंच स्नानसंध्या, महाराजांचें पूजन करून भोजन केलें. दुसरे दिवशीं समर्थांची स्वारी देशमुखांचे वाड्यांत गेली. तेथें सात दिवस राहून श्रीसमर्थांनीं योगशास्त्रांतील प्रश्नांचीं उत्तरें सर्वोत्कृष्ट अनुभवासहित विधिपूर्वक सांगितलीं. आपल्या दासास उत्तम, निश्चित परमार्थ होण्याविषयीं अथवा दुसऱ्या व्यावहारिक शुभाशुभ सूचना संज्ञा करण्याविषयीं तसेंच अंतःकरणाच्या पवित्रतेची परीक्षा पाहून कल्याण करणारे, आणि पदरांत प्रचितीच माप घालणारे, दयाळू सद्गुरु स्वामीराजांसारखे पुरुष पाहण्यांत येणें देखील महद्भाग्यावांचून कसें होईल ? महाराज वरचेवर म्हणत असत, "**समुद्र भरला, आहे त्यांतून घेववेल तितकें घ्यावें, शेत कापून पिकवून खावें.**" हें हितोपदेशक यथार्थ वचन मानून मेहनत व यत्न केले असतां साफल्यच होणार आहे.

## गोसाव्यास दत्तस्वरूपानें दर्शन.

शके १७९१ चे मार्गशीर्ष शुद्धांत श्रीस्वामीसमर्थांची स्वारी सेवेकरी लोकांसहित अक्कलकोटानजीक नागणसूर, हंचनाळ, कोतवालाचे हद्दें वगैरे गांवीं फिरत असतां, एक गोसावी पुष्कळ वर्षेंपर्यंत श्रीमत् गुरुदत्तात्रयाचें दर्शन व्हावें म्हणून अनुष्ठान केलेला, फिरत फिरत अक्कलकोटास येऊन शोध करीत, महाराज होते तेथें आला. व वंदन करून स्तब्ध उभा राहिला. यतिरायांनीं हें पहातांच स्वतः उभे राहून दत्तात्रय स्वरूपानें गोसाव्यास दर्शन दिलें. गोसाव्यास विलक्षण चमत्कार वाटून, परमानंद होत्साता म्हणाला, "आम्ही अज्ञानी असल्यामुळें आपल्या

स्वरूपाची ओळख कशानें व्हावी ? अहो भगवन्, आपण साक्षात् पूर्ण ब्रह्मदत्तात्रय गुरु अवधूत आहांत. हें निःसंशय माझ्या अनुभवास आलें. मला पाहतांच तत्काल उभे राहून आपण दत्तरूपें दर्शन दिलें. हे कृपासिंधु माझ्या जन्माचें खरें सार्थक झालें," असें म्हणून दुसरे दिवशीं आज्ञा होतांच स्वामीमहाराजांचा जयजयकार करीत, व अत्यंत हर्षभरीत होऊन चालता झाला.

## स्वामी तो अक्कलकोट मे है, देख. सय्यद मुसलमानास त्याचे इच्छेनुरूप दर्शन.

शके १७९६ चे भाद्रपद वद्य ६ गुरुवारीं स्वामीमहाराज अक्कलकोट येथील देशमुखांचे वाड्यांत बसले असतां, दिवसा बारावर तीन वाजतां मोंगलाईतील एक सय्यद मुसलमान दर्शनाकरितां आला. ते समयीं सुंदराबाई, शिउबाई, बाबा सबनीस, बाबा यादव वगैरे मंडळी बसली होती. ब्रह्मनिष्ठ बाबा समर्थांपुढें कीर्तन करण्यासाठीं वीणा लावीत होते. त्यावेळीं सय्यदानें द्वारांतील मंडळीस विचारिलें, 'क्यौंजी, ये अक्कलकोटके स्वामी कहां है ?'' त्यास कोणी सांगतात इतक्यांत स्वामीमहाराज म्हणाले, "**स्वामी तो अक्कलकोटमे है देख, ह्या क्यां देखतां है.**" असें समर्थांचें उद्धारक भाषण एकतांच सय्यद दंग होऊन एकदम तटस्थ घटकाभर उभा राहिला. 'मै आपका बंदा हूं, चाहेसो हुकूम करो.' असें स्वानुभवसहित बोलून, आणलेले पदार्थ महाराजांस अर्पण केले. दुसरे दिवशीं स्वामीसमर्थांची आज्ञा शिरसावंद्य मानून कृतार्थ होऊन स्वामी-रायांची वाहवा करीत आनंदानें हैदराबादकडे गेला. या वरील गोष्टीवरून एका भक्तानें महाराज अक्कलकोटासच कां राहिले याबद्दल, "आनंद स्वामीकृत भजनानंद लहरी" ग्रंथांचे उपोद्घातांत लिहिलेल्या गोष्टीची आम्हास आठवण झाली. सदरचे चतुर गृहस्थ म्हणतात, "अक्कलसे खुदा पछानना," म्हणून आपल्यामध्यें एक म्हण आहे. त्याप्रमाणें स्वामीमहाराजांनीं विचार केला कीं, आपण अक्कलकोटास रहावें म्हणजे खरोखर अक्कलवान लोक आपणास ओळखून भक्ति करतील. हा वाक्यालंकार आहे. पण महाराजांचे वरील साईस बोललेले शब्द, "स्वामी तो अक्कलकोटमे है, देख." व वरील कल्पना यांचा अगदीं मेळ मिळतो.

## माटे यांचा अभिमान नष्ट केला.

एक माटे उपनांवाचे पुराणिक अक्कलकोटास आले होते. त्यांनीं स्वामी महा-राजांपुढें एक वेळ कीर्तनांत वेदांत निरूपण केलें, व खुब्रीनें टोंचून स्वामीमहाराज

यथेष्टाचरण करितात, अशा उद्देशानें दृष्टांत देऊन बोलूं लागले. त्यावेळीं एक दोन चर्चरीत गुह्य दाखले समर्थांनीं दिल्यावर माटे बोवा विस्मित झाले. पुन्हां अभिमानानें बोलूं लागले कीं, अंत्यजानें श्रीमत्‌शंकराचार्यांस जगद्‌गुरु जाणून भोजनास आपले घरीं यावें म्हणून विनंति केली. तिला रुकार देऊन जगद्‌गुरु आचार्य श्वान रूपानें अंत्यजाचे घरीं भोजनास गेले. कुत्रें घरांत आल्यावर अंत्यजानें, हुस करितांच श्वान रुपानें परत आश्रमीं आलें. नंतर अंत्यज माध्याह्न समयीं जगद्‌गुरुचे आश्रमासन्निद्ध येऊन, भोजनास येण्याची विनंति करून, वरचेवर नमस्कार करूं लागला. त्यावेळीं श्रीमत्‌शंकरयतिवर्य अंत्यजास बोलले, “ आम्हीं श्वानरूपानें भोजनास आलों असतां, तूं धिःकार केला म्हणून परत आलों. तेव्हां अंत्यज रागानें म्हणाला, ‘आपण अवतारी महाज्ञानी अभेद बुद्धीचे जरी आहांत तरी आपण देखील श्वानास स्पर्श न करितां, व सन्मानपूर्वक जवळ क्षणभर न बसवितां हांकून लावाल. मग मजसारिखा नीच अज्ञानी श्वानाचा धिःकार करील, यांत आश्चर्य काय? जर विकारी देह सर्वांस सारखा आहे, आणि आत्मा निर्विकार चैतन्यरूप सर्वत्र सारखा आहे, असें असतां श्री सद्‌गुरु महाराजांनीं कपट करून, मला फसविणें योग्य दिसतें काय? आपण जगदोद्धारार्थ गुरुरूप अवतरलां आहांत. म्हणून दीनाची भिक्षा प्रेमानें अवश्य मान्य केली पाहिजे.’ नंतर श्रीमत् शंकराचार्यांनीं ज्ञानदृष्टिप्रबोधें करून, अंत्यजाचें समाधान केलें. असें बुवांचें भाषण ऐकून श्रीसमर्थ म्हणाले, ‘**या वेळीं तुम्ही कोठें होतां? श्वानांत व तुमच्यांत परमार्थ दृष्टीनें काय भेद आहे? दुकानदारी करून द्रव्याची पिशवी भरणें, आणि मनःपूत वर्तन ठेवणें हा परमार्थ किंवा काय?**’ वेदांत प्रतिपादन करणारे बुवांस फार खेद वाटला. व पश्चात्ताप झाला. त्या वेळीं समर्थांजवळ एक सर्वोत्कृष्ट संन्यासी बसले होते. त्यांनीं बुवांची चांगली खातरी करून म्हटलें कीः—

## श्लोक.

**कुशला ब्रह्मवर्तायां वृत्तिहीनाः सुरागिणः ॥**
**तेप्यज्ञानि तया नूनं पुनरायांति यांति च ॥ १ ॥**

**कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालका इव ॥**
**भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात् ॥ २ ॥**

असें संन्यासी बोवांबरोबर परस्पर चर्चा करून महाराजांविषयीं बोवांचें असलेलें द्वैत निरसन करून म्हणाले, “आपण विद्वान पुराणिक सातारा जिल्ह्याकडचे असून, पुण्यास सोमेश्वराचे मंदिरांत पुराण सांगत असतां. आपले गुरु अनगांव-कवाडकर बोवा मी स्वतः पाहिले आहेत. ते चांगले सत्पुरुष असून, फार निरभिमान आहेत; आपणही उत्तम आहांत; परंतु पूर्णब्रह्मसनातन स्वामी समर्थ जगदोद्धारार्थ दत्तात्रय स्वरूप अवतरले आहेत. यांची योग्यता आपणास कोणत्याही जन्मीं यावयाची नाहीं. अशा पुरुषोत्तमासमोर अभिमानानें व द्वैत बुद्धीनें भाषण करणें केवढें साहस आहे! वास्तविक परमार्थैक्य स्थितीला असे शब्द शोभत नाहींत” याप्रमाणें भाषण ऐकून माटे बुवांस फार पश्चात्ताप वाटला. व त्यानें लागलींच श्रीसमर्थांचे चरणीं सविनय नमन करून बोवा बिन्हाडीं गेले.

## अक्कलकोटास कार्तिकस्वामींचें रूपानें दर्शन.

कांहीं वर्षांपूर्वी बडोद्यांतील कांहीं मंडळी श्री कार्तिक स्वामींचे दर्शनास जातांना अक्कलकोटास उतरून, स्वामीमहाराजांचे दर्शन घेऊन पुढें गेली. त्यांत एक रामशास्त्री डोंगरे या नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं समर्थांस विनंति केली कीं, मी कार्तीकस्वामींचे दर्शनास जातों. नंतर यतिवर्य म्हणाले, “ **जाऊं नको.**” हें ऐकून रामशास्त्री विचारांत पडला, तेव्हां बाबासाहेब सबनीस शास्त्रीबुवांस, “आज्ञा भंग करून जाऊं नये.” असें बोलले. तें मान्य करून रामशास्त्री राहिले. परंतु मनांत कार्तिकस्वामींचे दर्शनाची तळमळ लागली. पुढें कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशीं स्नान संध्या आटोपून, रामशास्त्री स्वामीदर्शनास गेले. त्यावेळीं पुष्कळ मंडळी दर्शनार्थ बसली होती; समर्थांची मंगळारती झाल्यावर सर्वांस सुखकारक दर्शन झालें. त्यावेळीं समर्थ उभे राहिले आणि कार्तीकस्वामींच्या रूपानें यथासांग दर्शन समर्थांनीं रामशास्त्र्यांस दिलें. ते कार्तिकस्वामींचे स्वरूप मूर्तिमंत पाहून रामशास्त्र्यांस महदाश्चर्य वाटलें. आणि संतोषी होऊन स्तुति करूं लागले, “ भगवन्, दत्तमूर्ते! आपण प्रत्यक्ष बोलते चालते सगुणरूप ईश्वर निश्चयात्मक आहांत. परंतु आम्हीं अज्ञानी मदांध असल्यामुळें आपल्या स्वरूपास जाणत नाहीं. तथापि आपल्या साहजीक दयारूप औदार्यस्वभावानेंच आमचे इहपरहित होत आहे. पदरांत प्रचितीचें माप भरपूर पडल्यावर आमचे डोळे उघडतात. आणि खात्री होते.” असा आनंद झाल्यावर रामशास्त्री दोन वर्षेंपर्यंत अक्कलकोटास राहून नंतर बडोद्यास

आलें. हे रामशास्त्री सदाचारी व विवेकी असून पुराण सांगत होते. पुढें काशीयात्रा करून आल्यावर प्रकृति बिघडून शास्त्रीबुवा परलोकवासी झाले.

## निष्काम कर्म कर, म्हणजे परमात्मप्राप्ति प्रत्यक्ष होईल.

अहमदनगर जिल्ह्यांतील कोणी एक ब्राह्मण सपरिवार स्वामी महाराजांचे दर्शनास अक्कलकोटास आला होता, त्यांनीं श्री गुरूंचे दर्शन सप्रेमपूर्वक करून विनंति केली, " माझी गरिबाची दया येऊन पुडी मान्य करावी." यावेळीं समर्थ हर्षभरित होत्साते म्हणाले, " भजीं कोडबुळी क्षिप्रा आमटी करा, म्हणजे पोट भरेल." अशी आज्ञा होतांच ब्राह्मणानें गणपतराव सेवेकरी यास पदार्थांची माहिती विचारली व लागलेच दुसरे दिवशीं स्वस्त्रीकडून सर्व उत्तम रीतीनें स्वच्छ करवून पुरणावरणाचा स्वयंपाक करविला. पूर्व दिवशीं सायंकाळीं महाराजांचे कित्येक सेवेकरी व गांवांतील कांहीं मंडळीस भोजनार्थ आमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं पुन्हा समर्थांसही विनंति केली. भोजनाचें पाचारण झाल्यावर सर्व मंडळी आली; नंतर ब्राह्मण लगबगीनें श्री समर्थांस बोलाविण्यासाठीं गेला. त्यावेळीं दीनानाथ सद्गुरु घोड्याचे पागेंत ओट्यावर बसले होते. ब्राह्मणानें शुद्ध भक्तीन साष्टांग नमन करून भोजनास चलावें अशी प्रार्थना केली. तेव्हां दत्त दिगंबर स्वामीराज हांसत म्हणाले, **" सगळ्यांचें पोट भरल्यावर, आमचें पोट भरेल. जा, आनंदानें भटांस जेऊं घाल. आतां माती चिवडूं नको."** असें अनुग्रह वचन ब्राह्मणानें दीनपणें मान्य करून, आज्ञेनुरूप स्वस्थ आपले बिऱ्हाडीं येऊन, ब्राह्मणभोजन श्रद्धायुक्त केलें. सर्व मंडळी भोजन करून, यथास्थित पोट भरलेली तांबूल चर्वण करीत, खुशाल मजेंत स्वगृहास गेली. तदनंतर त्या भाविक ब्राह्मणानें श्री समर्थांचें एक पात्र व आपल्या स्त्रीचें आणि आपलें अशीं सर्व पदार्थ भरीत अन्नाचीं तीन पात्रें वाढून, वेगळीं ठेवून बाकीचें अन्न रोगी वगैरे सर्व सेवेकऱ्यास यथासांग दिलें. त्यावेळीं दूर देशचे दोन ब्राह्मण येऊन भोजन कोठें मिळेल असा शोध करीत थकून तेथें आले. त्यांचा जीव अन्नार्थ क्षुधेनें व्याकूळ झालेला पाहून, त्यांस स्वतः स्नान घालून पूजन करून, आपलें व स्त्रीचें वाढलेलें पात्र उभयतां ब्राह्मणांस एकेक समर्पण केलें. ब्राह्मण खूप जेवून पुन्हां जास्त अन्न मागूं लागले. भाविक ब्राह्मण व त्याची स्त्री विचार करूं लागली, " आतां काय करावें, फक्त एक यति राजांचें पात्र आहे, व त्यांचे आज्ञेवरून त्यांचे करितांच हे पदार्थ तयार केले. या आलेल्या ब्राह्मणांस क्षिप्रा पुष्कळ वाढली असतां आणखी मागतात.

आपलें प्रारब्ध." असें म्हणून महाराजांचे पात्रांतील क्षिप्रा वगैरे सर्व पदार्थ त्या दोन ब्राह्मणांस पूण तृप्ति होईतोंपर्यंत वाढले. भोजनोत्तर स्वामी महाराजांचे दर्शनास सर्वत्र गेले. त्यावेळीं महाराजांसन्निध पुष्कळ लोक दर्शनास आलेले, बसले होते. भाविक ब्राह्मणानें स्वस्त्रीसहित दयासागर दत्तमूर्तीस नमस्कार करून कंठ सद्गदित व प्रेमाश्रुपात होत्साता उभा राहिला. त्याकाळीं दूर देशचे ब्राह्मण वंदन करून बसतात, तों विश्वोदर स्वामी आपले पोटावर वरचेवर हात फिरवीत, व तृप्तीचे ढेंकर देत म्हणाले, "**कांहो आज क्षिप्रा फार चांगली झाली, परंतु वेलदोडे फार झाले, पुरणपोळी (होळगी) उत्कृष्ट बनली, भजीं आम्हांस तर फार आवडलीं, परंतु कोडबुळ्यांत मिरच्यांनीं भडका केला, तथापि स्वादिष्ट चर्चरीत, आमटीची शाबास आहे;**" असें ऐकून दूर देशचे ब्राह्मणांस व इतरांस फार आश्चर्य वाटलें. त्या वेळीं तेथें दोन सुधारक गृहस्थ बूट, स्टॉकिंग, पाटलून, कोट वगैरे पोषाख केलेले, व नेत्रास चष्मे लावलेले आणि हातांत दांडकें घेतलेले, जेवलेल्या ब्राह्मणांस विचारूं लागले कीं, "स्वामी म्हणतात हें खरें आहे काय?" नंतर समाराधनेंत जेवलेले सर्व म्हणाले, "हें वचन निःसंशय सर्वथैव खरें असल्याचा अनुभव आम्हांस खचित आज भोजनांत आला आहे. आणि पूर्ण खात्री आहे कीं, साक्षात् पूर्णब्रह्म विश्वंभर स्वामी समर्थ आहेत. आपल्यास किंतु वाटत असेल तर खात्री करून घ्या." इतक्यांत श्रीसमर्थ त्या ऐटदार पोशाख केलेल्या गृहस्थांस बोलले, "**कारे तुम्ही दोघे एकमेकांच्या बायको जवळ निजत असतांही आंगवस्त्र कशास बाळगतां?**" हें उद्धारक भाषण ऐकल्यावर, त्या दोघां सुधारकांची आपल्या दुष्ट कर्माबद्दल पूर्ण खात्री झाली, व ते लागलीच उभे राहून स्वामी अवतारिक आहेत असें म्हणून चालते झाले. तेव्हां भाविक ब्राह्मणास महाराज म्हणाले, "**तुझी समाराधना यथासांग झाली; तुझे बिऱ्हाडीं जाऊन कोनाड्यांत पत्रावळीवर भजीं वगैरे सरस्वतीनें ठेविलीं आहेत तीं घेऊन ये.**" भाविक ब्राह्मणाची स्त्री म्हणाली, "घरांत अन्न वगैरे बिलकूल शिल्लक नाहीं." श्री गुरुदेव प्रभु बोलेले, "**काय बोलतेस गे, तुझें घर भरलें आहे.**" हें कल्याणरूप आशिर्वचन ऐकून, उभयतां स्त्रीपुरुष बिऱ्हाडीं जाऊन पाहतात तों पदार्थ कोनाड्यांत पत्रावळीवर खचित दिसले. ते घेऊन फारच आनंदानें उभयतांनीं येऊन, समर्थांस खाऊं घातलें. ब्राह्मण समर्थ चरणीं कृतकृत्य होऊन स्तवन व नमन वारंवार करून म्हणाला, "मी नित्य पार्थिव

करीत असतों ती करूं नये काय? कारण श्री मुखांतून " आतां माती चिवडूं नको." असा अनुग्रह झाला आहे." तदनंतर महाराज म्हणाले, " **तुझी पूजा सफल झाली. निष्काम कर्म करावें, म्हणजे परमात्मप्राप्ति प्रत्यक्ष होईल.**" तें अत्यंत हितकर वचन ऐकून भाविक स्त्री व पुरुषास परमानंद झाला. पुन्हा ब्राह्मणानें दुसरे दिवशीं श्रीमत्‌गुरु परमहंसास नैवेद्य समर्पण करून, नंतर परिवारासह भोजन केलें, आणि समर्थांचा प्रसाद व आज्ञा घेऊन स्वग्रामास जाऊन स्वामीभक्ति करीत सुखानें सत्कालक्षेप करूं लागला. तसेंच दोन सुधारकांच्या स्त्रिया करुणाघनास शरण आल्या, आणि त्यांनीं पश्चात्ताप करून, वाईट कर्म सोडलें. महत्पुरुषांच्या दर्शनानें इहपर कल्याणच होणार आहे. चमत्कार असा कीं, या सुधारकांच्या ठेविलेल्या स्त्रियांपैकीं हिंदुस्थानी स्त्रीनें सर्वसंगपरित्याग तेथल्या तेथेंच करून, श्री समर्थांची कृपा प्रसाद आज्ञा स्वीकारून, निर्मोह होत्साती रामेश्वराच्या यात्रेस गेली. ही गोष्ट ब्रह्मनिष्ठ वामन बुवा यांनीं स्वतः पाहिली होती.

## असंत की कृपाजाली भलो संत को त्रास.

एके दिवशीं स्वामीरायांची स्वारी अक्कलकोट येथें सरकारी गणपति मंदिरांत स्नान करून, सुशोभित पलंगावर विराजमान झाली. त्यावेळेस मुंबईचे लोक बरेच दर्शनास आले होते. मंगलारती झाल्यावर यतिश्रेष्ठांनीं मुंबईच्या एका व्यापाऱ्यास रागानें म्हटलें कीं, " **क्योंजी आम्हारे डाळिंब ला देव.**" असें ऐकतांच मुंबईकर चकित झाला, आणि बोलूं लागला, "महाराज, मी आपल्यास एका कामांत नवस केल्याप्रमाणें माझें कार्य झालें. त्याबद्दल दोन डाळिंबे दर्शनास घेऊन पुढें ठेवीन असें कबूल केल्याप्रमाणें एक रुपयाचीं दोन डाळिंबें बरोबर आणिलीं आहेत. तीं विसरून पाकीटांत राहिलीं. क्षमा करावी." असें म्हणून मनुष्यास बिऱ्हाडीं पाठवून डाळिंबें आणवून पुढें ठेविलीं. त्याकालीं महाराजांच्या अंतर्साक्षित्वाचा आणि साहजिक लीलेचा सर्वत्रांस चमत्कार वाटला. सर्व मंडळी गेल्यावर सुंदराबाईनें तीं डाळिंबे आपलेपाशीं ठेविलीं. व त्यांतील एक डाळिंब घेऊन मुंडी मुरगाळल्या-प्रमाणें दोन्हीं हातांनीं डाळिंब मुरगाळून चुरगाळून आपल्या नातवांस दिलें. व खालीं पडलेले डाळिंबाचे दाणे महाराजांपुढें ठेविले. हें अमर्याद अयोग्य कृत्य पाहून ब्रह्मनिष्ठ वामनबुवांस व मराठे ज्ञातीच्या रामदासीबुवांस फार क्रोध आला. वरचेवर अमर्यादा सुंदराबाईकडून होत गेल्यामुळें, रामदासीबुवा आवेशानें तिला मारण्यास धांवले, व त्यांचे मागें ब्रह्मनिष्ठ बुवाही चवताळून धांवले.

इतक्यांत श्रीगुरुस्वामी दोन्ही हात वर करून बोलले, '**हं हं थांबा, उगेच स्वस्थ बसा. अरे शेतांत काळें पांढरें पांखरें भिण्यासाठीं करितात, त्यांतलेंच हें मडकें. पायपोस मारून काढून देऊं.**' हें श्रीमुखांतील ऐश्वर्य शांतीचें वाक्य ऐकून, वामनबुवा व रामदासबुवा मुकाट्यानें बसले. पुढें सहा महिन्यानंतर विष्णुपंत ओंडकर यांचे घरीं दत्तस्वामीराजांनीं पायपोस मारून बाईस वाटेस लाविलें. धन्य बाईचें सुकृत. दत्तात्रय मूर्तीच्या स्वहस्ताची प्रसादरूप शिक्षा मिळाल्यानें, यमाची जाचणी चुकली. कोणावर कशी कृपा होईल हें जाणणें अशक्य आहे. रागानेंही दयाच होते.

## दोहरा.

**असंतकी कृपाजाली भलो संतको त्रास ॥**
**जब सूरज गर्मा करे तब बरसात की आस ॥ १ ॥**

दुर्जनाची कृपा जळो, नको. आणि सद्गुरु महात्मा संतांचा राग, त्रास, सुखकारक होय. जसें उष्णकाळांत सूर्याचा अतिताप सहन करून, पुढें पर्जन्यवृष्टि झाली म्हणजे सुखशांति होते. तसें समर्थांच्या रागानें सुखच होतें.

## वस्तु पंचपात्रांत ठेविली आहे घ्या.

एकाकालीं श्रीसमर्थ अक्कलकोट येथें नव्या विहिरीचे कठड्यावर बसले होते, त्यावेळीं एक ब्राह्मणाची स्त्री दर्शनास आली होती. व आणखीही कांहीं बाया तेथें उभ्या होत्या. ब्राह्मण स्त्रीस पोटदुखीची व्याधि असल्यामुळें रडत होती. ते समई एक बाई दुसऱ्या बाईस सहज व्यवहारीक बोलतां बोलली, 'वस्तु पंचपात्रांत ठेविली आहे घ्या.' अस शब्द ऐकून श्रीस्वामीराज ब्रह्मानंदरूप व्यवहार झाला आहे ज्यांना, ते गुरुवर्य केवळ बोधार्थ म्हणाले, "**पंचपात्रांत वस्तु आहे ती तुला तरी प्राप्त झाली आहे काय? प्राप्त झाली असल्यास वस्तु स्वरूप यथार्थ सांग, म्हणजे घ्या म्हणतोस तर घेऊं,**" बायका पायां पडून हंसूं लागल्या. महाराजही हंसत पुन्हा बाईस बोलले, '**वटवृक्षास भेट, म्हणजे समजेल.**' अशी समर्थांची आज्ञा होतांच बाई वडाचे झाडास भेटून आली आणि स्वामी राजांस विनंति करून सांगूं लागली, "पंचपात्र म्हणजे पच भूतात्मक देह. वस्तु म्हणजे आत्मा. अंतर्यामी अनुभव वडाचे झाडास भेटतांच झाला आहे."

### श्लोक.

**साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थभूताही सावधः ॥**
**कालेन फलते तीर्थः सद्यः साधुसमागमः ॥ १ ॥**

### आर्या.

**देती फल बहु दिवसां देव शिला काष्ठ मृण्मय प्रणतां ॥**
**जलमय तीर्थेंहि तशीं संताचि फलती नमोस्तुते म्हणतां ॥ १ ॥**

या वाक्याचा अनुभव क्षणमात्रें करून श्रीचरणीं नमन करितांच बाईस झाला. व ती म्हणाली, "अहो दीन दयाळ, सद्गुरु, मला स्वयंपाक देखील नीट करितां येत नाहीं. मग भक्ति ज्ञान वैराग्य कसें कळावें ? जन्मोजन्मपर्यंत हटयोग राजयोग अभ्यास करितात आणि उत्तम प्रकारें वेदांतशास्त्रज्ञाते त्यांनाही वस्तु साक्षात्कार म्हणजे ब्रह्मात्मैक्य अनुभूति प्रत्यक्ष होणें दुर्लभ आहे. या चुलीपाशीं बसून स्वयंपाक करणाऱ्या आमच्या सारख्या असंख्य अबलांस अनंत जन्मांत देखील तें अति दुर्लभ नव्हे काय ?

## "तूं गंगाभागिरथी झालीस म्हणजे व्याधि जाईल."

"माझ्या अल्पबुद्धिस असें वाटतें कीं, असार संसारांतील सार आणि वेदशास्त्राचें परमगुह्य रहस्य जें तें महत्पुरुषाच्या कृपेनेंच तात्काल प्राप्त होतें, यांत संशय नाहीं." असें शुद्धांत करणानें व स्वात्मानुभवानें बोलून, नमन करून ती बसली. नंतर श्रीसमर्थ पोटदुखीच्या बाईस बोलले, "**गंगाभागीरथी झालीस म्हणजे व्याधि जाईल.**" पुढें तिचा पति श्रीक्षेत्र काशीस वारल्याचें पत्र आल्यावर खराच पाटशूळ गेला. दुसरी वस्तु स्वरूपानुभवी अन्नपूर्णाबाई सात आठ दिवस सद्गुरु दर्शन करून, नंतर मुलालेकरांसह कृतकृत्यहोत्साती ती आपले नगर जिल्ह्यांतील खेडले परमानंद गावाकडे गेली. तिच्या भ्रतारास समर्थांनीं वस्त्र प्रसाद दिलें, हें ब्रह्मनिष्ठ वामनबुवा यांची प्रत्यक्ष पाहिले आहे.

## मराठे स्त्रीस ६० वे वर्षी श्रीस्वामी कृपेनें पुत्र संतान.

एक वेळ श्रीस्वामी राजांची स्वारी अक्कलकोटच्या खास बागेंत सेवक जनांसह बसली असतां, एक मोरे उपनांवाची मराठ्याची स्त्री आपल्या पतीसह दर्शनास आली. उभयतां वृद्धावस्थेंत असून संतान नसल्यामुळें काळजींत होतीं. उभयतांनीं

समर्थांस दंडवत करून, श्रीफल वगैरे पुढें ठेवून, हात जोडले. नंतर स्वामी-महाराजांनीं श्रीफळ, " **अग घे कार्टी** " म्हणून पदरांत (ओटींत) **टाकते वेळीं** कांहीं शहाण्या मंडळीनें बाईस तुमचें वय किती आहे म्हणून विचारतां ६० वर्षांचें असें तिनें सांगितलें. समर्थ कृपेनें एक वर्षांत बाईस पुत्र झाला. समर्थ कृपेनें काय न होईल? ही बाई तळेगांव जवळची रहाणारी असून मोठी सती असे.

## ब्रह्मनिष्ठ वामनबुवांस–सप्तशृंगीस जाऊन शंख केला परंतु विडा आम्हांस द्यावा लागला.

शके १७९४ अंगिरानाम संवत्सरांत सिंहस्थ म्हणजे सिंहराशीस गुरु होता. त्यावेळीं मनांत असें आलें कीं, आपण भागीरथी गंगा आणून श्री दत्तात्रेय स्वामी चरणीं घालण्यास सामर्थ्य नाहीं; आणि सिंहस्थांत भागीरथी गोदावरीस मिळते; गोदावरी ही प्रत्यक्ष भागीरथीच आहे असें जाणून फाल्गुन शुद्ध २ शनि-वारीं पांच चार मनुष्यांसह नाशिकास गेलों. तेथें तीर्थविधि वगैरे करून, श्रीत्र्यंबकेश्वरीं गेलों. तेथें सात आठ दिवस राहून हुताशनीचे पूर्व दिवशीं नाशिकास आलों. नंतर दोन तीन दिवसांत श्री सप्तशृंगी देवीचे दर्शनास गेलों. व तेथें देवीचे जवळ असणारे आमचे गांवचे काशीबाईचें घरीं मुक्काम केला. जगदंबेचे पूजनादिक विधी आटोपल्यावर, पुजारी भोपे यांस देवीचे मुखांतील तांबुल प्रसाद मागितला असतां, भोपे पुजारी थट्टा करून उपहासात्मक छलक भाषणें बोलूं लागले. भोपे म्हणाले, "अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांची अवतारिक पूर्ण ब्रह्म मूर्ति असेल, आणि त्यांचे चरणीं तुमचें खरें प्रेम असेल, तर तुम्हांस जगदंबा मुखांतील तांबुल प्रसाद देईल." हीं भाषणें आमचे बरोबर असलेले पार-मार्थिक विद्वान ब्रम्हचारी यांनीं ऐकून जगदंबेची शास्त्रोक्त प्रार्थना केली. इतक्यांत सप्तशृंगनिवासिनी मातेच्या मुखांतील तांबुल एकाएकीं माझे अंगावर पडला. तो प्रसाद शिरसामान्य करून, ब्रम्हचारीबुवा आणि मी असे दोघांनीं प्रेमपूर्वक भक्षण केला. हा स्वामीसमर्थ लीलेचा चमत्कार पाहून पुजारी भोपे हे विस्मित झाले. व स्वामीमहाराजांविषयीं त्यांची खात्री झाली. पुढें दुसरें दिवशीं आम्हीं यशवंतराव महादेव भोसेकर देव मामलेदार, यांचे दर्शनास सटाण्यास गेलों. तेथें सात आठ दिवस राहून परत सप्तशृंगीहून नाशिकास आलों. तेथें गंगा भरून श्रीक्षेत्र पंढरपूर येथें जाऊन श्रीपांडुरंगाचे दर्शन पूजना-

दिक केलें. पांडुरंगावर ज्यादिवशीं गंगा घातली, त्यावेळीं तेथें श्रीस्वामी महाराजांची मूर्ती दिसली. त्या कालीं श्रीस्वामीमहाराजांचे दर्शन एकनाथपंत बडवे आणि त्यांच्या घरांतील यात्रेकरू दादाजी मनोहर यांस झालें. आणि त्यांना फार चमत्कार वाटून आनंद झाला. आपल्या भक्तांस सर्वत्र मीच आहे, अशी स्वानुभवपूर्वक खात्री करून देणारे श्रीस्वामी समर्थच होत. पंढरपुराहून पादचारी आम्ही अक्कलकोटास गेलो. त्या कालीं श्रीस्वामीसमर्थांची स्वारी सेवक जनांसह पेठेंत विरूपाक्ष मोदी यांचे घरांत विराजमान झाली होती. श्रीफलादिक पुढें ठेवून अनन्यभावानें साष्टांग नमस्कार करतांच श्रीसमर्थ म्हणाले, "**सप्तशृंगास जाऊन शंख केलात, परंतु विडा आम्हास द्यावा लागला, आणि पंढरीनाथाची गंगा आम्हीच ग्रहण केली.**" हें अनुभवसिद्ध सर्वांतर्यामित्वाचें भाषण आशिर्वाद-युक्त ऐकून मला व माझे बरोबरच्या मनुष्याला साश्चर्य अत्यानंद झाला. पुनः समर्थ रागानें बोलले, "**मामलेदाराकडे जाऊन × × × मिळालें?**" हें हितोपदेशक खुणेचें वचन श्रवण करून मी समर्थ चरणीं क्षमा मागितली.

## कानफाट्यानें बळवंतरावाचें डोकें फोडलें, व सुंदराबाईचे पाठीवर लाथ मारली.

रात्रीं मोदीचे घरांत सेवेकरी वगैरे मंडळी निजली असतां, सुमारें मध्यान् समयीं एकनाथ नांवाच्या कानफाट्यानें माझे शेजारीं निजलेल्या बळवंतरावाचें डोकें पथ्थरानें फोडिलें; त्यामुळें सर्व मनुष्यें जागृत झाली, व मोठा गलबला झाला. इतक्यांत श्रीस्वामीमहाराजांचे पलंगाजवळ सुंदराबाई निजली होती, तिच्या पाठीवर कानफाट्यानें लाथ मारली. तेव्हां एकच गर्दी झाली; परंतु श्रीस्वामीसमर्थ जशाचे तसेंच स्वस्थ बसले होते. गांवांत मनुष्ये जाऊन, पोलीसचे शिपाई व धाकूजी फौजदार यांस घेऊन आलें. फौजदारसाहेबांनीं कानफाट्यास फार समजूत दिली; परंतु कानफाट्यास धरण्याचें एकांचेंही सामर्थ्य होईना. कानफाट्यानाथ हा इतका सशक्त होता कीं तेथें असलेलीं पांचपन्नास मनुष्यें त्याचे खातरीस नव्हतीं. विचार होतां होतां भुजंगा अप्पा सेवेकरी व पोलीसचे लोक यांनीं मोठ्या युक्तीनें कानफाट्यास पकडलें. ह्या गोष्टींच्या पूर्वीं दोन दिवस विश्वंभर बुवा सेवेकरी यांचेही डोक्यास कानफाट्यानें जखमा केल्या होत्या. श्रीगुरुदेव दत्तस्वामीमहाराज कीं जय असें म्हटलें असतां कानफाट्या हा फारच रागावत असे.

## जैनास व बोडकीस काय भीतोस! गंगा आणून घाल.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं म्हणजे चैत्र वद्य ११ शके १७९५ बुधवारीं श्रीसमर्थांचे अंगावर मी स्नानाचे समयीं स्वतः गंगा घेऊन गेलों असतां, बडोदे येथील कित्येक धनवान् मंडळी त्यावेळीं उभी होती. श्रीसमर्थ स्नानास बसले असतां भक्त चोळापा, सुंदराबाई वगैरे मंडळी मला गंगा घालूं देईनात. इतक्यांत श्रीसमर्थ रागानें मोठ्यानें बोलले, "**जैनास व बोडकीस काय भितोस? गंगा आणून घाल.**" अशी आज्ञा होतांच, मी महाराजांचे अंगावर एक घडाभर गंगा घातली. रेशमी भगवें वस्त्र अंगावर घातले व नमस्कार करून बिऱ्हाडीं गेलों. पुन्हां दर्शनास आलों तों कानफाट्या पोलीसच्या शिपायांनीं बांधलेला श्रीसमर्थांचे दर्शनास आणिला होता. हा कानफाठ्या नाथ श्रीसमर्थांचे दर्शना वांचून पाणी देखील पीत नसे. डोकें फुटलेल्या मनुष्यास श्रीस्वामींनीं राताळू घासून लाविण्यास सांगितलें होतें. सायंकाळीं मी समर्थांपुढें कीर्तन करण्यास उभा राहूं लागलों, तों दयाघन म्हणाले, "फुकटचें कीर्तन कशास? नैवेद्याचा तर ठिकाणा नाहीं." तदनंतर आज्ञेनुरूप दुसरे दिवशीं श्रीदत्तात्रेय मूर्तीस नैवेद्य समर्पण केला.

## भटणी, अग तुला खोडकर पोरगा होईल.

यावेळीं दुसरा असाच चमत्कार झाला कीं, एका गरीब ब्राह्मणाच्या बाईनें श्रद्धापूर्वक श्रीसमर्थांस नैवेद्य अर्पण करण्याकरितां आणला होता; परंतु निर्धन असल्यामुळें तिची दाद कोणी लागूं देईनात; परंतु श्रीसमर्थ दयार्णव म्हणाले, "भटणीच्या नैवेद्यास कोण आड येतो? माजलेले पायपोस खातील." असें म्हणून समर्थांनीं भटणीस नैवेद्य आणण्यास सांगून परमानंदानें तो ग्रहण केला. धन्य ते समर्थ! गरीब बाई फार लांब बाहेर बसली असून दाद लागेना. तथापि अंतरसाक्षित्वानें जाणून श्रीमत् गुरुदेवदत्त स्वामीसमर्थ भगवान् यांनीं शुद्धांतःकरण पाहून बाईवर कृपा केली. बाईचे हृद्गत जाणून म्हणाले, "भटणी, अग तुला खोडकर मुलगा होईल." हें पुत्रानंदकारक वचनामृत श्रवण करून बाईस पोटांत मावेना असा आनंद झाला; व ती विनंति करून बोलली, "हे परमात्मन्, आजपर्यंत मी पुष्कळ सत्पुरुष पाहिले, परंतु मला इहपर सुखाचें पूर्ण समाधान या आपल्या चरणदर्शनानेंच झालें. या बाईस पुत्र संतान ४५ वर्षांचे वयापर्यंत नव्हतें, तें श्रीस्वामीकृपेनें बाईस एक वर्षांत पुत्रसौख्य प्राप्त झालें. ही बाई सातारा

जिल्ह्यांतील रहाणारी गोविंदभट नांवाच्या ब्राह्मणाची स्त्री. महासाध्वी व भोळी असे. हिला स्वामीमहाराजांचे स्मरण झालें म्हणजे कंठ सद्गदित होऊन ती मोठ्या प्रेमानें रडत असे. हें मी समक्ष पाहिलें आहे. निष्ठाच कारक आहे हें खरें.

## आम्हीं सोंवळ्याचें अन्न खात नसतों.

दुसरे दिवशीं श्रीसमर्थांचे दर्शनास बडोद्याहून जानकीबाई नांवाची कऱ्हाडे ब्राह्मणाची स्त्री आली होती. तिचे मनांत श्रीमहाराजांचे सोंवळ्या ओंवळ्याच्या संबंधानें फारच विकल्प येत होते. ही बाई सोंवळी इतकी होती कीं, तिचे पाय चालतांना पृथ्वीवर पडणें मुष्कील होत होते. या बाईनें श्रीस्वामीमहारांस नैवेद्य तयार करून सायंकाळचे वेळेस सोंवळ्यांत चालली असतां, सोंवळ्याच्या खटाटोपामुळें बाईचा पाय घसरून बाई रस्त्यांत पडली, व त्यावेळीं बाईस वृश्चिक दंश झाला. परंतु नैवेद्यास कोणत्याही प्रकारची अडचण भासली नाहीं. बाई धडपडत समर्थांजवळ गेली, व नैवेद्य पुढें ठेविला हें पाहून श्रीस्वामी बोलले, "**आम्हीं सोंवळ्याचें अन्न खात नसतों. तुझ्या नाटकवाल्या प्रिय पुरुषास ताट नेऊन दे.**" हें प्रचीतीचें व आपल्या दुष्ट कर्माचरणाचे दर्शक शब्द ऐकून, बाई आपल्या ठिकाणीं विरघळून, मृत्तिकेसारखी थंडगार झाली. व आपण पूर्ण ब्रह्मसर्वेश्वर साक्षात् स्वामी आहांत असें म्हणून स्तुति करूं लागली. नंतर समर्थांनीं कांहीं अंश ग्रहण केला व "पांढरी झाल्यावर तुला भक्ति लागेल." असें समर्थ म्हणाले. पुढें कांहीं दिवसांनीं ह्या बाईच्या आंगावर कुष्ट रोग (पांढरा) अति सोंवळ्याच्या विकल्पानें उत्पन्न झाला. श्रीसमर्थांचें वचन ब्रह्मदेवास देखील कधींच अनृत करण्याचें सामर्थ्य येणार नाहीं; मग मनुष्याचा पाड काय! असो. या वेळीं मी समर्थांजवळ दीड महिना होतो.

## मादरचोद पेढे भूल गया.

एका ब्राह्मणानें पोटशूळ बरा होण्याकरितां नरसोबाचे वाडीस जाऊन सव्वा रुपयाचे पेढे वांटीन असा नवस केल्यावरून, त्याचा पोटशूळ राहिला. पुढें १० वर्षांत देखील नवस फेडण्याचें स्मरण राहिलें नसून, कांहीं कामाकरितां अक्कलकोटास आला होता, तो स्वामीदर्शनास येऊन उभा राहिला असतां समर्थ म्हणाले, "**मादरचोद, पेढे भूल गया.**" हें ऐकून ब्राह्मण शरण होऊन त्यानें तात्काल पेढे वांटले.

## कुत्र्यास तुकडे घाला.

शके १७९५ श्रीमुखनाम संवत्सरे पौष शुद्ध ५ बुधवारीं, श्रीसमर्थ आज्ञेनुरूप मी द्वारका यात्रा करण्यास चार मनुष्यांसह निघालों. श्रीगुरुदेवदत्त गिरनारी सोरटी सोमनाथ, सुदामपुरी, द्वारका, व नारायण सरोवर वगैरे यात्रा करून शके १७९६ भावनाम संवत्सरे अधिक आषाढ वद्यांत बडोद्यास आलों. श्रीसद्‌गुरुंना पुढें ठेविण्याकरितां प्रत्येक स्थलांतील वस्तु आणिलेल्या बिघडतील, एतदर्थ भाद्रपद शुद्ध ६ बुधवारीं अक्कलकोटास गेलों. त्यावेळीं श्री दत्तात्रेयस्वामी यांची स्वारी देशमुखांचे वाड्यांत होती. गोपीचंदन वगैरे आणिलेल्या वस्तु श्रीस अर्पण केल्या; त्याकालीं सर्वांतर्यामी श्रीस्वामी समर्थ म्हणाले, '**बताशासारखें आणिलेलें पन्न मोठें आहे ?**' हें ऐकतांच मला स्मरण होऊन विस्मय झाला. बडोद्याहून निघते वेळीं डब्यांत पत्रें काढून ठेविलेलीं आणण्यास विसरलों. सर्वसाक्षी स्वामी महाराजांजवळ विनयपूर्वक क्षमादान मागितलें. नंतर समर्थ ह्मणाले, '**कुत्र्यास तुकडे घाला.**' व समर्थांच्या वचनाचा वास्तविक अर्थ लक्षांत न आल्यामुळें पुनः विनंति केली असतां श्री समर्थांनीं सेवेकरी लोकांकडे बोट दाखविलें. त्या आज्ञेनुरूप दुसरे दिवशीं सर्व जातीच्या लोकांस यथास्थित मधुकरी अन्न समर्पण केलें. तेव्हां एकंदर सेवा करणारे लोक निरनिराळ्या ज्ञातीचे अडीचशांवर होते. ही मधुकरी मोरोपंत म्हैसकर सेवेकरी यांचे घरीं कराविली होती. तेव्हां सच्चिदानंदघन स्वामी महाराज, त्यांच्या घरांत विष्णूपंत शंकराचे खोलींत बसले होते. सुमारें अर्ध सेवेकरी लोकांस मधुकरी घातल्यावर स्वामी समर्थ बोलले, '**आम्हांस ताट आणा.**' अशी आज्ञा होतांच झालेल्या यथासांग अन्नाचें पात्र स्वामी महाराजांपुढें आणून ठेविलें.

## पाण्यांत जाऊन बुडाल, चिखलांत जाऊन बुडाल, उगीच स्वस्थ आनंदांत असावें.

समर्थांचें पूजनादिक झाल्यावर सुंदराबाई महाराजांस खाऊं घालूं लागली; त्यावेळीं आणखी कांहीं पदार्थ आणून देत असतां स्वामीराज म्हणाले, '**पोळी दसऱ्याचे दिवशीं आणून वाढ.**' तें ऐकून माझे चित्तास असें वाटलें कीं विजयादशमीचा नैवेद्य झाल्यावांचून मला जाण्यास आज्ञा होत नाहींत. माझा तर लौकर जाण्याचा विचार होता. सर्व सेवेकऱ्यांस मधुकरी घातल्यानंतर

व सर्वांचें भोजन झाल्यानंतर सुमारें पांच वाजतां दत्तमूर्ति उठून, मोरोपंताचे घरांतील दरवाज्यावर दोन्ही हात ठेवून, डोकावून प्रसन्न वदनानें चालती झाली. ती भक्त भगवंता सुतार याचे घरीं जाऊन विराजमान झाली. पाठीमागें सर्व लोक धांवत गेले. मीही पाठीमागून केळीं वगैरे उपोषणाचे पदार्थ घेऊन सुंदराबाईस देण्याकरितां गेलों. समर्थांस साष्टांग नमस्कार करून सुंदराबाईस फलाहाराचें पदार्थ दिलें. त्याचा स्वीकार सुंदराबाईनें करून म्हणाल्या, "हो बुवा साहेब, आपण बडोद्यास एक दोन दिवसांत जाणार काय ?" नंतर मी सांगितलें, "सद्गुरु स्वामीरायांची आज्ञा विजयादशमीपर्यंत जाण्यास नाहीं. यामुळें मी उद्यां गाणगापुरास जातों." तदनंतर सुंदराबाई बोलली, "गाणगापुरास बहुत वेळां गेलां आहांत. आतां काय काम आहे." तेव्हां श्री समर्थ म्हणाले, '**पाण्यांत जाऊन बुडाल, चिखलांत जाऊन बुडाल.**' गाणगापुरास जाण्यास श्री स्वामी महाराजांची आज्ञा स्पष्ट होत नाहीं, असा बोध झाला असतां पुनः जाण्याचा दृढ विचार होऊन दुसरे दिवशीं गाणागापुरास चालता झालों. या भाद्रपद वद्यांत अक्कलकोट, गाणागापूर वगैरे प्रांतांत पाऊस चांगला पडला होता. मी गुड्डरच्या स्टेशनावर उतरून वाहनाचा तपास केला असतां मिळालें नाहीं. मग तसाच पादचारी एकटाच निघालों. सुमारें तीन कोस जातों इतक्यांत दोन तीन पाण्याचे ओढे लागले व चिखल (गाळ) भरलेला ओढा लागला. हळू हळू त्यांत पाय ठेवून चाललों तों कंठापर्यंत चिखलांत बुडालों. पुष्कळ प्रयत्न केलें. पण बाहेर निघतां येईना. तेव्हां फार घाबरलों. तों पाठीमागून घोड्यावर बसलेला मुसलमान स्वार येत होता. तोही घोड्यासुद्धां चिखलांत बुडाला. व मला पाहून म्हणाला, "क्यों जी चिखल बहुत हैं, ऐसा तुमने हमकू क्यौं नही कहा ?" त्या स्वारास मला उत्तर देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें व चिखलांतून पाय मागें पुढें हालवितां येईना, यामुळें प्राणवायुसहीत जीव अतिशय घाबरल्यामुळें कांहीं बोललों नाहीं. मी समर्थांची आज्ञा उल्लंघन करून आलों, म्हणून मला असा प्रसंग आला. असा विचार मनांत येतांच डोळ्यांपर्यंत चिखल लागला. आतां यांतून बाहेर निघणें होत नाहीं, म्हणून स्वामी महाराजांस मोठ्या हाका मारिल्या; त्या सपाट्यांत माझे हात धरून मला कोणी बाहेर काढिलें. असा भास झाला. चिखलांतून बाहेर आल्यानंतर २ कलाक दम फार लागला होता. मी आल्यानंतर स्वाराचा घोडाही फार झपाट्यानें निघाला. स्वार हळू हळू मोठ्या मिनतवारीनें बाहेर निघाला. माझे कपडे चिखलानें भरल्यामुळें पाण्याच्या ओढ्यांत

स्नान करून सर्व कपडे धुतले, व हळू हळू सायंकाळपर्यंत गाणागापुरास पोंहचलों. दोन दिवसांनीं हातपाय दुखणें कमी वाटल्यानंतर श्रीगुरुचरित्रग्रंथाचीं पारायणें सात दिवसांत सात केलीं, आणि देवाचें पूजनादिक ब्राह्मण भोजनादि करून, भीमा अमरजेच्या संगमास स्नानास गेलों. स्नान करितां करितां पाय घसरून भालाभर पाण्यांत गेलों. पोहतां येत नसल्यामुळें गटांगळ्या खाऊं लागलों. इतक्यांत संगमावरील दोन चार सेवेकरी येऊन त्यांनीं मला पाण्यांतून बाहेर काढिलें. त्यावेळीं सावध होण्यास दोन प्रहर लागले. नाका डोळ्यांतून पाणी जातच होतें; त्या दिवशीं संगमावर मुक्काम करणें भाग पडलें. पुढें दोन तीन दिवसांनीं गाणगापुराहून निघून आश्विन शुद्ध ६ स अक्कलकोटास आलो. त्यावेळीं समर्थ श्रीस्वामीमहाराज देशमुखांचे वाड्यांत आनंदांत बसले होते. तेथें मी जाऊन साष्टांग नमस्कार केला. सच्चिदानंद यतिराज म्हणाले, "**चिखला पाण्यांत बुडून जिवंत आलेत का?**" हें स्वप्रचितीचें भाषण ऐकून मी म्हणालो, "श्री समर्थांची आज्ञा उल्लंघन केल्यामुळें अती दुःखी झालो." हे ऐकून श्रीसमर्थ बोलले, "**उगीच स्वस्थ आनंदांत असावें.**" अशी स्वामी महाराजांची आज्ञा झाल्यावर पुढें गाणगापूर वगैरे कोणत्याही क्षेत्रीं पूर्णब्रह्म परमेश्वर दत्तात्रेयस्वामीचे चरण सोडून जाणें नाहीं, असा निश्चय केला. दोन तीन दिवसांनीं आश्विन शुद्ध दशमी आली. विजयादशमीस (मंगळवारीं) श्रीदत्तमूर्तीस नैवेद्य उत्तम प्रकारें करण्यास गणपतरावास सांगून, त्यांनीं तयार करून मंगळवारीं प्रातःकाळीं सूर्योदयापूर्वी समर्पण केला. मला उठण्यास उशीर झाल्यामुळें स्नान न करितां तसाच दर्शनास गेलों; विडा दक्षिणा पुढें ठेवावी. तों त्रयमूर्ति दत्तराज गुरु म्हणाले, "**आमचे सर्व पदार्थ उत्तम झाले, पोट भरलें.**" हें ऐकून माझी पूर्ण खात्री झाली. तांबूल दक्षिणा पुढें ठेवून नमस्कार केला. सायंकाळीं श्रीस्वामीमहाराज आणि श्रीमंत अक्कलकोटचे राजेसाहेब यांची स्वारी बंबगार्डन साहेबासहीत शमीपूजनास निघाली. शमीपूजन होऊन आल्यानंतर श्रीस्वामीमहाराज सर्वांस दर्शन देऊन राजवाड्यांत गेले. ते दोन चार दिवस बाहेर आले नाहींत. आश्विन शुद्ध १३ शुक्रवारीं समर्थ राजवड्यांतील ओट्यावर विराजमान असतां, सर्वांस दर्शन झालें. मीही चरणीं मस्तक ठेवून जाण्यास आज्ञा मागितली. तेव्हां दोन चिकण सुपाऱ्या व एक तराजूचा फद्या प्रसाद समर्थांनीं देऊन जाण्यास आज्ञा दिली. अशा ह्या पूर्ण ब्रह्मस्वामी समर्थांच्या दत्तरूपी अवतारलीला किती म्हणोन वर्णन कराव्या?

या विजयादशमीस एकतर राजेसाहेबांची स्वारी, व स्वामी महाराजांची स्वारी यांचा मोठा समारंभ पाहण्यासारखा होता. हजारों लोक दर्शनास आले होते.

## तुमच्या तोंडांत दांत आहेत तितकीं वर्षे रहाल.

एक सातारा जिल्ह्यांतील राहणारा गृहस्थ पांडुरंग केशव नांवाचा बडोद्याकडे नौकरीवर असतां, त्यास श्री अक्कलकोटच्या स्वामी महाराजांची फार भक्ति लागली. पुढें तो रजेवर देशी गेला. त्या वेळीं अक्कलकोटास स्वामीदर्शनाकरितां गेला होता. स्वामी महाराजांनीं पांडुरंग केशव पटवर्धन यास विचारलें, " **बडोद्यापासून नर्मदा किती लांब आहे, तिकडे आंब्यांचीं झाडें आहेत ना.** त्या आंब्यांचीं पानें आम्हांस आणून द्याल काय ? " नंतर पटवर्धनानें, 'होय' म्हणून उत्तर दिलें. मग श्री समर्थ, " **कांहो तुमच्या तोंडांत दांत आहेत तितकीं वर्षें रहाल.**" असें भाषण करून पांडोबाच्या पदरांत प्रसाद तीन वेळ टाकला, व पुनः परत घेतला आणि श्री समर्थ पांडुरंगांस बोलले, " तुला प्रसाद आठ वर्षांपूर्वी दिला आहे." ही आठवण पांडुरंगास होतांच श्री समर्थचरणीं अनन्य साष्टांग नमन करून आज्ञा घेऊन बडोद्यास परत आला. व नर्मदा कांठच्या आंब्यांचीं पानें श्री स्वामी महाराजांकडे पाठविली. पुढें तीन वर्षांनंतर पांडुरंग पटवर्धन याची प्रकृति बिघडून तो स्वामी महाराजांच्या भावी वचनानुरूप वयाचे बत्तिसावे वर्षी डभोई गांवांत भाद्रपद शुद्ध १४ स वारला. मरणाचे पूर्वी श्री समर्थांनीं पांडुरंगांस प्रत्यक्ष दर्शन दिलें होतें. समर्थांचे वचनाची खात्री अनुभव आल्यावर निःशंक होते.

## किमयाकार संन्यासी याचा वृत्तांत व शांती.

एक संन्यासी किमया करण्याचे नादांत फार दिवस फिरत होता. त्यानें किमया सिद्ध होण्याचे कामांत हजारों साधु गोसावी, सिद्ध, संन्यासी, जती, फकीर वगैरे लोकांचा समागम करून किमया साधली, असें तो लोकांस सांगत असे. या संन्याशानें यतिधर्माचा किंवा यति धर्माप्रमाणें चालण्याचा तिरस्कार करून अनादि वेदशास्त्रांस न मानितां किमयाचे छंदांत तीन तप आयुष्य घालविलें. याचे पूर्वाश्रमांतील व्यवहार निरनिराळ्या तऱ्हेचे असल्याबद्दल त्याचे जवळील शिष्य मंडळी सांगत होती. या संन्याशाजवळ पंचवीस मनुष्यें, दोन घोडे आणि एक साधे बैलाची गाडीही कांहीं दिवस होती. हा मोठमोठ्या शहरांत व बागेंत

हवाशीर जागेंत राहत असे. हा सुरूप असून मिजाशी होता. मिष्टान्न भोजनावांचून याचा एक दिवसही गेला नसेल, असें त्याच्या भोजनाच्या थाटावरून सहज वाटत असे. किमया संबंधांत याचे बोलणें चित्तवेधक इतकें सफाईचें होतें कीं कित्येक श्रीमंत, विद्वान्, ब्राह्मण, साधु, वाणी, मराठे व मुसलमान वगैरे लोक त्याचे भाषणांत तर्क न करितां गर्क होत असत. कित्येक तर किमयेचा चमत्कार पाहण्या-पुरते शिष्यही बनत असत. याला हिंदुस्थानी, मराठी व मुसलमानी अशा तीन भाषा चांगल्या बोलतां येत होत्या. आम्ही पंजाब देशाचे आहों असें तो स्वतः सांगत असे. याचे किमया विषयांत कोणी विरुद्ध बोलूं लागल्यास, तो अमर्याद शिव्या देत असे. आणि प्रसंगवशात् एखाद्यास, "पुरे पुरे, नको चुकलों, माफ करा, पायां पडतों. आपण म्हणतां तेंच खरें आहे." असें वचन तो वरचेवर म्हणे तोंपर्यंत देखील मारीत असे. त्याच्या ह्या विलक्षण स्वभावामुळें एका हिंदुस्थानी जवानानें यास यथेच्छ पोटभर मार देऊन लंगडें केलें होतें. ही हकीकत त्यांनीं सांगितली. व त्याचा डावा पाय थोडा अधू होता. हें समक्ष पाहण्यांत आलें आहे. शके १७९२ सालीं मी एका स्नेह्याच्या मुलाच्या मुंजीकरितां त्र्यंबकेश्वरीं गेलों होतों. मुंज झाल्यानंतर सर्व मंडळी नाशिकास आलों. गंगास्नान देवदर्शन करीत पंचवटींत गेलों. कपालेश्वराचे देवळांत एक संन्यासी चांलले होते; हे वेदांतशास्त्रांत व ज्योतिषशास्त्रांत उत्तम ज्ञाते होते. यांचें प्रसिद्ध नामाभिधान बाबा घोलप स्वामी होतें. चार घटिका त्यांचे जवळ बसल्यानें समाधान वाटलें. घोलप स्वामींनीं सांगितलें, "तो एक किमया करणारा संन्यासी तेथें उतरला आहे; मनुष्य व घोडे बरोबर असून यतीचा भगवा वेष आहे, परंतु यतीधर्माच्या विवेक वैराग्याचा गंध देखील नाहीं. कोणापाशीं द्रव्य न मागतां भोजनादि नित्य खर्च मजेनें चालवितो. त्याची आमची भेट झाली आहे, तर तुम्ही जा पहा, नंतर काय होतें तें सांगा." मग आम्ही कांहीं मंडळी किमया करणाऱ्या संन्याशाचे दर्शनार्थ गेलों. तेथें कांहीं बसलेली मंडळी उठल्यानंतर आम्ही संन्याशाचें भाषण उत्सुकतेनें व नम्रतेनें ऐकते झालों. त्या प्रसंगीं तेथें नारायण शास्त्री आचार्य विंचूरकर शास्त्री शौचे, गायधने भट वगैरे विद्वान् मंडळ बसलें होतें, त्यांचें व संन्याशाचें भाषण शेवटीं यद्वातद्वा होऊन विद्वान् लोक, संन्याशाचें ज्ञान, '**शेषं कोपेन पूरयेत्,**' येथपर्यंत जाणून स्वस्थ बसलें. तदनंतर स्वामी आम्हां मंडळीशीं बोलूं लागले. तो म्हणाला, "आम्हीं नित्य प्रातःकाळीं भट्टींत केवळ वनस्पतीनेंच तीन चार तोळे सोनें उत्तम तयार करितों. हें पहा." असें म्हणून सोनें दाखविलें. मग स्वामी म्हणाले, "चिल-

२९३२३ ... ७६५ ... ता. दि. १६९

मींत देखील तोळा अर्धा तोळा सोनें सहज करितों. मी तर काय पण गोरक्ष, मच्छेंद्रादिकांनीं किमया करून योग्यता मिळविली; तसेंच गुरुदत्तात्रेयांनीं या किमयेसाठींच अवतार घेतला. किमयेनें रामकृष्णावतार पूज्य मानिले गेले. ब्रह्मदेवानें दोन तीन वेळां किमया केली होती; विष्णूनें समुद्रांत एकांत बसून किमया करून पदार्थ उत्पन्न केले; शंकरानें तर किमयेनें चिलमींत रत्न, सोनें, रुपें व पारद करून ठेविलें आहे. तात्पर्य किमया करील तोच सिद्ध, तोच योगी, महात्मा म्हणावा. सोनें द्रव्य नसलें म्हणजे नाना प्रकारचे वेष धारण करून पोटार्थी दारोदार भीक मागतात, तें भीक मागणें, तोंड विचकणें, दीनता दाखविणें हीं साधूंचीं लक्षणें आहेत काय? ज्यांच्यावर परमेश्वराची संपूर्ण कृपा आहे ते कधीं तरी काखेंत झोळी घालून भिक्षा मागतील? भिक्षा केवळ उदर पोषणार्थ मागणें म्हणजे निर्लज्जपणाचें काम आहे. अशास तर धिःकार असो.” हें स्वामीचें म्हणणें बरोबर आहे; परंतु किमया खरी आहे असें सच्छास्त्र दृष्टीनें व सद्वर्तनानें आणि सत्समागमानें स्वानुभवपूर्वक झालें असतें तर सार्थक्य होतें. असो. हें बहु भाषण ऐकून स्वामीवर सर्व मंडळी रागावली. इतक्यांत मी व आमचे गोविंदराव चिमणाजी कारकून म्हणालों, “आपण संन्यास कां घेतला, पुडी (भोजन) कोठें करिता, किमया म्हणजे काय, संन्याशानें धातु-स्पर्श करावा काय?” हे चार प्रश्न ऐकून संन्यासी अति क्रोधी झाले. मला म्हणाला, ‘तुझें नांव काय?’ मी सांगितलें, ‘वामनबुवा वांबोरीकर.’ स्वामी म्हणाला, ‘तुझा गुरु कोण,’ इतक्यांत गोविंदराव बोलले, “आमचे गुरु दत्तावतार योगीराज अक्कलकोटनिवासी स्वामीमहाराज आहेत, आम्ही त्यांचे सेवेकरी आहोंत.” नंतर स्वामी म्हणाला, “अक्कलकोटका स्वामी देखा है.” नंतर मी म्हटलें अक्कलकोटास प्रति वर्षी एकवेळ तरी अवश्य जात असतों. पूर्ण ब्रह्म परमेश्वर स्वामी समर्थ सर्वांतर्यामी स्वात्मानुभवानें निःसंशय अखंडानंदाद्वितीयस्वरूप आहेत. असा अत्यंत दृढतर निश्चय आमचा आहे. आम्ही मोठ्या व शुद्ध वैदिक वंशांतील कोणास न मानणारे असे आहोंत, तथापि या सद्गुरु उत्तम पुरुषाचे केवळ यःकश्चित् सेवेकरी होऊन राहिलों. ज्यांच्या आज्ञेनें नोकरी व संसार व्यवहार सोडून दासानुदास होऊन राहिलों आहे. असें बोलतांना अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त योगीराज श्री स्वामी समर्थ महाराजकी जय, जय, असा श्री गुरुसमर्थांच्या नामाचा जयजयकार गजर होतांच आंगावर रोमांच उभे राहून सर्वत्रांस विलक्षण आनंद झाला. तो रसास्वाद भक्ति ज्ञान वैराग्ययुक्त गुरुभक्त जाणतात. अशा

वेळेस चकित झालेला संन्यासी उन्मत्तपणानें निंद्य बाष्कळासारिखें बोलत आंगावर येऊन, "उगीच तुम्ही गद्धेलोक स्तुति करितां. तुमचा गुरु सोनें करितो काय?" हें ऐकून निःशंक निर्भय होऊन गोविंदरावानें व मी उत्तर दिलें, "अरे किमयाकारा, तूं व्यर्थ निंदा करूं नकोस. महंताच्या दर्शनानें व कृपेनें खरी किमया समजली म्हणजे तुला सर्वत्र सुवर्णच दिसेल, व यतिवेष धारणाचें यथार्थ साफल्य होईल; परंतु एक वेळ अक्कलकोटास प्रत्यक्ष जाऊन पहा." नंतर संन्यासी बोलला, "मला प्रत्यक्ष जाऊन पाहण्याची जरूर नाहीं, व खरें असें कधींही मानणार नाहीं. जर ते खरेच उत्तम आहेत तर आम्हांस येथेंच चमत्कार झाला पाहिजे; खात्री झाल्यावर मी मानीन. उगीच पोकळ ढोंगाच्या गोष्टी मी ऐकत नसतों." इतकें ऐकून आम्हांस फार वाईट वाटलें. काय करावें, तथापि धीर धरून मोठ्या आवेशानें सांगितलें, "श्री सद्गुरु स्वामीराज करुणासागर आहेत ते कृपा करून तुझी खात्री करतील हें पक्कें समज; अधिक चावटपणांत अर्थ नाहीं." असें म्हणून आम्हीं सर्व उठून चालते झालों. झालेली एकंदर हकीकत बाबा घोलप स्वामास सांगितली. त्यांना फार राग येऊन, "फार मदोन्मत्त आहे, दुष्टास शासन होईल. घाबरूं नका." असें ते म्हणाले. पुढें बिऱ्हाडीं जाऊन संध्यावंदनादि करून गोविंदराव व मी दोघांनीं श्री समर्थांच्या अगम्यलीला गुणानुवादांत रात्र काढिली. दुसरे दिवशीं भोजनोत्तर देवदर्शनार्थ निघालों. आमची मंडळीही बरोबर होती. पंचवटींत जातों इतक्यांत गोविंदरावही कांहीं स्नेह्यांसहित कचेरींतून आले, सर्व मिळून घोलपस्वामीचें दर्शन केलें. आम्हांस पाहतांच घोलपस्वामी म्हणाले, "आतां त्याची शिष्यमंडळी येथें आली होती, त्यांनीं सांगितलें आज प्रातःकाळीं किमयेकडे नेहमींप्रमाणें पडदे लावून एकटा संन्यासी पुष्कळ वेळ बसला होता. करायचे तितके उपाय व हुन्नर अतिशय केले परंतु शेवटीं सोन्याची गोळी न बनतां केवळ काळ्या कोळशाची गोळी झाली. संन्याशी आज फार संतापला आहे. आज स्वयंपाक झाला नाहीं. मारल्यामुळें व संन्याशाचें भांडवल आटोपल्यामुळें बाया व पुरुष मिळून बरेच निघून गेले. अक्कलकोटाच्या सेवेकऱ्यांस ठार मारून टाकीन असा फार बडबडतो आहे. खोटें किती निभणार? पाप नडल्यावांचून रहात नाहीं; आम्हीं आतां चालते होतों. दोन मनुष्यानीं बाहेरचे बाहेर घोडे नेले," असा मजकूर घोलपस्वामीनीं सांगितल्यावर आम्ही विचारांत पडलों. श्रीसद्गुरु दत्तदिगंबर स्वामीमहाराजाधिराजाचा जयजय उच्च स्वरानें करीत या नाशिक क्षेत्रांत गंगेवर त्यांत गुरुसेवेंत संन्याशाचे हातून मरणें यापेक्षां श्रेय तें कोणतें? असें म्हणत

किमयाकार संन्याशाकडे हळू हळू गेलों. आम्हांस पहातांच एक मोठा धोंडा (दगड) दोन्ही हातांत घेऊन आम्हां दोघांचें डोकें फोडण्यास आला व तोंडानें " तुम्हारी माकी × × मरजाव वहां ×× आम्हारा सब घात किया ओ मादर × × खडे रहो, देखो हरामखोर गद्धे क्यौं नहीं मरत है, " असें वरचेवर बोलत अगदीं जवळ आला. त्यावेळीं या कालमूर्तीस पाहून फार भीति वाटली. आंगास दरदर घाम सुटून थरथर कांपत कांपत, 'श्रीगुरु स्वामीसमर्थ जयजय दत्तराज योगी' असा मुखानें अनन्य भावें करून गजराचा झपाट्यानें नामघोष चालविला. कोणाचें कोणास भान नाहीं. असा निर्भय प्रसंग पाहून संन्याशी घाबरा होऊन त्याचेच आंगावर दगड पडल्यामुळें तो एकाएकीं निचेष्टीत बेशुद्ध झाला. इकडे भजनाचा तडाखा चालला आहे इतक्यांत संन्यासी एकदम सावध होऊन, " अक्कलकोटका स्वामी हांजीभय्या, अक्कलकोटका स्वामी सच्चा है." असें म्हणून संन्याशानें मोठ्या गडबडीनें बडबडत धडधड धांवत जाऊन, गंगेंत दगड टाकला. व स्नान केलें. थोडा शांत झाला, मग आम्हांस हाक मारून, " तुमभी आश्नान करो." असें त्याचें किंचित् नम्र भाषण ऐकून आम्हीं स्नान संध्यावंदनादि केलें. नंतर आम्हांस पुन्हां " आछा आव सेवाधारी " असें ऐकून आम्ही सर्व त्याचे बिऱ्हाडीं गेलों. संन्यासी अधिकाधिक पश्चात्ताप सहित शांत होत आहे, हें पाहून संतोष झाला. नंतर, " स्वामीजी, कुछ प्रसाद भोजन करो." असें आम्हीं म्हटल्यावर, " ज्या दिवशीं अक्कलकोटस्वामीस पाहूं त्या दिवशीं भोजन करूं, तेथपर्यंत फलाहार स्वल्प होत जाईल; उद्यां प्रातः गंगास्नान करून रामचरणास बरोबर घेऊन चालते होऊं." स्वामीनीं मला विचारिलें, 'आपण अक्कलकोटास कधीं जाणार?' मी सांगितलें, "उद्या या मंडळीबरोबर वांबोरीस जाऊन, नंतर पुण्यास जाऊं. पुण्याहून मातोश्रीस घेऊन बडोद्यास जाऊं, तेथें आमचे मधले बंधू वेणीमाधवरावजी वैद्य, श्रीमंत बजुबाई साहेब घोरपडे अमीर उमराव यांजकडे असतात त्यांस भेटून, मग अक्कलकोटास येणें होईल. तिकडे द्वारका यात्रेचाही योग येईल." मग आमची सर्व हकीकत व पत्ता लिहून घेतला; पुढें होईल तें सर्व आपणास जरूर बडोद्यास लिहून कळवीन. कांहीं काळजी करूं नये, असें तो म्हणाला.

## ज्याच्या सत्कीर्ति श्रवणानें शक्ति प्राप्त होते त्याच्या दर्शनानें काय न होईल?

आम्ही उठते वेळीं गळ्यांत मिठी मारून स्वामीच्या नेत्रांतून प्रेमाश्रुपात होत होते. स्वामी म्हणाले, "ज्यांच्या सत्कीर्ति श्रवणानें माझ्यासारख्या अति मदोन्मत्तास

पश्चात्ताप होऊन शांति प्राप्त झाली त्या पुरुषाच्या प्रत्यक्ष दर्शनानें काय न होईल? पाहिजे तें होईल." दुसरे दिवशीं उपाधिरहित एक रामचरण शिष्य बरोबर घेऊन स्वामीजी अक्कलकोटाकडे चालते झाले. आम्हीं ही गोष्ट घोलप स्वामीला कळवून वांबोरीस आलों; तेथून पुण्यास येऊन मातोश्री सहित शके १७९२ जेष्ठ शुद्ध १५ मेस बडोद्यास आलों. बडोद्यास श्रावण वद्य ५ स माहूरगडाहून स्वामीजीचें पत्र आलें तें कृपापत्र खालीं लिहिल्याप्रमाणें इत्थंभूत मजकुराचें आहे.

## लिंबाड्याचे झाडांतून पाणी पाझरूं लागलें. पृथ्वी सोन्याप्रमाणें पिवळी दिसूं लागली—माहूरगडावर महाराजांचें दर्शन.

"आम्हीं रामचरणासह अक्कलकोटास पोंचल्यावर तात्काळ महत्पुरुषांच्या दर्शनास् खासबागेंत गेलों, तेथें बैलाच्या छपरांत भूमीवर आसनावर महापुरुष स्वामी गुरु बसले होते. मंडळीहि वरीच बसली होती. महात्मा स्वलीलेंत खेळत होते. फळें वगैरे पुढें ठेवून साष्टांग दंडवत प्रणाम करीत आहों एवढ्यांत झाडाकडे पाहून महापुरुष स्वामी मोठ्यानें "**घाल दगड डोक्यांत, कारे माजलास काय? बोडकी × × येथें काय हुडकतोस? कोळसे झाले तर जीव दे. संन्याशाची × × किमया देख, इकडे काय पहातोस रे! तें झाड पहा. बोडक्यांत फथर घे मारून, आंखा खोल. डाव्या हातानें पहा ती किमया,**" असें बोलून पोट धरधरून हंसूं लागले. अंतर्यामीं अंतरसाक्षित्वाच्या खुणा पटल्यावर, मला असें झालें कीं, मेलों असतों तर बरें झालें असतें. अथवा या पृथ्वीनें मला पोटांत घेतलें असतें तर हा प्रसंग आला नसता; परंतु आज महद्भाग्योदय प्राप्त झाला आहे. हेच ईश्वर. या पुरुषाच्या चरणकमलाचें दर्शन झालें. गुरुदर्शनानें पुनीत झालों. धन्यधन्य कृतकृत्य झालों. हे भगवन्, अपराधाची क्षमा व्हावी. झाडाकडे पाहूं लागलों तों लिंबाड्याचे झाडांतून पाणी पाझरूं लागलें. पृथ्वी सोन्याप्रमाणें स्वच्छ पिंवळी दिसूं लागली; सर्व सुवर्णमय पाहिल्यावर विलक्षण चमत्कार वाटला. कधीं न पाहिलेली व कधीं न ऐकलेली अत्यद्भूत किमया पाहून पाण्यांत विरघळल्यासारखा झालों; शरीरास कंप सुटला; हात पाय इंद्रियें जड अशीं दिसूं लागलीं; मी शरीर किंवा माझें शरीर असें संकल्प होऊं लागलें; शरीर मिथ्या आणि मी शरीरी वेगळा असल्याचें भान सावध रीतीनें मनांत खात्रीपूर्वक तत्त्व विचारदृष्ट्या स्पष्ट वाटूं लागलें. मी काय होतों, आतां कोण आहे, जगत् काय, आत्मा कोण, समजूं लागलें. वहावा! काय महात्म्य दर्शनाचें! "धन्य है, जीस पुरुषके

तात्काल दर्शन परसन और दयासे अंदरका आत्मा गुरु पहिच्यानके जाना जाता है ओही सद्‌गुरु सच्चा है. सोही परमात्मा सत्य है. ओही सबके अंतरजामी साक्षी अविनाशी है, धनधन मेरो भाग. क्या अजब लीला है. किमया ऐंद्रजाल गारुड माया अविद्या, असत् जड दुःखपर है. इदेंमे परमात्मापूर्ण परब्रह्म सर्वेश्वर दुतिया (द्वैत) रहिता है. नित्यानंद रूप है. मुक्त शुद्ध अतींद्रिय है. वाहवा महाराज, स्वामी दत्तगुरु, आपहि प्रभु समर्थ सर्व समदयासागर हो। मेरेसे कोईभी प्रकारसे कही कालमें सेवा नही बनी है, और दर्शनभी नहीं हुवाथा, ऐसे होके दीन अनाथकूं केवल निरपेक्ष **सद्यः साधुसमागमः ॥** इस वाक्य सत्य करके दर्शनात् तारते हो. कृतकृत्य करते हो. हे दत्तगुरु, स्वामी सेवककूं क्यां हुकूम है?" असें माझें नम्र भाषण प्रिय वाटून भक्तवत्सल दिनानाथ दत्तदिगंबर म्हणाले, "**जाव आम्हारे माहुर गडमे, मजेमे चूप बैठ रहो.**" असें प्रसादकारक कल्याणरूप सत्व चित्सुख वचन ऐकून, "आच्छा गुरु आप परमात्माकी आज्ञा सर्वतः शिरपर मान्य है." इतकें बोलतों, तो माझे आंगावर महात्मा पुरुषांनीं भगवें वस्त्र व मृगाजिन फेंकून दिलें. तें अत्यंत प्रेमभावानें घेऊन, गुरुदत्तास पूजा नैवेद्य समर्पण करून, दुसरे दिवशीं महत्पुरुषाचें दर्शन करून निघालों, तों माहुरगड गुरुस्थानांत श्रावण शुद्ध १० स आलों. दत्तगुरुच्या स्थानांत पाहतों तर मृगाजिनावर अक्कलकोटस्वामी महत्पुरुष पाहून वंदन केलें. अपूर्व सर्वव्यापकपणाचा चमत्कार व साक्षात्कार पूर्ण खात्रीपूर्वक निःशंक झाला. खरी किमया समजून उमजली. हे दत्तगुरु, आप अद्वितीय परम पुरुष आम्हारे निःसंदेह स्वात्मानुभवसे प्रत्यक्ष इस स्थानमें पण संरक्षण करनेके वास्ते बैठे हो," असें बोलतां दिसेनासे झाले, जय दत्तस्वामी महारजकी जय!

आम्हीं येथें सुखानंदांत आहोंत. तुम्हीं योग्य पूर्ण गुरुभक्त आहांत, म्हणून झालेलें वृत्त लिहून कळविलें आहे. लिहिलेल्या पत्यावर पत्र पाठवीत जावें, क्षमा असावी.

**जय सच्चिदानंद ॥ नारायण**

## हरिवंश ऐका म्हणजे मुलगा होईल.

श्रीमंत रामचंद्रराव घोरपडे आमिरुल उमराव बडोद्यास राहत होते. यांस भाऊसाहेब घोरपडे म्हणतात. यांना नारसिंहाचे वाडीनजीक दत्तवाड, बेडग, सप्तसागर वगैरे गांवें इंग्रज सरकारांतून वंशपरंपरा शेंपन्नास वर्षांपासून इनाम मिळालीं आहेत. मोठ्या सयाजीराव महाराजांच्या कन्या श्रीमंत बजुबाईसाहेब ह्या भाऊसाहेबांच्या मातोश्री होत. या सरदारास बडोद्यास जहागीर गांव असून मोठी नेमणूक आहे. हें घराणें

चांगलें आहे. भाऊसाहेबांस कन्या संतान झालें. पुत्र होईना. पुष्कळ देवधर्म उपाय केले; नंतर आमचे मधले बंधु वेणीमाधवरावजी वैद्य हे श्रीमंत घोरपडे यांचे आश्रित होते. त्यांनीं भाऊसाहेबांस विनंति केली कीं अक्कलकोटास कारकून पाठवून श्री स्वामीस प्रार्थना करावी. नंतर कारकून पाठविला. त्यानें श्रीसमर्थांचें पूजन करून प्रार्थना केली; तेव्हां श्री मुखांतून "**हरिवंश ऐका म्हणजे मुलगा होईल,**" असें शुभाशिर्वचनामृत कारकुनानें बडोद्यास येऊन यजमानास सांगितलें. त्याप्रमाणें हरिवंश श्रवणानें पुत्ररत्न थोरलें कुटुंब सौभाग्यवती गंगूबाई साहेब यांस होऊन, महदानंद सर्वत्रांस झाला. तें पुत्ररत्न श्रीमंत बाबासाहेब घोरपडे अमिर उमराव बाबासाहेबांचे वडील व थोरल्या मातोश्री कैलासवासी झाल्या आहेत. हे बाबासाहेब विद्याभ्यास करून आपलें काम पाहूं लागले.

## बडोद्यांतील भाऊसाहेबांस सर्व संकटनाशक आशिर्वाद व प्रसाद.

बडोद्यांतील प्रसिद्ध गृहस्थ भाऊसाहेब, हे कांहीं कारणानें बडोदें सोडून दक्षिण देशांत यात्रा वगैरे करीत फिरत होते. हे हुशार, आचारसंपन्न, चतुर असून भगवद्भजन करीत असत. व भक्तिज्ञानाचें ग्रंथ श्रवण करीत असत. स्वामीमहाराजांची कीर्ति ऐकून भाऊसाहेब अक्कलकोटास दर्शनास आले होते. त्यावेळीं दत्तदिगंबर-स्वामी पटवर्धनांचे गणपति मंदिराजवळ दगडावर बसले होते; तेव्हां भाऊसाहेबांनीं श्रीचरणीं शुद्धभावें नमन करून डोळ्यांस पाणी येऊन (प्रेमाश्रुपात होऊन) श्रीचरणार्द्र झाले, म्हणून वस्त्रानें पुसून, कर जोडून उभें राहिले. तेव्हां दयाघन यतिवर्यांनीं कुचके हरबऱ्याचे सात दाणे मोजून भाऊसाहेबांस दिलें. नंतर, "**जा खुशाल आपले गांवीं मोठें काम करा.**" असें म्हणून समर्थांनीं त्यांचे पदरांत फलादिक पदार्थ टाकिले. सर्व संकटनाशक आशिर्वाद व प्रसाद प्राप्त झाला म्हणून भाऊसाहेबांस निश्चयात्मक अतिशय आनंद झाला; त्यावेळीं समर्थांजवळ चोळाप्पा मंडळीसहित ब्रह्मनिष्ठ बोवा व श्रीपादभटजी वगैरे होते. भाऊसाहेबांनीं पूजनादिक करून तीन दिवस मोठे आनंदांत घालविले. पुढें थोडे दिवसांत भाऊसाहेब समर्थ कृपेनें बडोद्यास घरीं आले, व त्यांस मोठें कामही मिळालें व त्यांचा द्वेष करणारे सात कुचके मनुष्य निरुपायीं स्तब्ध होऊन राहिले. असा समर्थांच्या आशिर्वादाचा स्वानुभव सज्जन गृहस्थ जे भाऊसाहेब त्यांस आल्यावर ते नित्य श्रीस्वामी समर्थांचें स्मरण करीत असत. भाऊसाहेब थोडे दिवस झाले, कैलासवासी झाले. त्यांस एक पुत्र होता.

## पांच वैष्णव गर्विष्ठ आचार्य त्यांचें आंधळ्या मुलांकडून गर्व खंडन, व मुलास दृष्टिदान.

एके वेळीं अक्कलकोटांत देशमुखांच्या वाड्यांत श्रीसद्गुरुस्वामी महाराज बसले होते. त्या वेळीं समर्थांजवळ बाबा सबनीस, रामदास बुवा, बाबा यादव, गोपाळ भट, सुंदराबाई वगैरे बसले होते. सुंदराबाईजवळ एक मोंगलाईतील आपल्या मुलासह ब्राह्मणाची बाई बसली होती. नंतर शिऊबाईनें समर्थांस विनंति केली, "या मोंगलाईतील गरीब बाईचे मुलास मुंजीबंधन झाल्यापासून नेत्रांनीं अगदीं दिसत नाहीं, अंध झाला आहे. पूर्वी चांगलें स्वच्छ दिसत होतें; तरी कृपा करून उपाय सांगावा." तेव्हां यतिराज म्हणाले, "**पांच राक्षस येत आहेत. आमची परीक्षा पहाणार आहेत. परीक्षेचे वेळीं हा पोरगा डोळे उघडील.**" इतक्यांत डोकीस शालजोड्या बांधलेले वैष्णव ब्राह्मण, जेवून पोट फुगलेले मोठ्या थाटानें प्रथम पांचजण दर्शनास आले. नमन वगैरे न करितां कर्नाटकी भाषेंत, व कांहीं संस्कृतांत बोलूं लागले. त्या वेळीं आणखी ७।८ वैष्णव आचार्य येऊन साष्टांग नमस्कार करून महाराजांसन्मुख बसले. तेव्हां यतिराज रागानें आंधळ्या मुलास बोलले, "**गणेशा, इकडे ये. या काळ्यांच्या मनांतील वाक्यें उत्तरासह यांना सांग.**" नंतर अंध मुलगा चरणीं मस्तक ठेऊन विनवूं लागला, "एक अक्षर देखील येत नाहीं. मी काय सांगूं?" तदनंतर समर्थांनीं आपले गळ्यांतील माळ त्या अंध मुलाचे गळ्यांत घातली व झेंडूचें फूल त्याचे डोळ्यांस लाविलें. समर्थांचे कृपाकर नेत्रांस लागतांच, अंध मुलगा डोळे उघडून वैष्णव आचार्यांचे समोर उभा राहिला. आणि आवेशानें पंच वैष्णवांनीं आणलेले वेदमंत्र व भगवद्गीतेतील श्लोक तसेच भागवतांतील श्लोक म्हणूं लागला. हें अद्भुत दत्तात्रेय स्वामीचे पारमार्थिक सामर्थ्य पाहून वैष्णव आचार्य अभिमान सोडून, मनांतील सर्व खुणा पोंचतांच अनन्य शरण होऊन, श्रीसमर्थ चरणीं साष्टांग नमस्कार करिते झाले. आणि स्तुति करीत क्षमादान मागूं लागले. कृपाघन यतिराज शांततेनें मुख्य आचार्यास म्हणाले कीं, "**आम्ही पाहिजे त्या जातीच्या मनुष्याचें अन्न खातों म्हणून निंदा करून आमची परिक्षा पाहिलीत खरी.** परंतु तुझ्या आईनें बाल्यावस्थेंत पुष्कळ मुसलमानांशीं व्यभिचार कर्म केलें आहे, व तुझा जन्म इमामबक्ष मुसलमानापासून झाला आहे. म्हणून तूं मोठा भ्रष्ट आहेस." श्री मुखांतील आपलें जन्म कथन वैष्णव आचार्यांनीं श्रवण करून,

अत्यंत लज्जीत व फजीत होऊन म्हणूं लागलें, "या अनाथ पतितास पावन करावें, व अन्याय क्षमा करावा. आम्ही या अक्कलकोट गांवांत सज्जन गृहस्थ पंढरीनाथ पागे यांचे घरीं भोजनास आज गेलों होतों तेथें एक स्मार्त ब्राह्मण आपली कीर्ति वर्णन करूं लागला; त्यावेळीं मी उन्मत्तपणानें आपली निंदा फार केली. व परिक्षा पहावयास आलों. मजसारखा दुष्ट छळक कोणीच नसेल. यांत संशय नाहीं; परंतु पूर्व पुण्यानें आपले दर्शनाबरोबर खात्री व पश्चात्ताप झाला आहे तरी लीन झालेल्या दीनावर दया अवश्य पाहिजे. कारण आपण दीनोद्धारक समर्थ पूर्ण अवतारी पुरुष खचित आहांत, हें अनुभवासहित निश्चयात्मक आहे." नंतर दयाळू स्वामीराज कळवळून ह्मणालें, "गंगास्नान करून भागवत धर्म आचरण करा." असा तत्काळ अनुग्रह झाल्यावर सर्व वैष्णव प्रेमभावें शुद्धांतःकरण होत्साते नमन करून, श्रीगुरुदेवदत्त स्वामी महाराजकी जयजय करीत निरभिमानपूर्वक चालते झाले. व निरंतर स्वामीभक्ति करूं लागले. आणि अंध मुलावर कृपा होऊन तो डोळस व विद्वान् झाला. त्याचे मातोश्रीस महादाश्चर्य वाटलें आणि ती आनंदानें स्वामीराजांचें पूजन करून आपले मुलासह स्वग्रामा गेलीं. त्यावेळेस ब्रह्मनिष्ठ वामनबुवा हे समर्थांजवळ एक मास होते.

## चांदोर करनाळी जवळील जगन्नाथचे ब्रह्मानंद स्वामी यांनीं पाहिलेला चमत्कार! हाडाचे सोनें.

बडोद्यापासून सुमारें वीस कोस नर्मदानदी आहे. त्या नदीच्याकांठीं चांदोर करनाळी नांवाचें प्रसिद्ध क्षेत्र आहे. तेथून एक कोस जवळ गंगनाथ महादेवाचें स्थान आहे. त्या गंगनाथ स्थानांत एक ब्रह्मानंद नांवाचे मुख्य ब्रह्मचारी महाराज राहत आहेत. यांचे दर्शनास चार महिने झाले मी गेलों होतों, तेव्हां तेथें नव्हते, ॥ **सत्य संकल्पाचा दाता भगवान** ॥ याप्रमाणें शके १८१७ मार्गशीर्ष वद्य ११ गुरुवारीं रात्रीं मी पूजा आरती करीत असतां अकस्मात हे ब्रम्हानंद योगी ब्रह्मचारी सुदैवानें कृपा करून आले. आसनारूढ विराजमान होत्साते श्री स्वामी महाराजांची (लेख्यमूर्ति) तसबीर पाहून फार खुशी झाले. चिन्मूर्ति ओळखून जयदत्त अवधूत स्वामी गुरुमहाराजगुरु असें आनंदानें बोलत, हिंदुस्थानी भाषेंत सांगूं लागले कीं सुमारें ४० चाळीस वर्षें झालीं, श्री गुरु दत्तावतारी अवधूत अक्कलकोट स्वामींचें दर्शन मला झालें, तेव्हां कोणी अति दारिद्र्यानें पिडलेला मनुष्य अवधूतांसमोर उभा होता. त्यावर अवधूतांनीं करुणायुक्त हुकूम केला कीं, '**ओ**

कांदेवाडीच्या मठातील फोटो



श्रीअक्कलकोट स्वामी महाराज

हड्डी लेके जाव,' असें ऐकल्यावर हडकास कसें शिवावें म्हणून विचारांत पडला. काय करावें, आज्ञा उल्लंघन करणें अयोग्य. सर्वथैव जाणून मुकाट्यानें कांहीं हडकें पदरांत बांधून एके बाजूस ठेविलीं. थोड्या वेळानें उचलूं लागला, तों त्यास जड लागलें. उघडून पाहतां हडकें नाहींत, बावन कशी उत्तम सोनें झालें आहे. मग त्या आनंदास काय पुसावें! दीनदयाघन श्री समर्थांनीं त्या गरिबास कृपा करून सुखी केलें. हें पाहून सर्वत्रांस विलक्षण चमत्कार वाटला. तो या ब्रह्मानंद ब्रह्मचारी सत्पुरुषांनीं प्रत्यक्ष पाहिलेला आम्हांस सांगितला. हे ब्रह्मचारी ब्रह्मानंद स्वरूपच शुद्ध आहेत. यांचें वय सुमारें ९० वर्षांजवळ असतां शरीरानें चांगले सुदृढ कटाक्ष होते. या महात्मा पुरुषाचे दर्शनास पुष्कळ लोक जातात. त्यांची सुश्रूषा फार चांगली राहते. हे योगी ब्रह्मानंद महाराज मोठे शांत व निरभिमान असत.

## वामनबुवा शरीरव्याधीनें अत्यंत पीडित-जलसमाधि घेत असतां प्रत्यक्ष जाऊन वांचविलें.

शके १७९८ च्या वैशाख शुद्ध ४ चतुर्थी शुक्रवारपासून माझी प्रकृति फारच बिघडली होती. त्यावेळीं ओलांडा, मूत्रकृच्छ्र, खोकला, आमांश, संधिवात, शरीरदाह, नेत्ररोग, मूळव्याध व गर्मी वगैरे रोग शरीरांत अत्यंत बलवान् झाले. त्या समयीं बडोद्यास सुरसागराचे कांठीं सुदाम्याचे घरांत आम्हीं राहत होतों. मातोश्री, बंधु वगैरेस रात्रंदिवस निद्रा देखील येईना, इतकी काळजी लागली होती. कांहीं सुचेनासें झालें. माझा वांचण्याचा कोणासही भरंवसा नव्हता; लघ्वी होतेवेळीं प्राण निघून जाईलसें दुःख होत होतें. आमांशामुळें पांच पांच मिनिटांनीं शौचास जावें लागत असे; खोकल्यानें तर किंचित् खाववत नसे; मूळव्याध आणि संधिवातामुळें हातपाय नेहमीं बांधून जखडल्यासारखे झाले होते. इतकें अतिशय दुःसह दुःख झालें. तथापि स्ववर्णाश्रमधर्मकर्म आणि श्रीमत् दत्तात्रय स्वामी समर्थांची सेवा कधींही चुकली नाहीं. आतां वांचण्याची आशा नसल्यामुळें, अक्कलकोटास श्री स्वामी चरणीं विनंती पत्रें उत्तर येण्याचें पूर्ण जाणून पाठविलीं होतीं. औषध घेतलें म्हणजे अधिकच व्हावें; त्या वेळीं बडोद्यांतील सुलतानपुऱ्यांत राघवेंद्र ब्रह्मचारी हिंदुस्थानी राहत असे. त्यांनीं येऊन औषध दिलें. औषध दोन सप्तक घेतलें; परंतु गुण न येतां आंगावर लाल चट्टे मात्र पडले. वैद्य लोक बोलूं लागले कीं, सोमलभस्म खाण्यांत आलें; कच्चें रसायन असावें; कोणी म्हटलें, देवाधर्माचें पहा, जागा बदला, कोणते ग्रह अनिष्ट आहेत तें पाहून ग्रहाराधना करा, अमक्या

चांगल्या वैद्य डाक्तराचे उपाय करा, या प्रकारें ज्याला जसें वाटेल, तसें ते बोलत असत. प्राणीमात्रांस अतिदुःख, संकटसमयीं काय करावें म्हणून घाबरणें हें साहजिक असतें, परंतु ज्ञानधैर्य असल्यास फार चांगलें; कारण होणार तें चुकत नाहीं.

## श्लोक.

**अवश्यं भावि भावानां प्रतिकारो भवेद्यदि ।**
**तदा दुःखैर्न लिप्येरन्नलरामयुधिष्ठिराः ॥ १ ॥**
**ज्ञानिनोऽज्ञानिनश्चात्र समे प्रारब्धकर्मणोः ।**
**न क्लेशो ज्ञानिनो धैर्यान्मूढः क्लिश्यति धैर्यतः ॥ २ ॥**

**प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः ॥** या वेदशास्त्राच्या नियमाप्रमाणें अज्ञानी अथवा ज्ञानी यांस प्रारब्धकर्म, सुख दुःखात्मक भोगल्यावांचून सुटका नाहीं, हें खरें आहे. परंतु ज्ञानीजनांस देहबुद्धि नसून महान ज्ञानधैर्याच्या योगानें क्लेश होत नाहींत. हें सत्यानुभवसिद्ध आहे. असो. अक्कलकोटच्या पत्राचें उत्तर १०।१२ दिवसांत न आल्यामुळें प्राणायाम करून जलसमाधि घ्यावी, असा विचार करून रात्रौ १२ वाजतां, सर्व निजलेले पाहून, सुरसागरांतील एरंड्याचे कांठीं जाऊन एरंड्यांत उतरतों, इतक्यांत दीनदयाघन अक्कलकोट निवासी सद्गुरु स्वामीसमर्थ प्रत्यक्ष येऊन माझा हात धरून, वर ओढलें. अतिशय रागानें दोन थापड्या मारून, भक्तवत्सल भक्ताभिमानी यतिराज मला म्हणाले, "**शहाण्या गाढवा, आयुष्य असून कां मरतोस? तुझें भोग्य भोगल्याविना तुला गति नाहीं. आम्हांवर त्रागा कारितोस काय? सहज समाधी सोडून प्राण त्यागरूप जलसमाधी कशाची बोडक्याची घेतोस?**" असें म्हणून मला घरांत आणून सोडलें. माझे उरावर हात फिरवून, "**बरें होईल, उगाच बैस, चेष्टा करूं नको, पायपोस खाशील.**" असें बोलत बोलत कारुण्यानिधि राजाधिराज भक्तराज कल्पद्रुप योगेश्वर त्रिभुवनानंद अद्वैत अभेद परिपूर्ण ब्रह्म-श्रीमत्सद्गुरु सर्वांतर्यामीं स्वामी महाराज कोठें दिसेनासे झाले. त्या समयीं मातोश्रीस व बंधूस पूर्व पुण्यानें यत्न न करितां श्रीजगद्गुरु यतिश्रेष्ठांचें दुरून दर्शन झालें. तेव्हां त्रिभुवनांत मावेनासा परमानंद झाला. दत्तात्रय समर्थ स्वामी राजांचा अभय वरदहस्त आंगावर फिरल्यावर मग काय पुसावें! एक महिन्यांत अहोरात्र क्षणभरही निद्रा नव्हती, ती बिछान्यावर दयासागराचे अत्यद्भुत उपकार

स्मरण करतां करतां गाढ झोंप लागली. प्रातःकाळीं जागृत झाल्यावर पाहातों तो शरीर शांत व मन प्रफुल्लित झालें. बहुतेक व्याधी नाहींशा झाल्या. दहा वाजतां अक्कलकोटचें पत्र, प्रसाद सहित बरें होण्याचें आलें; मग त्या धैर्यानंदानें सर्वत्रांस संतोष झाला, तो काय सांगावा! समर्थांचें अपार कृपाकार सामर्थ्य सार्वभौम नृपालाही जाणण्यास अशक्य आहे, मग इतर काय जाणतील! या दुखण्यांत अक्कलकोटचे दाजीसाहेब भोंसले, नित्य दोन वेळां येऊन सतार वाजवून, श्रीस्वामी समर्थांचे गुणानुवाद गायन भजन प्रेमानें करीत असत. पुढें रामभाऊ बापटांच्या आग्रहावरून नेमीचंद डाक्तराचा वर उपचार केल्यानें प्रकृति बरी सुधारत चालली; परंतु संधिवायु, हात पाय कंबरेंतून जाईना, त्याबद्दल श्रीस्वामीसमर्थांची अशी सूचना झाली कीं, "**गुरुक्षेत्रीं आल्यावर निःशेष बरें होईल,**" अशी आज्ञा झाल्यावर लागलीच जागा बदलली, व मार्गशीर्ष शुद्ध ११ सोमवारीं निघून रेल्वे मार्गानें अक्कलकोटास गेलों. बाळकृष्ण ग्रामजोशीबुवा यांचें घरीं उतरून तपास केला. तेव्हां श्री स्वामीसमर्थ मैंदरगीस आहेत असें समजलें; परंतु संधिवायुनें तीस कोस जाण्याचा निरुपाय झाला. मार्गशीर्षांत अक्कलकोटास अन्नपाणी फार महाग होतें. तथापि समाराधना चालू होत्या. दत्तजयंतीचे दिवशीं गुरुवारीं श्रीस्वामीमहाराजांची स्वारी तीन वाजतां अक्कलकोटांत पेठेंतील मठांत येऊन, सोप्यांत पलंगावर विराजमान झाली. हजारों लोक दर्शन करून परतले. मी हळूहळू काठी टेंकीत जाऊन दत्तचरणीं अनन्य साष्टांग नमन केले. तेव्हां भगवान् देवाधिदेव स्वामीराज म्हणाले, "**कांहो बुवा, कुव्यांत जीव देत होतां ते तुम्हीच काय? तुमचा सुरसागर कोरडा होताना?**" असें म्हणून हांसले. प्रत्यक्ष प्रतीति आल्यावर कोण नम्र होणार नाहीं! सर्वजण नत होतील! मीही नत झालों! आश्चर्य असें कीं, महागाई फार असून स्वामी समर्थ महाराज खातीं पैसे शिल्लक नाहींत. दुष्काळामुळें लोक आले फार म्हणून पंच, सरपंच यांनीं दत्तजयंतीचे पारण्यास पुरणावरणाचा बेत न करितां **पांढरे तुकडे करावे** असें ठरवून दर्शनास आले. नमस्कार करून बसल्यावर श्री समर्थ बोलले, "बापाचे श्राद्धास पांढरे तुकडे करा, पोटभर गूळ तूप द्या." असें ऐकून सर्व विस्मित झाले. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं एक सद्‌गृहस्थ भक्त येऊन त्यानें लागेल तितकें तूप, गूळ सामान दिलें. दुष्काळ फार असतां सर्व जातीस यथास्थित पुरणावरणाचें भोजन मिळालें व समर्थांचे छायेंत आनंदानें तृप्त झाले. आणि सर्व स्वामीमहाराजांची अगम्य, सुखकारक लीला पाहून श्रीगुरुदेवदत्त स्वामी समर्थ

महाराजकी जय जय करूं लागले. धन्य तो सुदीन आम्हां सुवर्णाचा ॥ **स्वामी समर्थांचा जयजयकार** ॥ पुढें आठ दिवसांत संधिवायु गेला व बरा झालों.

## पुण्याचे काळ महाराज.

एक ब्राह्मण सत्पुरुष, ज्यास कोणी विष्णुबोवा, कोणी नारायण बोवा म्हणत होते. ते बोवा पंढरपुरास होते, त्यावेळीं अण्णा बापट म्हणून पंढरपुरास मामलेदार होते. या बुवांवर श्रीस्वामी महाराजांची पूर्ण कृपा होती. हे बुवा तत्वज्ञानी असून पिशाच्चवृत्तीनें वागत होते. या बुवांनीं एका ब्राह्मणाचे मुलास गुडघ्यावर दगड मारिला. मुलाचे बापानें अधिकाऱ्याकडे फिर्याद केली. अधिकाऱ्यानें तें काम सोलापूर येथें रा० ब० विष्णु परशराम रानडे यांजकडे या बुवासुद्धां पाठविलें. ते डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर होते. त्यांनीं बुवांची जबानी घेतां, बुवा म्हणाले, "सर्वांस काळ, बाप आहे. काळ रांडेचा रकत दगड खातो, ओकतो काळ आहे रे काळ आहे." कोणतेंही विचारलें असतां सदोदित बहुतेक हींच अक्षरें बोलत असून, मधून मधून स्वामी दत्त असें म्हणत असत. चौकशी अंतीं बुवा वेडे ठरले. या कारणानें पुणें येथें स्टेशानानजीक डेविड सासूनच्या इस्पितळांत त्यांस पाठविलें. बुवांस कांहीं शिक्षा वगैरे झाली नाहीं. ब्रह्मनिष्ठ वामन बुवा हे पुण्यास असतां एके दिवशीं ते नेहमींप्रमाणें इस्पितळांत गेले. तेथें पुष्कळ वेडे काम करीत होते. त्यांत हे बुवा असून पूर्वीं लिहिलेलीं अक्षरें उच्चारीत होते. इतक्यांत तेथें रा० रा० सदाशिवराव गोंडवे आले होते, त्यांनीं या बुवांस पाहून वामन बुवांस विचारलें, "हे वेडे आहेत कीं काय?" यावरून वामनबुवांनीं बुवांस विचारिलें, "आपण सत्पुरुष दिसतां. पिशाच्चवृत्ति धरण्याचें कारण काय, व आपले गुरु कोण आहेत?" त्यांनीं सांगितलें, "ज्यांनीं तुम्हांकडे ब्राह्मण पाठविला होता, व तुम्हीं त्याची थट्टा केलीत, त्या स्वामी महाराजांचे आम्ही सेवक आहोंत. लोकांची उपाधि न व्हावी म्हणून अशी वृत्ति धरिली आहे." नंतर सदाशिवराव गोंडवे यांनीं मुख्य डॉक्टराचा हुकूम घेऊन बुवांस शुक्रवारांत आणून ठेविलें, व त्यांची सेवा करीत होते. हे काळबुवा पुण्यास प्रसिद्ध होतेच. हे स्वामीमहाराजांच्या कृपेंतले होते. ब्रह्मनिष्ठ वामनबुवाही त्यांच्या दर्शनास नेहमीं जात होते. ज्या ब्राह्मणानें बुवांवर फिर्याद केली तो ब्राह्मण अक्कलकोटास कांहीं कामाकरितां गेला, व साहजिक श्रीस्वामी महाराजांचें दर्शन घेतलें. त्याला पाहतांच श्रीसमर्थ म्हणाले, "**कांहो, आमच्यावर फिर्याद करून तुम्हांस काय मिळालें?**" हें ऐकतांच खूण ब्राह्मणास पोंचल्यामुळें तो अनन्यभावें शरण आला.

## लवकर जोडावे, तूं एक ठिकाणीं बैस. संन्याशाची काय परीक्षा पहातोस ?

सोलापूर येथें त्रिंबकराव रघुनाथ नांवाचे सद्‌गृहस्थ फार दिवस नाझरच्या कामावर होते. त्यांचे चिरंजीव सखाराम बापू हे निर्मल मनाचे असून भगवद्भक्ती करीत असत. त्यांचें प्रेम स्वामीराजांचे चरणीं उत्तम असल्या कारणानें ते वरचेवर समर्थांचे दर्शनास अक्कलकोटास जात असत. सोलापुरा पर्यंतच रेलवेमार्ग होता, त्या वेळीं कोणी गाणगापुरास अथवा अक्कलकोटास दर्शनार्थ जाणारे भेटले, म्हणजे त्यांचें यथाशक्य आदरातिथ्य करीत, आणि कोणा बरोबर बोलत बोलत भगवंताचे गुणानुवाद गायन करीत थेट अक्कलकोटासही जात असत. एक वेळ हे बापूराव दोन मनुष्यांसह स्वामीदर्शनार्थ चालले असतां, मार्गांत त्रिवर्गांपैकीं एकजण म्हणाला, "मला द्रव्य व मनुष्य अनुकूल असून माझें वय चाळीस वर्षांवर झालें, तथापि लग्न होत नाहीं. लग्नाविषयीं प्रयत्न करून थकलों. दुसरा मनुष्य बोलला, अहो मला नोकरी पाहिजे तेथें मिळते, पण कायमची मिळत नाहीं. आम्हां दोघांचें कार्य झालें तरच आम्ही अवतारीक आहेत असें मानूं." हें भाषण त्यावेळीं अक्कलकोटच्या मार्गें जाणारे बरेच लोक ऐकत होते. बापूराव व एक ब्राह्मण स्त्री झपाट्यानें बोलली, "दर्शनाबरोबर तुमची खात्री होईल; बडबडूं नका." नंतर गांवांत येऊन दर्शनास आले. त्यांना पहातांच श्रीसद्‌गुरुवर्य सर्वांतर्यामीं महाराज हास्य मुखानें म्हणाले, "**लौकर जोडा घे.**" "**तूं एके ठिकाणीं बैस.**" "संन्याशाची काय परीक्षा करतोस." असें उभयतांस म्हणाले. हें ऐकून दोघेजण थरथरां कांपू लागले. मनांत खूब शुभकार्य पटलें, म्हणून स्वतां दोघे श्रीमुखावर स्वहस्तें मारून घेऊन कानास दाबून चिमटे घेऊं लागले. शरण होऊन अनन्यभावें श्री स्वामीं चरणीं क्षमा व्हावी म्हणून वरचेवर स्तुतिस्तोत्र करूं लागले; तेव्हां स्वामीरायांनीं बापुरावजींस व उभय मित्रांस प्रसाद, आणि आशीर्वाद दिल्यामुळें, ते अत्यंत हर्षभरित झाले. त्या वेळीं श्री समर्थां जवळ ब्रह्मनिष्ठ बोवा होते. त्रिवर्ग झाल्यानंतर दोन महिन्यांत अकस्मात् सोयरिक जमून एकाचें लग्न झालें. व दुसऱ्यास कायमचा सुखकारक रोजगार मिळाला. त्यावर ते कांहीं दिवसांनीं स्वामी महाराजांचे दर्शनास पुनः आले होते.

## भाग ४ था

## श्रीस्वामीभक्त चोळापा.

श्री चिंतोपंत आप्पा टोळ हे महाराजांस सोलापुराहून अक्कलकोटास आणीत असतांना, अक्कलकोट नजीक खंडोबाचे देवळांत महाराजांस विनंति करूनहि महाराज येत नाहींत असें पाहून, ते आपल्या बिऱ्हाडी गेले. व महाराज तेथून उठले ते गांव वेशीसमोर 'फाटक' म्हणून निशाण ठेवण्याची जागा आहे, तेथें जाऊन तीन दिवस निराहार बसले. चवथे दिवशीं फाटकांतील आमद अल्लीखां म्हणोन रिसालदार होता, त्यानें महाराजांस थट्टेनें विचारलें, "हुक्का पिते है?" तेव्हां महाराजांनीं उत्तर दिलें, "**हां पिता हूं.**" हा कोणीतरी वेडा मनुष्य आहे, असें समजून रिसालदारानें लबाडीनें रिकाम्या चिलमीवर विस्तव ठेवून हुक्का महाराजास ओढण्यास दिला. महाराजांनीं सुर, सुर करीत हुक्का ओढतांच चिलमीवर भकन् जाळ जहाला. चिलीम रिकामी असून जाळ झाला याबद्दल त्यास चमत्कार वाटला, व महाराज वेडे नसून कोणी अवलीया असावे, अशी त्याची खात्री झाली. महाराज तीन दिवस उपोषित आहेत, सबब त्यांस कोणा ब्राह्मणाकडे नेऊन भोजन घालावें असें रिसालदारानें मनांत आणिलें. चोळाप्पाचें घर नजीक होतें. त्यांस महाराजाबद्दल हकीकत कळवून, जेवणाची तयारी करण्यास सांगितलें. चोळाप्पाचे घरीं स्वयंपाकाची सिद्धता झाल्यावर रिसालदार श्रीस्वामीसमर्थांस घेऊन आला. चोळाप्पानें ताट वाढून महाराजापुढें आणून ठेविलें. महाराज जेविनात. रिसालदारास, 'ताटास हात लाव,' म्हणून महाराज सांगूं लागले. ब्राह्मणाचे भोजनाचे ताटास हात कसा लावावा म्हणून रिसालदार शंकित झाला. 'मत डरो, हातमें पकडो,' म्हणून महाराजांनीं पुन्हा आज्ञा केल्यावरून निरुपाय होऊन ताटास हात लावून, ताट महाराजां पुढें ठेविलें. मग महाराज, मोठ्या प्रेमानें जेवले. बायका माणसांनीं हा चमत्कार पाहून, हा कोणी वेडा व

वाट्या माणूस चोळाप्पानें घरांत आणला म्हणून त्यांस नांवें ठेविलीं. दुसरे दिवशीं महाराज तेथेंच राहिले. घरांतील स्वयंपाक सिद्ध झालेला सर्व विटाळून टाकिल्यामुळें बायका फार रागावल्या; व चोळाप्पास वेड लागलें असें म्हणून त्यास त्रास देऊं लागल्या. चोळाप्पाची मात्र भक्ति कमी न होतां उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊं लागली. वाटेल त्या ठिकाणीं शौच करावें, घरांतील डाळदाणा गाईकडून खाववावा, भलताच जिन्नस उचलून भिकाऱ्यास द्यावा, असे अनेक प्रकारांनीं महाराजांनीं चोळाप्पास त्रास दिला. पण सर्व सहन करून तो महाराजांचा पूर्ण भक्त बनला. एकदां चोळाप्याचे बायकोनें हरभरे भरडून उत्तम डाळ करून रांजणांत ठेविली होती. महाराज कोणास न कळतां त्यांतील डाळ चोळाप्याचे गाईस नेऊन घालीत. कांहीं दिवसांनी रांजण रिकामा पडला. पुढें एके दिवशीं कांहीं सण आला. पुरणपोळी करावी या हेतूनें चोळाप्पाची बायको डाळ काढण्यास गेली. पहाते तों रांजण रिकामा. महाराजांच्या रोजच्या लीला तिला माहितच होत्या; यावरून यांचेंच कांहीं तरी कृत्य असावें असा तिला संशय येऊन, तिनें ही गोष्ट चोळाप्पास कळविली. चोळाप्पानें महारांज डाळीबद्दल विचारलें, तेव्हां महाराजांनीं जाब दिला, '**हमकू क्या मालूम? तुमारी गउ डाल खागई. उनकू पूछ जा.**" चोळाप्पा घरचा फार दरिद्री होता, त्यामुळें त्याचे बायकोस महाराजांचे कृतीचा फार राग येई. असें निधान हातीं सांपडलें असून ओळख पटली नसल्यानें ती महाराजांस प्राकृत मनुष्यच समजे. ज्या प्रमाणें नंद यशोदेचें घरीं कृष्णानें अवतीर्ण होऊन, अद्भुत चमत्कार करून पुन्हां आपले मायेच्या योगानें कृष्ण आपला बाळ आहे, अशी मातापित्यांस भुरळ घातली होती. तद्वतच चोळाप्याचे घरीं श्रीस्वामीरत्न अवतीर्ण झालें असून, जरी त्यांनीं बहुत चमत्कार केले, तरी ते अवतारी असल्यामुळें, भुरळ पडल्यामुळें घरांतील माणसांस त्याची ओळख झाली नाहीं.

## भक्त वत्सल महाराज.

महाराज चोळाप्पाकडे वास करून त्याचे देव बनून राहिले. नमस्कारांवांचून चमत्कार नसतो अशी आपल्यात एक म्हण आहे. चोळाप्पाची तरी महाराजांचे चरणीं भक्ति उगीच लागली नाहीं. अनेक अमानुष कृत्यें अनुभवून चोळाप्पा श्रीस्वामींचा भक्त बनला. तो घरचा दरिद्री असल्यानें घरचीं भांडी गहान ठेवून महाराजांस जेऊं घालण्याचा प्रसंग येई. पुढें लवकरच राजाकडून महाराजांकरितां नेमणूक ठरली.

महाराजांची तरी कशी चमत्कारिक लीला होती पहा! जों पावेतों चोळाप्पा स्वतः घरचीं भांडीं गहाण ठेवून महाराजांस जेवूं घाली, तोंपावतों महाराज दुसरे कोठें न जातां त्याचे घरींच जेवीत. पुढें राजाची भक्ति बसून राजवाड्यांतून नित्य महाराजांकरितां, व चोळाप्पाचे माणसांकरितां शिधा येऊं लागला, तेव्हां-पासून महाराज चोळाप्पाचे घरीं क्वचितच जेवीत. नित्य गांवांत फिरून भक्तांचे घरीं जेवीत असत; व पुढें गांवगन्नाही हिंडूं लागले.

## पादुकांचा प्रसाद.

प्रथम दोन महिने महाराजांनीं चोळाप्पास अति त्रास देऊन त्याची कसोटी पाहिली. पुढें एके दिवशीं महाराज एक कोसावर हासापूर म्हणून गांव आहे तेथें गेले. चोळाप्पाही त्यांचे मागें होता. महाराजांनीं रागावून सांगितलें, '**आम्ही संन्यासी. आमच्यामागें तुम्ही लागूं नये; घरीं जाऊन प्रपंच करावा.**' असें सांगून महाराज झपाट्यानें चाललें; तों चोळाप्पा त्यांचा पिच्छा सोडीना. महाराजांनीं मागें वळून चोळाप्पास शिव्या दिल्या, व परत जाण्यास सांगितलें. पण तो कशाचा परत जातो? हात जोडून त्यानें महाराजांची प्रार्थना केली, 'महाराज मी घरदार सोडीन, बायका पोरें सोडीन, सर्वत्रांचा त्याग करीन, पण श्रींचे चरण सोडणार नाहीं.' त्याची दृढ भक्ति पाहून महाराज प्रसन्न झाले. आपल्या पायांतील खडावा महाराजांनीं चोळाप्पाचे अंगावर फेकून, त्यांची पूजा करण्यास आज्ञा दिली. चोळाप्पा भक्तीनें पादुकांची पूजा करूं लागला. पुढें गांवांतील आजारी, संबंधी, व्याधिग्रस्त वगैरे लोकांस चोळाप्पाचे घरीं पादुका आहेत, त्याचे दर्शनानें व्याधीचें निरसन होईल म्हणोन दृष्टांत होऊं लागले. खुद्द महाराजांची ही अगाध किर्ति सर्वत्र पसरूं लागली.

## धर्मभोळेपणा नको.

चोळाप्पाचे कुटुंबातील मनुष्यांपैकींच महाराज एक मनुष्य बनून राहिले होते. एके दिवशीं महाराज बाहेर गेले असतां चोळाप्पाचे घरांत घुबड शिरलें. हें कांहीं तरी विपरीत चिन्ह आहे असें जाणून चोळाप्पानें घराचे दारास कुलूप लावून बाहेरील काटी लावून सर्व मुलांबाळांसह चोळाप्पा खास बागेंत जाऊन राहिला. कांहीं वेळानें महाराज घरीं आल्यावर तपास करितात तों, चोळपा बागेंत जाऊन राहिल्याचें सममलें. मग महाराज चोळाप्पास खास बागेंतून सायंकाळीं घरीं घेऊन आले.

'घुबड शिरलें म्हणून कोणी घर सोडतात काय ?' म्हणून महाराज चोळप्पास रागें भरलें. या प्रमाणें महाराजांचे पुढें धर्मभोळेपणा चालत नसे. महाराज पक्के सुधारक होते.

## चोळापाची कसोटी.

ज्या अंथरुणावर चोळाप्याचीं मुलेंबाळें निजत, त्यावरच महाराज निजत असत. महाराजांनीं प्रथम चोळाप्पास फार त्रास देऊन त्याचें सत्व पाहिलें. चुलीवरचा तवा काढून चुलींत हगावें, चूल पेटली असतां, त्यांत पाणी ओतून ती विझवावी, ओंवळ्यानें स्वयंपाकास शिवून तो विटाळावा, सोंवळ्यानें पदार्थ वाढतों असें म्हणून नग्न होऊन वाढावयास लागावें, वगैरे अनेक प्रकारांनीं घरांतील माणसांस महाराजांनीं त्रास दिला. एके दिवशीं सण असल्यानें चोळाप्पाचे बायकोनें परातभर पुरणाच्या पोळ्या केल्या होत्या. तितक्यांत बाहेर एक बैरागी येऊन, "अलख" केल्याबरोबर महाराजांनीं जी पोळ्यांची परात उचलली, ती बाहेर बोवांजवळ नेली. चोळाप्पाचे बायकोनें धांवत धांवत मागें जाऊन परात आपल्या ताब्यांत घेतली. व बैराग्यास एक पोळी वाढून, परात घरांत घेऊन आली. एके दिवशीं चोळाप्पा बाहेर गांवीं गेला होता. सकाळचे प्रहरीं महाराजांनीं चोळाप्पाचे बायकोस व मुलां-बाळांस घराबाहेर हांकलून लावलें; व आपण एक मोठी काठी धरून उंबरठ्यांत बसले. ते कोणास घरांत येऊ देईनात. दोन प्रहर होऊन गेले. सर्व माणसें भुकेनें तळमळ करूं लागलीं, पण महाराज कोणाचें ऐकेनात. मग चोळाप्पा गांवाहून परत आला, तेव्हां त्यानें महाराजांची मुलाप्रमाणें समजूत काढून दारांतून उठाविलें; मग चोळाप्पाचे बायकोनें घरांत जाऊन स्वयंपाक केला व सर्वांस अन्न मिळालें.

## कन्यारत्नाचें सूचन.

एक वेळ असें झालें कीं चोळाप्पाचे बायकोस नऊ महिने भरून प्रसूति समय नजीक आला. पोट दुखूं लागलें म्हणून बाई खोलींत बाजेवर जाऊन निजली. पण महाराजांनीं जो हट्ट धरिला तो ते खोलीचें दार लावूं देईनात. एवढेंच नाहींतर महाराजांनीं खोलींत उद्योग चालविला तो असा कीं, मडक्यांच्या उतरंडी होत्या, त्या उतरून सर्व मडकीं खोलीभर पसरली. इकडे बाईची बाळंत होण्याची

वेळ आली. महाराजांपुढें कोणाचा इलाज चालेना. बायांस वाटलें, आतां महाराज फजीती करतात. इतक्यांत बाई प्रसूत होऊन कन्या झाली. त्या सरसें महाराजांनीं दार लावून घेतलें व उतरंडी रचून ठेवण्यास सांगितलें.

## चोळाप्पाचे पत्नीस वृश्चिकदंश.

एके दिवशीं चोळाप्पाचे बायकोचें हातास विंचू चावला. वेदना सोसवेनात म्हणून ती मोठ्यानें रडूं लागली. महाराज घरांतच होते. ती रडते असें पाहून महाराजांनीं आपला जोडा तिकडे फेकून, त्यांत हात घालण्यास तिला सांगितलें. बाईनें त्यांत हात घातल्याबरोबर वेदना कमी होऊन, हात थंडगार झाला. बाईस वाटलें आतां हात बरा झाला, अशा समजुतीनें बाईनें हात जोड्याबाहेर काढला. त्या सरशा वेदना पुन्हां सुरू झाल्या. पुन्हां हात जोड्यांत घालतांच वेदना कमी झाल्या. जोड्यांतच हात ठेवून तो उराशीं घेऊन बाईनें स्वस्थ झोंप घेतली.

## नथीची चोरी पकडून दिली.

एके दिवशीं चोळाप्पाचे घरीं त्याची मेहुणी आली होती. अंथरुणाखालीं नथ ठेवून ती रात्रीं निजली. चोळाप्पाचे पुतण्यानें तें पाहिलें होतें. पहांटेस उठून तो बागेंत फुलें आणण्यास जात असे. जाते वेळीं हळूच नथ काढून घेऊन ती त्यानें लांबविली. बाई सकाळीं जागी होऊन पहाते तों अंथरुणा खालीं नथ नाहीं. बाई घाबरली व इकडे तिकडे नथीकरितां तिनें हुडकाहुडक केली, पण नथ मिळाली नाहीं. बाई भिक्षुकाची बायको होती. मोठ्या प्रयासानें नवऱ्यानें शेंसवाशें रुपये मिळवून नुकतीच नथ करविली होती. बाई नथी करितां आक्रोश करूं लागली. अक्कलकोट-वासी जनांचे पोलिस, वैद्य, ज्योतिषी सर्व महाराजच होते. महाराजांजवळ जाऊन बाईनें रडत रडत नथ चोरीस गेल्याचा मजकूर सांगितला. महाराज बाईस म्हणाले, **"रडूं नको. उगीच बस. तुझी नथ सांपडेल."** बाई महाराजांजवळ बसली. एक तास झाला, नथ मिळत नाहीं हें पाहून बाई महाराजांजवळ नथी बद्दल पुन्हां विनवणी करूं लागली. **"थांब ग, तुझी नथ मिळेल, घाबरतेस कां."** म्हणून महाराज बाईस म्हणाले. पुढें चोरी करणारा मुलगा फुलें देवळांत ठेवून घरांत आला. त्यास पाहून महाराज म्हणाले, **"अरे ती रडत आहे, तिची नथ दे."** पोऱ्या नथ घेतल्याचे कबूल करीना. त्यास शिव्या देऊन महाराज म्हणाले, "सकाळीं अंथरुणाखालची नथ नेलेली देऊन टाक," महाराज रागावलेले पाहून मुलानें बाईची नथ गुपाचिप काढून दिली.

## महाराजांचे खरे भक्तांस दुसरें दैवत नाहीं.

चोळाप्पा महाराजांचा पूर्ण भक्त होता, पण महाराज त्याचे आधीन किंचित् तरी होते काय? मुळींच नाहीं. अगदीं नवीन मनुष्य दर्शनास आला तर त्याजबरोबर जी वर्तणूक तीच बहुत वर्षांचा सेवेकरी याज बरोबर असे. चोळाप्पा पैशाचे नादीं लागून खरी भक्ति कांहींशी विसरला होता. पुढें या योगानें त्याचा व महाराजांचा वियोग झाला.

प्रत्यक्ष निधान चोळापाचे घरीं आलें असून, चोळाप्पाची तीर्थयात्रा चुकली नव्हती. यावरून भक्तीचा जिव्हाळा त्यानें जाणला नव्हता असें म्हणावें लागतें. प्रत्यक्ष कल्पतरु कामना पूर्ण करण्यास सन्निध असून, पिरास शेरणी वाटण्याबद्दल नवस करण्याचा चोळाप्पाचा व त्याचे घरांतील माणसांचा क्रम चालूच होता. असो.

## तुळजापूरची भवानी.

तसेंच एक वेळ अशी गोष्ट झाली कीं, चोळाप्पाची कुलदैवत तुळजापुरची भवानी असल्यानें चोळाप्पा कुटुंबासुद्धां तुळजापुरास यात्रेस जाण्यास निघाला. बाळाप्पा सेवेकरी यासही आपल्या बरोबर येण्याविषयीं त्यानें आग्रह केला. बाळाप्पा महाराजांचा निस्सीम भक्त होता. महाराजांचे आज्ञेवांचून तो कोणतीही गोष्ट करीत नसे. त्यानें चोळाप्पास सांगितलें, महाराजांची जाण्याविषयीं आज्ञा घ्यावी, म्हणजे आपण येण्यास तयार आहों. चोळाप्पानें बाळाप्पाचा हात धरून महाराजांजवळ नेलें, व तुळजापुरास जाण्याविषयीं आज्ञा मागितली. महाराज म्हणाले, "**डोंगरावर चढून उकीरडे उकरण्यास जा.**" हें ऐकून महाराजांची सेवा सोडून तुळजापुरास जाण्यांत कांहींच अर्थ नाहीं, असें समजून बाळप्पा गेला नाहीं. चोळप्पा मात्र खरें कुलदैवत सोडून गेला, व देवीचे पायां पडून कृतकृत्य झालों असे मानून, यात्रा करून परत आला.

## स्वतंत्र बाणा—चोळ्या खेटर लाव.

इतकीं वर्षें सेवा केली पण चोळाप्याचे अधीन महाराज मुळींच राहिले नाहींत. द्रव्यलोभामुळें कधीं कधीं महाराजांचे सेवेंतही त्याचें दुर्लक्ष होत असे. "**माझें खाऊन माझेवर फिरला.**" म्हणून महाराज चोळप्पास कधीं कधीं म्हणत असत. चोळाप्पाचे शब्दास महाराज किती मान देत असत, याचा मासला एक

वेळ आमचे दृष्टीस पडला. भर दोन प्रहरीं वैशाखमासीं महाराजांची स्वारी अक्कलकोटांत बाजारपट्टींत एकाचे घरीं बसली होती. एकाएकीं तेथून जाण्याचें महाराजांचे मनांत येऊन, "**चोळया खेटर लाव,**" म्हणून महाराजांनीं आज्ञा केली. "महाराज, बाहेर ऊन फार कडक आहे, कृपा करून कांहीं वेळ येथेंच आराम करावा," म्हणून चोळाप्पानें प्रार्थना केली; पण त्याबद्दल त्यास वेड्या-वाकड्या दहा पांच शिव्या मिळाल्या एवढेंच. बाकी महाराज उठून एकदम चालूं लागले. अर्थातच सेवेकरी मंडळी मागाहून निघाली.

## चोळापाचा पुत्र कृष्णाप्पा.

कृष्णापा नांवाचा चोळापाचा पुत्र अक्कलकोटचे मठांत श्रीस्वामींची सेवा करीत असे. लहानपणापासून कृष्णापा श्रीस्वामींचे सेवेंत तत्पर असे. श्रीस्वामी सेवेवांचून त्यास दुसरा व्यासंग नव्हता. एक वेळ अशी गोष्ट झाली कीं, श्रीदादासाहेब विंचूरकर कारभारी असतां मठा संबंधानें कांहीं वर्षासन घेण्यास कृष्णापा त्यांजकडे गेला. पावतीवर सही करावयाची होती ती कृष्णाप्पानें मोठ्या प्रयासानें केली. सही करण्याचे परीश्रम पाहून दादासाहेब थट्टेनें म्हणाले, 'वाहवा, काय मुलाची हुषारी ही ! चोळापानें मुलांचे शिक्षणाकडे कांहींच लक्ष दिलें नाहीं.' या वेळेस महाराज, कारभारी यांचे घरीं होते. ते विंचूरकर यांच्यावर रागावून म्हणाले, "कायरे काय म्हणतोस ! तूं काय केलेंस ? तेल विकून पोट भरलेंस एवढेंच ना ! त्यांस नांवें ठेवूं नको, त्याचें भाग्य निराळेंच आहे." विंचूरकरांनीं महाराजांची क्षमा मागितली व उगीच राहिले. खरेंच आहे. सद्गुरूचे सेवेसारखें श्रेयस्कर असें दुसरें कोणतें कृत्य आहे. त्यांचे कृपेनें सर्व कांहीं प्राप्त होतें.

## चोळ्या हिला ( सुंदराबाईस ) ठेवूं नको बरें, तुझ्या डोक्यावर मिरीं वाटील.

सुंदराबाई नांवाची फार कडक स्वभावाची एक बाई होती. ती सोलापुरची राहणारी होती. तिचे पायांस उष्णतेनें फोड वगैरे होऊन नासून गेल्यामुळें श्रीसमर्थांची सेवा करण्यास ती अक्कलकोटास येऊन राहिली. तिची वर्तणूक कांहीं वर्णन करण्यासारखी नव्हती. पण तिचे पदरीं कांहीं पूर्वपुण्य असल्यानें तीस महाराजांची सेवा घडली. पहिल्यानें महाराज चोळाप्पाचे हातानें बहुधा जेवीत असत. पण बाई सेवा करण्यास लागल्यापासून महाराज तिचे हातानें जेऊं लागले. स्नान

घालणें वगैरे दुसरीही सेवा बाई करीत असे. चोळाप्यांस वाटलें, आपली सेवा करितां करितां धांदल उडते, व बरोबर सेवा होत नाहीं, सबब बाईस ठेवून घेतल्यास आपणास चांगली मदत होईल. असें मनांत आणून त्यानें बाईस ठेवून घेण्याचा निश्चय केला. त्या वक्तीं महाराज चोळापास म्हणाले, "**चोळ्या, हिला ठेवूं नको वरें, तुझ्या डोक्यावर मिरीं वाटील.**" चोळाप्यास वाटलें, महाराज आपली थट्टा करितात. महाराजांची समजुत घालून चोळाप्पानें बाईस ठेविलें. महाराजांस लघुशंकेस व शौचास नेणें, स्नान घालणें व भरविणें हीं कामें सुंदराबाई खुद्द करीत असे. याप्रमाणें सेवा चालली असतां, सुंदराबाईचें प्राबल्य फार वाढूं लागलें व महाराजांनीं पूर्वी भाकित केल्याप्रमाणें चोळाप्याचें तेज कमी पडूं लागलें. एकदां एका महाराजांचा हुबळीकडील राहणाऱ्या रामचंद्रशेट नांवाच्या गुर्जर भक्तानें महाराजांकरितां सोन्याचा चंद्रहार आणला व तो महाराजांस घालण्याकरितां चोळाप्पाजवळ दिला. महाराज राजवाड्यांत होते, व त्या वेळीं दिवाळी असल्यानें सुंदराबाईनें अक्कलकोटचे राणीसाहेबांस चोळाप्पाकडून महाराजांस घालण्याकरितां चंद्रहार आणावा अशी सूचना दिली. त्याप्रमाणें राणीसाहेबांनीं चोळाप्पाजवळून चंद्रहार मागण्यास शिपायास पाठविलें. चोळाप्पानें शिपायास सांगितलें, 'चंद्रहार बाळप्पाजवळ आहे, त्यांचे जवळून घेऊन जावें.' शिपाई बाळप्पाकडे येऊन चंद्रहार मागूं लागला, तेव्हां बाळप्पा म्हणाले, 'चंद्रहार चोळाप्पाचा आहे. तो देत असेल तर आपण देण्यास तयार आहे.' शिपाई चोळाप्पाकडे गेला, तेव्हां चोळाप्पा म्हणाला, 'बाळप्पा देईल तर घेऊन जा. त्याजवर आपली सत्ता नाहीं.' शिपाई मग राजवाड्यांत आला व झालेली हकीगत त्यानें राणीसाहेबांस निवेदन केली. या गोष्टीनें राणीसाहेबांस फारच राग आला. व चोळप्पा फार चढला आहे, त्यास हरतऱ्हेनें महाराजांपासून दूर केलें पाहिजे, असें त्यांचे मनांत आले. सुंदराबाईही त्यांचे बेतास अनुकूल होतीच. त्यांचा बेत कांहीं कां होईना, खुद्द महाराजांचे मनांत चोळाप्पास दूर करावें असें आल्याचें दिसतें; कारण पुढें महिना दोन महिन्यांनीं एके दिवशीं महाराज खासबागेंत असतां प्रातःकाळीं मुंबईची भाटे वगैरे पुष्कळ मंडळी महाराजांचे दर्शनास आली होती; तितक्यांत हात पुसावयाचें फडकें नजीक पडलें होतें, तें घेऊन त्याची झोळी करून हात वर करून महाराजांनीं, '**अलक**' म्हणून म्हटलें. महाराजांनीं खुद्द अलक म्हणून झोळी घेतल्यावर तेथें भिक्षेची काय उणीव. कोणी रुपया, कोणी दोन रुपये, कोणी पांच रुपये, याप्रमाणें बोलतां बोलतां शेसव्वाशें रुपये

तेव्हांच जमले. झोळी चोळाप्पाचें स्वाधीन करून महाराज त्यास म्हणाले, "**चोळप्पा तुझें ऋण फिटले बरें.**" असें म्हणून झोळी चोळप्पाचे स्वाधीन केली. एकदम एवढे रुपये मिळालेले पाहून चोळाप्पास अत्यानंद झाला. पण तुझें ऋण फिटलें म्हणून महाराज म्हणाले, या म्हणण्याचा चोळाप्पानें कांहीं विचार केला नाहीं. महाराजांचे म्हणण्याप्रमाणें पुढें दोन अधिक महिन्यांनीं चोळाप्पाची सेवा अंतरली. चंद्रहारासंबंधानें राणीसाहेबांचे मनांत चोळाप्पाबद्दल वैमनस्य आलेंच होतें. त्यांतूनच सुंदराबाईनें जास्त चुगल्या सांगून त्या वैषम्यांत भर पाडिली. चोळप्पास काढण्याबद्दल राणीसाहेबांचा आंतून बेत चाललाच होता, त्यास सुंदराबाईची मदत होतीच. सर्वज्ञ समर्थांचे नजरेखालून कोणती गोष्ट लपविली जाणार नाहीं. अंतस्थ कारस्थान चालले असतां महाराज सुंदराबाईस म्हणत, "**अग, ब्रह्मद्वेष घेऊं नको बरें?**" या उपदेशापासून सुंदराबाईचे कठोर मनास कांहीं पाझर सुटला नाहीं. एके दिवशीं श्रीसमर्थांची स्वारी बाळप्पा कुळकर्णी यांचे घरीं असतां, तिसरे प्रहरीं एकाएकीं राजवाड्यांतून दोन शिपाई येऊन चोळाप्पास महाराजांजवळून निघून जाण्याविषयीं त्यांनीं हुकूम केला, व आपण त्याचे जागीं महाराजांजवळ बसले. चोळाप्पा बिचारा नाइलाज होऊन मोठ्या कष्टानें निघून गेला. महाराज त्याचे वतीनें बोलतील असें वाटत होतें. पण ते एक चकार शब्दसुद्धां बोलले नाहींत. यावरून झालेली गोष्ट महाराजांस आवडली नाहीं, असें दिसत नाहीं. असंग शस्त्रेंकरून हा मायापाश तोडणारे श्रीदत्तअवधूत यांस चोळाप्पानें सेवा केली किंवा दुसरे कोणीहि सेवा केली तरी बिलकूल परवा नव्हती. चोळाप्पा इतर लोकांप्रमाणें दर्शनास वगैरे येत असे. पण महाराजांचे पुढील उत्पन्नावर त्याची काडीची सत्ता राहिली नाहीं. ह्याप्रमाणें सुंदराबाईनें महाराजांच्या वाक्याप्रमाणें खरोखरच चोळाप्पाचे डोक्यावर मिरें वाटलीं. चोळाप्पा महाराजांसन्निध येऊन बसत असे पण त्यास शिपाई लोक महाराजांपुढील कांहीं जिन्नस घेऊं देत नसत. शिपायांवर महाराज रागावत व म्हणत, "**कायरे तुमच्या बापाचें काय जातें?**" शिपाई वस्तादच होते. पुढें त्यांनीं असा क्रम ठेविला कीं, चोळाप्पानें कितीहि जिनसा घेतल्या तरी महाराजां समक्ष कांहीं बोलूं नये, मात्र तो घरीं जाण्याकरितां जाऊं लागला म्हणजे दूर त्यास गांठून त्या जवळील सर्व जिन्नसा हिसकावून घेत. या शिपायांच्या दांडगाईमुळें चोळाप्पा फार हिरमुसला झाला, व महाराजांसन्निध येण्याचें त्यानें सोडून दिलें. बरेंच दिवसांनीं एक वेळ चोळाप्पा महाराजांचे दर्शनास आला असतां, महाराज त्यास म्हणाले, "**चोळाप्पा शेत**

तुझें असतां तूं कां येत नाहींस ?" चोळाप्पानें सांगितलें, "शिपाई लोक मजशीं दांडगाई करितात." महाराजांनीं शिपायांस खूप शिव्या दिल्या. पुढें चोळाप्पा केव्हां केव्हां महाराजांजवळ येऊन बसे. चोळाप्पा महाराज आले, तेव्हां केवळ दरिद्री होता पण बारा वर्षांचे कारकिर्दींत हजारो रुपये मिळून तो श्रीमंत बनला. व श्रीचे कृपेनें त्यास पुत्रादि संततीही प्राप्त झाली. चोळाप्प्याचे अंतःकाळीं अर्धा कोसावर महाराजांची स्वारी असतां त्यास दर्शन दिलें नाहीं. चरणतीर्थही मोठ्या कष्टानें एका सेवेकऱ्यानें मिळवून चोळाप्पास पाजलें. यावरून महाराज कोणाचे आधीन नव्हते, हें दिसून येईल. चोळाप्पास महाराज चोळ्या व कधीं कधीं जैन या नांवानें हांक मारीत. याप्रमाणें सुमारें १२ वर्षांनीं चोळाप्पाचे कारकिर्दीचा शेवट झाला.

## भाग ५ वा

## श्रीस्वामी भक्त बाळाप्पा यांचें चरित्र.

आपले सेवकांस शेंकडों कोसांचे अंतरावरून घोड्यांस लगाम लाऊन जसे
खेंचून आणितात, तसे ते आणीत. आपल्या सेवकजनांबरोबर त्यांचें ममताळूपणाचें
व विचाराचें वर्तन असे; वगैरे गोष्टींचें चित्र वाचकजनांसमोर ठेवण्याचा आमचा
विचार आहे. हें काम महाराजांचे अतिसन्निध वास करून निस्सीम प्रे दोन
करणारे सत्पुरुषांकडूनच होणारें आहे. श्रीस्वामीकृपेनें तसें सत्पुरुषाकूम केला,
गांठ पडली आहे. ते सच्छिष्य श्रीस्वामीभक्तिपरायण बाळा नाइलाज होऊन
यांचे हातून श्रीसमर्थांची सेवा सुमारें एक तप झाली अस वाटत होतें. पण
लीला त्यांचे डोळ्यांसमोर आहे. ते हल्लीं मूळ ग्रंथलेखन राजांस आवडली
वास करीत असून १४ वर्षांपासून निरशनाचा फलाहार करू दत्तअवधूत यांस
आहेत. ते यजुर्वेदी ब्राह्मण असून, धारवाड जिल्ह्यांतील ल परवा नव्हती.
हावेरी गांवचे रहाणारे आहेत. त्यांची भक्ति समर्थांकडे कशी राजांचे पुढील
कोटास कसे आले, बारीकसारीक सेवा करितां करितां ते पट्टसेवें महाराजांच्या
चोळाप्पा, सुंदराबाई, राणीसरकार व पंच कारकीर्दी महाराजांसंबंधा राजांसन्निध
झाल्या, ह्या सर्व गोष्टी स्वामीभक्त बाळाप्पा, यांचें चरित्र दिल्यानें घेऊं देत
येणार आहेत; सबब त्यांचे चरित्र आमचे प्रिय वाचकांस सादर कांचें काय
र्नें

## बाळाप्पांचा गृहत्याग.

हे बाळाप्पा खाऊनपिऊन घरचे सुखी होते. सावकारीचें व सरा
त्यांचें दुकान होतें. जेव्हां सद्गुरुचीं सेवा करण्याचे त्यांचे दिवस उ
त्यांचे मनाची स्थिती एकदम बदलून कांहीं केल्यानें मनास शांतता
झाली. यावेळीं बाळाप्पाचें वय तीस वर्षांचें होतें. अक्कलकोटास जावें



श्रीसद्गुरु बाळाप्पा महाराज, अक्कलकोट.

# भाग ५ वा

## श्रीस्वामी भक्त बाळाप्पा यांचें चरित्र.

आपले सेवकांस शेंकडों कोसांचे अंतरावरून घोड्यांस लगाम लाऊन जसे खेंचून आणितात, तसे ते आणीत. आपल्या सेवकजनांबरोबर त्यांचें ममताळूपणाचें व विचाराचें वर्तन असे; वगैरे गोष्टींचें चित्र वाचकजनांसमोर ठेवण्याचा आमचा विचार आहे. हें काम महाराजांचे अतिसन्निध वास करून निस्सीम भक्तीनें सेवा करणारे सत्पुरुषांकडूनच होणारें आहे. श्रीस्वामीकृपेनें तसें सत्पुरुषाची व आमची गांठ पडली आहे. ते सच्छिष्य श्रीस्वामीभक्तिपरायण बाळाप्पा हे होत. बाळाप्पा यांचे हातून श्रीसमर्थांची सेवा सुमारें एक तप झाली असून महाराजांची सर्व लीला त्यांचे डोळ्यांसमोर आहे. ते हल्लीं मूळ ग्रंथलेखन काळीं अक्कलकोटास वास करीत असून १४ वर्षांपासून निरशनाचा फलाहार करून कालक्रमण करीत आहेत. ते यजुर्वेदी ब्राह्मण असून, धारवाड जिल्ह्यांतील करजगी तालुक्यापैकीं हावेरी गांवचे रहाणारे आहेत. त्यांची भक्ति समर्थांकडे कशी जडली, ते अक्कलकोटास कसे आले, बारीकसारीक सेवा करितां करितां ते पट्टसेवेकरी कसे बनले, चोळाप्पा, सुंदराबाई, राणीसरकार व पंच कारकीर्दी महाराजांसंबंधानें कशा कशा झाल्या, ह्या सर्व गोष्टी स्वामीभक्त बाळाप्पा, यांचें चरित्र दिल्यानें पूर्णपणें कळून येणार आहेत; सबब त्यांचे चरित्र आमचे प्रिय वाचकांस सादर करितों.

## बाळाप्पांचा गृहत्याग.

हे बाळाप्पा खाऊनपिऊन घरचे सुखी होते. सावकारीचें व सरा त्यांचें दुकान होतें. जेव्हां सद्गुरुचीं सेवा करण्याचे त्यांचे दिवस उ त्यांचे मनाची स्थिती एकदम बदलून कांहीं केल्यानें मनास शांतता झाली. यावेळीं बाळाप्पाचें वय तीस वर्षांचें होतें. अक्कलकोटास जावें



श्रीसद्गुरु बाळाप्पा महाराज, अक्कलकोट.



श्री गुरुमंदीर, वाळाप्पा मठ-अक्कलकोट



श्री वाळाप्पा मठांतील गाभारा-अक्कलकोट

जावें याबद्दल त्यांचा निश्चय झाला नव्हता. मात्र चित्त व्यग्र होऊन, सद्गुरुसेवा घडावी, अशी मनाची उत्कट इच्छा झाली होती. पुढें त्यांचे वडील मुलीचें लग्न झाल्यावर व मुलांचें उपनयन झाल्यावर ते घराबाहेर पडले. त्या पूर्वी तीन रात्रीं पंचपक्वानांनीं भरलेलें ताट स्वप्नांत त्यांजपुढें वाढून येत असे. हुबळीस आपणास फिर्याद देण्यास जावयाचें आहे, असें घरांतील माणसांस सांगून बाळाप्पा हे सद्गुरुचे शोधास निघाले. बाळाप्पानें प्रथम मुरगोड गांवीं जाण्याचा निश्चय केला.

## चिदांबर दिक्षीत बावा यांचा संक्षिप्त वृत्तांत.

मुरगोड हा गांव धारवाड जिल्ह्यांत असून येथें श्री. चिदांबर दिक्षीत ह्मणून साक्षात् शंकराचा अवतार होऊन गेला. या दिक्षितांनीं मोठा यज्ञ केला होता. त्यांनीं अनेक चमत्कार करून दाखविले. त्यांची किर्ति केवळ कर्नाटकांतच नाहीं पण सर्व हिंदुस्तानांत पसरली आहे. कोंकण प्रांतांतही बायका अद्याप दिक्षितांचें गाणें ॥ **पूर्ण ब्रह्म हरीचा ठेवा ॥ चिंदांबर दिक्षीत बावा ॥** या आकड कडव्यानें म्हणत असतात. या गाण्यांत दिक्षितांनीं केलेले कांहीं चमत्कार वर्णिले आहेत. हे दिक्षित दुसरे बाजीराव यांचे कारकिर्दींत होऊन गेले. श्रीस्वामीसमर्थांजवळ एक वेळ कोणी या दिक्षितांबद्दल गोष्ट काढली असतां, "**चिंदांबर दिक्षित मोठे होऊन गेले. बाजीराव त्यांचे पुढें कस्पट.**" असे महाराजांनीं उद्गार काढले. चिदांबर दिक्षितांनीं यज्ञ केला त्यावेळीं आपण पंक्तींत तूप वाढीत होतों, असेंही महाराज म्हणाले. चिदांबर दिक्षीतांची फारच ख्याती होती. त्यांचें वडील मल्हार दिक्षित यांनीं रामेश्वराचे वाटेवर चितांबरेश्वर म्हणून महादेवाचें स्थान आहे, तेथें बारा वर्षें तपश्चर्या केली. तेव्हां शंकरानें साक्षात् दर्शन देऊन तुझ्या पोटीं मीच अवतार घेतों, म्हणून आशिर्वाद दिला. जन्म झाल्यावर मुलाचे एका कानांत तुळशी व एका कानांत बेल असें असेल तोच अवतारी असें समजावें म्हणून सांगितलें. मल्हार दीक्षित पुढें स्वग्रामीं गेले. त्यांचे कुटुंबास गर्भ राहून चिदांबर दिक्षितांचा अवतार झाला. त्यांच्या अनेक अतिमानुष लीला प्रसिद्ध आहेत. मौंजीबंधन झाल्यावर एक वेळ एक बाई गजगौरी व्रताची पूजा संकल्प वगैरे सांगण्यास छोटे दिक्षितांस घेऊन गेली. गजाचे प्राणप्रतिष्ठेचा मंत्र म्हटल्याबरोबर, गजास खरोखर प्राण येऊन तो चालूं लागला ! ! मल्हार दिक्षितांस ही हकीकत कळतांच त्यांस पुत्राचे बाललीलेचे मोठें आश्चर्य वाटून, बाल अवतारी असल्याबद्दल त्यांची खात्री झाली. त्यांचे सर्व चमत्कार सांगूं लागल्यास एक मोठा ग्रंथच होणार आहे. यांनीं एक मोठा यज्ञ केला त्याची प्रसिद्धी सर्व महाराष्ट्रभर

आहे. या यज्ञास लाखों रुपये खर्च झाले. यज्ञाचे वेळेस एका प्रसंगीं तुपाचा तोटा आला असतां, पाण्याच्या घागरी आणून तुपाचे घटांत ओतल्याबरोबर सर्व तूप झालें. दुसरे बाजीराव साहेब हे दिक्षितांची कीर्ति ऐकून मुद्दाम पुण्याहून दिक्षितांचे दर्शनास आले होते. ते जाणार ऐकून, पुष्कळ गरीब गुरीब ब्राह्मण वगैरे ज्यांचीं इनाम गांवें, वर्षासनें वगैरे सरकारांतून अन्यायानें जप्त झालीं होतीं, असें लोक चिदांबर दिक्षित यांजकडे दाद मागण्यास आले. व आपणाबद्दल बाजीराव साहेबांस समजुतीच्या गोष्टी सांगून वर्षासनें वगैरे परत मिळण्याची कृपा व्हावी, म्हणून त्यांनीं प्रार्थना केली. पुढें कांहीं दिवसांनीं बाजीराव साहेब मुरगोडास आले. त्यांस आंतून बातमी लागली कीं, आपणाकडून गांजलेले लोक दाद मागण्यास दिक्षिताकडे आले आहेत; व दर्शनास गेल्यास दीक्षित त्यांचे बद्दल गोष्ट काढणार आहेत. ही बातमी ऐकून कोणाबद्दल आपणास भिड पडूं नये म्हणून बाजीरावनें दिक्षितांकडे एक सात कलमांची यादी पाठविली, व त्याप्रमाणें मान्य झाल्यास दर्शनास येऊं, म्हणून निरोप पाठविला. एक कलम असें होतें कीं, आपण दर्शनास आल्यावर कोणाबद्दल शिफारस न करतां, दिक्षितांनीं तात्काळ निरोप द्यावा. ही सर्व कलमें दिक्षितांनीं मान्य केल्यावर बाजीराव दर्शनास आले. आल्याबरोबर दिक्षितांनीं एक नारळ त्यांचे पदरांत टाकून परत जाण्यास आज्ञा दिली. व म्हणाले "चार दिवस ब्राह्मणाचे राज्य रहावें, अशी इच्छा होती, पण ज्याअर्थी तुम्हास तात्काळ निरोप मागण्याची बुद्धि झाली, त्याअर्थी आतां निरोपच आहे जा." पुढें बाजीराव पुण्यास गेले, व सिद्धवचनाप्रमाणें लौकरच राज्यभ्रष्ट होऊन ब्रह्मावर्तावर जाऊन राहिले. असो. सहज ओघांत या अवतारी पुरुषाची गोष्ट सांगण्याचा हा सुप्रसंग आला. बाळाप्पा हे संकेताप्रमाणें मुरगोड गांवीं आले, व तेथें तीन दिवस राहिले. पुढें गाणगापुरास जाऊन श्री नरसिंह सरस्वती स्वामीची सेवा करावी, असें त्यांनीं मनांत आणिलें. त्या गांवीं चिदांबर दीक्षितांचें पुजारी गलगलीचे ब्राह्मण होते, त्यांचे मुखानें प्रथम बाळाप्पानें श्री स्वामी महाराजांची कीर्ति ऐकिली. ब्राह्मणांनीं सांगितलें, 'अक्कलकोटास प्रत्यक्ष दत्तावतार स्वामी महाराज अवतीर्ण झाले आहेत.' "आपण अक्कलकोटास जाऊं, गाणगापुरास जाण्याचें कारण नाहीं," असें बाळाप्पा म्हणाले.

## बाळाप्पाचें गाणगापुरास सेवेकरितां प्रयाण

ब्राह्मणानें जबाब दिला, "अक्कलकोटास एकदम जाऊं नका; पहिल्यानें तुमचे मनांत आल्याप्रमाणें गाणगापुरास जा, तेथें जमा दृष्टांत होईल त्याप्रमाणें

करा." बाळाप्पास ही गोष्ट मानवली. मग गाणगापुरास जाऊन बाळाप्पानें श्री नरसिंह सरस्वतीचे पादुकांची सेवा दोन महिने पावेतों मनःपूर्वक केली. रात्रीं गाणगापूर गांवीं राहून मोठ्या पहांटेस उठून, संगमावर जाऊन भीमरथीचें स्नान करून, दोन प्रहर पावेतों ते अनुष्ठान करीत. गांवांपासून संगम कोस सव्वा कोस लांब आहे. दोन प्रहरानंतर गांवांत परत येऊन मधुकरी मागून, जे भाकरीचे तुकडे मिळतील ते खाऊन, निर्वाह करावा, त्रिकाल भीमरथीचें स्नान करावें. याप्रमाणें बाळाप्पानें सेवा चालविली. बाळाप्पा हे मूळचे गृहस्थ असून त्यांस भिक्षेचा कधीं प्रसंग नव्हता. त्यांतून भाकरीही पोटभर मिळत नसे, व त्यामुळें त्यांचा जीव तळमळ करीत असे. असें असूनही दृढ निश्चयानें कोणत्याही गोष्टीस न जुमानितां, बाळाप्पानें सेवा चालविली. ही स्थिति आय्याराम व पंढरीनाथ म्हणून गाणगापुरास पुष्कळ दिवस राहिलेले जुने सेवेकरी होते, ह्यांनीं पाहून बाळाप्पास आपल्या घरीं जेवणास बोलाविलें. या सेवेकऱ्यांस त्यांची गांवांत ओळख पडली असल्यानें, पुष्कळ मधुकरी मिळत असे. दोन दिवस बाळाप्पानें त्यांचे घरीं पोटभर भोजन केलें. पुढें त्यांनीं मनांत विचार केला, "आपण सेवेकरी तसेच तेही सेवेकरी, त्यांस आपणांकरितां विनाकारण त्रास देणें चांगलें नाहीं.' मग बाळाप्पा पूर्वीप्रमाणें मधुकरी मागूं लागले. जे तुकडे मिळतील ते अर्ध कोसावर कोटीतीर्थ म्हणून आहे, तेथें जाऊन झोळी पाण्यांत बुडवून काढावी, व दगडावर बसून तुकडे खावे. ह्याप्रमाणें क्रम चालविला. संध्याकाळ झाली म्हणजे ते आर्तीस गांवांत जात, पुन्हां संगमावर जाऊन अनुष्ठान करीत. याप्रमाणें एक महिनापावेतों सेवा झाल्यावर, एके दिवशीं रात्रीं तीन संन्याशांनी येऊन त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें. पुढें बाळाप्पास पोटभर भाकर मिळत नाहीं, असें एका बाईचे लक्षांत येऊन, ती अर्धी भाकर त्यास भिक्षेस घालूं लागली. गांवांतील तुकडे व ही अर्धी भाकर मिळून बाळाप्पास पोटभर अन्न मिळूं लागलें. नंतर १५ रोजांनीं एक ब्राह्मण स्वप्नांत येऊन बाळाप्पास सांगूं लागला, 'तुम्हीं अक्कलकोटास जावें.' त्याप्रमाणें बाळाप्पाचे मनांत जाण्याचें आलें, पण दुसरे दिवशीं त्यांचे अंथरुणाखालीं एक कागद सांपडला, त्यांत प्रथमचींच अक्षरें अशीं होतीं, "उतावळी करूं नये." तीं वाचून बाळाप्पास असें वाटलें कीं, अद्याप जाण्यास हुकूम झाला नाहीं, कांहीं दिवस रहावें. याप्रमाणें दोन महिने सेवा झाली. पुढें एके दिवशीं संगमावर बाळाप्पा आपलें धोतर औदुंबराखालीं ठेवून स्नानास गेले. परत येऊन धोतर उचलतात तों त्याखालीं मोठा लाल विंचू

आहे. या यज्ञास लाखों रुपये खर्च झाले. यज्ञाचे वेळेस एका प्रसंगीं तुपाचा तोटा आला असतां, पाण्याच्या घागरी आणून तुपाचे घटांत ओतल्याबरोबर सर्व तूप झालें. दुसरे बाजीराव साहेब हे दिक्षितांची कीर्ति ऐकून मुद्दाम पुण्याहून दिक्षितांचे दर्शनास आले होते. ते जागार ऐकून, पुष्कळ गरीब गुरीब ब्राह्मण वगैरे ज्यांचीं इनाम गांवें, वर्षासनें वगैरे सरकारांतून अन्यायानें जप्त झालीं होतीं, असें लोक चिदांबर दिक्षित यांजकडे दाद मागण्यास आले. व आपणाबद्दल बाजीराव साहेबांस समजुतीच्या गोष्टी सांगून वर्षासनें वगैरे परत मिळण्याची कृपा व्हावी, म्हणून त्यांनीं प्रार्थना केली. पुढें कांहीं दिवसांनीं बाजीराव साहेब मुरगोडास आले. त्यांस आंतून बातमी लागली कीं, आपणाकडून गांजलेले लोक दाद मागण्यास दिक्षिताकडे आले आहेत; व दर्शनास गेल्यास दीक्षित त्यांचे बद्दल गोष्ट काढणार आहेत. ही बातमी ऐकून कोणाबद्दल आपणास भिड पडूं नये म्हणून बाजीरावनें दिक्षितांकडे एक सात कलमांची यादी पाठविली, व त्याप्रमाणें मान्य झाल्यास दर्शनास येऊं, म्हणून निरोप पाठविला. एक कलम असें होतें कीं, आपण दर्शनास आल्यावर कोणाबद्दल शिफारस न करतां, दिक्षितांनीं तात्काळ निरोप द्यावा. ही सर्व कलमें दिक्षितांनीं मान्य केल्यावर बाजीराव दर्शनास आले. आल्याबरोबर दिक्षितांनीं एक नारळ त्यांचे पदरांत टाकून परत जाण्यास आज्ञा दिली. व म्हणाले "चार दिवस ब्राह्मणाचे राज्य रहावें, अशी इच्छा होती, पण ज्याअर्थी तुम्हास तात्काळ निरोप मागण्याची बुद्धि झाली, त्याअर्थी आतां निरोपच आहे जा." पुढें बाजीराव पुण्यास गेले, व सिद्धवचनाप्रमाणें लौकरच राज्यभ्रष्ट होऊन ब्रह्मावर्तावर जाऊन राहिले. असो. सहज ओघांत या अवतारी पुरुषाची गोष्ट सांगण्याचा हा सुप्रसंग आला. बाळाप्पा हे संकेताप्रमाणें मुरगोड गांवीं आले, व तेथें तीन दिवस राहिले. पुढें गाणगापुरास जाऊन श्री नरसिंह सरस्वती स्वामीची सेवा करावी, असें त्यांनीं मनांत आणिलें. त्या गांवीं चिदांबर दीक्षितांचें पुजारी गलगलीचे ब्राह्मण होते, त्यांचे मुखानें प्रथम बाळाप्पानें श्री स्वामी महाराजांची कीर्ति ऐकिली. ब्राह्मणांनीं सांगितलें, 'अक्कलकोटास प्रत्यक्ष दत्तावतार स्वामी महाराज अवतीर्ण झाले आहेत.' "आपण अक्कलकोटास जाऊं, गाणगापुरास जाण्याचें कारण नाहीं," असें बाळाप्पा म्हणाले.

## बाळाप्पाचें गाणगापुरास सेवेकरितां प्रयाण

ब्राह्मणानें जबाब दिला, "अक्कलकोटास एकदम जाऊं नका; पहिल्यानें तुमचे मनांत आल्याप्रमाणें गाणगापुरास जा, तेथें जसा दृष्टांत होईल त्याप्रमाणें

करा." बाळाप्पास ही गोष्ट मानवली. मग गाणगापुरास जाऊन बाळाप्पानें श्री नरसिंह सरस्वतींचे पादुकांची सेवा दोन महिने पावेतों मनःपूर्वक केली. रात्रीं गाणगापूर गांवीं राहून मोठ्या पहांटेस उठून, संगमावर जाऊन भीमरथीचें स्नान करून, दोन प्रहर पावेतों ते अनुष्ठान करीत. गांवांपासून संगम कोस सव्वा कोस लांब आहे. दोन प्रहरानंतर गांवांत परत येऊन मधुकरी मागून, जे भाकरीचे तुकडे मिळतील ते खाऊन, निर्वाह करावा, त्रिकाल भीमरथीचें स्नान करावें. याप्रमाणें बाळाप्पानें सेवा चालविली. बाळाप्पा हे मूळचे गृहस्थ असून त्यांस भिक्षेचा कधीं प्रसंग नव्हता. त्यांतून भाकरीही पोटभर मिळत नसे, व त्यामुळें त्यांचा जीव तळमळ करीत असे. असें असूनही दृढ निश्चयानें कोणत्याही गोष्टीस न जुमानितां, बाळाप्पानें सेवा चालविली. ही स्थिति आय्याराम व पंढरीनाथ म्हणून गाणगापुरास पुष्कळ दिवस राहिलेले जुने सेवेकरी होते, ह्यांनीं पाहून बाळाप्पास आपल्या घरीं जेवणास बोलाविलें. या सेवेकऱ्यांस त्यांची गांवांत ओळख पडली असल्यानें, पुष्कळ मधुकरी मिळत असे. दोन दिवस बाळाप्पानें त्यांचे घरीं पोटभर भोजन केलें. पुढें त्यांनीं मनांत विचार केला, "आपण सेवेकरी तसेच तेही सेवेकरी, त्यांस आपणांकरितां विनाकारण त्रास देणें चांगलें नाहीं.' मग बाळाप्पा पूर्वींप्रमाणें मधुकरी मागूं लागले. जे तुकडे मिळतील ते अर्ध कोसावर कोटीतीर्थ म्हणून आहे, तेथें जाऊन झोळी पाण्यांत बुडवून काढावी, व दगडावर बसून तुकडे खावे. ह्याप्रमाणें क्रम चालविला. संध्याकाळ झाली म्हणजे ते आर्तीस गांवांत जात, पुन्हां संगमावर जाऊन अनुष्ठान करीत. याप्रमाणें एक महिनापावेतों सेवा झाल्यावर, एके दिवशीं रात्रीं तीन संन्याशांनी येऊन त्यांस स्वप्नांत दर्शन दिलें. पुढें बाळाप्पास पोटभर भाकर मिळत नाहीं, असें एका बाईचे लक्षांत येऊन, ती अर्धी भाकर त्यास भिक्षेस घालूं लागली. गांवांतील तुकडे व ही अर्धी भाकर मिळून बाळाप्पास पोटभर अन्न मिळूं लागलें. नंतर १५ रोजांनीं एक ब्राह्मण स्वप्नांत येऊन बाळाप्पास सांगूं लागला, 'तुम्हीं अक्कलकोटास जावें.' त्याप्रमाणें बाळाप्पाचे मनांत जाण्याचें आलें, पण दुसरे दिवशीं त्यांचे अंथरुणाखालीं एक कागद सांपडला, त्यांत प्रथमचींच अक्षरें अशीं होतीं, "उतावळी करूं नये." तीं वाचून बाळाप्पास असें वाटलें कीं, अद्याप जाण्यास हुकूम झाला नाहीं, कांहीं दिवस रहावें. याप्रमाणें दोन महिने सेवा झाली. पुढें एके दिवशीं संगमावर बाळाप्पा आपलें धोतर औदुंबराखालीं ठेवून स्नानास गेले. परत येऊन धोतर उचलतात तों त्याखालीं मोठा लाल विंचू

त्यांचे दृष्टीस पडला. ते मनांत दचकले, व विंचवास न मारितां सोडून दिलें. आणि नित्यकर्म केलें. त्याच रात्रीं श्रीस्वामी महाराज बाळाप्पाचे स्वप्नांत येऊन त्यांचे अंथरुणावर बसून, दिगंबर मूर्तीनें दर्शन दिलें. रोज अनुष्ठान झाल्यावर महाराजांचा एक अष्टोत्तर जप बाळाप्पा नियमानें करीत असत; दुसरे दिवशीं नियमाप्रमाणें भिक्षेस गेले असतां, भाकरीची भिक्षा न मिळतां सर्वांचे घरीं पोळीचीच भिक्षा मिळाली. हा शुभ शकून मानून देवास नैवेद्य अर्पण करून बाळाप्पा हे अक्कलकोटास जाण्यास निघाले. देऊळ सोडून पुढें जातात तों, दोन सुवासिनी भरलेल्या घागरी घेऊन पुढें आल्या. याप्रमाणें उत्तम शकून होऊन, बाळाप्पा हे अक्कलकोटचे रस्त्यास लागले. श्रीनरसिंह सरस्वतीचें नामस्मरण करीत बाळाप्पा मार्गानें चालले. तों त्यांचे पाय जड होऊन पुढें पाऊल टाकतां येईनासें झालें. बाळाप्पास मोठें संकट पडलें कीं, आतां बारा कोस जमीन आपल्याच्यानें कशी चालून जातां येईल? याप्रमाणें विचार मनांत येऊन श्रीअक्कलकोटनिवासी स्वामी महाराजांचें स्वप्नांत दर्शन दिलेलें रूप मनांत आणून, त्यांचें स्मरण करूं लागले. त्यासरसा पायांतील जडपणा जाऊन पाय फुलासारखे हलके झाले. मार्ग चालतांना वाटेंत कोणी पुण्याचे एक जहागिरदार अक्कलकोटास गाडींत बसून जात असतां, बाळाप्पास भेटला. गाडींत बसण्याविषयीं आग्रह करूं लागला. पण फक्त आपली पडशी गाडींत ठेवून बाळाप्पा पायींच चालले. त्या दिवशीं दुधनीस मुक्काम करून दुसरे दिवशीं ते अक्कलकोटास गेले. तो दिवस रामनवमीचे पारण्याचा होता. अक्कलकोटास उतरतांच, जहागिरदाराचे लोक जेवण वगैरे करण्यांत गुंतले, पण बाळाप्पाचें तनमन सर्व स्वामींचरणीं असल्यानें भोजनाची काळजी न ठेवितां एक पैशाची खडीसाखर घेऊन, महाराज खासबागेंत गेले होते, तेथें दर्शनास गेले. स्वप्नांत ज्याप्रमाणें मूर्ति पाहिली होती, त्याप्रमाणेंच दिगंबर मूर्ति प्रत्यक्ष पाहून बाळाप्पाचा आनंद त्रिभुवनांत मावेना. चरणीं मस्तक ठेवून अनन्यभावानें बाळाप्पानें दर्शन घेतलें, व पुढें खडीसाखर ठेविली.

## महाराजांनीं झाडांस आलिंगन दिलें. तस्त व पिकदाणी साफ करण्याची सेवा.

महाराज त्यावेळेस जमिनीवर निजले होते. ते मग उठून बागांतील सर्व झाडांस आलिंगन देऊन भेटूं लागले. या कृतीनें बाळाप्पावरील आपलें प्रेम महाराजांनीं दर्शविलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मग बाळाप्पा हे बिऱ्हाडीं गेले. जहागिरदारानें

वाढलेलें भोजनपात्र घेऊन महाराजांसन्निध जाऊन प्रसाद घ्यावा, या हेतूनें ते निघाले. वाटेंतच त्यांस वर्तमान कळलें कीं, महाराज राजवाड्यांत गेले. राजवाड्यांत नियमित वेळेखेरीज लोकांस दर्शनास सोडीत नसत. मग मुरलीधराचे देउळांत जाऊन बाळाप्पानें पारणें सोडिलें. त्यांजबरोबर आलेले जहागिरदारास व दुसरे मंडळीस दुसरे दिवसपावेतों दर्शन झालें नाहीं. आठ दिवसपावेतों, महाराज राजवाड्यांत राहिले. इकडे बाळाप्पानें अनुष्ठान सुरू केलें. एक वेळ दर्शन घेऊन यावें, पुढें अनुष्ठान करावें, याप्रमाणें बाळाप्पाची कालक्रमणा होऊं लागली. त्यांचेबरोबर विश्वनाथ म्हणून सेवेकरी होता, तोही महाराजांचे दर्शनास नित्य जात असे. त्यास रोज फूल, खारीक, पेढे याप्रमाणें प्रसाद महाराज देत असत. पण बाळाप्पास म्हणून प्रसाद महाराजांनीं कधींच दिला नाहीं. तेणेंकरून बाळाप्पास वाटे 'आपण कमनशिबाचे, महाराजांचा प्रसाद मिळविण्याजोगी आपली पुण्याई नाहीं.' महाराजांपुढें कांहीं ठेविल्यास आपणास प्रसाद मिळेल अशी आशा धरून बाळाप्पानें एके दिवशीं एक पैशाच्या खारका नेऊन महाराजांपुढें ठेविल्या. महाराजांनीं तर प्रसाद दिला नाहींच, पण नजीक चोळाप्पा होता, त्यानें आपल्या हातानें कांहीं खारका प्रसाद म्हणून बाळाप्पास दिल्या. बाळाप्पा त्यांतच आनंद मानून जाऊं लागले. ते दहा वीस पाउलें गेले नाहींत तोंच महाराज चोळाप्पास म्हणाले, 'अरे, त्यास कशाला प्रसाद दिलास ? परत घेऊन ये.' हें ऐकून चोळाप्पा धांवत धांवत जाऊन बाळाप्पा जवळून प्रसाद दिलेल्या खारका महाराज परत मागतात, म्हणून मागून घेऊन गेला. हें पाहून तर बाळाप्पा मनांत फारच हिरमुष्ट झाले. आपण फारच अभागी म्हणून आपणास प्रसाद मिळण्याची योग्यता नाहीं, असें बाळाप्पास वाटलें. वास्तविक पहातां महाराजांचे कृतीचा अर्थ वेगळाच होता. ज्यांस जाण्याची परवानगी महाराजांकडून होई, त्यांस ते लागलाच प्रसाद देऊन वाटेस लावीत. पण ज्यांस आपणाजवळ ठेवून घेण्याची इच्छा असे, त्यांस ते प्रसाद कदापि देत नसत. ही गोष्ट पुढें अनुभवांतीं बाळाप्पास कळून आली. दोन महिने बाळाप्पाचें अनुष्ठान झालें. पुढें एके दिवशीं बाळाप्पा हे फूल काढीत असतां, त्यांचे बोटास कांटा लागून बोट सुजलें व ठणकूं लागलें. औषध लाविल्यापासून कांहीं कमीपणा वाटेना. यामुळें बाळाप्पाचें अनुष्ठान राहिलें. विश्वनाथ सेवेकरी मधुकरी मागून आणून, त्यांस जेऊं घाली व धोतरेंही धूत असे. याप्रमाणें सात आठ रोज गेले. एके दिवशीं महाराज सरकारवाड्यांत असतां, एका बाईनें बाळाप्पा समक्ष महाराजांस विचारिलें, "महाराज, माझे मुलास डोळ्यांनीं दिसत नाहीं,

काय करावें?" "म्हशीचें मूत लाव," म्हणून महाराजांनीं तिला सांगितलें. ही संधि पाहून बाळाप्पानें, 'आपण बोटास काय औषध लावावें,' म्हणून विचारिलें. 'तूं तेंच लाव' म्हणून महाराज म्हणाले. आज्ञे प्रमाणें मूत्र लाविल्यावर सात आठ दिवसांत बोट बरें झालें. पुढें विश्वनाथ सेवेकरी ज्यास महाराज नित्य प्रसाद देत असत, त्यास द्वारकेस जाण्याची महाराजांनीं आज्ञा दिली. त्याप्रमाणें तो गेला. बाळाप्पाचा दर्शन वगैरे क्रम सुरूच होता. एके दिवशीं संध्याकाळीं बाळाप्पा दर्शनास गेले असतां, महाराजांनीं आपल्या हातांतील माळ बाळाप्पाजवळ देऊन, 'यात्रा झाली कारे? यात्रा झाली कारे?' याप्रमाणें तीन वेळ विचारिलें. बाळाप्पानें उत्तर न देतां चरणीं नमन केलें. बाळाप्पा मधुकरी मागून मुरलीधराचे देवळांत बिऱ्हाड करून राहिले होते. मग गणपतराव व रंगाप्पा सेवेकरी चोळाप्पाचे घरीं रहात असत, तेथें त्यांचे बोलण्यावरून बाळाप्पा जाऊन राहिले. त्रिवर्ग मधुकरी मागून निर्वाह करीत व तेथेंच निजत असत. ह्याप्रमाणें कालक्रमणा चालली असतां, एके दिवशीं बाळाप्पाचे मनांत असें आलें, 'आपण सद्गुरु समर्थांची सेवा करण्याचे हेतूनें घर सोडिलें असून असें बाहेर राहून दिवस काढणें चांगलें नाहीं. महाराज ज्या ठिकाणीं वास करितील तेथेंच आपण रहावें, म्हणजे सेवा करण्याची संधि मिळेल,' असें मनांत येऊन त्या रात्रीं श्रीस्वामीसमर्थ मोदीचे घरांत येऊन राहिले होते, तेथें बाळाप्पा जाऊन निजले. त्यावेळीं महाराजांसन्निध सुंदराबाई सोलापूरकरीण ह्या नांवाची एक विधवा होती, ती महाराजांची व्यवस्था नीट ठेवीत असे. त्यावेळीं चांगला, मेहनती व हुशार असा सेवेकरी मुळींच नव्हता. सुंदराबाईनें बाळाप्पाची भक्ति पाहून, व सेवेविषयीं त्याची उत्कंठा पाहून, त्यास प्रथम महाराजांची तस्त पीकदाणी साफ करण्याची सेवा सांगितली. हा अलभ्य लाभ मानून अत्यानंदानें बाळाप्पा ती सेवा करूं लागले.

## बाळप्पास काढून टाकण्याचे प्रयत्न व्यर्थ

त्यावक्तीं तीन सेवेकरी महाराजांचे सेवेंत होते, पण ते आपसांत हमेश तंटे करीत असत, सबब व्हावी तशी सेवा त्यांजकडून होत नसे. सुंदराबाईनें बाळाप्पाची प्रेमळ भक्ति पाहून व सेवा करण्याविषयीं उत्सुकता पाहून, दुसरे दिवशीं महाराजांचें अंथरूण साफ करून घालण्याचें काम त्याजकडे सोंपविलें. पुढें पाणी तापविण्याचें, गंध उगाळण्याचें, स्वयंपाकाचें याप्रमाणें एकामागून एक अशीं सर्व कामें बाळाप्पाकडे आलीं. बाळाप्पाचा श्रीस्वामी सेवेविषयीं इच्छित मनोरथ पूर्ण

होऊन ते आपणास धन्य मानूं लागले, व अश्रांत श्रम करून महाराजांची मनोभावानें सेवा चालविली. दुसरे तीन भांडखोर सेवेकरी होते, त्यांस महाराजांनीं रस्ता पकडण्यास सांगितलें. पुढें माधुकरी मागून महाराजांची सेवा करण्याचे श्रम फार होतात, असें जाणून चोळाप्पानें त्यास आपल्या घरीं जेवण्याविषयीं विनंती केली. ती मान्य करून एक वेळ चोळाप्पाकडे जेवून बाळाप्पानें सद्गुरु सेवा चालविली. कांहीं दिवसांनीं बाळाप्पा यांचे बेंबींतून रक्त निघूं लागून, त्यामुळें ते आजारी झाले. दिवसेंदिवस बेंबीस कळ लागून रक्तस्राव ज्यास्त होत चालला. एक वेळ रक्तस्रावाबरोबर एक कागदाची पुडी बाहेर पडली, ती उकलून पाहतां, त्यांत कांहीं काळा पदार्थ असल्याचें दिसून आलें. तीन वर्षांपूर्वीं बाळाप्पा आपले घरीं असतां कोणी दुष्टानें त्यांस विषप्रयोग केला होता. कानोल्यांत विषाची पुडी घालून बाळाप्पास दिल्याचें दिसतें. महाराजांची कृपा, लीला व अद्भुत शक्ति अगम्य आहे. बाळाप्पाचे हातून श्रीची सेवा घडण्याची असल्यानें त्या विषापासून त्यांस मरण न येतां, तीन वर्षांनंतर कागदाची पुडी जशीची तशीच बाहेर पडली. ही पडलेली पुडी गणपतराव सेवेकरी व गयाबाई म्हणून अक्कलकोटास आहेत, त्यांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे. याप्रमाणें बाळाप्पाचा रोग दूर करून त्यांस महाराजांनीं जीवदान दिलें. पुढें बाळाप्पाची भक्ति स्वामीचरणीं दृढ झाली, पण अद्याप सर्वत्र स्वामीमय त्यांचें मन झालें नव्हतें. प्रथमपासून बाळाप्पास महादेवाची भक्ति होती. प्रत्येक सोमवारीं महादेवाची पूजा करून, मग ते महाराजांकडे येत. तेणेंकरून सेवेंत अंतर पडे. सोमवारीं महाराजांस स्नान घालण्याची पाळी सुंदराबाईकडे येई. तेव्हां ती महाराजांस म्हणे, "महाराज आपली सेवा बाळाप्पा करितात, मग महादेवाची पूजा करण्याचें काय प्रयोजन आहे? महादेवाची पूजा करूं नका, अशी बाळाप्पास आज्ञा द्यावी," असें बाई महाराजांस बहुत वेळ म्हणत असे. महाराज तीस उत्तर देत, "**नाहीं ग, दगडाची पूजा केलीच पाहिजे.**" याप्रमाणें सहा महिनेपावतों महादेवाची पूजा बाळाप्पास करूं दिली. पुढें एका सोमवारीं सुंदराबाईनें पूर्ववत् प्रमाणें विनंती केली असतां, 'सांबाची पूजा करूं नको,' म्हणून महाराजांनीं आज्ञा केली. अर्थात् बाळाप्पानें पूजा करण्याचें सोडिलें. याप्रमाणें सेवा चालली असतां सुंदराबाईस सवड मिळून चार पैशांची मिळकत होऊं लागली. हें पाहून चोळाप्पा व त्यांचा जांवई श्रीपाद यांस वैषम्य वाटूं लागलें. बाळाप्पा आल्यापासून आपलें नुकसान होऊं लागलें आहे, सबब त्यास

कोठेंतरी घालवून द्यावें, असा त्यांनीं विचार केला. श्रीपाद भटजीनें एके दिवशीं बाळाप्पास स्पष्ट सांगितलें कीं, तुम्हीं आल्यापासून आमचें नुकसान होत आहे. हें ऐकून बाळाप्पास फार वाईट वाटलें. ते म्हणाले, "ब्राह्मणाचें, त्यांतून ज्याचें अन्न खातों त्याचें नुकसान आपण कधींही करणार नाहीं. तत्रापि आपणाकडून सेवा घेणें तुम्हांस बरें वाटत नसल्यास महाराजांकडून निरोप दिला असतां, आपण आपल्या गांवीं जाण्यास तयार आहों." ही गोष्ट भटजीस मानवली. सुंदराबाई जवळ नाहीं अशी संधी पाहून श्रीपादभटजीनें महाराजांची विनंति केली, 'बाळाप्पा आपल्या कुळदेवतेस जाऊन येण्यास आज्ञा मागत आहे, त्यास आज्ञा द्यावी.' महाराज म्हणाले, "**आपल्या कुळदेवास रोज जाऊन येतो.**" याप्रमाणें महाराज त्रिवार म्हणाले. या रीतीनें लाग साधत नाहीं, हें पाहून श्रीपादभटजीनें दुसरी युक्ति काढिली. तो म्हणाला, 'महाराज, बाळाप्पा मुलेंबाळें सोडून आला आहे, त्यास घरीं जाण्यास आज्ञा द्यावी.' महाराज जमिनीवर हात थापटून म्हणाले, "**त्यांचीं बायकामुलें येथेंच आहेत.**" या उत्तरानें श्रीपादभटजीचा उपाय खुंटला.

## बाळाप्पाची आई व बायको यांचीं नांवें गंगाभागीरथी.

एके दिवशीं बाळाप्पा महाराजांचें तस्त घांशीत बसल असतां सुंदराबाईनें महाराजांस प्रश्न केला, 'बाळाप्पास आई व बायको आहेत कीं नाहीं ?' महाराज म्हणाले, "होय आहेत." पुन्हां बाईनें विचारलें, त्यांचीं नांवें काय ? महाराज म्हणाले, 'गंगाभागीरथी.' बाई म्हणाली, 'गंगाभीगारथी म्हणजे काय ?' महाराज म्हणाले, 'नदी.' सुंदराबाईस कांहीं उमज पडेना, पण बाळाप्पाचे मनांत खूण पटली. त्याचे आईचें नांव गंगा असून बायकोचें नांव भागीरथी होतें. मग याप्रमाणें बाईस सांगितल्यावर महाराजांनीं जबाब दिला तो बरोबर आहे, अशी बाईची खात्री झाली व बाळाप्पासही चमत्कार वाटला.

## पाठीवर चापट—चंचल वृत्ति कमी झाली व मन स्थिर झालें.

बाळाप्पावर महाराजांचें फार प्रेम होतें. त्यांस महाराजांनीं कधीं शिव्या दिल्या नाहींत व मारिलेंही नाहीं. मात्र सेवेस लागण्यापूर्वी एकवेळ महाराजांनीं त्यास मारिलें होतें. मुरलीधराचे देउळांत ते अनुष्ठान करीत असतां, त्यांची बुद्धि चंचल होऊं लागली. एके दिवशीं वैशाखमासीं महाराज फत्तेबागचे वाटेवर भर उन्हांत

बसले होते. मधुकरीस जाण्यापूर्वी बाळाप्पा दर्शनास जाऊन पायांवर डोकें ठेवून मग भिक्षेस जाई. नित्याप्रमाणें बाळाप्पा पायां पडण्यास गेल्याबरोबर, पाठीवर फाडकन् महाराजांनीं चापट मारिली. पांच बोटें पाठीवर स्पष्ट उमटलीं. जवळचे सेवेकरी बाळाप्पाची समजूत करूं लागले, 'तुम्हांस छान प्रसाद मिळाला.' बाळाप्पाची चंचलवृत्ति पुढें कमी झाली, व मन स्थिर झालें.

## हंसध्वजराजाचें उदाहरण–निर्लज्जो गुरुसन्निधौ.

बाळाप्पा सेवा करूं लागल्यावर एके दिवशीं त्याचे पुढें महाराजांनीं एक पोथी टाकिली. कामाचे गर्दीत ती पोथी कशाची हे न पाहतां, बाळाप्पानें ती घरांत नेऊन ठेविली. पुढें महाराज वाड्यांत जाऊन राहिल्यावर बाळाप्पास रिकामपण मिळालें. गणपतराव सेवेकरी यांनीं बाळाप्पास पोथीचें स्मरण दिलें. बाळाप्पानें पोथी आणून पाहातां त्यांत हंसध्वजराजाची गोष्ट असून श्रीकृष्णाचे भक्तिस्तव आपलें अर्धें शीर करवतीनें बायको व मुलगा यांचे हातून कापविल्याची गोष्ट होती, तें पाहून बाळाप्पानें मनांत गांठ मारिली कीं, अतिदृढतर भक्तीनें सेवा केली पाहिजे. कोणतेंहि संकट आलें, तरी त्यास घाबरतां कामा नये, असें पोथी देऊन महाराजांनीं सुचविलें आहे. याप्रमाणेंच बाळाप्पानें पुढें उत्तम सेवा केली. बाळाप्पा मूळचे गृहस्थ असून पाणी आणणें वगैरे आचाऱ्याचें काम करण्यास ते प्रथम लाजूं लागले. महाराज एक दिवस म्हणाले ॥ **निर्लज्जो गुरुसन्निधौ** ॥ हें श्रवण करून बाळाप्पानें सर्व लज्जा सोडून दिली. तुझ्या आज्यापणज्यानें असें काम केलें नाहीं, असें महाराज बाळाप्पास म्हणत असत. एके दिवशीं महाराजांची स्वारी मोदीचे घरांत असतां बाळाप्पा बाहेर गेले होते. ते परत येतात तों यात्रेकऱ्यांची पुष्कळ गर्दी जमली होती. त्या गर्दींत, 'इकडे ये' म्हणून महाराजांनीं बाळाप्पास हाक मारिली, व हात पुढें करण्यास सांगितलें. हात पुढें करितांच महाराजांचे तोंडांत पोफळा एवढा खडीसाखरेचा खडा होता, तो बाळाप्पाचे हातावर टाकिला. बाळाप्पा प्रसादाविषयीं आतुरच झाले होते. मोठ्या प्रेमानें प्रसाद भक्षण करून बाळाप्पा दृढभक्तीनें सेवा करूं लागले.

## बाळाप्पा आल्यापासून उत्तम व्यवस्था.

बाळाप्पा येण्याचे पूर्वीं आर्तीचे वेळीं व स्नानाचे वेळीं, हमेष भांडण होत असे. सुंदराबाईच्या वस्तु सेवेकरी पळवीत असत. हुकेवाला, विडे करणारा

वगैरे सर्व सेवेकरी सामान नसलें म्हणजे महाराजांकडे येऊन फिर्याद करीत असत. सुंदराबाई तर त्रासून महाराजांजवळ येऊन रडत असे. महाराज हातानें खूण करून दम धर ग म्हणून तिला इशारा करीत. पुढें बाळाप्पा सेवा करूं लागल्यापासून सर्व तक्रारी दूर होऊन उत्तम व्यवस्था होऊं लागली.

## चोळाप्पा—खजिनदार नाहींरे, जामदार झाला आहे.

पुढें बाळाप्पा पट्ट सेवेकरी झाले. सुंदराबाईनें आपलीं चांदीचीं भांडीं वगैरे बाळाप्पाजवळ ठेवावीं. चोळाप्पाही आपल्या मौल्यवान् जिनसा बाळाप्पाजवळ ठेवीत असे. एके दिवशीं महाराजांची स्वारी खास बागेंत असतां, चोळाप्पा सहज थट्टेनें महाराजांस म्हणाला, महाराज बाळाप्पा आतां खजिनदार झाला आहे. महाराजांनीं उत्तर दिलें, "खजिनदार नाहीं रे, जामदार झाला आहे." खजीनदाराजवळ पैसा असतो, जामदाराजवळ सामान असतें. सबब चोळाप्पानें बोलण्यांत चूक केली, त्याची दुरुस्ती महाराजांनीं केली. यावरून महाराजांचे शब्दज्ञान किती पूर्ण होतें, हें लक्षांत येणारें आहे.

## अग बसूनच खाऊं दे, सूर्यचंद्र असे तोंपावेतों राहूं दे— तारामंडळ असे तोंपावेतों राहूं दे.

बाळाप्पास शेत करून खावें म्हणून महाराजांनीं सांगितल्याचें मागें कळविलें आहे. पुढें एक तासानें महाराज शौचास बसले असतां, मोठे खुषींत असून हंसत होते. बाळाप्पानें सुंदराबाईकडून महाराजांस विचारविलें, 'महाराजांचा हेतू आपण मधुकरी मागून खावें असा आहे, किंवा गांवास जावें असा आहे.' सुंदराबाईनें प्रश्न केल्यावर महाराज म्हणाले, "**अग बसूनच खाऊंदे. सूर्यचंद्र असे-तोंपावेतों राहूं दे, तारामंडळ असे तोंपावेतों राहूं दे,**" हे आशिर्वादाचे शब्द ऐकून बाळाप्पास अति उल्हास होऊन ते एकनिष्ठपणें सेवा करूं लागले.

## हिला ठेवूं नको बरें. तुझ्या डोक्यावर मिरी वाटील.

बाईस पुढें पैसे मिळविण्याचा छंद लागला. तेव्हां तर ती वाटेल तसे चार करूं लागली. कोणास दर्शन घेणें तर बाईचे मनांत आल्यावांचून व कांहीं पैसे घेतल्यावांचून ती दर्शन होऊं देत नसे. पैसे दिले नाहींत तर महाराज निजले आहेत म्हणून ती सांगे. बाईची काय विलक्षण सद्दी आली

असेल कोण जाणे. महाराज तिचे अर्धे वचनांत रहात असत. तिची कांहीं तरी पूर्वपुण्याई असावी यांत संशय नाहीं. महाराजांस निजा म्हणून बाईनें म्हटलें तर लागलीच त्यांनीं निजावें; उठा म्हटलें म्हणजे उठावें. घोंटभर पाणी प्या म्हटलें तर तेवढेंच पाणी प्यावें. महाराज निद्रिस्त असले तरी बाईस रुपये मिळावयाचे असले म्हणजे तिनें महाराजांस उठा, दर्शन द्या, असें म्हणावें, म्हणजे महाराज तयार. मूळची स्त्रीजात, व महाराजांसारखें रत्न हातांत आल्यावर मग सुंदराबाईचे आढ्यतेचें काय वर्णन करावें ! रोख रुपये व इतर सर्व प्रकारच्या वस्तु महाराजांचे नांवावर सुंदराबाई मिळवूं लागली. महाराजांपुढें कोणी पैसा ठेवी तो कारकून गोळा करीत असे, पण यात्रेकरूस दर्शन करून देण्याबद्दल व महाराजांस प्रश्न करण्याबद्दल सुंदराबाई पैसा उपटीत असे. महाराजांचे सन्निध असल्यानें लोकांस तिची पूज्यता वाटे. पैसे उपटण्याच्या सुंदराबाई नव्या नव्या युक्त्या काढीत असे. एक फाटकेंसें लुगडें ती हमेशा परिधान करी, व एक उत्तम कोऱ्या लुगड्याची घडी ती हमेश जवळ बाळगी. साधारण चांगल्या स्थितींतील कोणी भाविक मनुष्य दर्शनास आला म्हणजे आपलें लुगडें फाटलें आहे, एखादें लुगडें घेऊन द्याल तर बरें होईल, म्हणून बाईनें प्रश्न करावा. त्या गृहस्थानें रुकार दिल्याबरोबर जवळ असलेली कोऱ्या लुगड्याची घडी बाई त्यास आणून दाखवी, व त्याची किंमत पंधरा, सोळा रुपये आहे म्हणून सांगे. रुपये हातीं पडल्याबरोबर बाईचे पेटींत जाऊन पडत. इकडे लुगड्याची घडी कोरीच्या कोरीच; व बाईचें नेसण्याचें लुगडें फाटकें तें फाटकेंच. दुसरा भक्त आला कीं, बाईची याचना सुरूच आहे. महाराजांचे दर्शनास नित्य शेकडों लोक येणारे असल्यानें बाईनें ह्याप्रमाणें शेंकडों रुपये मिळविलें.

## आतां काय नबाब झाले.

बाईच्या अशा कृतीनें महाराजांचे कधीं कधीं हालही होत असत. स्वयंपाकाचें काम गणपतराव सेवेकरी याजकडे होतें. एके दिवशीं महाराज जोशीबुवांचे मठांत होते. तो दिवस दत्तजयंतीचा होता. यात्रेची फार गर्दी होती. महाराजांस मोठ्या पहांटेस स्नान घालून चार वाजण्याचे सुमारास भरवीत असत. तितक्या पहांटेस दर्शनास आलेल्या एका श्रीमान गृहस्थानें महाराजांनीं आपला नैवेद्य ग्रहण करावा अशा इच्छेनें पंचपक्वान्नानें ताट भरून नैवेद्य तयार करून महाराजांसन्निध आणला. महाराजांची आंचविण्याची व हा नैवेद्य येण्याची एकच गांठ

पडली. तें पाहून तो गृहस्थ फार हिरमुसला झाला. सुंदराबाईपुढें हात जोडून त्यानें विनंती केली, "कसेंही करून महाराजांच्या मुखांत एक ग्रास तरी पडावा." ह्या कामाबद्दल बाईस त्यानें दोन रुपये देण्याचें कबूल केलें. 'आतां जेवण झालें, दुपारीं घालीन,' म्हणून बाईनें सांगितलें, व ताट आपणाजवळ ठेवून घेतलें. दत्तजयंतीचा तो दिवस व हजारों लोंकांची दर्शनास येण्याची दाटी असल्यानें, दिवसा महाराजांनीं कांहीं खाल्लेंच नाहीं. रात्रीं दहा वाजेपावेतों दाटी होतीच. मग सर्व वारावार झाल्यावर जेवण्याची वेळ आली. सुंदराबाईनें बाळापास सांगितलें होतें कीं, ताट वाढलेलें आहे, करितां नवीन स्वयंपाक करणें नको. त्याप्रमाणें गणपतरावानें त्या रात्रीं स्वयंपाक केला नव्हता. बाईनें पैशाचे आशेनें त्या गृहस्थाचें सकाळीं आणिलेलें शिळें अन्न महाराजांस भरविलें. तें महाराजांनीं मुकाट्यानें खाल्लें. सेवेकऱ्यांवर न रागावतां महाराज बाळापास एवढें मात्र त्रिवार म्हणाले, '**आतां काय नबाब झाले.**' एवढ्या शब्दानें बाळापास मरणप्राय दुःख होऊन, त्यांचा कंठ दाटून आला, व सद्गदित अंतःकरणानें समर्थांचे चरणद्वय घट्ट पोटाशीं धरून त्यानें झाल्या चुकीबद्दल माफी मागितली. बाईचे बोलण्यावर फसून ह्यापुढें महाराजांस शिळें खाण्याचा प्रसंग त्यानें कधीं येऊं दिला नाहीं.

## दुष्टांचें अन्न पोटांत गेलें असल्यास महाराज ते ओकून काढीत.

कोणी नैवेद्य आणला असतां आणणारा गृहस्थ सज्जन व भक्तिमान् असला तर मात्र महाराज तो ग्रहण करीत. सुंदराबाई पैशाच्या आशेनें कोणाचाही नैवेद्य आला तरी महाराजांस जेवूं घाली. महाराज तादात्म वृत्तीवर असले, म्हणजे बाई जें घाली, तें खात असत. पण शुद्धीवर आल्यावर, '**लोकांचा ×× आम्हांला कशाला घालतेस?**' म्हणून बाईस रागें भरत, व तोंडांत बोट घालून दुष्टांचें अन्न पोटांत गेलें असल्यास तें ओकून काढीत असत. सुंदराबाई फार कडक स्वभावाची होती, हें मागें सांगितलेंच आहे. बाळापासारिखा निस्सीम सेवेकरीही तिचे हाताखालीं टिकणें कठीण होतें. जेमतेम बाळापानें सहा महिने पावेतों बाईचे हाताखालीं सेवा केली. पुढें तंटे सुरू झाले. चोळापाचा तर पाणउतारा बाई हरघडी करूं लागली. महाराजांपुढें ठेविलेले पैसे बाई हमेश लांबवीत असे. एके दिवशीं महाराजांची स्वारी बाबा ओंडकर यांचे घरीं असतां, एका भक्तानें महाराजांपुढें पंचवीस रुपये आणून ठेविले. सुंदराबाईनें ते रुपये उचलून घेतले. तिसरे प्रहरीं चोळापा महाराजांसन्निध आला, महाराजांनीं सुंदराबाईस चोळापास रुपये देण्याबद्दल आज्ञा

केली. बाई कशाची सरळ रीतीनें पैसे देते? शेवटीं महाराजांनीं जोडा घेऊन बाईच्या डोक्यावर तीनचार वेळां मारिला, तेव्हां बाईनें रागानें रुपये फेंकून दिले. ते मग चोळापानें उचलून घेतले. याप्रमाणें 'तुझ्या डोक्यावर मिरीं वाटलि' म्हणून महाराजांनीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें चोळापाच्या अनुभवास येऊं लागलें. पुढें तर चोळापास अजीबात काढून आपणच पट्ट सेवेकरीण होण्याचा प्रयत्न बाईनें करून त्यांत ती सिद्धि पावली.

## महाराज सेवेकऱ्यांचा कैवार घेत असत.

सुंदराबाई विनाकारण सेवेकऱ्यांस छळूं लागली, म्हणजे महाराज त्यांचा कैवार घेत असत. बाळापा अहोरात्र सेवा करीत असे. रात्रीं बारा वाजल्यावर थोडावेळ त्यास निद्रा घेण्यास मिळे. एके दिवशीं रात्रीं दोन वाजतां बाईनें महाराजांस उठविलें. बाळापास झोंप लागली असल्यानें त्याच्यानें उठवेना. सेवेकरी बाईस म्हणाले, 'ते आतांच निजले आहेत, एव्हां त्यास उठवूं नका. त्यास कांहीं तरी विश्रांती पाहिजे कीं नाहीं?' हें ऐकून सुंदराबाईस फार राग आला, व ती बाळापास नानाप्रकारें बोलूं लागली. 'सर्व सेवेकरी मेले सारिखेच. पेढे—बरफी खातात व सेवा करण्यास नको,' वगैरे अनेक प्रकारांनीं बाई बोलूं लागली. तें ऐकून महाराज रागावले व बाईस म्हणाले, "**काय ग रांडे, तुझे बापाचा तो नौकर आहे? त्यास बोलतेस?**" मग आपणच उठून बाईनें पाणी तापवून महाराजांस स्नान घातलें.

## सेवेकऱ्यांस प्रेमानें वागवीत—चुकल्यास नमस्कार हो.

महाराज आपल्या सेवेकऱ्यांस मोठ्या प्रेमानें वागवीत असत. कोणी सेवेकरी सेवेंत चुकला तरी त्याजवर ते रागवत नसत, किंवा मारण्यास उठत नसत. फक्त "नमस्कार हो" असें म्हणत असत. असें म्हटल्याबरोबर आपली कांहीं तरी चूक झाली आहे, असें सेवेकरी मनांत समजत. ते आपल्या सेवेकऱ्यांची कसोटीही पहात असत. फार कढत पाण्यांत खेळण्याचें कडें टाकून तें काढण्यास सांगत. पाणी तापलें असतां महाराज स्नानास न उठतां तें निवालें म्हणजे स्नानास उठत. महाराजांचे सर्व कसोटीस बाळापा उतरला होता. आपले सेवेकऱ्यानें आपलीच भक्ति व पूजा करावी, दगडधोंड्याची करूं नये, असें महाराजांचें मत होतें. बहुतेक सेवेकरी सद्‌गुरुचीच भक्ति करीत, पण एखादा अज्ञानानें मूर्तिपूजा करूं लागला, तर महाराज त्यास ताडण करून ताळ्यावर आणीत. एकवेळ श्रीस्वामी

समर्थांची स्वारी शिदोऱ्यांचे घरीं होती. प्रातःकाळीं बाळापा व गणपतराव सेवेकरी महाराजांचे पूजेस आले. बाळापानें महाराजांचे चरणांची पूजा करून ते बाजूस सरले. नंतर गणपतराव पुढें होऊन त्यानेंही श्रीपादुकांची पूजा केली. महाराजांजवळ खेळण्याकरितां हमेश गणपती, गोपालकृष्ण, देवी वगैरे देवतांच्या पितळेच्या मूर्ति पडल्या असत. कोणी भक्त दर्शनास आला म्हणजे त्यांचें जें उपास्यदैवत असेल तें त्यांतून उचलून महाराज त्याचे हातीं देत. श्री चरणाची पूजा होऊन थोडें गंधफूल राहिलें होतें. गणपतरावास वाटलें अनायासें मूर्ति महाराजांनजीक आहे, तिची पूजा करावी. तो एका मूर्तीस गंधफूल वाहूं लागला. त्यासरसें महाराजांनीं त्याचे गालांत अशी एक चपराक दिली कीं, त्यासरसा तो पलीकडे जाऊन पडला, व डोळे चोळीत चोळीत खोलींत गेला. मग बाळापानें गणपतरावास सांगितलें, ' अरे, आपण मूर्तिपूजा करून मग सद्‌गुरूचे पायांजवळ आलों आहों, आणि आतां कशाला मूर्तिपूजा करितोस ? तुझ्या ह्या अज्ञानानें महाराजांस राग आला, पुनः असें करूं नको.'

## फार सोंवळें नसावें.

बाळापा फार सोंवळें होते. त्यांचे मनांतील विकल्प काढण्यास एके दिवशीं महाराजांनीं मोठी गमत केली. त्या दिवशीं महाराज बाळापा कुळकर्णी याचे घरीं होते. कुळकर्ण्यास सुतक असून त्यांचें घर लहान होतें, त्यांत महाराज जाऊन राहिले. सुतकी बाई पाणी घेऊन घर सारवीत बसली होती, तें पाणी आपणास खेळण्याकरितां घेऊन ये, अशी महाराजांनीं बाळापास आज्ञा केली. बाळापा स्नानसंध्या करून शुचिर्भूत होऊन बसले होते. त्यांचे मनांत सुतक्याचे पाण्यास शिवण्याची शंका आली व महाराजांची पहिली आज्ञा ऐकिली न ऐकिलीशी केली. पण महाराज कोठें गप बसणार. ' अरे पाणी घेऊन ये,' म्हणून महाराजांनीं पुनः आज्ञा केल्यावर नाईलाज होऊन बाळापा तें पाणी घेऊन आले. महाराजांचे मनांतच जर असा विटाळ कालविण्याचा आहे, तर तेथें आपलें काय चालणार? असें मनांत येऊन बाळापानें पुनः स्नान केलें नाहीं, व त्यामुळें विटाळासंबंधानें त्यांची कल्पना दूर झाली.

## महाराजांस खेळण्यास सर्व धान्यें—सुकीं फळें व फळफळावळ.

महाराजांस खेळण्याकरितां गहूं, हरभरे, डाळ, उडीद, तांदुळ, राळे, लाख, वाटाणे, मसूर, वगैरे सर्व प्रकारचीं धान्यें लागत असत. तसेंच अक्रोड, बदाम,

खारीक, वगैरे पदार्थही तयार ठेवावे लागत. कोणत्या वक्तीं काय मागतील ह्याचा नेम नसे. भक्तजन दर्शनास आले म्हणजे कोणाचे पदरांत गहूं, कोणाचे पदरांत तांदूळ, वगैरे घालीत असत. ह्यामुळें बाळापास ह्या सर्व वस्तु सज्ज ठेवाव्या लागत. महाराजांस खेळण्यास हे जिन्नस लागतात म्हणून पुष्कळ भक्तमंडळी दर्शनास आली म्हणजे महाराजांपुढें धान्यें वगैरे ठेवीत असत. पण सायंकाळीं चोळापा सर्व जिन्नस आपल्या घरीं घेऊन जाई. एके दिवशीं महाराजांचे आज्ञेवरून श्रीपाद भटजीनें बाळापाजवळ हरभरे मागितले. बाळापाजवळ हरभरे नसल्यानें त्यांचा नाईलाज झाला. ते श्रीपाद भटजीस म्हणाले, 'आलेले सर्व जिन्नस चोळापा घेऊन जातो, आपण काय करावें ? हरभरे शिल्लक नाहींत.' महाराजांनीं हें एकून बाळापाकडे पाहून म्हणाले, "कायरे तुला मी कशास ठवलें आहे ?" हें वचन ऐकून त्यापुढें महाराजांपुढें जे जिन्नस येत त्यांपैकीं कांहीं महाराजांस खेळावयास ठेवून बाकीचे तो चोळापास नेऊन देत असे.

## सेवेकऱ्यांस अति सुंदर शिकवणीच्या गोष्टी.

महाराज आपले सेवेकऱ्यांस हमेश शिकवणीच्या गोष्टी सांगत असत. कोणी भलतेच ठिकाणीं नाक शिंकरण्यास किंवा खाकरण्यास लागल्यास त्यास 'बाहेर जाऊन तसें करावें,' असें सांगत. 'गांजा ओढूं नये, त्यापासून डोकें फिरतें,' असें महाराज सेवेकऱ्यांस सांगत असत. महाराजांजवळील शिपाई व सेवेकरी लोक महाराज निद्रिस्त झाले म्हणजे पत्ते खेळण्यास बसत असत. याप्रमाणें काळाचा व्यय करणें महाराजांस चांगलें वाटत नसे. पत्ते पाहिल्याबरोबर ते फेंकून देत असत. कोणी यात्रेकरू आला म्हणजे तुम्ही कोठील काय वगैरे विचारपूस करण्याची बाळापास संवय होती. एक वेळ असा प्रश्न यात्रेकरूंस केलेला महाराजांनीं ऐकिला; तेव्हां महाराजांनीं त्यास जवळ बोलावून विचारिलें, "कायरे, तुला त्यांचे गांवास जावयाचें आहे काय ?" बाळापानें आपला कान उपटून घेऊन पुढें प्रश्न करण्याचें बंद केलें. कोणी प्रतिष्ठित लोक दर्शनास आले असतां, 'त्यांस बसण्यास टाक,' म्हणून महाराज सांगत असत. मंडळी बसली असून कोणी उंचावर बसल्यास त्यास खालीं बसण्यास महाराज सांगत. "कोणास अक्कल पाहिजे असल्यास शिकून जा." म्हणून महाराज पुष्कळ वेळ म्हणत असत.

"कुग्राम वस्ती कुलहीन सेवा, नकोरे बापा कधीं नको," असें महाराज हमेश म्हणत. तसेंच "संगत्यासंगदोषेण सत्यश्च मतिविभ्रमः । एकरात्र प्रसंगेन काष्ठघंटा-

विटंबना." असेंही पुष्कळ वेळां म्हणत असत. "लक्ष्मी माझी ×× धूत होती" असे महाराज कित्येक वेळेस बोलत असत. महाराजांचें दर्शन घेऊन श्रीगुरुदेवदत्त असें कोणी म्हटल्यास महाराजांस तें खपत नसे. "दत्त बसला ×× वर" असें महाराज तेव्हांच म्हणत. यावरून आपणच दत्तावतार असल्याचें महाराज सुचवीत असत. मूळ—मूळ—मूळ असें महाराज हमेश म्हणत असत. एके दिवशीं वडाचे झाडाखालीं महाराजांची स्वारी असतां एका बोवाचें कीर्तन चाललें होतें. ब्रह्मनिरूपण करितां करितां बोवानें प्रश्न केला, साधु कोणास म्हणावें ? त्याचें उत्तर बोवानें देण्यापूर्वींच महाराज म्हणाले, "**ज्याचे दर्शनानें पाप जाऊन, पुण्य प्राप्त होतें, त्यासच साधु म्हणावें.**" एके दिवशीं एका भक्तानें महाराजांस प्रश्न केला, 'महाराज, जय कोणास मिळतो ?' महाराजांनीं उत्तर दिलें, "**ज्या जवळ धर्म त्यासच जय मिळतो.**" महाराज मणूर गांवीं असतां एका वैष्णवानें प्रश्न केला, 'महाराज, शिव सर्वोत्तम खरे किंवा हरि सर्वोत्तम खरे ?' महाराज म्हणाले, '**दोन्हीही खरे.**' '**आळशाचे तोंड पाहूं नये,**' म्हणून महाराज म्हणत. कोणी पोटार्थी वेषधारी साधु आला असतां महाराज त्याजवर रागें भरत व "**आयता हुडकतो खायाला, आयता तुझे बापाची मत्ता, मेहनत करावी खावें, शेत करावें खावें**" असें महाराज म्हणत.

## सुंदराबाईचा बाळापावर राग व अबोला.

सहा महिने पावेतों सेवा झाल्यावर बाळापा व सुंदराबाई यांजमध्यें भांडण सुरू झालें. महाराजांस लघुशंकेस व शौचास नेणें, स्नान घालणें, ही सर्व कामें जातीनें सुंदराबाई करीत असे. ह्या कामांत दुसऱ्यानें हात घातल्यास तिला खपत नसे. एके दिवशीं अशी गोष्ट झाली कीं, श्रीस्वामी समर्थ मध्यरात्रीं जागे होऊन उठून उभे राहिले. बाळापा जवळच निजले होते, तेही जागे होऊन कंदील लावून ठेऊन महाराजांस लघुशंकेस बाहेर नेण्याकरितां सुंदराबाईस उठविण्यास गेले. बाळापानें सुंदराबाईस एकदां हाक मारिली, तितक्यांत महाराजांनीं बाळापाकडे वळून पाहिलें, आणि म्हणाले, "कायरे, तुला करितां येत नाहीं काय ?" ही गुरुआज्ञा ऐकून सुंदराबाईस जागें न करितां महाराजांचा हात धरून बाळापा त्यांस बाहेर घेऊन गेले. बाहेरून परत येतात तों सुंदराबाई जागी होऊन आपल्या अंथरुणावर बसली होती. महाराजांस बाहेर नेण्याची आपली कामगिरी बाळापानें बजावल्याचें पाहून बाईला फार राग आला, व म्हणाली, 'सर्व सेवेकरी सारखेच.' आजपावेतों सर्व

सेवेकऱ्यांचें व सुंदराबाईचें भांडण झालें होतें, पण बाळापाचें मात्र झालें नव्हतें. या प्रसंगीं बाळापानें आपला हक्क हिसकून घेतल्याचें पाहून, बाईस फार राग आला. पुढें महाराज निजले. सुंदराबाईचे मनांतील बाळापाविषयींचा राग दिवसेंदिवस दुणावूं लागला. तिनें बाळापाबरोबर अबोला धरिला. कांहीं मदतीची जरूर लागल्यास ती बाळापास न सांगतां, दुसरे सेवेकऱ्यांस सांगूं लागली. बाळापानें झालेली हकीकत एके दिवशीं चोळापास निवेदन केली. चोळापाचें व बाईचें मन साफ नव्हतेंच, कारण महाराजांपुढें ठेविलेल्या पैशावर बाई चोळापास कळूं न देतां उपटा मारीत असे.

## स्नानास म्हणून महाराजांनीं कधीं ना म्हटलेंच नाहीं.

या पुढें तीन चार दिवसांनीं महाराजांची स्वारी वाडी म्हणून अक्कलकोटाजवळ एक गांव आहे, तेथें गेली. सुंदराबाईचा वांकडेपणा पाहून, चोळाप्पानें बाळापास चांदीची भांडीं वगैरे निराळा संच करून दिला. प्रातःकाळीं सुंदराबाईनें उठून एके तपेल्यांत महाराजांचे स्नानाकरितां पाणी तापत ठेविलें. बाळाप्पानेंही एक हंडाभर पाणी तापत ठेविलें. स्नानास पाट सुंदराबाईनें मांडला. इकडे बाळाप्पानेंही मांडिला. 'सहस्र कामें एके बाजूस सोडून आधीं स्नान करावें,' अशी आपल्यांत एक म्हण आहे. ती, महाराज स्नानाचे कामीं तंतोतंत अमलांत आणीत. इतर कोणतेही कामास महाराजांस उठा बसा म्हणण्याचें कठीण वाटे, पण महाराजांस स्नान करण्यासंबंधानें पहांटेस कोणत्याही वेळेस कोणीही बोलविल्यास महाराजांची तयारीच असे. स्नानास म्हणून महाराजांनीं कधीं ना म्हटलेंच नाहीं. असो.

सुंदराबाई महाराजांचा हात धरून शौचास घेऊन गेली. परत आल्यावर तिनें मांडलेले पाटावर महाराजांस बसवूं लागली, पण महाराज न बसतां बाळाप्पानें मांडलेले पाटावर येऊन बसले. मग सुंदराबाई व बाळाप्पा दोघांनीं मिळून महाराजांस स्नान घातलें. पूजा वगैरे झाल्यावर सुंदराबाईनें नैवेद्याचें ताट वाढून आणिलें. तिनें निराळाच स्वयंपाक केला होता. महाराज जेवीनात. "माझें ताट कोठें आहे, तें आण," असें महाराज म्हणाले. तेव्हां नाइलाज होऊन, बाळापानें नैवेद्य भरून आणलेलें ताट घेऊन तिनें महाराजांस भरविलें. नंतर महाराज निजले. एक झोंप झाल्यावर मग उजाडलें. महाराजांचा नित्य जेवण्याचा असाच क्रम असे. कारण एकदां उजाडलें म्हणजे यात्रेकरूंची फारच गर्दी होत असे. मग स्नानभोजन करण्यास सवड मिळत नसे. व महाराजही उठत नसत. त्या

दिवशीं गणपतराव सेवेकऱ्यानें अक्कलकोटाहून नैवेद्याचे ताट आणिलें नाही. बारावर दोन वाजतां महाराज म्हणाले. "कोणास जेवावयाचें झाल्यास जेवून घ्या." सेवेकरी चतुरच होते, त्यांनीं जाणलें कीं, महाराजांचे मनांत कोठें तरी जावयाचें आहे. बाळाप्पानें घाईनें भात, पिठलें तयार करून महाराजांस जेवूं घालून हात धुतात, तों अक्कलकोटाहून राणीसाहेबांकडील बगी येऊन थडकली. राणीसाहेब मोठ्या भक्तिमान् होत्या. महाराजांनीं नेहमीं अक्कलकोटासच रहावें, व आपली सेवा घडावी, असें त्यांस वाटत असे. महाराज परगांवीं गेले म्हणजे मुद्दाम मेणा किंवा बगी पाठवून त्यांस अक्कलकोटास आणवीत असत. महाराज बगींत बसून अक्कलकोटास गेले. चार दिवस सरकारवाड्यांत राहून पुनः बाहेर पडले. नंतर कांहीं दिवसांनीं दिपवाळी आली, तेव्हां महाराज राजवाड्यांतच होते.

पुढें राणीसाहेब व सेवेकरीण सुंदराबाई यांची कारकीर्द सुरू झाली. महाराज पेठेंतून निघून गांवांत राहण्यास गेले. दुसरे दिवशीं महाराज बाबा सबनीस यांचे घरीं असतां चोळापा येऊन चांदीचीं वगैरे भांडीं बाळापा सेवेकरी यांचे जवळ होतीं तीं तो घेऊन गेला. त्यास वाटलें, सुंदराबाईपासून आपणांस पुढें भांडीं मिळणार नाहींत. मग बाळापांनीं पितळेंची उपकरणीं मिळवून, महाराजांची पूजा अर्चा करूं लागले. महाराज पूजा ग्रहण करीनात. 'हाट' असें म्हणून बाळापास हुसकावून दिलें. दुसरे दिवशीं बाळापानें चोळापाकडे जाऊन झालेली हकीकत निवेदन केली, व विनंती केली, 'महाराज पूजा ग्रहण करीत नाहींत, करितां कांहीं दिवस तरी चांदीचीं भांडीं आपणाजवळ राहूं द्यावीं. चोळापा प्रेमळच होता. त्यास वाईट वाटलें. त्यानें तत्काळ भांडीं बाळापाचे स्वाधीन केलीं. उपकरणीं परत आल्यावर महाराज पूर्ववत् पूजा ग्रहण करूं लागले. या वेळेस महाराजांजवळ बाळापा, गणपतराव, व नरसापा असे मुख्य सेवेकरी होते; व सुंदराबाई राणीसाहेबाचे तर्फे सेवा करून देखरेख करीत असे. पुढें महाराजांचे व्यवस्थेकरितां संस्थानांतून कारकून व दोन शिपाई यांची नेमणूक झाली. महाराजांपुढें जें उत्पन्न येईल त्याचा जमाखर्च कारकून ठेवी.

## राणीसाहेब व सुंदराबाई यांची कारकीर्द.

पुढें राणीसाहेबांची कारकीर्द दोन वर्षेंपावेतों चालली. राणीसाहेबांची कारकीर्द म्हणण्यापेक्षां सुंदराबाईची म्हणणें रास्त होईल; कारण पुढें सुंदराबाईचेंच प्राबल्य फार वाढून महाराजांसंबंधानें सर्व कारभार तिचे हातीं आला. दोन वर्षांनंतर पुनः पंचांची

कारकीर्द होऊन, चोळापाची पुनः सेवा सुरू झाली. चोळापास पैशाचा लोभ फार सुटला असल्यामुळें, महाराजांनीं त्यासही दोन वर्षांची विभक्त राहण्याची शिक्षा दिल्याचें दिसतें. चोळापा पेठेंत राहत असे. या दोन वर्षांत महाराज पेठेंत मुळींच गेले नाहींत.

## सुंदराबाई जीव देण्यांस जाते, महाराज तिची समजूत करतात.

मागें सांगितल्याप्रमाणें सुंदराबाईची कारकीर्द सुरू झाल्यावर तिचें प्राबल्य फार वाढलें. ती कोणास जुमानित नाहींशी झाली. तिचे मनांत नसलें तर मोठमोठे कामगार लोक सोलापुराहून दर्शनास आले असतां, दर्शन होऊं न देतां परत लावीत असे. तिला द्रव्यलोभही फार सुटला होता. पेढे, बरफी, हरभरे वगैरे धान्य व दुसरे पदार्थ महाराजांकरितां कोणी आणले म्हणजे बाई आपले घरांत नेऊन सांठवीत असे. सेवेकऱ्यांचें व बाईचें वांकडेंच होतें, व ते तिला फार त्रास दत असत. सारांश, बाई सर्वांचीच नावडती झाली होती. भुजंगा शिपायाचें व बाईचें तर हमेश भांडण होत असे. एक वेळ भुजंगानें, वेड्यावांकड्या शिव्या दिल्यावरून बाईस फार राग येऊन ती जीव देण्यास एका विहिरीकडे धांवत गेली. व उडी टाकण्याकरितां विहिरींत दोन्ही पाय सोडून बसली. महाराजांनीं भुजंगास तिला घेऊन येण्यास सांगितलें. त्याचे बोलावण्यानें ती येईना. दुसरे दोनतीन इसम जाऊन तिला आणण्याचा प्रयत्न केला, पण बाई कांहीं येईना. शेवटीं कनवाळू महाराज आपण स्वतः जाऊन, बाईचा हात धरून परत घेऊन आले. आल्यावर महाराज बाईस म्हणाले, "विहिरींत कां जीव देत होतीस?" तेव्हां बाई म्हणाली, 'बायकांमनुष्यांस वाटतील तशा बिभत्स शिव्या देऊन अब्रू घेणें चांगलें का? त्यांतून आपण ब्राह्मण, भुजंग वाणी, त्यानें आपली अब्रू घ्यावी त्यापेक्षां मरण बरें.' महाराजांनीं तिची समजूत घातली, "**जसे भिंतीस कोनाडे असतात, खुंट्या असतात, त्याप्रमाणें शरीरास उंचनीच अवयव असतात. त्यासंबंधानें कोणी कांहीं बोललें, तरी मनांत आणीत जाऊं नये.**

## बाळाप्पा रामाचार्य यांचे वाड्यांत आपले बिऱ्हाडीं गेले.

पुढें बाई निराहार करूं लागली. महाराजांपुढें स्वादिष्ट नामी नामी पक्वान्नें आलीं, म्हणजे बाईचे तोंडास पाणी सुटे. ती लोकांचा डोळा चुकवून रात्रीं पक्वान्नें

भक्षण करी. सेवेकरी तिचे पाळतीवरच होते. बाईची गुप्त गोष्ट ते तेव्हांच प्रसिद्ध करीत. एकानें तर "निराहार करते चोरून खाते," असे प्रास जमवून बाईवर एक कविताच केली होती. कविता महाराजांपुढें म्हटली म्हणजे महाराज खदखदां हांसत. बाईचा कोणाशींच बरेपणा नव्हता. पण ती अशी बहाद्दर होती कीं, ती सर्वांस पुरून उरली होती. असो. बाळाप्पा सेवेकरी याचें व बाईचें ज्यास्ती जास्ती वांकडें पडत चाललें होतें. एके दिवशीं महाराज कोंड्नाना यांचे घरांत होते. रात्रीं बारा वाजतां उठून महाराजांनीं हुक्का मागितला. पहारेकऱ्यांनीं बाळाप्पास उठवून हुक्का तयार करण्यास सांगितलें. हुक्का पिणें झाल्यावर बाळाप्पानें महाराजांस निजण्याविषयीं विनंति केली, पण महाराज निजेनात. तेव्हां बाळाप्पानें निरुपाय होऊन सुंदराबाईस जागें केलें, व 'महाराज कांहीं केल्या निजत नाहींत, तुम्ही निजवा' म्हणून सांगितलें. तेव्हां सुंदराबाई रागानें बाळापास म्हणाली,' 'मला अगोदर कां उठविलें नाहीं?' बाळापानें सांगितलें, 'आपणासही झोंप लागली होती, महाराजांनीं हुक्का मागितल्यावरून शिपायानें आपणास जागें केलें.' बाईचे मनांत ती गोष्ट येईना. 'महाराजांस पाहिजे तर निजवा, नाहींतर राहूं द्या,' असें ती म्हणाली. शेवटीं बाळाप्पानें महाराजांच्या चरणीं मस्तक ठेवून निजण्याविषयीं महाराजांची प्रार्थना केली, तेव्हां महाराज निजले. इकडे लुच्चा, लबाड वगैरे पुष्कळ शिव्या बाईनें बाळाप्पास दिल्या. बाळाप्पास फार वाईट वाटलें, व तो आपल्या मनांत म्हणूं लागला, आजपर्यंत आईबापाच्याही आपण शिव्या खाल्ल्या नाहींत; असें असून आज बाईच्या शिव्या खाण्याचा प्रसंग आला, परमेश्वराची इच्छा. असा विचार मनांत येतांच तिकडे महाराज म्हणूं लागले, "कसा नांदतोस, कसा नांदतोस, गुरू हो म्हणतो गुरू हो" याप्रमाणें महाराज त्रिवार म्हणाले. पहांटे चार वाजतां बाळापानें उठून नित्याप्रमाणें नरसापा यास पाणी तापविण्यास लाविलें, व गणपतराव यास स्वयंपाक करण्यास पाठविलें. सुंदराबाई महाराजांस नित्य चार वाजतां उठवीत असे, पण त्या दिवशीं उठविलें नाहीं. महाराज सात वाजेपावेतों उठले नाहींत. महाराज उठल्यावर आपणच जोडा घालून बाहेर चालले, तेव्हां बाळापानें त्यांचा हात धरून शौचास नेलें. ते दिवशीं थोडा पाऊस पडला होता, म्हणून महाराजांस समजावून फार लांब न जातां वडाखालींच शौचास नेऊन बसविलें. शौच झाल्यावर महाराजांचा हात धरून परत घेऊन येऊं लागला. इतक्यांत सुंदराबाई धांवत येऊन बाळापाचे हातास झटका देऊन, आपण महाराजांस घेऊन गेली. त्या दिवशीं महाराजांची

प्रकृति जरा अस्वस्थ असल्यानें आज स्नान करूं नका म्हणून बाईनें महाराजांची विनंति केली. ती त्यांनीं मान्य केली. महाराज पाटावर बसल्यावर नरसापानें उष्णोदक आणून ठेविलें होतें, तें घेऊन बाळापा नित्याप्रमाणें पाय धुऊं लागला. तेव्हां सुंदराबाई म्हणाली, 'तुझा बाप आला तरी पाय धुऊं देणार नाही.' बाळापाचे हातांतील तांब्या हिसकून घेतला. बाळापानें तिचे हातांतून हिसकून घेतला; याप्रमाणें हिसकाहिसकी चालली असतां महाराज बाळापास म्हणाले, "कांरे, भांडतोस कां ?" हे शब्द ऐकून बाळापानें तांब्या खालीं ठेविला. मग सुंदराबाईनें पाय धुतले व समर्थांची पूजा केली. बाळापा फार हिरमुसला झाला होता. त्या दिवशीं आरतीही गणपतराव सेवेकरी यानें केली. एक वर्षापासून बाळापाची व सुंदराबाईची घासाघासी चालली होती, यामुळें बाळापानें त्रासून निघून जाण्याचा विचार केला. आठ नऊ वाजतां महाराज निद्रिस्त झाल्यावर चांदीचीं वगैरे भांडीं त्याजपाशीं होतीं तीं महाराजांचे कारकुनापाशीं देऊन महाराजांचे चरणीं मस्तक ठेवून रामाचार्य यांचे वाड्यांत त्याचें बिऱ्हाड होतें तेथें बाळापा गेला.

## बाळापाचा मारुतीचे देवळांत श्रीस्वामी नामाचा जप.

मग दुसरे दिवशीं महाराज तेथेंच असतां, बाळापा सकाळीं सातआठ वाजतां दर्शनास आले. महाराज माडीवर होते. बाळापा खालून वर चढून जाणार तितक्यांत अंतरसाक्षी महाराजांनीं जगन्नाथ म्हणून हुक्का देणारा सेवेकरी सन्निध होता, त्यास सांगितलें, अरे, "**खालीं कोण येत आहे, त्याला आसन दाखीव.**" त्यानें आज्ञेप्रमाणें लागलीच एक हरणाचें व दुसरें वाघाचें कातडें घेऊन खालून बाळापा दर्शनास येत होते त्यांस हाक मारून महाराज आसन दाखविण्यास सांगतात, असें म्हणून आसन दाखविलें. तेव्हा बाळापानें तर्क केला कीं, महाराजांची अक्कलकोट सोडून जाण्याबद्दल आज्ञा दिसत नाहीं; येथेंच राहून जप करीत बसावें, अशी आज्ञा दिसते. नंतर बाळापानें माडीवर जाऊन श्रीसमर्थांचें दर्शन घेतलें, व आपल्या बिऱ्हाडीं परत गेले. आसन कोणत्या जागीं घालावें याची बाळापास चिंता पडली. रात्रीं स्वप्नामध्यें मारुतीचें देऊळ बाळापाचे दृष्टीस पडलें. त्याच देवळांत बसून जप करावा, असा बाळापानीं निश्चय केला. सकाळीं उठून महाराजांचें दर्शन घेऊन बाळापा जप करण्यास जावयास निघाले. तेव्हां "**हिशेब असूंदे बरें,**" म्हणून महाराज बाळापास म्हणाले. "श्रीस्वामी समर्थ" नामाचा जप मारुतीचे देवळांत बसून बाळापा करूं लागले. नित्य दुवक्त समर्थांचें

दर्शन घेऊन बाकीचा वेळ ते जपांत घालवीत. एके दिवशीं तिसरे प्रहरीं बाळापा दर्शनास गेले असतां, सुंदराबाईनें महाराजांस सांगितलें, ‘महाराज, बाळापा आपली सेवा सोडून लांब जाऊन देवळांत जप करीत बसले.’ तेव्हां महाराज म्हणाले, “**अग आपले लोक हजार कोसांवर कां असेनात ते जवळच असल्या सारिखे आहेत.**” तसेंच एके दिवशीं बाईनें वरप्रमाणेंच महाराजां-जवळ गोष्ट काढिली असतां, महाराज म्हणाले, “**तो कुलदीप आहे.**” याप्रमाणें सुमारें पंधरा दिवस झाल्यानंतर एके दिवशीं बाळापा दर्शनास जात असतां, गणपतराव सेवेकरी यांनीं बाळापास सांगितलें कीं, ‘एवढी छाटी महाराजांस नेऊन द्या. मी स्वयंपाकांत गुंतला आहे.’ त्यावरून बाळापा छाटी घेऊन महाराजांकडे गेले. महाराजांची छाटीची गाठोडी बाळापांनीं आणिलेली पाहून, सुंदराबाईस फार संताप आला. व हे दर्शनास न येतील तर बरें असें तिला वाटूं लागलें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बाळापा नित्याप्रमाणें दर्शनास आले असतां, महाराज जरा रंगांत होते, ही संधी साधून सुंदराबाईनें बाळापास साफ सांगितलें, ‘तुम्ही दर्शनास मुळींच येत जाऊं नका; तुम्ही आलां म्हणजे महाराज रागावतात.’ हें ऐकून बाळापास पराकाष्ठेचें वाईट वाटलें. त्यास वाटलें कीं आपण घरदार मुलेंमाणसें सोडून केवळ सद्गुरूसेवा करण्याकरितां येथें येऊन राहिलों. कर्मयोगानें सेवेपरी सेवा अंतरली, व आतां तर दर्शनही बंद होण्याची वेळ आली. आपण मोठे हतभागी आहों, असें मानून म्लानमुख करून एके बाजूस जाऊन बाळाप्पा बसले. हें पाहून करुणार्णव स्वामीसमर्थ मनांत कळवळले, व सुंदराबाईकडे रागानें पाहून छातीवर हात ठोकून तीन वेळां म्हणाले, “**अगे ,तुझी खबर घेतों बरें.**” पुढें बाळाप्पा तिसरे प्रहरीं एकदांच दर्शनास जाऊं लागले.

## अनुष्ठानास बसण्यापूर्वी बाळाप्पास, ‘जें असेल तें द्या व चालते व्हा.’

बाळाप्पा अनुष्ठानास बसण्याचे पूर्वीची सातआठ दिवसांची गोष्ट आहे. एके दिवशीं पुढील गोष्ट मनांत आणून महाराज बाळापास म्हणाले, “**जें असेल तें द्या व चालते व्हा.**” ही आज्ञा ऐकून बाळाप्पानीं आपल्या कानांत पांचपंचवीस रुपयांची भिकबाळी होती, ती काढून पुढें ठेविली; तसेंच त्यांनीं कांवळ्यांत पडशी, तांब्या, पंचपात्री, धोतरें वगैरे घालून सर्वांचें एक गाठोडें करून महाराजांपुढें ठेविलें; व साष्टांग नमस्कार घातला. सुंदराबाईनें तें गाठोडें

उचलून घरांत नेलें. त्या वेळेस ती महाराजांस म्हणाली, 'महाराज, बाळाप्पास हांतरण्यास कांबळे तरी असूं द्या.' तेव्हां महाराज म्हणाले, "**तुझें कांबळें कशास घेतील, त्यास शालजोडी मिळेल.**" पुढें आठ दिवसांनीं मागें सांगितल्याप्रमाणें भांडण होऊन बाळाप्पा मारुतीचे देवळांत जप करण्यास गेले.

## बाळाप्पास पूजा करण्यास मनाई.

बाळाप्पा जपास बसून एक महिना झाल्यानंतर एकाएकीं सुंदराबाई आजारी पडली. व तिला पायानें चालवेनासें झालें, त्यामुळें महाराजांस स्नान वगैरे घालण्याची अडचण पडूं लागली. तेव्हां गणपतराव सेवेकरी यांनीं बाळापास विनंती केली, 'महाराजांस तेवढें स्नान घालून नंतर अनुष्ठानास जात जा.' ही कामगिरी बाळाप्पांनीं आनंदानें मान्य केली. ते नित्य प्रातःकाळीं येऊन महाराजांस स्नान घालूं लागले. एके दिवशीं बाळाप्पानीं नैवेद्यास बर्फी आणिली होती. ती प्रसाद म्हणून तेथें जमलेल्या मुलांस त्यांनीं वांटली. तेथें माधवराव शिधेरे व त्याचीं मुलें होतीं. माधवरावानें थट्टेनें सुंदराबाईस सांगितलें, 'लंगडी झालीस म्हणून बाळाप्पानें बर्फी वाटली.' बाईस ती गोष्ट खरी वाटून तिचे तळव्याची आग मस्तकास गेली. 'उद्यां बाळाप्पा येऊन कसा स्नान घालतो तें पाहतें,' असें म्हणून दुसरे दिवशीं राणीसाहेबांस सांगून पाठविलें कीं, बाळापा महाराजांजवळ येऊन दंगा करितो. त्यावरून वाड्यांतून गंगुलाल जमादार महाराजांजवळ आला. प्रातःकाळीं महाराजांस स्नान घालण्यास बाळापा आले असतां, बाई एके पाटावर बसली व आपणास उचलून महाराजांजवळ नेण्यास तिनें भुजंगास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर बाळापास स्नान घालूं न देतां महाराजांस दुसऱ्याकडून स्नान घालविलें. ही बाईची कामगिरी बजाविल्याबद्दल भुजंगाची तीन दिवस पावेतों कंबर ठणकत होती. बाईच्या दांडगाईच्या गोष्टीस सहाय्य केल्याबद्दल महाराजांनींच त्याची अशी खोड मोडली. सरकारवाड्यांतून गंगूलाल जमादार आला होता, त्यानें बाळाप्पास विचारिलें, 'तुम्हीं दांडगाई कां करितां?' तेव्हां बाळाप्पा म्हणाले, 'महाराज आपलें उपास्य दैवत आहे. इतर देव सोडून महाराजांनीं आपली भक्ति लाविली आहे, त्याअर्थीं एक तांब्याभर पाणी घालून महाराजांची पूजा करून आपण निघून जातों. दांडगाई करण्याचें आपणास कारण नाहीं.' गंगुलाल म्हणाला, 'तुम्हांस पूजा करणें तर पहिली पूजा झाल्यावर मागाहून पूजा करीत जा.' पण तसें करण्याचें बाळाप्पानीं नाकारिलें. तेव्हां गंगुलाल म्हणाला, 'ही

गोष्ट आपण सायंकाळीं राणीसाहेबांस कळवून मग त्यांचा हुकूम होईल, तसें करण्यास तुम्हांस आज्ञा करूं.' "उद्यां सकाळपावेतों आपणांस उलट निरोप कळवावा, नाहींपेक्षां पूजा करण्यास आपण येणार नाहीं," असें बाळाप्पा म्हणाले. राणीसाहेबांजवळ सुंदराबाईचें वर्चस्व असल्यानें बाळाप्पास अनुकूल असा हुकूम होण्याची आशा नव्हतीच. बाळापास उलट निरोप न आल्यामुळें सकाळीं महाराजांस स्नान घालून पूजा करण्याचें त्यांनीं सोडून दिलें. तिसऱ्या प्रहरीं एकवेळ दर्शन घेऊन बाळापा परत जात असत.

## बाईस लवकरच रजा देतील अशी बाळाप्पाची खात्री.

असें जरी झालें तरी सुंदराबाई बाळापास चिडविल्यावांचून व त्याची चेष्टा केल्यावांचून रहात नसे. तिसरे प्रहरीं बाळापा आला म्हणजे बाईनें सर्व लोकांस खारकांचा प्रसाद वाटावा, व बाळापास मुद्दाम वगळावें. हें पाहून महाराज सुंदराबाईस म्हणाले, '**अग, खारका वांटूं नको बरें, पुढें लिंब्याकडून मागून घ्याव्या लागतील.**' पुढें दहापंधरा दिवसांनीं बावडेकर बोवांनीं महाराजांकरितां मद्रासेकडून एक जरीकांठी छाटी आणिली होती, ती त्यांनीं रंगवून महाराजांचे आंगावर घालण्यास बाईजवळ दिली. बाईनें महाराजांचे आंगावर छाटी घातली. ती महाराजांनीं परत तिचे आंगावर टाकिली. बाईनें महाराजांचे आंगावर पुन्हा छाटी घातली, तेव्हां महाराज म्हणाले, '**अग, पुढें छाटी मिळावयाची नाहीं, आतांच घालून घे.**' ह्या भाषणावरून बाळापाची खात्री झाली कीं, महाराज बाईस लौकरच काढून टाकतील. कांहीं दिवसांनीं महाराज राजवाड्यांत गेले. तेव्हां बाळाप्पा दर्शनास जाईनासे झाले; व त्यामुळें महाराजांकडील बातमी त्यांस कळेनाशी झाली. बाळाप्पानें भुजंगा चपराशी व नरसापा सेवेकरी यांस सांगितलें, 'महाराज काय लीला करितात, त्या मला कळवत जा.' भुजंगानें एके दिवशीं बाळाप्पास सांगितलें, 'महाराजांनीं आज तीन बोटें दाखविलीं.' यावरून बाळापानें मनांत अर्थ केला, तीन महिन्यांत महाराज बाईस काढून टाकितात. नरसापास महाराजांनीं एके दिवशीं चवरींतील केंस काढून दिला, तो त्यानें बाळाप्पास आणून दिला. त्यावरून बाळाप्पानें असा तर्क केला, 'आपली जटा काढूं नये. केंस तसेच राखून ठेवावे,' असा महाराजांचा हुकूम आहे.

## बाळापा हे उत्तम सेवेकरी—महाराज त्यास चहात.

महाराज हमेश गांवोगांव फिरत असत. एके गांवीं रहात नसत. पण बाळाप्पाची सेवा बंद होऊन ते अनुष्ठानास बसल्यानंतर महाराज परगांवीं मुळींच गेले नाहींत. बाळाप्पा जेव्हां पूर्ववत् सेवा करूं लागले, तेव्हांच महाराज पहिल्याप्रमाणें फिरूं लगले. यावरून सर्व सेवेकऱ्यांत बाळापा हे उत्तम सेवेकरी असून, महाराज त्यांस चहात असत, असें दिसून येतें. यापूर्वींही एक दोन वेळेस भांडणामुळें बाळापास सेवा सोडावी लागली. पण महाराजांनीं पुन्हा त्यास आपणाजवळ घेतलें. स्नान व पूजा होण्याचे आधींच बाई महाराजांस जेऊ घाली. त्यासंबंधानें त्यांचें व बाईचें भांडण होऊन, पूजा वगैरे त्यांनीं सोडून दिली होती. बाळाप्पचे मनास फार वाईट वाटलें, व पुन्हा सेवा मिळते कीं नाहीं, ह्याची त्यांस भीति पडली. त्यांस वाटलें चोळाप्पानें बारा वर्षें सेवा केली, तरी त्याची पर्वा न धरितां, महाराजांचे मनांत आलें, तेव्हां त्यांची सेवा बंद केली; मग आपण तर चार दिवसांचें सेवेकरी, आपणास महाराज कशाचे पुसतात ?' ह्याप्रमाणें वाईट वाटून त्यांनीं दोन दिवस अगदीं निश्चक्र उपास केला. तिसरे दिवशीं बाळापा महाराजांवर छत्री धरून उभे असतां महाराज म्हणाले, "**काय खाऊं म्हणतोस, दम खा बरें,**" असें तीन वेळ म्हणाले. तेच दिवशीं संध्याकाळीं सुंदराबाईची व बाळापाची समजूत होऊन बाळापा सेवा करूं लागले.

## महाराजांकडून सुंदराबाईस काढण्याचीं चिन्हें.

सुंदराबाईस काढून टाकतील अशीं चिन्हें महाराज दाखवूं लागले. एके दिवशीं राजवाड्यांत महाराजांची स्वारी असतां राणीसाहेबांस म्हणाले, "**आजपावेतों सुंदराबाईस आपण संभाळिलें, आतां तूं सांभाळ बरें.**" राणीसाहेब म्हणाल्या, 'बरें आम्ही संभाळतों.' श्रीस्वामीसमर्थ ज्यांस काढणार, त्यांस राणीसाहेब संभाळण्यास समर्थ कोठून होतील ? महाराजांचे बोलण्याचा रोंख समजून न घेतां राणीसाहेबांनीं कांहीं तरी उत्तर दिलें. असो. महाराजांचें नांव सांगून हरभरे वगैरे धान्य मणोगणती गोळा करून बाई आपले घरांत सांठवून ठेवीत असे, असें पूर्वीं सांगितलेंच आहे. बाईस काढून टाकण्याच्या अगोदर दोन चार महिने महाराजांनीं एक चमत्कारिक खेळ सुरू केला, तो असा. एक टोपली आणून ती हरभऱ्यांनीं भरून त्यांत कुलूप किल्ली पुरून ठेवीत, व कोणी दर्शनास आला म्हणजे टोपलींत काय आहे पहा असें सांगत. तो गृहस्थ टोपलींत पाहून उत्तर

देत असे कीं, टोपलींत हरभरे आहेत. महाराज रागावून शिवी देऊन त्यास म्हणत, "**त्याच्यांत काय आहे तें पहा.**" हरभरे उकरून पहावे तों त्यांत कुलूप किल्ली सांपडे. तें पाहून महाराज हास्य करीत. या खेळाचा पुढें असा अनुभव आला कीं, पुढें बाईस काढल्यावर धान्य वगैरे ठेविलेलीं सर्व घरें जप्त होऊन त्यांस सरकारी कुलुपें लागलीं. फळफळावळ आली म्हणजे बाईस महाराज म्हणत, "**अग खाऊन घे, पुढें खाण्यास मिळणार नाहींत बरें.**"

## सुंदराबाईविरुद्ध अर्ज व पंच नेमणुकीचा हुकूम.

सुंदराबाईच्या विलक्षण वर्तनानें सर्व लोक त्रस्त झाले, व तिला महाराजांपासून दूर करण्याबद्दल प्रजेनें मामलेदार व कारभारी यांजकडे अर्ज केले. राणीसाहेबांचे तर्फे सुंदराबाई सेवा करीत असल्यानें, सदरहू कामगार ते अर्ज तजविजीस राणीसाहेबांकडे पाठवीत. सुंदराबाई त्यांचे प्रीतींतील असल्यामुळें अर्जाबद्दल कांहीं विचार न होतां, ते विल्हेस पडत. मग कलेक्टर साहेबांकडे व कमिशनर साहेबांकडे व मुंबईचे गव्हर्नर साहेबांकडे अर्ज गेले. ते अर्ज कारभारी साहेबांकडे तपासण्यास येऊन, तपासांत बाईची गैरव्यवस्था दिसून आल्यामुळें, तसा वरिष्ठ ठिकाणीं रीपोर्ट होऊन शेवटीं, 'बाईस काढून टाकून, महाराजांचे व्यवस्थेकरितां पंचांची नेमणूक करावी,' असा मेहेरबान कलेक्टर साहेबांचा हुकूम कारभारी साहेबांस येऊन धडकला. बाळापाचें अनुष्ठान चाललेंच होतें. सुंदराबाईस काढून टाकण्याचे पूर्वींची दोनचार दिवसांची गोष्ट आहे. एके दिवशीं तिसरे प्रहरी बाळापा नित्याप्रमाणें दर्शनास गेले असतां, महाराज त्यांस म्हणाले, "अरे हिशेब घेऊन ये." बाळापास त्याचा अर्थ कळेना. बाबा सबनीस व गणपतराव यांस बाळापानें विचारिलें, 'हिशेब काय द्यावा ?' बाबा सबनिसांनीं मनन करून उत्तर दिलें, 'पूर्वी जनार्दनस्वामींनीं एकनाथ महाराज सेवा करीत असतांना हिशेब मागितला होता,' त्याप्रमाणें हिशेब पोथीवरून उतरून घेऊन बाबांनीं बाळापाजवळ दिला. तो हिशेब बाळाप्पांनीं महाराजांपुढें ठेविला. महाराजांनीं ते कागद घेऊन फेंकून दिले. बाळापाचे मनास चटपट लागली कीं, महाराजांचे मनाप्रमाणें झालें नाहीं. गणपतरावास त्यांनीं झालेली हकीगत सांगितली. अनुष्ठानास बसण्याचे वेळीं बाळापास महाराजांनीं हिशेब असूं दे, म्हणून आज्ञा केली होती. त्याचें स्मरण गणपतरावास होऊन, 'तुमचा जप किती झाला, त्याचें टिपण करून महाराजांपुढें ठेवावें,' असें त्यांनीं बाळापास सांगितलें. त्याप्रमाणें केल्यावर महाराजांनीं प्रसन्न मुद्रेनें तो हिशेब आपणाजवळ ठेवून घेतला.

## बाळाप्पांची अनुष्ठानाची दुसऱ्याकडून समाप्ति.

बाळापाचे तपाचा हिशेब महाराजांनीं घेतला. त्याचे पूर्वीं दोन दिवस एक सोलापुरचा गरीब लिंगाईत वाणी महाराजांचे दर्शनास आला होता. तो स्वयंपाक करून पोट भरीत असे. त्यांस महाराजांनीं सांगितलें कीं, बाळापा अनुष्ठान करितात, तेथें भटांस जेऊं घाल. त्यानें बाळाप्पाकडे येऊन महाराजांची आज्ञा त्यांस निवेदन केली. त्या वाण्याचें नांव कल्याण आपा होतें. त्याचे जवळ पैसे नव्हते, गळ्यांतील लिंग ठेवण्याचा चांदीचा चौक गहाण ठेवून त्यानें दहा पंधरा रुपये काढले, व ब्राह्मणभोजन घालून बाळापाचे अनुष्ठानाची समाप्ति केली. बाळापास स्वतः खटपट करण्याचें कारण पडलें नाहीं. महाराजांनीं परभारें वाण्यास सांगून ब्राह्मणभोजन करविलें. यावरून भक्तकाजाकडे दयार्णव स्वामींचें किती लक्ष असे हें ध्यानांत येईल. तसेंच अनुष्ठान चाललें असतां एके दिवशीं रात्रीं बाळापा मारुतीचे देवळांत निजले असतां, रात्रीं त्यांच्या उरावर कोणी बसलें आहे, असा भास होऊन ते घाबरून उठले. देवळानजीक चिंचेचे झाडावर भूत आहे, असें त्यांच्या ऐकण्यांत होतें. त्याचीच बाधा आपणास झाली कीं काय अशी चिंता करीत आहेत, तोंच सर्वज्ञ श्रीस्वामीसमर्थ अरुणोदयापूर्वींच देशमुखाचे वाड्यांतून निघून नेमके मारुतीचे देवळांत आले, व बाळाप्पाचे आसन घेऊन चारी बाजूनें फिरून दिग्बंधन करून परत गेले. पुढें बाळाप्पास भिण्याचा प्रकार कधींही आला नाहीं. सेवकजनाचे भयनिवारणार्थ महाराज कसे उडी घालून जात, याचें हें एक उदाहरण आहे, असो.

## महाराज, आज आपण फार कां हसतां ? महाराजांनीं बाईस उत्तर दिलें, ' उगाच हंसतों. '

बाईस दूर करण्याचा दिवस नजीक आला. त्याचे आदले दिवशीं हैदराबादेकडील एक जहागीरदार महाराजांचे दर्शनास आले होते. ते सन्निध असतां बाळापा नित्याप्रमाणें तिसरे प्रहरीं महाराजांचे दर्शनास आले. माधवराव शिधोरे यांचे घरीं महाराज होते. अनुष्ठानास बसल्यानें बाळाप्पाची दाढी वाढली होती. त्यामुळें बाळापा तोंड लपवून दर्शन घेत असत. बाळापा पायां पडण्यास लागले असतां, महाराज जहागीरदारास म्हणाले, " याचें तोंड पहा." त्यांनीं आज्ञेप्रमाणें केलें. सुंदराबाईस कौतुक वाटून बाळापाची थट्टा करण्याचे हेतूनें ती जहागीरदारांस

म्हणाली, 'याचें तोंड नीट पहा.' हें ऐकून महाराज हंसूं लागले. तेव्हां सुंदराबाईस जास्ती आनंद होऊन, 'नीट तोंड उघडून पहा' असें जहागीदारास म्हणाली. इकडे महाराज पोट धरधरून अधिक अधिक हंसूं लागले. तों तों सुंदराबाईस अत्यानंद होऊन, बाळापाची बरी फजिती होत आहे असें वाटून, तोंड पाहण्याविषयीं ती जहागीरदारास जास्ती आग्रह करूं लागली. इकडे महाराजांचे हंसूं आवरेना. तेव्हां सुंदराबाईही मनांत चकित झाली, व तिनें महाराजांस विचारलें, 'महाराज, आपण आज फार कां हंसतां ? महाराजांनीं उत्तर दिलें, "उगीच हंसतों." दुसरे दिवशीं याच वेळेस सुंदराबाईस पोलिसांनीं फरफरां ओढून नेऊन तिचे तोंडास काळिमा आणिली. सर्वज्ञ स्वामीसमर्थांस वाटलें, आज ही बाळापाचे तोंडाकडे पाहण्यास सांगत आहे, पण उद्यां हिचे लाजिरवाणें तोंडाकडे सर्व अक्कलकोटचे लोकांस पाहण्याचा प्रसंग येईल.'

## "कायरे, असेंच काम करतोस काय ?"

नानासाहेब बर्वे कारभारी यांजकडे बाईस काढण्याविषयीं हुकूम आला होता. पण हुकूम अमलांत आणण्याची त्यांची छाती होईना. त्यांस असें वाटे, 'बाई महाराजांचे प्रीतींतील आहे. तीस काढल्यास महाराजांचा आपणावर कोप होईल. त्या दिवशीं संध्याकाळीं नानासाहेब दर्शनास आले असतां, त्यांचे मनांतील विकल्प जाणून महाराज त्यांस म्हणाले, "**कायरे, असेंच काम करितोस काय ?**" हें ऐकून नानासाहेबांचे मनांत खूण पटली, व बाईस काढण्यासंबंधानेंच हे उद्गार असावे असें त्यांस वाटलें. दुसरे दिवशीं कारभारी यांनीं फौजदारास हुकूम दिला, 'सुंदराबाईस महाराजांपासून दूर करावी; व तीन सेवेकरी महाराजांचे सेवेस ठेवावे.' ज्या वेळेस बाळापाची थट्टा केली होती, त्याच वेळेस दुसरे दिवशीं फौजदार तीन चार शिपाई घेऊन ओंडकराचे घरीं महाराजांची स्वारी होती, तेथें आले. बाळापाही त्यावेळेस दर्शनास आले होते. सुंदराबाईही महाराजांचे उशापाशीं बसली होती. फौजदार येऊन महाराजांचे दर्शन घेऊन बाईस म्हणाला, 'आजपावेतों मातोश्रीप्रमाणें तुम्हांला मानिलें. हल्लीं सरकारचा हुकूम मी बजावीत आहें, त्यास उपाय नाहीं. आपण महाराजांजवळ बसूं नये, चालतें व्हावें. लोकांबरोबर दर्शन घेत जावें. इतःपर महाराजांचे सान्निध राहण्याची तुम्हांस परवानगी नाहीं." बाई महाराजांजवळून जाईना, मोठ्यानें रडूं ओरडूं लागली, 'दगडावर डोकें आपटून प्राण देतें' म्हणाली. महाराजांकडे पाहून

विनंती करूं लागली, "महाराज, हे कसे करितात पहा. यांना कांहीं तरी सांगा." पण महाराजांचेच मनांत तशी गोष्ट कर्तव्य असल्यानें ते एक शब्दही बोलले नाहींत. तेव्हां फौजदारासही धीर आला. बाईचा दंगा पाहून तिला त्यानें जरब दिली, "तुम्ही डोकें आपटून प्राण द्याल, व असे फंद कराल तर एकदम उचलून पिंजऱ्यांत ठेवीन." शेवटीं निरुपाय होऊन आक्रोश करीत बाई निघून गेली. हरभरे, तेल, लुगडीं, छाटी, जोडे, वगैरे अनेक पदार्थ बाईनें सांठवून ठेविले होते. पेढे-बर्फी तर कुजून गेली होती. ज्या ज्या घरांत हा माल होता, तो जप्त करून त्या घरांस सरकारचीं कुलुपें लाविलीं. पुढें सर्व मालाचा लिलांव करून तो पैसा महाराजांचे कारणीं लाविला.

## पंचांची नेमणूक—बाळापास सेवा करण्यास नेलें.

नग सरकारांतून पंचांची नेमणूक होऊन, त्यांनीं महाराजांची व्यवस्था पहावी असें ठरलें. पंढरीनाथ खासगी कारभारी हे मारुतीचे देऊळांत येऊन बाळाप्पास सेवा करण्यास घेऊन गेले. तसेंच गणपतराव व जगन्नाथ सेवेकरी यांस महाराजांचे सन्निध, सेवेकरितां ठेविले. तुम्हांस पगार मिळेल असें पंचांकडून त्यांस सांगण्यांत आले. पण पगार घेण्याचे तिघांनींही नाकारिलें. केवळ सद्गुरुप्रीत्यर्थच तिघेजणही सेवा करूं लागले. दुसरे दिवशीं चोळापा हा पुरातन सेवेकरी समजून कारभाऱ्यांनीं त्यांस महाराजांचे सेवेकरितां ठेवून घेतलें. मात्र उत्पन्न पंचांकडे जाऊं लागलें. त्याजवर चोळापाचा हक्क नव्हता. ह्याप्रमाणें सुंदराबाई व राणीसाहेब यांचे कारकिर्दीचा सुमारें दोन वर्षांनीं शेवट झाला.

21323 दि. ... नों दि: ... 20/9/58

# भाग ६ वा.

## श्रीस्वामीभक्तिपरायण स्वामीसूत यांचें चरित्र.

**आपणासारिखे करिती तत्काळ ॥**
**नाहीं काळवेळ मग त्यांशीं ॥**

तुकाराम.

हरीभाऊ ऊर्फ स्वामीसुत हे श्रीस्वामीसमर्थांचे उत्तम भक्तांपैकीं एक भक्त होऊन गेले. ते जातीचे उत्तम मराठ्यांपैकीं असून मौजे इलिया, तालुके राजापूर, जिल्हा रत्नागिरी या गांवचे खोत होते. यांचें घराणें चांगलें नामांकित व कुलीन होतें. ह्यांचे वडिलांचें नांव भाऊ ऊर्फ दाजीसाहेब होतें. हरीभाऊ यांस आठ भाऊ, व चार बहिणी होत्या. आठनऊ वर्षांचें होईपावेतों ते आपल्या गांवींच राहिले; व गांवठी शाळेंत जाऊन थोडाबहुत अभ्यास केला. लहानपणीं यांचा स्वभाव फार रागीट होता. ते प्रथमपासूनच भाविक व सत्यप्रिय होते. अमुक गोष्ट खरी आहे अशी एकवेळ त्यांची खातरी झाली म्हणजे निर्भयपणानें व निर्भीडपणानें ते तिचा स्वीकार करीत. व जीव जाण्याचा प्रसंग आला तरी खऱ्यास सोडून ते चालत नसत. हा दृढ निश्चयाचा गुण लहानपणापासूनच त्यांचे स्वभावांत दिसून येत होता. असो, दहावे वर्षी हरिभाऊ हे मुंबईस विद्याभ्यास करण्यास आले; त्यांचे आप्त दाजीसाहेब सुभेदार यांचे घरीं ते कांहीं वर्षे राहिले; सुमारें १५|१६ वर्षे मुंबईस राहून तें इंग्रजी व मराठी शिकले; पुढें त्यांनीं मुंबईस म्युनिसिपालिटींत नोकरी पत्करली. वीस रुपये दरमहावर बिल रिसीव्हरचे कामीं त्यांची नेमणूक झाली. ते मोठे बुद्धिमान् व दीर्घोद्योगी असल्यामुळें, त्यांची लवकरच भरभराट होऊन ते मोठे हुद्यास चढले असते. पण ईश्वरी संकेत निराळाच होता. गोसावी बनून श्रीस्वामीसमर्थांचा झेंडा मुंबई शहरांत लावावा, ही कामगिरी विधात्यानें त्यांचे भाळीं लिहिली असल्यानें, चारपांच वर्षे

नोकरी करून पुढें तिजवर पाणी सोडून, हरिभाऊ महाराजांचे एकनिष्ठ सेवेकरी बनले. त्यांनीं आपली कामगिरी उत्तम रीतीनें बजाविली. मुंबईस त्यांनीं कांदेवाडींत श्रीस्वामी समर्थांचा मठ स्थापन केला. हजारों लोकांस समर्थांचे भक्तीस लावून समर्थांचा कीर्तिध्वज त्यांनीं उभारिला. या मठाची भरभराटी इतकी झाली होती कीं, पेढ्यांचे व नारळांचे मठांत ढीगचे ढीग नित्य पडत असत. त्या वेळची ही भरभराटी पाहिलेले शेंकडों स्वामीभक्त हरिभाऊचे दृढभक्तीची व सामर्थ्याची हल्लीं तारीफ करीत असतात. श्रीस्वामींचे कृपेनें त्यांची योग्यता इतकी वाढली होती कीं ते जातीचे मराठे असतांना, कांहीं ब्राह्मणही त्यांजपासून गुरुपदेश घेऊन त्यांचे शिष्य बनले होते. हरिभाऊंची भक्ति श्रीस्वामीचरणीं कशी जडली व त्यांस दीक्षा द्यावयास काय कारण झालें याबद्दल हकीकत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

रा० रा० लक्ष्मण विनायक पंडीत नांवाचे एक भिक्षुक गृहस्थ, हल्लीं मुंबईस रहात होते. सन १८६८ सालीं अबिसीनियाची लढाई चालली असतां सदर्हू, गृहस्थ बळवंतराव सखाराम व कंपनी नांवाचे, गवत पुरविण्याचे कंपनींत भागिदार होते; त्या व्यापारांत पंडीत यांस बराच तोटा येऊन, ते कर्जबाजारी झाले होते. आपली अब्रू कशी राहते या विवंचनेंत ते हमेश रहात. पंडीत यांचे यजमान गोविंदराव माधवजी, राहणार मुंबई, हे मोठें भाविक गृहस्थ होते. बरोबर एक कनोजा ब्राह्मण घेऊन ते तीर्थयात्रेस गेले होते. तीर्थें करीत करीत ते गाणगापुरास आले. तेथें उपोषणें करूं लागले. तेव्हां त्यांस दृष्टांत झाला कीं, "प्रत्यक्ष रूपानें आपण अक्कलकोटांस आहों तेथें जाऊन भेट. म्हणजे तुला दर्शन होऊन तुझी मनकामना पुरी होईल." दुसरें दिवशीं गोविंदराव निघून अक्कलकोटास गेले व चारपांच महिने सेवा करीत राहिले; यांचे बरोबर असलेला कनोजा ब्राह्मण स्वयंपाक करून महाराजांस नैवेद्य अर्पण करीत असे, व मग उभयतां भोजन करीत. एके दिवशीं ब्राह्मणानें महाराजांकडे नैवेद्य आणला असतां महाराज म्हणाले "**जाव गांवके बाहेर मशीद मे फकीर और कुत्ता है उसकु खिलाव.**" हें ऐकून ब्राह्मण विश्वासानें नैवेद्य घेऊन धांवत गेला. व मागें पुढें न पाहतां सोंवळ्यानेंच मशीदींत शिरला. तेथें एक फकीर बसला असून त्याजवळ एक कुत्रा होता; ब्राह्मणास पाहून फकीर म्हणाला, "तुमकू स्वामीने भेजा है. इदर लाव." असें म्हणून नैवेद्याचे ताट घेऊन फकीरानें व कुत्र्यानें नैवेद्य भक्षण केला. थोडा वडा व खीर ताटांत ठेवून तें ताट फकीरानें ब्राह्मणास परत दिलें. ब्राह्मण तो प्रसाद घेऊन महाराजांकडे परत आला. तो प्रसाद खाण्यास महाराजांनीं ब्राह्मणास व गोविंदरावास आज्ञा केली.

गुरुवाक्य प्रमाण समजून ब्राह्मणानें प्रसाद भक्षण केला. गोविंदरावाचे मनांत मुसलमानाजवळील अन्न कसें खावें अशी कल्पना येऊन त्यानें प्रसाद भक्षण केला. नाहीं. ब्राह्मणावर महाराज प्रसन्न होऊन "जाव मुंबईमे दस हजार रुपये तुमकू मिलेंगे." असा आशिर्वाद देऊन त्यास जाण्यास आज्ञा दिली. गोविंदरावावर महाराज रागावले. व तुझी भक्ति अद्याप कच्ची आहे आणखी सेवा कर असें सांगून आपल्या पादुका त्यास पूजेस देऊन जाण्यास आज्ञा दिली.

त्या पादुका गोविंद माधवजी यांचे घरीं कुलदैवत होऊन बसल्या आहेत; रिची स्टुअर्ट कंपनींत असलेले कॅशर बाळकृष्ण अर्जुनजी हे गिरगांवांत रहात असत ते त्या पादुकांचें पूजन अर्चन करून दत्तजयंतीचा उत्साह मोठ्या थाटानें करीत. असो. गोविंद माधवजी पादुका घेऊन मुंबईस परतले, त्यांचे बरोबरचा कनोजा ब्राह्मणही मुंबईस आला. महाराजांचे वचनाप्रमाणें दहा हजार रुपये कसे व केव्हां मिळतात ह्या गोष्टीकडे त्यांचे लक्ष लागलें. त्यास वाटे आपण गरीब आपल्या हातून कांहीं व्यापार वगैरे होऊन त्यांत दहा हजार रुपये नफा मिळेल हें संभवनीय नाहीं. बरें! आपण तसे विद्वान् ही नाहीं, कीं जेंगेंकरून आपणांस एवढी प्राप्ति होईल. महाराजांचे शब्दावर तर पूर्ण भरंवसा त्यास वाटला. महाराज कोणत्यातरी हिकमतीनें आपलें वचन सत्य करतील. दुसरे मार्ग तर त्यास दिसेनात, पण त्यास वाटलें कीं, या बड्या शहरांत बडे बडे शेट आहेत, ते नोटांचीं बंडलेंचीं बंडलें खिशांत घालून इकडून तिकडे धांवतात, न जाणो एखादे वेळेस आपणांस दहा-हजार रुपयांच्या नोटा रस्त्यांत सांपडून श्रीस्वामीसमर्थांचा आशिर्वाद फळास येईल. असें मनांत येऊन ब्राह्मणबोवा नित्य गल्लोगल्लीं फिरूं लागले. उकिरड्यावर व केराचे कुंडांत पडलेले कागद गोळा करीत इकडे पहा तिकडे पहा असें वेड्या-सारखे चाळे ब्राह्मण करूं लागला. दहापंधरा दिवस ब्राह्मण कागद गोळा करीत, भ्रमिष्टासारखा फिरला पण दहाहजार रुपयांच्या नोटा काय वाटेवर पडल्या आहेत? नित्य प्रातःकाळीं उठून ब्राह्मणानें हाच धंदा सुरू करावा; एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, मुंबईत एक श्रीमान भाट्या मरण पावला होता. तन्निमित्य त्याचे बायकोनें अनेक प्रकारचा दानधर्म केला. बाईचें मनांत गुप्त दान देण्याचें होतें. तिनें दहा हजारांच्या नोटा एका कागदांत गुंडाळून द्वारामध्यें ब्राह्मणाची वाट पहात बसली. आमचे वेडे झालेले ब्राह्मण कागद निवडण्यास निघाले. ते प्रथमदर्शनींच बाईचे वाड्यासमोर आले. बाईनें नोटांचें बंडल ब्राह्मणाचे हवालीं केलें. एका बाजूस जाऊन सोडून पहातो तों त्यांत दहा हजार रुपयांच्या नोटा

होत्या. महाराजांचे वचनाचा त्यास अनुभव येऊन त्यानें श्रीस्वामीनांवाचा जयघोष केला. पुनः बाईपाशीं जाऊन त्यानें विनंति केली, 'आपण पडलों गरीब, कोणी आपणावर चोरीचा आळ आणला तर काय करावें ?" बाईनें ब्राह्मणास निर्भयपणानें जाण्यास सांगितलें, व तसा प्रसंग आल्यास आपलें नांव सांगण्यास सांगितलें. ब्राह्मण अत्यानंदानें उत्तर हिंदुस्थानांत आपल्या गांवीं जाऊन विवाह करून श्रीस्वामीकृपेनें संसारसुखाचा अनुभव घेऊं लागला.

गोविंद माधवजींनीं मुंबईस आल्यावर कांहीं दिवसांनीं तीर्थयात्रेप्रीत्यर्थ मावंदें केलें. लक्ष्मण विनायक पंडित आपल्या वडिलांसह जेवण्यास गेले होते. गोविंद माधवजींनीं श्रीस्वामींच्या लीला वर्णन केल्या, व श्रीस्वामी साक्षात् दत्तावतार असल्याचें मंडळीस सांगितलें. लक्ष्मणराव पंडित कर्जाचे चिंतेत होते हें पूर्वी सांगितलेंच आहे. गोविंदजीचें वाक्य ऐकून पंडिताचें मन स्वामीचरणीं वेधलें. त्यांनीं नवस केला. 'महाराजांनीं जर आठ दिवसांत आपणास कर्जमुक्त केलें, तर आपण अक्कलकोटास जाऊन दर्शन घेऊन स्वामीचे भक्त होऊं.' गोविंदजीनें सांगितलें, 'तुमचा निश्चय आहे तर खचित कार्यसिद्धि होईल,' तथास्तु म्हणून पंडित निवांत राहिले; सात दिवस झाले पण कर्ज फिटण्याचीं चिन्हें कांहीं दिसेनात. पंडितांनीं आपल्या कमनशिबास दोष दिला. आपल्या खडतर नशिबास श्रीस्वामी तरी काय करितात, अशी मनाची समजूत करून ते स्वस्थ राहिले. हरीभाऊचा व पंडिताचा स्नेह होता, आठवा दिवस उगवला. सकाळचे प्रहरीं हरीभाऊ व गजानन श्रीधर खत्री असे दोघे पंडिताकडे आले. खत्री म्युनिसिपालिटींतच नोकर होते. या दोघांनीं लक्ष्मणराव पंडितास सांगितलें कीं, आपण दोघां मिळून एक व्यापार केला असून तो अंगावर आला आहे, त्यांत फार तोटा येणार असून दोघांचें दिवाळें निघणार, त्या संबंधानें आपण तुमचेकडे आलों आहों. ते म्हणाले, 'तसा प्रसंग आल्यास आपण नोकरीस आंचवूं' यांतून पार पडण्यास त्यांनीं पंडितास अशी विनंति केली, 'आपणाबरोबर दुकानांत येऊन आपल्या जागीं पंडितांनीं सही करून द्यावी व नफ्यातोट्याची हम्मी घ्यावी.' हरीभाऊनें व खत्री यानें पंडितास आणखी सांगितलें कीं, तुमचें पूर्वीचें कर्ज व हें कर्ज मिळून सर्व कर्जाबद्दल लढा देण्यास तुम्हांस मदत करूं. उभयतां पंडित याचे मित्र असल्यानें त्यांनीं गोष्ट मान्य केली. ज्या पेढीवर आफिणीचा सट्टा होता, त्या पेढीवर जाऊन त्या दोघांऐवजीं आपण मालक आहों अशा मतलबाची पंडित यांनीं सही केली, व हरिभाऊ आणि खत्री यांस मुक्त केलें. गिरधारी लाल या नांवानें पेढी चालत होती; तीन

दिवसांनीं पैसा भरून देऊं अशी पंडितांनी भुलथाप देऊन स्वारी घरीं आली व लहा घेण्याबद्दल तजवीज चालविली. सायंकाळीं चार वाजतां ईश्वऱ्या मारवाडी पंडिताकडे येऊन घरीं आहेत काय म्हणून तपास करूं लागला; पंडितास वाटलें मारवाडी पैशाचे तगाद्यास आला; ते तोंड चुकवाचुकवी करूं लागले; दोन तीन खेपा मारवाड्यानें घातल्या पण लक्ष्मणराव भेटेनात; तेव्हां मारवाडी म्युनिसिपाल ऑफिसांत जाऊन हरीभाऊ व गजानन खत्री यांस भेटला. 'आफूचे व्यापारास दोन हजार रुपये नफा आला आहे हें सांगण्यास आपण नवीन शेअरर लक्ष्मणराव यांजकडे गेलों असून, त्यांची भेट होत नाहीं,' म्हणून कळविलें. तेव्हां उभयतां व मारवाडी मिळून पंडित यांचे घरीं गेले; मारवाड्यानें सांगितलें, 'माल पूर्वीं विकला नव्हता. हल्लीं तार आल्यावरून माल विकला, त्यांत दिढी नफा मिळाला आहे, दोन हजार रुपयांची रकम पेढीवर जाऊन घेऊन यावी' म्हणून मारवाडी म्हणाला. अत्यानंदानें पंडित, हरीभाऊ व खत्री पेढीवर गेले. पंडितांनीं सही करून दिली. कमिशन, बट्टा वगैरे जाऊन १९०० रुपये पंडित यांस मिळाले. ते घेऊन सर्वजण घरीं आले; पंडितानें श्रीस्वामीसमर्थांस नवस केल्याची गोष्ट व त्याची प्रचिती आल्याची गोष्ट उभयतांस सांगितली व म्हणाले, अक्कलकोटास जाऊन आल्यावांचून रुपयांस हात लावावयाचा नाहीं. हरीभाऊ व गजानन यांस मोठें आश्चर्य वाटलें, व त्यांनीं निश्चय केला कीं, अशा अवतारी सद्‌गुरूचें **आपणही दर्शन** घेऊन पुनीत होऊं. नफ्यापैकीं तीनशें रुपये बरोबर घेतले, व उभयतांनीं पंधरा दिवसांची रजा घेऊन त्रिवर्ग अक्कलकोटास जाण्यास निघाले.

दाजीबा भोंसले त्या वेळेस सरकार इच्छेवरून मुंबईस राहत होते, त्यांची शिफारस चिठ्ठी घेऊन त्रिवर्ग अक्कलकोटास गेले; तेथें गणपतराव जोशी यांचे वाड्यांत उतरले. दर्शनाकरितां महाराजांचा तपास करितां चोळाप्पाचे घरीं असल्याचें कळलें; तेथें जाऊन त्रिवर्गांनीं श्रीदत्ताची आनंदमूर्ति झोंपाळ्यावर लीला करीत बसलेली पाहिली. तिघांनीं दर्शन घेतांच महाराज म्हणाले, "**व्यापार केला तोटा आला, मला नवस केल्यावरून दोन हजार रुपये नफा झाला. अबी जाव साले तेरी माकी × ×**" हे शब्द ऐकतांच तिघांचींही मनें विरघळून जाऊन, नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले; नंतर आज्ञा घेऊन तिघेही बिऱ्हाडीं गेले. माघ मासांतील ही गोष्ट आहे, रात्रीं असा प्रकार झाला कीं, एक चोर येऊन त्यानें तिघांचेही आंगरखा, पागोटें व सर्व कपडे चोरून नेले. सकाळीं कपड्यांचा पुष्कळ तपास केला, पोलीसकडे वर्दी दिली,

पण कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रातःकाळीं श्रीस्वामीसमर्थांचे दर्शनास त्रिवर्ग गेले. तेव्हां त्यांनीं आपल्या चोरीची फिर्याद महाराजांजवळ केली, महाराज म्हणाले, "**सुंठीवांचून खोकला गेला.**" मग तिघांपैकीं गजानन यास बाजारांत जाऊन डोकीस धोतर बांधण्याची आज्ञा केली, लक्ष्मण विनायक यास डोकीस रुमाल बांधण्यास सांगितलें, व हरीभाऊस हातांत धरून पुढें ओढून आपल्याजवळ घेतला व म्हणाले, "**आपल्या कुळावर पाणी सोड, आणि माझा सूत हो.**" नफ्यापैकीं तीनशें रुपये घेऊन तिघे अक्कलकोटास आले होते. त्या पैशांचे सफेत सफेत घेऊन ये म्हणून हरीभाऊस महाराजांनीं आज्ञा केली. सफेत म्हणजे काय हरिभाऊनें प्रश्न केला असतां महाराजांनीं आपल्या पायास हात लावून दाखविला. त्यावरून पादुका करून आणण्याविषयीं आज्ञा होत आहे असें हरीभाऊ समजले. त्या दिवशीं एकादशी होती. मुंबईहून महाराजां-करितां तिघांनीं आपल्याबरोबर उत्तम प्रकारचीं केळीं आणिलीं होतीं, तीं लक्ष्मण विनायक यांचे मनांत आलें कीं, एक केळें सोलून महाराजांस खावयास घालावें. त्या प्रमाणें एक केळें घेऊन तें सोलून त्यांनीं महाराजांचे तोंडाजवळ नेलें, तें न खातां मोठे क्रोधायमान होऊन महाराज म्हणाले, "**तेरेकू खाशी है, उसवास्ते तुम ए आडके पिछे जाके खाना.**" हे शब्द ऐकून सर्व मंडळींनीं लक्ष्मण विनायक यास सांगितलें, 'तुम्हांवर प्रसाद झाला,' महाराजांचे आज्ञेप्रमाणें आडाच्या पलिकडे जाऊन त्यांनीं केळें खाल्लें. मग दर्शन घेऊन तिघेही बिऱ्हाडीं गेले. दुसरे दिवशीं द्वादशी होती म्हणून देवब्राह्मण करण्याचा त्यांनीं विचार केला. गणपतराव जोशी यांजकडेसच स्वयंपाक करण्याचा बेत ठरला. हरीभाऊनें गणपतरावास सांगितलें, 'महाराजांचे आवडीचे जें पदार्थ असतील ते नैवेद्यास तयार करावे.' बेसन लाडू, खीर, भजीं आदिकरून पदार्थ तयार केले. दत्तोपंताचे हातीं नैवेद्य देऊन श्रीस्वामीसमर्थांची स्वारी राजवाड्यांत होती, तेथें त्रिवर्ग गेले. राजवाड्यांत इतर लोकांस जाण्याची परवानगी नसे. पण यांनीं भोंसले यांचें शिफारसपत्र आणलें असल्यानें त्यांस अडथळा झाला नाहीं. महाराजांस नैवेद्य समर्पण केल्यावर महाराजांनीं भाताची मूद उचलून हरीभाऊस दिली, गजाननास लाडू उचलून दिला, व लक्ष्मण विनायक यास कांद्यांचीं भजीं उचलून दिलीं. लक्ष्मण यांनीं बहुत वर्षांपासून कांदे खाण्याचें सोडिलें होतें. सबब महाराजांनीं प्रसाद दिलेलीं भजीं खाण्यास ते कांकूं करूं लागले. कांदे कसे खावे असें आपसांत हळूच बोलत असतां महाराजांना त्याचा संशय जाणून त्यास

बोलावून, तेथें असलेल्या तसबिरांपैकीं एक पाहण्यास सांगितली. व त्यांत कोण आहे म्हणून प्रश्न केला. तसबीर पाहून त्यांनीं उत्तर दिलें, 'यांत मारुती आहे,' दुसऱ्या तसबिरीकडे बोट दाखवून यांत कोण आहे म्हणून महाराजांनीं विचारिलें, तसबीर पाहून 'त्यांत राम आहे,' म्हणून लक्ष्मण पंडित यांनीं उत्तर दिलें. पुनः तिसरे तसबिरीकडे बोट दाखवून 'त्यांत कोण आहे?' म्हणून प्रश्न केला असतां 'शंकर आहे,' म्हणून पंडितांनीं जबाब दिला. तेव्हां महाराज म्हणाले, **'हेच तुम्ही तिघेजण आहांत.'** मारुती ब्रह्मचारी आहे म्हणून स्वामीसुत मारुती होईल; शंकर शुभ करणारा आहे, म्हणून गजानन शंकर होईल, पंडित यास महाराज म्हणाले, 'तूं राम होशील. मी या प्रमाणें तुमच्या तिघांच्या गांठीं घातल्या आहेत.' असें म्हणून महाराजांनीं तेथेंच तिघांना तीन श्लोक दिले. प्रथम हरीभाऊस खालीं लिहिलेला श्लोक दिला.

## श्लोक

**॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥**
**॥ गुरुरेव परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

गजाननास खालीं लिहिलेला श्लोक दिला.

**आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ॥**
**सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥**

लक्ष्मण पंडित यास श्लोक दिला तो,

**इदमेव शिवं ॥ इदमेव शिवं ॥**
**इदमेव शिवं ॥ इदमेव शिवः ॥**

हे श्लोक म्हणून दाखविल्यावर त्यांचा अर्थ सांगण्यास महाराजांनीं पंडितास आज्ञा केली. पंडित यांनीं यथाशक्ति अर्थ सांगितल्यावर महाराज त्यास म्हणाले, "कांद्यांत काय आहे? तूं भक्षण कर. मंगल आहे." पुढें तिघेही प्रसाद भक्षण करून बिऱ्हाडीं गेले. दोन तीनं दिवसांनीं लक्ष्मण पंडित यांस मुंबईस जाण्यास आज्ञा मिळाली. पुढें चार दिवसांनीं हरीभाऊ व गजानन यास जाण्याची आज्ञा दिली. मुंबईस गेल्यावर त्रिवर्गांनीं सोळाशें रुपये नफ्याचे वांटून घेतले. पंडित हे आपलें कर्ज फेडून काळजींतून मुक्त झाले. हरीभाऊ यांनीं प्रत्यक्ष चालती बोलती परब्रह्म मूर्ति अवलोकन केल्यापासून त्यांचें चित्त संसारांत लागेना. चाकरी नकोशी त्यांस वाटूं लागली. समर्थांचे चरणापाशीं केव्हां जाईन व त्यांचा अनुग्रह आपणास

केव्हां होईल हाच ध्यास त्यांस लागला. तीनशें रुपये अक्कलकोटास नेले होते, त्यांपैकीं दोनशें रुपये शिलक राहिले होते. त्याच्या चांदीच्या पादुका बनवून, त्यावर वेलबुट्टी वगैरे काढून, पंधरा दिवसांचे आंतच हरीभाऊ आपल्या दोन मित्रांसह श्रीस्वामी माऊलींचे दर्शनास अक्कलकोटास पुनः गेले.

## हरीभाऊस पादुका दान, अनुग्रह, वरदहस्त व त्यांचें वैराग्य.

अक्कलकोटास गेल्यावर चांदीच्या मढवून आणिलेल्या पादुका श्रीसमर्थांपुढें हरीभाऊनें ठेविल्या. त्या महाराजांनीं तेव्हांच आपल्या पायांत घालून त्याजवर बसले. सतत चौदा दिवस पर्यंत महाराजांनीं पादुका आपल्या जवळ ठेविल्या. व नित्य पायांत घालून त्याजवर मोठ्या प्रेमाणें बसत असत. ह्या चांदीच्या पादुका आपणास प्राप्त व्हाव्या म्हणून सेवेकरी लोकांनीं बहुत खटपट करून पाहिली. परंतु त्या महाराजांनीं कोणास दिल्या नाहींत. ते म्हणत, ‘ **हें माझें आत्मलिंग आहे.** मी त्या कोणास देणार नाहीं. ’ पुढें चौदावे दिवशीं हरीभाऊ दर्शनास गेले असतां, त्यास आपणाजवळ ओढून घेऊन म्हणाले, “ **तूं माझा सुत आहेस, तूं आपला सर्व धंदा रोजगार सोडून, बंदर किनाऱ्यावर जाऊन, मोठा किल्ला बांधून, ध्वजा उभी कर.**” मग पादुका महाराजांनीं आपल्या हातास पायास, तोंडास वगैरे सर्व अवयवांस लावून हरीभाऊस हात जोडून उभें राहण्यास सांगितलें, व त्यांजकडून तीन वेळ उठाबशा काढविल्या, आणि सांगितलें, “ हें माझें आत्मलिंग त्या किल्ल्यांत मांडण्याकरितां तुला दिलें आहे, तूं माझा आजपासून सुत झालास.” पुनः हरिभाऊस आपल्या पोटावरून हात फिरविण्यास महाराजांनीं सांगितलें, व पादुका मस्तकावर धारण करण्यास सांगितलें. मग काय विचारावें ! हरीभाऊचा आनंद त्रिभुवनांत मावेना. तो आनंदानें नाचूं उडूं लागला. व श्रीस्वामीनामाचा जयघोष करूं लागला. पुढें पंडीत, गजानन व हरीभाऊ असे त्रिवर्ग आपल्या बिऱ्हाडीं गेले. त्याच रात्रीं महाराजांचा हरीभाऊस कांहीं अनुग्रह झाल्याचें पंडिताचे सांगण्यावरून कळतें; त्या रात्रीं श्रीस्वामीसमर्थ गांवाबाहेर पिंपळाचें झाड आहे, तेथें वस्तीस होते. हरीभाऊ वगैरे मंडळी तेथें जाऊन महाराजांसन्निध राहिली. सुमारें अर्धरात्र गेल्यावर सर्व मंडळी निद्रिस्त असतां महाराज एकाएकीच उठून बसले. व हातांत काठी घेऊन झाडाकडे म्हणाले, “**तूं साले ह्यांसे निकल जा, नीचे हमारे बाल गोविंद सोये है.**” याप्रमाणें तीन वेळ म्हणाले, व काठी उगारली. त्या सरसें झाड एकदम खळ्खळ् असें हललें व

त्यांतून मशालीचे उजेडाप्रमाणें प्रज्वलित गोळा निघून गेल्यासारखा दिसला. हरिभाऊ व पंडित या मंडळीनें गुप्चुप् निजल्या ठिकाणाहून हें पाहिलें. कांहींवेळ गेल्यावर हरीभाऊ हळूच उठून श्रीस्वामीसन्निध जाऊन पाय रगडण्यास लागले. त्यावेळेस महाराजांच्या व हरीभाऊच्या गुह्य गोष्टी बराच वेळ चालल्या होत्या. शेवटीं आपली छाटी, कफनी वगैरे कपडे उशाखालीं होते ते हरीभाऊच्या आंगावर फेंकून दिले, आणि त्यास सांगितलें, "आपला संसार सर्व लुटवून टाक." दुसरे दिवशीं प्रातःकाळीं आत्मलिंग पादुका घेऊन, व महाराजांनीं दिलेले कपडे परिधान करून हरीभाऊ मंडळीसह मुंबईस परत आले. त्यावेळेस ते कामाठीपुऱ्यांत रहात. मुंबईस आल्यावर गुरूआज्ञा शिरसावंद्य करून प्रथम त्यांनीं आपला संसार लुटविण्याचें काम केलें. धन्य त्या गुरूशिष्यांची! सद्गुरूनें मस्तकावर हात ठेविल्याबरोबर काम, क्रोध, लोभ आदिकरून षड्रिपू क्षीण होऊन कडकडीत वैराग्य प्राप्त झालें. ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. हरीभाऊ घरचे चांगले असल्यानें त्यांस जरी थोडा पगार होता तरी त्यांनीं मुंबईस संसार उत्तम प्रकारें थाटला होता. श्रीमंतांप्रमाणें डागडागिने त्यांच्याजवळ होते; म्हशी गाई वगैरे गुरेंही त्यांनीं बाळगिलीं होतीं; ब्राह्मणास बोलावून संकल्प करून त्यांनीं आपल्यासमक्ष सर्व चीजवस्त लुटविली. धन्य हरीभाऊचे वैराग्याची! उगीच साधुपणाचे सोंग आणितां येत नाहीं. हरीभाऊचे कुटुंबाचें नांव ताराबाई. तिचे आंगावर सोन्याचे तोडे वजन भार ६०, सोन्याच्या बांगड्या वजन तोळे २४, अठरा पुतळ्यांचें गांठलें, ठुशी, नथ, बुगड्या पायांतील तोडे वगैरे मोठे मोठे डागिने होते. ते सर्व हरीभाऊने लुटाविले. एकाकडेसच सोनें सर्व जाईल, सबब हरीभाऊचे मित्रांनीं डागिने विकून त्याचे रुपये करून ब्राह्मणांस वांटून दिले. ताराबाईनें रडरडून डोळे सुजविले. आपणास थोडें तरी रहावें म्हणून फारच विनवणी केली. पण हरीभाऊस सुवर्ण लोहासम वाटूं लागलें होतें. ताराबाईचे आंगावरील मणी, मंगळसूत्रही त्यांनीं राहूं दिलें नाहीं. सर्व लुटविलें. आपण भगवीं वस्त्रें नेसून व ताराबाईस एक पांढरे पातळ नेसण्यास देऊन, हरीभाऊ निवळ बैरागी बनले. टाळ, वीणा घेऊन, श्रीस्वामी समर्थांचें भजन प्रेमळ अंतःकरणानें ते करूं लागले.

## भजन करितांना तंद्रि–स्फुरण व महाराजांवर अभंग.

स्वामीसुत भजनास उभे राहिले म्हणजे, त्यांस देहभान नाहींसे होत असे; केवळ श्रीस्वामीसमर्थांकडे त्याचें तनमन लागत असे; भजन करितां करितां स्फुरण

होऊन महाराजांवर अभंग, पदें वगैरे प्रेमळ कविता ते करीत असत. त्यांचे कुटुंब ताराबाई यांस सर्व लुटवून, बैरागीण केल्याचें मागें सांगितलेंच आहे. तिला ही नवीन स्थिति फार दुःसह होत असे. गळयांतील मंगळसूत्र देखील ठेवलें नसल्यानें ती वारंवार दुःख करीत असे. व स्वामीसुतावर रागावून त्यांस फार ताप देत असे. रात्रंदिवस तंटा करीत असे. स्वामीसुत त्याबद्दल कांहींएक खेद न मानितां तुकाराम बोवाप्रमाणें जों जों बायको जास्त शिव्या देई, तों तों जास्ती हंसत असत. ताराबाईस उद्देशून कांहीं उपदेशपर अभंग केलेले खालीं दिलेले आहेत.

## अभंग

**तारके आतां हेंचि करि ॥ हातीं घ्यावी ही तंबुरी ॥**
**स्वामीरायाचें गायन ॥ करी चरणीं ठेउनि मन ॥**
**धन्य तूंचि होसि जगीं ॥ भज भज माझा योगी ॥**
**स्वामीरायाच्या नौबदी ॥ तूंच पाहशील आधीं ॥**
**त्या सांगतील गांवोंगांव ॥ माझ्या बापाचें तें नांव ॥**
**स्वामीसुत म्हणे तारके ॥ स्वामीनाम घ्यावें सुखें ॥**

## स्वामी पादुकांची कामाठीपुऱ्यांत व नंतर कांदेवाडींत स्थापना.

प्रथम स्वामीसुताचा मठ कामाठीपुऱ्यांत होता. स्वामीसुताच्या पूर्ण भक्तीमुळें या मठाची उत्तरोत्तर फारच भरभराटी होऊं लागली. पारशी, प्रभु, सोनार, पांचकळशी, वाणी वगैरे सर्व लोक येऊन समर्थांची भक्ति करूं लागले; कांहीं दिवस पादुका कामाठीपुऱ्यांत होत्या. नंतर महाराजांचे सेवेस येणाऱ्यांपैकीं चिमाबाई बेलवाडी नांवाच्या सेवेकरणीनें, त्या कांदेवाडींत आपल्या चाळींत स्थापन करविल्या; तेथें हजारों लोक नित्य दर्शनास येत असत. अक्कलकोटास श्रीस्वामी समर्थांचे दर्शनास भक्तजन गेले असतां, दर्या किनाऱ्यावर जाण्याविषयीं आज्ञा होत असे. मुंबईचे मठांत ती मंडळी आली म्हणजे स्वामीसुत अक्कलकोटास घडलेल्या गोष्टीविषयीं खुणा देत असत. याप्रमाणें हरीभाऊ (स्वामीसुत) यांची योग्यता फारच वाढली; कांहीं ब्राह्मण लोकांस हें सर्व थोतांड आहे असें वाटून मठांत येऊन ते छळ करीत. स्वामीसुत हास्यमुखानें अभंगद्वारें त्यांस स्वामीनामाचा उपदेश करीत असत.

## अभंग.

**भट अहंकारें बुडाले ॥ डोळे झांकूनि बैसले ॥**
**जगीं मिरवती मोठेपण ॥ मुखिं नाहीं स्वामी नाम ॥**
**ब्रह्म अवतरलें जगीं ॥ स्वामीराज हेचि योगी ।**
**स्वामीसुत म्हणे भटा ॥ सोडा तुम्ही आपला ताठा ॥ १ ॥**

याप्रमाणें उत्तर देऊन त्यांचें मन समर्थांकडे वळवीत असत. बाबा शेणवाई, गोविंदपंत केतकर, बाबसी काका, हरीचंद गजानन वगैरे बहुत लोकांस समर्थांची दीक्षा देऊन भक्तीस लाविलें. नाना सोनी म्हणून कोंकणस्थ ब्राह्मण मुंबईस म्युनिसिपल कोर्टांत दीडशें रुपयांवर नोकर होते. ते मठांत छलक बुद्धीनें येत असतां कांहीं दिवसांनीं त्यांस पश्चात्ताप होऊन, ते अक्कलकोटास गेले. तेथें समर्थांचें दर्शन केल्यावर त्यांचा सर्व संशय दूर होऊन, ते स्वामीभक्त बनले. मुंबईस आल्यावर नोकरीचा राजीनामा देऊन, लंगोट लावून पत्नीसुद्धां झोळी घेऊन निःशंकपणें मुंबईत वास करून, स्वामीसेवेंत निपुण झाले. पुढें कांहीं दिवसांनीं स्वामीसुतांनीं समर्थांच्या पादुका त्यास प्रसाद दिल्या. रत्नागिरीजवळ नाखरे गांवीं त्यांनीं मठ स्थापन केला आहे; कांहीं दिवस सेवा केल्यावर नाना सोनी कैलासवासी झाले. हल्लीं त्यांची पत्नी व पुत्र मठ चालवित आहेत.

## नरसोजी पारशी यांस दृष्टिदान.

नरसोजी पारशी हे मुंबईस चौपाटीवर राहत असत. हे डोळ्यानें अधु होते. मुंबईचे मठांत ते दररोज आर्तीस येत असत. त्यांची भक्ति पाहून स्वामीसुतांनीं त्यांस दृष्टिदान दिलें, व त्यांची भक्ति वाढविली. याप्रमाणें शेंकडों पारशी लोक मठांत येऊन भक्ति करीत असत. व समर्थांचे कृपेनें त्यांचे इच्छित मनोरथ पूर्ण होत असत.

स्वामीसुत बैरागी बनले तेव्हां ते अगदीं तरूण म्हणजे पंचवीस वर्षांचे वयाचे होते; असा होतकरू राजबिंडा बैरागी होऊन आपलें आयुष्य व्यर्थ घालवीत आहे, असें वाटून त्यांचे आप्तजन त्यांचा द्वेष करूं लागले. दाजी सुभेदार यांची हरी-भाऊंवर फार प्रीति असे. पण हरीभाऊंनीं हा वेष घेतल्यापासून ते त्यांचे शत्रू बनले. हरीभाऊंनीं समर्थ चरणीं लक्ष ठेवून आप्तांची अगर प्रत्यक्ष मातापितरांची परवा राखिली नाहीं. हरीभाऊंचे मातोश्रीस काकूबाई या नांवानें हांक मारीत

असत. श्रीस्वामीमहाराज काकुबाईस अनुसूया या नांवानें हाक मारीत असत, व मातेप्रमाणें तिजवर प्रेम ठेवीत. हरीभाऊ बैरागी बनले तेव्हां काकुबाई कोंकणांत होत्या; हरीभाऊंनीं संसारावर पाणी सोडल्याचें ऐकून त्या रडतच मुंबईस आल्या. " आतां तरी शुद्धीवर येऊन संसाराचे मार्गास लाग. हे भिकेचे डोहळे चांगले नाहींत, वगैरे पुष्कळ तऱ्हेनें त्यांनीं त्यांस उपदेश केला." पण तो सर्व व्यर्थ गेला. ॥ **ब्रह्मानंदीं लागली टाळी ॥ कोण देहातें सांभाळी** ॥ याप्रमाणें हरीभाऊंची स्थिति झाली होती. काकुबाईस–वाटलें ' यास कोणी चेटूक करून वेड लाविलें आहे.' त्यावेळेस श्रीमंत यशवंतराव महादेव हे सटाण्यास देवमामलेदार नांवानें प्रसिद्ध साधू होते. त्यांजकडे काकुबाईनें जाऊन शुद्धीवर येईल अशी कृपा करावी म्हणून बाईनें प्रार्थना केली; मामलेदारानें सांगितलें, ' हरीभाऊंस जबर भूत लागलें आहे. तें आपल्या देवाऱ्यानेंहि सोडविलें जाणार नाहीं. " हें वचन ऐकून काकुबाई निराश होऊन परत मुंबईस आल्या.

कांदेवाडींतील मठ स्थापन झाल्यावर, स्वामीसुतानें श्रीस्वामीसमर्थांचा कीर्तिध्वज उत्तम रीतीनें उभारिला. पारशी, यवन, हिंदु वगैरे सर्व जातींतलि हजारों लोक समर्थांचे भक्तीस लागले; श्रीआत्मलिंगाची सेवा केल्यानें अनेक कामिक भक्तांचे मनोरथ पूर्ण होऊं लागले; स्वामीसुताचे उपदेशानें बहुत लोक अक्कलकोटास जाऊं लागले; श्रीस्वामीजयंतीचा उत्साह प्रथम शके १७९२ सालीं स्वामीसुतानें मुंबईस केला. त्याबद्दल स्वामीसुतानें अभंग केला तो—

## अभंग.

**श्रीस्वामीसमर्थ आनंद उत्साहो ॥ करिताती पाहो मुंबापुरीं ॥१॥ शालीवाहन शके सत्राशें ब्याण्णव ॥ उत्साहाचा वैभव तये दिनीं ॥ २ ॥ फाल्गुन वद्य त्रयोदशीं रविवारीं ॥ उत्साह निर्धारीं आरंभिला ॥ ३ ॥ ऐसा हा आरंभ मुंबापुरीं झाला ॥ तोचि कळूं आला सर्वांलागीं ॥ ४ ॥**

उत्तर हिंदुस्थानांत छेलीखेडीं ग्रामीं आपला भक्त विजयसिंग, हा गोट्या खेळत असतां, श्रीस्वामीसमर्थांचा अवतार झाला असें स्वामीसुतानें प्रतिपादन केलें आहे. त्यास पुष्टीकरणार्थ दुसरा कांहीं आधार नाहीं. पण स्वामीसुत अक्कलकोटास जाऊन श्रीचे जयंतीचा उत्सव करून घेत असत. श्रीसमर्थांचे अवतारासंबंधानें स्वामीसुतांनीं कांहीं केलेलें अभंग आम्हीं पहिल्या भागांत दिले आहेत.

स्वामीसुतानें अक्कलकोटहून येतांना आत्मलिंगाची पूजा करण्यास समर्थांचे सेवेकऱ्यांपैकीं दोन ब्राह्मण सेवेकरी, महाराजांची आज्ञा घेऊन मुंबईस आणिले होते. आज्ञा देतांना दोघांपैकीं एक पुढले वर्षी पळून जाईल, असें महाराज म्हणाले. त्याचा अनुभव असा आला कीं, एका वर्षांतच त्यास देवाज्ञा झाली. दुसरा सेवेकरी ब्रह्मचारी बोवा या नांवाचे सेवा करीत होते, ते जरा रागीट स्वभावाचे असल्यानें हल्लींचे बोवांचें व त्यांचें न जमून कांहीं वर्षांनीं ते मठ सोडून गेले.

समर्थांची भक्ति सर्वांनीं करावी म्हणून मुंबईतील लोकांस उपदेशाचे प्रेमळ भक्तिपर अभंग स्वामीसुत हमेश म्हणत असत. त्यांपैकीं मासल्याकरितां कांहीं खालीं दिले आहेतः—

## अभंग.

**सकळांसि माझें सांगणें हें आतां ॥ स्वामीचरणीं माथा ठेवा भावें ॥ १ ॥ ठेवूनि या हेत तया एकनिष्ठ ॥ मुक्ति ही वरिष्ठ साधा वेगीं ॥२॥ अमोल्य नरदेह जाईल वा वायां ॥ आलीया उपाया चुकूं नका ॥ ३ ॥ यवनाची जात म्हणो जरी जावें ॥ तिकडील ठावें नसे कांहीं ॥ ४ ॥ येथील हा नाहीं नाहीं धागादोरा ॥ म्हणोनियां बरा पंथ असे ॥ ५ ॥ जें जें येथें होत सुखें तें ऐकावें ॥ अनुभवें घ्यावें पदरांत ॥६॥ स्वामीचें वचन सांगतों तुम्हांसी ॥ आपुल्या हितासी ऐका भावें ॥ ७ ॥ स्वामी सुत हाचि पामर हो खरा ॥ परि सूत्रदोरा करीं त्याच्या ॥८॥ मागें पुढें पहाल जरी तुम्ही आतां ॥ गेला वेळ परता नये मागें ॥ ९ ॥ म्हणोनि विचार करा सर्व जन ॥ स्वामीचरणीं लीन होऊनीयां ॥ १० ॥ आठवण देतों तुम्हां पुनः पुनः ॥ माझा स्वामी राणा भुलूं नका ॥ ११ ॥ स्वामीसुत म्हणे मागें काय पहातां ॥ भजा या समर्था एकचित्तें ॥ १२ ॥ स्वामीराया स्मरा तुम्ही निरंतर ॥ बरवा विचार हाचि असे ॥ १३ ॥ भक्तिभावें गातां सुलभ उपाव ॥ चरणाचा ठाव मिळे जेणें ॥ १४ ॥ पुढें आहे मौज मौज तेच मौज ॥ भजा स्वामी हेंच सांगतसे ॥ १५ ॥ सांगणें हें माझें समर्थां सोडून ॥**

करूं नका शीण कदाकाळीं ॥ १६ ॥ स्वामीसुत म्हणे विचार कराया ॥ ब्रह्मपर राया स्मराच या ॥ १७ ॥ किती गोड प्रेम किती गोड धाम ॥ किती गोड नाम समर्थांचें ॥ १८ ॥ किती गोड लीला किती गोड कळा ॥ तुम्ही घ्या सोहळा स्वामीनामीं ॥ १९ ॥ एक चित्तिं ठेवा एक चित्तिं ठेवा । स्वामीराज ध्यावा अनुदीना ॥ २० ॥ स्वामीसुत म्हणे मुंबापुरी जन । स्वामी हा निधान चित्तीं ठेवा ॥ २१ ॥

एक वेळ त्यांची पत्नी ताराबाई ही रागावून बसली असतां तीस उपदेशपर केलेले अभंग खालीं दिले आहेत :—

स्वामीविण हेंच सर्व असे खोटें ॥ स्मरलीया वाटे भय नाहीं ॥ १ ॥ तारके तुज आतां सांगतसें हीत ॥ स्वामीचे त्वरित पाय धरीं ॥ २ ॥ कोणाचा नवरा कोणाची बाईल ॥ अवघे तें स्थूळ नातें खोटें ॥ ३ ॥ कोणाचे हो भाऊ कोणाच्या बहिणी । अवघी ती करणी मायीकची ॥ ४ ॥ कोणाचे सोयरे कोणाचे धायरे ॥ अवघे ते पसारे व्यर्थ सर्व ॥ ५ ॥ कोणाचा चुलता कोणाचा हो काका । आणिकही आका लटक्याची ॥ ६ ॥ मामाहि कोणाचा नये हो कामाचा । शेवटिं यमाचा जाच मोठा ॥ ७ ॥ ऐशा मायाजाळीं गुंतूनि फससी । सर्वस्वीं मुकसी आपुल्या हीता ॥ ८ ॥ सोडुनियां माया स्वामीचे चरण । करिं तूं वंदन सर्वकाळ ॥ ९ ॥ माझा बाप स्वामी येई जंव कामीं । सासरा निजधामीं नेईल तो ॥ १० ॥ आमुची ही आस सोडुनियां द्यावी । धरूं नको जीवीं सुखदुःख ॥ ११ ॥ स्वामीसुत म्हणे धन्य तूंचि होसि । जयाचिये वंशीं येऊनियां ॥ १२ ॥ निरोप हा माझा सांगा तारकेसि । स्वामीचे चरणासि भुलूं नको ॥ १३ ॥ मागें माझी आस कांहीं नसे आतां । स्वामीचरणीं माथा ठेविला असे ॥ १४ ॥ तुझा हा सासरा स्वामी माझा बाप । तया नामीं जप करीं सदा ॥ १५ ॥ धन्य तूं होशील समर्थप्रसादें । नाम तें स्वच्छंदें गात जावें ॥ १६ ॥ स्वामीसुत सांगे अंतरिंची खूण । स्वामीचे चरण भुलूं नको ॥ १७ ॥

# नगरचे नाना रेखे.

स्वामीसुताचे पुष्कळ शिष्य झाले होते. त्यांपैकीं कांहीं ब्राह्मणहि होते असें मागें सांगितलेंच आहे. नगरचे नाना रेखे जोशी हे त्यांचेच शिष्य होत. स्वामीसुतानें खुद्द नगरास जाऊन श्रीसमर्थांचा मठ स्थापन केला. स्वामीसुतानें चर्चन, विजापूर, नगर, पुणें, ठाणें, वसई, रत्नागिरी, नारखे व चिपळूण येथें समर्थांचे मठ स्थापन करून लोक भक्तीस लाविले आहेत. वे. नाना जोशी यांच्याकडून स्वामीसुताबद्दल मिळालेली माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे.

शके १७९१ सालचे कार्तिकमासांत नाना हे कांहीं खाजगी कामाकरितां मुंबईस गेले होते. त्या वेळेस श्रीसमर्थांचा एक शिष्य कामाठीपुऱ्यांत सातव्या गल्लींत राहत आहे, असें त्यास कळलें. नाना हे स्वभावतः जिज्ञासु असल्यानें सदहू शिष्याचे भेटीस गेले. तेथें जातांच स्वामीसुत म्हणाले, 'नगरकर नाना जोशी ते आपणच काय?' हे शब्द ऐकून नानांस फार आश्चर्य वाटलें. कारण नानाची व स्वामीसुताची पूर्वींची ओळख नसून एकमेकांस कधीं पाहिलेंही नव्हतें. नानानें सद्गदित अंतःकरणानें स्वामीसुताच्या चरणीं मस्तक ठेविलें. स्वामीसुतानें नानांस पोटाशीं धरून सांगितलें, 'आजपासून तुम्ही समर्थांचे जोशी आहांत. तुमचें पागोटें जाऊन झोळीप्रसाद मिळून नगरास तुमच्या येथें श्रीस्वामींचा मठ होणार आहे.' ही आनंदमूर्ति पाहिल्यापासून नानाचें चित्त त्यांच्याकडेस लागलें व ते सदोदित स्वामीसुताचे समागमानें राहूं लागले. एके दिवशीं तिसरे प्रहरीं स्वामीसुतानें नानास महाराजांची पत्रिका करण्यास आज्ञा केली. तिथि, वार नक्षत्र स्वामीसुतापासून विचारून घेऊन नानानीं समर्थांची पत्रिका तयार केली. ती स्वामीसुतास पसंत पडल्यावरून त्यांचे आज्ञेवरून नाना अक्कलकोटास समर्थचरणीं पत्रिका अर्पण करण्यास घेऊन गेले. तेथें दत्तंभट सेवेकरी यांचे मार्फत दर्शनाचा योग रामाचे देवळासमोर आला; पुढें महाराज उठून गांवांतील दर्ग्याचे देवडींत जाऊन बसले. दत्तंभटासह नाना दर्ग्यांत गेले व महाराजांची आनंदी वृत्ति पाहून पत्रिकचा लखोटा व पूजेचें सामान त्यांच्यापुढें ठेविलें. महाराजांस साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां महाराज म्हणाले, "**क्या देखता है नौबत बजाव.**" हें शब्द महाराजांचे मुखांतून निघतांच, नाना दर्ग्यांतील नौबती जवळ जाऊन ती वाजवूं लागले. हें पाहून महाराज पुष्कळ हंसले व म्हणाले, "**तुझ्या हातावर आत्मलिंग दक्षिणा मिळेल.**" ही प्रसादवाणी ऐकून नाना आठदहा दिवस

अक्कलकोटास राहून मग परत मुंबईस स्वामीसुताकडेस गेले. व झालेली हकीकत त्यांस निवेदन केली. या वेळेस कांदेवाडींतील मठ स्थापन झाला होता. पुढें शके १७९३ च्या चैत्र शुद्ध २ पासून स्वामीजयंतीचा उत्सव स्वामीसुतानें सुरू केला. प्रथमचा उत्सव अक्कलकोटास जाऊन खुद्द स्वामीचरणांपाशीं केला. त्या वेळेस कित्येक लोकांस तो अमान्य वाटूं लागला व ते थट्टा करूं लागले. तेव्हां शिऊबाई व भुजंगा यांनीं महाराजांस विचारिलें, 'महाराज स्वामीसुत हें काय करीत आहेत?' तेव्हां महाराजांनीं उत्तर दिलें, "**हा आमचे लग्नाचा उत्सव आहे.**" त्या समयास स्वामीसुत जे जे अभंग म्हणत, त्याप्रमाणें गोट्या खेळणें वगैरें लीला स्वतः महाराज करून दाखवीत. लोकांचे निंदेकडे व थट्टेकडे लक्ष्य न देतां स्वामीसुत हे मजुराचे डोक्यावर मगर, खजूर, दाणे वगैरे घेऊन घरोघर फिरून, फराळाचें देऊन, हात जोडून प्रार्थना करून म्हणत, 'माझ्या बापाच्या जयंतीचा आज उपास करा;' शिवाय ते आणखी असें सांगत, 'पोळी खातां समर्थांची व टाळी वाजवितां दुसऱ्याची.' स्वामीसुत मोठे प्रेमळ व भक्तिमान् असतां अक्कलकोटचे लोक व महाराजांचे सेवेकरी त्यांस अत्यंत त्रास देत असत. त्याचा यत्किंचित् मनांत विकल्प न आणितां सर्वांस हात जोडून समर्थभजनीं लावण्याचा उद्योग स्वामीसुत करीत असत. स्वामीसुत समर्थांचे भजन मोठ्या प्रेमानें करीत, व तें भजन ऐकण्यास शेंकडो लोक जमत असत. एके दिवशीं मुरलीधराचे देवळांत स्वामीसुत भजन करीत असतां पुष्कळ मंडळी जमा झाली होती. पूर्वेकडील धर्मशाळेंतील तीन खण अगदीं सुटलेले होते. तीन तासपर्यंत भजन चालू होतें. भजन आटोपून मंडळी बाहेर पाऊल ठेविते तों धाडकन् आवाज होऊन धर्मशाळा खालीं पडलीं. भजन चाललें असतां त्यांत महाराजांनीं विघ्न येऊं दिलें नाहीं. याचें सर्वांस आश्चर्य वाटलें.

## स्वामीसुतास राजवाड्यांत जाण्याची बंदी काढून टाकली.

एक वेळ स्वामीसुत अक्कलकोटास आले असतां समर्थांची स्वारी राजवाड्यांत होती. त्यामुळें दर्शनाचा योग येईना; तीन दिवसपावेतों स्वामीसुतांनीं निर्जल उपोषण केलें. चौथे दिवशीं राजवाड्यासमोर जाऊन भजन करीत उभे राहिले. त्या वेळेस खालीं लिहिलेला प्रेमळ अभंग त्यांनीं म्हटला:—

## अभंग.

माझी माता तुमचे घरीं ॥ म्हणुनी आलों मी हो द्वारीं ॥ आम्हां नको तुमचें कांहीं ॥ स्वामी चरण दावा बाई ॥ १ ॥ स्वामीचरणाचें रज ॥ देऊनी तृप्त करा मज ॥ माझी माय आहे आंत ॥ मज दाखवा त्वरित ॥ २ ॥ माय सोडुनियां बाळ ॥ कैसा घालविल काळ ॥ आम्ही जाऊनियां आंत ॥ तुमचें कांहीं नाहीं नेत ॥ ३ ॥ प्रेम पान्हा घेऊनि झोडा ॥ गात येऊं हो पवाडा ॥ स्वामीसुत म्हणे आई ॥ बाळा भेटवावें बाई ॥ ४ ॥

हा अभंग म्हटलेला राणीसाहेबांनीं ऐकून, स्वामीसुत हे महान् गुरुभक्त आहेत, अशी त्यांची खातरी झाली. कारकून वगैरे पाठवून आदरानें स्वामीसुतास वाड्यांत नेलें. स्वामीसुतांनीं मोठ्या प्रेमानें समर्थांचे दर्शन घेऊन एक तासभर भजन करून. सर्वत्रांचें मन रंजविलें. यापुढें कोणत्याही वेळीं महाराज वाड्यांत असतां स्वामीसुतास मजाव करूं नये, म्हणून राणीसाहेबांनीं आपल्या नोकरांस सक्त हुकूम दिला.

## बेटा मंगता है, और हमारे हनुमानजीकु देखता नही.

एके दिवशीं समर्थांची स्वारी गांवाबाहेरील खोजाच्या दर्ग्यापुढें चिंचे जवळील ओट्यावर होती. स्वामीसुत त्या वेळेस अक्कलकोटास असून मुरलीधराचे देवळांत त्यांचे बिऱ्हाड होतें. रात्रीचे नऊ वाजण्याच्या सुमारास मुंबईतील द्वारकानाथ आप्पाजी वकील कुटुंबासह समर्थांचे दर्शनास आले. त्यांनीं महाराजांपुढें कापुराच्या वड्यांच्यावड्या लाविल्या. महाराज पलंगावर पहुडले होते, ते मोठ्या रागानें उठून वकिलास म्हणाले, “ **बेटा मंगनेकू आया है, हमारे हनुमान अंधारेमे बैठे है, उनके तरफ देखता नहीं.** ” ह्या वाक्याचा अर्थ वकिलास न कळल्यामुळें ते महाराजांचे मुखाकडे वेड्यासारखे पाहूं लागले. तेव्हां महाराज त्यास पुनः म्हणाले, “ मुरलीधरके देवलमे हमारा हनुमान अंधारेमे है. ” हें ऐकून भुजंगा मुरलीधराचे देऊळांत गेला व पाहतो तों तेथें स्वामीसुत अंधारांत बसले असल्याचे त्याचे दृष्टीस पडले. तें पाहून भुजंगा परत महाराजांकडे आला, व वकिलास म्हणाला, “ तुम्ही मुरलीधराचे देऊळांत स्वामीसुतापुढें दिवे लावा,

म्हणजे महाराज तुमच्यावर कृपा करितील.” त्याप्रमाणें मुरलीधराचे देऊळांत जाऊन वकिलानें दिवे लावून मोठी आरास केली, व परत महाराजांचे दर्शनास आले. महाराजांनीं त्यांस चणे आणण्याविषयीं आज्ञा केली. रात्र फार झाली असल्यामुळें चणे कोठें मिळेनात, पण प्रयासानें त्यानें चणे आणविले. त्या चण्यांबरोबर महाराज एक तासभर खेळत होते. पुढें त्याच चण्यांचा प्रसाद महाराजांनीं वकिलास दिला. त्या योगानें त्याचे मनोरथ सिद्धीस गेले.

## स्वामीसुताची भरभराट—अपमान—आजार व निर्याण.

महाराज स्वामीसुतास चंदुलाल या नांवानें हाक मारीत असत. पुष्कळ लोकांस त्यांची मनेप्सित कामना सिद्ध होण्याकरितां दर्याकिनाऱ्यावर म्हणजे मुंबईस स्वामीसुताकडे जाण्याविषयीं आज्ञा देत. तेथें समर्थांचे कृपादृष्टीनें त्यांचे हेतु पूर्ण होत. या प्रमाणें सुमारें चार वर्षें स्वामीसुताची अत्यंत भरभराट चालली होती. समर्थांचे भक्तीस हजारों लोक त्यांनीं लाविले; एक वेळ असें झाल्याचें सांगतात कीं, स्वामीसुत अक्कलकोटास असतां, महाराजांची स्वारी खासबागेंत होती. स्वामीसुत पायांत खडावा घालून महाराजांपुढें भजन करूं लागले. त्यांचा द्वेष करणारी कांहीं सेवेकरी वगैरे मंडळी असल्याचें मागें कळविलेंच आहे, त्यांस पायांत खडावा घालून समर्थांपुढें उभे राहणें हा मोठा प्रमाद आहे, असें वाटून स्वामीसुताचा अपमान करण्याची युक्ति ते योजूं लागले. सेवेकऱ्यांनीं समर्थांची हात जोडून प्रार्थना केली कीं, ‘स्वामीसुत खडावा घालून भजन करितात हें रास्त नाहीं, सबब खडावा काढून घेण्याची आज्ञा व्हावी.’ ज्याचें असंग शस्त्र सदैव प्रज्वलित अशा महाराजांस सुत सारखा व चोरही सारखाच. खडावा काढून घ्याव्या म्हणोन पडत्या फळाची आज्ञा होतांच स्वामीसुताचे पायांतील खडावा बळजबरीनें काढून घेऊन त्यांचा हिरमोड सेवेकऱ्यांनीं केला. स्वामीसुत स्वभावानें मोठे मानी होते. त्यांस या अपमानाचें स्मरण शेवटपावेतों राहिलें. शिवाय महाराजांनीं बोलतां बोलतां आपण लवकरच अवतार संपविणार, तूं पुढें ध्वजा उभारावी अशी सूचना केल्यावरून स्वामीसुतास अत्यंत वाईट वाटलें. व बापाचे आधींच प्रयाण करण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केला. ‘**आम्ही उत्तर हिंदुस्थानांत जातों, गादी घेऊन बसा,**’ हे महाराजांचे सूचक शब्द होते. श्रावण महिन्यांत त्यांची प्रकृति अस्वस्थ झाली. श्रीसमर्थांनीं त्यांस अक्कलकोटास येण्याविषयीं निरोप पाठविला. शिऊबाईस मुद्दाम स्वामीसुतास आणण्यास मुंबईस पाठविलें. पण ते आले नाहींत.

मग श्रीपादभटजीस व कृष्णापास त्यांस आणण्यास पाठविलें, पण ते आले नाहींत. शेवटीं देवाजी माळी यास महाराजांनीं पाठवून, 'त्यास बांधून तरी घेऊन ये,' म्हणून आज्ञा दिली. पण स्वामीसुत नाहींच आले. महाराजांनीं निरोप पाठविला, 'तोफ लावून तयारी करून ठेविली आहे, आला तर बरें; नाहींतर झोंपडें उडवून टाकतों.' याचा अर्थ उघड होता. पण स्वामीसुत मरणास भ्याले नाहींत. महाराज त्यांची येण्याची फारच मार्गप्रतीक्षा करीत होते. 'कोणी त्यांस पेटींत घालून तरी आणा, अगर वाटेल त्या रीतीनें आणा,' म्हणून जवळचे लोकांस म्हणत. स्वामीसुतांनीं येण्याचें नाकारल्यामुळें कोणाचा इलाज चालेना. अक्कलकोटास येते तर स्वामीसुतास महाराजांनीं खरोखर शतायु केलें असतें. पण होणार गोष्ट कशाची टळते ? पुढें श्रावण वद्य १ स स्वामीसुत गतायु झाले. हर ! हर ! त्या वेळेस मुंबईचे मठांत मोठाच आकांत उडाला. हजारों भक्तमंडळी येऊन स्वामीसुताचे मुखाकडे पाहून शोकांत निमग्न झाली. असो. स्वामीसुत जातीचा मराठा असल्यानें लोक त्याची कशीही निंदा करोत, आम्हीं त्यास पूज्य मानतों ॥ **उंचनिच कांहीं नेणे भगवंत ॥ तिष्ठे भावभक्ति देखुनियां ॥** स्वामीसुताची गुरुभक्ति अति उच्च प्रतीची होती. श्रीविठ्ठलाचे नामदेव व तुकाराम, श्रीकृष्णाचे उद्धव, अक्रूर व श्रीरामाचे मारुती व रामदास, रामदासाचा जसा कल्याण शिष्य, तसे स्वामीसुत हे समर्थांचे शिष्य होते. यांत तिळमात्र संशय नाहीं.

## काकुबाईचा शोक व महाराजांकडून शांतवन.

स्वामीसुत ( हरीभाऊ ) यांस देवाज्ञा झाल्याबद्दल तार अक्कलकोटास आली. महाराजांपुढें तारेचें पाकिट ठेविलें. त्यांनीं काकुबाई ( स्वामीसुताची माता ) यांचेपुढें ठेवण्यास सांगितलें. महाराज भांडारखान्यांत होते. ते त्या दिवशीं विपरीत लीला दाखवित होते. पलंगावरून धडकन् आंग भुईवर टाकून कपाळास हात लावून महाराज भुईवर बसले. नंतर तेथून ओसरीवर गेले. मग ओंडकराचे वाड्यांत गेले. ओंडकर महाराजांस म्हणाले, 'महाराज स्नान करतां ना ?' होय म्हणून महाराज बसले, आंग पुसलें नाहीं. आपल्या हातानेंच भस्म घेऊन आंगास लाविलें. गंध लावीनात, आरती ओवाळूं देईनात. याप्रमाणें महाराजांची त्या दिवशीं चंचलवृत्ति होती. तार कोणी काकुबाईस वाचून दाखविली नाहीं. महाराजांचे कृतीवरून तारेचा अर्थ उघडच होता. काकुबाई अत्यंत शोक करूं लागल्या. मुंबईस जाण्यास महाराजांजवळ आज्ञा मागूं लागल्या, महाराज आज्ञा देईनात. 'माझी माय, तूं जाऊं

नको, तुला जाऊन काय करावयाचें आहे', अशी महाराज समजूत घालीत. आईची माया विलक्षण आहे, काकुबाई एकवार मुंबईस जाऊन परत आल्या, व महाराजांजवळ फार शोक करीत बसल्या. महाराज नानाप्रकारें त्यांचें शांतवन करूं लागले. काकुबाई म्हणाल्या, 'महाराज स्वामीसुत तुमचे पदरांत टाकले असतां त्यांस कसें हो जाऊं दिलें?' महाराजांनीं उत्तर दिलें, **"पेटींत घालून आणण्यास सांगितलें असतां आला नाहीं, त्यास मी काय करूं? मी तुमचा लेक आहेना, रडूं नका. त्यास चांगल्या जागेवर पाठविलें आहे."** वगैरे गोष्टी सांगून महाराज समजूत घालीत. वारंवार काकुबाई सुतकी असतां त्यांस कवटाळून पोटाशीं धरीत. याप्रमाणें प्राकृत जनाप्रमाणें परब्रह्म सद्गुरुमूर्ति स्वामीसमर्थ यांनीं मायाजालानें शोकाग्नींत होरपळत असलेल्या आपल्या शिष्यमातेचें आठपंधरा दिवस सतत शांतवन केलें.

## मोर पाखरू व पाऱ्याची वीट.

पुढें महाराज रोज "मोरपांखरा, मोरपांखरा होत!" अशा शब्दांनीं मोठमोठ्यानें किंकाळ्या मारीत. महाराजांचे या ओरडण्याचा अर्थ कोणास कळेना. खासबागेंतून मोर आणून महाराजांपुढें उभा केला असतां, त्याजकडे महाराजांनीं पाहिलेंही नाहीं. यावरून महाराजांचे मोरपांखरूं निराळेंच असावें असा सर्वत्रांचा समज झाला. पण तें कोणतें याचा मात्र तर्क होईना. मोरपांखरा, मोरपांखरा, म्हणून वर लिहिल्याप्रमाणें किंकाळ्या मारण्याचा रोज क्रम सुरूच होता. पुढें महाराज काकुबाईस विचारूं लागले, 'आम्ही मागूं तें आम्हास द्याल काय?' 'आतां मजजवळ काय मागतां,' म्हणून काकुबाईनें महाराजांस विचारिलें असतां, 'आमची पाऱ्याची वीट आम्हांस आणून द्या,' म्हणून महाराज म्हणाले. काकुबाईस कांहीं अर्थ कळेना. 'पाऱ्याची वीट कोठून आणूं? चोरी करून आणूं अथवा एखाद्या विटेवर पारा लावून आणूं,' म्हणून महाराजांस काकुबाई म्हणूं लागल्या. महाराज स्पष्ट अर्थ सांगेनात व 'आपली लपवून ठेवलेली वीट घेऊन या,' म्हणून काकूबाईचे मागें तगादा करूं लागले. असें चाललें असतां मुंबईहून ब्रह्मचारी बोवा, बावा शेणवई केरोबा, बापाशी काका वगैरे शिष्य मंडळी समर्थांसन्निध येऊन स्वामीसुताचे गादीवर कोणास बसवावें याबद्दल आज्ञा मागूं लागले. ब्रह्मचारी बोवास बसविण्याविषयीं एकानें सुचविलें असतां महाराज म्हणाले, "ब्राह्मचारी गांड धुणारा आहे, तो कामाचा नाहीं." बाबा शेणवई आपले कामाचा नाहीं असेंही महाराज म्हणाले.

" मोरपांखरा मोरपांखरा " म्हणून महाराज आरोळ्या मारूं लागले, ' मोरपांखरास आम्ही आणूं, तुम्ही चीप रहा, आमचे मनांत येईल तें आम्ही करूं, ' असें महाराज म्हणाले. त्यानंतर काकुबाईस म्हणाले **" आमचे मोरपांखरू तुम्ही बंदीखान्यांत घालून, छपवून ठेविलें आहे. त्यास मी घेऊन येईन."**

पुढें हमेश बोलण्यांत " मोरपांखराचा " संबंध महाराजांनीं आणावा. महाराज हातांत काठीं धरून चालत असत. काकूबाईनें ब्रह्मचाऱ्यास सांगून मुंबईहून एक छानदार काठी महाराजांकरितां मागविली. महाराजांनीं ती पाहून उद्गार काढिले कीं, **" ही काठी मोरपांखराचे उपयोगीं पडेल. "**

काकुबाई स्वभावानें फार भोळ्या होत्या. एकाद्या धूर्त माणसास महाराजांचे म्हणण्याचा अर्थ तेव्हांच कळला असता. " मोरपांखरूं," " पाऱ्याची वीट ", लपवून ठेवलेली, वगैरे उल्लेख महाराज करीत असत ते काकुबाईचा धाकटा मुलगा दादा नांवाचा उमर वर्षे ८।९ चा कोकणांत होता त्यासंबंधाचे होते. काकुबाइस महाराजांचा हेतु अगदीं शेवटपावेतों म्हणजे दादाबोवास महाराजांनीं दीक्षा देऊन गोसावी बनवीपावेतो कळला नाहीं. असें झालें म्हणून बरें झालें. नाहींतर काकु-बाईनें आपल्या चिमुकल्या बाळास महाराजांसमोर मुळींच येऊं दिलें नसतें. हरिभाऊ स्वामीभक्त होऊन बैरागी झाल्याबद्दल काकुबाईस व इतर आप्तांस किती वाईट वाटलें तें पूर्वीं सांगितलेंच आहे. हल्लीं दादा तर केवळ बच्छडाच होता. त्यास महाराज गोसावी करतील ही गोष्ट काकुबाईचे स्वप्नींही नव्हती. त्यांना या गोष्टीचा थोडा जरी सुगावा लागता तर दादास महाराजांजवळ त्यांनीं आणला नसता. एवढेंच नाहीं, तर आपणही अक्कलकोट सोडून कोंकणांत जाऊन आपल्या स्वस्थ राहिल्या असत्या. पण समर्थांची लीला अगाध आहे. त्यांची माया ब्रह्मादिकांसही मोहित करते, मग काकुबाईची बिशाद ती काय ? असो.

हरिभाऊचें घर कोंकाणांत राजापुरापासून दोन कोसांवर इलिया म्हणून असल्याचें मागें सांगितलेंच आहे. तेथें त्याचा लहान भाऊ दादा रहात होता. त्यांचें लाडकें नांव बाबू होतें. हरीभाऊ व काकुबाई मुंबईकडे गेल्यानें हरीभाऊचें वहिणीनें दादास आपल्या सासरीं पोंड्यास नेलें होतें. तेथें दादाची प्रकृति बिघडून तो फार कृश होत चालला. वहिणीनें कारण पुसतां तात्यास भेटावेंसें वाटतें असें दादा म्हणाला. यावरून गाडी घोडा देऊन वहिणीनें दादाची इलियास रवानगी केली. तात्यास दादा भेटला, व मातोश्रीस भेटण्याची इच्छा दर्शविल्यावरून ते

दादास घेऊन मुंबईस आले. ब्रह्मचारी बोवाजवळ दादास ठेवून तात्या परत गेले. इकडे अक्कलकोटास समर्थांनीं दादा आल्याचें जाणलें. नानासाहेब केजकर यांस महाराज म्हणाले, 'आम्हांस धोंडे द्या हो.' सर्वांजवळ धोंडे मागूं लागलेले पाहून काकुबाईनें एक गोटी महाराजांजवळ नेऊन ठेविली. महाराज रागावून म्हणाले, "**इतका ओरडतों कळत नाहीं ?**" "**कुंभारास सांगून पायाचे पायपोस लावून द्या.**" मुंबईस पत्र लिहिल्यावरून ब्रह्मचारी बोवानें पादुका अक्कलकोटास पाठवून दिल्या. त्याच वेळेस ब्रह्मचारीबोवांनीं दादाबोवाचीही रवानगी अक्कलकोटास करून दिली; फार दिवसांनीं भेटलेल्या आपल्या आवडत्या बाबूस पाहून काकुबाईस फार आनंद झाला. प्रेमानें आलिंगन देऊन वारंवार चुंबन घेऊन बाळास न्हाऊं घातलें, व मोठ्या आनंदानें बाळ महाराजांचे चरणावर घालण्यास घेऊन गेली. महाराजांची स्वारी शिदोऱ्यांचे घरांत होती. बाळास पहातांच महाराज फारच मोठ्यानें खदखदां हसूं लागले. त्यांचें हसूं त्यांस आवरेना. भिंतीकडे तोंड करून बुरखा घेऊन महाराज फार वेळ हंसत बसले. काकुबाईस फार आश्चर्य वाटलें. बाळास पायांवर टाकून काकुबाईनें प्रार्थना केली, 'मुलगा फार कृश होत चालला, त्यास जीर्णज्वर लागला आहे, त्याजकडे कृपादृष्टीनें पहावें.' महाराज म्हणाले, "**त्यास रोज चार वेळ जेऊं घालीत जा. तो बरा होईल.**"

## महाराजांचा केज येथील मठ.

नानासाहेब केजकर यांस पादुका स्थापन करण्याविषयीं महाराजांची आज्ञा झाली असल्यानें पादुका व ब्रह्मचारी बोवा यांस घेऊन ते केजेस जाण्यास निघाले. बरोबर बहुत भक्तमंडळीही होती. दादासही बरोबर न्यावें असें नानासाहेबांस वाटलें. पण काकुबाई त्यास धाडीनात. 'तो अशक्त झाला आहे, त्यास जीणज्वर आहे, त्याची प्रकृती जास्ती बिघडेल, सबब मी त्यास पाठवीत नाहीं,' म्हणून काकुबाई म्हणाल्या. 'त्याची आम्ही चांगली काळजी घेऊं. पाठवाच,' म्हणून मंडळीनें आग्रह केल्यावरून काकुबाई म्हणाल्या, 'मी श्रीसमर्थांजवळ जाऊन आज्ञा मागेन, आज्ञा दिल्यास पाठवीन.' त्याप्रमाणें बाबूस बरोबर घेऊन त्या श्रीस्वामी-समर्थ थडगे बागेत होते तेथें गेल्या. महाराज तेथें एकटेच होते; तेथें एक चवरी पडली होती. त्यांतील केंस काढून एक हीर घेऊन त्यास झेंडूचीं फलें लावून एक चेंडू महाराजांनीं तयार केला. काकुबाई महाराजांस म्हणाल्या, 'हा (दादा) केजेस


जातो, ऐकत नाहीं.' त्याचें उत्तर न देतां दादास उद्देशून महाराज म्हणाले, "**बसा हो त्या पलंगावर निजा हो त्या पलंगावर ओटंगा हो.**" काकुबाईस वाटलें महाराज असें काय करितात कोण जाणे. नंतर महाराजांनीं दादास नबाब या नांवानें हाक मारून जवळ घेतलें, व झेंडूचा चेंडू त्याचे हातांत देऊन म्हणाले, "आमचा झेंडा लावा बरें." काकुबाई म्हणाल्या, 'झेंडा कशाचा लावण्यास सांगतां? महाराज, यास केजेस जाऊं नको म्हणून सांगा,' महाराज दादास म्हणाले, 'तूं हिचे ऐकूं नको, केजेस जा.' तेव्हां काकुबाईचा निरुपाय झाला; त्या महाराजांस म्हणाल्या, 'हा अशक्त झाला आहे, तुमचेकडे अपयश येईल बरें.' नानासाहेबांबरोबर मग दादा गेला. केजेस पादुकास्थापनाचा मोठा समारंभ झाला. केजगांव मोगलाईत आहे. हल्लीं २५।३० हजार रुपये खर्चून सभामंडप वगैरे काम उत्तम बांधलें आहे. दादास केजेकडे बारा दिवस लागले. नानासाहेबांनीं बरोबर नेलेल्या शिष्यमंडळीस कोणास धोतार, कोणास पागोटें याप्रमाणें देऊन सन्मान केला. त्यांनीं दादासही आंगरखा टोपी देऊन अक्कलकोटास रवाना केलें. दादाचें आंगावर बाळलेणीं म्हणजे हातांतील कडीं, तोडे, गळयांत गळसरी व ताईत आणि कानांत भीकबाळी याप्रमाणें होतीं; काकुबाईस दादा सुखरूप परत आल्याचें पाहून आनंद झाला. तिनें दादास न्हाऊं घालून वडांचें झाडाखालीं महाराज होते तेथें घेऊन गेली.

## दादा बोवास समर्थांची दीक्षा.

दर्शन घेऊन उभयतां वडाचे आड बसलीं तेव्हां "**धोतर हुडकण्यास यास ठेवून घेतला होतात,**" म्हणून महाराज म्हणाले व कावरेबावरे होऊन उठून काकुबाईकडे गेले. "कोणाचा माल ठेवून घेतला? सोडा, सोडा." असें म्हणून दादास ओढूं लागले. "इतकें दिवस चोरून ठेविला होतास आमचा आम्हांस दे." असें म्हणून दादास महाराजांनीं ओढलें, दादा काकुबाईचे कंबरेस मिठी मारून रडूं लागला. महाराजांचे या शब्दावरून काकुबाईस वाटलें 'पान्याची वीट लपवून ठेविली," "मोर पांखरू," वगैरे महाराज म्हणत तें दादास उद्देशून असावें. तथापि एवढ्या लहान लेंकरास महाराज गोसावी बनवितील, असें तिजला अजूनही वाटलें नाहीं. महाराजांनीं दादास आपल्याजवळ नेऊन बसविलें, व त्याचा सन्मान केला. पुढें काकुबाईस नकळत महाराजांनीं दादास आपल्याजवळ नेऊन बसविलें, व मुंबईकर मंडळीस सांगितलें



श्री बाळकृष्ण महाराज, सुरत (दादर, मुंबई)



श्री स्वामी महाराजांची समाधी-अक्कलकोट

कीं यास मुंबईस नेऊन गादीचा धनी करा. मंडळीनें दादास मुंबईस नेऊन ब्रह्मचारी बोवांचे स्वाधीन केलें. व महाराजांची आज्ञा निवेदन केली. ब्रह्मचारी बोवांनीं पुष्कळ खटपट केली; पण दादा जरी वयानें लहान होता तरी गोसावी बनविण्याची गोष्ट काढली म्हणजे साफ नाहीं म्हणे. त्यामुळें बोवांचें कांहीं चालेना. इकडे अक्कलकोटास काकूबाई दादाबद्दल काळजी वाहत असत. "महाराज, लेंकरू रडत रडत गेलें आहे त्यांस परत आणूं का? पत्र धाडूं का?" म्हणून बाईनें एक दिवस महाराजांस विचारिलें. तेव्हां महाराज रागावून म्हणाले, "**कोणतें लेंकरूं म्हणतेस, कोण तुझें लेंकरूं, आम्हीं त्यांस बांधलें आहे.**" हें ऐकून काकुबाईस भीति पडली, 'महाराज बाबूस बोवा करितात.' इकडे ब्रह्मचारी बोवांनीं एक महिनाभर हवे तितके श्रम केले, पण दादा कांहीं दीक्षा घेईना. तेव्हां त्यांनीं विचार केला कीं टाळकरी मंडळीबरोबर दादास अक्कलकोटास पाठवावे. मग तेथें महाराज पाहिजे तें करोत. भजनवाली मंडळी दादासह अक्कलकोटास आली. महाराज चिटणीसांचे वाड्यांत होते. सायंकाळचा समय होता. दादाचे हातीं तंबुरी होती. "श्रीस्वामी महाराजकी जय" म्हणून मंडळींनीं जयघोष करून महाराजांचें भजन करीत उभे राहिले. महाराज भुजंगास म्हणाले, "**फिरंगी वाघाचे कातड्यावर त्यास उभा कर, त्याचे गळ्यांत माळ घाल, हें खेटर घेऊन त्याचे डोकीवर ठेव.**" असें म्हणून पायांतील जोडे महाराजांनीं फेंकले. आज्ञेप्रमाणें भुजंगानें सर्व केलें. दोन चवऱ्या आणण्यास सांगून त्या आपण स्वतः दादावर वारूं लागले. आतां मात्र काकुबाईची खात्री झाली कीं, महाराज दादास खास बैरागी करितात. तिला फार वाईट वाटलें. ती महाराजांस म्हणाली, "पायांतील खेटर पैजर उचलणार असा दादा असून असें उफराटें कसें करितां?" महाराज म्हणाले, "**तुला बघवत नाहीं, घालारे कोंडून इला.**" मग मोरचेल आणवून तेही वारूं लागले. पंखा घेऊन महाराज दादास वारा घालूं लागले, "**माझा हरीबा लहान लहान झाला, माझा मारुती लहान आहे. असो आम्ही त्यास बुद्धि देऊं.**" असें महाराज म्हणूं लागले. काकुबाईचे पोटांत धडकी भरली, दर्शन घेऊन सर्व मंडळी गेली. तेव्हां बाबूस एके बाजूस घेऊन काकुबाई विचारूं लागल्या "तुला कोणीरे रंगविलें, कोणी नाचविलें, असे चाळे करूं नये, आपण लौकरच कोंकणांत जाऊन संसार करून राहूं." या उपदेशाच्या गोष्टी दादास रुचेनात. महाराजांच्या पादुका मस्तकावर पडल्यापासून त्याची बुद्धि फिरली. दादा उलटा

काकुबाईस शिकवणीच्या गोष्टी सांगूं लागला. "मला एकत्र्यास सहा वर्षांचा कोंकणांत टाकून आलीस तेव्हां नाहीं कांहीं मनास वाटलें, आतां मी साफ तुझा नाहीं. महाराज माझे व मी महाराजांचा." आतां मात्र काकुबाईची कंबर अगदीं खचली. महाराजांचे तडाक्यांतून बाबू कसा सुटतो याचा विचार त्यांना सुचेना. त्या दप्तरदारास म्हणाल्या, 'कसेंही करून बाबूस सोडवा.' ज्याला त्याला त्या असेंच सांगूं लागल्या. पण महाराजांचे मनांत जी गोष्ट आली त्याचे विरुद्ध कोण जाणार? दुसरे दिवशीं गांवांत भिक्षा मागून आणून दादानें ती झोळी काकुबाईचे पुढें ठेविली. त्यांना दे माय धरणी ठाय असें झालें. "लाडक्या असें काय करतोस तुझे चुलते व आप्तवर्ग आपणांस नांव ठेवतील, पाहिजे तर त्यांची परवानगी घेऊन तूं गोसावी हो." वगैरे पुष्कळ रीतीनें काकुबाईनें समजूत काढली, पण दादा कांहीं ऐकेना. महाराजही अधिकअधिकच गम्मत करूं लागले. दादास त्यांनीं अनसूयेजवळ (काकूबाई) भिक्षा मागण्यास सांगितलें. काकूबाई रागवल्या, "महाराज हें काय म्हणतां? एकास गोसावी केला, दुसरा लोकांचा आहे. त्यास कोणाचे हुकमानें गोसावी करूं? मी साफ भिक्षा घालणार नाहीं, जिकडील तिकडे जाऊं द्या." अशी अनेक प्रकारें काकुबाईनीं विनंति केली. पण व्यर्थ. "**झोळी खाड्यांत टाकावी काय,**" म्हणून महाराज म्हणाले. तेव्हां काकूबाई म्हणाल्या, 'खाड्यांत टाका किंवा वाटेल तें करा, मी साफ गोसावी करूं देणार नाहीं. स्वामीसुतांकरितां वाटेल तें केलें, त्यास गोसावी बनवून शेवटीं नाहींसाही केला, आतां मी आपल्या बाळास देणार नाहीं,' असा काकुबाईनें हट्ट मांडिला. महाराज तिचे देवाचे देव, ते तिला कशाची दाद देतात. महाराज रागावून म्हणाले, "**टाका खोलींत, घाला खाड्यांत; पाहवेना, रगत भरलें डोळ्यांत, कौतुक तिच्यानें पाहवेना, ठोका बिड्या.**" काकूबाई रडूं आरडूं लागल्या. दादाचे आंगावरील भीकबाळी कडींतोडे वगैरे दागिने महाराजांनीं काढविले. महाराजांनीं स्वतः दादास कौपीन नेसविली. इकडे काकूबाई ऊरशीर बडवून घेऊं लागल्या, डोकें फोडून घेतलें, नाकातोंडांतून रक्त वाहूं लागलें, त्यांच्या डोक्यास अद्यापही जखमेच्या खुणा आहेत. महाराजांपुढें त्यांचें काय चालतें? शिऊबाई व सुंदराबाई महाराजांचे प्रीतींतल्या होत्या, त्यांस काकुबाईनें विनंति केली, 'महाराजांस दोन गोष्टी सांगून दादास सोडून देतील अशी कांहीं तजवीज करावी.' त्यांस करुणा येऊन प्रथम शिऊबाई महाराजांजवळ जाऊन विनंति करूं लागली. "महाराज तिचें लेंकरूं लहान त्यास कौपीन कशी नेसविली?"

महाराज खेटर घेऊन तिचे मागें मारण्यास धांवले व वाटेल तशा शिव्या तिला दिल्या; अर्थातच सुंदराबाईच्यानें गोष्ट काढविली नाहीं. घटकाभरेनें महाराज थंड झाले. तेव्हां श्रीपादभटानें हळूच गोष्ट काढिली, 'महाराज हें कसें होणार ?' महाराज म्हणाले, "**जळता पाय मागें ओढावा, झाली गोष्ट ती फिरावयाची नाहीं; धोंड्यावर रेघ ओढून ठेव.**" मग कोणी कांहीं बोललें नाहीं. पुढें महाराजांनीं दादास मांडीवर आडवा घेऊन कुरवाळलें, त्याचे कान फुंकले, नाना तऱ्हेनें त्यास खेळविलें, काकूबाईस बोलावणें धाडून तिचे पायांवर त्याजकडून डोकें ठेवविलें. 'काकूबाई तुझी आई नव्हे. तूं तिचा मुलगा नाहींस. तूं आतां माझा आहेस,' असें म्हणून त्याचे मस्तकावर हस्त ठेविला.

'सच्चिदानंद स्वामीकुमार', हें नांव घऊन दादाबोवा मुंबईचे मठांत सेवा करूं लागले. कांहीं वर्षें महाराजांची सेवा करून तेंहि स्वामी चरण लीन झालें. त्यांचे पश्चात् श्रीस्वामीसुतांची मुलगी व नातु महाराजांची पूजाअर्चा करून कालक्रमण करीत होते. श्रीस्वामीसुतांची मुलगी नंतर स्वर्गस्थ झाल्या, व श्रीस्वामीसुतांचा नातु सध्या स्वामीरायांची पूजाअर्चा करून कालक्रमणा करीत आहे.

# भाग ७ वा

## महाराजांचे चरित्रासंबंधानें अखेरच्या कांहीं गोष्टी.

श्रीगुरूचें चरित्र अपार आहे. तें सर्व वर्णूं शकणें अशक्य आहे. हरघडीस अनेक चमत्कारिक लीला समर्थ दाखवीत असत. त्या सर्व लिहून ठेवणें अशक्य होतें. फक्त एक दोन भक्तांनीं स्वामींची चरित्रलीला आपल्या स्मरणशक्तीच्या प्रभावानें जगापुढें मांडण्यासारखी प्रगट केली. ती यथाशक्ति रसिक वाचकांचे सेवेस सादर केली आहे. हजारों भक्तजन समर्थांचे दर्शनास येत असत. प्रत्येकास निरनिराळ्या रीतीनें चमत्कार दाखवून ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणें श्रीगुरु मनेप्सित कामना पूर्ण करीत असत. असे प्रसंग रोज शेंकडों येत असत. यावरून समर्थांच्या लीला अनंत आहेत. त्या यथातथ्य वर्णन करणें मानवशक्तीच्या पलीकडे आहे. याची सत्यता वाचकांचे ध्यानांत सहज येईल. आतां महाराजांच्या चरित्रासंबंधानें अखेरच्या कांहीं गोष्टी सांगून चरित्र संपविण्याचा आमचा विचार आहे. सबब तिकडे लक्ष देऊन वाचक जन शेवट गोड करतील, अशी पूर्ण आशा आहे.

महाराज आपले जवळील सेवेकऱ्यांस व इतर भक्तजनांस त्यांचे स्वतःचे नांवानें हाक न मारितां, निराळींच नांवें ठेवून हाक मारीत असत. त्यांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहे.

चोळापा यास जैन या नांवानें हांक मारीत, कृष्णापा यास नीलकंठ्या, भुजंगा चपराशी यास फिरंगी, गणपतराव सेवेकरी यास भट, राजास कुंभार, चोळापाची बायको येमूबाई हिजला काशी, राचाप्पा मोदी यास मारवाडी, या नांवांनीं महाराज हांक मारीत असत. बाळाप्पा सेवेकरी यास तर लाला बहाद्दर, मुत्सद्दी, गोविंद्या, धनगर, अशीं अनेक नांवें महाराजांनीं ठेविलीं होतीं.

## पायापाशी जागा नाहीं मिळावयाची.

दगड फोडून फोडून लोखंड केलें, म्हणून महाराज सुंदराबाईस हमेश म्हणत असत. खरेंच आहे, लोखंडाच्या पुढील पायरीस जाण्याची बाईची योग्यता नव्हती. पारमार्थिक विचार बाजूस ठेवून पुढें बाई केवळ पैशाकरितां महाराजांची सेवा करी; मग उत्तम गति कोठून मिळणार! कधीं कधीं आपल्या आचरणावरून आपणास काय गति होईल याची बाईचे मनांत शंका येऊन ती "पायांपाशीं जागा द्या," म्हणून महाराजांची वारंवार प्रार्थना करी. प्रत्येक वेळेस, "**नाहीं मिळावयाची**" असाच जबाब महाराज तिजला देत असत.

## वर्णानां जंगमो गुरुः

महाराज कधीं कधीं मोठे गमतीची थट्टा करीत असत. अक्कलकोटचे राजेसाहेब यांनीं एका जंगमाचा उपदेश घेऊन त्यास गुरु केलें होतें. राजा मोठा धार्मिक व भक्तिमान् असून त्यास वेदांताचाही नाद लागला होता. हमेश समर्थांजवळ येऊन धर्मासंबंधी गोष्टी तो बोलत असे. राजा आला म्हणजे "**वर्णानां जंगमो गुरुः**" असें महाराज त्याची थट्टा करण्याकरितां म्हणत असत. वास्तविक चरण "वर्णानां ब्राह्मणो गुरुः" असा आहे, हें सर्वत्रांस माहितच आहे.

## "तुला एवढे ज्ञान असते तर तूं भाकरी बडवीत कशाला बसली असतीस!"

एक वेळ महाराजांची स्वारी जोशीबोवांचे घरांत असतां, एक दूरदेशची बाई दर्शनास आली. जोशीबोवांचे घरांत एक म्हातारी भाकरी करीत बसली होती. दोघींच्या गोष्टी होतां होतां, पाहुणी बाई म्हणाली, "आपणांस काशीविश्वेश्वराचे दर्शनास जावयाचें आहे." हें ऐकून भाकरी बडविणारी बाई मोठ्या प्रेमानें म्हणाली, "कशास बाई इतके लांब कष्ट करून जातां? श्रीस्वामीसमर्थ साक्षात् काशीविश्वेश्वर आहेत बरें." हें ऐकून महाराज खदखदां हंसूं लागले, व त्या भाकरी-वाले बाईस म्हणाले, "**अग तुला एवढें ज्ञान झालें असतें तर तूं भाकरी बडवीत कशाला बसली असतीस!**"

## शेरभर दाणे घरांत राहूं दे.

महाराज हे केवळ अक्कलकोटनिवासी जनांस कल्पतरूच होते. त्यांस ओळखून भक्तिपूर्वक याचना करण्याची काय ती उणीव. स्वार्थ किंवा परमार्थ वाटेल तें

देण्यास महाराजांची तयारी असे. बार्शी कडील कांहीं लिंगाईत वाण्यांचा नेम असे कीं, वर्षारंभीं महाराजांसन्निध येऊन पुढें कोणत्या जिनसांचा व्यापार केला असतां आपणांस बरकत येईल, याबद्दल महाराजांची आज्ञा घेऊन त्याप्रमाणें ते व्यापार करीत असत. मग व्यापारांत दुप्पट तिप्पट नफा झाला नाहीं, असें कधींच होत नसे. सन १८७६ सालचा दुष्काळ पडण्यापूर्वी लिंगाप्पा वाणी, ज्यास महाराज नाग्या म्हणून हाक मारीत असत, त्यास "**शेरभर दाणे घरांत राहूं दे,**" म्हणून महाराजांनीं आज्ञा केली होती. त्याप्रमाणें त्यानें बरेंच धान्य खरेदी केलें. व पुढें त्यास दुष्काळसंबंधानें नफाही पुष्कळ झाला.

## "तुझा बैल तुला धरतां येत नाहीं काय?"

अक्कलकोटवासी जन तर महाराजांची यःकश्चित् गोष्टीकरितां देखील प्रार्थना करीत. एके दिवशीं महाराजांची स्वारी एका बागेंत असतां, एक बैल अति मस्त होऊन धन्याचे हातून सुटून बागेंत आला. बैल फार दांडगा होता. तो विहिरीवर येऊन उभा राहिला, कोणी धरण्यास गेलें कीं आंगावर चालून येई. पांचपंचवीस लोक व स्वतः कुणबी असे त्यास धरण्याचा यत्न करीत होते, पण व्यर्थ. याप्रमाणें सायंकाळपावेतों त्यांनीं अनेक प्रकारचे यत्न केले. तथापि बैल सांपडेना. शेवटीं कंटाळून कुणब्यानें सायंकाळीं महाराजांजवळ येऊन बैलाबद्दल हकीगत निवेदन केली. तेव्हां महाराज म्हणाले, "**तुला तुझा बैल धरितां येत नाहीं काय?**" कुणब्यानें उत्तर दिलें, 'बैल आंगावर येतो, धरूं देत नाहीं, मी काय करूं?' मग महाराज स्वतः उठून जाऊन बैलाचा कान धरून शेळीसारखें ओढून आणून त्यास मालकाचे स्वाधीन केलें. हें कौतुक पाहून कुणब्यास मोठा आनंद झाला व सर्व लोकांत महाराजांचे सामर्थ्याबद्दल मोठें आश्चर्य वाटलें.

## अरे रावण येतील रावण.

महाराजांची कीर्ति पसरून पुढें मोठमोठे सरदार, संस्थानिक वगैरे दर्शनास येऊं लागले. तेव्हां कोणी सेवेकरी म्हणाला, 'आतां मोठमोठे लोक येऊं लागले बरें का.' ते ऐकून महाराजांनीं उत्तर दिलें, "**अरे रावण येतील बरें रावण.**"

## अक्कलकोट येथें कुशावर्ततीर्थ—राजेंद्र बावडी.

श्रीदत्त स्वामीमहाराज यांच्या वास्तव्यानें अक्कलकोट हें एक मोठ्या क्षेत्रांपैकीं क्षेत्र बनून गेले आहे. महाराजांचे मठ चार पांच ठिकाणीं आहेत. गांवाबाहेर

बाजारपेठेंत चोळापाचे घराजवळ महाराजांची मुख्य समाधि आहे. गांवांत वडा-खालीं महाराज निजधामास गेले, तेथेंही पादुकांची स्थापना केलेली असून मठ, सभामंडप वगैरे उत्तम काम झालेलें आहे. शुष्क काष्ठाचे पाटावर महाराजांच्या पादुका वठल्या, तो पाटही एका मठांत ठेविलेला आहे. तसाच आणखी एक ग्रामजोशाचे घराजवळ राजे रायराय यांनीं हजारों रुपये खर्च करून चौक व त्यांत मठ बांधलेला आहे. ह्याप्रमाणें अक्कलकोट हें दत्तस्थानांपैकीं एक मुख्य स्थान बनून राहिलें आहे. अक्कलकोट हें जरी राजधानीचें गांव होतें, तरी वस्ती अगदीं भिकार असून कांहींच शोभा दिसत नसे. महाराज अक्कलकोटास आल्यावर 'अक्कलकोट गुलाबाचे फुलाप्रमाणें करीन,' म्हणून वारंवार म्हणत असत. त्याप्रमाणें तें गांव सुधारून हल्लीं त्यावर गुलाबाचे फुलाप्रमाणें टवटवी आलेली दिसते. महाराजांचे संबंधानें तेथें व्यापार वाढून जे लोक केवळ दरिद्री होते, ते हल्लीं श्रीमान् झालेले आहेत. भिकार धाबेघरांचे ठिकाणीं हल्लीं मोठमोठ्या हवेल्यांनीं आपलीं डोकीं वर केली आहेत. पेठेंतील समाधीजवळ एक औदुंबरवृक्ष महाराजांनीं स्वतः लावलेला आहे त्याची सेवा केली असतां भूतप्रेतादि बाधा निरसन होऊन मनेप्सित कामना पूर्ण होतात. या मठाजवळ चोपाळाचे घर आहे. त्याचे जवळ एक मोठी बावडी नवीन खणलेली आहे. तीस कुशावर्ततीर्थ असें नांव महाराजांनीं दिलें आहे. ही विहीर खणूं लागले तेव्हां महाराज चोळापाचे घरींच होते. रंगापा सेवेकरी यानें महाराजांस विनंति केली, 'महाराज या विहिरींत भागीरथी आली पाहिजे." तेव्हां महाराजांनीं गणपतराव सेवेकरी यास भवानी सहस्त्रनामाचें पारायण करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें पारायण झालें. पुढें विहिरीस पाणी लागलें. तेव्हां एकमुखी रुद्राक्ष रंगापा सेवेकरी याचें शेंडींत होता, तो महाराजांनीं मागितला. मग रंगापा व भुजंगा शिपायी या दोघांस आज्ञा केली, "तुम्ही विहिरींत जाऊन स्नान करा, व रुद्राक्षासही स्नान घाला." मग ते दोघे जाऊन त्यांनीं विहिरींत स्नान केलें, व बेल आणि रुद्राक्ष पाण्यांत बुडविला. बेल आणि आणि रुद्राक्ष नाहींसा झाला. तेव्हां रंगाप्पा येऊन त्यानें महाराजांस स्नान केल्या-बद्दल सांगितलें. तसेंच रुद्राक्ष आणि बेल नाहींसा झाल्याचेंहि सांगितलें. महा-राजांनीं सांगितलें, "बेल व रुद्राक्ष त्र्यंबकेश्वराला गेले, जो पुण्यवंत असेल त्यास कुशावर्तांत सांपडतील. हें विहिरीचें तीर्थ कुशावर्त आहे. जो कोण स्नान करील त्याचे गोहत्येचें पातक जाईल," म्हणून महाराजांनीं सांगितलें. याप्रमाणें तीर्थ प्रगट केलें. विहिरीस राजेंद्रबावडी म्हणून महाराजांनीं नांव ठेविलें.

## सौ. गयाबाईस पुत्रप्राप्ती.

महाराज विश्वकुटुंबी होते. म्हणजे हे साग्र विश्व त्यांचें कुटुंबच होते. ॥ **ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्** ॥ या भगवद्वाक्याप्रमाणें महाराज जशास तसे होते. महाराज पूर्ण दयाळू होते. भक्तजनइच्छितकामना परिपूर्ण करणारे ते कल्पतरूच होते. इतकेंच कीं, कोणतीही गोष्ट धांदलीनें होत नसे. कोणी आपली मनकामना त्वरित पूर्ण व्हावी, म्हणून महाराजांजवळ चिंतन करीत बसला कीं, "उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग." हें म्हणण्याचा महाराजांचा सपाटा चाललाच. पण भक्तांच्या इच्छित कामना निश्चयानें सिद्धीस जात असत. मात्र सावकाशीनें काम होत असे. अक्कलकोटास रामाचार्य म्हणून भिक्षुक होते. त्यास चार कन्या असून पुत्रसंतति नव्हती. महाराज त्याचें घरीं कधीं कधीं जात येत असत. रामाचार्यांचें कुटुंब सौ. गयाबाई महाराजांस पुत्रप्राप्तीबद्दल हमेशा प्रार्थना करीत असें. 'तुला एक मुलगा आम्ही देऊं,' म्हणून तिला महाराज म्हणत. याप्रमाणें दोन वर्षें झालीं, पुत्र झाला नाहीं. गयाबाई महाराजांस वारंवार पुत्रप्राप्तीबद्दल प्रश्न करी. "होईल, होईल." म्हणून उत्तर देत. याप्रमाणें सहा वर्षें झाझीं, गयाबाई निराश होऊन एके दिवशीं महाराजांस म्हणाली, "महाराज सहा वर्षें झालीं, पुत्र होत नाहीं, आपण उगीच कां मला आशा दाखविता? माझ्या नशिबीं नसेल तर तसेंच सांगा, आपल्या आशीर्वादानें ह्या जन्मींच पुत्र होईल कीं पुढल्या जन्मीं, त्याची स्पष्टता करावी." ह्याप्रमाणें अति विनयानें महाराजांची प्रार्थना केल्यावरून महाराज म्हणाले, "**तुला ह्याच जन्मीं पुत्र देऊं.**" पुढें दोन वर्षें आणखी गेल्यावर गयाबाईस पुत्ररत्न झालें. त्या वेळीं बाईचें वय ४५ वर्षांचें होतें. हेंच बाईचें शेवटचें संतान आहे. मुलाचें नांव कृष्ण असून तो हल्लीं अक्कलकोटास शाळेंत शिकत असे. रामाचार्य कैलासवासी आहेत.

## बोरीच्या झाडास प्रदक्षिणा घालून पुत्रप्राप्ति.

मुंबई शहरीं कृष्णराव अनंत ऊर्फ भाऊराव सरदेसाई म्हणून जी. आय्. पी रेल्वेंत क्लार्क आहेत. ते मूळचे संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी येथील राहणारे असून तेथील सरदेसाई होते. ते बहुत वर्षांपासून आपला गांव सोडून मुंबईस नोकरी धरून राहिले होते. श्रीस्वामीसुत (हरीभाऊ) ह्यांनीं मुंबईस श्रीस्वामींचा मठ स्थापन केल्यावर त्यांत भाऊराव हे भजन-पूजन करीत असत. यांस एका पुत्रा-

वांचून संतति मुळींच नव्हती. त्यांचें कुटुंब जन्माचें क्षयरोगी असून केवळ अस्थिचर्म धारण करून होतें. त्यांस कोणी पाहिलें तर हल्लीं त्यांस असलेला मुलगा त्यांचा आहे, असें कोणास वाटावयाचें नाहीं. असो. श्रीस्वामीसुताचे मुखानें श्रीस्वामी महाराजांची कीर्ति ऐकून त्यांजबरोबर भाऊराव स्वामीमहाराजांचे दर्शनास गेले. मुंबईस परत आल्यावर कांहीं दिवसांनीं आपल्या कुटुंबास घेऊन भाऊराव अक्कलकोटास गेले. त्यांचे कुटुंबाचें नांव सौ० अन्नपूर्णाबाई होतें. उभयतां दंपत्यानें महाराजांची एकनिष्ठपणें सेवा केली. 'मनांतील हेतु, आपणांस संतति होऊन आपल्या जन्माचें सार्थक व्हावें.' पुढें एके दिवशीं अन्नपूर्णाबाईनें महाराजांची सेवेकरीण सुंदराबाई हिची विनंति करून आपल्यास संतति होईल कीं नाहीं, याबद्दल महाराजांस प्रश्न करण्यास सांगितलें. महाराजांस सुंदराबाईनें सांगितलें, 'अन्नपूर्णाबाई संततीची इच्छा धरून श्रीचरणापाशीं आली आहे, महाराजांनीं कृपा करून तिजला पुत्र द्यावा.' महाराजांनीं उत्तर दिलें, '**बोरीचे झाडास तिनें प्रदक्षिणा घालाव्या, म्हणजे तिला अग्नीसारखा पुत्र होईल.**' बाईनें तथास्तु म्हणून स्वामीचरणीं मस्तक ठेवून मुंबईस परत गेली. आपल्या पतीस तिनें महाराजांची आज्ञा कळविली; "बोरीचे झाडास कोणी प्रदक्षिणा घालतांना ऐकिलें नाहीं, व पाहिलें नाहीं, आपण प्रदक्षिणा घातल्यास लोक नांवें ठेवितील, कसें करावें," म्हणून तिनें भाऊरावांची सल्ला विचारिली. भाऊराव म्हणाले, "महाराजांचे बोलण्याचा अर्थ कोणास कळत नाहीं, करितां तूं पिंपळास प्रदक्षिणा घाल, म्हणजे झालें." पुढें बालमुकुंद-बोवाचे मठानजीक अश्वत्थवृक्ष आहे, त्यास एक वर्षभर बाईनें प्रदक्षिणा घातल्या, पण पुत्र झाला नाहीं. बाई पुत्रप्राप्तीबद्दल निराश होऊं लागली. भाऊरावानें तिची खात्री केली कीं, श्रीस्वामींचा आशीर्वाद कालत्रयीं असत्य होणार नाहीं. एके दिवशीं श्रीस्वामीसुतांचे मठांत भाऊराव दर्शनास गेले असतां, श्रीसच्चिदानंद स्वामीकुमारां-जवळ, भाऊरावानें महाराजांची बोरीचे झाडास प्रदक्षिणा घालण्याबद्दल आज्ञा केल्याची गोष्ट सांगितली. ते आणखी म्हणाले, 'आपलें कुटुंब अश्वत्थास एक वर्ष प्रदक्षिणा घालीत असतें, पण फलप्राप्ति नाहीं.' स्वामीकुमारानें विचार करून जबाब दिला, 'महाराजांचे आज्ञेचा अर्थ तुम्हांस समजला नाहीं. श्रीस्वामीसुतास महाराज "बोरीचें झाड" म्हणत असत. श्रीस्वामीसुताचे मठांत येऊन बाईनें सेवा केल्यास कामना खचित पूर्ण होईल.' पुढें उभयतां स्त्रीपुरुषांनीं महाराजांचे मठांत सेवा करण्याचा क्रम चालविला, व कांहीं वर्षांनीं भाऊरावांची स्त्री गरोदर झाली. पांच महिने लोटल्यावर तिजला आपल्या घरीं कोंकणांत बाळंत-

पणास पाठविलें. भाऊरावांस मोठी पंचाईत पडली, 'श्रीस्वामीकृपेनें स्त्री गरोदर झाली हें चांगलें झालें, पण ती फार अशक्त असल्यानें तिची निर्विघ्नपणें सुटका होऊन एका जिवाचे दोन जीव होतील, तो सुदिन., श्रीस्वामीचरणीं पूर्ण भरंवसा ठेवून, भाऊराव स्वस्थ राहिले. नवमास पूर्ण झाल्यावर एके दिवशीं रात्रीं भाऊरावांस स्वप्नांत स्वामी महाराजांनीं येऊन सांगितलें, "मी सोनवड्यास स्नानास जातों." सोनवड्यास अन्नपूर्णाबाई बाळंतपणास गेली होती. भाऊरावांस वाटलें कीं, कांहीं तरी दुश्चिन्ह आहे. आपणास पुत्रमुख तर नाहींच, पण बायकोही दृष्टीस पडते कीं नाहीं, कोण जाणे? दुसरे दिवशीं प्रातःकाळीं अन्नपूर्णाबाई बाळंत होऊन पुत्र झाल्याचें पत्र आलें. सदरचा वरदी पुत्र पंधरा सोळा वर्षे उमरीचा असून, इंग्रजी शिकत असे. त्याची कांति व स्वभाव केवळ अग्नीसारखा आहे. भाऊराव यांस या पुत्रावांचून मुळींच संतति झाली नाहीं. पुत्र झाला तेव्हां भाऊरावांचें वय पन्नास वर्षांचें असून त्यांचे रोगी कुटुंबाचें वय पस्तीस वर्षांचे होतें. निर्जीव लांकडास अंकुर फुटणें जितकें आश्चर्याचें आहे, तितकेंच आश्चर्य क्षयरोगी अन्नपूर्णाबाईस पुत्रप्राप्ति झाल्याचें आहे. श्रीस्वामीची दृढभक्ति केल्यास भक्तजनांचे मनोरथ ह्याप्रमाणें पूर्ण होतात भक्ति मात्र पूर्ण पाहिजे.

## थडग्यांत निजून महाराजांनीं राजेरायरंचा मृत्यु टाळला.

श्रीमंत रा० रा० शंकरराव राजे रायराय यांस ब्रह्मसंमंध असून क्षयरोगही होता. सहा लक्षांची सालीना त्यांस जहागीर होती. पण ब्रह्मसंमंधानें शरीरास सुख कसें तें लागेना. दिवसें दिवस प्रकृति जास्त बिघडत चालली. नामांकित हकीम, वैद्य, डॉक्टर, यांनीं बहुत परिश्रम केले. पण ते सर्व व्यर्थ गेले. शंकरराव यांची प्रकृति जास्त बिघडून त्यांस वाटूं लागलें कीं, आपली आयुर्मर्यादा पुरी झाली. अनेक जपानुष्ठानें, ब्राह्मणसंतर्पणें व दानधर्म त्यांनीं केला, आराम पडेना. शेवटीं सद्गुरुचे कृपादृष्टीनें आराम होईल, असें कोणी सांगितल्यावरून श्रीगाणगापुरास शंकरराव पत्नीसह जाऊन राहिले. तेथें तीन महिने राहून पुष्कळ अनुष्ठानें वगैरे केल्यावर त्यांस दृष्टांत झाला, 'अक्कलकोटास श्रीसमर्थांकडे जावें, म्हणजे आरोग्य होईल.' शंकरराव यांची श्रीसमर्थांचे ठिकाणीं विशेष श्रद्धा नसल्यानें ते तसेंच गाणगापुरास राहिले. पुनः त्यांस दृष्टांत झाला, 'अक्कलकोटास गेल्याशिवाय आरोग्य होणार नाहीं.' तेव्हां नाइलाज होऊन ब्राह्मणसंतर्पण करून राजे रायराय अक्कलकोटास येऊन देशमुखांचे वाड्यांत उतरले. श्रीसमर्थांची स्वारी आप्पा

कर्दळकर यांचे माडीवर होती. शंकरराव दर्शनास गेले. महाराज पलंगावर पडले होते. चरणीं मस्तक ठेवून राजे रायराय सन्निध बसले. सुंदराबाई सेवा करीत होती, तिजजवळ शंकररावानें गोष्ट काढिली, "व्याधीनें मी फार नाडलों आहें." श्रीसमर्थांजवळ माझ्याबद्दल प्रार्थना करावी. सुंदराबाई म्हणाली, "तुम्हांस आरोग्य झाल्यास काय द्याल?" शंकरराव म्हणाले, "तुम्ही सांगाल ते देऊं." शंकरराव हे लक्षाधीश होते, तरी त्यांचे आंगावर रोगामुळें तेज मुळींच नव्हतें. त्यांचा वर्ण काळाकुट्ट होता. बाईस वाटलें, कोणीतरी साधारण गृहस्थ असावे. असें समजून बाईनें मोठें मन करून शंकरराव यांस, 'बरे झाल्यास द्याल दोन हजार रुपये?' म्हणून प्रश्न केला. शंकरराव म्हणाले, 'मी बरा झाल्यास दहा हजार रुपये देईन.' बाई मनांत चकित झाली. तिची खात्री होईना. दहा हजार रुपये देण्याचा संकल्प करून पाणी सोडण्यास बाईनें सांगितलें. त्याप्रमाणें शंकरराव यांनीं केलें. 'महाराज, यांस बरें करावें,' म्हणून बाई म्हणाली. महाराजांनीं कांहीं जबाब न देतां उठून चालूं लागले. शेखनूर साहेबाचे दरग्यांत महाराज गेले. तेथें मुसलमान लोकांची स्मशानभूमि आहे. एक नवीनच खांच केलेलें थडगें होतें, त्यांत छाटी टाकून महाराज निजले. थोडा वेळ तेथें पडून महाराज उठले. राजे रायराय यांस फकिरांस भोजन देण्यास सांगितलें. पुढें महाराज वडाखालीं गेले. सेवेकरी लोक म्हणूं लागले, 'राजे रायराय यांचा मृत्यु, आपण थडग्यांत निजून त्या कृतीनें महाराजांनीं टाळला.' शंकरराव यांनीं फकिरांस खाना देऊन शेखनूरचे कबरस्थानावर कफनी चढविली. आठ दहा दिवस ते अक्कलकोटास राहिले. लिंबाचा पाला बारीक वांटून त्यांत नऊ मिऱ्यें घालून तें औषध घ्यावें, म्हणून आज्ञा झाल्याप्रमाणें तें औषध सुरू केलें व त्यापासून त्यांस गुण वाटूं लागला. पुढें राजे रायराय हे हैदराबादेस गेले. पांच सहा महिन्यांनीं प्रकृति चांगली होऊन ते पुनः दर्शनास आले. श्रीसमर्थांचे दर्शन घेऊन विज्ञप्ति केली, "श्रीकृपेनें आपणास आराम पडला आहे, करितां दहासहस्र रुपये श्रीचरणीं अर्पण करण्याचें उदक सोडलें आहे, त्या रुपयांचें काय करावें, त्याची आज्ञा व्हावी." तेव्हां महाराजांनीं मठ बांधण्याबद्दल आज्ञा केली. दत्तात्रय त्र्यंबक गाणगापूरकर, कारकून, हे बरोबर होते. रामाचे देवळानजीक मारुतीचें देऊळ आहे, तेथें जाऊन जागा दाखवावी म्हणून महाराजांनीं भुजंगा व मुंबईचे ठाकूरदास बोवा तेथें आले होते, त्यांस आज्ञा केली. चुनेगची मठ बांधण्याबद्दल आज्ञा झाली, ही बातमी रा० नानासाहेब बर्वे कारभारी, वगैरे मंडळीस कळल्यावर, गांवाबाहेर मठ बांधल्यास तेथें कोणी राहाणार नाहीं, करितां

गांवांतच मठ बांधल्यास चांगलें, अशी त्यांनीं सूचना केली. महाराजांकडे विनंति करितांच, बाहेर मठ करण्याची आज्ञा झाली. पुढें मठाचें काम पुष्कळ वर्षें चाललें होतें. ब्राह्मणभोजन मोठ्या थाटानें झालें. सुमारें सहस्र ब्राह्मण भोजनास होते. एकेक रुपया ब्राह्मण–सुवासिनींस दक्षिणा वांटली. गर्भारशी बायकोस दोन रुपये दक्षिणा वांटली. अक्कलकोटास पुष्कळ बडे लोक येऊन, ब्राह्मणभोजन व दानधर्म करून गेले. त्यांत दक्षिणेबद्दल राजे रायरायांची, व पक्वान्नाबद्दल बडोदेकरांची फार कीर्ति झाली.

स्वामिभक्तपैकीं एक दोन गृहस्थांबद्दल हकीगत लिहून ग्रंथ परिपूर्ण करण्याचा आमचा विचार आहे.

## रावसाहेब गणेश बल्लाल मुळेकर यांस दर्शन, आशिर्वाद व अलभ्य पादुकांची चमत्कारीक रीतीनें प्राप्ति.

रावसाहेब गणेश बल्लाळ मुळेकर, मामलेदारीचे कामावर होते. ते रेविन्यू खात्यांत शिरण्यापूर्वी असिस्टंट मास्तर होते, व कांहीं दिवस कोर्टांत बेलीफ होते. आपणास मोठा हुद्दा मिळून आपण मामलेदार व फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट होऊं, हें त्यांच स्वप्नींहि नव्हते. केवळ श्रीसमर्थांचे कृपें करून त्यांस उत्तम स्थिति प्राप्त झाली. संगमनेरकर कोर्टांत बेलीफाचे कामावर असतां त्यांस त्यांचे चुलतबंधु रा० रा० कृष्णाराव सदाशिव यांनीं सोलापुरांस हेड क्लार्क असतां, कलेक्टरकचेरींत क्लार्कचे जागेवर आणण्याची खटखट केली. त्या जागेवर जाऊन गणपतराव रुजू होतात, तों अक्षर वाईट आहे, या सबबीनें त्यांस क्लार्कचे जागेवरून कमी करून परत कोर्टाकडे जाण्याचा हुकूम झाला. कोर्टाकडील व शाळाखात्यांतील नोकरीवर हक्क नसल्यानें त्यांस घरीं बसावें लागलें. अशा संकट-समयीं मानव अधिकारी वर्गाकडे हांजी हांजी करण्याची पंचाईत न करितां त्यांनीं श्रीस्वामी जगद्गुरु पतितपावन यांजकडे धांव घेतली. यापूर्वी गणपतराव यांनीं श्रीसमर्थांची कीर्ति मात्र श्रवण केली होती; पण प्रत्यक्ष दर्शन झालें नव्हतें. अक्कल-कोटगांवांत शिरतांच, श्रीस्वामी महाराजांची ब्रह्मानंद देणारी मूर्ति सडकेवरच विराजमान झालेली गणपतरावांचे दृष्टीस पडली. अहाहा ! दत्तमूर्ति पाहून गणपत-रावांचे आनंदास पारावर नाहींसा झाला. आनंदाश्रूंनीं अंध्रि क्षालन करून गणपतराव उभे राहिले. अशी आनंदमूर्ति जन्मांत त्यांचे दृष्टीस पडली नव्हती. ग्रामांत जाऊन

यांनीं नैवेद्य करवून श्रीसन्निध घेऊन आले, तों पावेतों समर्थांची स्वारी खासबागेंत जाऊन विहिरी नजीक विराजमान झाली होती. या वेळेस महाराजांनीं तमोवृत्तीचा स्वीकार केला होता. आसपास शंभर कदमांवर कोणास फिरकूं देत नव्हते. नैवेद्य सेवेकऱ्यानें पुढें केल्याबरोबर महाराज गालिप्रदान करीत. असें बहुत वेळां होऊन शेवटीं नजीकचे सेवेकऱ्या जवळ नैवेद्य देऊन गणपतरावांस परत जावें लागलें. पुन्हां तिसरे प्रहरीं गणपतराव दर्शनास आले. त्या वेळेस महाराज फार शांत स्थितींत असून आनंदी होते. अशा वेळीं गणपतरावानें चवरी वारणें, चरण चुरणें वगैरें अल्पसेवा केली. महाराजांचे सान्निध्यानें गणपतरावांची तल्लीनवृत्ति होऊन देहभान हरपलें. यां प्रमाणें थोडे दिवस गेले. आपली नोकरी गेली ती मिळण्यासंबंधानें विचारण्याची संधि गणपतरावांस मिळेना. महाराजांचें जाज्वल्य तेज पाहून प्रश्न करण्याचा त्यांस धीर होईना. रामनवमीचे आदले दिवशीं गणपतरावांस एका सेवेकऱ्यानें विनंति केली, 'उद्यां रामनवमी आहे, सबब फराळाकरितां आपणांस आठ आण्यांचें दहीं विकत घेऊन द्यावें.' गणपतरावानें विचार केला, 'आपलें अडलेलें काम सेवेकऱ्याकडून करवून घेऊन दहीं द्यावें.' गणपतराव सेवेकऱ्यास म्हणाले, 'एक काम आहे. तेवढें झालें म्हणजे आनंदानें आपण दहीं घेऊं.' सेवेकऱ्यानें काम कोणतें आहे तें विचारलें. आपली नोकरी गेली आहे ती मिळण्यासंबंधानें समर्थांस प्रार्थना करावयाची असल्याचें गणपतरावांनीं सांगितलें. सेवेकऱ्यानें तत्काळ समर्थांस प्रश्न केला. "यांची नोकरी गेली आहे ती केव्हां लागेल ?" महाराज म्हणाले, "नोकरी लागली आहे जा." हें ऐकून गणपतरावांस समाधान वाटलें. पण थोडी शंका असल्यानें पुन्हा सेवेकऱ्यास विनंति केली, 'आपणास चाळीस रुपयांची नोकरी होती, आतां किती रुपयांची लागेल, याबद्दल आणखी एकवार प्रश्न करावा.' गणपतरावांचे अर्जावरून त्यांस १५ रुपयांची नोकरी देण्याचें कलेक्टरसाहेबानें कबूल केलें होतें. सेवेकऱ्यानें महाराजांस पुन्हा प्रश्न केला, "महाराज नोकरी किती रुपयांची लागेल ?" तेव्हां महाराज एकदम म्हणाले, "**लाख रुपयांची लागली जा.**" हा आशीर्वाद ऐकून गणपतरावांस परमानंद झाला. सेवेकऱ्यास आठ आण्यांचें दहीं घेऊन दिलें, आणि थोडे दिवस तेथें राहून गणपतराव गाणगापुरास गेले. जातांना महाराजांनीं एक चमत्कार केला. गणपतरावांची नोकरी गेली असल्यानें खर्चाची टंचाई होती. व गाणगापुरास लागणारे रुपये निराळे ठेवून कडबगांवपावेतों लागणारे टांग्याचे पैसे गांठीं मारून ते निघाले. जास्ती खर्चण्यास राहिलें नाहीं. टांग्यांत बसून चालू

झाले तों बातमी लागली कीं, समर्थांची स्वारी स्टेशनचे वाटेवरच रामाचे देवळांत आहे. दर्शन घेतल्याशिवाय जातां येईना. नारळ वगैरे पुढें ठेवण्यास घ्यावा, तर पैसे बेतापुरतेच. सबब कसें करावें याबद्दल त्यांस विचार पडला. टांग्यांतील दुसऱ्या भाडेकऱ्यांनीं समर्थांपुढें ठेवण्यास खारका घेतल्या. त्यांतील चार नासक्या कुचक्या मिळालेल्या खारका घेऊन समर्थांपुढें ठेवून चरणीं मस्तक ठेविलें. त्यासरसे महाराज रागावून म्हणाले, **"नारळ घेऊन ये जा."** हें ऐकून निरुपाय होऊन रुपया मोडून चार आण्यांचा नारळ आणून महाराजांपुढें ठेविला. महाराजांनीं तो उचलून एक शास्त्री जवळ बसले होते त्यांस दिला. गणपतरावानें मग कडबगांवचा रस्ता धरिला. मनांत चिंता कीं महाराजांनीं तर रुपया मोडण्यास लाविला, आतां सोलापूर-पावेतों खर्ची कशी पुरणार. गाणगापुरास जाण्यास गुड्डूर स्टेशन लागतें. तेथें गणपतराव उतरले. पाहतात तों तेथील स्टेशनमास्तर हरी परांजपे आपल्या गांवचाच (खालापूर) आहे; तो बाळमित्र असल्यानें त्याचेच घरीं गणपतरावानें बिऱ्हाड ठेवून भोजन केलें. या मित्राजवळ खर्चण्यास पांच रुपये मागावे असें गणपतरावाचे मनांत आलें; पण आपली नौकरी गेली असल्यामुळें पांच रुपये उसने हरी भाऊ देतो कीं नाहीं, याची त्यांचे मनांत शंका आली. अशा विचारांत ते आहेत तों हरी भाऊ त्यांस म्हणाले, "नथोबा, (गणपतरावाचें दुसरें नांव) सोलापुरास गेल्यावर आपणास आंगरख्यास कापड पाठवून द्यावें." हें ऐकून गणपतरावास आनंद झाला. त्यांस क्लार्कची जागा मिळाल्यामुळें झकपक पोशाखानें ऑफिसांत जावें लागणार, म्हणून आंगरख्यास उत्तम हरकाचें कापड त्यांनीं घेऊन ठेविलें होतें. पण आंगरखे करण्यापूर्वीच नोकरी गेल्यामुळें कापड तसेंच गाठोड्यांत शिल्लक राहिलें होतें. तें हरीभाऊस देऊन गणपतरावानें पांच सहा रुपये घेतले. महाराजांनीं रुपया मोडण्यास लाविला होता, त्याबद्दलचा विषाद दूर होऊन, उलटे महाराजांचे कृतीचा त्यांस चमत्कार वाटला. गणपतराव पुढें गाणगापुरास जाऊन यात्रा करून परत सोलापुरास आले. ज्या दिवशीं नोकरी लागली असा महाराजांनीं आशीर्वाद दिला होता त्याच दिवशीं, त्याच वेळीं, बरोबर महिन्यानें गणपतरावांस नोकरी लागली. तो दिवस शनिवार होता. सोलापूर मामलेदार कचेरींत कारकुनाची प्रथम त्यांस १५ रुपये दरमहाची नोकरी लागली. थोडे महिन्यांनीं त्यांस फर्स्ट असिस्टंट कलेक्टरचे ऑफिसांत (ज्याच्याकडे अक्कलकोटचे ॲक्टिंग पोलिटिकल एजंटचें काम होतें) २० रुपयांची, क्लार्कची नोकरी मिळाली. यामुळें अक्कलकोटास जाण्याचा वारंवार प्रसंग येई.

महाराजांची वारंवार भेट होत असल्यानें आपणास लाख रुपयांची नोकरी मिळाली असें गणपतरावांस वाटूं लागलें. ही गोष्ट १८७६ सालची आहे. हें दुष्काळाचें साल होतें. गणपतरावांची स्वामिभक्ति वृद्धिंगत होऊं लागली. अनेक गुप्त खुणा दाखवून आपल्या अंतरसाक्षित्वाबद्दल व अवतारीपणाबद्दल महाराजांनीं गणपतरावांची खात्री केली. गणपतराव महाराजांचे निस्सीम भक्त झाले. मॅजिस्ट्रेटी लोअर व हायर स्टयांडर्डच्या परीक्षा पास होऊन, सन १८८१ सालीं म्हणजे पांच वर्षांतच गणपतराव अवल कारकून झाले. व त्याच सालीं मामलेदार झाले. उत्तरोत्तर त्यांना बढती मिळून, ते फर्स्ट ग्रेड मामलेदार व फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट झाले. याप्रमाणें श्रीस्वामींचे आशीर्वादाप्रमाणें त्यांस लाख रुपयांची नोकरी लागली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वामी समर्थांशिवाय दुसरें दैवत ते जाणत नाहींत. समर्थांचीही त्यांजवर पूर्ण कृपा होती. नोकरी संबंधानें अनेक वेळ अनेक संकटें वेळोवेळीं आलीं. पण श्रीस्वामी समर्थांनीं तीं सर्व दूर केलीं.



ग्रंथविस्ताराचे भीतीमुळें त्या बद्दल हकीकत येथें देतां येत नाहीं. पुणे वैभव वर्तमानपत्रांत श्रीस्वामीचरित्र छापून प्रसिद्ध करण्याचे कामीं गणपतरावांनीं बरेंच परिश्रम

घेतले होते. महाराज पूर्ण दत्तावतार असल्याबद्दल त्यांची बालंबाल खात्री झाली. त्यांचे मनोगताप्रमाणें श्रींचा दृष्टांत होऊन त्यांचे पादुकांचा प्रसाद त्यांस चमत्कारिक रीतीनें थोडे वर्षांपूर्वी प्राप्त झाला. नंतर पादुकांची पूजा करून ते अत्यानंदांत राहिले. त्या पादुकांचें चित्र पान २५९ वर दिलें आहे.

हे गणपतराव महाराजांचे पश्चात् जवळ जवळ २०–२२ वर्षे सेवाअर्चा करून थोडे दिवसांचे आजारानंतर ता. १३–१०–१९०० सालीं श्रीस्वामीचरणीं लीन झाले.

## अक्कलकोटास पंढरीचे विठोबाचें दर्शन.

दुसरे निस्सीम भक्त रा. रा. रामचंद्र केरोबा ऊर्फ बळवंतराव भेंडे हे होत. हे जातीचे सारस्वत ब्राह्मण असून ते मुंबईत जांबुळवाडींत घर नंबर १ यांत राहत असत. त्यांची भक्ति मूळ स्वामिचरणीं कशी लागली, त्याबद्दल त्यांनीं दिलेली हकीगत खालीं दिली आहे—

सन १८६९–७० सालीं त्यांचें वय २८ वर्षांचें असून शरिरांत एकाएकीं आजार उत्पन्न होऊन शरीर फार अशक्त झालें. त्यावर क्षयरोगाची भावना दिसूं लागली. डोके फार हलकें झाल्यानें भ्रमाचीं चिन्हें उत्पन्न झालीं. दोन तीन महिने औषधें घेतलीं, परंतु कांहीं गुण येईना. त्यांना ज्या सावकारी आफिसांत नौकरी होती त्याला नुकसानी लागल्यामुळें ऑफीस बंद झालें; व त्यांची नौकरी गेली. त्या वेळीं त्यांचे मावसभाऊ रावबहादूर नागोबा सोनोबा पुण्यास हुजूर डेप्युटी कलेक्टर होते. त्यांनीं हवा पालटण्याकरितां त्यांना पुण्यास आणिलें. तेथें राजवैद्य गणोबा व आपा वैद्य वगैरेंचीं औषधें घेतलीं. परंतु कांहीं गुण येईना. पुण्यास असतां कांहीं मंडळीच्या सांगण्यावरून समजलें कीं, अक्कलकोटास श्रीगुरु स्वामीसमर्थ श्रीपाद श्रीनरहरीचा अवतार प्रगट झाला आहे. तेथें दर्शनास गेल्यावर सर्व रोगराई नाहींशी होईल. ही गोष्ट रावसाहेबांस मान्य झाली. नंतर लौकरच त्यांनीं आपल्या पदरचा शिपाई देऊन व अक्कलकोटचे त्या वेळचे मामलेदार रा. रा. बाबुराव यांस पत्र देऊन, त्यांची बहीण व मातोश्री यांसह अक्कलकोटास रवानगी केली. अक्कलकोटास तेथील मामलेदार यांना पत्र दिल्यावर त्यांनीं आपल्या घरीं सर्व जणांस राहण्यास जागा दिली. पहिल्या दिवशीं रीतीप्रमाणें महाराजांचें दर्शन घेतलें. दुसऱ्या दिवशीं, पूजेचें साहित्य घेऊन दर्शनास गेले.

श्रींची स्वारी खास बागेंत एका विस्तीर्ण वडाचे छाये खालीं बसली होती. सर्वांस असा भास झाला कीं, साक्षात् श्रीशिव योगीच बसले आहेत. ते पूजेचें साहित्य घेऊन जवळ गेले. पादुकांस केशर गंध लावून महाराजांच्या सर्वांगास उटी लाविली. व सुंदर पुष्पांची माळ गळ्यांत घालून यथाशक्ति दक्षणा, नारळ फळफळावळ पुढें ठेवून, मोठ्या प्रेमानें साष्टांग नमस्कार घातला; त्या वेळीं त्यास असें वाटलें, 'आज आपलें कुळदैवत शंकर यांचें प्रत्यक्ष दर्शन होऊन जन्माचें सार्थक झालें.' नमस्कार करून उठत आहेत इतक्यांत महाराज हाक मारून म्हणाले, "**अरे इकडे ये;**" व नारळ उचलून पदरांत टाकितां टाकितां म्हणाले, "**तोंड वासून बसलास कशाला, जा आपल्या घरीं.**" हें ऐकून सर्व सेवेकरी म्हणाले, 'आपणास प्रसाद झाला, आतां आपण जावें.' मातोश्रीनें पूजा केली, तिला आपले गळ्यांतील माळ काढून समर्थांनीं दिली. नंतर सर्वजण बिऱ्हाडीं परत गेले. घरीं गेल्यावर विचार केला, 'मुंबईचा लांबचा पल्ला असल्यामुळें वारंवार येणें कठीण आहे, करितां आलों आहों तर अक्कलकोटास १०।१२ दिवस राहून महाराजांची लीला पाहून नेत्रांची तृप्ति करून घ्यावी.' अक्कलकोट सोडण्यापूर्वीं मातोश्रीचा असा विचार झाला, 'जातांना पंढरपुरावरून जाऊन श्रीपांडुरंगाचें दर्शन घ्यावें.' हा विचार ठरला त्या दिवशीं संध्याकाळीं खास बागेंत समर्थांचे दर्शनास मातोश्रीस घेऊन गेले असतां, समर्थ एका आंब्याच्या झाडाखालीं कटीवर दोन्ही हात ठेवून उभे राहिलेले दिसले; यामुळें तेथेंच महाराजांनीं साक्षात् पंढरीच्या पांडुरंगमूर्तीचें दर्शन दिलें. सर्व मंडळी विचारूं लागली, आज हा काय चमत्कार आहे ? त्या वेळीं यांनीं सांगितलें, 'आम्ही मुंबईस परत जातांना पंढरपुरावरून जावें असा बेत केला होता. तो अंतरसाक्षित्वानें स्वामींनीं ध्यानांत आणून आम्हांस येथेंच पांडुरंगाचें दर्शन दिलें. नंतर पंढरपुरास जाण्याचा बेत रहित करून गाणगापुरास २।३ दिवस राहून श्रींचें दर्शन घेऊन पुण्यास गेले. व झालेली सर्व हकीगत रावसाहेबांना सांगितली. त्या वेळीं त्यांनाही फार आनंद झाला. व रावसाहेबांनीं त्यांस मुंबईस पाठविलें. पुण्याहून रात्रीं ११ वाजतां निघून सकाळीं ७ वाजतां मंडळी मुंबईस पोहोंचली. घरीं पोहोंचले इतक्यांत आफिसचे साहेबांनीं शिपायाबरोबर चिठ्ठी पाठविली कीं आपण आपल्या पूर्वींच्या नोकरीवर यावें. नंतर नोकरीवर जाऊन आजपावेतों श्रीस्वामिकृपेंकरून दिवसेंदिवस भक्ति करून, आनंदांत राहिले; व देहांत जीव आहे तों पावेतों स्वामिसेवेंत अंतर पडूं नये अशी प्रार्थना करून काळ घालवीत होते.

## चोळाप्पांचा अंतकाळ.

महाराजांचा प्रियभक्त चोळाप्पा याचा अंतकाळ, महाराजांचे आधीं सहा महिने झाला. आश्विन मास होता; महाराजांची स्वारी मणूरास होती. भीमानदीमध्यें महाराजांस लोकांनीं नांवेंत बसवून खेळण्यास नेलें. नदीचे पलीकडे चितापूर म्हणून गांव आहे. त्या गांवानजीक एक टेंकडी आहे. व त्या नजीक एक देऊळ आहे. तेथें महाराज जाऊन बसले. सेवेकरी व गुरें वगैरे मणूरासच होतीं. चोळाप्पा महाराजांबरोबर होता. त्यास महाराज म्हणाले, 'मणूरचे वाटेनें कांटे आहेत, गाई गुरें घेऊन ये. आपण दुसऱ्या वाटेनें जाऊं.' महाराजांचे म्हणण्याचा अर्थ न समजून आपण याच वाटेनें जाऊं, असा चोळाप्पानें आग्रह धरिला. पुनः सकाळचे प्रहरीं महादेवाजवळ महाराज बसले असतां, गाई गुरें आणण्याविषयीं महाराजांनीं चोळाप्पास सांगितलें. चोळाप्पा आग्रह सोडीना. भवितव्य कोणास चुकत नाहीं. पुढील परिणाम ध्यानांत आणून महाराजांचे डोळ्यांस पाणी आलें. महाराज चोळाप्पाबरोबर मणूरास गेले, तेथें मेणेवाले दोन भोयांस पटकीचा आजार होऊन त्यांपैकीं एक मरण पावला. दुसरे दिवशीं समर्थांची स्वारी वाडीस येऊन रानांत देवीचें देऊळ आहे तेथें राहिली. महाराज खेळ खेळत असतां त्यांनीं हातांतील कडें लांब फेंकून दिलें. चोळाप्पानें तें परत आणून महाराजांजवळ दिलें. तेव्हां महाराज म्हणाले, 'कडें तूं आपल्या +++ लावून घे.' संध्याकाळीं सहा वाजतां चोळाप्पास वाखा झाला. रानांत जागा नसल्यामुळें वाडी गांवास मारुतीचें देऊळ आहे, तेथें लोकांनीं चोळाप्पास नेलें. वाख्याचा जोर होऊन रात्रीं बारा वाजतां हातपाय वळूं लागले. चोळाप्पास वाटलें, 'आतां आपण खास मरतों.' बाळाप्पा व सेवेकरी महाराजांजवळ होते, त्यांस बोलावणें पाठविलें. गणपतराव आले. पण बाळाप्पास महाराजांनीं जाण्यास आज्ञा दिली नाहीं. बाळाप्पास दोन तीन बोलावणीं आलीं, तेव्हां महाराजांचें चरणतीर्थ पंढरी नांवाचे संन्यासी महाराजांजवळ बसले होते, त्यांचें हस्तें युक्तीनें घेऊन बाळाप्पा गांवांत गेले, व चोळाप्पास भेटले. महाराजांनीं मरणसमयीं चोळाप्पास दर्शन दिलें नाहीं. यावरून अलीकडे चोळाप्पाची भक्ति समर्थचरणापेक्षां द्रव्याकडे जास्त लागली होती, असें स्पष्ट दिसून येतें. महाराज चोळाप्पास तसाच आजारी सोडून अक्कलकोटास निघून गेले. चोळाप्पा दुसरे दिवशीं तिसरें प्रहरीं मरण पावला. चोळाप्पानें आपल्या घरांत श्रीस्वामींचा देह ठेवण्यास समाधी बांधिली होती; ती तयार होत

असतां महाराज चोळाप्पास म्हणाले, " **चोळ्या हें काय करितोस रे?** " " कांहीं नाहीं महाराज," म्हणून चोळाप्पानें जाब दिला. महाराजांनीं त्याचे वर्म जाणून म्हणाले, " **चोळ्या यांत अगोदर तुला घालीन, मग मी जाईन वरें.** " या म्हणण्याप्रमाणें चोळाप्पास आधीं प्रयाण करावें लागले. महाराज निजधामास जाण्यापूर्वी एक वर्षापासून आपण जाणार अशी चिन्हें दाखवूं लागले. एके दिवशीं महाराज सलगर म्हणून गांव आहे तेथें गेले होते. सायंकाळचे वेळेस कबरस्थानांत जाऊन फिरून आले, व पलीकडे सराट्याचे रान होतें तेथें राहिले. तेथेंही दर्शनास येणाऱ्या लोकांची दाटी होतीच. दर्शनास लोक येत त्यांचे पायास सराटे लागले म्हणजे महाराज थट्टेनें हांसत असत. रात्रीं महाराज रानांतच राहिले.

## निजधामास जाण्याची वेळ नजिक आली.

पहांटेस चार वाजतां महाराजांनीं बाळाप्पाजवळ हुक्का भरून मागितल्यावर महाराज बाळाप्पास म्हणाले, " **आम्हाला फार उंच जावयाचें आहे, फार लांब जावयाचें आहे, माझी नोकरी करण्यास येतोस कीं नाहीं?** " महाराजांचे बोलण्याचा बाळाप्पास त्या वेळेस अर्थ कळला नाहीं. चैत्र वद्य १३ शीची ही गोष्ट आहे. पुढील सालच्या चैत्र वद्यांत महाराजांनीं देह ठेविला. ह्या वेळेपासून महाराज वरचेवर दुश्चिन्हें दाखवीत होते. आरती ओवाळूं लागले म्हणजे ती घेऊन महाराज पालथी घालीत असत.

## लिंगायत साधूचे समाधिवर होम.

सलगराहून महाराज अक्कलकोटास आले. संतांचा मठ म्हणून अक्कलकोटास स्थान आहे, त्या ठिकाणीं एका लिंगाईत साधूची समाधी आहे. समर्थांचें मठापासून जवळच ही समाधी आहे; त्या मठांत महाराज जाऊन समाधीपुढें पलंग टाकून निजले. त्या वेळेस ठाकूरदास बोवा तेथें होते. त्यांनीं समर्थांपुढें तिसरे प्रहरीं कीर्तन केलें. व बावडेकर पुराणिकबोवाही महाराजांसन्निध होते. त्यांस महाराजांनीं दोन चार टोपल्या गोंवऱ्या आणण्याविषयीं आज्ञा केली. पुराणिकबोवा एक टोपलीभर गोंवऱ्या घेऊन आले. 'आपणास होम करावयाचा आहे आणखी दोन तीन टोपल्या घेऊन या,' असें महाराज त्यास म्हणाले. मग त्यांनीं आणखी गोवऱ्या आणिल्या. समाधीवर एक महादेवाची पिंडी होती तिजवर सेवेकऱ्यांकडून महाराजांनीं सर्व गोंवऱ्या रचविल्या, व तूप आणण्याविषयीं महाराजांनीं आज्ञा केली. सेवेकऱ्यांनीं एक मणभर तूप आणिलें. खारीक, नारळ, सुपारी वगैरे जे जे पदार्थ महाराजांपुढें

कोणी ठेविलें ते सर्व ह्या गोंवऱ्यांवर महाराजांनीं टाकविलें व आणविलेले तूपहि त्या गोंवऱ्यांवर टाकवून, त्या चितेस संध्याकाळीं अग्नि लावून दिला. सर्व दिवसभर महाराज त्या दिवशीं निश्चक्र उपाशीं होते. आपल्या गुरुची समाधी जाळतात ही वार्ता ऐकून त्या साधूची सुमारें पंचवीस शिष्यमंडळी महाराजांस शासन करावें, गोंवऱ्या वगैरे उडवून द्याव्या ह्या हेतूनें तेथें आली. पण महाराजांची किती अद्भुत शक्ति होती पहा! महाराजांचे मुखाकडे पाहतांच तोंडांतून एक शब्दही न काढितां चित्राप्रमाणें ते चिप राहिले. चिता पुष्कळ वेळ जळत होती, उजेडल्यावर राख काढून पिंडी धुऊन साफ करण्या विषयीं महाराजांनीं भुजंगास आज्ञा केली. त्यानें तसें केलें. तों पूर्वीपेक्षां दैदीप्यमान तेजाची पिंडी दिसूं लागली. वास्तविक पाहातां अग्नीच्या तापानें त्या दगडाच्या पिंडीचें तुकडे तुकडे होऊन जावे. पण समर्थांची लीला अगाध आहे. ती पिंडी पूर्वीपेक्षां अधिक तेजःपुंज बनली. त्या उष्णतेच्या कडकपणानें दरवाजाचे चिरेही तडकून गेले. पण पिंडीस तिळमात्र इजा झाली नाहीं.

## सर्व मंडळी रडा सर्व मंडळी बोंबा ठोका.

देह ठेवण्याचे अगोदर पंधरा दिवसांची ही गोष्ट आहे. ती अशी कीं, एके दिवशीं महाराज तात्या सुभेदार यांचे घरीं असतां पुष्कळ शिष्यमंडळी जमली होती. दरवाजा बाहेर एक दगडाची कुंडी पडली होती. ती कुंडी उचलून मुरलीधराचे देवळानजीक एक तळें आहे त्यांत नेण्याविषयीं महाराजांनीं सेवेकऱ्यांस आज्ञा केली. त्याप्रमाणें सेवेकऱ्यांनीं कुंडी घेऊन तळ्यावर नेली. महाराजही त्यांचे मागोमाग गेले; महाराजांनीं गुडघाभर पाण्यांत आपण स्वतः जाऊन ती कुंडी पाण्यांत बुडविण्याविषयीं सेवेकऱ्यांस आज्ञा केली. त्या प्रमाणें त्यांनीं केल्यावर '**सर्व मंडळी रडा, सर्व मंडळी बोंबा ठोका,**' म्हणून महाराज म्हणाले.

## महाराजांचें भजन.

आठ दिवस अगोदर महाराज नागणहळ्ळी म्हणून गांव आहे तेथे असतां, "**शिव हर शंकर नमामि, शंकर शिव शंकर शंभो! हे गिरिजापति भवानिशंकर, शिव शंकर शंभो.**" या प्रमाणें भजन करूं लागले. यापूर्वीं भजन महाराजांनीं कधीं केलें नाहीं.

महाराज परसाकडेस बसले म्हणजे स्वस्थ न बसतां लहान अर्भकाप्रमाणें कांहींतरी खेळ खेळत असत. देह ठेवण्यापूर्वीं एक महिनाभर अशा वेळेस ते चौकोनी खडे घेऊन समाधि रूपी आकृती काढून पुढील दुश्चिन्हें दाखवीत असत.

## कन्हणें कुंथणें कांहीं नाहीं.

महाराज तात्या सुभेदार यांचे घरांत राहिले असतां दुपारचे वेळेस शौचास जाऊन बसले. कांहीं कारण नसतां एकाएकीं महाराज लवंडले. लोक म्हणाले, 'असें काय झालें ?' महाराज म्हणाले, 'रांड पटकीनें मला ढकलिलें.' त्या दिवशीं महाराजांचे अंगांत अतिशय ज्वर भरला. सायंकाळीं महाराजांस मुरलीधराचे देवळांत नेल. त्या दिवशीं महाराजांस रेचही फार झाले. दुसरे दिवशीं प्रकृतीस आराम वाटल्यानें मेण्यांत बसून महाराज नागणहल्लीस गेलें. तेथें आंब्याचे बागेंत चार दिवस राहिले; पण तेव्हांपासून महाराजांनीं अन्न वर्ज केलें. महाराजांस आराम पडत नाहीं, हें पाहून सखाराम लोखंड्या सन्निध होता, त्यानें महाराजांस प्रार्थना केली, 'अक्कलकोटास वडा खालीं बसावें.' ती गोष्ट महाराजांनीं मान्य केली. त्यावरून मेण्यांत घालून महाराजांस अक्कलकोटास आणिले. महाराजांनीं अन्न बिलकुल वर्ज केलें. अंगांत तसता विशेष होती, पण दुखण्यांतील कन्हणें, कुंथणें किंवा कोणतीही कुरकूर समर्थांजवळ बिलकुल नव्हती. सर्व आनंदमय होतें. वडाखाली गेल्यावर महाराजांचा प्रिय नापिक गोपाळा, ज्यास महाराज नाईक या नांवानें हाक मारीत, त्यास समर्थांचे आज्ञेवरून बोलावून आणिलें. त्याजकडून श्मश्रु करवून महाराजांस स्नान घालून पूजा करून मंगल आरती केली. पण महाराज कांहीं खाईनात. या मुळें फार काळजी वाटूं लागली. आपण जाणार म्हणून महाराज वारंवार म्हणूं लागले. पण महाराजांनीं अवतार समाप्त करावा असें कोणा-सहि इष्ट न वाटलेमुळें जो तो आपआपल्यापरी सामर्थ्यानुसार उपचार करूं लागला. नामांकित डॉक्टर, वैद्य, अंगारे धुपारे करणारे, सर्वांनीं आपली पराकाष्ठा केली. पण महाराजांचे मनांतच देह ठेवण्याचें असल्यानें कोणाचा उपाय चालेना.

## डोंगर बोलतील तेव्हां उठेन, पंढरी जळेल तेव्हां उठेन.

वरील स्थिति पाहून सुंदराबाई महाराजांस म्हणाली, 'महाराज, तुम्ही केव्हां उठाल ?' महाराज म्हणाले, **'डोंगर बोलतील तेव्हां उठेन'** श्रीपाद भटजीनें असाच प्रश्न केला असतां महाराज म्हणाले, **'पंढरी जळेल तेव्हां उठेन.'** या जबाबावरून समर्थ अवतार पूर्ण करणार हें स्पष्ट होतें. पण भक्तमंडळींची आशा सुटेना. औषधोपचार, अंगारे धुपारे सुरूच होते; डॉक्टरच्या गोळ्या तोंडांत घातल्याबरोबर महाराज थुंकून टाकीत. सोलापुरचे नाना वैद्य येऊन त्यांनीही

उपचार कल. पण व्यर्थ. अन्न वर्ज केल्यानें परसाकडेस बाहेर जाववत नसे. भुजंगा महाराजांस म्हणाला, 'महाराज, आपण पाटावर बसा मी आपणास बाहेर उचलून नेतों.' महाराज म्हणाले, 'आज पाट नेईन म्हणतोस उद्यां देऊळ नेशील काय?' या सर्व जबाबावरून महाराज खास जाणार असे सर्वत्रांस वाटलें. आजपावेतों आपण आनंदांत होतों, 'पण स्वामी माउलीनें देह ठेविल्यावर आपलें काय होईल' याची भक्तजनांस चिंता पडली. प्रत्येकजण येउन पुढें, 'आपण काय करावें' याची आज्ञा मागूं लागला. श्रीपाद भटजीस महाराजांनीं वडाचीं मुळें खणीत बस म्हणून सांगितलें. गणपतरावांस देवळांत राहण्याची आज्ञा केली. बाळापास औदुंबर छायेंत बसण्यास सांगितलें. काकूबाइस अक्कलकोटास राहण्यास सांगितलें. कोणास कांहीं, कोणास कांहीं सांगून समजूत केली. असे शेंकडों भक्त असल्यानें महाराजांनीं एक श्लोक म्हणून सर्वत्रांचें समाधान केलें.

## श्लोक.

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

हा भगवद्गीतेंतील नवव्या अध्यायांतील बाविसावा श्लोक महाराजांनीं पंचवीस वेळां म्हटला. जो माझी अनन्य भावानें भक्ति करितो त्याचा योगक्षेम मी स्वतः करितों, अशी भाक या वचनावरून समर्थांनीं आपल्या प्रिय भक्तांस दिली आहे. एकनिष्ठ भक्तांस याचा अनुभव प्रत्यहीं येत आहे. अभयपणाची श्री समर्थांची सनदच आहे व याचा अनुभव भाविक भक्तांनीं अवश्य घ्यावा, अशी स्वामीदासाची सवत्रांस शिफारस आहे.

## महाराजांचें निर्याण.

शके १८०० बहुधान्यनाम संवत्सरे, चैत्र वद्य १३ मंगळवारीं तिसरे प्रहरीं चार वाजतां महाराज निजधामास गेले. नित्याप्रमाणें दोन प्रहरचे सुमारास राणीसाहेब समाचारास आल्या. १०।१२ दिवस अन्न बिलकुल वार्जिलें होतें. पण त्या दिवशीं काकूबाईचे व इतर भक्तांचे विनवणीवरून महाराजांनीं काकूबाईचे हातांनीं थोडी पेज घेतली. तोंड धुऊन रुमालानें पुसून टाकिलें. महाराजांस अंथरुणावर निजविलें. बाळापानें सुपारी दिली. ती घेतली. राणीसाहेबांस अत्यानंद झाला. आतां माझे महाराजांस भय नाहीं असें म्हणून त्या परत वाड्यांत गेल्या. इकडे

महाराजांची प्रयाणाची वेळ नजीक आली. श्रीपाद भटजी नजीक होते. महाराजांचे प्रकृतीची चलबिचल पाहून श्रीपाद भट म्हणाले, 'असें काय करितां ? बाळगोपाळांस कोणाचे स्वाधीन करणार ? ' महाराजांनीं आपणास उठवून बसवावें अशी आज्ञा केल्यावरून श्रीपाद भटानें तसें केलें. स्वतः मांडी घालून महाराज बसले. व पहातां पहातां एकदम निजानंदीं निमग्न झाले. एकाएकीं डोळयांच्या पापण्या हालण्याच्या राहिल्या. महाराजांची तेजःपुंज कांति जशीच्या तशीच होती. अंतकाळीं समर्थांचे मुखांतून खसखशी एवढे पांढरे तीन दाणे पडले.

## जनतेचा अनिवार्य शोक–चोळाप्पाचे घरीं समाप्ति समाधी.

ही बातमी जिकडे तिकडे तेव्हांच पसरली. जिकडेतिकडे हलकल्लोळ झाला. भुजंगा व कांहीं निस्सीम भक्त डोकें आपटून घेऊन प्राण देण्यास सिद्ध झाले. सर्व भक्त आक्रोश करून समर्थांचे गुण आठवूं लागले. तान्हुल्याची माय मेली असतां जसें तें पोरकें दिसतें, तसे सर्व भक्त अनाथ झालें. हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी वडाजवळ जमल्या. "हर हर महादेव," असा एकच घोष होऊं लागला. भजनीवाल्यांचे मेळे जमा होऊन भजन जिकडेतिकडे सुरू झालें. खेडोखेड्याहून बातमी कळतांच हजारों लोक रुदन करीत अक्कलकोटास आले. त्या वेळचें हृदयद्रावक, पाषाणास पाझर फुटण्यासारखें भक्तजनांचे विलापांचें वर्णन करणें, हें आमच्या शक्ती बाहेरचे आहे. कांहीं विचारी स्वामिभक्त होते त्यांनीं आपला शोक आवरून पुढील व्यवस्था करण्याकडे गुंतले. एक दिव्य विमान तयार करून त्यांत समर्थांस बसविलें. भजन, चवघडे, वाजंत्री वगैरे मंगल वाद्ये सुरू झाली. मोठ्या थाटानें समर्थांस चोळाप्पाचे घरीं नेलें. चोळाप्पानें समर्थांकरितां समाधि पूर्वीच बांधून ठेविली होती. पूजा आरती करून स्वामीनामाचा जयघोष झाल्यावर रा. रा. नानासाहेब बर्वे कारभारी व बाबूराव विष्णु मोघे मामलेदार यांनीं दोन बाजूंस धरून समाधींत महाराजांस नेऊन बसविलें. तितक्यांत बाळाप्पास स्मरण झालें कीं, आपल्या बिऱ्हाडीं अत्तराची कुपी शिल्लक आहे. पुढें तिचा काय उपयोग होणार ? आतांच श्रीस्वामीस अत्तर अर्पण करावें असें त्यांचे मनांत आलें. पण हजारों लोकांची गर्दी, त्यांत बिऱ्हाडीं कोण जाणार, अशा विवंचनेंत ते असतां एकजण उत्तम अत्तराची कुपी घेऊन आला. व त्या गर्दींत बाळाप्पाचें हातीं देऊन श्रीस्वामीस अर्पण करण्याबद्दल त्यानें विनंती केली. त्या वेळीं बाळाप्पास फार आनंद होऊन, त्यानें अत्तराचें स्वामींचें अंगास लेपन केलें. व चरणीं मस्तक

ठेऊन सर्वजण बाहेर आले, व समाधीचें तोंड बंद केलें. या प्रमाणें या दत्तावताराची समाप्ती झाली.

श्रीस्वामी समर्थांचें भक्तांपैकीं पुष्कळांनीं समर्थांवर प्रेमळ कविता बहुत केल्या आहेत. त्यांपैकीं थोड्या खालीं दिलेल्या आहेत.

## अष्टक.

क्षीराब्धिवासं तृणकाष्ठव्याप्तं श्रिया समेतं सुरवृंदपूज्यम् ॥ सज्ज्ञानयुक्तं सुखदं सुरूपं वंदे गुरुं दत्त इतीह वेद्यम् ॥ १ ॥ सृष्टिस्वभावं कमलोद्भवंतं वाण्या समेतं श्रुतिविस्मरंतम् ॥ श्रीलासुतं विष्णुपदाब्जलीनं वंदे गुरुं० ॥ २ ॥ पिनाकपाणिं गिरिजासमेतं भूताधिपं नागमुखेन स्तुत्यं ॥ विषं पिवतं फणिभूषितांग वंदे गुरुं० ॥ ३ ॥ मोमारमाश्चर्यकरावतारं अत्रेः सुतं ख्यातमनंतचर्यम् ॥ सूर्यांकसंस्थं दिविदेवपूज्यं वंदे गुरुं० ॥ ४ ॥ ब्रह्मादिदेवांशयुतं महांतं विशेषनाम्ना कलिकोटि-विघ्नम् ॥ भूपालविप्रादिभिरीड्यमानं वंदे गुरुं० ॥ ५ ॥ दीनस्य चोलस्य धनप्रदंतं दीनार्तिविच्छेदनमुख्य हेतुम् ॥ स्थल-त्रयौदुंबरपादुकस्थं वंदेगुरुं ॥ ६ ॥ ब्रह्मघ्नपीडादिकमुक्तिदंतं व्याधेर्विनाशं भवतापवर्ज्यम् ॥ अजं हि स्पष्टाकृति प्रज्वलंतं वंदेगुरुं ॥ ७ ॥ विदीर्घबाहुं च विरागपाणिं राजीवसूक्ष्मं पद-पद्मयुग्म युग्मम् ॥ संन्यासरुपीव स्फुटं दशांतं वंदेगुरुम् ॥ ८ ॥ भीमातटायां गतमाधवेन गुरुप्रसादात्कृतमष्टकं यत् ॥ तदर्पणं स्याद् गुरुपादपद्मे समस्तपापघ्नपुमर्थ देहि ॥ ९ ॥

## ॥ भूपाळी ॥

उठिं उठिं बा दत्तात्रया। तारी भक्तजना राया ॥ बहु शिणलो तापत्रया, उठिंउठिं बा गुरुवर्या ॥ध्रु०॥ तूं तरी भक्तांची माउली, दासां करिशी निज साउली। जैशी वच्छला गाउली, तैसा होशी योगीशा ॥ उठिं उठिं बा० ॥ १ ॥ हाका मारी जनार्दन, त्यासी दिधलें निजदर्शन। एकनाथ त्वत्पदीं लीन, तो निज-पदास पैं केला ॥ उठिं उठिं बा० ॥ २ ॥ ऐसे अनंत भक्त

तारिले, पुढें श्रीपादरूपी झाले । भक्तां देउनि इच्छित फळें, नरसिंह सरस्वती अवतार ॥ उठिं उठिं बा० ॥ ३ ॥ माता बोबडें बोलवी, बाळा नरहरिला खेळवी । मुके बालक देवादेवीं नवसा पावे म्हणे अंबा । उठिं उठिं बा० ॥ ४ ॥ अमृतदृष्टी लोहा हस्त, लावुनी कांचन करी श्रीदत्त । लिंबालवणा ओंवाळित, न पडो दृष्टी तान्हुल्या ॥ उठिं उठिं बा० ॥ ५ ॥ देउनि पुत्रयुग्म मातेस, काशीक्षेत्रीं घेती संन्यास । जठर-व्यथेचे विप्रास, सुखवी सायंदेवगृहीं ॥ उठिं उठिं बा० ॥ ६ ॥ मृतपुत्राचें संजीवन, दरिद्री विप्रा दिधलें धन । वंध्या महिषीस राग येउन, दुग्धवती पैं केली ॥ उठिं उठिं बा० ॥ ७ ॥ मृतपती साध्वीचा उठविला, नरहरी नंदीकुष्ठ दवडीला । शतपट जोंधळा पिकविला, वंध्या गंगा पुत्रवती ॥ उठिं उठिं बा० ॥ ८ ॥ सण दिपवाळी आला थोर, झाले अष्टरूप गुरुवर । महिमा वर्णूं किती पामर, बा हे सिद्ध उठिं ताता ॥ उठिं उठिं बा० ॥ ९ ॥ अक्कलकोटीं झाला अवतार, श्रीस्वामी पूर्ण दिनकर । भक्तां तारण्या गुरुवर, पाहे वाट दिनरजनीं ॥ उठिं उठिं बा० ॥ १० ॥ हाका मारीतो चोळाप्पा, हरी भाऊ आला बाळाप्पा । दीन गणेश तोही तापा, त्रासुनि आला चरणासी ॥ उठिं उठिं बा० ॥ ११ ॥ साळे भोळे भक्त ते भाटे, येती मुंबईहुनी घनदाट । त्यांचीं मनें करुनि चोखट, इच्छित पुरवीं श्रीस्वामी ॥ उठिं उठिं बा० ॥ १२ ॥ कलिकाळास्तव झाले गुप्त, जनां दीसती ते प्रत्यक्ष । भावें आकळावा गुरुनाथ गणेश दास स्वामीचा ॥ उठिं उठिं बा दत्तात्रया, तारीं भक्तजना राया ॥ बहु शिणलों तापत्रया, श्रीगुरुवर्या ॥ उठिं उठिं बा ॥ १३ ॥

## पद ॥ १ ॥

( राग मल्हार—नभ मेघानें आक्रमिलें )

स्वामी राया तारे तारे ॥ भक्त तुझे जे निपट बावरे ॥ स्वामी स्वामी श्रीस्वामी म्हणतीरे ॥ स्वामीराया ॥ १ ॥ अक्कलकोटीं

चोळाप्पागृहीं वास करूनि केली बहु नवलाई ॥ दीन गणेशा पोटीं धरी ॥ स्वामी ॥

### पद ॥ २ ॥

( राग बिलावल—प्रतिकुल होईल कैसा या चालीवर )

भक्तकाजकल्पद्रुम स्वामिराज माझा ॥ लेकुरासी माय जैसी शिणें भक्तकाजा ॥ पाहुनि स्वजना कष्टी मनीं कळवळें ॥ सुमंगल शुभकल्याण पीक फळफळें ॥ कल्पवृक्ष दिनानाथ ध्यारे भावबळे ॥ नको अन्य देव भक्ति व्रतोपास पूजा ॥ भक्तकाज ॥ १ ॥

### पद ॥ ३ ॥

( काय मला भूल पडली या चालीवर )

भक्तजना रक्षि स्वामीराज माउली ॥ प्रेम पान्हा पाजी वत्सा जेवि गाऊलि ॥ धृ ॥ अज्ञ आम्हां नकळे तव वैभवा मुळीं ॥ शक्तिमान तूं समर्थ बद्ध अंजुली ॥ प्रार्थितो दयार्णवा होसि तूं बळी ॥ क्षमा करीं दास तुझा लागे पाउलीं ॥ भक्तजना ॥ १ ॥ चातुर्यें सृष्टी तुवां निर्मिली पहा ॥ मनुज, पशु, पक्षि वृक्ष कीटकां अहा ॥ नक्षत्रें चंद्र सूर्य तेज उ । महा ॥ सृष्ट्युद्भ-वलयपालनि मूर्ति शीणली ॥ भक्तजना ॥ २ ॥ जलबुद्बुदा परीस आयु हें नरा ॥ येत कुठुनि जात जीव कोणत्या थरा ॥ माय बाप बंधु पुत्र मित्र तूं खरा ॥ व्यर्थ इतर मायिक मति चरणीं रंगली ॥ भक्तजना ॥ ३ ॥

### पद ॥ ४ ॥

चाल ( पंचतुंडी नरकुंड मालधर )

श्रीगुरुयतिवर भवभय दुस्तर निस्तर सत्वर श्रीस्वामी । भक्तकृपा करध्यान रुचिर सुरवंद्य पदांबुज प्रणितों मी ॥ धृ ॥ ब्रह्मा विष्णु शिवगणपतीही अंबा दुर्गा तूं स्वामी ॥ श्रीपाद

श्रीवल्लभ नरहरी दत्त तुझी रुपें नामीं ॥ भक्त रक्षका नमो नमस्ते राहो प्रीति तव नामीं ॥ स्वामी स्वामी श्रीस्वामी जपाहो हेंच निदानीं ये कामीं ॥ श्रीगुरु ॥ १ ॥ रामकृष्ण अवतार तुझेची झाले सदया जाणें मीं ॥ पुराण पुरुषा मनुज मानिती तुज जे गढले गाढ तमीं ॥ परब्रह्म साक्षात् श्रीगुरु श्रुति यापरि बोले निगमीं ॥ कल्पवृक्ष श्री अक्कलकोटीं स्वामी विराजे मठ धामीं ॥ श्रीगुरु ॥ २ ॥ भाग्यवान् तो घडलें ज्यातें स्वामी दर्शन सप्रेमें ॥ अलभ्य लाभा तोचि लाभला स्वामि-भजन जो करीं नेमें ॥ धर्मसार हें तत्त्व मानवा जतन करीं तूं निष्कामें ॥ दास गणेशा आस स्वामींची त्याविण न दुजें कांहीं गमे ॥ श्रीगुरु ॥ ३ ॥

## पद ॥ ५ ॥

चाल ( साध्य नसे मुनी कन्या )

अक्कलकोटनिवासी स्वामी यश गातों मी ॥ अक्कलकोट ॥ध्रु०॥
भव्य रुचिरतनु ध्यान विराजे । गौरवर्ण कटिं मेखल साजे ॥
कस्तुरी टिळक कपाळीं ॥ वाली भक्त जनांचा ॥ अक्कल ॥ १ ॥
भगवी छाटी कौपिनधारी ॥ हास्यवदन कंजनयन मुरारी ॥
नासिक जणु चांपेकळीं ॥ पाळी स्नेहें वाळा ॥ अक्कलकोट ॥२॥
मस्तकीं टोपी माळ गळां ती ॥ रुद्राक्षांचे कुंडल डुलती ॥
बहुदीर्घ अवतारी ॥ स्वामीं भवभयहारी ॥ अक्कलकोट ॥ ३ ॥

## आरती.

जयदेव जयदेव जय स्वामीराया ॥ दास ओवाळीतो आरति तव पायां ॥ जयदेव० ॥ ध्रु० ॥ मानवदेहीं जन्मा घेउनि गुरुवर्या ॥ प्रेमळ भक्तसांगोपन केलें आर्या ॥ भव्य मूर्ति उंच तेज जेवीं सूर्या ॥ आजानुबाहू पाहूं मूर्ति गुरुवर्या ॥ जयदेव० ॥ १ ॥ कोठें जन्म दीक्षा कोठें घेतली ॥ कोण जनिता जननी रत्न प्रसवली ॥ भक्तां कामधेनु कृपासाउली ॥

बालक केवीं जाणे आपली माउली ॥ जयदेव० ॥ २ ॥ अक्कलकोटीं वास भक्तांकारणें ॥ चोळाप्पा प्रेमळभक्त आला शरण ॥ अनेक शिष्यां गुप्त दावीली खूण ॥ इच्छित पुरवूनि तारिले जन ॥ जयदेव० ॥३॥ अनेक शिष्य अनेक भक्त म्हणवीती॥ अंत:करण दत्त त्यांचें चाहाती ॥ पात्रानुसार सर्वां कौतुक दावीती ॥ प्रिय स्वामीप्रति निश्चल भक्ति ॥ जयदेव० ॥ ४ ॥ कलिकालास्तव पूरें वाटलें मना ॥ घेऊनि समाधि त्यागिलें जनां ॥ भक्तां अझूनि देती अमृतरस पाना ॥ गणेश न विसंबे श्रीदत्तचरणां ॥ जयदेव जयदेव जय स्वामीराया ॥ दास ओवाळीतो आरति तव पायां ॥ जयदेव ॥ ५ ॥

## आरती.

जयदेव जयदेव जय जय अवधूता ॥ अगम्य लीला स्वामी त्रिभुवनिं तुझी सत्ता ॥ ध्रु० ॥ तूझें दर्शन होतां जाती हीं पापें ॥ स्पर्शनमात्रें विलया जाती भवदुरितें ॥ चरणीं मस्तक ठेवुनि मनिं समजा पुरतें ॥ वैकुंठीचें सूख नाहीं यापरतें ॥ जयदेव० ॥ १ ॥ सुगंध केशर भाळीं वर टोपी टीळा ॥ कर्णीं कुंडल शोभति वक्षस्थळीं माळा ॥ शरणागत तुज होतां भय पडलें काळा ॥ तूझे दास करिती सेवासोज्वळा ॥ जयदेव० ॥ २ ॥ मानवरूपीकाया दिससी आम्हांस ॥ अक्कलकोटीं केला यतिवेषें वास ॥ पूर्णब्रह्म तूं अवतरलासी खास ॥ अज्ञानी जीवांस विपरीत भास ॥ जय० ॥ ३ ॥ निर्गुण निर्विकार विश्वव्यापक ॥ स्थिरचर व्यापुनि अवघा उरलासि एक ॥ अनंत रूपें धरिसी करणें मायीक ॥ तूझे गुण वर्णितां थकले विधिलेख ॥ जय० ॥ ४ ॥ घडतां अनंत जन्मीं सुकृत हें गांठीं ॥ त्याची ही फलप्राप्ती सद्गुरुची भेटी ॥ सुवर्णतार्टीं भरली अमृतरसवाटी ॥ शरणागत दासावरि करिं कृपादृष्टी ॥ जयदेव जयदेव जय जय अवधूता ॥ अगम्य लीला स्वामी त्रिभुवनिं तुझी सत्ता ॥ ५ ॥

## आरती

जयदेव जयदेव जय श्रीस्वामिसमर्था ॥ आरती ओवाळूं चरणीं ठेवुनियां माथा ॥ धृ० ॥ छेली खेडे ग्रामीं तूं अवतरलासी ॥ जगदोद्धारासाठीं राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा तूं एक होसी ॥ म्हणूनि शरण आलों तूझे चरणासी ॥१॥ त्रैगुण परब्रह्म तूझा अवतार ॥ त्याची काय वर्णूं लीला पामर ॥ शेषादिक शिणले नलगे त्यां पार ॥ तेथें जडमूढ कैसा करुं मी विस्तार ॥ २ ॥ देवाधिदेव तूं स्वामिराया ॥ निर्जरमुनिजन ध्याती भावें तव पायां ॥ तुजसी अर्पण केली आपुली ही काया ॥ शरणागता तारीं तूं स्वामिराया ॥ ३ ॥ अघटित लीला करुनी जगमूढ उद्धरिले ॥ कीर्ति ऐकुनि कानीं चरणीं मी लोळें ॥ चरणप्रसाद मोठा मज हें अनुभवलें ॥ तूझ्या सूतां नलगे चरणावेगळें ॥ जयदेव जय० ॥ ५ ॥

## ध्यान.

### श्लोक.

आरक्तवर्णतनुदिव्यकांती ॥ पद्मनेत्रज्याचेजगींसूर्यदिप्ती ॥ आनंदवदनीमितहास्यपाहें ॥ पाहुंजयातेंकरितितपाहे ॥ १ ॥ सगुणरूपेंजगींहाचीझाला ॥ श्रीगुरुस्वामीम्हणतीजयाला ॥ देखोनियांतेंजगींधन्यझाले ॥ त्याच्यापदींजेसदानिवाले ॥ २ ॥ व्यापुनिभुवनास्थिरयाचरांतें ॥ वेगळाचआहेम्हणतितयातें ॥ ज्याच्याशक्तिनेजाणहेंविश्वचाले ॥ तयानेणतीवेदजेथुनजाहले ॥ ३ ॥ निराकारवस्तु मुनिहेंचपाहाती ॥ पहातांजयातेंनलवेचपातीं ॥ पांहूनियातेंजनमुक्तव्हारे ॥ आनंदवाणीपरिहीतध्यारे ॥ ४ ॥

श्रीअक्कलकोट निवासी राजाधीराज योगीराज श्रीगुरु स्वामीसमर्थ महाराजकी जय.

समाप्त

# परिशिष्ट.

## श्री स्वामीदास सद्‌गुरु बाळाप्पा महाराज यांचें संक्षिप्त चरित्र.

### ( उत्तरार्ध )

### श्रींचें पुनर्दर्शन.

श्री बाळाप्पा महाराज हे एक निष्ठावंत गुरुभक्त होते. त्यांना श्रीस्वामी समर्थ महाराजांचा दीर्घकाळ सहवास लाभला होता. श्रीसमर्थांचेंहि त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम होते. श्रींनीं त्यांचेकडून उपासना करवून घेऊन त्यांना साधनसिद्ध बनविलें होतें. श्री. बाळाप्पा महाराजांच्या मनास थोडें जरी दुःख झालें, तरी श्रीसमर्थ त्यांचें स्वतः समाधान करीत असत. यामुळें श्रींच्या निर्याणानंतर महाराजांना आपलें जीवन असह्य झालें. वारंवार श्रींची आठवण काढून समाधी समोर बसून ते आपला दुःखावेग आंवरण्याचा प्रयत्न करीत. पण त्यांना समाधान लाभेना. श्रीसमर्थांच्या आज्ञेनुसार त्यांनीं निरशनव्रत अंगिकारिलें होतेंच. पण यावेळीं वियोगदुःखामुळें त्यांनीं मूठभर शेंगा खाणेंही बंद केलें. पाणी सुद्धां ते घेईनात. अहोरात्र त्यांना झोंपही येईना. अशा विरहाकुल अवस्थेंत एके दिवशीं श्रीस्वामी समर्थ महाराज आपणापुढें उभे आहेत, असें त्यांना दिसलें. त्यांचें अंतःकरण आनंदानें भरून आलें, व तत्काल त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. त्या वेळीं दयाघन श्रीस्वामीराय म्हणाले, “ तुला मी ज्या पादुका दिल्या आहेत, तेथें मी चैतन्यरूपानें प्रत्यक्ष वास करीत आहें. या पुढें तेथेंच मी तुझी सेवा घेईन. पूर्वी प्रमाणेंच माझी सेवाशुश्रूषा करीत जा.” एवढें बोलून श्रीस्वामी समर्थ अंतर्धान पावले. श्रींच्या दर्शनानें महाराजांस अत्यानंद झाला. विरहावस्थेंत त्यांनीं श्रींच्या ज्या प्रसादपादुका पेटींत घालून ठेविल्या होत्या, त्या बाहेर काढून त्यांची चौरंगावर प्रतिष्ठापना केली. जवळच श्रींचें निशाण ठेविलें, व श्रींना करीत ते सर्व

उपचार, पादुकांना सुरू केले. या चैतन्य पादुकांविषयीं ते नेहमीं म्हणत, "येथें श्रीस्वामी समर्थ प्रत्यक्ष वास करीत आहेत."

## तुझे द्वारां मीच कार्य करणार आहें.

श्री बाळाप्पा महाराज यांना समर्थ वारंवार म्हणत, "तुला मी आपल्या-सारखें करीन." त्याचप्रमाणें महाराजांना उद्देशून, "कसा नांदतोस! कसा नांदतोस! गुरु हो म्हणतो, गुरु हो म्हणतो." असेंही श्री म्हणत. या उद्गारांत सुचित केल्याप्रमाणें त्यांनीं आपला आध्यात्मिक वारसाच महाराजांना दिला होता. निर्याण काल समीप आल्यावेळीं आपल्या हातांतील 'श्री स्वामी समर्थ' हीं अक्षरें कोरलेली आंगठी त्यांचे बोटांत घालून, "माझें शिक्कामोर्तब तुला देत आहें. माझा शिक्का यावच्चंद्रदिवाकरौ तूं पुढें चालव," असा आशिर्वाद दिला. आणि आपल्या प्रसादपूर्ण चैतन्यपादुका देऊन स्वतंत्र मठ स्थापण्याची आज्ञा केली होती. या प्रमाणें श्री बाळाप्पा महाराज यांचेंवर श्रींचें अवतारकार्य पुढें चालविण्याची मोठी जबाबदारी पडली होती. ही कामगिरी आपले हातून कशी पार पडेल ही एकच चिंता त्यांना सारखी व्यथित करी. या वेळींही श्रींनीं त्यांना अभय देऊन आज्ञापिलें कीं, "मी शरिरानें अंतर्धान पावलों असलों तरी तुझ्या द्वारां मीच कार्य करणार आहे. तूं केवळ निमित्तमात्र आहेस. पादुकांच्या द्वारा माझी द्वाही फिरवून लोकसंग्रह करा."

## संचार व लोकसंग्रह.

या नंतर श्रींच्या आज्ञेनुसार महाराजांनीं आपलें देवस्थान बरोबर घेऊन, देश–संचारास सुरवात केली. त्यांचें दिव्य तपोबळ व श्रीसमर्थांचा पूर्ण वरदहस्त या मुळें ते जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांचें प्रचंड स्वागत होई. हजारों लोक दर्शनाला येत. कित्येक आर्तांचें दुःख त्यांनीं नाहींसें केलें. अनेक सकामांच्या मनकामना पूर्ण केल्या. असंख्य जिज्ञासूंना त्यांनीं समाधान प्राप्त करून दिलें. आणि कित्येक मुमुक्षूंना त्यांनीं मार्गदर्शन केलें. जे लोक केवळ परीक्षा पाहण्या-करितां किंवा टवाळीच्या उद्देशानें येत तेहि महाराजांच्या दिव्य तेजानें दिपून जात, व त्यांचे भक्त बनत. या सर्व गोष्टी द्याव्या म्हटल्यास एक मोठा ग्रंथच होईल. तथापि त्यांच्या आध्यात्मिक शक्तीची साधारण कल्पना यावी म्हणून कांहीं उदाहरणें देत आहोंत.

## सरसाहेबांचा पुनर्जन्म झाला !

मुंबईचे नामांकित कायदेपंडित सर चिमणलाल सेटलवाड एकदां अतिशय आजारी झाले. अनेक सुप्रसिद्ध डॉक्टर, वैद्य यांचे इलाज झाले. पण गुण नाहीं. सर्व हताश झाले. त्या वेळीं महाराजांचा मुक्काम मुंबईसच होता. महाराजांचे भक्त व सरसाहेबांचे स्नेही श्री. विष्णुपंत पानवलकर यांनी महाराजांना सरसाहेबांच्या प्रकृतीविषयीं चिंता व्यक्त केली. तेव्हां महाराजांनीं त्यांना अंगारा दिला व म्हटलें, "काळजी करूं नका. स्वामींच्या कृपेनें ते लवकरच बरे होतील." महाराजांच्या आशीर्वादाप्रमाणें सरसाहेब लवकरच आजारांतून खडखडींत बरे झाले. व महाराजांचे परमभक्त झाले. त्यांनीं अक्कलकोट येथील श्री बाळप्पा मठाचा सुंदर गाभारा बांधून दिला.

## स्वामींनीं नैवेद्य स्वीकारला नाहीं.

श्री बाळाप्पा महाराज हे चरित्रलेखक कै. गणेश बल्लाळ मुळेकर हयात असतांना त्यांचे घरीं चातुर्मास मुक्कामास जात असत. त्यांचे पश्चात् त्यांच्या मुलाकडेही जाणें येणें असे.

एकदां पुणें येथें महाराजांचा मुक्काम मुळेकरांचे मुलांकडे असतांना, एके दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें श्रीस्वामीसमर्थांस महानैवेद्य दाखविला असतां, महाराजांनीं श्री. मुळेकरांच्या कुटुंबास सांगितलें, "आज समर्थांनीं नैवेद्याचा स्वीकार केला नाहीं." सर्व मंडळी अस्वस्थ झाली. कोणांस कांहीं उमज पडेना. दुसरे दिवशीं श्री. मुळेकरांच्या वडील मुलाचा मुलगा वर्ष दीड वर्षें वयाचा होता, त्याचें प्राणोत्क्रमण झाल्याचे पत्र आले. तेव्हां सर्वांना आदले दिवशीं स्वामींनीं नैवेद्य कां स्वीकारला नाहीं याचा उलगडा झाला.

## बारा वर्षें टाकलेल्या पत्नीस नांदविलें.

श्री. मुळेकर रहात असलेल्या वाड्यांतच शेजारी एक बाई रहात होती. तिचा नवरा तिला सोडून देऊन परगांवीं गेल्यास १०–१२ वर्षें होऊन गेली. तरी त्याजकडून तिला कधींच पत्र आले नव्हतें; कांहीं समाचार कळला नव्हता. आपल्याच वाड्यांत एक महान् सत्पुरुष आले आहेत असें तिला समजलें. तेव्हां त्यांच्या कृपेनें आपण आपलें कार्य साधून घ्यावें असा विचार करून तिनें मनोमनीं प्रार्थना केली. लगेच दुसरे दिवशीं जेव्हां तिच्या

यजमानाकडून तिला पत्र आलें, तेव्हां तिनें मोठ्या आनंदानें पेढे वाटले. वाड्यांतील मंडळींनीं त्या बाईजवळ तिनें पेढे कां वांटले याबद्दल बरीच विचारपूस केली. पण तिनें खुलासा करण्याचें टाळल्यामुळें अखेरीस महाराजानींच सांगितलें, "अरे, यजमानाचें पत्र आल्यामुळें तिनें पेढे वांटले. एवढेंच काय तर लवकरच तिचे यजमान येथें येऊन तिला मुंबईस घेऊन जातील." त्याप्रमाणें खरोखरच त्या आठवड्याच्या शनिवारीं रविवारीं तिचे यजमान येऊन त्यांनीं तिला मुंबईस नेलें.

## महाराजांच्या कृपेनें पुत्र झाला.

एकदां महाराजांचा मूर्तिजापूर येथें मुक्काम असतांना तेथील श्री. नारायणराव जमादार हे दर्शनार्थ आले. घरीं गजांत लक्ष्मी असून संतानसुख नसल्यामुळें तें उद्विग्न असत. महाराजांनीं त्यांची चिंता जाणून त्यांना आशिर्वाद दिला, "लकरच पुत्र होईल." पुढें श्री. जमादार यांस पुत्र झाला. त्यांची महाराजांचे ठायीं श्रद्धा दृढ झाली. त्यांनींच अक्कलकोट येथील श्री बाळाप्पा मठाच्या गाभाऱ्यापुढील भव्य सभामंडप बांधून दिला. व त्यांनीं मूर्तिजापूर येथेंही मठ स्थापून, श्रींच्या व महाराजांच्या पादुकांची स्थापना केली. अक्कलकोट प्रमाणेंच तेथेंही उत्सव होतात. श्री. जमादार यांचे चिरंजीव श्री. विठ्ठलराव हेही महाराजांचे परमभक्त आहेत.

## चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं !

एकदां महाराजांचा मुक्काम छत्तिसगड प्रदेशांतील बिलासपूर या गांवीं असतां, असंख्य स्त्रीपुरुष यांचे दर्शनार्थ जात असत. त्या गांवीं श्री. नारायणराव बानेरकर या नांवाचे एक गृहस्थ रेल्वे खात्यांत नोकर होते. ते संगीतशास्त्रांत प्रवीण असल्यामुळें लोक त्यांना नारायणराव संगीत या नांवानेंच ओळखत. आपल्या मित्रमंडळीच्या आग्रहास्तव एक दिवस ते महाराजांचे दर्शनास गेले. त्यांना पाहतांच महाराज उद्गारले, 'अरे, ये. तुझी मी फार वाट पहात आहे. साहेबाची नोकरी सोड, घरादारावर तुळशीपत्र ठेव. आणि आतां गुरूची सेवा कर.' महाराजांच्या शब्दांवर नारायणरावांचा विश्वास बसला नाहीं. व सतत तीन तास महाराजांशीं वाद करून अखेरीस ते म्हणाले, 'चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं.' यावर महाराज केवळ हंसले. व नारायणराव आपले घरीं परत गेले. त्याच दिवशीं ते आपल्या

खोलींत दार बंद करून झोपले असतां, पहांटेच्या वेळीं त्यांना जवळच खडावांचा आवाज ऐकूं आला म्हणून जागे होऊन पाहतात तों महाराज तेथें उभे असून, आदल्या दिवशीं प्रमाणेंच आदेश देतात. असें त्यांना दिसले. लगेच महाराज अंतर्धान पावले. नारायणराव उठून पाहतात तो दारास कडी जशीच्या तशीच. तेव्हां नारायणरावांची खात्री झाली कीं महाराज हे कारणिक पुरुष आहेत. तत्काळ ते स्नान वगैरे आटोपून महाराजांकडे गेले व म्हणाले, 'यापुढें आमरण मी आपली सेवा करीन; मला पदरांत घ्या." पुढें नोकरीचा राजीनामा देऊन, ते महाराजांचे सान्निध्यांत राहून गुरूपदीष्ट मार्गानें साधना करूं लागले. कांहीं काळानंतर महाराजांनीं त्यांना उमरेड येथें जाऊन, अयाचित वृत्तीनें रहाण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें ते उमरेड येथेंच राहूं लागले. व त्यांनीं तेथें मठाची स्थापना करून गुरु संप्रदायाचा प्रसार केला. हेही श्रेष्ठ दर्जाचे पुरुष होऊन गेले.

## श्री बाळाप्पा मठाची स्थापना.

श्री बाळाप्पा महाराजांची उत्तरोत्तर कीर्ति वाढूं लागली. व दर्शनार्थी भाविक लोकांची गर्दी होऊं लागली. अक्कलकोट येथील श्री समर्थांच्या समाधी मागील त्याची श्री. पुजारी यांचे वाड्यांतील खोली अगदींच अपुरी पडूं लागली. या मुळें महाराज श्री. ग्रामजोशी यांचे वाड्यांत रहाण्यास गेलें. दिवसेंदिवस भक्तमंडळी वाढूं लागल्यामुळें, तीही जागा पुरी पडेना. तेव्हां ते श्री. चिदानंदाच्या वाड्यांत राहूं लागले. याप्रमाणें कांहीं काल त्यांचा मठ फिरताच होता. दूरदूरच्या व नजीकच्या अनेक प्रांतांतून बरीच मंडळी उत्सवप्रसंगीं अक्कलकोट येथें महाराजांकडे येत. त्यावेळीं मंडळींना जवळपासच्या १०।१५ वाड्यांतून जेवणास बसावें लागे. प्रसादाकरितां गल्लीगल्लींतून पानें मांडावीं लागत. त्या मुळें जागेची अडचण फारच तीव्रतेनें भासूं लागली. तेव्हां अक्कलकोटच्या संस्थानिकांनीं खासगीकडील दाजीबा भोसले यांचे परसूची जागा मठाकरतां बक्षीस दिली. त्या जागेंत मुंबईचे सर चिमणलाल सेटलवाड यांनीं मठाचा गाभारा बांधून दिला. त्या वेळचे अक्कलकोटाचे कारभारी श्री. विठ्ठल टिकाजी यानीं प्रदक्षिणेची इमारत बांधून दिली. गाभाऱ्यांत सिंहासनावर श्रींच्या चैतन्य पादुकांची प्रतिष्ठापना करण्यांत आली. गाभाऱ्यासमोरील सभामंडप व महाद्वारापर्यंतचें सर्व बांधकाम, मूर्तिजापूरचे श्री. जमादार यांनीं करून दिलें. हें गुरुस्थान श्री. बाळाप्पा मठ या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

## महाराजांचा चतुर्थाश्रमस्वीकार, व अधिकारदान.

श्रीसमर्थांच्या निर्याणानंतर २६ वर्षांनीं मिति माघ शु. ४ शके १८२६ रोजीं महाराजांनीं आश्रमधर्माचें महत्त्व पटविण्याकरतां विधिपूर्वक चतुर्थाश्रम स्वीकारला. व 'श्री ब्रह्मानंद सरस्वती' हें नांव धारण केलें. या नंतर मिति पौष शु. १५ शके १८३१ रोजीं महाराजांनीं आपले शिष्य श्री. गंगाधर महाराज यांना गुरुगादीचे सर्वाधिकार देऊन त्यांचेवर मठाची सर्व जबाबदारी सोंपविली. व मिति फाल्गुन शु. ४ शके १८३१ दिनांक १५-३-१९१० रोजीं आपण महासमाधिनिमग्न जाहले. श्री. गंगाधर महाराज हेही महान् तपस्वी होते. त्यांची आजानुबाहू व तेजस्वी मूर्ति पाहून कोणाच्याही मनांत आदर उत्पन्न होई. महाराजांच्या निर्याणानंतर त्यांनीं सतत २८ वर्षें निरलसपणें मठाचें कार्य करून मठाचा उत्कर्ष साधिला. नंतर ते आपले शिष्य श्री. गजानन महाराज यांना गुरुगादीचे सर्वाधिकार सुपूर्द करून मिति फाल्गुन व. ७ शके १८५९ रोजीं निजानंदीं निमग्न झाले. त्यांचे पश्चात् श्रींच्या गुरुगादीचे सर्वाधिकारी श्री गजानन महाराज हे सदैव ध्यानधारणेंत व नित्यानुष्ठानांत निमग्न राहून, आपणाकडे येणाऱ्या भाविकांस अचूक मार्गदर्शन करून मठाचें परंपरित कार्य नेटानें करीत आहेत. मठांत प्रत्यहीं साक्षात्कार घडत असून, आजपावेतों अनेकांस दाखले मिळून, ते सन्मार्गास लागले आहेत. यापुढेंही मठाचें कार्य असेंच चालत राहून भक्तजनांचे मनोरथ पूर्ण होत राहतील यांत शंका नाहीं.

## श्री बाळाप्पा महाराजांची थोरवी.

श्री बाळाप्पा महाराज यांनीं महाराष्ट्राचा कानाकोपरा, व तसेंच बंगाल, बिहार, ओरिसा महाकोशल, राजस्तान, मध्यप्रदेश तों थेट उत्तरप्रदेश पर्यंत संचार केला. व हजारों लोकांना सन्मार्गाला लाविलें. या प्रमाणें अविश्रांत परिश्रमपूर्वक देशपर्यटन करून त्यांनीं लोकोद्धाराचें कार्य केलें. व श्रींचा अवतारसंदेश दिगंतरीं पोहोंचविला. अशा प्रकारें महाराजानीं श्रींच्या निर्याणानंतर ३२ वर्षें पर्यंत गुरुकार्याची धुरा वाहिली. श्री समर्थांच्या आज्ञेप्रमाणें आपण नाममात्र राहून भक्तांच्या मनकामना श्रींच्याकडूनच पुऱ्या करविल्या. सर्वत्र श्री समर्थांचें गुणगान होऊं लागले.

श्री बाळाप्पा महाराज ही एक लोकोत्तर विभूति गणली जाऊन त्यांचा अनुयायी वर्गही फार वाढला. महाराजांच्या शिष्यवर्गांतहीं कांहीं असे सत्पुरुष

होऊन गेले कीं त्यांनींही स्वतंत्रपणें संप्रदायाचा प्रसार केला. महाराजांच्या शिष्य-प्रशिष्यांनीं स्थापन केलेले मठ पुणें, देहू, ताथवडे, शिवडाव (सावंतवाडी), सावइवेरे (गोवा), जालना (मराठवाडा), मूर्तिजापूर (वऱ्हाड,) उमरेड (नागपूर) आणि अन्य ठिकाणींही आहेत. या सर्व मठांतून महाराजांनीं आंखून दिलेल्या मार्गानें कार्य चालू आहे. यावरून श्री बाळाप्पा महाराजांचें कार्य किती व्यापक स्वरूपाचें होतें, व ते एक अलौकिक महापुरुष होऊन गेले, हें वाचकांच्या सहज ध्यानीं येईल.

## निलेगांवी गमन.

एकदां श्रीमत्सद्‌गुरु दत्तावधूत स्वामीसमर्थ, सेवेकरी मंडळीसह मोंगलाईतील नवदुर्ग भागांत गेले असतां निलेगांव नजीक आले. त्या गांवचे जहागिरदार श्री. भाऊसाहेब हे परम स्वामीभक्त होते. त्यांनाहि बातमी कळतांच अत्यंत आनंदित अंतःकरणानें समर्थांना सामोरे येऊन त्यांची त्यांनीं षोडशोपचारें पूजा केली. आणि निलेगांवीं चलावें अशी विनंती केली. श्रीस्वामीसमर्थ म्हणाले, "आम्ही शनिवारीं तुमच्या गांवीं येऊं." महाराजांनीं केव्हांतरी एकदां आपल्या घरीं यावयाचें कबूल केलेलें पाहून जहागिरदारांस अत्यंत हर्ष झाला.

कांहीं दिवसांनीं श्रीस्वामीसमर्थ आपल्या परिवारासहीत जहागिरदारांकडे जावयास निघाले. जन्मसाफल्य झाल्याचे आनंदांत मोठ्या थाटानें महाराजांचें भाऊसाहेबांनीं स्वागत केलें. मोठ्या भक्ति भावानें मंगलस्नान घालून एका सुशोभित सिंहासनावर बसविलें. त्यांच्या गळ्यांत पुष्पमाला घालून, भालीं कस्तुरी तिलक लाविला. त्या तिलकावर तांदुळाक्षता लावीत असतां, त्यांतील तीन दाणे खालीं घसरले. समर्थांनीं ते तीन दाणे चटकन् झेलून भाऊसाहेबास प्रसाद म्हणून दिले. त्यांतील दोन कण भाऊसाहेबांनीं खाल्ले व एक आपले पत्नीस दिला.

महाराज भाऊसाहेबांकडे दोन दिवस मुक्कामास होते. तिसरे दिवशीं समर्थ जावयास निघाले. तेव्हां भाऊसाहेब त्यांस म्हणाले, "महाराज, पुन्हा या पामराला दर्शन द्यावें." "तुमची मनकामना निश्चित पूर्ण होईल," असें म्हणून समर्थ निलेगांवाहून बाहेर पडले. महाराजांचे कृपा प्रसादानें जहागिदारांस दोन कन्या व एक पुत्र झाला.

दत्तजयंतीचे निमित्तानें भाऊसाहेब श्रीस्वामी समर्थांचे दर्शनासाठीं गेले व आपल्या मुलामुलींस समर्थांचे चरणापाशीं ठेवून महाराजांची कृपा भाकली.

पुन्हा निलेगांवीं आपले मंगलदर्शन द्यावें अशी विनंती केली. या वेळींहि शनिवारीं निश्चयें आपले गांवीं येऊं असे समर्थांनी कबूल केलें.

## वचनपूर्तीसाठीं निर्याणानंतर पुनरागमन.

पुढें महाराज समाधिस्थ झाल्यावर, पांच दिवसांनीं शनिवारीं भक्तजनासहित निलेगावांबाहेर प्रगट झाले. ही बातमी गांवांत पसरतांच भाऊसाहेब इष्टमित्रांसह समर्थांचे दर्शनास गेले. व घरीं येण्याबद्दल विनंती करूं लागले. 'उद्यां तुमचे घरीं येऊं,' असें सांगून समर्थांनीं सर्वांस परत लावलें. रात्रींचे वेळीं समर्थांचे सान्निध्यांत चार घटका घालवाव्या या उद्देशानें मंडळी जो तिकडे गेली तों काय ! समर्थ गुप्त झालेले. भाऊसाहेबांस अत्यंत वाईट वाटलें. चोहोंकडे चौकशी सुरू झाली. पण कोठेंच शोध लागेना. म्हणून दुसरे दिवशीं पहाटें जासुदा करवीं निरोप पाठवून अक्कलकोटीं चौकशी कराविली. जासूद परत येण्यापूर्वीच त्या दिवशीं दुपारचे वेळीं भाऊ साहेब जेवावयास बसले असतां यतिवेशांत श्रीसमर्थ त्यांचे समोर प्रगट झाले. लगबगीनें त्यांना आसन वगैरे देऊन भोजनाची आग्रहानें विनंती करण्यांत आली. पण कांहींहि भाषण न करितां श्रीसद्‌गुरु एकदम अंतर्धान पावले.

अशा रीतीनें श्री समर्थांनी भक्ताला महा प्रयाणानंतरहि कबूल केल्याप्रमाणें शनिवारीं दर्शन दिलें.

कांहीं वेळानें अक्कलकोटहून जासुदानें समर्थांचे महाप्रयाण मंगळवारींच झालें असा निरोप आणतां सर्वांनाच समर्थ लीलेचा अचंबा वाटला. सद्गदित अंतःकरणानें समर्थ चरणीं सर्वांची मस्तकें लीन झाली.

# परिशिष्ट ( अ )

## श्री आनंदनाथ महाराजांचें चरित्र

श्री आनंदनाथ महाराज हे वालावलचे राहणारे असून कुडाळदेशकर ब्राह्मण होते. यांचे आडनांव वालावलकरच होतें. हे हरड्याचा व्यापार करीत. एकदां मुंबईस व्यापारानिमित्त भेंडे यांचे पेढीवर आले असतांना त्यांना समजलें कीं श्री अक्कलकोटला कोणी दत्तावतारी महाराज आहेत. ते तसेच निघून अक्कल-कोटस आले. तेथें वडाखालीं लहानशा तळ्यांत पाय धुण्यास उतरले. पाय धूत

असतांना वरून एक सुख्या डहाळीचा तुकडा त्यांचे मस्तकावर पडला. तेव्हां त्यांनीं वर पाहिलें. तों त्यांस महाराजांचें दिव्य दर्शन होऊन तत्काळ त्यांच्यावर कृपादृष्टि झाली. आनंदनाथ तेथेंच बैरागी झाले. त्या नंतर तेथें अक्कलकोटास ते सहा वर्षें राहिले. त्यांस स्फूर्ति होऊन ते भक्तिरसानें ओथंबलेले असे सुंदर अभंग म्हणून महाराजांसमोर नेहमीं भजन करीत. ते नेहमीं दिगंबर दशेंत रहात. त्या नंतर त्यांस महाराजांनीं बाहेर जाण्यास आज्ञा दिली. तेव्हां आनंदबुवा यांनीं महाराजांपाशीं प्रसाद मागितला. पूर्णब्रह्म साक्षात् परमात्मा श्री अक्कलकोट महाराज यांनीं अत्यंत सुप्रसन्न होऊन त्यांस आत्मपादुका स्वमुखांतून काढून दिल्या. त्या पादुका चिमुकल्या सुमारे अर्ध्या इंचाहूनही कमी आकाराच्या आहेत. त्यांत श्रींचे चरणदर्शन अति रमणीय असें होतें. त्या जरी लहानच आहेत तरी चरणावरील रेषान् रेषा अति स्पष्टपणें दृक्गोचर होतात. त्या कशापासून बनविल्या आहेत तें अद्यापही कोणांस सांगता येत नाहीं. त्या पादुकांचे दर्शनार्थ अनेक गांवोगांवचे भक्तजन येत असतात.

आनंदनाथ महाराजांनीं तीन मठ स्थापन केले आहेत. प्रथम एवले येथें मठ स्थापना केला. नंतर दुसरा मठ होडावडे येथें सावंतवाडी संस्थानांत स्थापन केला. व तिसरा मठ वेंगुर्ले कँपांत धावडे म्हणून ठिकाण आहे, तेथें स्थापन केला. हें स्थळ गांवा नजीकच एकांतांत व अति रमणीय असें आहे. तेथें श्री अक्कलकोट स्वामी महाराजांची अनेक भक्त मंडळी दर्शनार्थ येतात. व वर दर्शविलेल्या आत्मपादुकाही येथेंच आहेत. हे तीन्ही मठ आज सुस्थींत आहेत.

श्री आनंदनाथ महाराजांनीं श्रींच्यावर मोठें साहित्य निर्माण केलें आहे. त्यांत भूपाळ्या, भजनें, श्लोक आरत्या वगैरेंचा समावेश होतो. त्यांच्या साहित्याचा पुष्कळसा भाग अद्याप अप्राशितच आहे; वेंगुर्ले येथील मठांत दररोज सकाळीं त्यांनीं रचलेल्याच भूपाळ्या, काकड आरत्या, भजने वगैरे म्हणतात. तसेंच रात्रौही पूजा भजन, शेजारती समयीं त्यांचींच केलेलीं कवनें म्हटली जातात. तसेंच दरसाल सदर मठांत दत्तजयंती, स्वामींची पुण्यतिथी, स्वामी जयंती, गुरुप्रतिपदा, गुरुद्वादशी वगैरे उत्सव साजरे होतात. मागें स्वामी जयंतीस मुक्तद्वार असे. म्हणजे गावांतील रस्त्यावर मुद्दाम माणसें बसवून सर्वांस अगाऊ आमंत्रण देऊन भंडारा होत असे. व अशा रीतीनें फारच मोठी अन्नशांती होत असे. हल्लींही थोड्या बहुत कमी प्रमाणावर असाच कार्यक्रम चालू आहे.

श्री. आनंदनाथ महाराजांची रहाणी साधारण माणसाप्रमाणें नव्हती. ते मोठ्या इतमानानें रहात. त्यांचेकडे नोकर, चाकर, आचारी पाणके, गाई, म्हशी, बैल, गाड्या वगैरे असत. एक मोठ्या किंमतीची जातीवंत घोडीही त्यांनीं मठासाठीं बाळगली होती. एकंदरींत हा मठ त्यांचे हयातींत फारच थाटानें चालत असे. आनंदनाथ महाराजांस श्रींचे कृपेनें सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. व त्या योगानें त्यांनीं अनंत लोकांचे रोग बरे केले आहेत. त्यांस वाक्सिद्धिही प्राप्त झाली असल्यामुळें त्यांनीं अनंत लोकांचे कल्याण केले आहे.

सदर आनंदनाथ महाराजांनीं जेष्ठ शुद्ध ६ शके १८२५ (इ. स. १९०४) रोजीं वेंगुर्ले येथें जीवंत समाधी घेतली. मठाचे शेजारीच त्यांचा अन्त्य संस्कार झाला. व तेथेंच त्यांच्या पादुकाही स्थापन केल्या आहेत.

हे अक्कलकोटास आनंदबुवा या नांवानेच प्रसिद्ध होते.

( वेंगुर्ले येथील स्वामीभक्त श्री श्रीपाद धोंडशेट अरवारी यांनीं पुरविलेल्या माहितीवरून )

# परिशिष्ट ( ब )

## तात महाराजांचें चरित्र

मुंबई येथें धोबीतलावा नजीक जांबुळ वाडींत गौड सारस्वत ज्ञातीचे एक भेंडे उर्फ, बेरड आडनांवाचें कुटुंब रहात होतें. त्यांत तात महाराजांचा जन्म झाला. त्यांचे वडील हरब्याचा व इतर जिनसांचा मोठा व्यापार करीत असत. तात महाराज जन्मल्या पासून मातेचें दुग्ध प्यायले नाहींत. वयाच्या दोन वर्षांपासून एक लहानशी रेशमी लंगोटी लावून फिरत असत. वयाच्या तिसऱ्या वर्षां पासून त्यांस शंकराच्या आराधनेचा ध्यास होता. आणि म्हणून ते बाबुलनाथाचे पूजे करतां तेथें जात. त्या वेळीं तेथें आजच्या सारखी घनदाट वसती व टोलेजंग इमारतीही नव्हत्या. ती स्मशानवत् भूमी असून तेथें झाडी होती. वयाचे चवदावे वर्षी त्यांस अक्कलकोटचे महाराजांनीं दृष्टांत देऊन अक्कलकोटास बोलावले. पण तात महाराज तेथें गेले नाहींत; अशाच प्रकारें पुन्हां दृष्टांत झाला. तरी पण ते गेले नाहींत; मात्र जेव्हां तिसरून दृष्टांत झाला तेव्हां ते तेथें गेले. वडाखालीं आज जेथें लहानशी बावडी आहे तेथें तेव्हां लहान तळी

होती. त्या तळींत नेहमीच्या पद्धती प्रमाणें पाय धुऊन वर मठांत जाण्याची प्रथा होती. तात महाराज त्याप्रमाणें हात पाय धुऊन वर जात होते. इतक्यांत शंकर भक्त मार्कंडेय यांस जसें शंकरानें दर्शन दिलें, तसेंच दर्शन शंकरानें तात महाराजांस दिलें. पण यावेळीं शंकरानें हात जोडून श्री अक्कलकोट स्वामी महाराजांस नमन करीत आहेत असें दाखविलें. असें दृश्य पाहून तात महाराज श्री स्वामी समर्थांस तात्काल शरण गेले. व त्याच क्षणापासून ते शंकर भक्ति सोडून स्वामी भक्त बनले. कर्मधर्मसयोगानें या वेळीं श्री आनंदनाथ महाराजही तेथें होते. ते पाहून महाराज त्यांस वडील बंधू प्रमाणें मान देत असत. श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे कृपाप्रसादानें तात महाराजांस तेथेंच साक्षात्कार झाला. यांचा शिष्यगण गुजराथेंत व कारवारांत फार मोठा आहे. श्रींच्या कृपाप्रसादानें त्यांस सर्व सिद्धि अवगत असल्यामुळें त्यांनीं अनंत चमत्कार करून भक्त कामना तृप्त केल्या आहेत. कोणत्याही प्रकारच्या शरीर व्याधीने पीडलेल्या आपल्या भक्तास त्याचे हातीं स्वामीतीर्थ देऊन, ते आपणच प्राशन करून, त्याची व्याधी दूर करीत असत. तेही स्वामी चरणीं लीन होऊन बरीच वर्षें झाली आहेत.

(एका तात महाराजांचे भक्तानें माहिती पुरवल्या वरून.)

# परिशिष्ट ( क )

## दादरचे श्री. बाळकृष्ण महाराज ( सुरत ) यांचे चरित्र

श्री. बाळकृष्ण महाराज ह्यांचा जन्म सुरत शहरीं एका गुजराथी यजुर्वेदीय ब्राह्मण कुळांत शके १७८४ आश्विन वद्य ५ रविवारीं मध्यरात्रीं झाला. त्यांच्या वडिलांचें नांव शिवशंकर व मातोश्रीचे नांव श्री. देवकोरबाई असें होतें. त्यांचे शिक्षण सुरत व मुंबईस झालें. ते मुंबईत इंग्रजी शिक्षण आपला मोठा भाऊ सूर्यशंकर यांच्याकडे राहून घेत असत. ते इंग्रजी ७ व्या इयत्तेंत असतांना त्यांच्या कानीं दयानंद सरस्वतींचीं व्याख्यानें आलीं, व ते नास्तिक बनले. त्यांनीं स्नान संध्या वगैरे सोडून दिली. त्यांचा भाऊ रविशंकर ह्याची मैत्री श्रीरामचंद्र व्यंकटेश ब्रेरड ऊर्फ तातमहाराज ह्या नांवाच्या स्वामी भक्ताबरोबर होती. ह्या तातमहाराजांना श्रीस्वामींचे दर्शन झाले होते. ह्या श्रीतातमहाराजांची व श्रीबाळकृष्ण महाराजांची गांठ त्यांच्या भावाने घालून दिली. श्रीतातमहाराजांचे उपदेशा-

मृतामुळें श्रीबाळकृष्ण हे पण स्वामीभक्त बनले. श्रीबाळकृष्ण महाराजांचें मुंबई, पुणें, सुरत, आदी शहरीं पुष्कळ भक्त होतें. त्यांनीं सुरत येथें श्रीस्वामींचा मठ सन १९११ सालीं स्थापन केला. त्यांनीं शके १८४० वैशाख वद्य ११ बुधवार रोजीं सुरत मुक्कामी सकाळीं ६–१५ च्या पहाटेला देह ठेविला. त्यांच्या समाधीचे देऊळ सुरत येथें तापी नदीचे कांहीं अश्विनीकुमार घाटावर त्यांच्या भक्त मंडळीनें बांधले आहे.

हे महाराज पूर्वाश्रमीं मुंबईत गोकुळदास संस्कृत पाठशाळेंत संस्कृत मास्तर होते. ते शेअर बझारमध्यें पण काम करीत असत. तेथें त्यांना ठोकर बसल्यामुळें त्यांची वृत्ति पारमार्थिक आधींच होती, ती जास्त श्रीस्वामी भक्तिकडे वळली. त्यांना श्रीस्वामींचा साक्षात्कार होऊन ते पूर्ण विरक्त व सिद्धभक्त बनले.

त्यांनीं पुष्कळ चमत्कार केले. त्यापैकीं एक दोन येथें नमूद करतों.

पुण्याच्या फुलगांव येथील धोत्रे कुटुंबांतील एका भावाचे लग्न पेरणे मुक्कामीं होतें. त्यांनीं घेतलेला वाडा भुताटकीचा होता. तेथें नवऱ्या मुलाचे भावाला– सदाशिवाला पिशाचानें सर्परूपानें दंश केला. त्यावेळीं श्री बाळकृष्ण महाराज तेथें होते. त्यांनीं त्या पिशाचाला मुक्त केले. तेव्हां तो सर्प तेथें सदाशिवाचे पायाजवळ मरून पडला, व सदाशिव सावध झाला.

श्रीसद्गुरु बाळकृष्ण महाराज हे भजनाचें भोक्ते होते. भक्तमंडळी भजन करीत असतां त्यांनीं कधीं पुरें म्हटलें नाहीं. त्यांच्या नित्य क्रमाला साधारण आठ तास लागत. व जेव्हां भजन सुरू असेल तेव्हां तीन तीन दिवसांत अन्न ग्रहण न करतां ते ऐकत बसत. माहीमचें कै. श्री. अण्णा काटेकर यांचे बरोबरच्या माहीमकर मंडळीचें भजन त्यांना प्रिय असें. शनिवारीं रात्रीं भजनाला सुरवात झालीं कीं रविवारीं सकाळीं उशीरा पर्यंतहि भजन आटपत नसें. भजनाचें पूर्वीं महाराज निरनिराळ्या ग्रंथांवरती विवेचन करीत असत. व त्यांच्या दादरच्या मठांत शेंकडो मंत्रमुग्ध होऊन त्यांचे मार्मिक विवेचन ऐकत असत. ग्रंथांत एकनाथी भागवत ह्रा ग्रंथ प्रामुख्यानें असें. श्री. अक्कलकोट स्वामी महाराजांचे चरणीं ते एक जीव झालेले होते. एकांत अनेक पहावे व अनेकांत एक पहावा, ही त्यांची शिकवण होती. त्यांचे जवळ जातिभेद व धर्मभेद नव्हता. त्यांचे कडे दर्शनास येण्यास हिन्दू, मुसलमान, पार्शी, खिश्चन यांस कोणासही मज्जाव नव्हता. दर्शनासाठीं व

भजनासाठीं माझ्या मठाचें दार केव्हांही बंद रहाणार नाहीं, हें त्यांचें ब्रीद होतें. त्यांनीं अनेक लोक समर्थांचें उपासनेला लावलें. त्यांत प्रामुख्यानें ऑनरेबल एन्. एम्. समर्थ, प्रो. नागरकट्टी, दाभोळकर, पिळगांवर वकील, सॉ. रेळे, श्री. भाऊसाहेब देशमुख, श्रीमुस, श्री. विश्वनाथ मो. कोठारे, भगवंतराव परळकर वगैरे अनेक गृहस्थांचा उल्लेख करतां येईल. आज त्यांनीं स्थापन केलेला श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचा मठ डी. एल. वैद्यरोड, दादर, मुंबई येथें चालू आहे. व तेथें शेंकडो लोक श्री अक्कलकोट स्वामी महाराजांच्या उपासनेचा लाभ घेत आहेत.

( दादर येथील एका बाळकृष्ण महाराजांचे भक्तानें पुरविलेल्या माहीती वरून )

# परिशिष्ट (ड)

[ श्री. सदाशिव नारायण भट, ६६८ सदाशिव पेठ, भटांचा वाडा, पुणें २, कळवितात कीं त्यांचे घरीं महाराजांचे देवस्थान आहे. व तेथें दर्शनास पुष्कळ लोक येतात. त्यांही पाठविलेल्या त्यांच्या स्वानुभवाच्या दोन गोष्टी खाली दिल्या आहेत. ]

१ "आमचें ऑफीस (डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ मुंबई इलाखा) ता. २७ डिसेंबर १९४१ पासून पुण्याहून मुंबईस बदललें. १९४२ चे मे महिन्यांत स्वामींनीं मला सांगितलें, "तूं मुंबईस बिन्हाड करूं नकोस. कारण पुढील वर्षी तुझी पुण्यास तारेने बदली होईल व पुन्हां मुंबई दिसणार नाहीं." त्या प्रमाणें ९ सप्टेंबर १९४३ रोजीं मुंबई सरकारची आम्हांस पुण्याहून तार येऊन आमचें सर्व ऑफीस पुन्हां पुण्यास परत आणले. पुन्हां १९५२ मध्यें ऑफीस मुंबईस यावयाचें घाटत होतें. तेव्हां महाराजांनीं सांगितलें, "ऑफीस मधील सर्वजण पेढे वाटा. ऑफीस मुंबईस जात नाहीं." ह्या प्रमाणेंच पुढें घडलें."

२ मी ऑक्टोबर १९५३ मध्यें पेन्शन घेतल्यावर, पैशाची टंचाई साहजिकच पडली. तेव्हां १९५४ सालीं महाराजांनीं दृष्टांत दिला, व म्हणाले, "तेणें तूझी काय, केली नाहीं चिंता राहे त्या अनंता आठवूनी ॥ १ ॥ त्या नंतर १५ नव्हेंबर १९५४ पासून मजला पुणें येथील वाडिया कॉलेजमध्यें नोकरी लागली आहे."

## परिशिष्ट ( इ )

श्री स्वामीरायांच्या प्रयाणा नंतर श्री ब्रह्मनिष्ठ वामनबुवा वांबोरीकर हे बडोदेस गेले. तेथें त्यांनीं संन्यास घेऊन ते लवकरच आजारी पडले व चैत्र शु॥ ५ मी प्लवनाम संवत्सरे शके १८२३ रोजीं स्वामी चरणीं लीन झाले.

## परिशिष्ट ( ई )

### श्री अक्कलकोट मधील महाराजांचे मठ

हल्लीं श्रीअक्कलकोट येथें चार पांच मठ आहेत, ते येणें प्रमाणें:—(१) वडाखालील मठ, (२) श्री समाधीकडील मठ, (३) श्रीसद्गुरु बाळप्पांचा मठ (४) श्रीराजे रायराय यांचा मठ व (५) श्री जोशीबुवा यांचा मठ.

### वडाखालील मठ

वडाखालील मठ हा सर्वांत जुना मठ आहे. महाराजांचें अत्यंत आवडीचें बसण्याचें नेहमीचें ठिकाण म्हणजे हाच वटवृक्ष होय. येथेंच महाराजांनीं अनंत लीला करून भक्तकामकल्पद्रुम या नामाची सत्यता पटवून दिली.

फार पूर्वीं या ठिकाणीं एक लहानसें छप्पर होतें. पुढें जसजसा महाराजांचा भक्तगण वाढूं लागला. तसतशी येथील झाडी कमी झाली, व सुंदर अशा वटवृक्षाखालीं एक सुंदर क्षेत्रच निर्माण झालें.

प्रथम येथें एक लहान गाभारा व सभामंडप बांधण्यांत आला. नंतर आजचा मोठा मंडप, तसेंच गाभारा, गणपती मंदिर, शेज मंदिर, वगैरे नवीन इमारती बांधण्यांत आल्या. तसेंच समोर धर्मशाळा व नगारखानाही भक्त मंडळीनीं बनविला आहे. अशा प्रकारें भक्त–मंडळी व यात्रेकरूंस उतरण्याची सोय आहे.

येथें वडाखालीं एक बावडी ( आड ) आहे. ते समर्थांचें तीर्थ समजलें जातें. सदर विहिरीचें पाणी फारच चांगलें आहे. कितीही तें पाणी प्यालें तरी मनाचें समाधान होत नाहीं, व अधिक प्यावें असें वाटतें. तें प्रकृतीस अपायकारकही होत नाहीं. त्यांत अन्नपाचन करण्याची शक्ति फारच आहे. महाराजांचे कृपाप्रसादानेंच

सदर तीर्थांचे पाणी थंड, रुचकर, हलके व अत्यंत पाचक असें आहे. सदर वडाखालील मठ, वटवृक्ष, व बावडी यांचे छायाचित्र दिलें आहे.

एकंदरींत हें स्थान अत्यंत रमणीय भासतें. येथील भव्य, विशाल, अत्यंत प्रशांत व रमणीय अशा वटवृक्षाचे शीतल छायेमध्यें श्रीसमर्थ असतांना जो कृपाप्रसाद भक्तजनांना मिळाला, तोच प्रसाद अद्यापपर्यंत त्यांचेच कृपेनें आजहि सर्व आर्त, जिज्ञासु व मुमुक्षु भक्तमंडळीस मिळून येथें मनाचें समाधान होतें.

श्री स्वामी महाराजांनीं सुमारें २१ वर्षें अक्कलकोटांत वास करून अखेरीस आपला पार्थिव देह याच वडाखालीं ठेविला. व तो तेथूनच बुधवारांतील समाधि मठांत मोठ्या थाटानें नेण्यांत आला, व तेथें भक्त चोळापानें मुद्दाम बांधून ठेविलेल्या, 'ब्रह्मानंद गुहेंत' महासमाधि देऊन ठेवण्यांत आला. व त्यावर सुंदर समाधि बांधण्यांत आली आहे. अत्यंत प्रेमळ व खरे श्रद्धान्वित भक्तजनांस स्वामी महाराज येथेंही प्रत्यक्ष दर्शन अद्याप देत आहेत. सदर समाधिचें नित्य दर्शन व्हावें व्हणून सोबत छायाचित्र दिले आहे.

वडाखालील मठांत हल्ली श्री दिगंबर दत्तात्रेय हे पुजारी आहेत. हे चोळापाचे पणतु. हे सौम्य, प्रेमळ, निगर्वि व भक्तियुक्त असल्यामुळें पुष्कळ भक्त जनांचे आवडते आहेत.

वडाखालील मठांतलि नित्य कार्यक्रम यात्रेकरूंचें माहितीकरितां देण्यांत येत आहे.

पहाटे पांच वाजतां काकड आरती होते. नंतर सर्वांना समर्थांचे मठांतील गाभाऱ्यातील पादुकांचे दर्शन होऊन, प्रसाद मिळतो. सदर गाभार्यांचे आंतील सर्व दृश्य व पादुकांचे नित्य दर्शन व्हावें म्हणून त्याचे छायाचित्र दिले आहे. नंतर पूजा वगैरे होऊन आरती होते व तिर्थ मिळते. त्यानंतर कोणाही भक्तमंडळीस पूजा, अभिषेक, लघुरुद्र, महारुद्र वगैरे अकरा वाजेपर्यंत करता येतो. नंतर नैवेद्य होतो. सायंकाळीं ८ चे सुमारास धूपारती, आरती व शेजारती एकदमच होते. दर गुरुवारीं पालखी निघते.

एरवीं कोणीहि पालखी काढविल्यास ती सेवा त्यांना करतां येते. दर गुरुवारीं सोमवारीं व एकादशीस रात्रौ १२ पर्यंत भजन चालते.

**उत्सवः**—येथें मुख्य दोन उत्सव होत असतात. एक श्रींची पुण्यतिथी चैत्र वद्य १३ शीस, व दुसरा दत्तजयंतीचा म्हणजे मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेचा. तसेंच



श्री स्वामी महाराज यांचा वडाखालील मठ, अक्कलकोट.



वडाखालील मठाचा गाभारा-अक्कलकोट

स्वामी जयंतीचा चैत्र शुद्ध २ चा व गुरुप्रतिपदेचा म्हणजे माघ वद्य १ चा असे प्राणसी दोन उत्सव लहान प्रमाणांत होतात.

श्री स्वामीसमर्थ पुण्यतिथीचा उत्सव चैत्र वद्य ६ पासून चैत्र १४ पर्यंत चालतो. वद्य ६ पासून अखंड नाम सप्ताह, कथा, कीर्तन, पारायण, भजन, भोजन प्रसाद हें कार्यक्रम असतात. चैत्र वद्य १३ शीस श्रींस लघुरुद्रभिषेक होऊन, ब्राह्मण भोजन होते. सायंकाळीं ७ वाजतां समर्थांचें पालखीची सर्व लवाजम्यासह गांवांतून मोठ्या प्रमाणावर मिरवणूक निघून, समाधिस्थानापर्यंत जाते. तेथें आरती वगैरे होऊन, रात्रीं बारा वाजतां मिरवणूक परत येते. वाटेंत एकठिकाणीं महाराजांची पूजा आतरी वगैरे होते. हा सोहळा मोठा छानच भक्तिरसानें भरलेला असल्यामुळें फारच आकर्षक असा असतो. कितीही नास्तिक असला तरी नम्रच होतो. नंतर दुसरे दिवशीं म्हणजे चैत्र वद्य १४ शीस लघुरुद्र, अभिषेक, महापूजा होऊन भंडारा प्रसाद सर्वांना मुक्तद्वार महाप्रसाद मिळतो. सायंकाळीं गोपालकाला होऊन उत्सवाची समाप्ति होते.

श्री दत्तजयंतीच्या उत्सवास मार्गशीर्ष शुद्ध ८ मी पासून पारायण, सप्ताह, कथा कीर्तन, वगैरे चालू असतात. पौर्णिमेस सायंकाळीं प्रदोष वेळीं श्री दत्तजन्मोत्सव होतो. नंतर दुसरे दिवशीं पुण्यतिथि उत्सवाप्रमाणेंच मिरवणूक, भंडारा प्रसाद मिळून उत्सव संपतो.

श्री स्वामीसमर्थ महाराजांचे समाधि नंतर वडाखालील मठांतील व समाधिचे मठांतील पूजा अर्चा नैवेद्य, नंदादीप, उत्सव वगैरे व्यवस्था श्रीमंत राजेसाहेब यांचे कडून नक्त नेमणूक मिळून होत होती. श्रीसमर्थांनीं देह ठेवल्या नंतर श्रीमंत राजेसाहेब, चोपाळाचे वंशज व भक्त मंडळीकडून वडाखालीं श्रीसमर्थांनीं देह ठेवल्या ठिकाणीं, सुंदर शिवलिंग व महापादुका श्री स्वामींचे आज्ञेप्रमाणें स्थापन केल्या आहेत. पुढें व्याप वाढत चालला म्हणून इ. स. १९२२ चे सुमारास व्यवस्थेसाठीं पंच नेमले गेले. दोन्ही मठांची व्यवस्था श्री चोळाप्पाचे वंशजा-मार्फतच अद्याप चालू आहे. पूर्वीं संस्थानांतून मिळत असलेली नेमणुक हल्लीं बंद आहे. पुजारी, ट्रस्टी व भक्त मंडळीचे सहायानें हे सर्व उत्सव स्वामी महाराजे कृपेनें हल्लीं चालत आहेत. देवस्थानचे कायम उत्सव थोडे असलें तरी समर्थ कृपेनें कांहींही उणे पडत नाहीं.

[ लिहून आलेला मजकूर ]

## श्री सद्गुरु बाळाप्पा महाराजांचा मठ.

हा मठ मध्य वसतींत असून फार मोठा आहे. येथें भक्त मंडळीस उतरण्या चांगली सोय आहे. येथील व्यवस्था हल्लीं श्री गजानन महाराज यांचेकडे अ त्यांचा स्वभाव गोड, मनमिळाऊ व प्रेमळ आहे. तसेंच ते स्वामीभक्तिपरायण अस मुळें त्यांचेकडे यात्रेकरूंची नेहमीच दाटी असते. तसेंच त्यांच्या पत्निचांही स्वभा गोड असल्यामुळें दुधांत साखर पडून कितीही यात्रे करू आले तरी त्यांचे निरलसपणें व प्रेम भावानें सोय होते. ही स्वामी महाराजांची मोठी कृपा आहे येथेंही पान २८८–२८९ मध्यें वर्णन केलेले सर्व नित्यक्रम व महत्वाचे उत्स चांगल्या रीतीनें साजरे करण्यांत येतात. येथें अजूनहि महाराजांचा प्रत्यक्ष वा असल्याचे पुष्कळांचे अनुभवास येत आहे.

॥ ॐ तत्सत् ॥

॥ श्री स्वाम्यर्पणमस्तु ॥

अनुक्रम २१३२३ दि
क्रमांक ... नों: दि: ...
REFBK-0008945